ारतीय साम्राज्य.

रायण भवानराव पावगी

यानें रचिलें असे.

तें

णें येथें "इंदिरा" छापखान्यात छापिलें.

शके

प्लवनाम संवत्सरें.

॥ श्री ॥

सद्गुरुचरणारविंदीं

नमन करून

ही

ग्रंथरूपी

यथाशक्ति व यथामति केलेली

अत्यल्प

देशसेवा

नारायण भवानराव पावगी

यानें

आपल्या दयितआर्यभूमीच्या ठिकाणीं

असलेल्या अत्युत्कट

प्रीत्यर्थ

सकल

आर्यभगिनींस व आर्यबांधवांस

प्रीतिपूर्वक

अत्यादरानें समर्पिली असे.

भ

प्रस्तावना.

राष्ट्रींचें वचन निश्चित । परि अत्यंत रसभरित ।
ना मक्षिकांचे मुखीं स्रवत । मधुरस जैसें कां ॥२९५॥
वीण राज्य आलें हातां । तरी कां हो सोडावें तत्त्वता ।
त भाषा ऐकोनि कथा । लाभ श्रोतीं घेईजे तैवी ॥२११॥
(श्रीधरकृत रामविजय. अ० १ ला.)

श्री सद्गुरु मंगलमूर्तींच्या कृपेनें, भारतीय साम्राज्य हासमालेंतील पु० १ आर्यदेश व तत्संबंधीं वृत्तांत, पु २ आर्यलोक व त्यांचे बुद्धिवैभव, पु० ३ आर्येति- व भूगोल, पु० ४ आर्यशास्त्र व कला, पु० ५ र्यशासनपद्धति व संस्था, पु० ६ आर्यगृहस्थिति, नीति, , व उन्नत्ति, पु० ७ भरतखंडांतील मुख्य धर्म, ८ भरतखंडांतील जातिवैचित्र्य, पु० ९ भरतखंडांतील ाविध भाषा, आणि पु १० संस्कृत भाषेचा इति- , अशीं आजपर्यंत प्रसिद्ध झालीं असून, प्रस्तुतच्या राव्या पुस्तकांत, प्राकृत व मराठी भाषेचा इतिहास ाचा आमचा विचार आहे.

आतां, प्राकृत भाषांचा प्रादुर्भाव ब्राह्मणकाळांत, णि महाभारत कालापूर्वीं होऊं लागला असल्याचें दि- , व त्यावरून, इ० स० पूर्वीं सुमारें तीन हजार वर्षां नच, संस्कृतांत थोडाबहुत अपभ्रंश होऊन, अशुद्ध

अथवा प्राकृत भाषांचा उद्भव होऊं लागला असावा, असें वाटतें. (भाग ७२ वा, व पुढील पानें ९७, १०२, १०४–१०८ पहा.)

तदनन्तर, कालान्तरानें, महाराष्ट्री, मागधी, शौरसेनी, इत्यादि भाषा प्रचारांत आल्या, आणि इ० स० च्या दहाव्या शतकांत किंवा त्या सुमारास, महाराष्ट्रीपासूनच मराठीचाही प्रादुर्भाव झाला.

ह्या मराठी भाषेचा इतिहास इ० स० च्या दहाव्या शतकापासून सुरू होत असून, तो इ० स० १९०० अखेर-पर्यंत देण्याचा आमचा विचार आहे; आणि प्राकृत भाषांचा उद्भव इ० स० पूर्वी तीन हजार वर्षांपलीकडील काळांत होऊं लागल्यामुळें, ह्या तीन हजार वर्षांतीलच त्यांचें इतिवृत्त देणें अगदी आवश्यकतेचें आहे.

तेव्हां, इतक्या दीर्घकालाचा, ह्मणजे सुमारें पांच हजार वर्षांचा, प्राकृत व मराठी वाङ्मयाचा इतिहास लिहिण्याचें मी मनांत योजिलें आहे. परंतु, ह्या संबंधानें माझ्या जवळील सामग्रीचा, आणि माझ्या स्वतःच्या पात्रतेचा विचार मनांत आला, ह्मणजे माझें हृदय फारच साशंक होतें, व माझा धीर तर अगदींच सुटतो.

शिवाय, प्राकृत व मराठी भाषेचा इतिहास लिहिण्याच्या संबंधानें, हा केवळ प्रथमच प्रयत्न असल्यानें, या लेखकानें सादर केलेल्या यत्नांत, असंख्य दोष निघतील, ह्यांत शंकाच नाहीं. ह्यासाठीं, वाचकांचें प्रेम, त्यांचा अनुग्रह, आणि त्यांची क्षमाशीलता, यांजवर नजर देऊन, ही अत्यल्प

सेवा त्यांनीं गोड करून घ्यावी, अशी माझी त्यांस सविनय विज्ञप्ति आहे. कारण,

मी तरी सर्वाविषयीं हीन । ऐसें साक्ष देतसे मन ।
परी कृपा केली कवण्या गुणें । त्याचें कारण तो जाणे ॥
आंधारानें कोंदलें अंबर । त्यासी प्रकाशमान करी दिनकर ।
कां परिस लोहासि लागतां सत्वर । कालिमा अणुमात्र न राहे
एकएक अक्षराची भीक । कृपा करोनि द्याल सकळिक ।
तरीच वाढेल माझा लौकिक ॥ सप्रेमसुख श्रोतया ।
तैसाचि मी मतिहीन । नेणें कवित्व कळा लक्षण ।
ग्रंथ प्रारंभ केला जाण । भरंवसा धरून संताचा ॥

शेवटीं, त्या जगन्नियंत्या श्री सद्गुरूच्या कृपेनेंच हा ग्रंथ पुरा झाल्यामुळें, त्याचे अहर्निशीं अनन्त उपकार मानून, ही प्रस्तावना मी पुरी करितों.

मुक्काम पुणें गुरुवार. मार्गशीर्ष शुद्ध १. शके १८२३. प्लवनाम संवत्सरें. — नारायण भवानराव पावगी.

अनुक्रमणिका.

भाग ७० वा— पृष्ठ.

पूर्वपीठिका, अथवा महाराष्ट्र व इतर प्राकृत भाषांचा मूलवृत्तान्त. १

भाग ७१ वा—

प्राकृत व मराठी भाषेची उपपत्ति. ४६

भाग ७२ वा—

प्राकृत व मराठी भाषेच्या कालाचा विचार.... ... ९३

भाग ७३ वा—

संस्कृत शब्दांचें रूपान्तर व स्थित्यन्तर आणि त्यामुळें प्राकृत व मराठी भाषेची झालेली रचना. १२०

भाग ७४ वा—

अपभ्रंशाचे सामान्य नियम. १३७

भाग ७५ वा—

मराठी भाषेचें प्रास्ताविक विवेचन. १५२

भाग ७६ वा—

मराठी भाषेची बाल्यावस्था–प्रथमकाल. १५८

भाग ७७ वा—

मराठी भाषेची बाल्यावस्था व प्रथमकालाचें सिंहावलोकन. १७८

भाग ७८ वा—

मराठी भाषेची बाल्यावस्था–द्वितीय काल.... ... १८३

भाग ७९ वा—

मराठी भाषेची युवावस्था–प्रथम काल. १८५

भाग ८० वा—

मराठी भाषेची युवावस्था–प्रथमकाल–उपसंहार. ... २०८

भाग ८१ वा—

मराठी भाषेची युवावस्था–द्वितीयकाल. २११

भाग ८२ वा—
मराठी भाषेच्या युवावस्थेतील द्वितीय काल-सिंहावलोकन. २३२
भाग ८३ वा—
मराठी भाषेची युवावस्था-तृतीयकाल. २३६
भाग ८४ वा—
मराठी भाषेची प्रौढावस्था-प्रथमकाल, व उपसंहार. २४१
भाग ८५ वा—
मराठी भाषेची प्रौढावस्था-द्वितीयकाल. २५४
भाग ८६ वा—
मराठी भाषेच्या प्रौढावस्थेतील द्वितीयकाल-सिंहावलोकन. ३००
भाग ८७ वा—
मराठी भाषेची प्रौढावस्था-तृतीयकाल. ३१३
भाग ८८ वा—
मराठी भाषेची प्रौढावस्था-तृतीयकाल-ऐतिहासिक ग्रंथ. ३५२
भाग ८९ वा—
मराठी भाषेच्या प्रौढावस्थेतील तृतीयकाल-उपसंहार. ३६१
भाग ९० वा—
मराठी भाषेची प्रौढावस्था-चतुर्थकाल. ३६६
भाग ९१ वा—
मराठी भाषेची प्रौढावस्था-चतुर्थकाल-सिंहावलोकन. ३९२
भाग ९२ वा—
मराठी भाषेच्या संबधानें आमचें शैथिल्य, आणि त्याचा विघातक परिणाम. ३९९
भाग ९३ वा—
मराठी भाषोन्नत्यर्थ उचित उपाय. ४०७
भाग ९४ वा—
मराठी भाषेचा धार्मिक, नैतिक, सामाजिक आणि राजकीय परिणाम. ४२९

भारतीय साम्राज्य.

उत्तरार्ध.

पुस्तक अकरावें.

प्राकृत व मराठी भाषेचा इतिहास.

भाग ७० वा.

पूर्वपीठिका,

अथवा

महाराष्ट्र व इतर प्राकृत भाषांचा मूलवृत्तान्त.

प्राकृत भाषा, व त्यांचा उद्भव.

संस्कृत भाषेचें स्थित्यन्तर आणि रूपान्तर होऊन, तिच्यापासून ज्या अनेक भाषा भरतखंडांत उद्भवल्या, त्यास प्राकृत अशी संज्ञा आहे. ह्यांपैकीं, १ महाराष्ट्री, २ मागधी, ३ शौरसेनी, व ४ पैशाची, या भाषा मुख्य असून, त्यांत देखील महाराष्ट्र ही श्रेष्ठतम आहे, यांत बिलकुल शंका नाहीं.

आतां, कोणत्याही भाषेच्या इतिहासांत, तिचा साद्यन्त ऊहापोह होणें फारच अगत्याचें असतें. आणि म्हणूनच प्राकृत किंवा मराठी भाषेचा इतिहास लिहावयास लागलें, म्हणजे तिची मूळ स्थिति कशी होती; ती कोणत्या वेळी उद्भवली; तिला कोणी जन्म दिला; ती केव्हां उदयास आली; तिचें जन्मस्थान कोणतें; तिची उपपत्ति कशी आहे; इत्यादि नितान्त महत्त्वाच्या प्रश्नांचा विचार केल्याशिवाय गत्यन्तरच नसतें. शिवाय, तिचें बीजारोपण, तिची बाल्यावस्था, तिचें तारुण्य, तिची प्रौढदशा, तिची गलितावस्था तिची अनास्था, तिची अवनति, व तिची पुनश्च होऊं लागलेली उन्नति, इत्यादि बाबतींतही सविस्तर विवेचन सर्व बाजूंनीं झालें पाहिजे. सबब, तिकडेच आतां प्रथमतः वळतों.

प्राकृत व मराठी भाषेच्या पूर्ववृत्तान्ताचा विचार.

आपण हल्लीं जी मराठी भाषा बोलतों, ती प्राक्कालीन महाराष्ट्र भाषेपासूनच उत्पन्न झाली आहे, हें कोणालाही कबूल करावें लागेल. तथापि, ह्या दोहोंत सुद्धां बरेंच अन्तर दिसून येतें; आणि ऐतिहासिक दृष्टीनें तर, तें खरोखरच विशेष महत्वाचें वाटतें. कारण, तें कित्येक राजकीय, धार्मिक, सामाजिक, व इतर संयोगांनींच घडून आलेलें असतें. तेव्हा, अशा प्रकारचा वृत्तान्त निःसंशय बोधप्रद आणि मनोवेधक असल्यामुळें, प्रस्तुत पुस्तकांत

मराठी भाषा व तिचें जन्म.

प्राकृत व मराठी भाषेचा इतिहास यथावकाश देण्याचें आम्हीं योजिलें आहे.

संस्कृत, प्राकृत, व मराठी ह्यांचा परस्परसंबंध.

प्रथमतः, संस्कृत भाषेनेंच प्राकृत[1] किंवा महाराष्ट्र भाषेला जन्म दिला असून, ह्या भाषेपासूनच मराठी भाषा उद्भवली आहे. तेव्हां, या सर्वांचा परस्पर अगदीं निकट संबंध असल्यानें, एकीचें विवेचन करावयास लागलें, म्हणजे दुसरीची हकीकत द्यावी लागते; आणि दुसरीची दिली, म्हणजे तिसरीचाही थोडाबहुत उल्लेख करणें भाग पडतें.

वररुचि, व त्यानें प्राकृत भाषेचे केलेले मुख्य भेद.

आमच्या भरतखंडांतील पुराणतम प्राकृत वैयाकरण म्हटला म्हणजे वररुचि असून, ह्यालाच कात्यायन अशी देखील संज्ञा आहे, असें कित्येक म्हणतात. हा विक्रमादित्याच्या राजसभेंतील नवरत्नापैकीं एक होता, असें दिसतें; व त्यावरून, तो इ. स. पूर्वी ५६ सालच्या सुमारास उदयास आला असावा, असें पौरस्त्य आणि

[1] प्राकृत किंवा महाराष्ट्र हे निव्वळ पर्याय शब्दच होत. किंबहुना, महाराष्ट्र म्हणजे सर्वांत उत्तम म्हणून नांवाजलेली 'प्राकृत' भाषाच समजावयाची, यांत तिळमात्र देखील शंका नाहीं. आणि सुप्रसिद्ध कवि दण्डीनें तर, आपल्या जगत्प्रसिद्ध काव्यादर्शांत तद्विषयक स्पष्टच उल्लेख केलेला असल्यामुळें, ती गोष्ट आतां सर्वमान्य झाली आहे. दण्डी म्हणतो,

महाराष्ट्राश्रयांभाषां प्रकृष्टं प्राकृतं विदुः ।
(का. द. १.३४)

पाश्चात्य विद्वज्जनांच्या मतें ठरतें. ह्यानें प्राकृत भाषेचे मुख्यत्वेंकरून चार भेद केले आहेत. १ महाराष्ट्र, २ शौरसेनी, ३ मागधी, व ४ पैशाची. ह्यांपैकीं, मागधी आणि पैशाची[3] ह्या शौरसेनीपासून उद्भवल्या असून, शौरसेनी[4] व महाराष्ट्री[5] ह्या संस्कृतजन्य असल्याबद्दल, त्यानें अगदीं स्पष्टतेचाच उल्लेख केला आहे.

१ कॉवेल संशोधित प्राकृतप्रकाश पहा. ह्याच्याच प्रस्तावनेंत कॉवेल असें स्पष्टपणें लिहितो कीं,

" Vararuchi appears to have been the first grammarian who reduced these popular dialects to a system, and, if we may receive the Hindu tradition, he was one of the ' Nine Gems ' who flourished at the Court of Vikramâditya, king of Oujein, whose great victory over the Sakas, as they passed onward towards India, after overrunning Bactria, B C. 56, is the traditional epoch from which the Hindns still date their Samvat Era " (P. VI. 1868)

२ प्रकृतिः शौरसेनी ॥२॥ (प्राकृत प्रकाश. परिच्छेद् ११वा.)

३ प्रकृतिः शौरसेनी ॥ २ ॥ (प्रा० प्र० परिच्छेद्. १० वा.)

४ प्रकृतिः संस्कृतम् ॥ २ ॥ (प्रा० प्र० परिच्छेद्. १२ वा.)

५ इतर सर्व बाबतींत, शौरसेनी हीं महाराष्ट्र भाषेप्रमाणेंच असल्याचें सांगून, वररुचि म्हणतो, शेषंमहाराष्ट्रीवत् ॥ ३२ ॥ (प्रा. प्र. प. १२ वा.) ह्यावरून, महाराष्ट्री भाषा संस्कृतोद्भवच असल्याचें उघड दिसतें. शिवाय, प्रत्यय, समास, तद्धित, लिंग, आणि वर्णकादिविधि, यांत सुद्धां संस्कृताप्रमाणेंच तिची व्यवस्था लागते, असेंही खालीं लिहिलेल्या सूत्रावरून चांगले व्यक्त होतें.

(पुढें चालू)

दण्डीनें प्राकृत भाषेचें केलेले प्रकार.

दण्डी हा प्राकृतभाषा संस्कृतोद्भव असल्याचेंच लिहितो; आणि तिचे १ तद्भव, २ तत्सम, व ३ देशी, असे तीन प्रकार सांगून, त्यांचे महाराष्ट्र, शौरसेनी, गौडी, लाटी, अपभ्रंश, भूतभाषा म्हणजे पैशाची, इत्यादि अनेक भेद आहेत, म्हणून वर्णन करितो.

आतां, १ तद्भव, २ तत्सम, आणि ३ देशी, ह्या तीन प्रकारांनीं दण्डीनें जें प्राकृत भाषेचें सदरीं नमूद केलेलें वर्गीकरण केलें आहे, तें चागल्या रीतीनें ध्यानांत येण्यास्तव, त्या प्रत्येकाचें उदाहरण देऊन, किंचित् दिग्दर्शन करतों.

त्याची फोड.

प्राकृत भाषांपैकीं, प्रत्यक्ष संस्कृतापासूनच उद्भवलेली जी महाराष्ट्र भाषा, तींत संस्कृतोद्भव शब्दांचा विशेष भरणा असल्याचें दिसतें. आणि म्हणूनच हिच्यांतील खग्ग वगैरे

(मागील पृष्ठावरून पुढें चालू.)

• शेषः संस्कृतात् ॥ १८ ॥ (प्राकृत प्रकाश. परिच्छेद ९ वा.) ह्या सूत्राची व्याख्या भामहानें आपल्या "मनोरमा" नामक टीकेंत जरा विस्तृत रीतीनें दिली आहे. तो म्हणतो,

उक्तादन्यः शेषः । प्रत्ययसमासतद्धितलिंगवर्णकादिविधिः शेषः संस्कृतादवगन्तव्यः । इहग्रंथविस्तरभयान्नदर्शितः ।

१ संस्कृतं नामदैवीवागन्वाख्यातामहर्षिभिः ।
तद्भवस्तत्समोदेशीत्यनेकः प्राकृतक्रमः ॥ ३३ ॥
(काव्यादर्श प. १.)

शब्दांचा समावेश तद्भव वर्गांत करण्यांत येतो. हिण्डीर, हुण्डे, इत्यादि शब्द संस्कृतोद्भव नसून, संस्कृततुल्य आहेत. सबब, ते तत्सम वर्गांत मोडतात. आता, बाकी राहिलेले जे देशी शब्द, ते ज्या त्या देशांतले असल्यामुळें, व्यावहारिक भाषेंत त्यांचें विशेष प्राचुर्य असतें; व म्हणूनच त्यांचा तिसऱ्या वर्गांत समावेश होतो. अर्थात्, ह्याच कारणानें तिला देशी असें नामधेय पडलें आहे.

अन्य भाषाभिज्ञांनी मानलेले भेद.

दुसरें कित्येक भारतीयभाषाभिज्ञ हे प्राकृत भाषेचे खालीं लिहिल्याप्रमाणें दहा प्रकार असल्याचें सांगतात.

१ शौरसेनी, २ गौडी, ३ लाटी, ४ आवन्ती, ५ मागधी, ६ अर्धमागधी, ७ प्राची, ८ महाराष्ट्री, ९ द्राविडी, आणि १० बाल्हीकी.

महाराष्ट्र भाषेंत इतर प्राकृत भाषांचें जन्म असल्याबद्दल लक्ष्मीधराचा अभिप्राय.

षड्भाषा चन्द्रिकेंत लक्ष्मीधराने असें प्रतिपादन केलें आहे कीं, प्राकृत भाषा ही महाराष्ट्री भाषेपासूनच उत्पन्न झाली आहे. अर्थात्, संस्कृत भाषेपासून प्रथमतः महाराष्ट्री भाषेचा उद्भव होऊन, तदनन्तर तिच्यापासूनच अन्य प्राकृत भाषा उदयास आल्या, असा त्याच्या म्हणण्याचा भावार्थ होय. कारण, "प्राकृतम् महाराष्ट्रोद्भवम्" । इत्यादि उक्तींनीं त्यांनीं आपल्या षड्भाषाचन्द्रिकेंत ह्याबद्दलचा स्पष्टच उल्लेख केला आहे.

सर्व प्राकृत भाषांचें महाराष्ट्र भाषाच मूळ असल्याविषयीं रामतर्कवागीशाचें मत.

रामतर्कवागीशाचें देखील अ[illegible] प्रकारचें मत असल्याचें दिसतें; व तें त्यानें आपल्या सुप्रसिद्ध कृतींत विशेष रीतीनें व्यक्त केल्याचें निदर्शनास येतें. कारण-प्राकृतकल्पतरूंत त्यानें असें म्हटलें आहे कीं, सर्व प्राकृत भाषांची महाराष्ट्र भाषा ही केवळ आधारस्तंभच होय. आणि म्हणूनच, तिच्यापासून शौरसेनी, व ह्या दोहोंपासून मागधी उद्भवली आहे, असें त्याच्या लेखावरूनच ध्वनित होतें. तो म्हणतो,

सर्वासु भाषास्विह हेतुभूताम्
भाषां महाराष्ट्रभवां पुरस्तात् ।
निरूदयिष्यामि यथोपदेशम्
श्रीरामशर्माऽहमिमां प्रयत्नात् ॥

शौरसेनीभाषा महाराष्ट्रोद्भव असल्याबद्दल, त्याचे उद्गार खालीं लिहिल्याप्रमाणें आहेत.

विरच्यते संप्रति शौरसेनी
पूर्वैव भाषा प्रकृतिः किलास्याः । (स्त० १ लें.)

आतां, मागधी भाषेविषयीं लिहितांना, त्यानें थोडक्यांतच खुलासा केला आहे. सबब, त्याच्या कृतींतील अवश्य तितकें अवतरण येथें देतों. तो म्हणतो,

---

प्राकृत कल्पतरू. द्वितिय शाखा. पहिलें स्तबक.
२ प्रा० कल्पतरू. दुसरें स्तबक.

अथेह मागध्यनुशिष्यते । * * * अस्या महाराष्ट्रकशौरसेनभाषे प्रवर्णैः प्रकृति निरुक्ते ।

असो. रामतर्कवागीश हा महाराष्ट्री, शौरसेनी, मागधी, अर्धमागधी, दाक्षिणात्य, इत्यादींस " भाषा " अशी संज्ञा देऊन, शकारी (म्हणजे चांडालिका), शाबरी, आभीरिका, द्राविडी, उत्कली, वगैरेना, तो दुसऱ्या वर्गात घालतो, आणि त्यांस " विभाषा " हें टोपण नांव देतो. आतां, ह्या सर्व अपभ्रष्ट भाषाच होत. तथापि, नाटकांत त्यांचा उपयोग करण्यांत आला असतां, त्यांजला अपभ्रष्ट समजूं नयेत, असा वागीश मजकूर याचा अभिप्राय आहे.

त्यानें केलेले भाषांचे भेद.

शकारकोद्रद्रविडादि वाचो
पभ्रष्टतां यद्यपि संश्रयन्ति ।
स्याद्नाटकादौ यदिसंप्रयोगो
नैतास्वपभ्रंशतया तथैषः ॥(प्रा. क. स्त. ३१.)

आतां, मराठी भाषेचा उद्भव प्राकृत भाषेंतच असल्याकारणानें, व तिच्या खऱ्या ऐतीह्याचा अन्तर्भाव ह्याच भाषेंत झाल्यामुळें, प्रथमतः प्राकृत भाषेचाच इतिवृत्तान्त देणें विशेष अगत्याचें आहे. कारण, तो दिल्याशिवाय, एकंदर पूर्वापर संबंध वाचकांच्या लक्षांत बिलकुल येणार नाहीं; आणि म्हणूनच तो दिल्यावेरीज अगदीं गत्यन्तर नाहीं, असें कोणालाही कबूल करावें लागेल. सबब, प्राकृत

भाषेचा पूर्वेतिहास देऊन, ती कशी व केव्हां उदयास आली, तिला कोणीं जन्म दिला, तिचे मुख्य भेद कोणते, इत्यादि महत्वाच्या व मूळ प्रश्नांचा क्रमशः विचार करूं.

आर्य, शमी, व तुराणी, अशी या भूतलावराल एकंदर भाषांचीं तीन कुटुंबें.

ह्या भूतलावरील एकंदर भाषाचें शास्त्रीय रीतीनें विवेचन होण्यासाठीं, भाषाशास्त्रज्ञ त्यांचा तीन कुटुंबांत समावेश करतात; आणि १ आर्य, २ शमी, व ३ तुराणी, या नामधेयांनीं ते त्यांस ओळखतात. आतां आर्य, वैदिक, आणि संस्कृत, हे निव्वळ पर्याय शब्दच होत; व ही गोष्ट आम्ही भारतीय साम्राज्याच्या नवव्या पुस्तकांत, सप्रमाण दाखविली आहे. शिवाय, ह्या प्रत्येक कुटुंबाचें तपशिलवार विवेचन आणि

१ ग्रंथकर्त्याचें भाषाशास्त्र नांवाचें पुस्तक पहा.

२ वैदिकभाषा व संस्कृत ही एकच असल्याविषयीं, पाश्चात्यांचें देखील मत आहे. मूर म्हणतो,

"The Sanskrit was originally a spoken language, and the old spoken language of India and the Sanskrit of the Vedas, were at one time identical." (Muir's Sanskrit Text. vol. II. P. P. 140-160 Edn. 1874.)

त्याचप्रमाणें, आर्यभाषा व संस्कृत, हे देखील पर्याय शब्दच असल्याविषयीं, त्यानें दुसऱ्या एका ठिकाणीं व्यक्त केलें आहे. कारण, तो लिहितो कीं,

"Sanskrit (by which must be understood the then current form or forms of the old Aryan Speech.) (Muir's S. T. vol. II P. P. 145-50. 2nd Edn.)

साद्यन्त ऊहापोह, आम्हीं "भाषाशास्त्र" नावाच्या ग्रंथांत स्वतंत्र रीतीनेंच केला आहे.

महाराष्ट्र भाषेची आर्यकुटुंबांत गणना.

भरतखंडातील भाषाभिज्ञ व कविमुकुटमणि, हे भारतीय वाङ्मयाचे चार[१] वर्ग करितात. १ संस्कृत, २ प्राकृत, ३ अपभ्रंश, आणि ४ मिश्र. संस्कृत ही दैवीवाक् होय. महाराष्ट्र, शौरसेनी, गौडी, लाटी, इत्यादींचा प्राकृतात समावेश होतो. गौळी वगैरे अपभ्रंश भाषा बोलतात. आणि अनेक भाषांची जी खिचडी दृग्गोचर होते, तिला मिश्र अशी संज्ञा आहे. आतां, संस्कृत ही प्राकृतादि[२] शाखांची आदिजननी असल्यामुळें, तिला ज्याप्रमाणें मातृपदाचा बहुमान प्राप्त होतो, त्याचप्रमाणें प्राकृत ही देखील मराठी, वगैरे अन्यभाषांची जननी असल्याकारणानें, तिच्याकडे सुद्धां मातृत्वाचें श्रेष्ठत्व चालून येतें. अर्थात्, मराठी भाषा ही प्राकृत भाषेची दुहिता म्हणजे मुलगी असून, संस्कृत भाषेची ती पौत्री अथवा नात आहे, हें आणखी विशेष रीतीनें सांगावयास नलगे.

---

१ तदेतद्वाङ्मयंभूयः संस्कृतं प्राकृतं तथा।
अपभ्रंशश्चमिश्रश्चे त्याहुरार्याश्चतुर्विधम्॥ ३२॥
(श्री दण्डिकविकृत काव्यादर्श. १ ला परिच्छेद.)

२ संस्कृत हीच अखिल आर्यशाखांची आदिजननी असून, तिला मातृपदाचें श्रेष्ठत्व व मायभाषेचा बहुमान यथार्थ मिळाला अस-

(पुढें चालू)

आर्य अथवा संस्कृत भाषेच्या खंडांतरीं गेले- ल्या शाखा.

संस्कृत भाषेच्या अनेक शाखा **भरतखंडांत** व **भरत**-खंडाबाहेर पसरल्या असून, त्या फार लांब लांब, दूर दूर देशांत, आणि खंडान्तरींही गेल्या आहेत. त्यामुळें, भिन्न भिन्न परिवेष्टनानुरूप, कित्येक शब्दांत कालान्तरानें सहजीं अपभ्रंश होऊन, कांहींत जमीन अस्मानाचें अन्तर आपोआपच पडत गेलें. फार तर काय सांगावें, पण, कित्येक शब्दांतल्या रूपांत व स्थितींत हरएक प्रकारचा लोप होऊन, काहीं कांहीं ठिकाणीं तर त्या ऐवजीं अगदीं नूतन शब्दच बनले.

(मार्गील पृष्ठावरून पुढें चालू.)

त्याविषयीं, आम्ही **भारतीय** साम्राज्याच्या नवव्या पुस्तकांत सप्रमाण सिद्ध करून दाखविलें आहे. इतकेंच नव्हें तर, **संस्कृत** ही या भूतलावरील यच्चावत् भाषांचें मूळ असावें, असें मानण्यासही बलवत्तर कारण मिळतें, इत्यादि संबंधानें देखील आम्ही पुष्कळ ऊहापोह व यथार्थ विवेचन "**भाषाशास्त्रांत**" केलें आहे; आणि त्यांतच, **पाश्चात्य** पंडितांचे लेख व पाश्चात्य **धर्मग्रंथ**, यांवरून आमच्या प्रतिपादनास कसें पुष्टीकरण मिळत आहे, हें सुद्धां दाखविलें आहे.

* **झन्द**, **ग्रीक**, **ल्याटिन**, **गॉथिक**, इत्यादि सर्व **संस्कृताच्याच** शाखा आहेत, असें एका पाश्चात्य भाषाभिज्ञानें सुद्धां कबूल केलें आहे. एके ठिकाणी **कर्झन** ह्मणतो,

"I venture to affirm, that they (other languages such as Zandic, Greek, Latin, Gothic, &c) have all sprung, at different chronological periods, from the Sanskrit, (that is, the Vaidic Sanskrit.)"

(J. R. A. Society. vol. XVI. P. 177.)

सान्निध्यानें व देशान्तरानें उद्भवलेलें अन्तर.

ज्या शाखांनीं आमच्या सन्निध वास केला, त्यांच्यांत शब्दसाम्य बरेंच राहून, अपभ्रंश देखील तितक्या मानानें कमीच होत गेला. परंतु, ज्या शाखा देशांन्तरीं पसरल्या व खंडांतरीं राहिल्या, त्यांतील शब्दांत पुष्कळच फरक होत गेला; आणि कांहीं कांहीं ठिकाणीं तर, त्यांत आजिबात रूपान्तरच झालें. शौरसेनी, मागधी, महाराष्ट्री, इत्यादि प्राकृत शाखांचा निकट संबंध मूळनिर्झराशीं म्हणजे संस्कृत-मायभाषेशींच असल्यामुळें, ह्या भाषांत संस्कृताचें साम्य विशेष दिसून येतें. त्याचप्रमाणें, झन्द भाषा देखील आमच्या भरतभूमीच्या हद्दीपलीकडे विशेष दूर नसल्या-कारणानें, त्यांतही बरेंच साम्य दृष्टीस पडतें. परंतु, ग्रीक, ल्याटिन, जर्मन, स्ल्याव्हॉनिक, पोलिश, बोहीमियन्, इत्यादि शाखा खंडान्तरीं गेल्यामुळें, त्या भाषांतील शब्दांत अगदींच थोडें साम्य असून, कित्येक ठिकाणीं तर त्याचा मागमूस सुद्धां राहिला नाहीं, असें भासमान होतें; आणि शेवटीं ती गोष्ट अगदीं निर्विवादपणें कबूलही करावी लागते.

त्याचें उदाहरण.

संस्कृत भाषेपासून आर्य मूळाच्या अनेक शाखा कशा उद्भवल्या; त्यांत हरतऱ्हेचें कसें रूपान्तर झालें; आणि मूळच्या संस्कृत शब्दांत कोणत्या प्रकारें स्थित्यन्तर होत गेलें; हें खालील शब्दांवरून वाचकाच्या लक्षांत तेव्हांच येण्यासारखें आहे.

पाश्चात्यशाखा — मूळ — पौरस्त्यशाखा.

इंग्रजी.	ल्याटिन	ग्रीक.	झन्द.	संस्कृत.	प्राकृत	मराठी.	हिन्दी	गुजराथी.
फादर.	पेटर.	पटीर.	पतर.	पितर.	पिआ. पिअरो	पिता. बाप.	बाप	बापा.
मदर.	मेटर.	मिटीर.	मातर	मातर.	माआ	माय. आई.	मा.	मा.
मिडल्.	मिडियस.	मीमाँस.	मैध्य.	मध्य.	मज्झम्	मधला.	मधवच.	मधवच.

ह्या संबंधाचें साद्यन्त विवेचन भारतीय साम्राज्याच्या नवव्या पुस्तकांतील ९२ व्या भागांत, पान ९३ ते ९६ वर आम्हीं केलें आहे. सबब, येथें तत्संबंधी पुनरुक्ति करण्याचें प्रयोजन नाहीं.

सदरहूवरून, पाश्चात्य शाखांतील शब्दांपेक्षां, पौरस्त्य शाखांतील शब्दांशीं संस्कृताचें विशेष साम्य दग्गोचर होतें; आणि त्यांत अपभ्रंश देखील बराच कमी झालेला दृष्टीस पडतो; असें कोणाच्याही लक्षांत सहजीं येईल. अर्थात्, संस्कृत भाषेच्यानिकट सान्निध्यांत जी आर्यशाखा राहिली, ती प्राकृत या नामधेयानें सुविख्यात झाली; व झन्द ग्रीक, ल्याटिन्, ट्युटॉनिक, स्लयाव्हॉनिक, आणि सेल्टिक, इत्यादि ज्या शाखा देशांतरीं गेल्या, त्या, त्या त्या नांवांनीं नांवारूपास आल्या.

प्राकृत भाषा व तिची व्याख्या.

आतां, ज्या प्राकृत भाषेनें मराठी भाषेस जन्म दिला, अथवा विशेष उक्त म्हटलें, म्हणजे जिच्यापासून ही उद्भवली, तिजविषयींचें कुतूहल सकृद्दर्शनींच कोणालाही होणें अगदीं साहजीक आहे. सबब, प्राकृत भाषा म्हणजे काय, व ती कशी आणि केव्हां उद्भवली, याविषयींचा विचार करूं.

भाषाभिज्ञांनीं केलेली,

संस्कृतज्ञ व प्राकृतभाषाभिज्ञ हे प्राकृताची व्याख्या खालीं लिहिल्याप्रमाणें देतात.

संस्कृतरूपायाः प्रकृतेरुत्पन्नत्वात्प्राकृतम् ।

हेमचन्द्रानें दिलेली,

अर्थात्, जी भाषा मूळापासून, म्हणजे आरंभापासूनच संस्कृतोद्भव आहे, ती प्राकृत होय. आणि ही व्याख्या अगदीं सप्रमाण असल्याचें दिसतें. कारण, ह्या भाषेच्या संबंधानें हेमचन्द्रानें विशेष परिश्रम व शोध केलेले असून, त्यानें देखील प्राकृत भाषेची व्याख्या, आपल्या मागधी व्याकरणांत, अशाच प्रकारची दिलेली आढळते. तो म्हणतो,

प्रकृतिः संस्कृतम् । तत्रभवम् ।
ततः आगतंवा प्राकृतम् ।

आणि, वररुचीनें सांगितलेली.

प्राकृत भाषांचें ज्यानें याहीपेक्षां विशेष परिशीलन केलें आहे, असा वररुचि होय. हा एक नामांकित ग्रंथकार, सुविख्यात भाषाभिज्ञ, आणि मर्मज्ञ वैयाकरण होऊन गेला; व प्राकृत

भाषांवरील प्राकृतप्रकाश नांवाचें यानें केलेलें व्याकरण सर्वांसच महशूर आहे. किंबहुना, ह्या भाषांवरील हें व्याकरण पहिलेंच होय, असें देखील म्हणण्यास हरकत नाहीं. ह्यानें त्यांत शौरसेनी भाषेची सामान्य माहिती बाराव्या परिच्छेदांत दिली असून, "प्रकृतिः संस्कृतं" अशी त्यानें तिची प्रथमतःच मीमांसा केली आहे. त्यावरून, प्राकृताचें स्वरूप पाहून, तिची त्यानें थोडक्यांत व्याख्याच दिल्याचें व्यक्त होतें; आणि ती संस्कृतापासूनच उद्भवली असल्याचें सदरहू निरूपणावरून उघड दिसतें.

---

१ प्राकृत भाषेवरील अन्य व्याकरण ग्रंथ खालीं लिहिल्याप्रमाणें होतः—

१ चंडकृत प्राकृतलक्ष्मण, २ मार्कंडेयकृत प्राकृत सर्वस्व, ३ हेमचन्द्रकृत प्राकृताष्टाध्यायी, ४ वसंतराजकृत प्राकृतसंजीवनी, ५ प्राकृतलंकेश्वर, ६ प्राकृत कल्पलतिका, ७ क्रमदीश्वर, इत्यादि. ह्याखेरीज ८ शाकल्य, ९ भरत, १० कोहल, ११ भामह, वगैरे अनेक भाषाभिज्ञांनीं प्राकृत भाषेचें व्याकरण लिहिलें असल्याचें मार्कंडेयाच्या लेखावरूनच कळून येतें.

कारण, मार्कंडेयकृत प्राकृतसर्वस्वांत खालीं लिहिलेली उक्ति दृष्टीस पडते.

शाकल्य भरतकोहलवररुचिभामहवसंतराजाद्यैः ।
प्रोक्तान्ग्रंथान्नानालक्ष्याणि निपुणमालोक्य ॥
अव्याकीर्णविशदंसारं स्वल्पाक्षरग्रथितपद्यम् ।
मार्कंडेयकवीन्द्रः प्राकृतसर्वस्वमारभते ॥ (प्राकृतसर्वस्व.)

त्याचप्रमाणें, १२ लक्ष्मीधरकृत षड्भाषाचान्द्रिका, १३ चण्डीदेवकृत प्राकृतदीपिका, १४ रामतर्कवागीशकृत प्राकृतकल्पतरु, १५ काव्यचन्द्रिका, इत्यादि अनेक नांवाजलेले ग्रंथही प्राकृत भाषेवरच आहेत.

याप्रमाणें, सदरीं निर्दिष्ट केलेल्या कारणांनीं प्राकृत भाषा उत्पन्न झाल्यावर, तिला भिन्नभिन्न देशांतील परिवेष्टनानुरूप व लोकशिक्षणानुसार, निरनिराळें स्वरूप प्राप्त झालें. अर्थात, वर्णान्तरानें, किंवा अक्षरलोपानें, अथवा दोन्ही प्रकारच्या मिश्रणानें, तिला भिन्नत्व येऊन, ती महाराष्ट्री, शौरसेनी, मागधी, पैशाची, इत्यादि मुख्य भेदांनीं सर्वांस महशूर झाली.

प्राकृत अथवा महाराष्ट्र व इतर भाषांस प्राप्त झालेली संज्ञा

महाराष्ट्री भाषा महाराष्ट्र देशांत बोलत असून, महाराष्ट्र म्हणजे अवन्ती किंवा उज्जयिनी नगरीच्या भोंवतालचा प्रदेश होय. हा प्रथम बराच विस्तृत असे. तथापि, हल्लींच्या मानानें तो पूर्वीं पुष्कळच संकुचित होता, यांत बिलकुल शंका नाहीं; आणि म्हणूनच त्याची प्राक्कालीन सीमा व सांप्रतची मर्यादा, यांत [1]महदन्तर दिसून येतें. शौरसेनी म्हणजे शूरसेन अथवा मथुरेच्या आसपासच्या प्रदेशांतील भाषा समजावयाची. [2]मागधी ही मगध देशांतील भाषा असून, त्याच प्रांताला हल्लीं बहार म्हणतात. आणि डोंगरावरील जंगली व अशिक्षित लोकांच्या भाषेला पैशाची अशी संज्ञा आहे.

त्या भाषांची जन्मभूमि.

१ ग्रॅण्टडफकृत मराठ्यांचा इतिहास. १८७३ पा. २१३.

२ मागधी आणि पाली भाषा एकच असल्याचें दिसतें; व तसें वेबर प्रभृति पाश्चात्य विद्वानांचें देखील मत आहे. तथापि, ल्यासन् वगैरे भाषाभिज्ञांचा याहून अगदीं भिन्न अभिप्राय असून, ते पाली भाषा केवळ स्वतंत्र असल्याचेंच समजतात.
(Spiegel's Preface to the Kammavákya. Lasson's Indian Antiquities vol. II. P. P. 488-490.)

आतां, पैशाची ही कोणत्या प्रदेशांतील व्यावहारीक भाषा आहे; आणि तद्विषयक प्राचीन प्राकृतभाषाभिज्ञांच्या लेखांत, कृतींत, अथवा ग्रंथांत, कशा प्रकारची माहिती आढळून येते; याबद्दलचा कांहीं दाखला मिळाला तर पाहूं.

लक्ष्मीधरकृत षड्भाषाचन्द्रिकेवरून पैशाची भाषा ज्या त्या प्रांतांतल्या परिस्थित्यनुरूप दोन प्रकारची असल्याचें दिसतें; व ती खालीं लिहिलेल्या स्थळीं चालत असल्याबद्दलची माहिती उपलब्ध होते. १ गांधार. २ हैव. ३ बाल्हीक. ४ नेपाळ. ५ भोत. ६ केकय. ७ कुंतल. ८ कनोज. ९ सुधेष. १० सह्य. आणि ११ पांडय. ह्यावरून, ही पैशाची भाषा उत्तरेपासून तों तहत दक्षिणेकडील टोंकापर्यंतच्या प्रदेशांत, निरनिराळया ठिकाणीं प्रचारांत होती, याविषयींची शंका राहत नाहीं. कारण, पाण्डय हा दक्षिणेकडील प्रांत असून, गांधार, नेपाळ, कनोज, इत्यादि उत्तरेकडील प्रान्त होत.

मागधी भाषेचा ऊर्जित काल, व

असो. ह्या भाषापैकीं, मागधी भाषेला बौद्धधर्मामुळें सकृद्दर्शनींच विशेष प्रोत्साहन मिळालें. आणि तिच्यांतच धर्मोपदेश करण्याविषयीं राजाज्ञा अस-

---

१ लक्ष्मीधर म्हणतो:—

पिशाचदेशनियंतपैशाची द्वितयं विदुः ।
पिशाच देशास्तु वृद्धै रुक्ताः ।
पांड्य केकयवाल्हीकसह्यनेपालकुन्तलाः ।
सुधेषभोतगांधारहैवकनोजनास्तथा ।
एते पैशाचदेशाः स्युस्तद्देश्यस्तद्गुणोभवेत् ।

त्यानें, ह्या भाषेचा एकदम फैलाव झाला, व ती पवित्र पदवीप्रत पोहोंचली. पुढें कालान्तरानें, ह्या राजाश्रय एकसारखा वाढत चालला; आणि अशोकाच्या कारकीर्दींत तर त्याचा कळसच झाला. त्या कारणानें, मागधी भाषेला विलक्षण तेज येऊन, तिचा बोलबाला दिवसानुदिवस अधिकाधिकच होत गेला. इतकेंच नव्हें तर, धर्मसंस्थेंत अगर विद्यापीठांत, सरकारांत अथवा दरबारांत, पंडित समाजांत किंवा लोकसमुदायांत, घरीं वा दारीं, केवळ ह्या भाषेचेंच प्राबल्य निर्विवाद ठरलें.

तिचा सिंहलद्वीपांत प्रवेश.

तदनन्तर, इ. स. पू. २४९ व्या वर्षी, अशोकानें आपला मुलगा महेन्द्र याला सिंहलद्वीपांत तद्देशीयांचें धर्मान्तर करविण्यासाठीं पाठविला; व तो तेथें गेल्यावर, सिंहली राजानें देखील त्याचें मोठें आदरातिथ्य केलें, आणि आपल्या प्रजेसहित आपणही बौद्ध धर्माचा अनुयायी बनला. त्यामुळें, त्या बेटांत बौद्धधर्म जो एकदां चिरंजीव झाला, तो अजून सुध्दां तेथें प्रचलित असून, तेथूनच तो ब्रह्मदेशांत व गंगेपलीकडील प्रांतांत फैलावला. फार तर काय सांगावें, पण अखिल भारतीयांच्या, म्हणजे हिंदू लोकांच्या दृष्टीनें, काशी हें ज्याप्रमाणें पवित्र तीर्थ मानिलें जातें, त्याचप्रमाणें सिंहलद्वीपाला देखील दक्षिणस्थ[1] बौध्दधर्म हे पवित्र स्थान समजतात.

१ सिंहलद्वीप व ब्रह्मदेश येथें चालत असलेल्या बौद्ध धर्मास दक्षिणस्थ बौद्धधर्म म्हणतात; आणि नेपाळ, तिबेट, चीन, व

(पुढें चालू)

तिची तेथें झालेली प्रतिष्ठा.

अशा प्रकारें, मागधी भाषेचा फैलाव भरतखंडांतल्या उत्तरेकडील प्रांतांत झपाट्यानें होत गेल्यावर, तिचा प्रसार दक्षिण-टोंकापलीकडे, म्हणजे हिंदीमहासागरांतल्या सिंहलद्विपांतही झाला. त्यामुळें, तिची प्रतिष्ठा जास्त वाढत जाऊन, सिंहली लोकांनीं तर तिला केवळ शिखरावरच चढविलें. त्यांनीं तिला पालि हें उपपद दिलें, आणि ते तिला संस्कृतापेक्षांही श्रेष्ठतर मानूं लागले. कारण, मागधी म्हणजे मूल भाषाच होय, असें त्यांच्या मताप्रमाणें त्यांनीं ठरविलें, व तद्विषयक निरनिराळीं प्रमाणें सुध्दां त्यांनीं पुढें आणिलीं. ह्यापैकीं, "प्रयोगसिद्धि" नामक व्याकरणांतील व महावंशांतील एक प्रमाण, मासल्याकरितां मी वाचकापुढें ठेवितों. ह्यांत असें ह्मटलें आहे कीं,

मागधी मूलभासा नरायायादिकप्पिका ।
ब्रह्मणोचास्सुतालापा संबुद्धा चापिभासरे ॥

भावार्थः—मागधी ही मूळ भाषा होय. कारण, सृष्टयुत्पत्तीच्या वेळीं, अन्य कोणत्याही भाषेचा ध्वनि, श्रवणपुटांत देखील पडला नव्हता, तेव्हां ब्राह्मण आणि इतर माणसें, व खुद

(मागील पृष्टावरून पुढें चालू.)

जपान, या उदीचीन देशांतील बौद्धधर्मास उत्तरस्थ बौद्धधर्म, असें नामधेय आहे. दक्षिणस्थ बौद्धधर्मात, हीनयान नांवाच्या स्मृतिवचनाला मान देतात, आणि उत्तरस्थ बौद्ध हे महायान नामक स्मृति पाळतात.

बुद्ध सुद्धां, ही मागधी भाषाच बोलूं लागला. अर्थात्, ती मानवी प्राण्याची मूळ भाषा होती, असा त्यांच्या लिहिण्याचा आशय होय.

अतिरिक्त श्रद्धेनें तिच्याविषयीं झालेला गैर-समज

अर्थात्, पालि भाषा संस्कृतापेक्षां देखील पुराणतर होय, असा सिंहलद्वीपीयांच्या म्हणण्याचा आशय दिसतो. परंतु, बौद्ध धर्मावरील अतिरिक्त श्रद्धेनें ही भ्रांतिमूलक समजूत झाली होती, याबद्दलची तिळमात्रही शंका नाहीं. इतकेंच नव्हें तर, एतद्विषयक प्रत्यन्तराचें आणखी एकादें प्रमाण सुद्धां वाचकांपुढें रुजू करण्याचें प्रयोजन दिसत नाहीं. कारण, ती गोष्ट सूर्याच्या प्रत्यक्ष तेजाप्रमाणेंच, कोणाही डोळस मनुष्यास स्वयमेव भासमान होणारी आहे. विद्वन्मुकुटमणि भट्ट रामकृष्ण गोपाळ भांडारकर हे

१ हें आमचें प्रतिपादन पाश्चात्यांस देखील संमत असल्यामुळें, त्यांच्या लेखांतील अवश्य तितकें अवतरण येथें देतों. टर्नर म्हणतोः–

"The general results of the researches hitherto made by Europeans, both historical and philosophical, unquestionally converge to prove the greater antiquity of the Sanskrit. Eevn in this island (Ceylon), all works on astronomy, medicine, and (such as they are) on chemistry and mathematics, are exclusively written in Sanskrit; while the works on Buddhism, the histories subsequent to the advent of Gotama Buddha, and certain philological works alone, are composed in the Pali language.'

(Turnour's Maháwanso. Intro. P. P. XXII. XXIII).

तद्विषयक भट्ट भांडारकरांचा अभिप्राय.

देखील पालीला संस्कृतची शाखाच ठरवितात, आणि तींत अनेक अपभ्रंश असल्याचें म्हणतात. मात्र, महाराष्ट्री, शौरसेनी, व मागधी, यांच्यापेक्षां देखील ती पुराणतर प्राकृत होय, असें त्यांचें मत असल्याचें दिसतें. तथापि, संस्कृत मायभाषेपासूनच पालीचा आणि इतर प्राकृत भाषांचा जन्म आहे, अशाविषयीं ते आपलें ठाम मत देतात.

अशा तऱ्हेची वस्तुस्थिति असून, व पालि भाषा सं-

---

१. ह्या संबंधानें, "दक्षिणचा प्राचीन इतिहास" नामक पुस्तकांत, त्यांनीं असें लिहिलें आहे कीं,

"The present Marathi language is as much an offshoot of the Sanskrit, as the other languages of northern India. The ancient representatives of these dialects—the Maharashtri, the Sauraseni, and the Magadhi, as well as an earlier form of speech, the Pali—show extensive corruptions of Sanskrit sounds."

(Early History of the Dekkan P. P. 314. 1884).

२ ते म्हणतात कीं,

"The theory therefore is utterly untenable, and the Contemporaneons development of Sanskrit and the Prakrits, derived from it, to account for which it was invented, is an impossibility." P. 324.

"The Pali must be regarded as a daughter of Sanskrit, and not its Sister." P. 326.

(Dr. Bhandarkar's Sanskrit & Prakrit Lectures. R. A. S. Bombay Branch. vol. XVI. 1885).

त्यासंबंधानें डी. अल्विसूची झालेली भ्रांतिमूलक कल्पना.

स्कृतोद्भव असल्याविषयीं अनेक प्रमाणें उपलब्ध असतांही, मि. जेम्स. डी. आल्विस् यानें ती संस्कृताची जननी आहे, असें सिद्ध करण्याचा यत्न चालविला. परंतु, ही गोष्ट प्रमाणरहित असल्यामुळें, तींत त्याला बिलकूल यश आलें नाहीं, हें आणखी नव्यानें सांगावयास नको. इतकेंच नव्हें तर, वेबर सारख्या पश्चिमेकडील अति तीक्ष्ण गुणदोषविवेचकानेंच त्याच्या प्रतिपादनाला हरताळ लाविली, हें देखील ध्यानांत ठेवण्यासारखें आहे. शिवाय, भट्ट भांडारकरांनीं सुध्दां त्याला चागलें

१ पालि म्हणजे प्राकृत, व तीच मूळची भाषा समजावयाची, आणि तिच्यापासूनच ही परिपूर्णतेस आलेली संस्कृत भाषा उद्भवली आहे, असें प्रतिपादन आल्विस् मजकूरनें केलें आहे. तो ह्मणतो,

"By the Prakrit was therefore at first meant the *original* Indian language, as distinguished from the Apabhransa, 'the ungrammatical' and the Sanskrit signifying that 'which has been Composed or formed by art, adorned, embellished, and regularly inflected as a language."

(Introduction to Kachchayana's Grammar. 1863. P. XCII).

२ ह्या संबंधानें वेबर असें लिहितो कीं,

"And yet the assumption that the Pàli, and so the Prákrit, are derived from the Sanskrit, *deserves the preference over the Converse views*, to which D'Alwis appears here and there to be not indisposed, viz. that the Pàli, as being the most ancient Prakrit

(पुढें चालू)

विरजण लाविलें, ही गोष्ट पण विशेष लक्षांत बाळगली पाहिजे. (मागें पान २१ पहा.)

पाली व मागधीचें तादात्म्य.

असो. प्रस्तुत स्थळीं, आणखीही एका महत्वाच्या गोष्टीचा अवश्य खुलासा केला पाहिजे. आणि तो हा कीं, **पा**लि व **मा**गधी ह्या एकच भाषा असल्यामुळें, ते केवळ पर्याय शब्दच होत असें समजून, आम्ही ते अभेद बुद्धीनें सर्रास्त वापरले आहेत. शिवाय, कित्येक **पाश्चात्य** पंडितांचा देखील तसाच अभिप्राय आहे. मात्र, भेद म्हणून इतकाच कीं, **सिंहली** लोकांनीं **माग**धी

(मागील पृष्ठावरून पुढें चालू.)
which has been handed down to us, stands higher in point of originality and independence than the Sanskrit."

(Journal. German Oriental Society. 1865. vol. XIX P. 658).

सदरहू अवतरणांतील इतालिक वर्ण आमचे आहेत. (ग्रंथकर्ता).

१ मागील पान १६ वरील टीप २ पहा.

ह्यासंबंधानें **बरनॉफ्** म्हणतोः—

"Still, while we allow for the degree of artificial regularity, which the cultivation of the Pali in Ceylon may have introduced, we must hold that the Pali version (of the passage) approaches very closely to the form which it must have had in Magadhi."

(Lotus deLa BonneLoi. App. P. 862).

अशाच मासल्याचा **स्पीजेल्**चाही अभिप्राय आहे. तो असें लिहितो कीं,

(पुढें चालू)

भाषेवर उत्तम अलंकार चढवून, तिला सुसंस्कृत केल्यावर, ते तिला पाँलि म्हणूं लागले, आणि तिची गणना पवित्र भाषेंत होत चालली; व मागधी भाषा मगध देशांतील असल्याकारणानें, तिचें मूळचें नांव उत्तर हिंदुस्थानांत तसेंच कायम राहिलें.

तथापि, बेनेफे[2], मूर[3], आणि पाश्चात्य देशांतील

(मागील पृष्टावरून पुढें चालू.)

" It is probable that the Pali was called Magadhi in consequence of the mission of Asoka's son Mahendra to introduce Buddhism into Ceylon."

(Preface to the Kammavàkya).

१ भारतीय साम्राज्य. पु० ९ वें पान १८५.

२ हा गृहस्थ पालि भाषा महाराष्ट्रीसारखी असल्याचें समजतो, आणि असें लिहितो कीं,

"...Pali...is the sacred language of the Buddhist in Ceylon, and in the countries converted to Buddhism by the Ceylonese, and...was the predominating popular dialact of Central India......varying in many particulars from the language of Magadha, and approximating to the principal Prakrit or Maharashtri dialect."

(Benfey's article on India P. P. I94-246).

३ मूर म्हणतो कीं, पालि ही प्राकृत भाषेपेक्षां विशेष पुराणतर असून, ती संस्कृत भाषेशीं साम्य पावते.

" From this Comparison, it will result that the Pali stands nearer to the Sanskrit, and represents a more ancient phase of vernacular speech of Northern India than is exhibited in Prakrit."

(Muir's Sanskrit Texts vol. II P.73).

तथापि, ह्यानेंच पालीला मागधी म्हटलें आहे.

" A language called Pali or Magadhi."

(Muir II. 10. 1871).

तद्विषयक मूर प्रभृतींचें मतभिन्नत्व व त्याची निराधारता.

ल्यॉसन नामक विद्वान, यांचें याहून अगदीं भिन्न मत असल्याचें दिसतें. परंतु, त्याला फारसा आधार, किंवा विशेष बलवत्तर प्रमाण आहेसें वाटत नाहीं. कारण, त्याबद्दलचा उल्लेख वररुचीनेंही केलेला नसून, इतर भारतीय प्राकृतभाषाभिज्ञांनीं सुद्धां तद्विषयक कोठेंच कांहीं लिहिलेलें नाहीं. इतकेंच नव्हें तर,

त्यासंबंधानें पहिलें प्रमाण.

खुद्द सिंहली लोकांनीं देखील पालीला मागधी अशीच संज्ञा दिल्याचें कळून येतें; व ती गोष्ट पाश्चात्य भाषापंडितही कबूल करतात.

---

१ ल्यॉसन असें प्रतिपादन करतो कीं, महाराष्ट्री आणि शौरसेनी भाषा जरी पालीशीं साम्य पावतात, तरी पालि ही त्या दोहोंपेक्षां देखील पुराणतर आहे.

"These two dialects (Maharashtri & Shauraseni) stand the nearest to the Pali, though it is decidedly older thau they are. I conjecture, therefore, that we may regard it as the oldest form which has been preserved of the vernacular language of Western India, between the Jumna river and the Vindhya range, a tract which includes Malwa."

(Indian Antiquities vol. II. P. P. 480-490).

२ ह्या संबंधानें मूर म्हणतो,

"Magadhi is the appellation which the Buddhists of Ceylon themselves give to it (Pali)."

(Muir's Sanskrit Text. vol. II, P. 54, 1871).

तसेंच टर्नर लिहितो,

(पुढें चालू.)

आतां, पालि भाषा मागधीहून थोडीशी भिन्न दिसते, ही गोष्ट खरी आहे. तथापि, ही भिन्नता दीर्घदेशान्तरामुळें आणि स्थलान्तराच्या योगानें उद्भवलेली असून, पुण्याकडील चित्तपावन ब्राह्मणांच्या बोलण्यांत, व रत्नागिरीकडील अथवा मालवणांतल्या अशिक्षित लोकांच्या बोलण्यांत, जो भेद दिसून येतो, तोच पालि आणि मागधींत दृग्गोचर होतो. आणि म्हणूनच त्या भाषा निराळ्या नाहींत, असें म्हणणें प्राप्त येतें. आमच्यांत एक अशी म्हण आहे कीं, "बारा कोसांवर भाषा बदलते;" व सूक्ष्म विचार करून शोधकबुद्धीनें पाहिलें तर, ती गोष्ट खरीही

(मागील पृष्ठावरून पुढें चालू.)

"The Buddhists are impressed with the conviction that their sacred and classical language the Magadhi or Pali, is of greater antiquity than the Sanskrit."

(Intro. to Mahavamsa. P.P. XXII. XXIII).

मागील पान १९।२० पहा.

सर मॉनियर विल्यम्स् हा देखील, पालि व मागधी एकच भाषा असल्याचें समजतो. कारण, "भारतीय विज्ञान" नामक पुस्तकांत, त्यानें एके ठिकाणीं असें म्हटलें आहे कीं,

"The earlier form of the ancient spoken language called Pali or Magadhi, has a grammar and extensive literature of its own...Pali was introduced into Ceylon by Buddhist missionaries from Magadha, when Buddhism began to spread, and is now the sacred language of Ceylon and Burmah, in which all their Buddhist literature is written."

(Indian Wisdom. Introduction.. P.P. XXIX. XXX.)

दिसते. कारण, तितक्यास्थलान्तरानें भाषेंत थोडा बहुत फरक आपोआपच होत जातो. परंतु, फक्त एवढयाच विशेषानें जर आपण भिन्न भाषा मानीत गेलों, तर ह्या भूतलावर निःसंशय अगणित भाषा होतील, आणि प्रत्येक व्यक्तीगणिक एक स्वतंत्र भाषाच बनेल. सबब, सदरहू कारणांनीं, पालि ही निराळी भाषा नसावी[1], असें आमच्या अल्प समजुतीस वाटतें.

दुसरें प्रमाण.

शिवाय, पालि ही संस्कृतोद्भव[2] असून, केवळ प्राकृत[3] भाषाच असल्याविषयीं, पाश्चात्यांनींही कबूल केलें आहे; आणि वर-

---

१ प्राकृत भाषेप्रमाणें, पालि ही भिन्न भाषा नाहीं, असा भट्ट भांडारकरांनीं देखील आपला अभिप्राय व्यक्त केला आहे. ते म्हणतात,

" It is on account of the mixture of such correct words and forms with others that were incorrect, that the Pali was not regarded as an independent dialect. The case was different with the Prakrits. They assumed a more settled and fixed character... and thus came to be considered and treated as separate languages. P. 356.

(Sanskrit and Prakrit Language R. A. S. B. B. vol. XVI. 1885).

२ मागील पान २० ते २४ पहा.

३ मूर ह्मणतो,

" It (Pali) is yet nothing more than one of the ancient vernacular dialects of Northern India."

(Muirs Sanskrit Text. II. P. 53).

रुचि हा तर सर्वांहून श्रेष्ठ व पुराणतम प्राकृत आणि संस्कृत-भाषाकोविद असल्याबद्दलची गोष्ट सुद्धां त्यांना संमत आहे. तेव्हां, जर पालि भाषा मागधीहून भिन्न व अगदीं स्वतंत्र असती, तर तिचा उल्लेख वररुचीकडून झाल्यावांचून खचितच राहिला नसता, हें निर्विवाद आहे. अर्थात्, मागधी आणि पालि ह्यांचें तादात्म्य असून, पालि हें नांव सिंहलद्वीपीयांनीं वररुचीनन्तर दिलें, असें मानण्यास बलवत्तर कारण मिळतें, अशी निदान आमची तरी अल्प समजूत आहे.

तिसरें प्रमाण.

ह्याखेरीज, आणखीही एक मुद्याची गोष्ट येथें वेळींच सांगितली पाहिजे. ती ही कीं, पालि व मागधी भाषेंत क्वचित् कोठें रूपान्तर दृष्टीस पडतें, आणि त्यामुळेंच कित्येक पाश्चात्यांचें मत, ह्या दोन्ही भाषा स्वतंत्र असल्याविषयीं झाल्याचें दिसतें. परंतु, ही त्यांची भ्रांतिमूलक समजूत असावी, असें आमच्या अल्प बुद्धीस वाटतें. कारण, भाषा ही चल असल्यामुळें, परिवर्तनास निःसंशय पात्र आहे; व म्हणूनच तिचें थोडेंबहुत स्थित्यन्तर आणि रूपान्तर हें नेहेमींच होत असतें. परंतु, तेवढ्याच सबबीनें तिला भाषाभिन्नत्व येत नसून, तिची एकरूपता सुद्धां नाहींशी होत नाहीं. अर्थात्, भाषाभिन्नत्वाला मुख्यत्वेंकरून सर्व प्रकारचें स्थित्य-

---

१ ह्या संबंधानें मूरनें असें लिहिलें आहे कीं,

"Vararuchi, the oldest extant grammarian, who treats of the Prakrit forms of speech."

(Muir. II. 43).

न्तर व रूपान्तर व्हावें लागतें, हें उघड आहे. आणि तसें झालें म्हणजे शब्दविचार, वाक्यरचना, व व्याकरण-पद्धति, यांत देखील सहजींच फेरबदल होतो. मात्र, मूलभाषेच्या शाखांत आणि पोटभेदांत, त्या भाषेचें आदि-तत्व, इतक्याही असंख्य अवस्थान्तरांत, सामान्यतः काय-मच राहतें, असें म्हणण्यास हरकत नाहीं.[1]

त्याचें उदाहरण.

ह्याचें प्रत्यक्ष व प्रत्यन्तराचें प्रमाण पहाण्यासाठीं, आपण क्षणभर मराठी भाषेकडेच वळूं, आणि तिची आज सुमारें नऊशें वर्षांत कशा प्रकारची स्थिति व कसें विलक्षण अव-स्थान्तर झालें आहे, हें पाहूं.

मराठी भाषेचा आदिकवि मुकुन्दराज[2] किंवा तदनन्तरचा कल्पक ज्ञानेश्वर[3], प्रौढ पंडितवामन[4] अथवा रसाळ मुक्तेश्वर[5], प्राकृत तुका[6] अगर सुसंस्कृत मयूर[7], फार तर काय सांगावें, पण, सांप्रत कालीन संगीत किर्लोसकर[8] किंवा सतेज

---

१ ह्या गोष्टीची सत्यता प्राकृत, झन्द, ग्रीक, ल्याटिन, इत्यादि भाषांचें परिशीलन केल्यानें, वाचकाच्या लक्षांत सहजीं येणारी आहे. ह्या सर्व भाषांत संस्कृताचें मूलतत्व कायम राहिलें असून, संस्कृतां-तील व्याकरणसंबंधीं सर्व स्थूल विचारांचें प्रतिबिंब, सदरहू सर्व भा-षांत, क्वचित् हुबेहुब, व क्वचित पर्यायानें, परंतु स्पष्ट व्यक्त होतें; आणि लिंग, वचन, विभक्ति, काळ, प्रत्यय, अभ्यास, इत्यादींचें अत्यन्त सादृश्य संस्कृताप्रमाणेंच त्यांत सुद्धां आढळून येतें. (भार-तीय साम्राज्य पु० ९ वें पान ५३–५६; ८६–९३).

२ इ. स. ९७८. ३ इ. स. १२१६. ४ इ. स. १६७३, ५ इ. स. १६५९. ६ इ.स. १६२८. ७ इ.स. १७९४. ८ इ. स. चें १९ वें शतक.

शास्त्री चिंपळुणकर, इत्यादींच्या कृतींत पुष्कळ फरक आणि महदन्तर दिसून येतें. इतकेंच नव्हे तर, मराठी भाषेची प्रथमची मुग्धावस्ता, तदनन्तर तींत शनैः शनैः आलेलें माधुर्य, तिच्यांतील पदलालित्य, तिची सुकुमारता, तिचें गद्यपद्यात्मक जीवन, आणि भाषाव्यंजकत्वासंबंधीं तिच्यांतील प्रसाद, इत्यादि गुण कालान्तरानें व क्रमशः केवळ मूर्तिमंतच तींत भासमान होतात. परंतु असें असून, आणि मराठी भाषेच्या पूर्व व सद्यःस्थितींत जमीन अस्मानाचें अन्तर पडलें असतांही, आम्ही आज नऊशें वर्षांच्या दीर्घावधींत, मराठी वाङ्मयाच्या मजबूत तटबंदींत, आणि त्याच्या उदंड सौरभ्याच्या साम्राज्याखालींच आहों, असें आह्मांला निरंतर वाटतें. इतकेंच नव्हें तर, मुकुंदरायाच्या वेळच्या भाषेची, व सांप्रत काळीं आम्ही वापरीत असलेल्या भाषेचीं, बिलकूल ताडातोड झालेली नसून, तिला भाषाभिन्नत्वसुद्धां आललें नाहीं, असें आम्ही निःशंक समजतों.

हाच नियम अन्य भाषेला देखील तितक्याच प्रमाणानें सर्वांशीं लागू पडतो. चॉसर कवीच्या वेळची व तत्पूर्वकालीन आंग्ल भाषा, आणि बर्क, मेकॉले, वगैरे ग्रंथकारांची[१] सांप्रतची आंग्लभाषा, यांत महदन्तर आहे. तथापि, एवढ्याच कारणानें तिला भाषाभिन्नत्व आलें नसून, तिची निराळ्या किंवा स्वतंत्र भाषेंतही गणना होत नाहीं. आणि मागधी व पालि भाषेचें सुध्दां त्याचप्रमाणें असल्याविषयीं आमचा अल्प समजूत आहे. शिवाय, सदरहू प्राकृत अथवा

१ इ. स. चें १९ वें शतक.

मागधी भाषेचें पालि हें केवळ प्रथमचें आणि पुराणतर रूप असल्याबद्दल, सुविद्यात भट्ट भांडारकरांनीं सुध्दां आपल्या प्रसिध्द दक्षिणच्या इतिहासांत व्यक्त केलें असल्यामुळें, ती गोष्ट देखील आम्ही वाचकांपुढें जशीच्या तशीच ठेविली आहे. (मागील पान २१ पहा).

अशोकाच्या वेळीं मागधी भाषा चांगली प्रचारांत होती; व ती बहार प्रांतांत सुरू असल्याबद्दल सर्वांस महशूर आहे. सबब, त्याच भाषेंत बौद्ध धर्माचीं मतें फैलावलीं जाऊन, त्यांचा प्रसारेही थेट सिव्हलद्वीपापर्यंत झाला. पुढें, ह्या भाषेला सिंहली लोकांनीं पालि अशी संज्ञा दिली, आणि तिची तदनन्तरच पवित्र भाषेंत गणना होऊं लागली. कारण, बौद्धधर्माचीं पुस्तकें ह्याच भाषेंत लिहिण्याचा परिपाठ पडला, व त्यामुळें तिला सहजींच महत्व आलें.

गाथा नांवाची अन्य भाषा.

असो. संस्कृतापासूनच उद्भवलेली एक गाथा नांवाची देखील प्राकृत भाषा आहे, असें कित्येक मानतात. हींत पद्यरचना साधण्याकरितां, व्याकरणाच्या नियमांला अगदींच फांटा दिल्याचें आढळून येतें; आणि ह्याच कारणानें तिच्यांत विशेष अपभ्रंश दृग्गोचर होतात. ललित विस्तारासारखें याच मासल्याचें ग्रंथ होत, व त्यांचा काल इ. स. पूर्वींचा असल्याविषयीं, शोधक विद्वानांचें मत आहे.

---

१ मॉक्समुलरचें ह्या संबंधानें असेंच मत आहे. तो असें ह्मणतो कीं,

(पुढें चालू.)

गाथा हें नांव, नेपालस्थ इतिहासकारांनींच ह्या अपभ्रष्ट भाषेला दिलें असल्याचें कित्येक विद्वान समजतात; आणि हिलाच बर्नाफ हा जंगली संस्कृत, व पालि, प्राकृत, संस्कृत, इत्यादि अठरा धान्यांचें कडबोळें म्हणतो. ही गाथा पद्यात्मक असते; आणि हिचा उपयोग महावैपुल्य, सूत्र, वगैरे बौद्ध ग्रंथांत करण्यांत येतो. हींत अनष्टुभ, शार्दूल-विक्रीडित, इत्यादि अनेक जातींचीं वृत्तें आहेत. तथापि, तींत अपभ्रष्ट व ग्राम्य शब्दांची विशेष खोगीरभरती असून, तिच्यांत नियमबद्धताही दिसत नाहीं. मात्र, ह्या गाथा बऱ्याच प्राचीनकाळच्या आहेत, याबद्दलची शंका

तिचें पौराणत्व.

(मागील पृष्ठावरून पुढें चालू)

" On account of its style and language " it " had been refered by Oriental scholars to a much more modern period of Indian literature," but it " can now safely be ascribed to an ante-Christian era, if, as we are told by Chinese Scholars, it was translated from Sanskrit into Chinese as one of the Canonical books of Buddhism, as early as the year 76 A. D. (Buddhist Pilgrims. " Chips " 1st Edn. vol. I P. 258).

१ बाबू राजेन्द्रलालमित्र.
(J. A. S. Bengal No. 6. 1854).

२ ह्या गाथा नामक भाषेला बर्नाफ् रानटी भाषा म्हणतो.

" A barbarous Sanskrit, in which the forms of all ages, Sanskait, Pali, and Prakrit, appear to be Confounded." (L'Histoire du Buddhisme. P. 104).

वाटत नाहीं. कारण. अशोक चक्रवर्तीच्या भब्र येथील शिलालेखांत, "मुनीगाथा" असें पद आढळून येत असल्याविषयीं, बेर्नाफ, विल्सन, इत्यादींचें मत आहे.

त्या संबंधानें भट्ट भांडारकर यांचें मत.

भट्ट भांडारकर तर गाथा ही स्वतंत्र भाषा म्हणून समजतच नाहींत; आणि आमच्यांत, मुलांच्या जन्मपत्रिका करणारे ज्योतिषी ज्याप्रमाणें अशुद्ध संस्कृत लिहून, त्यांत अडेल त्या ठिकाणीं मराठी ढकलतात, त्याचप्रमाणें गाथा भाषा बनलेली असल्याविषयीं, त्यांचें[3] मत आहे

साहित्य दर्पणांत, संस्कृत भाषा सुशिक्षित आणि

---

1 App. X. Lotus' P. P. 724-29.

2 J. R. A. S. vol. XVI. P. P. 359-67.

३ ह्या संबंधानें ते असें लिहितात कीं,

"I have also to give...another variety of language that is found in the writings of the Northern or Nepalese Buddhists." P. 312.

"This laguage has therefore no fixed characteristics at all......It therefore appears to me that this is not an independent language; but that the writers of the Gathas knew the spoken language or Pali, and that they were imperfectly acquainted with Sanskrit." P. 313.

(Dr. Bhandarkars Sanskrit & PrakritLectures. vol. XVI. 1885).

४ पुरुषाणामनीचानां संस्कृतं संस्कृतात्मनाम् ।
शौरसेनीप्रयोक्तव्याता दृशीनांचयोषितांम् ॥

(पुढें चालू.)

साहित्यदर्पणांतील भाषाविभाग.

सभ्य पुरुषांनीं बोलावी, म्हणून सांगितलें असून, प्राकृत भाषेचे एकंदर चौदा प्रकार दिले आहेत. १ शौरसेनी. २ महाराष्ट्री. ३ मागधी. ४ अर्धमागधी. ५ प्राच्य किंवा गौडी. ६ अवन्तिका. ७ दाक्षिणात्य. ८ शाकरी. ९ बाल्हीकी. १० द्राविडी. ११ आभीरी. १२ चांडाली. १३ शाबरी. व १४ पैशाची. याचप्रमाणें, हे भाषेचे अनेक पोटभेद कोणी वापरावयाचे, याबद्दलचें देखील विश्वनाथानें तपशिलवार विवेचन केलें आहे. कारण, तो असें ह्मणतो कीं, कुलीन आणि सुशिक्षित लोकांच्या

(मागील पृष्ठावरून पुढें चालू)

आसामेवतुगाथासुमहाराष्ट्रींप्रयोजयेत् ।
अत्रोक्तामागधीभाषाराजान्तःपुरचारिणाम् ॥
चेटानांराजपुत्राणां श्रेष्ठिनांचार्धमागधी ॥
प्राच्याविदूषकादीनांधूर्तानांस्यादवन्तिका ।
योधनागरिकादीनां दाक्षिणात्याहि दीयताम् ।
शकाराणांशकादीनांशाकरीं संप्रयोजयेत् ॥
बाल्हीकभाषादिव्यानां द्राविडी द्राविडादिषु ।
आभीरेषुतथाभीरी चांडालीपुक्कसादिषु ॥
आभीरी शाबरीचापिकाष्ठपत्रोपजीविषु ।
तथैवांगारकारादौपैशाची स्यात्पिशाचकम् ॥
चेटीनामप्यनीचानामपिस्यात् शौरसेनिका ।
बालानांषंडकानांचनीचग्रहविचारिणाम् ॥
उन्मत्तानामातुराणांसैवस्यात् संस्कृतं क्वचित् । ...
(४३२ ॥ प० ६ वा.)

स्त्रियांनीं शौरसेनी भाषा वापरावी; मात्र, गायनांत किंवा काव्यांत, ही भाषा महाराष्ट्री असली पाहिजे. राजवाड्यांत अथवा अंतःपुरांत असणाऱ्या नोकरचाकरांची भाषा मागधी असावी. राजपुत्र, व्यापारी, आणि इतर परिवाराची भाषा अर्धमागधी. विदूषक वगैरेंची प्राच्य किंवा गौडी. धूर्तांची अवन्ती. नागरिक व योद्धे यांची दाक्षिणात्य किंवा विदर्भी. शक आणि शकार यांची शाकरी. दिव्यदेहधाऱ्यांची (उत्तरेकडील गांधार देशजांची ?) बाल्हीकी. द्रविडांची द्राविडी. गवळयांची आभीरी. पुक्कसांची चांडाली. लांकडांच्या मोळ्या आणि पानें विकून उपजीविका करणारांची आभीरी व शाबरी. आणि लोणाऱ्यांची पैशाची.

तत्संबंधीं पाश्चात्यांचें मतवैपरीत्य.

परंतु, ह्या भाषाभिन्नत्वासंबंधानें, पाश्चात्यांत बरेंच मतवैपरीत्य असल्याचें दिसतें. कारण, ते असें समजतात कीं, एकाच राष्ट्रांत, एकाच लोकांत, एकाच वर्गांत, एकाच जनसमूहांत, एकाच समाजांत, आणि एकाच जातींत, इतक्या प्रकारचें भाषावैचित्र्य असणें अगदीं शक्य नाहीं. अर्थात्, तें केवळ कृत्रिम अस-

---

१ ह्याखेरीज अन्य सेवकजन, मुलें, नपुंसक, पंचांग पाहणारे सामान्य ज्योतिषी, यांनीं सुद्धां शौरसेनी भाषेचाच उपयोग करावा; आणि कारणपरत्वें, आजारी व वेड्या माणसांनीं संस्कृतांत बोलावें; असें साहित्यदर्पणांत वर्णन आहे.

२ ह्या संबंधानें मूर म्हणतो,

" The rules here given are quite artificial, as it

(पुढें चालू)

त्याविषयींच त्यांची कल्पना आहे, हें आणखी ज्यास्त सांगावयास नको. बीम्र्सचें[1] तर असें मत आहे कीं, नाटकांत किंवा काव्यांत ज्या प्राकृत भाषा आढळतात, त्या बिलकुल व्यावहारिक भाषाच नव्हत्या. म्हणजे, त्या केवळ आलंकारिक असून, त्या लोकांच्या बोलण्यांत कधींही येत नसत, असा त्याच्या लेखाचा आशय होय; व त्याचप्रमाणें, डाक्तर[2] पिश्चेलचा देखील अभिप्राय आहे.

त्यांची भ्रांतिमूलक समजूत.

तथापि, योग्य शोधाअन्तीं, पाश्चात्य विद्वानांची अशा प्रकारची कल्पना केवळ भ्रान्तिमूलक व मिथ्यावादच होय. असें कोणाच्याही लक्षांत सहज येईल, व त्याची खात्री झाल्यावांचून खचितच राहणार नाहीं.

(मानील पृष्ठावरून पुढें चालू)

would be absurd to suppose that different classes of persons living in the same locality, as most at least of the dramatis personæ would do, could each speak different dialects, and that, too, the dialects of other and perhaps distant provinces."

(Muirs Sanskrit Text. vol. II. P. 51. 1871).

१ बीम म्हणतो,

" The Prakrit of the poets is clearly not a dialect that ever was spoken."

२ हा जर्मन विद्वान असून, तो असें लिहितो कीं,

" I agree with Mr. Beams, that none of the Prakrits was ever a spoken language and that in order to learn what was the spoken language of the Aryans we must turn principally to the modern vernaculars."

आतां, पाश्चात्यांस आलेल्या शंकेचें यथार्थ निरसन होण्यासाठीं, आपण एक व्यवहारांतलेंच उदाहरण घेऊं, आणि घडून येणारी वस्तुस्थितीच त्यांच्या पुढें ठेवूं. ह्मणजे, त्यावरून, खरें काय आहे तें कळण्यास त्यांजला चांगलें साधन मिळेल.

तद्विषयक प्रमाण, व एकाच भाषेंतील अनेक भेद.

एतद्विषयक दाखला महाराष्ट्र देशांतलाच घेतल्यास, आपल्याला असें दिसून येईल कीं, आपण सभेंत व विद्वान लोकांशीं बोलतांना जी मराठी भाषा वापरतों, ती भाषा आपण आपल्या घरांत, नित्य व्यवहारांत, आणि मुलांबाळांबरोबर कधींही वापरीत नाहीं. इतकेंच नव्हें तर, शूद्र व अतिशूद्रांची भाषा जरा ग्राम्य आणि अश्लील असल्यामुळें, त्यांच्याशीं जें भाषण करावयाचें, तें त्यांजला समजेल अशाच सोप्या भाषेंत केलें पाहिजे; व तसें केल्याशिवाय गत्यन्तरही नाहीं असें समजून, आपण त्यांच्याशीं त्यांच्याच नेहेमींच्या भाषेंत बोलतों. अर्थात्, सभेंतील व्याख्यानाची भाषा एक, आणि सेवकवर्गाबरोबर वापरण्याची भाषा एक; शिष्ट मंडळीशीं बोलण्याची भाषा एक, व घरांत बोलण्याची एक; अशी वस्तुस्थिति असल्यामुळें, ह्या सर्व परस्परांहून थोड्याबहूत भिन्नच असतात; व प्रसंगानुसार त्या तशा वापरणें देखील आपणांला भाग पडतें. कारण, गडीमाणसांला समजण्यासाठीं, जी भाषा आम्ही बोलतों, तीच जर आम्हीं व्याख्यानांत आणि सभेंत वापरली, तर ती श्रोतृवर्गास नापसंत होऊन, शिष्ट परिषद् आह्मांस ग्राम्य म्हटल्या-

वांचून खचितच राहणार नाहीं. त्याचप्रमाणें, सभेंत किंवा व्याख्यानांत वापरीत असलेल्या भाषेचाच जर आम्ही घरीं दारीं, मुलांबाळांबरोबर, अथवा चाकरमाणसांशीं उपयोग केला, तर त्यांजला ती सरीस्त समजणेंच शक्य नाहीं. एतावता, सरकार व दरबार, घर आणि दार, इत्यादि गोष्टी संभाळण्यासाठीं, आह्मांला या सर्व भाषांचा यथोचित काळीं योग्य तोच उपयोग करावा लागतो.

विशाल नगरींतील भाषाभेद, व

शिवाय, मुंबई सारख्या विस्तीर्ण शहरांत तर, आम्हांला प्रसंगानुसार संस्कृत, मराठी, गुजराथी, हिंदुस्थानी, सिन्धी, पंजाबी, व एकादा लिंगाप्पा भेटल्यास, कानडी सुद्धां बोलावें लागतें. ह्याखेरीज, इंग्रजी भाषेंत सांप्रतकाळीं आमचा अहोरात्र किती व्यवहार चालतो, याचा तर पत्ताच नाहीं. तेव्हां, अशा प्रकारचा "प्रपंचादर्श" दाखविण्यासाठीं, हेंच व्यावहारिक नाटक लिहून, कोणी रसिक जनानें तें रंगभूमीवर लोकांपुढें आणिलें, तर त्यांत संस्कृत, मराठी, गुजराथी, हिंदुस्थानी, सिन्धी, पंजाबी, कानडी, इंग्रजी, इत्यादि अनेक भाषा निरनिराळ्या पात्रांच्या मुखांतून निघालेल्या आपल्या दृष्टीस सहजीं पडतील. अर्थात्, ह्या सर्व व्यावहारिक भाषाच आहेत, असें आज आम्ही निःशंकपणें समजतों. सबब, हल्लीं त्याबद्दल कोणालाही तिळमात्र देखील संशय येण्यासारखाच नाहीं. परंतु, अशी कल्पना करा कीं, हजार पांचशें वर्षीनीं ह्या सर्व मृतभाषा होऊन, मराठी वाङ्मयांतलें सदरीं नमूद केलेलें "प्रपंचादर्श" नाटक मात्र, तत्कालीन एखाद्या भावी विद्वान शोधकाच्या

हातीं लागलें. पुढें, ह्यानें त्याचें परीक्षण केल्यावर, ह्या इतक्या भाषा इ० स० १९०१ सालीं प्रचारांत नसतील, किंवा त्या कोणी सुद्धां बोलत नसेल, अथवा त्या नष्टप्राय असतील, अगर त्या व्यावहारिक असणें शक्यच नव्हतें, असें जर तो प्रतिपादन करील, तर त्याचें म्हणणें किती चुकीचें, कसें भ्रांतिमूलक, व वस्तुस्थितीपासून कितपत दूर होईल, याचा विचार करण्याचें काम मी वाचकाकडेसच सोंपतों.

सुशिक्षित वर्गाचें भाषा ज्ञान.

ह्या समवेतच, पाश्चात्यांनीं आणखीही एक महत्वाची गोष्ट विशेष रीतीनें लक्षांत ठेविली पाहिजे. ती ही कीं, आमच्यांत जे जे ह्मणून आपणास सुशिक्षित ह्मणवितात, त्यांजला बहुतकरून पांच सहा[१] भाषांचें ज्ञान असतें. आणि प्राचीन काळीं, ज्यावेळीं नाटकें लिहिण्यांत आलीं, त्यावेळीं तर आमचें स्वराज्य व साम्राज्य असल्यामुळें, संस्कृतास व भरतखंडांतील देशी भाषांस चांगलेंच उत्तेजन मिळे. कारण, त्याच भाषांत आमची राजकीय, सामाजिक, धार्मिक, व नैतिक हालचाल होत असल्यानें, त्या न्यूनाधिक प्रमाणानें बहुतेक सर्वांसच अवगत असत. तेव्हां, अशा स्थितींत, आणि आमचें भारतीय साम्राज्य विस्तीर्ण असतांना, आमचा चरित्रक्रम व नित्यनैमित्तिक व्यवहार निरनिराळ्या भाषांत सर्रास्त चालावा, यांत कांहींच नवल नाहीं.

---

१ आमच्या महाराष्ट्रांतील व्यवहारज्ञांस, मराठी, गुजराथी, हिंदुस्थानी, कानडी, इंग्रजी, संस्कृत, इत्यादि भाषा बहुतकरून येतात, अशी आमची समजूत आहे.

पाश्चात्यांस आणखीही एका गोष्टीचें महदाश्चर्य वाटतें. सबब, तिचाही खुलासा येथेंच केला पाहिजे. ते असें प्रतिपादन करतात कीं, संस्कृत नाटकांतलीं प्रतिष्ठित पात्रें सेवकादि हलक्या वर्गाबरोबर संस्कृत भाषेंतच बोलतात; आणि हीं त्यांस प्राकृत भाषेंतच उत्तरें देऊन, आपला कार्यभाग उरकतात. सबब, ही खरी वस्तुस्थिति नसावी; व अशी गोष्ट असणें अगदींच शक्य नाहीं; असा त्यांच्या म्हणण्याचा आशय होय. परंतु, प्रत्यक्ष प्रचारांत आणि व्यवहारांत देखील, आपण पूर्वीच्या नाटकांत जसें पाहतों, तसाच अनुभव आपल्याला आज मित्तीस सुद्धां येतो. कारण, शास्त्री, पंडित, इत्यादि विद्वान लोकांस, ठिकठिकाणच्या भिन्न भिन्न देशी भाषांचें विशेष ज्ञान नसल्यामुळें, ते नेहेमीं संस्कृतांतच बोलतात; व त्यांचें भाषण आम्हां प्राकृत जनांस चांगलें समजतें. परंतु, आम्हांला संस्कृत बोलतां येत नसल्याकारणानें, आम्ही मात्र त्यांच्याशीं केवळ मराठींतच संवाद करतों; आणि आपल्या गरजा भागवून घेतों; हें कोणालाही नाकबूल करवणार नाहीं.

प्रतिष्ठित व नीच पात्रांतील भाषाभेद, व त्याचें सांप्रतचें व्यावहारिक उदाहरण.

पाश्चात्यांचा तिसरा आक्षेप असा आहे कीं, नेहेमीं बोलण्याच्या प्रचारांतील भाषेहून, हिंदूंच्या ग्रंथांतरीं दृग्गोचर होत असलेली भाषा अगदीं भिन्न असल्यामुळें, ती निःसंशय कृत्रिम व अलंकारिक होय. परंतु, हें त्यांचें म्हणणें देखील केवळ भ्रांतिमूलक आणि चुकीचें असल्याबद्दल, कोणाच्याही तेव्हांच लक्षांत येईल. कारण,

नेहेमींची बोलण्याची भाषा, व ग्रंथांतली भाषा.

ही गोष्ट फक्त भरतखंडाला किंवा भारतीयांसच लागू आहे, असें नाहीं. तर, ती अखिल भूतलावर, सर्वत्रच प्रचारांत आहे. इतकेंच नव्हें तर, त्याचें प्रत्यक्ष प्रमाण युरोपखंडांत सुद्धां आढळून येत असल्यामुळें, ती गोष्ट पाश्चात्य पंडितांनीं देखील कबूल केली आहे.

भट्ट भांडारकरांनीं पाश्चात्य मताचें केलेलें खंडन.

भट्ट भांडारकरांनीं देखील सदरीं निर्दिष्ट केलेल्या पाश्चात्यांच्या भ्रांतिमूलक समजुतीचें यथार्थ खंडन केलें आहे. ते असें म्हणतात कीं, हल्लीं प्रचारांत असलेल्या देशी भाषा प्राकृतापासूनच उद्भवल्या असून,

---

१ ह्यासंबंधानें, लॅासन हा आपल्या प्राक्कालीन भारतवर्णांत असें म्हणतो कीं,

" The Athenians and Romans certainly did not, in their ordinary life, express themselves in the same style in which their orators spoke; and we Germans permit ourselves to make use of many turns of expression which we deny ourselves in books."

(Lassen's Indian Antiquities. vol.II.P.P. 1147-1153)

त्याचप्रमाणें, आपली व्यावहारिक भाषा ग्रंथांतील भाषेहून कांहींशीं भिन्न असते, हें म्यूरला सुद्धां संमत असल्याचें, त्याच्याच लेखावरून स्पष्ट दिसतें. कारण, त्यानें एके ठिकाणीं असें लिहिलें आहे कीं,

" The language of conversation always differs to some extent from the language of formal composition, or of books."

(Muir's Sanskrit Text. vol. II. 2nd Edn. P. 146.)

२ ह्यांनीं एतद्विषयक निरूपणांत असें लिहिलें आहे कीं,

"The vernaculars have descended from the Prakrits and the Prakrits from the Sanskrit." P. 315.

(पुढें चालू)

ह्या प्राकृत भाषांसही संस्कृतानेंच जन्म दिला आहे. तेव्हां, जर ह्या भाषा 'कृतक मानल्या, तर त्यांची रचना कशासाठीं आणि कोणत्या तत्वावर झाली,

---

(मागील पृष्टावरून पुढें चालू.)

"If the Pràkrit dialects are to be considered artificial, it is difficult to conceive upon what principles they could have been constructed and for what purpose. A conscious manufacture of a language would be conducted upon some general principles, and would not admit of such isolated forms, not obeying any general rule, as we have noticed." P. 316.

"Again if these had been artifical languages, they would not have been called after the names of provinces, as we have seen they were." P. 317.

"And how, if they were not papular dialects, could the idea of using them for women and the inferior characters in dramatic plays have in the first place, arisen? That a poet should make certain persons in his work speak their peculiar dialects, especially when that is an inferior dialect and likely to create mirth, is natural, and this device is resorted to by writers in all countries. But it was probably more from considerations of propriety than liveliness that these languages began to be used by Sanskrit dramatists. For, they are no less particular about such proprieties, and of even the so-called unities, than other nations. For, one of the rules of the Art is that one act should not contain the events of more than a day." P. 317.

(पुढें चालू)

याची कल्पनाच होत नाहीं. शिवाय, अनेक वैयाकरणांनीं व भाषाभिज्ञांनीं एकत्र बसूनच त्या बनविल्या, असें जर आपण क्षणभर मानलें, तर कोणत्या तरी एकाच नियमित धोरणानें त्यांची रचना खचितच झाली पाहिजे होती. परंतु, तसेंही दिसत नाहीं. कारण, जर वस्तुस्थिति तशीच असती, तर त्यांच्यांत हल्लीं जीं शब्दांचीं आणि धातूंचीं निरनिराळीं अपवादक रूपें आढळतात, त्यांजला फांटाच मिळाला असता; व प्रांतसंज्ञक जीं त्यांचीं नांवें सांप्रतकाळीं दृग्गोचर होतात, तशींही सांपडलीं नसतीं. उदाहरणार्थ, महाराष्ट्री, मागधी, गौडी, इत्यादि नांवें महाराष्ट्र, मागध, गौड (बंगाल), वगैरे देशांवरून पडलीं आहेत. सबब, ह्या प्राकृत भाषा अगदीं कृतक नाहींत, हें उघडच सिद्ध होतें.

(मागील पृष्ठावरून पुढें चालू.)

" And the Pràkrits of some of our early plays represent the vernaculars of the time faithfully". P.317

" A literary style, as distinguished from a conversational style, is what one can understand, but a language which never had anything to correspond to it in ordinary vernacular speech, but is simply created, is inconceivable." P. 322.

" And what is the evidence for the truth of this theory? Absolutely none is given. It is simply the vague feeling of an individual or individuals, and not a conclusion arrived at after a deliberate weighing of evidence; while it sets at nought the clearest evidenee available in the works of the grammarians themselves." P. P. 323-324.

(R. A. S. Bombay Branch. vol. XVI. 1885).

त्याचप्रमाणें, आणखीही एक मुद्याची गोष्ट ध्यानांत ठेविली पाहिजे. ती ही कीं, सदरहू प्राकृत भाषा व्यावहारिक नसत्या, तर स्त्रियांची किंवा सेवकवर्गाची भाषा शिष्ट पात्रांहून निराळीच दाखविण्याविषयींचा जो प्रयत्न नाटकादि कृतींत दिसून येतो, त्याचा उद्भव कसा झाला, अथवा तद्विषयक कल्पना उत्पन्न होण्याला तरी कोणतें कारण घडून आलें, हा प्रश्न मुख्यत्वेंकरून उद्भवतो. अर्थात्, शिष्ट पात्रांची संस्कृत, व अन्य पात्रांची ज्या त्या प्रांतांतील प्राकृत भाषाच असल्यामुळें, ती जीं तीं पात्रें तत्कालीन व्यवहारानुरूपच निःसंशय बोलत. यासाठीं, पाश्चात्यांच्या प्रतिपादनास कोणतेंही प्रमाण नसून, प्राक्कालीन भाषाभिन्नत्वांत कसलाही कृत्रिम प्रकार बिलकुल दिसून येत नाहीं, असें म्हणणें प्राप्त येतें.

संस्कृत व प्राकृत भाषांच्या व्यावहारिकत्वाची प्रमाणपूर्वक सिद्धता.

तात्पर्य, संस्कृत आणि प्राकृत भाषा, ह्या केव्हां देखील प्रचारांत नव्हत्या, म्हणून जे कित्येक पाश्चात्य प्रतिपादन करितात, तें केवळ निराधार होय, असें ह्या भाषांत जे अनेक फेरफार झालेले दृष्टीस पडतात, त्यावरून सिद्ध होतें. शिवाय, संस्कृत आणि अनेक प्रकारच्या वर निर्दिष्ट केलेल्या प्राकृत भाषा, ह्यांच्या प्रत्यक्ष इतिहासावरूनच त्यांच्या व्यावहारिकत्वाबद्दल चांगलें अनुमान करतां येतें. कारण, ज्या नियमांनीं त्यांत स्थित्यन्तर व रूपान्तर झालें, ते नियम केवळ सार्वत्रिक असून, त्याच नियमांनीं यूरोपखंडांतल्या देखील नानाविध भाषा बनल्या, आणि त्या संस्कृतोद्भव ग्रीक व ल्याटिन भाषेपासून प्रसवल्या.

मानवी कृतीनें भाषा-घटनेची अशक्यता.

आतां, आमची ही अपूर्व संस्कृत भाषा, अथवा आमचा तो लोकोत्तर प्राकृत वचोविन्यास, कोणी तरी प्रचंड भारतीय पंडितांनींच मुद्दाम तयार केला, अशी क्षणभर कल्पना करावी, तर तें सुद्धां बिलकुल शक्यच नाहीं. कारण, अशा प्रकारची विद्वज्जनांची सभा भरवून, अनेक पंडितांकडून भाषा घडविल्याचें, किंवा ह्या अलौकिक टंकसाळेंतूनच तिचें मुद्रण झाल्याचें, एकही उदारण जगांतील इतिहासांत कोठेंच आढळून येत नाहीं. फार तर काय सांगावें, पण, सुमारें सात आठ वर्षांपूर्वी, युरोपांतील कित्येक पंडितांचा असा विचार चालला होता कीं, अखिल भूतलावरील लोकांना सर्व साधारण अशी होलोपी नांवाची एकच भाषा नवीन तयार करावी. परंतु, तो त्यांचा दीर्घ प्रयत्न जागच्या जागीं, तसाच थिजला. इतकेंच नव्हे तर, त्यांत त्याजला कोणत्याही प्रकारचें बिलकूल यश आलें नाहीं. ह्यावरून, भाषा ही टंकसाळीनें किंवा मुद्दाम केल्यानें होत नसून, तिचें बीज क्वचित स्वयमेव, व क्वचित् सांकेतिक[1] चिन्हांत असतें. मात्र, असंख्य कविपुंगव, अनेक पंडित, व नानाविध विद्वान, तिच्या उन्नतीस आणि श्रेष्ठत्वास कारणीभूत होतात, यांत तिलप्राय देखील शंका नाहीं. अर्थात् सदरील सर्व कारणांनीं, संस्कृत व प्राकृत भाषा ह्या व्यावहारिकच होत्या, असें म्हणण्यास बलवत्तर प्रमाण मिळतें.

---

१ ग्रंथकर्त्याचें भाषाशास्त्र नांवाचें पुस्तक पहा.

भाग ७१ वा.

प्राकृत व मराठी भाषेची उपपत्ति.

प्राकृत व मराठी भाषेची उपपत्ति.

मागील भागांत, प्राकृत व मराठी भाषेची पूर्वपीठिका सांगितली; आणि एकंदर हकीकत संगतवार ध्यानांत येण्यासाठीं, तिची जननी जी संस्कृत व महाराष्ट्र भाषा, तिचा सुद्धां संक्षिप्त इतिहास दिला. इतकेंच नव्हे तर, त्या समवेतच अन्य प्राकृत भाषांचा देखील अवश्य तेवढा वृत्तान्त मीं आपल्या अल्प समजुतीप्रमाणें वाचकांपुढें यथावकाश सादर केला. सबब, आतां मराठी भाषेच्या उपपत्तीकडे वळूं, व तत्संबंधाचा यथावकाश विचार करूं.

तिच्या जननीचा पूर्ववृत्तान्त, व तो देण्याचें कारण.

मराठी, व प्राकृत किंवा महाराष्ट्र या भाषांचा अगदीं निकट संबंध असून, त्यांचें परस्पर केवळ मायलेकींचेंच नातें आहे, असें म्हणण्यास सुद्धां तिळमात्रही हरकत नाहीं. आणि म्हणूनच, मराठी भाषेच्या इतिहासास सुरवात करून, तो प्रत्यक्ष हातीं घेण्यापूर्वी, तिचा उद्भव जिच्यापासून झाला, तिची साद्यन्त हकीकत, केवळ पूर्वापर संबंध कळण्यासाठींच देणें, खरोखरच विशेष अगत्याचें

आहे असें समजून, मागील भागांत प्राकृत भाषांचा पूर्व वृत्तान्त दिला.

प्राकृत व मराठी भाषेच्या इतिहासाचें महत्व.

अस्तु. प्राकृत भाषेप्रमाणेंच मराठी भाषेचा इतिहास देखील फारच रमणीय व रसभरित आहे. इतकेंच नव्हें तर, तो महाराष्ट्रदृष्ट्या सुद्धां विशेष महत्वाचा आहे, हें आणखी ज्यास्त सांगावयास नको. कारण, ही भाषा मध्यप्रांताचा दक्षिणेकडील भाग, वऱ्हाडप्रांत, ग्वाल्हेरचें राज्य, इन्दूरसंस्थान, माळवा प्रांत, सागर मुलुख, गुजराथेंतील बडोदेंसंस्थानचा मुलुख, महाराष्ट्र देश, कोंकणप्रांत, कर्नाटक प्रांतांतला कांहीं मुलूख, म्हणजे बेळगांव, धारवाड, इत्यादि, गोमन्तक प्रांत, तंजावर, वगैरे ठिकाणीं अगदीं ज्यारीनें सुरू असून, चांगली प्रचारांत असल्याचें दिसतें. शिवाय, दिवसानुदिवस, तिच्या अभिवृद्धीचीं चिन्हेंही दिसूं लागलीं आहेत. फार तर काय सांगावें,

सांप्रतच्या प्राकृत भाषांत मराठी भाषेचें श्रेष्ठत्व.

पण, एक शतकापूर्वीं, कांहीं कालपर्यंत, तिचीं ठाणीं अखिल भरतखंडभर सर्वत्र पसरलेलीं होतीं;

---

१ ह्यावेळीं, महाराष्ट्र साम्राज्याचा उदयकाल असल्यामुळें, मराठ्यांची सत्ता सर्व भरतखंडभर वाढली, आणि त्याकारणानें राजकीय बंदोबस्तासाठीं, मराठ्यांचें लष्कर व त्यांचीं ठाणीं चोहोंकडे ठेवावीं लागलीं. ह्या महाराष्ट्र साम्राज्याच्या विस्तारासंबंधानें ग्रॅण्टडफ हा एके ठिकाणीं असें म्हणतो कीं,

(पुढें चालू)

तिच्या लहान लहान वसाहती इतस्ततः चोहोंकडे, अल्पकाळ पावेतों, यथेष्ट चमकत असत; आणि तिचा प्रतापसूर्य सुद्धां उदयाचलावर उत्तम प्रकारें भासमान झाला होता. कारण, श्री शिवाजी छत्रपति महाराजांनीं महाराष्ट्र साम्राज्याचा पाया आपल्या इच्छेनुरूप घातल्यावर, त्यावरील भव्य इमारत व तिची तटबंदी, श्रीमन्त पेशवे सरकारांनीं शुक्ल चन्द्रमाप्रमाणें वाढीस लाविली. इतकेंच नव्हें तर, त्यांनीं कालान्तरानें दिल्ली तक्ताधिपतींस देखील महाराष्ट्र साम्राज्याचे सामंन्त[1] बनवून, हिन्दुपद पादशाहीला त्यांजकडून खंडणी देवविली, आणि हिंदूचें सार्व-[2]

(मागील पृष्टावरून पुढें चालू.)

" Like the parched grass, kindled amid the forests of the Sahyàdri mountains, they (the Marathas) burst forth in spreading flame, and men afar off wondered at the conflagration."

(History of the Marathas P. 30. 3rd Edn).

१ ही उक्ति कदाचित् कोणास अतिशयोक्तीची वाटेल. सबब, तत्संबंधीं परकीयांचा व त्रयस्थांचाच लेख वाचकांपुढें ठेवितों. ह्या बाबतींत डेव्हिड सिंक्लेअर असें लिहितो कीं,

" It was the Peshwa (Báláji Vishwanth) that entered into a treaty with the Emperor (of Delhi) whereby the latter is supposed to have paid tribute to the Marathas, in order to preserve his territories around Delhi from being plundered."

(History of India. By David Sinclair. P. 98).

२ ह्याची सत्यता प्रत्यक्ष आंग्ल प्रमाणानें व इंग्रजांच्या लेखावरूनच सहजीं भासमान होईल. एके ठिकाणीं कीन म्हणतो,

(पुढें चालू)

व तिचा प्रसार.

भौमत्व प्रतिष्ठापित केलें. त्यामुळें, आमच्या वसाहती व आमचीं ठाणीं भरतखंडांत चोहोंकडे चमकत चाललीं. तसेंच, हिमाचलापासून तों तहत रामेश्वरापर्यंत, आणि अटकेपासून तों थेट ब्रह्मपुत्रा नदी पावेतों, आमचा भगवा झेंडाच अव्याहत फडकत असल्यानें, आम्हांला वारंवार सर्वत्र जावें लागे; व सामान्यतः आमचा लवाजमा, नोकर चाकर, इत्यादि सर्व मंडळी तेथेंच राही. क्वचित् प्रसंगीं, आमुचे सगेसोयरे सुद्धां त्याच ठिकाणीं वस्ती करीत, आणि ज्या त्या जितप्रदेशाचा कारभारही संभाळीत. त्याकारणानें, त्या त्या मुलखांत आम्हां जेत्यांची भाषा प्रचारांत येऊन, ती शनैः शनैः फैलावत गेली; व त्या योगानेंच, मराठ्यांचें वर्चस्व आपोआप वाढत जाऊन, त्यांच्या भाषेला सुद्धां त्यासमवेतच सहजीं प्रोत्साहन मिळालें.

(मागील पृष्ठावरून पुढें चालू.)

"The robes of the Empire (of India or Hindustan) now hung not ungracefully on the limbs of a Hindu." (Rulers of India Series. P. 15. Madhavrao Sindia. By H. G. Keene. C. I. E. M. A.)

डाक्टर हण्टर हा असें निष्प्रांजलपणें कबूल करतो कीं,

" The British won India, not from the Moghals but from the Hindus-" (Indian Empire. P. 316. 2nd. Edn).

मराठ्यांचा सुप्रसिद्ध इतिहासकार ग्रॅण्टडफ लिहितो,

" The rise, progress, decline, and fall of our pre, decessors in Conquest in India-" (the Marathas).

(History of the Marathas, 3rd Edn. P. 19).

अर्थात्, ती योग्य कारणांनीं राजकीय भाषा बनली.

महाराष्ट्र साम्राज्यांत, राजकीय, सामाजिक, नैतिक, व धार्मिक वादविवादांत तिचें चलन.

घरीं, दारीं, जनीं, विजनीं, व राजदरबारांतही, या मराठी भाषेचाच प्रसार झाला. राजकीय सल्लामसलत ह्या भाषेंतच होऊं लागली. हरएक प्रकारचें कारस्थान हिच्यांतच होत चाललें. नैतिक वादविवादांत देखील हिनें खरोखरीचेंच अग्रेसरत्व घेतलें. सामाजिक घडामोडींत तर, सर्व कांहीं या मराठी भाषेवरच अवलंबून राहिलें. आणि धार्मिक विषयांत सुद्धां हिच्याखेरीज पानहीं हालेनासें झालें. यामुळें, तिचें प्राबल्य शुक्लचन्द्राप्रमाणें दिवसानुदिवस प्रत्येक कलेनें वाढून, तिचा फैलाव अधिकाधिकच होत गेला.

मराठी भाषा महाराष्ट्र देशांत प्रचारांत असल्याविषयीं, कोणासही शंका येण्यासारखी नाहीं. सबब, हा महाराष्ट्र देश कोणता, त्याची हल्लींची व्याप्ति कशी आहे, आणि पूर्वीं किती होती, याविषयींचाच अगोदर खुलासा देऊं.

महाराष्ट्र देशाची सांप्रतची मर्यादा.

सांप्रतकाळीं, महाराष्ट्र देशाची मर्यादा बरीच विसृत झालेली असून, ज्या देशांत मराठी भाषा प्रचारांत आहे, त्या देशाची गणना महाराष्ट्रांत होते. अर्थात्, सामान्यतः, उत्तरेकडील नर्मदानदीपासून तों तहत दक्षिणेकडील तुंगभद्रा नदीपर्यंतचा सर्व टापू, भडोच व सुरत हे दोन जिल्हे खेरीज करून, केवळ महाराष्ट्रच होय, असें ह्मणण्यास हरकत नाहीं.

रत्नकोश व पुराणांवरून त्याची व्याप्ति.

रत्नकोशावरून, वैदर्भ, नर्मदातटदेश, तापीतटदेश, (म्हणजे नर्मदा आणि तापी नद्यांच्या दोन्ही काठांवरील प्रदेश), महाराष्ट्र व कोंकण, हे सर्व निरनिराळेच प्रांत असल्याचें होतें. शिवाय, मत्स्य, मार्कंडेय, आणि वायुपुराणांवरून तर, महाराष्ट्र हें नांव प्रथमतः अगदींच लहान टापूला असावें, असें वाटतें. कारण, त्यांत फक्त उपरिस्थ गोदावरी व कृष्णानदी, यांच्या दरम्यानच्या प्रदेशाचाच समावेश केला आहे.

दक्षिण, दक्षिणापथ, दण्डकारण्य, व महाराष्ट्र, हे पर्याय शब्द.

तथापि, अन्य संस्कृत ग्रंथावरून, दक्षिण आणि महाराष्ट्र हे बहुतेक पर्याय शब्दच असून, दक्षिण म्हणजे नर्मदा नदीच्या दक्षिणेकडील देश होय, यांत शंका नाहीं. संस्कृतांत, ह्या प्रदेशाला दक्षिणापथ अशी संज्ञा आहे, व त्याचा अर्थ दक्षिणेकडील देश अथवा प्रान्त, असा होतो. ह्याचाच दक्खिणाबध अथवा दक्खिणावध असा प्राकृतांत अपभ्रंश झाला आहे; आणि पेरिप्लसांत देखील ह्या प्रदेशाला दखिनाबदीस असेंच म्हटलें असल्याचें आढळतें.[१]

मत्स्य, मार्कंडेय, व वायु पुराणावरून, दक्षिणापथांत केरलें[२], पांड्यें[३], आणि चोलें[४], यांचा समावेश होत असल्याचें दिसतें. परंतु, त्यांत सुद्धां क्वचित् विसंवादीपणा

---

१ Indian Antiquary. vol. VIII. P. 143.

२ सांप्रतचा मलबारप्रांत. ३ मदुरा. ४ तंजावर.

दिसून येतो; व त्यामुळें, त्याची मर्यादा ल्हान मोठी वाटते. ह्या दक्षिणापथांतच दंडकारण्याचाही समावेश होतो; आणि ह्यालाच दक्षिण किंवा महाराष्ट्र म्हणतात[1].

महाराष्ट्रांतील आमची प्राचीन वस्ती.

असो. महाराष्ट्रांत आमची वस्ती फार प्राचीन काळापासूनच असल्याचें दिसतें. कारण, रामायण काळांत[2] देखील तेथें अगस्त्यऋषींचा आश्रम[3] होता, आणि राम वनवासांत असतांना, त्यांनीं त्याचें यथोचित आदरातिथ्य[4] केल्याविषयीं, प्रत्यक्ष वाल्मीकिरामायणांतच वर्णन आहे.

---

१ दक्षिणच्या प्राचीन इतिहासांत, भट्ट भांडारकरांनीं खालीं लिहिल्याप्रमाणें, एतद्विषयक विवेचन केलें आहे. ते असें लिहितात कीं,

"That this Dandakaranya was the modern Maharashtra is shown by the fact, stated above, that it was watered by the river Godavary and by several others. (Early History of the Dekkan. P. 3. 1884).

२ रामायण कालाचें विवेचन आम्हीं भारतीय साम्राज्याच्या दुसऱ्या पुस्तकांत केलें आहे.

३ स्निग्धपत्रा तथावृक्षा यथा क्षान्ता मृगद्विजाः
आश्रमो नातिदूरस्थो महर्षेर्भावितात्मनः ॥ ७८ ॥
अयंदीर्घायुषस्तस्य लोके विश्रुतकर्मणः
अगस्त्यस्याश्रमः श्रीमान् विनीतमृगसेवितः ॥ ८६ ॥
(सर्ग ११ वा.)

४ एवमुक्त्वा फलैर्मूलैः पुष्पैश्चान्यैश्च राघवम्
पूजयित्वा यथाकामं ततोऽगस्त्यस्तमब्रवीत् ॥ ३१ ॥
(सर्ग १२ वा अरण्यकांडम् ३)

तत्संबंधीं अगस्त्य ऋषींचा उपक्रम.

शिवाय, अगस्त्य महामुनी विंध्याद्रि ओलांडून त्याच्या पलीकडे दक्षिण दिशेला गेल्यावरच, दक्षिणापथांत जास्त दळणवळण सुरूं झाल्याचें दिसतें. इतकेंच नव्हें तर, दक्षिणापथ, किंवा दण्डकारण्यदेश, अथवा महाराष्ट्र प्रान्त वसविण्याच्या कामीं, पहिला उपक्रम अगस्त्य ऋषींनेंच केला होता, असें प्रतिपादन करण्यास ही रामायणावरून बलवत्तर प्रमाण मिळतें. कारण, ह्या पर्वतावरील मार्गक्रमणानें त्याला बहुत श्रम झाले असल्याबद्दल, सदरहू महाकाव्यांतच स्पष्ट उल्लेख आहे. वाल्मीकि कवि ह्मणतोः—

अगस्त्य इति विख्यातो लोके स्वेनैव कर्मणा।
आश्रमो दृश्यते तस्य परिश्रान्तश्रमापहः ॥ ७९ ॥

(सर्ग ११. अरण्यकाण्डम् ३)

तद्विषयक भट्ट भांडारकर यांचें मत.

ह्या संबंधानें भट्टभांडारकरांचें[1] देखील अशाच प्रकारचें मत असल्याचें दिसतें.

मराठीला महाराष्ट्र म्हणण्याचा प्राचीन कालापासूनचा प्रचार.

मराठी म्हणजे महाराष्ट्र देशांत प्रचारांत असलेली भाषा होय. तेव्हां, तिला महाराष्ट्री अशी संज्ञा देणें खचितच आवश्यकतेचें होतें. अर्थात्, ज्या ज्या ठिकाणीं "मराठी भाषेचा इतिहास", "मराठी भाषेची उपपत्ति," "मराठी भाषा," इत्यादि पदांचा आम्ही उप-

---

१ दक्षिणचा प्राचीन इतिहास. पान २.

योग केला आहे, त्या त्या ठिकाणीं "मराठी" च्या ऐवजीं "महाराष्ट्र" हाच प्रौढ व अन्वर्थ शब्द उपयोगांत आणिला पाहिजे होता. इतकेंच नव्हे तर, तसें करणें देखील निःसंशय सयुक्तिक आणि विशेष श्रेयस्कर होतें, असें कित्येक वाचकास प्रसंगानुसार वाटणें, अगदीं संभवनीय व साहजीक आहे. फार तर काय सांगावें, पण, मराठी म्हणजे महाराष्ट्र किंवा प्राकृत भाषाच होय, असें प्रतिपादन करण्यासही फार प्राचीन आणि अगदीं अर्वाचीन असें योग्य प्रमाणच असल्यामुळें, विशेष बळकट्टर कारण मिळतें.

त्याविषयींचें ज्ञानेश्वरींतलें प्रमाण.

आम्ही महाराष्ट्र देशांतले सबब महाराष्ट्र मंडळी असून, आमची भाषा मराठी होय, अशाविषयीं ज्ञानेश्वरांच्या[1] रसाळ व प्रौढ उक्तींतच प्रत्यक्ष आधार सापडतो. ते म्हणतोः—

तो मी येक सर्व मुका । बोलोनि मऱ्हाटिया भाषा ।
करीं डोळेवरी लोकां । घेवों ये ऐसें जें ॥ १७८०॥
ऐसें युगीं परिकळीं । आणि महाराष्ट्र मंडळी ।
श्री गोदावरीच्या कुळीं। दक्षिणिलीं ॥ १८०२॥
(ज्ञा० अ० १८ वा)

श्रीसरस्वती[2] गंगाधरकृत गुरुचरित्रांतसुद्धां मराठी भाषे-

---

१ समाधीकाल. शके १२१८ (इ. स. १२९६.)

२ हा कवि अपस्तंब शाखेंतील कौण्डिण्य गोत्रांतील होता; व त्यानें आपला वृत्तान्त खालीं लिहिल्याप्रमाणें दिला आहे.

(पुढें चालू)

गुरुचरित्रांतलें प्रमाण.

ला महाराष्ट्र हेंच नांव इ. स. च्या १७ व्या शतकांत दिलेलें आढळतें.

नकळे ग्रंथाचा प्रकार । नेणें शास्त्रांचा विचार ॥
भाषा नये महाराष्ट्र । म्हणोनि विनवीं तुम्हांसी १५
(श्रीगुरुचरित्र. अध्याय १ ला.)

श्रीधर कवीचें प्रमाण

मराठी भाषेला सुप्रसिद्ध श्रीधर[1] कवीनें देखील "प्राकृत" व "महाराष्ट्र भाषा" असेंच उपपद दिल्याचें आढळतें. कारण, रामविजयांत त्यानें खालीं लिहिल्याप्रमाणें लिहिलें आहे.

प्राकृत भाषा म्हणोनी ॥ अव्हेर न करावा पंडित जनीं ॥ जैसी कृष्णावेणीचीं तीरें दोनी ॥ परि उदक एकचि जाणिजे ॥ २८ ॥

(मागील पृष्ठावरून पुढें चालू.)

अपस्तंब शाखेसीं । गोत्र कौण्डिण्य महाऋषी ॥
साखरे नाम ख्यातीसी । सायं देवा पासाव ॥ ३८ ॥
त्यापासुनी नागनाथ । देवराव तयाचा सुत ॥
सदा श्रीसद्गुरुचरणध्यात । गंगाधर जनक माझा ३९॥
काश्यपाचे गोत्रीं । चौंडेश्वर नामधारी ॥
मागे जैसा जन्हु अवधारी । अथवा जनक गंगेचा ४१॥
त्याची कन्या माझी जननी । निश्चयें जैशी भवानी ॥
चंपा नामें पुण्यखाणी । स्वामिणी माझी परियेसी ४२॥
(अध्याय १ ला.)

१ मरणकाल. शके १६५०. (इ. स. १७२८).

महाराष्ट्रीचें वचन निश्चित ॥ परि अत्यंत रस भरित ॥ मधुमक्षिकांचें मुखीं स्रवत ॥ मधु सुरस जैसें कां ॥ २९८ ॥

कष्टवीण राज्य आलें हातां ॥ तरी कांहो सोडावें तत्वता ॥ प्राकृत भाषा ऐकोनि कथा ॥ काम श्रोतीं घेइजे तेंवी ॥ २९९ ॥

(श्रीधरकृत रामविजय. अ० १ ला).

अर्वाचीन प्रमाण.

याप्रमाणें, "मराठी" ला "महाराष्ट्र" किंवा "प्राकृत" हा पर्याय शब्द बऱ्याच प्राचीन काळापासून योजीत असल्याचें, आपल्याला उत्कृष्ट उदाहरण आणि बलवत्तर प्रमाण मिळतें. सबब, आता आपण अर्वाचीन काळाकडे वळूं, व ह्यांत कोणी प्रसिद्ध आणि सर्वमान्य विद्वानानें मराठीला महाराष्ट्र हेंच उपपद दिलें असल्यास पाहूं.

राव बहादूर दादोबा पांडुरंग तर्खडकर हे कोण गृहस्थ होते, हें मराठी वाचकास तरी खचितच सांगावयास नको. कारण, ह्यांनीं आपल्या सुविख्यात व्याकरणानें, मराठी भाषेची उत्तम सेवा केली असल्याचें सर्वांसच मशहूर आहे. तदवलोकनानें वाचकास असें कळून येईल कीं, सदरहू ग्रंथाला त्यांनीं " महाराष्ट्र भाषेचें व्याकरण, " हेंच नामधेय दिलें होतें. इतकेंच नव्हे तर, मराठी देशास महाराष्ट्र देश, त्यांतील लोकांस महाराष्ट्र लोक,

आणि त्यांच्या भाषेस महाराष्ट्र भाषा, असेंच त्यांनीं वारंवार म्हटलें[1] आहे.

शास्त्रीय विचारानें त्या पद्धतींचें अनुकरण करण्यास आलेला व्यत्यय.

तेव्हा, अशा प्रकारची वस्तुस्थिति असल्यामुळें, मराठीला महाराष्ट्र भाषेनेंच सुसंज्ञित करणें अगदीं अगत्याचें होतें, यात शंका नाहीं. तथापि, केवळ पारिभाषिक अडचणीमुळें, आम्हांला तसें करतां आलें नाहीं, ही निरुपायाची गोष्ट होय. कारण, मराठी भाषा महाराष्ट्र भाषेपासूनच उत्पन्न झाली असून, महाराष्ट्र भाषेची जी व्याख्या भाषाशास्त्रज्ञानी दिली आहे, ती पाहतां, महाराष्ट्र म्हणजे केवळ उत्कृष्ट प्रतीचें प्राकृतच होय, असें समजावयाचें आहे. फार तर काय सागावें, पण, प्राकृत व महाराष्ट्र हे निव्वळ पर्याय शब्दच होत, असें म्हणण्यास प्रत्यवाय नाही. कारण, काव्यादर्शांत दण्डी कवीनें असें लिहिलें आहे कीं,

महाराष्ट्राश्रयां भाषां प्रकृष्टं प्राकृतं विदुः ।(१.३४)

सबब, मराठी, आणि महाराष्ट्र (अथवा प्राकृत), या दोन भिन्न भिन्न भाषा असून, त्या दोहोंत परस्पर माय-

---

१ दादोबा पांडुरंगकृत महाराष्ट्र भाषेचें व्याकरण. आवृत्ति पांचवी. १८६९. ह्या व्याकरणाची पाहिली आवृत्ति शके १७५८ मांत, म्हणजे इ. स. १८३६ साली, छापली असून, हें व्याकरण दादोबा मजकूरनीं आपल्या वयाच्या विसाव्या वर्षी लिहिलें होतें. यावरून, त्यांची बुद्धिमत्ता, भाषाभिज्ञता, विषयविन्यासपटुता, व कार्यदक्षता, हीं वाचकाच्या लक्षांत सहजीं येतील.

केकींचेंच नातें असल्याकारणानें, दुहितेला (म्हणजे मराठीला) मातेच्या (म्हणजे अर्थात् महाराष्ट्र) नांवानें हाक मारल्यानें किंवा संज्ञित केल्यानें, समजुनींत विपर्यास होण्याचा संभव आहे. एवढेंच नव्हे तर, एकंदर विषयनिरूपणाच्या संबंधानें देखील ठिकठिकाणीं घोंटाळा माजण्यासारखा आहे. यासाठीं, तो दूर होऊन, प्रसंगोपात भासमान होणाऱ्या विकल्पालाही बिलकुल अवकाशच राहूं नये एतदर्थ, प्राकृताच्या जोडीला आम्ही मराठी हेंच नाव कायम ठेविलें, व त्या अनुरोधानेंच पुढील विवेचन केलें.

मराठी, महाराष्ट्र प्राकृत, व संस्कृत, या शब्दांची मीमांसा.

आता, मराठी, महाराष्ट्र, आणि प्राकृत, हीं जीं नांवें आमच्या वाङ्मयाला पडलीं, त्याबद्दलचा विचार करूं; व ह्या भाषाच्या मूलनिर्झराला, किंबहुना या भूतलावरील यच्चावत् भाषांच्या आदिजननीला, संस्कृत हें जें नामधेय देण्यांत आलें, त्याबद्दलच्या कारणांचाही कांहीं मागमूस लागला तर पाहूं. अर्थात्, सदरहू नांवें केव्हा आणि कशीं प्रचारांत आलीं; तीं प्रथम पासूनच तशीं होतीं, अथवा कालान्तरानें त्यांत कांहीं फेरबदल झाला; हा फेरफार कोणत्या कारणानीं घडून आला; इत्यादि गोष्टी नितान्त महत्वाच्या असल्या कारणानें, तिकडे ही क्षणभर आपण आपलें लक्ष्य पुरवूं.

आम्ही महाराष्ट्र देशांतले असल्यामुळें, आमच्या भा-

महाराष्ट्र म्हणजे उत्तम प्राकृत; व महाराष्ट्राचा अपभ्रंश मराठी; आणि त्यांचें परस्पर मायलेकांचें नातें.

षेला महाराष्ट्र हेंच नांव पडलें, व त्याचाच पुढें मराठी असा अपभ्रंश झाला, यांत शंका नाहीं. आतां मराठी भाषेचें मूळ पाहूं गेलें असता, तें निःसंशय महाराष्ट्रींतच सापडतें; आणि महाराष्ट्री म्हणजे उच्च प्रतीची केवळ प्राकृत भाषाच होय, अशा बद्दलचें देखील चांगलें व निरुत्तर प्रमाण मिळतें. (मागील पान ३ व ५७ पहा). याप्रमाणें, महाराष्ट्र ही प्राकृतच असल्याविषयीं सदरहू विवेचनावरून ठरतें. तरी प्राकृत म्हणजे काय, या प्रश्नाच्या उत्तराची अपेक्षा खचितच राहते. पण, ती न राहण्यासाठीं, आम्हीं त्या संबंधाची मीमांसा पूर्वींच केली आहे. (मागील पान १४ पहा). तथापि, तद्विषयक अनुवाद आम्ही पुनश्च येथें थोडक्यात करतों, आणि असें सांगतों कीं, जिची प्रकृति अथवा मूळ केवळ संस्कृतांत असून, जिचा उद्‌भव निव्वळ संस्कृतापासूनच झाला आहे, ती प्राकृत भाषा होय.

प्राकृताची व्याख्या व मराठीचें उद्‌गमस्थान.

ह्या प्राकृत भाषापैकीं, जी सर्वोत्कृष्ट तिलाच महाराष्ट्र अशी संज्ञा आहे, व तिच्यापासूनच मराठी भाषा उत्पन्न झाली आहे, असें आह्मांस वाटतें.

---

१ यासंबधानं, वेबरचें देखील असेंच मत आहे. कारण, तो असें म्हणतोः—" The Prakrit pre-eminently so named,

(पुढें चालू)

परंतु, सुप्रसिद्ध मराठी व्याकरणकार राव बहादूर दादोबा पांडुरंग यांचा अभिप्राय याहून भिन्न असल्याचें दिसतें. कारण, ते असें म्हणतात[1] कीं,

तत्संबंधीं कित्येक विद्वानांचें भिन्न मत.

" ही मराठी भाषा नाटकादि ग्रंथांत मागधी, पैशाची, म्हणोन संस्कृत भाषेवरून साधलेली जी बालभाषा या नांवेंकरून प्रसिद्ध आहे, तिचाच अपभ्रंश अथवा कांहीं एक प्रकार असावा."

क्याप्टेन मोल्सवर्थचा सुद्धां अशाच मासल्याचा अभिप्राय आहे, आणि तो देखील मराठी भाषा मागधीपासून उद्भवली असल्याचेंच लिहितो.[2] तथापि, आमच्या अल्प समजुतीप्रमाणें, हें त्याचें प्रतिपादन सयुक्तिक आहेसें वाटत नाहीं. कारण, एक तर मराठीभाषा महाराष्ट्रीशीं निकट साम्य पावते. दुसरें असें कीं, मराठी व

(मागील पृष्ठावरून पुढें चालू.)

is also called the language of Mahâharâshtra, and is *manifestly the parent of the modern Marathi.* '

(Benfey's article on India. P. 245).

सदरहू अवतरणांतील इतालिक वर्ण आमचे आहेत (ग्रंथकर्ता).

१ महाराष्ट्र भाषेचें व्याकरण. पांचवी आवृत्ति. प्रस्तावना पान १४ वें.

२ मराठी भाषेवरील निबंधांत हा असें लिहितो कीं,

" The latter (Marathi), in like manner, is a language formed from the ancient Magadhi. "

(Captain Molesworth's Essay on the English and Marathi language.)

महाराष्ट्र भाषांचा टापू एकच असल्याचें दिसतें. आणि तिसरें हें कीं, महाराष्ट्र व मागधी या भिन्न भाषा असून, मराठी भाषा मागधीशीं विशेष साम्यही पावत नाहीं. त्यामुळें, मराठी भाषेची उत्पत्ति महाराष्ट्रीपासूनच झाल्याचें उघड होतें.

महाराष्ट्र शब्दाची उपपत्ति.

कित्येकांच्या अभिप्रायाप्रमाणें, महाराष्ट्र हा अन्वर्थच शब्द असून, त्याचा अर्थ मोठें राष्ट्र, अथवा बडे लोक, असा होतो; आणि हाच शब्द प्रचंड व विस्तीर्ण देशाचाही वाचक आहे, असें ते समजतात. भट्ट भांडार·

---

१ वररुचिकृत प्राकृतप्रकाश. मागील पान ४ पहा.

२ भरतखंडाचा अर्वाचीन कोश. पान ३८५. पहिली आवृत्ति. रघुनाथ भास्कर गोडबोलेकृत.

ॲक्वर्थनें महाराष्ट्राला "मोठें राष्ट्र" अशीच सज्ञा दिली आहे. कारण तो म्हणतो, ... "The Marathas, the men of Maharashtra (the Great Nation "), as such. "
(The Maratha Ballads Edited by Acworth. P. III. 1891)

पोप ह्या देशाला "The country of the Mahrathas, or Maharashtra (the great province), असें म्हणतो.

त्यालाच डेव्हिड सिंक्लेर हा मोठें राज्य अशी सज्ञा देतो.

" Maharashtra, (*the great kingdom*), the country of the Marathas, embraced that mountainous district lying between the Central Provinces and the Arabian Sea. " (History of India. By David Sinclair M. A. P. 89. 1892).

करांचें असें मत आहे कीं, राष्ट्रिक, रट्टी, रड्डी, अथवा रड्ड नांवाचे लोक आपल्याला महारड्डी किंवा महारड्ड असें म्हणवूं लागले; आणि यामुळेंच त्यांच्या वसतिप्रदेशाला महाराष्ट्र हें नामधेय पडलें; व पुढें, ह्याचेंच संस्कृतांत महाराष्ट्र असें रूप झालें. तिसरी कल्पना अशी आहे कीं, राठोड नांवाचे रजपूत लोक मारवाडांत आहेत, व त्यांचे पूर्वज महाराठोड अगर मोठे राठोड ह्मणून प्रसिद्ध होते. तेव्हां, ह्याचाच कालान्तरानें महाराष्ट्र हा शब्द बनला असावा. पंडित भगवानलालचें ह्मणणें असें आहे कीं, महारथी (ह्मणजे मोठे योद्धे), या शब्दावरूनच महाराठी हा शब्द झाला, व तदनन्तर मराठी ही संज्ञा प्रचारांत आली.

ह्या सर्वांत, पहिली उपपत्ति आम्हांला विशेष सप्रमाण वाटते; आणि महाराष्ट्र म्हणजे " मोठें राष्ट्र; " महाराष्ट्र देश म्हणजे " मोठ्या राष्ट्रानें वसविलेला देश; " व महाराष्ट्र भाषा म्हणजे "मोठ्या राष्ट्राची अथवा लोकांची व्यावहारिक भाषा;" असाच त्याचा अर्थ स्वयमेव होतो, असें दिसतें. शिवाय, महाराष्ट्र देशाची परंपरा, त्या राष्ट्राचें शौर्य व बुद्धिमता, आणि त्यांची राजकीय व मानसिक उन्नति, इत्यादि गुणांनीं, त्या लोकांस, त्यांच्या देशास, व त्यांच्या भाषेस, हें अन्वर्थच नामधेय प्राप्त झालें आहे, याविषयीं देखील बिलकुल शंका वाटत नाहीं.

आतां, सदरीं पंडित भगवान लालनें महाराठी=महारथी[१]

१ दक्षिणचा प्राचीन इतिहास. पान १०. इ. स. १८८४.

पंडित भगवानलालचें मत.

(ह्मणजे मोठे योद्धे या शब्दा) 'पासूनच महाराष्ट्र हें पद झाल्याचें लिहिलें आहे. अर्थात्, महाराष्ट्र आणि महारथी यांचें तात्पर्यावबोधन एकच असल्यामुळें, आमच्या लोकांस व आमच्या देशास महाराष्ट्र हें नामधेय अगदीं अन्वर्थ असून, तें तद्वाचक जातीवरून खचितच पडलें नसावें, असें सहजीं अनुमान होतें.

तथापि, भट्ट भांडारकर[1] याचा अभिप्राय याहून भिन्न आहेसें वाटतें. कारण, बेडसा शिलालेखांत "महारथिनी" हें केवळ स्त्रीवाचकच पद आलेलें असल्यामुळें, पंडित मजकूरच्या व्याख्येबद्दल भट्ट भांडारकर हे आक्षेप घेतात, आणि असें म्हणतात कीं, सदरहू स्थळीं "महारथिनी" चा अर्थ "महावीर्यवती" किंवा "महारथीची स्त्री," असा करतां येणार नाहीं. तेव्हां, महारथी हें नांव जातीचेंच असावें, असा ते आपला अभिप्राय व्यक्त करतात.

प्राचीन व अर्वाचीन ऐतिहासिक कोशकारांचें मत.

परंतु, ह्या संबंधानें रा० रा० रघुनाथ भास्कर गोडबोले, भारतवर्षीय प्राचीन व अर्वाचीन ऐतिहासिक कोशकार, यांचा ही लेख महत्त्वाचा असल्या कारणानें, त्यांतील अवश्य तें अवतरण येथें देतों. ते ह्मणतात, ' महाराष्ट्र म्हणजे मराठी देश. पृथिवीवर जे देश आहेत, त्यांत हा "महा" ह्मणजे मोठा; व "राष्ट्र" म्हणजे देश. ह्मणून, यास महाराष्ट्र असें नांव आहे. शक्तिसंगम-

---

१ दक्षिणचा प्राचीन इतिहास. पान १०. टीप ४.

तंत्रांत छपन्नदेश आहेत; त्यांत, आणि भारतांत, व जैनांच्या ग्रंथांतसुद्धा, या देशाचें महाराष्ट्र असेंच नांव आढळतें.'

उपहासकांचें मत व त्याचें खंडन.

याप्रमाणें, मराठी शब्द ज्यापासून उत्पन्न झाला, त्या महाराष्ट्रपदाची मीमांसा सर्व बाजूंनीं झाली. इतकेंच नव्हे तर, तत्संबधोच उपलब्ध असलेले यच्चावत् आधार सुद्धां, आम्हीं आपल्या समजुतीप्रमाणें वाचकापुढें यथावकाश रुजू केले. मात्र, कांहीं हिंदुधर्मोपहासकांनीं, व किल्येक दोषैकदृक् पाद्र्यांनीं, आणि कांहीं मत्सरग्रस्त विधर्मीयांनीं, कोणत्याही प्रकारचा तिळमात्र देखील आधार नसता, फक्त नसतेंच छिद्र काढण्याच्या हेतूनें, व केवळ कल्पित बुद्धि धरून, महाराष्ट्र देशाची अगदीं हसूं येण्याजोगी, आणि अज्ञान बालकाकडून सुद्धां विटंबना होण्यासारखी, व्युत्पत्ति केली आहे. अर्थात्, ती अशा प्रकारची असल्यामुळें, तिचें येथें कथन करण्याचें देखील मुळींच प्रयोजन नाहीं. कारण, इतिहासदृष्ट्या योग्य ऊहापोह होण्याजोगी तिची बिलकूल पात्रताच नाहीं. तथापि, जी गोष्ट एकदां श्रवणपथावर आली, अथवा जी एकवार दृग्विषयभूत झाली, तिचा निकाल लावून, कोणत्याही निरर्गल प्रलापाचें वेळींच अवश्य तें खंडन केलें पाहिजे. नाहीं तर, हा विषवृक्ष एकदम वाढीस लागून, कालान्तरानें खचितच फळास येईल. आणि तसें झालें म्हणजे, तद्रसास्वादानें लोकांची प्राणहानि झाल्यावांचून निःसंशय राहणार नाहीं. सबब, समयानुसार तत्काळ जागें होऊन, त्याचा आपण योग्य प्रतिकार केला

पाहिजे; आणि पेरलेलें बीं व रुजलेली रोपें, एकदम मुळासकटच खणून काढून, तीं तत्काळ उपटून टाकलीं पाहिजेत; व त्या सर्वांचा ताबडतोब नाशही केला पाहिजे.

सदरीं निर्दिष्ट केलेल्या गृहस्थांनीं, महाराष्ट्राचा महार+राष्ट्र असा पदच्छेद करून, महाराष्ट्र म्हणजे महारांचें राष्ट्र, अशी त्याची व्याख्या दिली आहे. परंतु, ती सर्वथैव निराधार आहे, हें आणखी विशेष रीतीनें येथें सांगावयास नको. कारण,

१ एक तर, महार हा शब्द प्राचीन नसून, अगदीं अर्वाचीन आहे. आणि म्हणूनच तो संस्कृत किंवा प्राकृत वाङ्मयांत, कोठें देखील आढळून येत नाहीं.

२ दुसरें असें कीं, महाराष्ट्र हा शब्द फार प्राचीन आहे; व तो बुद्धकालीन धर्मक्रान्तीपासून तर चांगलाच प्रचारांत आला असावा, असें वाटतें. निदान, तो इ. स. पूर्वी अनेक शतकें व्यवहारात होता, असें वररुचिकृत प्राकृत प्रकाशावरून तरी खचितच व्यक्त होतें. शिवाय, इसवी सनाच्या अव्वलीस, तो चांगला प्रचारांत असल्याबद्दलची तिळमात्रही शंका नाहीं, असें भट्ट भांडारकर स्पष्टपणेंच

१ संस्कृत व प्राकृत भाषेचा कोश पहा.

२ बुद्धाचा जन्म काळ इ. स. पूर्वी ६२२ वर्षे. भारतीय साम्राज्य पु. ७ वें. पान १४७. डा० हुंटरकृत इतिहास पान १३३. आवृत्ति दुसरी.

३ इ. स. पू. ५६ वर्षे. कॉवेल संशोधित प्राकृत प्रकाश.

लिहितांत. तेव्हां, महाराष्ट्र, म्हणजे मोठें राष्ट्र हेंच नांव खरें होय, यांत संशय नाहीं.

३ तिसरें हें कीं महारांचें अल्पस्वल्प किंवा एवढें मोठें राष्ट्र असल्याचें कोठेंही ऐकिवात नाहीं. इतकेंच नव्हे तर, तद्विषक या भूतलावरील कोणत्याही ग्रंथांत, लेशमात्र देखील प्रमाण नाहीं.

४ चवथें असें कीं, महार, मातंग, इत्यादि हीन जातींची तुरळक वस्ती, पूर्वी कदाचित् गांवोगांव असेल, अशी बाणकृत कादंबरीवरून कल्पना होते; आणि सांप्रतकाळीं तर ती आपण तशी असल्याचें प्रत्यक्षच पाहतों. तथापि, अखिल देश अगर राष्ट्र, महार किंवा मांगांच्या वस्तीचें असल्याचें, थेट ऋग्वेद कालापासून तों तहत सांप्रतच्या विसाव्या शतकापर्यंत, कमींत कमी दहापंधरा हजार वर्षांच्या अवधींत, कोठेंही पाहिलेलें किंवा ऐकिलेलें नाहीं.

५ पांचवें हें कीं, भट्ट भांडारकरासारख्या कोणत्याही नामांकित अगर शोधक विद्वानानें, महाराष्ट्र शब्दाची

---

१ दक्षिणच्या प्राचीन इतिहासांत, भट्ट भांडारकरांनीं असें म्हटलें आहे कीं,

" Whether the name Maratha or Maharashtra had come into use in the time of Asoka does not appear clear from this, but that it was used in the early centuries of the Christian Era admits of little doubt."

(Early H. of the Dekkan P. 10. 1884).

२ इ.स. चें सातवें शतक. भारतीय साम्राज्य. पु. २ रें. पान २२८.

३ रा. रा. बाळ गंगाधर टिळककृत वेदांचें अनादित्व.

" महारांचें राष्ट्र " अशी व्युत्पत्ति केलेलीच नाहीं. इतकेंच नव्हे तर, रट्ट, रास्टिक, अथवा राष्ट्रिक. हेच महाराष्ट्रांतले अगदीं पुराणतम लोक होत, असें त्यांनीं स्पष्टपणें लिहिलें आहे.

६ सहावें असें कीं, अगस्त्य ऋषीने प्रथमतःच महाराष्ट्र देश वसविला, आणि तेथें आपला आश्रम बांधला. परंतु, त्याला सुद्धां महारांची वस्ती अगर महारांचें राष्ट्र कोठें देखील आढळलें नाहीं, व त्याबद्दलचा ग्रंथान्तरीं उल्लेखही नाहीं.

७ सातवें हें कीं, रामायणांत सीतेच्या शोधार्थ, विदर्भ, ऋष्टिक, माहिषक, मत्स्य, कलिंग, दण्डकारण्य अथवा महाराष्ट्र, अन्ध्र, पुण्ड्र, चोल, पाण्डय, केरल, कावेरी, व

---

१ ह्या संबधानें भट्ट भांडारकर म्हणतात,

" The Rastikas, the Sanskrit of which name is Rashtrikas, were very likely the people of Maharashtra; for, a tribe of the name of Rattas has from the remotest times held political supremacy in the Dekkan. " (Early H. of the Dekkan. P. 9).

२ ह्याने आपल्या अद्भुतशक्तीनें एक कन्या उत्पन्न करून, ती विदर्भ राजास दिली असल्याविषयीं, महाभारतांत एक आख्यायिका आहे, त्यावरून, हा ऋषि पुष्कळ पुराण असल्याचें दिसतें.

(महाभारत.)

महाभारताच्या कालाविषयी, भारतीय साम्राज्य पु. दुसरें, यांत विवेचन आहे.

३ भट्ट भांडारकरकृत दक्षिणचा इतिहास.

मलयगिरीचा प्रदेश, वगैरे अनेक ठिकाणीं थेट लंकेपर्यंत, सुग्रीवानें आपले दूत पाठविले असल्याविषयीं वर्णन आहे. परंतु, त्यांत महारांच्या राष्ट्राचा, किंवा त्यांच्या वस्तीच्या देशाचा कोठें ही नामनिर्देश सुद्धां नाहीं.

८ आठवें असें कीं, रामायणावरून राम हा बहुतकोकपर्यंत दण्डकारण्यांत (महाराष्ट्रांत) राहिला असल्याचें दिसतें. परंतु, त्याजला देखील तेथें महारांचें राष्ट्र अगर त्यांची वस्ती, कोठेंही दिसून आली नव्हती.

---

१ आब्रवन्तीमवन्तीं च सर्वमेवानुपश्यत ।
विदर्भानृष्टिकांश्चैव रम्यान्माहिषकानपि ॥ १० ॥
तथा मत्स्यकलिंगाश्च कौशिकांश्च समन्ततः ।
अन्वीक्ष्य दंडकारण्यं सपर्वतनदीगुहम् ॥ ११ ॥
नदीं गोदावरीं चैव सर्वमेवानुपश्यत ।
तथैवान्ध्रांश्च पुंड्रांश्च चोलान्पांड्यांश्च केरलान् ॥१२॥
तत्र द्रक्ष्यथ कावेरीं विहृतामप्सरोगणैः ।
तस्यासीनं नगस्याग्रे मलयस्य महौजसः ॥ १५ ॥
तमुपैति सहस्राक्षः सदा पर्वसु पर्वसु ।
द्वीपस्तस्यापरे पारे शतयोजनविस्तृतः ॥ २३ ॥
अगम्यो मानुषैर्दीप्तस्तं मार्गध्वं समन्ततः ।
तत्र सर्वात्मना सीता मार्गितव्या विशेषतः ॥२४॥
स हि देशस्तु वध्यस्य रावणस्य दुरात्मनः ।
राक्षसाधिपतेर्वासः सहस्राक्षसमद्युते ॥ २५ ॥

(वा. रामायण. किष्किंधाकांड. सर्ग ४१)

२ एवं लक्ष्मणमुक्त्वातु राघवो लक्ष्मिवर्धनः । तस्मिन्देशे बहुफलेन्यवसत्ससुखं सुखी ॥ ३० ॥

(अरण्यकांडम् ३. सर्ग १५).

९ नववें हें कीं, सहदेवाच्या दिग्विजयात, पांड्य, द्रविड, उद्र, केरळ, आन्ध्र, किष्किन्ध, शूर्पारक, इत्यादि दक्षिणेकडील देश जिंकिले असल्याविषयींचें वर्णन आहे. परंतु, त्यांत, महारांचा देश, महाराचें राष्ट्र, किंवा महारांची वस्ती जिंकली असल्याबद्दल कोठें सुद्धां विवेचन नाहीं. फार तर काय सांगावें, पण, त्याचा नुसता नामनिर्देश देखील नाहीं.

१० दहावें असे कीं, सुप्रसिद्ध अशोक नामक चक्रवर्ती

---

१ वशे चक्रे महाबाहुः सुराष्ट्राधिपतिं तदा ।...॥६२॥...
ततः शूर्पारकं चैव तालाकटमथापि च ॥ ६५ ॥
वशे चक्रे महातेजा दंडकांश्च महाबलः ।
सागरद्वीपवासांश्च नृपतीन् म्लेच्छयोनिजान् ॥६६॥
निषादान्पुरुषादांश्च ....॥ ६७ ॥
द्वीपं ताम्राह्वयं चैव पर्वतं रामकं तथा ॥ ६८ ॥
... एकपादांश्च पुरुषान्केरलान्वनवासिनः ॥ ६९ ॥
नगरीं संजयतीं च पाषंडं करहाटकं ॥
दूतैरेव वशे चक्रे करं चैनानदापयत् ॥ ७० ॥
पांड्यांश्च द्रविडांश्चैव सहितांश्चोड्रकेरलैः ।
अन्ध्रांस्तालवनांश्चैव कलिंगानुष्ट्रकर्णिकान् ॥ ७१ ॥
ततः कच्छगतो धीमान् दूतान्माद्रवतीसुतः ।
प्रेषयामास राजेन्द्र पौलस्त्याय महात्मने ॥ ७२ ॥
बिभीषणाय धर्मात्मा प्रीतिपूर्वमरिन्दमः ॥ ७३ ॥
सचास्य प्रतिजग्राह शासनं प्रीतिपूर्वकम् ॥ ७४ ॥
एवं निर्जित्य तरसा सान्त्वेन विजयेन च ।
करदान्पार्थिवान्कृत्वा प्रत्यागच्छदरिंदमः ॥ ७७ ॥
(सभापर्व. अ. ३१).

बादशहानें आपले धर्ममंत्री १ रास्टिक, २ पेटेनिक, आणि ३ अपरान्त, या देशांत पाठविले होते. ह्यापैकीं, रास्टिक म्हणजे संस्कृत राष्ट्रिक होय; व हाच महाराष्ट्रदेश असावा, अशाविषयीं भट्टभांडारकरांचा अभिप्राय आहे. (मागें पान ५२, ६७ पहा). पेटेनिक हा प्राकृतांतील अपभ्रंश असून, तो संस्कृत प्रतिष्ठान शब्दापासून झाला आहे; आणि ह्याला च मराठींत पैठण म्हणतात. आता, अपरान्त हें उत्तर कोंकण म्हणून, सर्वांसच मशहूर आहे; व प्राचीनकाळीं ह्याची राजधानी शूर्पारक असे. कांहीं काळपर्यंत ह्या उत्तर कोंकणाचीच राजधानी श्रीस्थानक (म्हणजे ठाणें) असावी, असें वाटतें.

सदरहू शूर्पारकालाच हल्लीं सुपारा म्हणतात; आणि त्या ठिकाणीं, पंडित भगवानलाल व मिस्तर क्याम्बेल यांनीं पुराणवस्तुविषयक जे महत्वाचे शोध केले, त्यांत त्यांजला अशोक चक्रवर्तीची राजाज्ञाही सापडली. ह्या सर्व गोष्टींवरून, अशोकाची सत्ता सार्वभौम असून, ती दक्षिणोत्तर म्हणजे अफगाणिस्थानापासून तों तहत दक्षिणेकडील कोंकणापर्यंत पसरलेली होती, आणि त्याच्या राजाज्ञेंत मोठमोठीं राष्ट्रें व देश, यांचा उल्लेख विशेष रीतीनें करण्यांत येई परंतु, त्यात महाराचें राष्ट्र किंवा देश, याबद्दलचा कोठेंही नामनिर्देश नाहीं, हें लक्ष्यांत ठेवण्यासारखें आहे.

---

१ भारतीय साम्राज्य. पु. ३, रें. पान १७९.

२ इ. स. पूर्वी २६३–२२९ वर्षे (भट्ट भांडारकरकृत दक्षिणचा इतिहास.)

११ अकरावें हें कीं, पेरिप्लसांत[1] त्या ग्रीक शोधकानें व भूगोलशास्त्रज्ञानें, ह्या भरत भूमींतील नामांकित लोक, अनेक देश, मोठमोठीं शहरें, व नानाविध स्थळें, यांची परिस्थिति, आणि त्यांची हकीगत, या विषयींचें चांगलें व समग्र वर्णन केलें आहे; आणि त्यांतच पैठण, दक्षिणापथ, इत्यादींची महाराष्ट्र देशाबद्दलची माहिती आहे. परंतु, त्यांत महाराष्ट्र ह्मणजे महारांचा देश, अशा विषयींचा कोठेंच उल्लेख नाहीं.

तेव्हां, ही सर्व कारणें मनात आणून, त्यांचा योग्य विचार केला, ह्मणजे असेंच निश्चयात्मक ठरतें कीं, महाराष्ट्र ह्मणजे महाराचा देश, अशी त्याची व्युत्पत्ति खचितच नव्हे. आणि म्हणूनच त्यासंबंधानें, प्राचीन व अर्वाचीन कोशकारांनीं, खालीं लिहिल्याप्रमाणें उद्गार काढिले आहेत. ते ह्मणतात, " आमच्या ऐकण्यांत असें आलें आहे कीं, अलीकडे एका * * *[2] नव्या विद्वानानें, या (शब्दा) चा महार आणि राष्ट्र असा पदच्छेद करून, हें राष्ट्र महारांचें असा अर्थ केला आहे. परंतु तो तसा केलाच असल्यास निर्मूल, अप्रयोजक, व व्याकरण रीतीस प्रतिकूल, म्हणून अशुद्ध आहे, असें समजावें."[3]

---

१ Vide Periplus.

२ हा शब्द व वर्ण जरा ग्राम्य, कडक, आणि सौजन्यरहित असल्याकारणानें, आम्हीं त्यांचा लोप केला आहे. (ग्रंथकर्ता.)

३ रा. रा. रघुनाथ भास्कर गोडबोलेकृत भरतखंडाचा अर्वाचीन कोश. आवृत्ति पहिली. पान. ३८५.

महाराष्ट्र म्हणजे " मोठें राष्ट्र " च होय, असें मराठी भाषेचें परिशीलन करणाऱ्या ॲक्वर्थ सारख्या विद्वान व शोधक पाश्चात्यानें देखील मोठ्या गौरवानें म्हटलें आहे. हा बरींच वर्षे मुंबई म्युनिसिपालिटीचा कमिशनर होता; आणि ह्या व अशाच प्रकारच्या दुसऱ्या मोठ्या हुद्याच्या जागेवर असतांही, त्यानें मराठ्याचे पवाडे उपलब्ध असलेल्या सर्व ठिकाणाहून मुद्दाम जमवून, ते छापविण्याचा केवळ दीर्घ प्रयत्नच केला असल्याचें सर्व लोकांस महशूर आहे.

ह्यासंबंधानें पाश्चात्य मत.

---

१ महाराष्ट्र वाङ्मयासंबंधी व्याख्यान देतांना, महाराष्ट्र म्हणजे महारांचें राष्ट्र (महार + राष्ट्र) अशी जी कुत्सित व्याख्या डाक्तर विल्सनूनें केली आहे, तिला पूर्ण हरताळ लावून, व तद्विषयक आपली बिलकुल संमति नसल्याचें प्रदर्शित करून, मि. ॲक्वर्थ, मुंबई म्युनिसिपालिटीचे माजी कमिशनर, हे असें म्हणाले कीं,

"I cannot believe that, as Dr. Wilson would have it, the word Marathi is derived from such words as Mahar or Mahar Rashtra While we find such words as Kirat (किरात) and Matang (मातंग) in the ancient works of the Hindus, the word Mhar or Mahar is hardly ever mentioned. I should be inclined to say that the word Maratha comes from the Prakrit Maharatha (महारथ), which means a warrier, or great warrior. The word Maharashtra would follow the name of the race."

(Mr. Acworth's Lecture on Marathi Poetry. Delivered on the 26th of December 1901, in the College Hall. Bombay.)

प्राकृत भाषेचें नामकरण.

आतां, **प्राकृत** म्हणजे काय, त्याची मीमांसा कशी होते, आणि त्यावरून कोणतें अवबोधन व्हावें म्हणून मूळ शब्दाचा हेतु आहे, याबद्दलचा विचार करूं.

प्राकृत भाषेची व्याख्या आम्हीं पूर्वींच दिली आहे. (मागें पान १४ पहा.) त्यावरून ज्या भाषेची **प्रकृति** म्हणजे उत्पत्ति **संस्कृता**त आहे, ती **प्राकृत** भाषा होय, असें समजावयाचें. अर्थात्, **मूलवाक्** किंवा **मायभाषा** ही **अलंकृत** असल्याकारणानें तिला **संस्कृत** हें अन्वर्थ नांव पडलें; व तिच्यापासून उद्भवलेल्या भाषेस **प्राकृत** हें नामधेय प्राप्त झालें.

सकृत भाषेचें नामकरण

याप्रमाणें, **मराठी** भाषेच्या उत्पत्तीविषयीं, किंवा तिच्या नामधेयासंबंधीं, अवश्य तो विचार झाला; आणि **मराठी**ची जननी[1] जी **प्राकृत**, जिला **महाराष्ट्र** अथवा **उत्तम प्राकृत**[2] अशी संज्ञा आहे, तिच्या उद्गमाविषयींचा

---

१ सांप्रतची **मराठी** भाषा, ही **महाराष्ट्री**पासूनच उत्पन्न झाली असल्याविषयीं, **बेन्फे**नें देखील लिहिलें आहे तो म्हणतो:—
" And (Maharashtri) is manifestly the parent of the modern Marathi "

२ **प्राकृत** म्हणजे उत्कृष्ट **महाराष्ट्री**च होय, असें **दण्डी**नें सांगितलें आहे. मागील पान ३ पहा.

आणि ह्याचाच अनुवाद पाश्चात्यांनींही केला आहे. **बेन्फे** लिहितो,
" The Prakrit, pre-eminently so named, is also called the language of Maharashtra."
(Article on India. P. 245).

देखील जरूर तो वृत्तान्त दिला. सबब, आतां, ह्या दोहोंचें उत्पत्तिस्थान जें संस्कृत, त्याचें नामकरण कसें व केव्हां झालें, याबद्दलचा विचार करूं.

त्याचा शोध.

आमच्या संस्कृत वाङ्मयांत, किंबहुना अखिल भूतलावरील ग्रंथसंपत्तींत,[२] ऋग्वेद हेच पुराणतम ग्रंथ होत; आणि ते तसे असल्याविषयीं, पौरस्त्य व पाश्चात्य पंडितांत सुद्धां, बिलकुल मतभेदच नाहीं. सबब, ह्या अद्वितीय आणि विमल अशा मूलनिर्झरापासूनच आपण सुरवात करूं, व या अमूल्य रत्नखचित वागुदधींत, संस्कृत नामकरणाच्या अगोदर ह्या सुप्रसिद्ध गीर्वाण भाषेला काय ह्मणत असत, याबद्दलचें कांहीं प्रमाण मिळालें तर पाहूं.

त्याचें मूळ, व पहिलें नांव

ज्या भाषेला आह्मी हल्लीं संस्कृत म्हणतों, अथवा जिला ह्या पृथिवीवरील सर्व राष्ट्रें संस्कृत या सुविश्रुत नामधेयानेंच ओळखतात, ती अतिप्राचीन काळीं,

---

१ हें विवेचन आम्ही भारतीय साम्राज्याच्या दहाव्या पुस्तकांत केलें आहे. परंतु, प्रस्तुतचें पुस्तक अगदीं स्वतंत्रच असल्यामुळें, त्यांतील अवश्य तो मजकूर इतक्याच्या सोईसाठीं, येथें दिला आहे.

२ भट भांडारकर, रा. रा. टिळक, इत्यादि पौरस्त्य पंडित, आणि प्रो. मॉक्समुलर, वेबर, कोलब्रूक, मूर, वगैरे पाश्चात्य विद्वान, यांचे ग्रंथ पहावे. आमच्या वेदांस एक फ्रेंच पंडित "पुराणतम ग्रंथ संपत्तीतील अवशिष्ट रत्न," असेंच म्हणतो.

" Remains of a literature the most ancient. "

(La Bible Dans L' Inde. P. 17. By M. Louis Jacolliot. 1870).

किंबहुना आमचा जन्म होऊन आम्ही उदयास आल्यापासूनच, आमची व्यावहारिक भाषा होती. आणि ह्मणूनच

---

१ संस्कृत ही व्यावहारिक भाषा असल्याविषयी, आम्हा भारतीय साम्राज्याच्या नवव्या पुस्तकांत, यथास्थित ऊहापोह केला आहे. सबब, वाचकांनीं कृपा करून आपलें लक्ष्य तिकडे पुरवावें. (पान ९७ ते १२८ पहा.)

ह्या संबंधानें भट्ट भांडारकरांचे विचारही येथें थोडक्यांत देतों. ते म्हणतात कीं, आम्हां भारतीयांची संस्कृत हीच मूळापासूनची व्यावहारिक भाषा होय.

" Sanskrit must have been a spoken language. And, independently of this consideration, there is positive evidence that Sanskrit was a spoken language." P. 326 " Hence Sanskrit must have been in the times of those two grammarians (Kátyâyana and Patanjali), a spoken language. " P. 357. " It is evident from the whole passage, that Sanskrit was then a spoken language, though some of its verbal forms had fallen into desuetude. " P. 328.

" I am at a loss to see why some scholars should find it so difficult to believe that Sanskrit was a vernacular. If its declensions and conjugations are considered too complicated for the language of every day life, it must not be forgotten that such a fact did not prevent the ancient languages of Europe from becoming spoken languages. " P, 328.

" The only difference is that Sanskrit has had the most perfect grammarians in the world, who observed all the facts of their language, and laid

(पुढें चालू)

आर्यावर्तांत अगर विस्तृत भरतखंडांत, ती आम्ही अहर्निशीं बोलत असूं, व यच्यावत् व्यापार तिच्यांतच चाले, याविषयीं तिळमात्र देखील शंका नाहीं. मात्र, त्यावेळीं तिला संस्कृत हें प्रौढ आणि अन्वर्थ नांव प्राप्त झालें नव्हतें; व तत्समयीं तिची तशी योग्यताही नव्हती. अर्थात्, वेदकाळीं तिला फक्त **वाक्** हीच सामान्य संज्ञा असावी, असें वाटतें; आणि अनेक प्रमाणावरून देखाल तें तसेंच असल्याचें दिसतें.

भाषासंज्ञक वाक्शब्दाचा उपयोग.

ऋग्वेदांतल्या दहाव्या मंडलांत खालीं लिहिलेला ऋचार्ध असून, त्यांत "मी भाषण करतों." "**वाचः प्रथमं मसीय**" असें अग्नीनें म्हटलें आहे. अर्थात्, ही **वाचा** ह्मणजे नेहेमीची तत्कालीन प्रचारांतील भाषा होय. आणि तिलाच **वाक्** ही त्यावेळीं सामान्य संज्ञा असे, अशी माझी अल्प समजून आहे.

तदद्य वाचः प्रथमं मसीय १३. (ऋ. मं १०. अ. ४.)

(मागील पृष्ठावरून पुढें चालू.)

them down as unchangeable facts, and it is this which gives that language a stiffened appearance." P. 318.

"Now, it is clear from all this, that correct words, i. e, Sanskrit, was spoken in these days by all." P. 328. (Dr. Bhandarkar's Sanskrit and Prakrit lectures. R. A. S. Society. Bombay Branch. vol. XVI. 1885.)

त्यावरून, संस्कृत ही व्यावहारिक भाषा असल्याविषयींची वाचकांचो खात्री होण्यासारखी आहे.

हल्लीं आपण बोलत असलेल्या भाषेला जशी **मराठी**, **महाराष्ट्री**, किंवा **प्राकृत** अशी संज्ञा आहे, त्याचप्रमाणें **वेदकालीन आर्यभाषेला** (ह्मणजे **वैदिक संस्कृताला**) **वाक्** हीच सामान्य संज्ञा होती, असें मला वाटतें. इतकेंच नव्हे तर, ह्या प्रतिपादनाच्या पुष्टीकरणार्थ, आणखी हें दुसरें बलवत्तर प्रमाण मिळतें.

त्याचें प्रमाण.

ह्या संबंधानें, **ऋगुवेदाच्या** पहिल्या **मंडलांतील ऋचा** विशेष महत्वाची आहे. सबब, ती येथे नमुद करतों.

> **चत्वारिवाक् परिमिता पदानि**
> **तानिविदुर्ब्राह्मणाये मनीषिणः**
> **गुहात्रीणि निहतानेङ्गयन्ति**
> **तुरीयंवाचो मनुष्यावदन्ति ॥ ४९ ॥**

(ऋ. अ. २ अ. ३. व . २. मं. १. अ. २२. सू. १६४)

भावार्थः— वाचेचीं चार रूपें सांगितलीं असून, विद्वान **ब्राह्मणास** तीं माहीत आहेत. ह्यापैकीं, तीन गुप्त असल्यामुळें, ती कोणाच्या लक्षात येत नाहींत. आणि फक्त राहिलेलें जें वाणीचें चवथें रूप, तें मात्र मनुष्यें बोलतात.

ऋगूवेदांताल.

ह्या ऋचेंत " **वाचा मनुष्या वदन्ति** " हे शब्द खचितच ध्यानांत ठेवण्यासारखे आहेत; आणि जी भाषा मनुष्यें बोलतात म्हणून सदरहू ऋचेंत वर्णन आहे, ती भाषा त्यावेळीं व्यवहारांत होती, असें समजणें भाग पडते. तिलाच

आर्यभाषा किंवा वैदिक संस्कृत म्हणतात; व हिलाच वाक् हें त्यावेळचें भाषासंज्ञक सामान्य नांव असावें, असें वाटतें. कारण तिला वाचा अशीच संज्ञा दिली असल्याचें सद्रहू ऋचेंत सांगितलें असून, ही गोष्ट "वाचो मनुष्या वदंति" या पदावरून चांगली व्यक्त होते.

वेदकालीन समाजाची, निदान प्रथमची तरी, खाचितच बाल्यावस्था होती. त्यामुळें, त्याच्या व्यावहारिक भाषेला देखील कायमचें स्थैर्य किंवा प्रौढता आली नव्हती, असें म्हणण्यास हरकत नाहीं. आणि म्हणूनच तिला कोणतेंही विशेष नांव पडलें नसावें; व "वाक्" किंवा "वाचा" हेंच तिचें सामान्य आणि नेहमींच्या परिपाठांतलें नांव असावें; असें मानण्यास बळवत्तर कारण मिळतें. अर्थात्, पाणिनीच्या वेळीं प्रचारात असलेल्या संस्कृत भाषेला ज्याप्रमाणें "भाषा" अशी संज्ञा होती, त्याचप्रमाणे वेदकालीन ऋषी हे त्यांच्या वेळीं प्रचारांत असलेल्या भाषेला "वाक्" म्हणत, असें दिसतें.

यजुर्वेदांतील.

यजुर्वेदांत देखील "वाक्" शब्द केवळ तत्कालीन भाषासंज्ञकच असल्यामुळें, त्याचा तसा उपयोग केल्याचें चांगलें व्यक्त होतें. कारण, त्या भाषेचें व्याकरण सांगण्याविषयीं, आमच्या त्यावेळच्या ऋषींनीं इन्द्राची प्रार्थना केल्यावरून, त्यानें त्यांस तें प्रकट केलें होतें; व ती गोष्ट तशी असल्याबद्दल योग्य प्रमाण सुद्धां मिळतें.

कृष्णयजुर्वेदांतील ऐन्द्रवायवग्रह ब्राह्मणांत, एके ठिकाणीं खालीं लिहिल्याप्रमाणें उल्लेख आढळतोः—

वाग्वै पराच्य व्याकृताऽवदत् । ते देवा इन्द्रमब्रुवान्निमां नोवाचं व्याकुर्विति । सोऽब्रवीद्वरं वृणै । * * तांमिन्द्रो मध्यतोवक्रम्य व्याकरोत् । तस्मादियं व्याकृता वागुच्यते । इत्यादि. (६·४.)

सामवेदांतील.

त्याचप्रमाणें सामवेदात देखील **वाक्** शब्द तत्कालीन भाषासंज्ञकच असल्याचें दिसतें.

कदु प्रचेतसे महे वचो देवाय शस्यते ।
तदिध्यस्य वर्धनम् ॥ २ ॥

(२ अ० १२ ख० ३ प्र० १ अर्द्ध ४ द० ६ ऋ०)

अयमु ते समतासि कपोत इव गर्भधिम् ।
वचस्त च्चिन ओहसे ॥ ९ ॥

(२ अ. ७ ख. २ प्र. २ अर्द्ध. ९ द. १ ऋ.)

व अथर्वणवेदांतील.

अथर्वणवेदात तर, याहीपेक्षां बलवत्तर प्रमाण उपलब्ध होतें; आणि त्यावरून, "**वाक्**" शब्द तत्कालीनवाचेचाच संज्ञक होता, असें वाटतें.

मधुमन्मे निक्रमणं मधुमन्मे परायणम् ।
वाचा वदामि मधुमद्भूयासं मधुसंदृशः ॥ ३ ॥

(अथर्वणवेद. १. ३४.)

कारण, सदरहू ऋचेंत "**वाचावदामि,**" ह्मणजे "त्यावेळीं प्रचारांत असलेल्या आर्यभाषेंत किंवा वैदिकसंस्कृतांत मी बोलतों," असें सांगण्याचा भावार्थ दिसतो.. नाहींपेक्षां,

("**वाचा**"=वाचेनें=तत्कालीन व्यावहारिक भाषेनें, हा शब्द घातल्याशिवाय देखील) नुसत्या वदामि (ह्मणतो) या शब्दानें कार्यभाग होण्यासारखा आहे.

गीः शब्दाचा व्यावहारिक उपयोग.

वाचेप्रमाणेंच "गीः" शब्द देखील तत्कालीन व्यावहारिक भाषेचाच सज्ञक असे, यांत शंका नाहीं. कारण, त्यावरूनच, **गीर्वाण** हें भाषेचें नांव पडलें आहे; आणि गीर्वाण म्हणजे **संस्कृत** भाषा होय, असें समजतात. अर्थात्, **वैदिक संस्कृताला** ज्याप्रमाणें अन्वर्ध्यायम्[2]. छन्दस्, **निगम, मंत्र,** आणि **ब्राह्मण,** अशीं नावें आहेत, त्याचप्रमाणें **वेदकाळीं** प्रचारात असलेल्या भाषेलाही मुख्यत्वेंकरून "**वाक्**" व कधींकधीं '**गीः**" अशी संज्ञा दिल्याचें दिसते. [1]यासंबंधानें, ऋग्वेदात खाली लिहिल्याप्रमाणें आढळून येतें.

यथा वामत्रिरश्विनागीर्भिर्विप्रोऽअजो हवीत् ॥ २८ ॥

(ऋ. अ ६. अ ३. मं ८. अ ५.)

गिरःस्तोमासऽईरते ॥ २९ ॥

(ऋ. अ ६. अ ३. मं ८. अ ६.)

सामवेदात सुद्धा, "गीः" शब्दाचा व्यावहारिक वाचा म्हणूनच उपयोग केला असल्याचे दिसतें. कारण, त्यातील ऋचांत, गिरेनें स्तवन करीत असल्याचें ठिकठिकाणीं

---

१ हें नांव **यास्कानें** दिलेलें होय. निरुक्त (१-४), व पुढील पान (८२) पहा.

२ हें **पाणिनीच्या अष्टाध्यायीत** सापडतें. पुढील पान (८४) पहा.

वर्णन आहे, व त्यावेळची **गीः** किंवा **वाक्** ही **संस्कृत** होती, म्हणजे **वैदिक संस्कृत** होती, याविषयीं बिलकुल शंका नाहीं. (मागें पान ९, ७५ व पुढें पान ८२–८५ पहा).

सामवेदांतील काहीं उतारे वाचकांच्या सोईसाठीं, येथें थोडक्यांत देतों.

अग्ने त्वां कामये गिरा ॥ ८ ॥

(१ अ. १ ख. १ प्र. १ अर्द्ध. १ द. ८ ऋ.).

यजिष्टमंजसे गिरा ॥ २ ॥

(सदर. २ द. ३ ऋ.)

त्वं त्वा गोपवनो गिरा जनिष्ठदग्ने अंगिरः ।

(१ अ. २ ख. १ प्र. १ अर्द्ध. ३ द. ११ ऋ.)

इन्द्राय मद्वने सुतं परिष्टोभन्तुनोगिरः

(२ अ. ५ ख. २ प्र. ९ अर्द्ध. २ द. ७ ऋ.)

गीर्वणः पाहि नः सुतम् ।

(ऐन्द्रपर्व, कलकत्ता आवृत्ति. पान १०४)

इन्द्रंगीर्भिस्ताविषमा विवासत ॥ २ ॥

(ऐं. प. क. आ. पा. २१६)

उपोषुशृणुहींगिरोमघवन्माऽतथाइव ॥ ८ ॥

(ऐ. क. पा. २३४)

वेदकालानन्तर व्यावहारिक भाषेचें नांव.

असो. वेदकालानन्तर, ह्या भाषेंत थोडासा फरक पडत चालला; व त्यामुळेंच तिला काठिण्य येऊन, ती सामान्य जनांस समजेनाशी झाली. तथापि, **शनैः शनैः** थोडें बहुत रूपान्तर होऊन जी भाषा सिद्ध

झाली, तीच लोकांची व्यावहारिक भाषा बनल्या कारणानें, तिच्यांत आणि वैदिक भाषेंत थोडा विशेष मानणें, किंवा कांहीं निराळया संज्ञेनें दोहोंत भेद करणें, भाग पडलें; व त्याच योगानें, वेदकालीन भाषेचें एक नांव, आणि वेदकालानंतर प्रचारांत असलेल्या भाषेचें एक नांव, असें पृथक् पृथक् नामकरण अमलात आलें.

ही गोष्ट बहुत ग्रंथांवरून, व अनेक ऋषिप्रमाणांवरून सिद्ध होण्यासारखी आहे. सबब, तिकडेच आपण क्षणभर वळूं, आणि त्यासंबंधाचा अवश्य तो दाखला वाचकापुढें ठेवूं.

यास्क ऋषीच्या वेळीं वैदिक भाषेला अन्वध्यायम् म्हणत,

वेद्भाषेचें व व्यावहारिक भाषेचें यास्कानें ठरविलेलें नांव.

व ऋषि मजकूर हे ज्या व्यावहारिक भाषेचा उपयोग करीत, तिला "भाषा" हें रूढ आणि प्रचारातलें नांव असे. ही फोड वेदकालीन भाषेंत दिसत नाहीं, व त्यावेळीं अन्य भाषा प्रचारांत देखील नव्हती. पुढें, कालान्तरानें, वेददुर्बोधत्वामुळें व्यावहारिक भाषा निराळी झाली, आणि सदरीं निर्दिष्ट केलेली वैदिक व अन्य व्यावहारिक भाषेचीं नांवें आपोआपच प्रचारांत आलीं.

ही गोष्ट निरुक्तावरून स्पष्ट दिसते; आणि वेदकाठिण्यामुळें त्याच्या अर्थावबोधाची खरी आवश्यकता असल्याचेंही त्यावरून व्यक्त होतें. कारण, त्यांत असें म्हटलें आहे कीं,

भाषायां चान्वध्यायम् ॥ (१–४.)
अथापीदमंतरेण मंत्रष्वर्थप्रत्ययोनविद्यते ।
अर्थमप्रतियतोनात्यंतं स्वरसंस्कारोद्देशः ।
(१–१९. निरुक्त.)

व्यावहारिक भाषेचें रामायणकालीन नामधेय.

पुढें, कालान्तरानें, ह्या व्यावहारिक भाषेला शनैः शनैः बरेंच मनोहरत्व येऊं लागलें, व तिची सौंदर्यकला देखिल शुक्ल चंद्रमाप्रमाणें फांकत चालली. त्यामुळें तिच्या रमणीयतेला अधिकाधिक तेज येऊन, ती सहजींच अलंकृत झाली, आणि रामायणकालीं तिला संस्कृत हें अन्वर्थ नामधेय पडलें.

ह्याचें प्रत्यक्ष प्रमाण आपल्याला रामायणांतच दिसून येतें, व तत्कालीन व्यावहारिक भाषेची संज्ञा संस्कृत असल्याचें त्यावरूनच व्यक्त होतें. कारण, अरण्यकांडांत, इल्वल नामक क्रूर राक्षसानें ब्राह्मणाचें रूप धारण करून तो संस्कृत बोलावयास लागला, आणि नंतर त्यानें ब्राह्मणांस श्राद्धकर्म करण्यास बोलाविलें, असें वर्णन आहे.

धारयन् ब्राह्मणं रूपं इल्वलः संस्कृतं वदन् ।
आमंत्रयति विप्रान्स श्राद्धमुद्दिश्यनिर्घृणः ॥५६॥

(रामायण. अरण्यकांड. सर्ग ११ वा.)

व तदूनन्तर आजपर्यंत चालत आलेलें नामधेय.

आतां, लौकिक, भाष्य, व भाषा, हीं गीर्वाण भाषेची नांवें जरी प्रसिद्ध आहेत; आणि शास्त्रीय ग्रंथांत तीं विशेष प्रचारांत असल्याचें जरी दिसतें; तरी एकंदर व्यवहारांत संस्कृत हेंच नांव ज्यास्त महशूर आहे, व तेंच अद्यापिही चालतें.

ह्या भाषेचें पाणिनी-च्या वेळचें नांव.

पाणिनीच्या अष्टाध्यायींत सुद्धां प्रचारांत असलेल्या व्यवहारिक भाषेला, "भाषा" अशी संज्ञा दिली आहे, व वैदिक भाषेला छन्दम् म्हटले आहे

विभाषा छन्दसि । (१-२)

छन्दसि सहः । (७-४)

भाषायां सदवसश्रुवः । (७-६)

संस्कृत शब्दाशीं पाणिनीची अभ्यस्तता.

तथापि, त्याला संस्कृत शब्द हा खचितच अभ्यस्त होता, आणि पाणिनीय शिक्षेंत तर संस्कृत शब्दाचा उपयोग प्राकृत शब्दाच्या मुकाबल्यानेंच केलेला आढळतो.[1]

त्रिषष्टिश्चतुःषष्टिर्वा वर्णाः शंभुमते मताः ।
प्राकृते संस्कृतेचापि स्वयं प्रोक्ताः स्वयं भुवा ॥

(पाणिनीय शिक्षा.)

---

१ ही गोष्ट प्रमाणसिद्ध असल्याकारणानें, ती वेबरसारख्या अति तीक्ष्ण गुणदोषविवेचकास सुद्धा कबूल करणें भाग पडलें तो म्हणतो,

" Panini is familiar with the word Sanskrit, but does not use it in this sense, though the Paniniya Siksha does so employ it, in contradistinction to Prakrit. "

(Weber's History of Sanskrit Literature. P. 177. 1882)

कात्यायनकृत शुक्लयजुःप्रातिशाख्यांत, वैदिक भाषेला छन्दस अशी संज्ञा असून, त्या ऋषीच्या वेळीं प्रचारांत असलेल्या भाषेला लौकिक किंवा भाष्य अशी संज्ञा असल्याचें दिसतें.

कात्यायनकालीन त्या भाषेची संज्ञा.

स्वरसंस्कारयोश्छन्दासि नियमः ॥१॥ (अध्याय १ला)
लौकिकानामर्थपूर्वकत्वात् ॥ २ ॥ (अध्याय १ ला).
अथकारं भाष्येषु ॥ १९ ॥ (अध्याय १ ला).

सदरीं, "विभाषा," "भाषायाम्," "भाष्येषु," इत्यादि जीं पदे नमुद केलीं आहेत, त्याचा अर्थ व्यावहारिक किंवा प्रचारांतली भाषा असल्याविषयीं, आम्हीं पूर्वीच सांगितलें असून, भट्ट भांडारकरे[2] देखील त्याचा अर्थ तसाच करतात.

भाषा ह्मणजे व्यवहारिक भाषा.

१ कात्यायनाचा काल इ. स. पूर्वी चवथें शतक असल्याविषयीं, भट्ट भांडारकर यांचा अभिप्राय आहे. ते म्हणतात, "I am therefore inclined to accept the popular tradition which refers Kátyáyana to the period of the Nandas, i. e., to about the first quarter of the fourth Century."

(Dr Bhandarkar's Sanskrit and Prakrit Lectures. R. A. S. Bombay Branch. vol. XVI. 1885. P. 340).

२ ह्यासंबंधानें ते असें म्हणतात कीं, " Now, since Bhâshâ or the ordinary Sanskrit, is thus distinguished from the dialect of the Vedas, it must be the language in use at the time when these writers lived.

(पुढें चालू)

ह्या सर्व गोष्टींचा योग्य आणि सूक्ष्म विचार केला, म्हणजे आपल्याला एवढी गोष्ट अगदीं निर्विवादपणें कबूल करावी लागते कीं, देशावरून, लोकांवरून, अगर राष्ट्रांवरूनच भाषेला नांव पडतें; अथवा, तन्नाम संज्ञकच त्यांच्या भाषेचें नामधेय असतें; म्हणून जें कित्येक प्रतिपादन करतात, तें सर्वांशींच खरें नसून, भाषेची ही अशा प्रकारचीं देशसंज्ञक व राष्ट्रसूचक नावें, तिला मागाहूनच प्राप्त होतात, यात संशय नाहीं.

देशावरून किंवा राष्ट्रावरूनच भाषेला नांव पडतें, हें सर्वांशी सिद्ध नाही.

याबद्दलच्या दाखल्याचें प्रत्यक्ष उदाहरण भरतखंडांतलेंच घेतलें, तर असें दिसून येईल कीं, आमच्या आर्य, वैदिक, गीर्वाण, किंवा संस्कृत भाषेचें प्रथमचें नाव वाक् अथवा गीः असें होतें. (मागें पान ७६ ते ८१ पहा). तदनन्तर, ही थोडीशी प्रचारातीत होऊन तिला काठिण्य आल्यावर, तिच्या ऐवजीं अन्य व्या-

त्याचें प्रमाण.

(मागील पृष्ठावरून पुढें चालू)

"Bhasha," as used by them, is a proper name but in later Sanskrit, it acquired a generic signification and meant language generally. The root from which the word is derived signifies 'to speak." wherefore the original sense of the word as a proper noun must have been the "speech" or "the spoken language." And because this was its signification, it afterwards came to denote "explanation." P. P. 326/327. (Dr. Bhandarkar's Sanskrit and Prakrit Lectures. vol. XVI. 1885. Royal Asiatic Society. Bombay Branch.)

वहारिक भाषा बनली. त्यामुळें पहिलीला अन्वध्यायम्, छन्दस्, निगम, मंत्र, ब्राह्मण, वेद, अशी संज्ञा पडून, दुसरीला भाषा, विभाषा, भाष्य, लौकिकी, व्यावहारिकी, असें म्हणूं लागले. (मागें पान ८२ ते ८९ पहा.) पुढें, ह्या पुराणतम व पवित्र भाषेवर कालान्तरानें नानाविध अलंकार चढून, ती सुसंस्कृत झाली, आणि त्याच कारणानें तिला संस्कृत हे अन्वर्थ नामधेय पडलें.

तद्विषयक मॉक्समुलरचा अभिप्राय व त्याचें प्रामाण्यराहित्य.

तथापि, ह्या संस्कृत संज्ञेसंबंधानें, खुद्द मॉक्समुलरचा अभिप्राय काहीं निराळाच असल्याचें दिसते. कारण, हा असें म्हणतो कीं, गीर्वाण भाषेला संस्कृत हें जें नाव पडलें, तें ती भाषा विशेष अलंकृत

१ ह्यानें आपल्या " अनभ्यस्त बोधक संस्कृत व्याकरणांत " असें लिहिलें आहे की, *Sanskrita* (संस्कृत) means what is rendered fit or perfect. But Sanskrit is not called so because the Brahmans, or still less, because the first Europeans who became acquainted with it, considered it the most perfect of all languages. *Sanskrita* means what is rendered fit for sacred purpose, hence purified, sacred A vessel that is purified, a sacrificial victim that is properly dressed, a man that has passed through all the initiatory rites or *Samskaras;* all these are called *Samskrita.* Hence the language which alone was fit for sacred act, the ancient idiom of the Vedas, was called *Samskrita*, or the sacred language."

(Max Muller's Sanskrit Grammar for Biginners.

किंवा फारच परिपूर्णतेस आल्याच्या योगानें नव्हे. तर, ती यज्ञयागादि क्रियार्थ अत्यन्त पवित्र मानलेली असल्यामुळेंच तिला संस्कृत हें नामधेय प्राप्त झालें. परंतु, ह्या प्रतिपादनास कसलें देखील प्रमाण आहेसे वाटत नाहीं. इतकेंच नव्हे तर, संस्कृत म्हणजे दैवीवाक्; अर्थात्, जिच्यात देव बोलतात, ती भाषा होय; असें दिगन्तविख्यात संस्कृत कविवर समजतात, व सुप्रसिद्ध वाक्पंडितही मानतात.

दण्डीनें एके ठिकाणीं म्हटलें आहे:—

संकृतं नामदैवीवागन्वाख्यातामहर्षिभिः ।

(काव्यादर्श.)

संस्कृत, प्राकृत, गाथा, झन्द, इत्यादि भाषाची नावें देशावरुन पडलेली नव्हेत, असा प्रत्यक्ष पुरावा

याप्रमाणें, संस्कृत भाषेला वेळोवेळीं जी नावें देण्यात आलीं; अथवा ज्या नामकरणानें ती महशूर झाली, त्यापैकीं, देशाचें, लोकाचें, अगर राष्ट्राचें वाचक असें एक नाव देखील नाहीं, हें कोणाच्याही लक्षात सहजी येण्यासारखें आहे.

प्राकृत भाषेचे देखील असेच असून, तिचे प्राकृत हें भाषासंज्ञक नाव देशावरून, लोकावरून, किंवा राष्ट्रावरून मुळीच पडलेले नाहीं, ही गोष्ट प्रमाणसिद्ध असल्यामुळें, कोणासही कबूल केली पाहिजे.

पालि आणि गाथा नामक भाषा, व या दोहोंपेक्षाही पुराणतर जी झन्द भाषा, तिचें सुद्धा याचप्रमाणें आहे; आणि ह्या तिन्ही भाषाचीं नावें देशावरून, लोकावरून, किंवा राष्ट्रावरून, बिलकूल पडलेलीं नाहींत.

आतां, महाराष्ट्र देशांतील भाषेला मराठी, महाराष्ट्र, किंवा प्राकृत, अशीं भिन्नभिन्न नांवें असल्याचें आम्हीं पूर्वीच सांगितलें आहे. (मागें पान ५४ ते ५९ पहा). तेव्हां, जिला देशी अशी संज्ञा दिलेली दृष्टीस पडते, ती भाषा कोणती, याविषयींची किंचित् शंका सहजींच उत्पन्न होते. सबब, त्या संबंधाची थोडीशी हकीकत येथेंच निवेदन करतों.

देशी भाषा कोणती समजावयाची.

देशी हें भाषेचें सामान्य नाम असून, तें अमुक एक भाषेला म्हणून दिलेलें नाहीं. पण, देशभिन्नत्वानें जो भाषेचा प्रकार उत्पन्न झाला, त्यालाच देशी असें नांव पडल्याचें दिसतें. अर्थात्, देशी म्हणजे ज्या त्या देशाची, प्रांताची, किंवा स्थलविशेषाची व्यावहारिक भाषा होय, असें देखील म्हणण्यास हरकत नाहीं. आणि म्हणूनच, भरतखंडांतील आदिमवासी लोकांची किंवा जंगली

देशी म्हणजे प्रांतिक व व्यावहारिक भाषा.

---

१ आम्हीं भरतबाह्य देशांतून आलों असल्याविषयीं, कोणत्याही ग्रंथांत यत्किंचित् देखील प्रमाण नाहीं. इतकेंच नव्हे तर, आम्ही भरतखंडांतलेच रहिवाशी आहोंत, असें मानण्यास बलवत्तर कारण मिळतें.(ग्रंथकर्त्याचें भाषाशास्त्र नांवाचें पुस्तक पहा. पान १०१-१८६.) ह्याच संबंधाचा तपशिलवार ऊहापोह " भारताचें भरतखंड, अथवा आर्याक्रमणाचा मिथ्याप्रवाद " नांवाच्या भारतीय साम्राज्याच्या सोळाव्या पुस्तकांत केला आहे. (हें हल्लीं छापत आहे. ग्रंथकर्ता.)

२ आमच्या आधीं, भरतखंडांत कोणाचीही वस्ती नव्हती; व आम्ही भारतीय आर्यच येथून सर्वत्र गेलों. (भारतीय साम्राज्य पुस्तक दहावें. पान ६१, ६२, ३९७ पहा.)

जातींची भाषाच देशी समजावयाची, असें जें कित्येकांचें म्हणणें आहे, तें निव्वळ भ्रांतिमूलक होय.

त्याचें मुकुंद कवि-कालीन प्रमाण.

मुकुंदराजकृत विवेकसिंधूवरून, देशी शब्द प्रान्तिक भाषेलाच लाविलेला असल्याचें दिसतें. कारण, त्यांत त्यानें असें लिहिलें आहे कीं, परमार्थाचें विवेचन मराठींत असो अगर अन्य देशी भाषेंत असो, त्याचा कोणीही आव्हेर न करतां, सर्वांनीं स्वीकारच केला पाहिजे.

देशी होका मऱ्हाठी । परि उपनिषदाची राहटी ।
तरी हा अर्थु जिवाचिया गांठीं । कां न बांधावा ॥२५॥

(विवेकसिंधु. पूर्वार्ध. अ० १ ला).

शिवाय, देशी म्हणजे ज्या त्या प्रांतातील भिन्न भाषा होय. अर्थात् मराठी, गुजराथी, हिन्दी, व्रिजभाषा, कानडी, तेलंगी, इत्यादि देशी बोलीच समजावयाची, म्हणून जें आम्हीं वर प्रतिपादन केलें, त्याच्या समर्थनार्थ आणखी देखील विशेष बलवत्तर प्रमाण उपलब्ध होतें. आणि त्यावरून, मराठी म्हणजे महाराष्ट्र देशांतील भाषा समजून, देशी भाषेनें मराठी किंवा अन्य प्रान्तिक भाषा घ्यावयाची, हें उघड व सयुक्तिक दिसतें.

ह्या संबंधानें, मुकुंदराजकृत विवेकसिन्धूंत, एक ओंवी फारच महत्वाची आहे. सबब, त्यांतील अवश्य तेवढें अवतरण येथें देतों. कारण, तींत त्यानें फक्त मराठीचाच स्वतंत्र रीतीनें उल्लेख करून, तदनन्तरच्या ओंवींत देशी व मराठी यांचीही जोड दिली आहे.

वेदशास्त्राचा मथितार्थू । मराठिया होय फलितार्थू ॥
तरी चतुरीं परमार्थू । कां न घ्यावा ॥ ११ ॥

(विवेक सिंधु. पूर्वार्ध. अ० १ ला).

आतां, मराठीसुद्धां महाराष्ट्र देशांतील देशीभाषाच होय. त्यामुळें, मुकुंदराज, ज्ञानदेव, श्रीधर, इत्यादि कवि-कुलावतंसांनीं आपल्या भाषेला मराठी, महाराष्ट्री, प्राकृत, व देशी, असें नाव देऊन, तद्व्यतिरिक्त प्रलापास फक्त देशीच म्हणण्याचा परिपाठ पाडला. आणि ही गोष्ट मुकुंदराजाच्या उक्तीवरून, अगदीं सप्रमाण असल्याचें व्यक्त होतें. कारण, त्यानें असें म्हटलें आहे कीं,

देशी हो का मराठी । परि उपनिषदाचीच राहटी ॥
तरी हा अर्थू जिवाचिया गांठीं ॥ कां न बांधावा ॥२९॥

(वि. सि. पू. अ. १ ला)

ज्ञानदेवकालीन प्रमाण.

ज्ञानदेवानें देखील आपल्या ज्ञानेश्वरींत, देशी म्हणजे महाराष्ट्र देशांतील प्रांतिकभाषा, या अर्थानेंच तो शब्द वापरला असल्याचें व्यक्त होतें.

तेथ महेशान्वय संभूतें । श्रीनिवृत्तिनाथ सुतें ॥
केलें ज्ञानदेवें गीते । देशीकार लेणें ॥ १८०६ ॥

(मोक्षसंन्यासयोग. अ० १८).

त्याचप्रमाणें, मुक्तेश्वर कवीनें सुद्धा आपल्या सुप्रसिद्ध महाभारतांत, मराठीला "देशभाषा" हेंच उपपद दिलें आहे. तो म्हणतो,

व्यास ग्रंथगिरीचें सोनें। संस्कृत खोदिये गाळुनि मनें॥
देशभाषा घडिलें लेणें। साहित्यरत्नीं सुजडित ॥

* * *

तो मुद्गल चिंतामणिसुत। लीलाविश्वंभर जगविख्यात
व्यासभारतीचा अर्थ। महाराष्ट्र बोलिला ॥

ह्यावरून, देशी म्हणजे मराठी किंवा प्रांतिक भाषा असून, ती जंगली, रानटी, किंवा आदिमवासी लोकांची भाषा खचितच नव्हे, ही गोष्ट वाचकाच्या लक्षांत तेव्हांच येईल.

शिवाय, दण्डीनें प्राकृत भाषांचे १ तद्भव, २ तत्सम, आणि ३ देशी, असे जे तीन प्रकार केले आहेत, त्यांत देखील देशी म्हणजे प्रान्तिक भाषा, असाच त्याच्या लिहिण्याचा मथितार्थ दिसतो.

दण्डीच्या वेळच्या त्याचा इत्यर्थ.

तद्भवस्तत्समो देशीत्यनेकप्राकृतक्रमः।
(काव्यादर्श.)

भाग ७२ वा.

प्राकृत व मराठी भाषेच्या कालाचा विचार.

प्राकृत व मराठी भाषेच्या कालाचा विचार.

यापूर्वी, मराठी, महाराष्ट्र, व इतर प्राकृत भाषांची मूळपीठिका देऊन, त्याच्या उपपत्तीविषयीं देखील अवश्य ती हकीकत सांगितली. सबब, प्रस्तुत भागांत, प्राकृत आणि मराठी भाषेच्या कालाबद्दलचा विचार करूं, व त्या केव्हा उद्भवल्या, यासंबंधीं कांहीं प्रमाण मिळालें तर पाहूं.

ह्या प्रश्नाचा उलगडा करण्याच्या तजविजीस लागलें, म्हणजे आपल्याला किती प्राचीन कालांत गेलें पाहिजे, आणि खरा सुगाव लागण्याचा कोठें संभव आहे, याबद्दलचा प्रथमतःच विचार करणें अगदीं भाग पडतें.

नाटकावरून त्याचा आनुमानिक काल.

नाटकांवरून असें दिसतें कीं, नाटकशाळांत, अथवा रंगभूमीवर, लोकरंजनार्थ नानाविध रसात्मक प्रयोग करण्याचा ज्यावेळीं प्रघात पडला, त्यावेळीं प्राकृत भाषा देखील संस्कृताप्रमाणेंच केवळ व्यावहारिक व सामान्य जनाच्या प्रचारांतली बनली असावी; आणि मृच्छकटिकाच्या वेळीं व त्यानन्तर, अशाच प्रकारची स्थिति होती, यांत शंका नाहीं.

मृच्छकटिक नाटकाचा काल.

मृच्छकटिक हें सर्वांत पुराणतम नाटक होय; आणि हें शूद्रकानेंच रचलेलें असल्यामुळें, त्याचा काल इ. स. पूर्वी शंभर[1] वर्षे असल्याचें समजतें. तेव्हां, निदान नाटकांवरून तरी, प्राकृत भाषांचा उद्भव आज सुमारें दोन हजार वर्षांपलीकडील कालांत होता, असें ह्मणण्यास हरकत नाहीं.

अशोकाच्या वेळीं प्रचारांत असलेल्या प्राकृत भाषा, व त्यांचा काल.

शिवाय, ह्या गोष्टीला आणखी देखील विशेष बलवत्तर प्रमाण मिळतें, व त्यावरून प्राकृतभाषा याच्याही पूर्वी अनेक शतकें प्रचारांत असल्याचें व्यक्त होतें. कारण, बौद्धधर्माची तिसरी परिषद् इ. स. पूर्वी ३०९ सालीं[2] भरली असून, त्यावेळीं अशोक बादशहा राज्य करीत होता, असें कळून येतें. इतकेंच नव्हे तर,

---

१ ह्यासंबंधानें विल्सन् म्हणतो, " Sudraka preceded Vikramádittya, and consequently the era of Christianity, by a century at least. .. .. It (मृच्छकटिक) ... ... may be considered as the oldest extant specimen of the Hindu drama, and a composition of respectable antiquity. The play contains abundant internal evidence of an ancient date. "

(Wilson's Hindu Theatre. Intr. P. 6.)

२ मूर म्हणतो,

" In the year 309 B. C, the third council was held in the reign of king Asoka, who was a zealous promoter of Buddhism. Turnour. P. XXIX. "

(Muir's Sanskrit Text. vol, II. P. 56).

ह्या चक्रवर्ती राजाच्या कारकीर्दीत, प्राकृतभाषा व्यावहारिक असल्याबद्दलचा दाखला, ह्यानें जणूकाय अजरामरच करून ठेवल्याचें दृष्टीस पडतें; आणि ह्यानें ठिकठिकाणीं निर्माण केलेल्या जयस्तंभांवरून, व तदर्पित लेखांवरून, सामान्य जनास समजत असलेल्या ज्या त्या प्रांतांतील प्राकृत व देशी भाषांतच त्या राजाचीं आज्ञापत्रें प्रसिद्ध होत असल्याचें दिसतें. ह्या भाषात महाराष्ट्री, मागधी, आणि शौरसेनी, या मुख्य होत्या, असें वाटतें. तथापि, त्यांत सुध्दां, बौद्धधर्माच्या संबंधानें फक्त मागधी भाषेला मात्र पवित्रता प्राप्त झाली, व तिच्यांतच असंख्य बौद्धधर्म रचले गेले, यांत संशय नाहीं.

तत्पूर्वकालीन त्यांची परंपरा.

मदरहू विवेचनावरून, प्राकृत भाषांचा काल थेट अशोक राजाच्या कारकीर्दीपर्यंत जाऊन थडकतो, असें कोणाच्याही लक्षांत सहजीं येईल. परंतु, वास्तविक विचार करून दूरवर पाहिलें, आणि सखोलान्वेषण केलें, तर ह्या भाषाचा उदय याच्याही अगोदर सुमारें आठशे वर्षें, किंबहुना हजारपंधराशें वर्षेंही झाला असावा, असें मानण्यास बलवत्तर साधन मिळतें. कारण, गौतम-

१ ह्यासंबंधाचा दाखला महाभारतांत आणि शतपथ ब्राह्मणांत मिळतो. सबब, एतद्विषयक तपशिलवार विवेचन आम्ही पुढें योग्य त्या स्थळीं करण्याचें योजिलें आहे. (पुढील पान १०१–८पहा.,)

महाभारत कालीं संस्कृतेतर भाषा प्रचारांत असल्याविषयीं खालीं लिहिलेल्या श्लोकावरून व्यक्त होतें.

(पुढें चालू)

बुद्धानें बौद्धधर्म प्रतिष्ठापित केला व तो कालान्तरानें नांवारूपासही आणिला. पुढें, ह्या धर्माचा प्रसार होण्यासाठीं, त्यानें ह्या धर्मसंबंधाचा उपदेश आणि तद्विषयक व्याख्यानें, त्यावेळीं प्रचारांत असलेल्या ज्या त्या देशी भाषांत सुरू केलीं; व त्यामुळें, देशी भाषांचा फैलाव होण्यास ही एक उत्कृष्टच संधि मिळाली. तथापि, याच्याही पूर्वी देशीभाषा थोड्याबहुत तरी खचित व्यवहारांत असाव्या, असें मानावें लागतें.

बुद्धाचा काळ, व त्याच्या वेळी प्रचारांत असलेल्यां प्राकृत भाषा.

आता, बुध्दाचा जन्म[1] इ. स. पू. ६२२ व्या वर्षी झाला; आणि त्यावेळीं प्राकृत भाषा चांगल्या प्रचारात होत्या. तेव्हां, त्यांचा उद्गम होऊन त्या व्यावहारिक भाषा बनण्याला, निदान चार पांचशें वर्षे तरी कमींत कमी गेलीं पाहिजेत, हें उघड आहे. सबब, ह्या सर्व कारणांवरून, प्राकृत भाषांचा उदभव झाल्याला आज सुमारें तीन हजार, किंवा चार हजारांजवळ जवळच वर्षे लोटलीं असावींत, असें वाटतें; व तसें मानण्यास

(मागील पृष्ठावरून पुढें चालू.)

प्राज्ञः प्राज्ञप्रलापज्ञः प्रलापज्ञमिदं वचः ॥
प्राज्ञं प्राज्ञः प्रलापज्ञः प्रलापज्ञं वचो ब्रवीत् ॥ २० ॥
(महाभारत. आदिपर्व. अध्याय १४५.)

त्याचप्रमाणें, हीनवाक् किंवा अपभ्रष्ट भाषा ब्राह्मणांनी बोलूं नये, अशाविषयीं शतपथ ब्राह्मणांत सुद्धां प्रमाण मिळतें.

उपजिज्ञास्यां सम्लेछस्तस्मान्न ब्राह्मणो म्लेच्छेत् ।
(३ मपा. १. ५. ११. अ. ३. २. १. २४).

१ डा० हंटरकृत हिंदुस्थानच्या इतिहास. आवृत्ति दुसरी.

बलवत्तर साधनही मिळतें. तथापि, चार हजार वर्षांपलीकडील कालांत मात्र, प्राकृत भाषांचा उद्भव झाल्याचें संभवत नाहीं. कारण, रामायणांत[1], संस्कृतेतर भाषा व्यवहारिक असल्याबद्दल, कोठेंही उल्लेख नाहीं. त्याचप्रमाणें, त्यापूर्वी, म्हणजे वेदकालांत देखील, संस्कृताहून भिन्न अशी अन्यभाषा व्यवहारात असल्याविषयींही दाखला नाहीं.

आतां, ऋग्वेदांत, वाचेचीं चार रूपें असल्याबद्दलचें एका ऋचेंत[3] वर्णन आहे खरें. तथापि, हीं चार रूपें भाषाभिन्नत्वासंबंधानें नसून, तीं वेदवादी, वैयाकरण, याज्ञिक, नैरुक्त, ऐतिहासिक, आत्मवादी, आणि योगी, यांनीं मानलेलीं होत. कारण, वेदवादी हे ओम, भूः, भुवः, व स्वः, हींच वाचेचीं चार रूपें मानतात. वैयाकरणाच्या मतें नाम,

१ रामायणकालाला पांच हजार वर्षे होऊन गेलीं असावीं असें दिसतें.

भा. भा. पु. पुस्तक २ रें. पान १५७ तें १७१.

महाभारताचा काल तीन हजार वर्षावर असल्याचें वाटतें.

भारतीय साम्राज्य. पूर्वार्ध. पुस्तक. २ रें पान १७२ ते २०३.

२ आर्यभाषा व संस्कृत हे निव्वळ पर्याय शब्दच असल्याविषयीं आम्ही पूर्वी सांगितलें आहे (मार्गे पान ९ पहा.). मूर आणखी असेंही म्हणतो कीं, " The Vedic Sanskrit is (excepting some archaisms) nearly identical with the epic. "

(Muir's Sanskrit Texts. II, P 132.)

३ चत्वारिवाक् परिमितापदानि......इत्यादि. ॥४५॥

(ऋ. अ२. अ३. व२२. मं१. अ२२. सू. १६४).

४ ग्रंथकर्त्याचें भाषाशास्त्र पहा. (पान ८२–८३)..

क्रियापद, उपसर्ग, आणि निपात, यांसच वाचेचीं चार रूपें समजण्यांत येतात. मंत्र, कल्प, ब्राह्मण, व लौकिकी, अशीं चार रूपें याज्ञिकांच्या अभिप्रायाप्रमाणें होत. ऋग्, यजुः, साम, आणि अथर्व, अशीं नैरुक्तांच्या मतें वाचेचीं चार रूपें समजावयाचीं. सर्पांची भाषा, पक्षांची भाषा, तिर्यङ्योनींतील क्षुद्र जीवजंतूंची भाषा, व व्यावहारिक भाषा, असे वाचेचे चार प्रकार असल्याविषयीं, ऐतिहासिकांचें ह्मणणें आहे. आत्मवाद्यांच्या मतें, पशु, तूणव, मृग, आणि मनुष्य, यांच्या चार भिन्न भाषाच समजावयाच्या. तसेंच परा, पश्यन्ती, मध्यमा, व वैखरी, हे योग्यांच्या समजुतीप्रमाणें वाचेचे चार प्रकार आहेत. अर्थात्, हे भाषेचे प्रकार देशाभिन्नत्वानें, किंवा राष्ट्रभिन्नत्वानें, अथवा अपभ्रंशानें झालेले नसून, ते केवळ पारिभाषिक आणि विषयभिन्नत्वानेंच कल्पिलेले होत, हें उघड आहे.

वैदिक, रामायण, व महाभारत कालानन्तर प्राकृत भाषांचा जन्म.

सदर्हू निरूपणावरून, या प्राकृत भाषा, वैदिक व रामायण कालानन्तरच्या असल्याविषयीं, अगदीं निश्चित होतें. तथापि, त्या बौद्ध कालाच्याही पूर्वीच्या असल्यामुळें, पुष्कळ प्राचीन आहेत, याविषयीं मात्र तिळभर देखील शंका रहात नाहीं.

एतद्विषयक वेबर प्रभृतींचें मत, व त्यांचें खंडण.

कित्येकांचें असें मत आहे कीं, प्राकृत भाषा संस्कृतापासून उद्भवलेल्या नसून, प्राकृत व संस्कृत या दोन्ही भाषा एका जननीपासूनच जन्म पावल्या आ-

हेत. आणि म्हणूनच, वेबर[1] प्रभृतींचा अभिप्राय सदरीं नमूद केलेल्या विवेचनाहून अगदीं भिन्न आहे, असें दिसतें. कारण, ते असें प्रतिपादन करतात कीं, प्राकृत भाषा संस्कृतोद्भव नसून, केवळ संस्कृतप्रमाणेंच, वैदिक किंवा आर्यभाषेपासून उत्पन्न झाल्या आहेत. पालि भाषेची देखील अशीच हकीकत असल्याचें ते मानतात, आणि ती निराळी

१ त्यानें एके ठिकाणी असें लिहिले आहे की,

" The Sanskrit Language and the Prakrit dialects had, therefore, a common and simultaneous origin ; the latter did not spring out of the former. "

२ डी. आल्विसूनें केलेल्या कात्यायन व्याकरणाचें परीक्षण करतांना, वेबर असें म्हणतो,

" The long investigation which the author then institutes (P P. LXXIII—CXXXII.) regarding the antiquity of the Pali and its relation to the Sanskrit conducts him rightly to the conclusion that both dialects (Pali and Sanskrit) were ' contemporaneously ' evolved from one source (viz, the Vedic language). .. ... It is clear that the Sanskrit, both in its phonetic system and flexions, stands much closer to the common mother of it and the Pali, than the latter does, and has consequently a far superior right than it, to be regarded as the representative of that parent language. "

(Journal, German Oriental Society. 1895.)

दुसऱ्या एका ठिकाणीं, वेबरनें पालि, प्राकृत, आणि संस्कृत, यांजला ' बहिणी ' अथवा ' सहोदरा ' अशीच संज्ञा दिलेली आढ-

(पुढें चालू)

भाषा नसल्याचें समजतात. अर्थात्, संस्कृत, व प्राकृत आणि पाली, यांचें परस्परांतील नातें मायलेकीचें नसून, तें सहोदराचें आहे, अशी त्यांची समजूत झाल्याचें दिसतें. परंतु, ह्या त्यांच्या म्हणण्याला काहीं एक आधार नाहीं, व म्हणूनच ल्यॉसननें[1] त्याचें यथार्थ खंडन केलें आहे; आणि भट्ट भांडारकरांनीं सुद्धां[2] त्याबद्दलचा आपला सणसणीत अभिप्राय दिला आहे. कारण, ते असें

ल्यॉसन व भट्ट भांडारकरांचा अभिप्राय.

(मागील पृष्ठावरून पुढें चालू.)

ळते. कारण, त्यानें असें लिहिलें आहे की, " We have unfortunately no proper name for that style of the language which lies as the foundation of both the 'sister dialects,' the Pali (and Prakrit) and the Sanskrit; i. e, for the Vedic vulgar speech. "

तथापि, ह्या संबंधानें वेबरचें मत ठाम असल्याचें दिसत नाहीं. कारण संस्कृत ही पालि व प्राकृत भाषेची मायभाषाच ठरविणें विशेष श्रेयस्कर होय, असें सुद्धां त्यानें एके ठिकाणीं म्हटलें असून, दुसऱ्या एका स्थळीं तर, प्राकृत भाषेलाच तिचा मूळ पाया बनविला आहे. (मागें पान २२पहा). जर्नल् जर्मन् सोसायटी. पु.१९वें.

१ ल्यॉसन् म्हणतो, " I do not therefore believe in a contemporaneous development side by side, of the Sanskrit and the Prakrit tongues out of the one common source of the Indo-Aryan langnage. "

(Indian Autiquities. vol. II. P. 486.)

२ भट्ट भांडारकर म्हणतात, ' The vernaculars have descended from the Prakrits, and the Prakrits from Sanskrit.,' P. 315.

स्पष्टपणें लिहितात कीं, सांप्रतकाळीं प्रचारांत असलेल्या देशी भाषा प्राकृतापासून झाल्या असून, ह्या प्राकृतभाषा संस्कृतापासूनच उद्भवलेल्या असल्यामुळें, पाली व प्राकृतभाषा ह्या सर्व संस्कृताच्या केवळ दुहिताच होत.

आतां, संस्कृत व प्राकृत या समकालीनच भाषा होत, असा वेबरचा मूळ अभिप्राय असल्यामुळें, प्राकृताच्या प्राचीनत्वाबद्दल, निदान त्याला तरी शंका घेण्याचें कारण नाहीं. आणि म्हणनच, त्यानें आपलें तद्विषयक मत अगदीं स्पष्टपणें प्रकट केलें आहे; व इ. स. पूर्वी ३०० वर्षांच्याही अगोदर, अनेक शतकें, सदरहू प्राकृतभाषा मायभाषेपासून प्रसवल्या असाव्या, असें तो लिहितो. (वेबरकृत संस्कृत भाषेचा इतिहास. पान १८०).

प्राकृत भाषांच्या पौराणत्वाविषयीं, वेबरचें मत.

आमच्या अल्प समजुतीप्रमाणें, आह्मांस तर असें वाटतें कीं, प्राकृत भाषेचा काल याहीपेक्षा पुराणतर असावा; निदान हिचे बीजांकुर तरी फार प्राचीनकाळांत

प्राकृत भाषेचे बीजांकुर

(मागील पृष्ठावरून पुढें चालू.)

"The development of the Prakrit dialects from Sanskrit is paralleled by the development of the Romance languages from Latin." P. 316.

"The Pali must be regarded as a daughter of Sanskrit and not its sister." P. 326.

(Dr. Bhandarkar's Sanskrit and Prakrit Lectures. R. A. S. Bombay Branch. vol. XVI. 1885.)

दृग्गोचर होतात, याविषयीं बिलकुल शंका नाहीं. कारण, शुक्ल यजुर्वेदाच्या शतपथब्राह्मणांत, भाषाविषयक प्रश्नांचा यदृच्छयाच विचार केला आहे. त्यावरून आमच्या प्रतिपादनाला बरेंच पुष्टीकरण मिळत असल्याचें दिसतें. ह्यांतील एका ऋचेंत असें कथानक आहे कीं, असुर हे अपभ्रष्ट भाषा बोलले, आणि शुद्ध शब्द न वापरतां, अशुद्ध शब्दांचाच त्यांनीं उपयोग केला. त्यामुळें, "हे अरयो हे अरयः" । या शुद्ध शब्दाऐवजीं, "हेऽलवो हेऽलवः" या अशुद्ध शब्दांचा प्रयोग होऊन, असुराचा पराभव झाला.

तेऽसुरा आत्तवचसो हेऽलवो हेलव इतिवदन्तः पराबभूवुः ॥ २३ ॥ (३ प्रपा० १. ५. ११; अध्या० ३. २. १. २३.)

यासाठीं, ब्राम्हणांनीं अपभ्रष्ट भाषा बोलूं नये, अशी शतपथ ब्राह्मणांत आज्ञा आहे.

उपजिज्ञास्यांसम्लेछस्तस्मान्नब्राह्मणोम्लेछेत् । ....२४ (३ प्रपा० १. ६. ११. ३ अध्या० २. १.२४.)

एकंदर प्रमाणांवरून, प्राकृत भाषांच्या पौराणत्वाची सिद्धता.

असो. अशा प्रकारें, प्राकृत भाषेचें पौराणत्व केवळ निर्विवादच सिद्ध झाल्यामुळें, तें पाश्चात्यांस[१] देखील निःशंक कबूल करावें लागतें; आणि म्हणूनच,

---

१ ल्यासन् म्हणतो,

"But such a corruption of language is not the work of a few years, the Sanskrit must have

(पुढें चालू)

तत्संबंधाचा अभिप्राय ते अगदीं निर्भिडपणें व ठाम रीतीनें देतात.

म्लेच्छ किंवा अपभ्रष्ट शब्द.

सदरहू " म्लेछ " शब्दाचा अर्थ " म्लेच्छांची भाषा " असा नसून, त्याचा अर्थ " अपभ्रष्ट भाषा " असा होतो. आणि म्हणूनच म्लेच्छ ह्मणजे अमंगळ, तिरस्करणीय, किंवा भ्रष्ट, असें समजण्याचें आहे. वेदकाळांत,

---

(मागील पृष्ठावरून पुढें चालू.)

begun centuries before to be resolved into the popular dialects, we will not here take into account the tradition that the Buddhists from the commencement anuounced their new doctrine in Prakrit. The Epic poems no where allude to the different classes of auditors being unable to understand each other; nor have I yet found any reference to a diversity of speeeh among the Aryans." (Lassen. P. 592.)

आणखी एका ठिकाणीं तो असेंही म्हणतो कीं, अशोकाच्याही पूर्वी पुष्कळ कालपर्यंत, ह्या प्राकृत भाषा चांगल्या प्रचारांत असाव्या.

" It is highly probable that the popular Indian dialects existed at a still earlier period than this" (the age of Asoka).

(Lassen's Indian antiquities. vol. II, P. 486).

ह्या प्राकृत भाषांच्या संबंधानें, म्यूरनें असें लिहिलें आहे कीं, त्या फारच प्राचीन असून संस्कृतोद्भव आहेत.

" These (Prakrit) dialects assert for themselves a high antiquity, and are derived, one cannot doubt, from an ancient Aryan speech. " (Muir. II. 8. 1871).

दस्यु अथवा अनार्य शब्दाचा अर्थ याच हेतूनें घेण्यांत येई; व धर्मभ्रष्टांस किंवा क्रियाहीनांस मात्र हें उपपद लावीत. तेव्हां, म्लेच्छ शब्दानें यवन, ग्रीक, अगर मुसलमान समजण्याचा नाहीं; किंवा दस्यु व अनार्य शब्दानें भारतेतर जात, अथवा जंगली, डोंगरी, रानटी, आणि आदिमवासी लोक, असेंही मानण्याचें नाहीं. अर्थात्, पाश्चात्यांच्या भ्रांतिमूलक समजुतीप्रमाणें, दस्यु ह्मणजे कृष्णवर्णाचे मुळचे लोक नव्हेत; व म्लेच्छ ह्मणजे यवन ही नव्हेत. तर, म्लेच्छ म्हणजे भ्रष्ट व गर्ह्य; आणि दस्यु किंवा अनार्य म्हणजे कर्महीन व अपवित्र; असेंच समजावयाचें, हें उघड आहे.

तद्विषयक शतपथ ब्राह्मणांतील प्रमाण.

सदरहू ऋचां संबंधानें, सायणाचार्यांची टीका निःसंशय विशेष महत्वाची आहे. सबब, तिच्यांतील अवश्य तितकें अवतरण येथें देतों. ते म्हणतात,

प्रसंगात् किंचिद् वाग् विषयं नियममाह तत्रेति। उपजिज्ञास्यां ज्ञातव्यां संदिग्धां वाचमूहुरुक्तवन्तोऽसुराः। सम्लेच्छः संदिग्धार्थस्यापभ्रंशरूपस्य वचसो भाषणं यद् म्लेछनमित्यर्थः। यद्वा य ईदृशींवाचं वदति सम्लेछः। तस्मान्न म्लेछेत्। म्लेछो न भवेत् २४॥

ह्यावरून, म्लेछभाषा म्हणजे, अपभ्रष्ट झालेलीच भाषा होय, याविषयीं शंका रहात नाहीं.

---

१ भारतीय साम्राज्य. पुस्तक नववें. पान २३ ते ३२ पहा.
२ ग्रंथकर्त्याचें भाषाशास्त्र, पान २२७ ते २३२ पहा.

त्याचप्रमाणें, महाभारतावरील टीकाकारानें सुद्धां, "म्लेच्छ भाषा" म्हणजे "अपभ्रष्ट भाषा" असाच अर्थ केला असल्याचें दिसतें. कारण, त्यानें

अन्य प्रमाण.

प्राज्ञः प्राज्ञप्रलापज्ञः प्रलापज्ञमिदंवचः ।
प्राज्ञंप्राज्ञः प्रलापज्ञः प्रलापज्ञंवचोब्रवीत् ॥ २० ॥

(महाभारत. आदिपर्व अ. १४५. पोथी. पान १७९.)

या श्लोकावर टीका करताना, विदुरानें युधिष्ठिरापाशीं ज्या संस्कृतेतर भाषेंत संवाद केला, त्या भाषेला "म्लेच्छ" अशीच संज्ञा दिली आहे. ह्या संबंधानें, टीकाकार मजकूर खालीं लिहिल्याप्रमाणें म्हणतात.

विदुरोयुधिष्ठिरं प्रलापज्ञं म्लेच्छभाषाभिज्ञंइदंवक्ष्यमाणंवचो म्लेच्छभाषारूपं प्राज्ञः प्रकर्षेणजानतः.... इति पूर्वार्द्धशब्दतो म्लेच्छभाषाभिज्ञत्वमुक्तम् ॥२०॥

ह्यावरून, शतपथ ब्राह्मणाच्या वेळीं, किंवा त्यापूर्वीं, संस्कृत भाषेंत अपभ्रंश होण्याला प्रारंभ झाला असावा, असें अनुमान होतें.

ऐतरेय ब्राह्मणात देखील, श्यापर्ण नांवाचे ब्राह्मण घाणेरडी भाषा बोलत असल्याविषयींचें कथानक आहे; व ज्यापेक्षां भाषेचे नियन्ते ब्राह्मणच आहेत, त्यापेक्षां निदान ह्यांनीं तरी अशुध्द, व अपवित्र भाषा बोलूं नये, अशाबद्दलचा शतपथ ब्राह्मणांत विशेष कटाक्ष

ऐतरेय ब्राह्मणांतील अपूत भाषा.

असल्याचें दिसतें. शिवाय, ऐतरेय ब्राह्मणांत, अपूत भाषेसंबंधीं खालीं लिहिलेलें प्रमाणही सांपडतें.

तान्ह दृष्ट्वोवाच पापस्य वाइमे कर्मणः ।
कर्तार आसतेऽपूतायै वाचो वदितारो यच्छ्या ।
पर्णा इमानुत्थापयतेमे मेऽन्तर्वेदि माऽऽ ।
सिषतेति तथेति तानुत्थापयांचक्रुः । इति
(ऐतरेय ब्राह्मणं प्रथमः खंडः अध्याय३९.)

सदरहूवरून, तत्कालीन श्यापर्ण नामक ब्राह्मण किती अपभ्रष्ट भाषा बोलत असत, आणि त्याच कारणानें, विश्वंतर राजाला फार राग येऊन, त्यानें त्यास कसें हांकलून लाविलें, हें वाचकाच्या लक्षांत सहजीं येईल.

ह्यासंबंधानें, दुसरी एक महत्वाची गोष्ट विशेष रीतीनें ध्यानांत ठेवण्यासारखी आहे. ती ही कीं, अध्यापन व अध्ययन हींच ब्राह्मणाच्या मुख्य कर्मांपैकीं दोन श्रेष्ठ कर्में असून, त्यांनीं आपल्या इतिकर्तव्यतेत तत्पर असणें फारच आवश्यकतेचे आहे. परंतु, ह्या इतिकर्तव्यतेला श्यापर्ण नांवाचे ब्राह्मण खचितच पराङ्मुख झाले होते, असें ह्मणणें प्राप्त येतें. कारण अध्यापन आणि अध्ययन, हीं त्याच्या स्वप्नीं देखील नव्हती, असें वाटतें. इतकेंच नव्हे तर, शुद्ध वर्णोच्चार हें जें ब्राह्मणांचें मुख्य ब्रीद, किंबहुना बाळकडूच, त्याला सुद्धां त्यांनीं यथेष्ट विरजणच लाविलें होतें, यांत तिळप्राय देखील शंका नाहीं.

आम्हांला असें वाटतें कीं, "अपूतायैवाचो वदितारो-

१ ऐतरेय ब्राह्मणम्. (१ लें खंड. ३५ वा अध्याय.)

यच्छयापूणाः" (घाणेरडी व अशुद्ध भाषा बोलणारे जे इयापर्ण ब्राह्मण) त्यांजला अनुलक्षूनच "तस्मान्न ब्राह्मणो म्लेच्छेत्"। (यासाठीं, निदान ब्राह्मणांनीं तरी अपभ्रष्ट व अशुद्ध भाषा बोलूं नये), असें शतपथ ब्राह्मणांत मुद्दाम सांगितल्याचें दिसतें.

ह्या अभिनव अंकुरांचा पुढें झालेला प्राकृत भाषारूपी वृक्ष.

सदरहू विवेचनावरून, एक महत्वाचें अनुमान करण्यास बलवत्तर साधन मिळतें. तें हें कीं, प्राकृत भाषेचें मूळ किंवा तिचे बीजांकुर, ह्या ब्राह्मणकाळांतच दृग्विषयींभूत होऊं लागले; आणि ह्या अभिनवांकुरांचाच कालान्तरानें प्राकृतभाषारूपी मोठा वृक्ष बनला. अर्थात्, यावेळीं प्राकृतभाषा निर्माण झाली नव्हती; किंवा ती नांवारूपास सुध्दां आली नव्हती; ही गोष्ट अगदीं अक्षरशः खरी आहे. तथापि, तिच्या भावी उदयाचीं हीं पूर्वचिन्हें वेदग्रंथांत व संस्कृत वाङ्मयांत, चांगल्या रीतीनें भासमान होऊं लागलीं होतीं, असें म्हणण्यास कोणताही प्रत्यवाय दिसत नाहीं.

महाभारत काळीं, संस्कृतेतर भाषेचा प्रचार.

महाभारतकाळीं, संस्कृत भाषा प्रचारांतच असल्यामुळें, तिची दिवसानुदिवस चांगली अभिवृद्धि होत होती, हें तर अगदीं निर्विवादच आहे. परंतु, तिच्या सम-

---

१ शतपथ ब्राह्मणम्. (३ प्रपा० १. ५. ११. ३ रा अध्याय. २. १. २४.)

२ ऐतरेय व शतपथ ब्राह्मण.

३ महाभारत. (आदिपर्व. अ० १४५. श्लो० २०)

वेतच, प्राकृतासारखी, पण संस्कृताहून भिन्न अशी अन्य भाषा देखील, त्यावेळीं एकमेकांत निःसंशय बोलत असत, असें अन्तर्गत प्रमाणावरून निदर्शनास येतें. कारण, पांडवांचा कपटानें नाश करण्याविषयीं, दुर्योधनादि कौरवांचा जो दुष्ट हेतु होता, तो विदुरानें युधिष्ठिरास, अन्य कोणालाही समजूं नये म्हणून, संस्कृतेतर भाषेंतच कळविला होता, असें महाभारतावरून दृष्टीस पडतें.

प्राज्ञः प्राज्ञप्रलापज्ञः प्रलापज्ञमिदंवचः ।
प्राज्ञंप्राज्ञः प्रलापज्ञः प्रलापज्ञंवचोऽब्रवीत् ॥२०॥

(महाभारत. आदिपर्व. अ. १४६ वा.)

भावार्थः--ज्ञानसंपन्न आणि अनेक भाषाभिज्ञ (जो विदुर त्यानें) नानाविध भाषा व त्याचे पोटभेद जाणणारा (जो धर्मराजा त्याच्या) जवळ हें भाषण केलें.

आतां, ज्या भाषेंत हा परस्पर संवाद झाला, त्यांतलेंच प्रत्यक्ष अवतरण व्यास ऋषींनीं दिलेलें नसल्यामुळें, ती भाषा कोणती होती, हें समजण्यास खचितच मार्ग नाहीं. तथापि, विदुर आणि धर्म ह्या दोघांखेरीज, दुसऱ्या कोणास देखील समजण्यासारखी ती भाषा नव्हती; व एवढ्यावरूनच ती संस्कृतेतर होती, याबद्दलची बिलकुल शंकाच वाटत नाहीं.

बौद्धकालांत प्राकृत भाषांचें व्यावहारिकत्व.

असो. बुध्दानें जो बौध्दधर्माचा फैलाव केला, तो तत्कालीन प्रचारात' असलेल्या भाषांतच सर्व लोकांस धर्मोपदेश करून केला, ही गोष्ट लक्षांत

आणिली म्हणजे, त्याच्यावेळीं कित्येक प्राकृत भाषा व्यावहारिक होत्या, असें उघड दिसतें. आणि अशोक बादशहानें ठिकठिकाणीं प्रतिष्ठापित केलेल्या जयस्तंभावरून तर, ह्या प्राकृत भाषा तत्कालीं चांगल्याच प्रचारांत असाव्या, असें मानण्यास बलवत्तर कारण मिळतें. तथापि, त्यांतही संस्कृत भाषेचें श्रेष्ठत्व अगदीं निर्विवादच होतें; व त्याच कारणानें, यच्चावत् महत्वाचा व्यवहार हिच्यांतच चाले; राजकीय, धार्मिक, सामाजिक, नैतिक, इत्यादि नानाविध विषयांचें निरूपण हिच्यांतच होई; आणि शिक्षणसंबंधीं विचार, शास्त्रीय शोध, अनेक कलान्वेषण, वगैरे हरतऱ्हेच्या गोष्टींचा खल ह्या गीर्वाण भाषेंतच केला जाई.

अशोकाच्या वेळीं प्राकृत भाषांचा फैलाव.

परंतु, अशोक[1] हा बौध्दधर्मानुयायीच पडल्यामुळें, ह्या धर्माचा प्रसार झपाट्यानें व्हावा, अशी त्याची उत्कट इच्छा होती. इतकेंच नव्हे तर, ह्या धर्माचा उपदेश ज्या त्या प्रांताच्या देशी भाषेंत केला, तरच त्याचा अंगिकार, लहान व मोठे, गरीब आणि श्रीमान, विद्वान व अज्ञान, तरुण आणि वृध्द, इत्यादींकडून खचित होईल, असा त्याचा दृढ ग्रह झाला होता. त्या कारणानें, आपले इष्ट हेतु सिध्दीस नेण्यासाठीं, त्यानें काबूलकंदहारपासून तों थेट ब्रह्मपुत्रानदी व दक्षिण कोंकणापर्यंत, सर्व मुलूख जिंकून पादाक्रान्त केला; आणि ह्या अखिल जितप्रदेशावर, ठिकठिकाणीं, आपल्या अति विस्तीर्ण दिग्विजयाचीं आनन्द-

१ हा मगध(बहार) देशांतील पाटलीपुत्राचा चक्रवर्ती राजा असे.

दायक तोरणें मोठ्या थाटानें उभारून, देशी भाषेंतच धर्मोपदेश चालविला.

त्याच्या कारकीर्दींतल्या शिलालेखांत प्राकृत भाषेंतील राजाज्ञा.

हीं दिग्विजयाचीं अजरामर चिन्हें, अशोक राजानें १ कपुर्दगिरी, २ दिल्ली, ३ प्रयाग, ४ वैभ्र, ५ खालसी, ६ गिरनॉर, ७ धौली, ८ जौगड, ९ सुपॉरा, इत्यादि स्थळीं प्रतिष्ठापित केलीं होतीं; व त्यांजवरील शिलांवर, त्यानें आपल्या कारकीर्दींतल्या राजाज्ञा खोदवून ठेविल्या होत्या. हे शिलालेख अजूनही उपलब्ध असून, राहिले साहिलेले यापुढें देखील कालान्तरानें सांपडण्याचा संभव आहे. सबब, जे कांहीं सांपडलेले आहेत, त्यांजवरील भाषा कोणत्या होत्या, हें मासल्याकरतां व चाचणीदाखल पाहूं, आणि त्यांवरून तत्कालीन व्यावहारिक प्राकृत भाषांचें अनुमान करूं.

ह्या शिलालेखांची लिपी तीन प्रकारची आहे. ह्यापैकीं,

---

१ ह्यालाच शाहाबाजगिरि म्हणत असून, हें ठिकाण अफगाणिस्थानांत आहे.

२ हें राजपुतान्यांत आहे.

३ हें हिमालयांत मसूरीनजीक आहे.

४ हें काठेवाडांत जुनागडजवळ आहे.

५ हें कटक प्रांतांत आहे.

६ हें उत्तर सरकार प्रांतांत गंजमनजीक आहे.

७ हें उत्तर कोंकणांत, ठाणें जिल्ह्यांतील वसई तालुक्यांत आहे.

८ ह्या एकंदर चौदा आहेत.

सदरहू शिलालेखांची तीन प्रकारची लिपि.

गिरनार शिलालेखाची भाषा बहुतेक पालिसारखीच असून, धौली, गंजम, बभ्र, व खालसी, येथील पाठभेद मागधीप्राकृतासारखे आहेत. ह्यात र्च्या ऐवजीं लचा आदेश झालेला दृष्टीस पडतो; आणि अकारान्त पुल्लिंगी नामाचा, व एकवचनी प्रथमा विभक्तीचा, अन्त्यवर्ण ओकारान्त असल्यास, तो एकारान्त होतो. तसेंच पालि ' म्हि''च्या ऐवजी सिं ह्या सप्तमी प्रत्ययाचा आदेश होतो; आणि अहम्‌बद्दल हकम् होतें. ह्याखेरीज, दुसरे किरकोळ फरक सुद्धा दृष्टोत्पत्तीस येतात, व श, ष, बद्दल सचा उपयोग करण्यात येतो.

गिरनार येथील राजाज्ञेची लिपि.

१ गिरनार येथील आठव्या राजाज्ञेत खालीं लिहिलेली भाषा आढळून येतें.

अतिकातं अंतरं राजानो विहारयातां अयासु। एतमगव्या अञानि च एतारिसानि अभिरमकानि अहुंसु। सोदेवानं पियो पियदसि राजा दसवसाभिसितो संतो अयाय सबोधिं। तेन सा धंमयाता एतायं होति बाम्हण समणानं दसणे च दानेच थैराणं दसणेच हिरंणपटिविधाने च जनपदस च जनस दसनं धंमानुसःतीच धंमपार पुच्छाच। तदोपया एसा भूयरति भवति देवानं पियस पियदसिनो राञो भागे अंञे।

सदरहूचा शब्दशः अर्थ ध्यानांत येऊन, आचें कसें-

तिचें संस्कृत परिधान.

कसें रूपान्तर झालें हें कळण्यासाठीं, त्याचें संस्कृत देखील येथेंच देतों.

अतिक्रान्तमन्तरं राजानो विहारयात्रां निरयासिषुः । एतमृगयान्यानि चैतादृशान्यभिरामकाण्यभूवन् । सदेवानां प्रियः प्रियदर्शी राजा दशवर्षाभिषिक्तः सन्नयासीत्संबोधिम् । तेन सा धर्मयात्रैता यद्भवति ब्राह्मणश्रमणानां दर्शनेच दानेच स्थविराणां दर्शनेच हिरण्यप्रतिविधानेच जनपदस्यच जनस्य दर्शनं धर्मानुशास्तिश्च धर्मपरिपृच्छा च । तदौपर्यादेषा भूयोरतिर्भवति देवानां प्रियस्य प्रियदर्शिनो राज्ञो भागेन्यस्मिन् ।

त्याचें भाषांतर.

भाषान्तरः—प्राचीनकाळीं राजे लोक गमतीखातर सहल करावयास जात; आणि शिकार किंवा तत्सदृश नानाविध खेळ खेळीत. तथापि, अशोक राजावर देवांचे प्रेम असून, राज्याभिषेक होऊन दहा वर्षें झालीं न झालीं, तोंच त्याला ज्ञान प्राप्त झालें. त्यामुळें, तो सन्मार्गाकडे वळला; व ब्राह्मणश्रमणादिकांना भेटणें, दान देणें, वृद्ध पुरुषांचें दर्शन घेणें, सुवर्ण दान करणें, प्रजा व तिची स्थिति पाहणें, नीतिशिक्षण लावणें, आणि स्मृतिधर्माचा ऊहापोह चालविणें, ह्यांतच तो आपली इतिकर्तव्यता मानूं लागला. पुढें, हेंच करणें त्याला विशेष प्रिय वाटून, त्या देवप्रिय प्रियदर्शी राजानें, त्यांतच आपला राहिलेला काळ घालविला.

ह्या शिलालेखांत, प्रियचें पिय, "प्रति" चें पटि, विकल्पानें भूचें हू, "स्थविराणां" चें थैराणं, इत्यादि रूपान्तर झालेलें दृष्टीस पडतें.

धौलीचा जयस्तंभ, व त्याजवरील लिपि.

२ धौली व खाल्सी मिळून उपलब्ध झालेल्या शिलालेखांत, खालीं लिहिलेला प्रकार दिसतो.

अतिकतं अंतलं लाजानो विहालयातं नाम निखमिसु । हिदामिगविया अन्नानिच एदिसानि अभिलामानि हुवंति नं । मे देवानं पिये पियदसी लाजा दसवसाभिसिते संते निखमि संबोधि । तेन ता धंम याता एता यं होति समनबाभनानं दसने च दानेच वढानं दसने च हिलं न पटि विधानेच ।

ह्यांत स्थविराणां (वृद्धाना = थैराणं) चें वढानं, "यातां श्रेयासु" बद्दल निखमिसु, "एतारिसानि" च्या ऐवजीं एदिसानि, बाम्हण चें बाभन, समण (श्रमण) बद्दल समन, इत्यादि स्थित्यन्तर झाल्याचें दृग्गोचर होतें.

कपुर्दगिरि तोरणावरील लिपि.

३ कपुर्दगिरि अथवा ज्याला शहाबाजगिरि म्हणतात त्याठिकाणीं, खालीं लिहिलेलें पाठान्तर आढळून येतें.

अतिकतं अंतरं ने राञ विहारयातां नाम निखमिषुं मगया अञानि च एदिसानि अतिसमना अभवसु सो देवानं प्रियो प्रियदर्शी राजा दशवषाभिसि-

तो संतो निकमी संबोधिं तेन सा धर्मयात्रा एता या इयं होति श्रमण ब्राम्हणानां दशनेच दाने.....

मगध देशांतील प्राकृत भाषा मागधी.

चक्रवर्ती अशोक राजाच्या साम्राज्यांत, मगध देशाची मर्यादा पुष्कळ विस्तीर्ण होती, आणि बहुतेक त्याला लागूनच खालसी, धौली, गंजम, बभ्र, हे प्रान्त असत. त्यामुळें, त्या प्रदेशांतील शिलालेखावरील भाषांत विशेष साम्य असून, त्या मगध देशांतल्या भाषेशीं पुष्कळच सादृश्य पावतात. तेव्हां, अशी वस्तुस्थिति असल्याकारणानें, मगध देशातील भाषेला आमच्या भारतीय भाषाशास्त्रज्ञांनीं मागधी असें जें नांव ठेविलें, तें निरर्थक नसून यथायोग्य आहे, असेंच कबूल करणें भाग पडतें.

तिचें व्यावहारिकत्व.

ह्यावरून, मागधी भाषा अथवा तत्सदृश अन्य प्रलाप अशोक बादशहाच्या वेळीं क्वचितच सुरू होता, असें म्हणण्यास हरकत दिसत नाहीं. आणि ही गोष्ट भट्ट भांडारकरांनीं[1] देखील अंगीकृत केल्याचें आढळून येतें.

---

[1] ह्यासंबंधानें भट्ट मजकूर म्हणतात,

"It would thus appear that the grammarians of the latter languages had more solid grounds than mere fancy for calling the Prakrit, which bears close resemblance to this language, by the name of Magadhi."

(Dr. Bhandarkar's Lectures. R. A. Society. Bombay Branch. vol. XVI. P. 311.)

अन्यशिला लेखांवरून, प्राकृत भाषांचे प्राचीनत्व.

कित्येक खासगी शिलालेखांवर सुद्धां प्राकृत भाषेंतीलच शब्द दृग्गोचर होतात. उदाहरणार्थ, प्रातिक बद्दल पडिक, वेदिका ऐवजीं वेयिका, भदन्त बद्दल भयंत, महाभोजस्य शब्दाच्या ठिकाणीं महाभोयस, "प्रव्रजितिकाया:" ह्या जागीं "पवइति काअ," व काणभोजस्य बद्दल काणभोअस. आता, हे लेखच प्राचीन असल्यामुळें, त्यांच्या भाषा सुद्धा प्राचीनच होत्या, असें ह्मणणें प्राप्त येतें.

प्रोफेसर बेन्फेचें मत असें आहे कीं, इ. स. पूर्वी नऊशें

---

१ ह्या बाबतीत भट भांडारकरांनी एके ठिकाणी असें म्हटलें आहे की,

"The growth of the specific Prakrits, therefore, must be referred to the early centuries of the Christian Era, and we may therefore infer, that about the time our first dramatic plays were written, they were actually the spoken dialects of those classes of the people, whose representatives use them in those works" (Lectures P P. 341-342.)

२ ह्यानें एके ठिकाणी असें लिहिलें आहे की, संस्कृत भाषा अखिल भरतखडभर, व महाराष्ट्राच्या दक्षिणटोंकापर्यंत, आणि त्याच्याही पलीकडे दक्षिणेस.* फैलावलेली होती; व तिचाच यथावत् व्यवहारांत उपयोग करण्यांत येई. तो ह्मणतो:—

"Down to perhaps the ninth century B. C., Sanskrit became diffused as the prevailing vernacular dialect over the whole of Hindustan as far as the Southern borders of the Maratha country.". "From

(पुढें चालू)

तत्संबंधानें बेनफेचें मत.

वर्षांपर्यंत संस्कृत भाषा प्रचारांत असून,* त्या नंतर ती मृतभाषा[1] झाली. पुढें, तिचा उत्तरोत्तर

(मागील पृष्ठावरून पुढें चालू.)

the ninth century B C., the Sanskrit began to die out : derivative dialects became developed from it ; and in the sixth century B. C., it had become extinct as a vernacular language. On the other hand, it maintained its ground in the schools of the Brahmans. About the third century B. C, in consequence of the regeneration of Brahmanism in Kanouj, it was brought back into public life as a sacred language, and gained a gradually increasing importance as the organ of all the higher intellectual development. About the fifth century A. D., it had become diffused in this character over the whole of India. So long as the Empire of the Hindus lasted, it continued to increase in estimation, and even long after the Mahomedans had settled in India, it was almost the sole instrument for the expression of the highest intellectual efforts."

(Benfey's Article on India.)

* संस्कृत भाषेचा फेलाव महाराष्ट्रापलीकडेही आणखी दक्षिणेस झाला होता, असें बेनफे म्हणतो.

"Sanskrit penetrated still further to the south, where it formed the language of the educated."

(Benefey's A.ricle on India. P. 245.)

१ हें म्हणणें कांहीं अंशीं भ्रांतिमूलक दिसतें. कारण, संस्कृत ही बऱ्याच अर्वाचीन कालांत देशील व्यावहारिक भाषा होती. इतकेंच नव्हे तर, सांप्रतकाळीं, इ. स. च्या विसाव्या शतकांतसुद्धां, शास्त्रीय

अपभ्रंश होत जाऊन, त्यापासूनच संस्कृतेतर प्राकृत भाषा उद्भवल्या. अर्थात्, इसवी सनापूर्वी नऊशें वर्षांच्या सुमारास, किंवा त्यानंतर काहीं काळानें,

---

(मागील पृष्ठावरून पुढें चालू.)

व धर्मविषयक वादविवाद ह्याच गीर्वाण भाषेंत सरास्त चालतो, व तो लेखनद्वारें आणि वक्तृत्वांतही करण्यांत येतो. हल्ली, पंडित, प्रत्नकम्रनंदिनी, विद्योदय, इत्यादि वर्तमानपत्रें संस्कृत भाषेंतच चालतात. फार तर काय सांगावें पण, १८९१ सालच्या खानेसुमारीत, संस्कृत हीच आपली व्यावहारिक भाषा असल्याबद्दल, कित्येक हिंदु कुटुंबांनीं लिहून दिलें असून, त्यांची संख्या ३०८ आहे. ह्यासंबंधानें बेन म्हणतो,

"In bringing to a close this review of the Aryan tongues of India, the fact should be mentioned that 308 persons returned the tongue habitually spoken in their parent's household as Sanskrit."

(Baine's Census Report for 1891. P. 144.)

भारतीय साम्राज्य. पु, नववें. पान ९६ ते १२८. पहा.

ह्यासंबंधानें मॅक्समुलर म्हणतो,

"Whenever I receive a letter from a learned man in India, it is written in Sanskrit. Whenever there is a controversy on questions of law and religion, the pamphlets published in India are written in Sanskrit. There are journals written in Sanskrit which must entirly depend, for their support on readers who prefer that classical language to the vulgar dialects.

(What can India teach us? P. 79. 1883.

अपभ्रंश अथवा प्राकृत भाषांचा उदय[1] होऊं लागला; आणि अशोकाच्या कारकीर्दींत त्यांचाच उपयोग केला जाऊन, त्यांजला पालि, मागधी, महाराष्ट्री, हीं नावें दिनावधीनें पडलीं, असा बेनफेच्या म्हणण्याचा आशय दिसतो.

सदरीं नमुद केलेल्या एकंदर ऊहापोहाचा योग्य विचार करतां, महाराष्ट्री व प्राकृत भाषा अशोकाच्या वेळीं, म्हणजे इ. स. पूर्वीं तिसऱ्या शतकांत, चांगल्या प्रचारांत होत्या, याविषयीं बिलकुल शंका राहत नाहीं.

याप्रमाणें, महाराष्ट्र व अन्य प्राकृत भाषांचें पौराणत्व वाचकांच्या ध्यानांत सहजी येण्यासारखें असल्यामुळें, पहिलीची दुहिता जी मराठी, तिच्या कालाविषयीं आतां आपण थोडक्यांत विचार करूं.

मराठी भाषेचा काल.

मराठी भाषा फार प्राचीन असल्याचें दिसत नाहीं. तथापि, ती उदयास आल्याला सुमारें हजार अकराशें वर्षें तरी

---

१ बेन्फे म्हणतो,

"Derivative dialects became developed from it (Sanskrit). ... ... The sacred language of Buddhism is the Pali, which, though varying in many particulars from the language of Magadha, and approximating to the principal Prakrit (the Maharashtri), stands yet in a similar relation to the Sanskrit as the latter, and the two dialects of Asoka's inscriptions."

(Benfey's Article on India.)

खचितच झालीं असावीं, असें वाटतें. कारण, मराठी भाषेंतला पहिलाच कवि मुकुंदराज होय; आणि हा शके ९०० मध्यें, किंवा इ. स. १००० वर्षांच्या सुमारास, अथवा त्याच्या आंत बाहेर झाला होता, याविषयीं सामान्य लोकांचें व विद्वज्जनांचेंही मतैक्यच आहे. (पुढील भाग ७१–७६ पहा.)

---

१ जुनें नवनीत. मुकुंदराज कवि पहा.

ह्यासंबंधानें भट भांडारकर म्हणतात,

"The modern vernaculars seem to have begun to assume a distinctive character about the tenth century,"

(Dr. Bhandarkar's Lectures. vol. XVI. P. 342. 1885).

भाग ७३ वा.

संस्कृत शब्दांचें रूपान्तर व स्थित्यन्तर आणि त्यामुळें प्राकृत व मराठी भाषेची झालेली रचना.

विषयनिरूपण.

मागील भागांत, प्राकृत व मराठी भाषेच्या कालाचा विचार केला. यासाठीं, प्रस्तुत-स्थळीं, संस्कृत भाषेचें रूपान्तर व अपभ्रंश, याविषयींचा यथावकाश ऊहापोह करूं, आणि प्राकृत व मराठी भाषांची रचना कशी झाली, हें सूक्ष्मावलोकनानें पाहूं.

वैदिककालापासून मूळ शब्दाचा इतिहास, त्यांचें स्थित्यंतर व रूपान्तर.

प्राकृत व मराठी भाषांतील शब्दाचा, आणि त्यांच्या रूपान्तराचा व स्थित्यन्तराचा इतिहास खरोखरच विशेष मनोवेधक आहे. मात्र, त्याचें सखोल अन्वेषण करून, त्याचा शोधकबुध्दीनें यथास्थित विचार केला पाहिजे. कारण, त्याची परंपरा थेट वैदिक कालापासूनच सुरू होते. उदाहरणार्थ, ऋग्वेदांतील संस्कृतात व तदनन्तरच्या संस्कृतात पुष्कळ भेद दृष्टीस पडतो. एवढेच नव्हें तर, वैदिक कालांतील जे कित्येक धातू फक्त त्यावेळींच प्रचारांत होते, ते पुढें पुढें तर अगदीं व्यवहारातीत होऊन,

कालान्तरानें नष्टच झाले; आणि अलंकृत व परिपक्वदशे-प्रत पोहोंचलेल्या लौकिक[1]-संस्कृतांत तर, त्याचा मागमूस सुद्धां राहिला नाहीं.

लुप्त व व्यवहारातीत झालेले शब्द.

अशा प्रकारचे धातू म्हटले म्हणजे भर्व्, तुर्व्, वक्ष्, वेस्, मन्द्, ध्रज्, कन्, इंख्, शव्, उब्ज् म्यच्, सच्, ध्रज, त्सर, इत्यादि होत. त्याचप्रमाणें, तुवि = विपुल; नपात् = संतान; तक्मन् = मूलवाळ; ग्मा = पृथ्वी; ज्मा = धरणी; केतस् = ज्ञान; आकेनिप = शहाणा; वगैरे अनेक शब्द जरी निघंटूंत आढळतात, तरी तद्विषयक विवेचन अमरकोशात कोठेंही दिसून येत नाहीं. अर्थात्, ते अमराच्या वेळीं खरोखर प्रचारांत नव्हते; आणि म्हणूनच त्यांचा समावेश तत्कालीन शब्दात झाला नाहीं; हें उघड आहे.

अवस्थान्तर झालेले धातू.

याप्रमाणें, संस्कृत भाषेंतील वेदकालीन मूळधातूंची स्थिति होऊन, ते कालान्तरानें आपोआप व्यवहारातीत झाले. तथापि, कित्येकांची तशी दशा न होतां, त्यांचें फक्त रूपान्तरच बनल्याचें दिसतें. उदाहरणार्थ, वैदिक कालांतील ग्रभ् = धरणें, पकडणें, या धातूच्या अन्त्यवर्णाचें किंचित् रूपान्तर होऊन, हाच शब्द पुढें ग्रह् ह्या रूपानें लौकिक संस्कृतींत प्रचारांत आला. तसेंच,

---

[1] Classical Sanskrit.

धुर्व व ध्यृ यांचें हुहु असें रूपान्तर झालें; आणि शुन्धचें शुधू बनलें.

अशा प्रकारें, संस्कृत भाषेंतच कालान्तरानें शनैः शनैः कसा फरक पडत चालला; तिच्यांतील कित्येक शब्द कशा तऱ्हेनें अजिबात नाहींसे झाले; कित्येक नूतनच कसे बनले; व काहींकांचें कसें अवस्थान्तर होत गेलें; हें कोणाच्याही लक्षांत सहजीं येतें. इतकेंच नव्हे तर, असंख्य कारणांनीं, आणि भिन्न भिन्न परिवेष्टनानुरूप, भाषेची उत्क्रान्ति होऊन तिच्यांत नानाविध फरफार कसे घडून येतात; व अशाच मासल्याचीं, परंतु याहून भिन्न कारणें क्षितिजावर आणि वातावरणांत उद्भवून, तीं तिच्याच अवनतीस कशीं कारणीभूत होतात; याचेंही दिग्दर्शन होतें.

संस्कृतांत कालान्तरानें झालेला फेरफार.

याप्रमाणें, एकंदर भाषांचीं कुटुंबें, त्याचा मूलनिर्झर, व त्यांचा प्रवाह, हीं आपल्या अवलोकनात आल्यामुळें, प्राकृत आणि मराठी भाषेचा कसा उद्भव झाला, याबद्दलचा यथावकाश विचार करूं.

आम्हां भारतीयाच्या प्राक्कालीन साम्राज्यांत, संस्कृत भाषाच बहुत कालपर्यंत विशेष प्रचारांत[१] होती; व त्याचकारणानें, सर्व प्रकारच्या व्यवहारांत आम्ही

संस्कृत भाषेचें व्यावहारिकत्व.

---

१ ही गोष्ट आम्ही भारतीयसाम्राज्याच्या नवव्या पुस्तकांत, अनेक प्रमाणांनीं सिद्ध करून दाखविली आहे. भाग ५३ वा पहा.

तिचाच उपयोग करीत असूं; यांत काडीमात्रही शंका नाहीं. मुलांबाळांबरोबर, अथवा घरीं, दारीं, आणि विजनीं, आम्ही तीच बोलत होतों. हरएक प्रकारची हालचाल तिच्यांतच चाले. आमचे यच्चावत् विचार तिच्यांतच प्रकट करण्यांत येत. नानाप्रकारचे ग्रंथ हिच्यांतच लिहिले जात. तऱ्हे-तऱ्हेचीं असंख्य धर्मपुस्तकें लिहितांना, हीच भाषा वापरीत. भिन्न भिन्न प्रकारचें शास्त्रीय विवेचन ह्याच भाषेच्या द्वारें केलें जाई. राजकीय सल्लामसलत ह्याच भाषेंत होई. लोकशिक्षण देखील ह्याच गीर्वाण भाषेंत चाले. आणि अशिक्षित, अडाणी, व खालच्या प्रतीच्या लोकांबरोबर, आमची नेहेमींची बोलाचालही ह्याच संस्कृत भाषेंत करण्यांत येई.

प्राकृत भाषेचा उद्भव.

तेव्हां, अशा प्रकारची वस्तुस्थिति असल्यामुळें, संस्कृत भाषेंतील कित्येक कठिण शब्द उच्चारण्यास, अशिक्षित लोकांस जड जात; आणि कांहीं अडाणी माणसांस तर, त्यांचा शुद्ध उच्चार करणें देखील, केवळ दुःसाध्य व अशक्यच वाटे. त्या कारणानें, त्यांच्या असंस्कृत जिव्हेला जो उच्चार स्वल्पसा भासला, आणि जो त्यांस करतां आला, तोच करण्याचा प्रघात पडला; व त्यायोगानें प्रत्यहीं नवीन नवीन शब्द अपभ्रष्ट होऊन प्रचारांत येऊं लागले. हेच शब्द प्राकृत भाषेचें मूलरूप असून, ते जेव्हां सर्रास व्यवहारांत आले, तेव्हां त्यांची एक स्वतंत्र भाषाच बनली; आणि तिला प्राकृत[1] हें नामधेय पडलें.

---

१ प्राकृत शब्दाची उत्पत्ति आम्ही एकाहत्तराव्या भागांतच सांगितली आहे. (मागें पान ५७ पहा.)

पुढें, कालान्तरानें, इ. स. पूर्वीच्या सातव्या शतकांत, ह्या भरतखंडांत एक फारच विलक्षण धर्मक्रान्ति झाली, व तिनें हा सर्व देश अगदीं दणाणून सोडला.

धर्मक्रान्ति, व बौद्धधर्माची प्रतिष्ठापना.

ह्या धर्मक्रान्तीचें मूळकारण गौतमबुद्ध होय. हा इ. स. पू. ६२२ सालीं जन्मला, आणि पुढें मोठा झाल्यावर, त्यानें बौद्धधर्म[1] नावाचा एक निराळाच पंथ काढून, त्याचा सविस्तर प्रसार ठिकठिकाणच्या देशी भाषेंत व्हावा एतदर्थ, केवळ भगीरथ प्रयत्नच केला.

तदनन्तर, अल्पकालातच, हा नूतन धर्म आशियाखंडांतील बहुतेक देशांत हं हं म्हणता पसरला, आणि पुढें पुढें तर, त्याला चांगला राजाश्रयही मिळाला. त्यामुळें, धर्मप्रसाराचें काम सामान्य व अशिक्षित लोकाना समजत असलेल्या प्राकृत भाषेंनच चालूं ठेवण्याविषयीं राजाज्ञा होऊन, सर्व प्राकृत भाषांस उत्कृष्ट प्रकारचें उत्तेजन मिळालें, आणि त्यांचा एकदम फैलाव ज्यारीनें सुरू झाला.

बौद्धधर्मामुळें, प्राकृत भाषांस मिळालेलें प्रोत्साहन.

आतां, संस्कृत भाषेपासून प्राकृत, आणि प्राकृत भाषेपासून मराठी, इत्यादि अनेक भाषा उद्भवल्या असल्याचें आम्हीं पूर्वीच लिहिलें आहे. सबब, सं-

प्राकृत आणि मराठी भाषांतील शब्दांच्या स्थित्यंतराचें दिग्दर्शन.

---

१ ह्या धर्माचें सविस्तर विवेचन भारतीय साम्राज्याच्या सातव्या पुस्तकांत केलें आहे.

स्कृत भाषेचें रूपांतर होऊन, ती महाराष्ट्रीय आभरणांत सजेपर्यंत, मूळ शब्दांत कसकसा फेरफार होत गेला; म्हणजे संस्कृतांतून प्राकृतांत येतांना मूलरूपाचें कशा प्रकारें स्थित्यन्तर झालें; त्याचप्रमाणें, प्राकृत ही मराठी बनतांना, तींत कोणतें अवस्थान्तर होऊं लागलें; यांविषयींची थोडी-शी तरी हकीकत देणें फारच अगत्याचें आहे असें समजून, ती येथें देतों.

संस्कृत, प्राकृत, व मराठी भाषेंतील अवस्थान्तर दर्शक शब्दावलि.

संस्कृत.	प्राकृत.	मराठी.
अग्निम्.	अग्गिम्	आग.
अद्य.	अज्ज.	आज.
अभवत्.	हुवीअ.	होता. होऊन गेला.
अर्धम्.	अद्धम्.	आधा, (अर्धा).
अंधकार.	अंधार.	अंधार, (अंधेर).
अभूत्.	होहीअ.	होता.
अश्रु.	आसु, अस्सु.	असूं, आसुं.
अस्ति.	अत्ति, अच्चि.	आहे.
अस्माकम्.	अम्हाणम्.	आम्हाला.
अहम्.	अहम्, हम्. हग्गे, हई.	मीं.
आत्मा.	आपा, अप्पा.	आपण.
करोमि.	करोमि. कलेमि. करेमि.	करितों.
कर्णः.	कण्णो.	कान.

संस्कृत.	प्राकृत.	मराठी.
कार्यम्. कर्म.	कज्ज. कम्मो.	काज. काम.
काष्ठ.	कट्ठ.	काठी.
कुत्र.	कहिं.	कोठें.
कुर्वन्.	करंतो. कलेन्तो.	करीत.
कृतम्.	कदे.	केलें.
खाद.	खा.	खाणें.
गर्दभः	गड्डहो. गद्दहो.	गाढव.
ग्राम.	गाम.	गाव.
गृध्र.	गिद्ध.	गिधाड.
गृहम्.	हरम्. घरम् घलम्. गिहम्	घर.
ग्रंथिः.	गंथि.	गाठ.
चन्द्रः.	चन्दो.	चान्द.
जागृत.	जग्गेथ.	जागा.
मयूर.	मोरो.	मोर.
मुख.	मुहं.	मुख.
सत्यम्.	सच्छम्.	साच. सत्य.
सुवर्णम्.	शोवण.	सोनें.
शुष्क.	सुख्ख. शुख्ख.	सुका.
श्रेष्ठी.	सेट्ठी.	शेट.
देव, नरथो भग्नोऽस्यमनोरथोपि।	देव ण रहो भग्गोसे मणो रहोवि।	हे देवा, रथ मोडला नाहीं, व मनोरथही भंग झाला नाहीं.

संस्कृत.	प्राकृत.	मराठी.
अग्रत: कथय।	अग्गदो. कहेहि।	अघाडीचें कथन कर. (पुढें काय झालें तें सांग.)
नाथ अश्रुतपूर्वमीदृशंवचनं तत्पुनर्भण।	णाह अस्सुद पूव्वं एदिसं वअणं ता पुणो भणाहि।	नाथ, पूर्वी न ऐकिलेलें असें तें वचन पुन्हा बोल.
क एष यज्ञः।	को एसो जण्णो।	कोणता हा यज्ञ.
अहो जानीथ कस्मिन्नुद्देशे कुरुनाथो वर्तत इति।	हं हो जाणहकस्सि उद्देसे कुरुणाहो वट्ट इति।	अहो, (तुम्ही) जाणतां, कोणत्या शोधांत कुरुनाथ आहे?
अयंजनः कस्य हस्ते समर्पितः।	अअं जणोकस्स हत्थे समप्पिदो।	हा जन कोणाच्या हातीं समर्पिला. (दिला)
पृथिव्या यः शरणं स तव समीपे वर्तते।	पुथीवी एजो सरणं सो तुम्ह समीपे वट्टइ।	पृथ्वीचें जो शरण (रक्षणकर्ता), तो तुझ्यासमीपच आहे.

उच्चारकाठिण्य हेंच अपभ्रंशाचें आदिकारण.

असो. सदरहू शब्दाच्या स्थित्यंतराचें मूळकारण चांगल्या प्रकारें ध्यानांत येण्यासाठीं, आपण क्षणभर आपल्या मराठी भाषेकडेच वळूं, व तिच्याच मुकाबल्यानें एकंदर वस्तुस्थिति कशा प्रकारची आहे, हें पाहूं.

कांहीं अशिक्षित शूद्रांस, आणि कुणबी लोकांस,

मराठी आणि गुजराथी भाषांप्रमाणेंच, हिंदीचें देखील संस्कृताशीं अगदीं निकट साम्य दिसून येतें; आणि क्वचित् स्थळीं, शब्दाचें रूपान्तर सुद्धा त्या मानानें कमीच झालेलें भासतें. उदाहरणार्थ, 'कथयति' शब्दाचा कहेताहै असा अपभ्रंश होतो. 'शर्करा' ला 'शक्कर' म्हणतात. 'तनु' शब्दाचें 'तन' असें रूप बनतें; व सदरीं नमूद केलेल्या अनेक कारणानीं, भिन्न भिन्न प्रकारचें स्थित्यन्तर होत जातें.

शब्द हेच भाषेच्या इतिहासाचें बीज.

अशा रीतीनें, मूलनिर्झरापासून सुटल्यानन्तर, एकंदर शब्दाचा निस्यन्द होताना, ते कसे रूपान्तर पावतात, आणि त्यांचें स्थित्यन्तर कशा प्रकारें घडून येतें, हेंच विशेष रीतीनें ध्यानांत ठेवण्यासारखें आहे. कारण, ह्याच भाषेचा खरा इतिहास होय. ह्यानच भाषेचें मूळस्वरूप आपल्या दृग्गोचर होतें. ह्यांतच तिचा इतिवृत्तांत कळून येतो. ह्यांतच तिचें खरें ऐतिह्य समजतें. आणि ह्यांतच तिच्या उद्गमस्थानाविषयींची कल्पना होते. फार तर काय सांगावें, पण, ह्या अमूल्य शब्दमौक्तिकातच भाषेच्या इतिहासाचें खरें बीज असतें; व त्यातच तें प्रच्छन्नावस्थेंत दृष्टीस पडतें.

सिंहावलोकन.

सदरहू विवेचनावरून, मराठी व प्राकृत भाषांतील शब्दाचें स्थित्यन्तर आणि रूपान्तर कसकसें होत गेलें, हें सहजीं लक्षांत येतें. इतकेंच नव्हे तर, मराठी कन्येची

जननी कोणती, व ह्या जननीला कोणीं जन्म दिला; अर्थात्, ह्या सर्व भाषांचा मूलनिर्झर कोणता, आणि त्यांतून ह्या भाषा कशा प्रसवल्या; हें सिद्ध करण्याला, किंवा ते स्वयमेव व्यक्त होण्याला, ह्या योगानेंच उत्तम प्रकारचें साधन मिळतें, हें उघड आहे.

व वेबरच्या मताचें खडण.

शिवाय, ह्याच प्रमाणावरून, दुसरी ही एक महत्वाची गोष्ट शाबीत ठरते. ती ही कीं, संस्कृत हीच प्राकृत व मराठी भाषेची मायभाषा असून, तिच्यापासूनच ह्या दोन्हीं भाषा पुत्री आणि पौत्री या नात्यानें प्रसवल्या आहेत. तेव्हां, प्राकृत भाषेलाच आदिजननी किंवा मूलकारण समजून, तिलाच संस्कृत भाषेचें अधिष्ठान ठरविण्याचा जो वेबरनें[1] प्रयत्न केला, तो सदोष असल्यामुळें

---

१ प्राकृत ही आदिमवासि लोकांची भाषा असून, तिच्यावर असंख्य आर्यभाषाभिज्ञांचे अगणित संस्कार झाल्यानें, ती सुसंस्कृत बनली, व कालान्तरानें नांवारूपासही आली; एवढेंच नव्हे तर, त्याच कारणानें ह्या मूळ प्राकृत भाषेपासून उद्भवलेल्या, आणि कालान्तरानें अलकृत झालेल्या भाषेलाच संस्कृत हें अन्वर्थ नांव पडलें; असें वेबरचें मत आहे. हा एके ठिकाणी असें लिहितो कीं,

"The name *Prakrita Bhasha*, which was at the same time applied to the popular dialects, is derived from the word *Prakriti*, 'nature,' 'origin,' and probably describes these as the 'natural,' 'original,' continuations of the ancient *bhasha*." (Note. P. 177.)

(पुढें चालू)

केवळ मिथ्यावादच होय, याविषयीं देखील काडीमात्रही शंका राहत नाहीं. कारण, प्राकृत भाषेंतल्या शब्दांचें खरें मुळरूप खुद्द प्राकृत भाषेंत देखील दृग्गोचर होत नसल्यामुळें, तदन्वेषणार्थ तिच्याही पलीकडे अन्यत्र जावें

(मागील पृष्ठावरून पुढें चालू.)

" The more the language of the grammatically educated gained on the one hand in purity, and in being purged of every thing not strictly regular, the more foreign did it become on the other hand to the usage of the majority of the people, who were without grammatical training In this way, a refined language gradually disconnected itself from the vernacular as more and more the exclusive property of the higher classes of the people."
(History of Sanskrit Literature. P. 176 1882)

तथापि, इ. स. १८६२ सालीं, वेबरचें मत याहून अगदीच भिन्न होतें, यांत शंका नाहीं कारण, त्यावेळीं त्यानें असें प्रतिपादन केलें होतें कीं, संस्कृतापासूनच पाली आणि प्राकृत भाषा उद्भवल्या असल्याचें विशेष संभवतें. (मागें भाग २२, ९९, १०० पहा).

असो. संस्कृत भाषेपासूनच प्राकृत भाषा उत्पन्न झाली, असें रॉथनामक दुसऱ्या पाश्चात्य विद्वानाचें ही मत आहे सबब, तें देखील येथे थोडक्यात देतों रॉथ ह्मणतो,

" Prakrit (according to the derivation which seems to me the correct one) signifies that which has its foundation in another thing 'the derived' or the 'to be derived' The expression is one formed by grammarians, and has a grammatical sense."
(Journal. German Oriental Society 1853. P. 605.)

लागतें; आणि सर्व शब्दरत्नांची खाण, व अखिल धातुमौक्तिकांचा महोदधि जें संस्कृत, त्यांतच विशेष काळजीपूर्वक बुडी मारणें भाग पडतें. येथें आल्यावर मात्र, ह्या महामूल्य खाणीचे प्राचीनतम थर, व त्यांतील मौक्तिकांच्या अपूर्व शुक्तिका, आपापल्या मूळस्थितींत सहजीं दृग्विषयीभूत होतात. इतकेंच नव्हे तर, ह्याच्या पलीकडे, त्यांतील शब्दांची मीमांसा होण्याला अवकाशच राहत नाहीं. त्यामुळें, संशयाला फांटा मिळून, शंकेची निवृत्ति होते, आणि संस्कृत् हीच प्राकृत भाषेची जननी ठरते.

---

१ ही गोष्ट अगदीं निर्विवादरीत्या सिद्ध असून, भारतीय भाषाभिज्ञांस तर त्याबद्दलची शंकाच नाहीं, असें वररुचि, हेमचन्द्र, इत्यादि नामांकित वैयाकरणांचे सुप्रसिद्ध ग्रंथ वाचल्यानें, कोणाचीही खात्री होण्यासारखी आहे. तथापि, सदरहू पौरस्त्य प्रमाणांबरोबर कित्येक पाश्चात्य पंडितांचें मतही मासल्याकरितां वाचकांपुढें ठेवितों. कर्झन हा एके ठिकाणीं असें स्पष्टपणें लिहितो कीं, आर्यकुटुंबांतील सर्व भाषा संस्कृतापासूनच उद्भवल्या आहेत.

“ All the languages of the Aryan family, and consequently all their dialects, subdialects, and varieties, have been framed from a Sanskrit basis, and are only modified and currupted forms of what was once the original tongue of all the Aryan races of India. ”

(R. A. Society's Journal. vol. XVI. P. 181).

प्राकृत भाषा संस्कृतोद्भव असल्याविषयीं, ल्यॉसन्, बीम्, मूर, यांनीं देखील आपला अभिप्राय व्यक्त केला आहे.

(Vide Lassen's Prakrit Grammar. J R. A. Society. 1868. P. 498, and Muir's Sanskrit Texts. vol. II. 1871.) मागील पान १००-३ पहा.

तद्विषयक प्रमाण.

आतां, संस्कृत ही कठिण व अत्यलंकृत भाषा असल्यामुळें, ती केव्हांही व्यावहारिक असण्याचा संभवच नाहीं, असें जें वेबरचें म्हणणें आहे, त्याला अन्य तऱ्हेनें देखील आक्षेप येतो. तो असा कीं, संस्कृताप्रमाणेंच ग्रीक, ल्याटिन, पाली, किंवा प्राकृत, या भाषा कठिण असूनही, त्या प्रचारांत होत्या; आणि ही गोष्ट खुद्द वेबर मजकूर सुद्धां स्वतःच कबूल करतो. तेव्हां, काठिण्य व अलंकार आणि व्यावहारिकत्व, यांचा परस्पर बिलकुल विरोधच नाहीं, हें उघड आहे.

नाटकांवरूनही, संस्कृत व प्राकृत ह्या पूर्वी व्यावहारिक असल्याचें चांगलें व्यक्त होतें. इतकेंच नव्हें तर, मोठमोठ्या विद्यापीठाच्या ठिकाणीं, पंडित आणि विद्वान लोक अजून देखील हीच भाषा अस्खलित बोलतात, व हिच्यांतच हरएक शास्त्रीय विषयावर प्रचंड ऊहापोह सर्रास करतात. फार तर काय सांगावें, पण, इ. स. १८९१ सालच्या खानेसुमारींत ज्यांची मायभाषा संस्कृतच होती असे पंचवीस लोक मुंबई शहरांत; आणि तीनशे आठ एकंदर भरतखंडांत सांपडले. ह्यावरून, हिच्या प्राक्कालीन व्यावहारिकत्वाबद्दल कोणास सुद्धां शंका राहणार नाहीं.

ह्यासंबंधानें, प्रोफेसर बेनूफेचें देखील अशाच प्रका-

---

१ Çensus Commissioner Mr. Baine's Census Report for 1891. (P. 144). मागील पान ११७ पहा.

व बेनफेचा अभिप्राय

रचें मत असल्याचें दिसतें; व तो सुद्धां प्राकृत भाषा संस्कृतोद्भव[1] आहे म्हणून लिहितो; आणि ती संस्कृताप्रमाणेंच व्यावहारिक असल्याचें सांगतो.

प्राकृत व मराठी भाषेची रचना, आणि त्यांतील शब्द.

असो. पूर्वीं सांगितल्याप्रमाणें, प्राकृत आणि मराठी भाषेंत १ तद्भव, २ तत्सम, व ३ देशी, असे तीन प्रकारचे शब्द येतात (मागील पान ९ पहा); आणि त्या योगानेंच् ह्या भाषा बनतात, असें वाचकांच्या लक्षांत सहजीं आलें असेल. मात्र, कित्येक ठिकाणीं त्यांत वर्णलोप, व क्वचित् वर्णान्तरही होतें, हें ध्यानांत ठेविलें पाहिजे. उदाहरणार्थ, पर्यंक = पलंग; सुवर्णकार = सोनार; बीज = बीं; इत्यादि. तथापि, हे वर्णान्तराचे नियम बहुतेक सामान्य असून, ते संस्कृत भाषेच्या यूरोपीय शाखांस देखील लागू पडतात, हें विसरतां कामा नये.

---

१ बेन्फे म्हणतो,

"To the South, Sanskrit exercised nearly its full sway, as far as the Sonthern frontiers of Maharashtra : this is proved by the fact that one of the dialects, *which are most decidedly of Sanskrit Origin*, namely, the Prakrit pre-eminently so named, is also called the language of Maharashtra, and is manifestly the parent of the modern Mahrathi."

(Benfey's Article on India. P. 245).

सद्रहू अवतरणांतील इतालिक वर्ण आमचे आहेत. (ग्रंथकर्ता)

२ मागें पान ११–१३ पहा.

कित्येक ठिकाणीं, "त्" किंवा "द्" चा "ल्" होतो, आणि ही गोष्ट ज्याप्रमाणें प्राकृतांत अगर मराठींत दृष्टीस पडते, त्याचप्रमाणें ती युरोपीय भाषात सुद्धा अनुभवास येते. जसें ल्याटिन भाषेंत At + latum चें Allatum होतं; व प्राकृतात अथवा मराठींत "उत् (उद्) लिखित" चें उल्लिखित बनतें. शिवाय ह्या नियमास अनुसरूनच इंग्रजींतले शब्द इलेव्हन व ट्वेल्व्ह (Eleven, Twelve) हेही झाले आहेत, असें डाक्तर मॅकीकन्[1] म्हणतो.

---

१ विल्सनूच्या शब्दव्युत्पत्तिशास्त्रविषयक व्याख्यानमालेंतील, तारीख २८ जुलै इ. स. १८९८ रोजीं झालेलें, डा. मॅकिकनूचें मराठी भाषेवरील पांचवें व्याख्यान पहा.

भाग ७४ वा.

अपभ्रंशाचे सामान्य नियम.

विषयोपन्यास.

प्रस्तुत भागांत, अपभ्रंशासंबंधीं ज्या नियमांच्या योगानें भाषानियंत्रण होतें, ते देण्याचा आमचा विचार आहे.

भाषेचें नियमन.व त्या मुळें तिचें स्थैर्य.

भाषा जसजशी सुधारत जाते; तिला ज्या मानानें प्रौढता येते; ती ज्या परिमाणानें अलंकृत होते; तिची मनःपूर्वक सेवा करण्याचें जितक्या अंशानें अनेक कविजन मनावर घेतात; व तिच्या लालनपालनाविषयीं विद्वज्जन जितके म्हणून झटतात; तितकी ती नियंत्रित होऊन नियमव्यापकतेस पात्र होते. परंतु, जी भाषा नियमबद्ध नसते, तिच्यांत अनेक, किंबहुना असंख्य भेद आढळून येतात, ही गोष्ट कोणालाही नाकबूल करवणार नाहीं. प्राचीनकाळीं संस्कृत भाषेचा प्रसार[1] अखिल भरतखंडभर, ह्मणजे हिमालयापासून तों तहत कन्याकुमारीपर्यंत, आणि हिंदुकूश पासून तों थेट ब्रह्मपुत्रानदीपावेतों, एकसारखा होता. तरी देखील, ती केवळ नियंत्रित असल्याकारणानेंच, एवढ्या मोठ्या अफाट देशांत सुद्धां, ती बारा कोशांवर

१ भारतीय साम्राज्य. पु. १ वें. भाग ५२–५३ पहा.

बदलली नाहीं, किंवा तिच्यांत कोणत्याही निरर्गल अशा अनियमितपणाचा शिरकाव देखील झाला नाहीं. इतकेंच नव्हे तर, तिनें आपल्या एकछत्रीसाम्राज्यांत, यच्चावत मनुष्यमात्रास एका नियमानेंच वर्तावयास लाविलें, आणि आपण स्वतः सुद्धां त्याच नियमानें चालली. त्यामुळें, तिचा नियमितपणा एकसारखा, अबाधित, व कायम राहून, त्याचें उल्लंघन करण्याचें कोणाच्याही हातांत न राहतां, तें त्याच्या शक्तिबाहेरचेंच कृत्य होऊन गेलें.

या संबधानें मराठी भाषेची स्थिति व तिचे प्रकार.

संस्कृताप्रमाणेंच जर आमची मराठी भाषा नियंत्रित असती, तर तिच्यांत हल्लींप्रमाणें निरनिराळे प्रकार खचितच दिसून आले नसते. मावळप्रांतांतली भाषा, व मावळापलीकडील घाटावरील भाषा, यांत बराच भेद दिसून येतो; आणि तो मुख्यत्वेंकरून स्वरभेद व शब्दवैचित्र्य यांतच दृष्टीस पडतो. ज्या ज्या देशांच्या सीमेवर महाराष्ट्राची हद्द मिळते, त्या त्या ठिकाणीं त्या त्या भाषेचे शब्द मराठींत मिसळले जाऊन, त्यांत स्वरभिन्नता देखील दृग्गोचर होते. करवीरापासून तों तहत सोलापूरपर्यंतच्या प्रदेशांत, अथवा कर्नाटकाच्या सरहद्दीजवळील प्रांतांत, एका तऱ्हेची निराळीच भाषा आढळून येते. बऱ्हाणपूरपासून नंदुरबारपर्यंतची खानदेश सरहद्दीची भाषा, आणि खुद्द खानदेशाची भाषा, यांत बरेंच अन्तर दिसतें. तसेंच वऱ्हाड प्रांतांतील निव्वळ देशस्थी भाषेचा प्रकार देखील कांहीं निराळाच असल्याचें वाटतें. खुद्द कोंकणांत सुद्धां, मराठी

भाषेचे चार पांच प्रकार आढळून येतात. ह्मणजे दमणपासून डहाणूपर्यंतच्या टापूंतील भाषा व पुढें मुंबईपर्यंतच्या टापूंतील भाषा, यात आणि पुण्याकडील भाषेंत, फरक दिसतो. मुंबईच्या दक्षिणेकडील अष्टागरांतील भाषा अगदीं निराळीच वाटते. याहीपेक्षां रत्नागिरीकडील भाषा भिन्न असून, मालवण, गोमन्तक, इत्यादि प्रातात तर अगदींच निराळा प्रकार आढळतो. परंतु, भाषेचें नियमन झाल्यानें, हा सर्व प्रकार बंद होतो, व तिला सौंदर्यही प्राप्त होतें.

प्राकृत व मराठी भाषांतील शब्दसाम्य, व त्यांचें रूपान्तर.

आता, संस्कृत भाषेंतील जे अनेक शब्द प्राकृत आणि मराठी भाषेत दृष्टीस पडतात, ते क्वचित् मूळच्या स्थितींत असून, कित्येक तर साधारण रूपान्तर झालेलेच आढळतात. तथापि, ते बहुत करून अपभ्रष्ट स्थितींतच असतात, असे म्हणण्यास बिलकुल हरकत नाहीं

तद्विषयक नियमन

ह्या सर्व शब्दांच्या स्थित्यंतराचा आणि रूपान्तराचा आपण अगदीं लक्षपूर्वक विचार केला तर, आपणांस असे खचित दिसून येईल कीं, हे अपभ्रंश केवळ नियंत्रित असून, ते भाषाशास्त्राच्या नियमास अनुसरूनच झालेले आहेत; आणि एतद्विषयक सविस्तर ऊहापोह सुप्रसिद्ध भारतीय भाषाकोविद जो वररुचि, व नामांकित हेमचन्द्र, यानींही आपल्या प्राकृत व्याकरणांत केला आहे. तथापि, कित्येक ठिकाणीं बरेच अपवादही आढळून येतात. परंतु, ह्या

अपवादांनींच सामान्य नियमांची व्याप्ति सिद्ध होते, ही गोष्ट कोणालाही कबूल केली पाहिजे.

रूपान्तराचे नियम.

आतां, मूळ शब्दांचें रूपान्तर कसकसें व कोणत्या नियमानीं होत गेलें, हें निदान थोड्या बहुत तरी प्रमाणानें वाचकाच्या ध्यानांत येण्यासाठीं, शब्दापभ्रंशाचे कांहीं नियम केवळ संक्षिप्त रूपानेंच येथें देतों. म्हणजे त्यावरून, एकंदर वस्तुस्थिति सहजीं लक्षात येईल.

स्वरांसंबंधीं नियम.

१ प्राकृतांत, **ऋ**, **ॠ**, **ऌ**, **ॡ**, **ऐ**, व **औ**, या स्वरांचा उपयोग करण्यांत येत नाहीं.

२ **ऋ**ची **रि** होतें. उ० घृतं = घी. शृगं = शिंग. परंतु, त्याच्या मागें व्यजन असल्यास, त्याच्या ऐवजीं **अ**, **इ**, किंवा **उ**, यांचा आदेश बहुतकरून होतो. उ० मृत = मर्दे. कृपा = कीव.

३ **ऐ**ची **ए** अथवा **अ ई**, किंवा क्वचित् **इ** अगर **ई** होते. उ० धैर्य = धीर.

४ **औ**चा **ओ** किंवा **अ**, **उ**, आणि केव्हां केव्हां **उ** होतो. उ० गौर = गोरा. औषध = **ओखद्**. सौराष्ट्र = सोरट (**देश**). सौन्दर्य = सुंदर.

५ **ए** अगर **ओ** हे संयुक्त स्वर समजण्यांत येत नसून, ते **ऱ्हस्व** किंवा दीर्घ होतात.

६ द्वित्त व्यंजनामागील स्वर दीर्घ असल्यास तो **ऱ्हस्व होतो.** म्हणजे **आ**, **ई**, आणि **ऊ**, यांच्या ऐवजीं **अ**, **इ**, व **उ** यांचा आदेश होतो. उ० ईश्वर = इस्सर. मार्ग = मग्ग.

७ विसर्गाचा लोप होऊन, अचा **आ** होतो. रामः = रामा.

८ अची **इ**, **उ**, **ए**, **ओ**, व **औ** होतो. उ० पंजर = पिंजरा. मज्जन = बुडणें. शय्या = शेज. वर्कर = बोकड. चतुर्थ = चौथा.

९ द्वित्त व्यंजना मागील स्वर ऱ्हस्व असल्यास तो दीर्घ होतो. उ० जिव्हा = जीभ. गर्भ = गाभ. दृत = दांत.

१० क्वचित्, आदिस्वर **अ** असल्यास त्याचा लोप होतो. उ० अरघट्ट = रहाट.

११ संयुक्त व्यंजनापूर्वी **इ** व **उ** असल्यास, त्यांबद्दल बहुतकरून, **ए** आणि **ओ** येतात. उ० तुंड = तोंड सिन्दुर = शेन्दूर.

१२ उचा क्वचित् **ओ** व **अ** होतो. उ० पुस्तक = पोथी. सिंधु = सिंध.

१३ **इ**चा **अ**, **ई**, **ऊ**, व **ए** होतो. उ० हरिद्रा = हळद्. विद्युत् = वीज. इक्षु = ऊस. कीदृश = कैसा.

१४ **ए**चा **ई** होतो. उ० देवृ = दार.

१५ केव्हां केव्हा दोन स्वराबद्दल एकाच स्वराचा आदेश होतो, व तसें होताना एकादें अक्षर अजिबात गळतें. उ० उपवास=उपास. उलूखल = उखळ. अवस्थान = वठाण.

व्यंजनांसंबंधीं नियम.

१ प्राकृतांत तालव्य, किंवा मास्तिष्कोष्म व्यंजनें नाहींत.

२ **न्**च्या पुढें दन्त्य व्यंजन आलें नसल्यास, त्याचा **ण** होतो. उ० कठिनं = कठिण.

३ आरंभीच्या **य**चा **ज** होतो. उ० १ यव=जव. २ यानं=जाणें.

४ अन्त्य व्यंजनाचा लोप होतो. मात्र, हें व्यंजन **म्** किंवा **न्** असल्यास, त्यांचा अनुस्वार बनतो. उ० विद्युत् = वीज.

५ शब्दाच्या पोटांत **क्**, **ग्**, **च्**, **ज्**, **त्**, **द्**, **प**, **ब्**, व **य्** असे असल्यास, ते तसेच राहतात; किंवा त्यांजला गाळाऊ करण्यांत येतें

मात्र, त् व प् हीं व्यंजनें राहिलीं असल्यास, त्यांच्याबद्दल द्, आणि व अथवा ब, होतो. उ० कूपः = कुवा.

६ टचा ड होतो; व डचा क्वचित् ल् होतो उ० घटः = घडा. बिडाल = बिलाडी. (गुजराथी).

७ रचा ल् होतो.

८ ण्, म्, ल्, स्, आणि ह्, यांच्यांत कांहीं एक फरक न होतां, ते तसेच राहतात.

९ ख, घ, थ, ध, भ, यांच्या ऐवजी हचा आदेश होतो; किंवा त्यांत कांहीं एक बदल न होतां, ते मूलस्थितीत ही राहतात. उ० १ लेखनं = लिहिणें. २ बधिर = बहिरा. ३ लाभ = लाहो. ४ प्राघुणः = पाहुणा.

१० कित्येक ठिकाणीं, क्, ग्, च, ज, ड, त्, द्, ध, प, भ, म्, य, र, ल, व, श, आणि ह, यांचा लोप होतो उ० १ कुंमकार = कुंभार. २ चपानगर = चांपानेर. ३ मरीच = मिरें. ४ सपाद् = सव्वा. ५ देवृ=दीर. ६ भिक्षाहारी=भिकारी. ७ भूमि = भुई.

११ कचा ग आणि ग चा क होतो. उ० १ आकर = आगर. २ कर्मकार = कामगार. पंचगव्य = पंचकव्य. प्रकट = प्रगट.

१२ अनुस्वाराचा व अंत्य तिचा क्वचित् लोप होतो. उ० विंशति = वीस. त्रिंशति = तीस.

१३ ब च्या ठिकाणी व; डच्या जागी ल किंवा ळ; क चा ख; षचा ख; असे ही आदेश होतात. उ० १ बाष्प = वाफ. २ गुडं = गूळ. ३ कीलक = खिळा. ४ औषधं = ओखद्.

१४ संस्कृत शब्दांतल्या जोडाक्षराचे आद्य अवयव श, ष, स, असल्यास त्यांचा लोप होतो. श्मशान = मसण. शुष्कः = सुका.

१५ संयुक्त थचा ठ होतो. उ० १ ग्रंथि = गांठ. २ उत्थानं = उठणें.

१६ क्वचित् ठचा ढ होतो. उ० पठण = पढणें.

१७ **त** आणि **द्**च्याजागीं **ड** होतो. उ० पतनं = **पडणें.** दोलनं = डोलणें.

१८ **प**च्या जागी **फ**चा आदेश होतो. उ० पाशः = **फांस.** पनस=फणस.

१९ **श** आणि षच्या जागी **स**चा आदेश होतो उ० **वश**= वासा. पोषण = पोसणे.

२० **क्ष**चा **स** होतो. उ० कुक्षि = कूस.

२१ **क्ष**चा **ख** होतो. उ० लाक्षा = लाख.

२२ **द्य**च्या जागी **ज** होतो. उ० अद्य = आज.

२३ **ष्ट** अथवा **ष्ठ** यांच्या ऐवजी ठ किंवा **ड** होतो. उ० १ ओष्ठ = ओंठ. २ पृष्ट = पाठ. ३ काष्ट = काटी.

२४ अद्याक्षर लघु असून, तदनन्तरचे जोडाक्षर असलें तर, त्या जोडाक्षराच्या एक अवयवाचा लोप होतो, आणि आद्याक्षर **दीर्घ** होतें. उ० चक्र = चाक. तक्र = ताक. सदरहू जोडाक्षराचा अवयव अनुनासिक असल्यास, त्यांतलें आद्याक्षर गुरु होतें, व त्यांत अनुस्वार सामील करण्यांत येतो. उ० दन्त = **दांत.** कम्प = कांप.

२५ **द्ध**चा **ड्ढ** अथवा **ढ** होतो उ० वर्द्धन = **वाढणें.** सार्धपंच = साडेपांच.

२६ **स्त**चा **थ** होतो. उ० स्तोक = थोडें. हस्त = **हाथ.** (गुजराथी).

२७ **द्**चा **व** होतो. उ० पाद् = पाव (हिंदुस्थानी).

२८ **म**चा **व** होतो. उ० लोम = लव.

२९ **ष** व **श**च्या ठिकाणी **छ**; आणि **छ**च्या जागी **स**चा **आ**देश होतो. उ० १ षट्त्रिंशत् = छत्तीस. २ शाटी = **छाटी.** ३ कच्छप = कासव.

३० अंत्य कचा ड होतो. उ० केतक = केवडा.

३१ ऋकारान्त शब्दांत, अन्त्य ताच्या ऐवजीं ईचा आदेश करण्यांत येतो. उ० भ्राता = भाई. २ जामाता = जांवई. ३ माता = माई, आई.

३२ कित्येक ठिकाणीं, गच्या ऐवजी घचा आदेश होतो. उ० १ गृह = घर. २ ग्रास = घास.

३३ तच्या जागी व आणि लचा आदेश होतो. उ० १ कंकत= कंगवा. २ कृतं = केलें.

३४ प्राति उपसर्गाच्या ऐवजी पाद्चा आदेश होतो.

३५ प्राकृतांत भिन्न भिन्न वर्गांतील दोन व्यंजनांचा संयोग होत नाही. त्यामुळें, त्या दोन व्यंजनापैकी कोणतें तरी एक नाहींसें होऊन, राहिलेलें दुसरें द्वित्त होतें. उदाहरणार्थ, खड्गाचें खग्गो होतें.

३६ तथापि, ह्या बाबतीत अपवाद असून, जेव्हां सयुक्त व्यंजनांत स, ष, आणि श, ही व्यजनें असतात, तेव्हा ह्यांचा लोप होऊन, त्या ऐवजी राहिलेल्या व्यंजनाचा महाप्राण बनतो. असें पुष्कर=पोक्खरो. स्कन्द=खदो. यक्षः=जक्खो.

३७ मात्र, जेव्हां राहिलेल्या व्यजनास महाप्राण नसतो, तेव्हां तें व्यंजन राहून, महाप्राणाच्या ऐवजी हचा आदेश होतो. उ० स्नानम्=ण्हाणम्.

३८ त्याचप्रमाणें, संयुक्त व्यजनांत र असल्यास त्या ऐवजीं, व क्वचित् व आणि स या अक्षरांबद्दल, अनुस्वाराचा आदेश होतो. उ० वक्रम्=वंकम्. अश्रु=अंसुं. अश्वः=असो. दर्शनम्=दंसणम्.

३९ कित्येक ठिकाणीं संयुक्त व्यंजनांच्या दरम्यान एक नवीनच स्वर दाखल होतो. उ० कष्टम्=कसटम्. तन्वी=तणुई क्लेशः=किलेसो. श्रीः=सिरी. हर्षः=हरिसो.

हाचप्रकार आपल्याला मराठी भाषेंत देखील आढळून येतो. उ० युक्तिः=युगत.

४० प्राकृतांत, खालीं लिहिलेल्या संस्कृत जोडाक्षरांच्या ऐवजीं त्यांच्या समोर निर्दिष्ट केलेल्या संयुक्त व्यंजनांचा आदेश होतो. मराठींत मात्र, मूळ संस्कृत शब्दाचाच क्वचित उपयोग करतात; व क्वचित त्याचें रूपान्तर झालेलें ही दृष्टीस पडतें.

त्क	क्क	उ० सत्कारः	= सक्कालो.	म० सत्कार.
क्त		उ० मुक्तम्	= मुक्कम्.	म० मुक्त.
क्य		उ० वाक्यम्	= वाक्कम्.	म० वाक्य
स्क		उ० तिरस्कारः	= तिरक्कारो.	म० तिरस्कार.
क्र		उ० शक्रः	= सक्को.	म० शक्र.
र्क		उ० अर्कः	= अक्को.	म० अर्क.
क्ल		उ० विक्लवः	= विक्कवो.	म० विक्लव.
ल्क		उ० वल्कलं	= वक्कलम्.	म० वल्कल.
क्व		उ० पक्वम्	= पिक्कम्.	मं० पिकलेलें.
त्ख		उ० उत्खातम्	= उक्खाअम्.	म० खणलेलें.
ख्य		उ० व्याख्यानम	= वक्खाणम्.	म० व्याख्यान.
क्ष	झ	उ० क्षीणम्	= झीणम्.	म० क्षीण.
	क्ख	उ० यक्षः	= जक्खो.	म० यक्ष.
	च्छ	उ० इक्षुः	= उच्छु	म० ऊंस.
ष्क		उ० पुष्करः	= पोक्खरो.	म० पोखरण.
स्क	ख	उ० स्कंधः	= खधो.	म० खांदा.
स्ख		उ० स्खलितम्	= खलिअम्.	म० अडखळत.
स्त		उ० स्तंभः	= खभो.	म० खांब.
स्थ		उ० स्थाणुः	= खाणु.	म० स्थाणु.
स्फ		उ० स्फोटकः	= खोडओ.	म० फोड.
ड्ग	ग्ग	उ० खड्गः	= खग्गो.	म० खड्ग.
द्ग		उ० मुद्गः	= मुग्गो.	मं० मूग.
ग्न		उ० नग्नः	= णग्गो.	म० नागवा.
ग्य		उ० योग्यः	= जोग्गो.	म० योग्य, जोगा.
र्ग		उ० मार्गः	= मग्गो.	म० मार्ग.
ग्म		उ० युग्मम्	= जुग्गम्.	म० जोडपें.

घ्न	ग्घ	उ० विघ्नम्	= विग्घम् (विघ्घम्)	म० विघ्न.
च्य	च्च	उ० वाच्यम्	= वाच्चम्	म० वाच्य.
छ्र	च्छ	उ० कृच्छ्रं	= किच्छम्.	म० कृछ्र.
ब्ज		उ० कुब्जः	= खुज्जो.	म० कुबडा.
ज्र		उ० वज्रम्	= वज्जम्.	म० वज्र.
र्ज		उ० गर्जितम्	= गज्जिदम्.	म० गाजलेलें.
ज्व		उ० ज्वालः	= जालो.	म० जाळ.
न्य		उ० अभिमन्युः	= अहिमज्जू.	म० अभिमन्यु.
ज्ञ	ज्ज	उ० सर्वज्ञः	= सव्वज्जो.	म० सर्वज्ञ.
ड्ज		उ० षड्जः	= सज्जो.	म० षड्ज.
द्य		उ० विद्या	= विज्जा.	म० विद्या.
र्य		उ० कार्यम्	= कज्जम्.	म० काज. कार्य.
य्या		उ० शय्या	= सेज्जा.	म० शेज.
ध्य		उ० मध्यम्	= मज्झम्.	म० मध्य.
ह्य	ज्झ	उ० गुह्यम्	= गुज्झम्.	म० गुह्य.
र्झ		उ० निर्झरः	= णिज्झरो.	म० निर्झर.
र्त	ट्ट	उ० नर्तकः	= णट्टओ.	म० नाचणारा.
त्त		उ० पत्तनम्	= पट्टणम्.	म० पट्टण. पैठण.
ज्ञ		उ० विज्ञातः	= विंजातो.	म० विज्ञात.
न्य	ञ	उ० कन्या	= कंञा.	म० कन्या.
ण्य		उ० ब्रह्मण्यः	= ब्रह्मंजो.	म० ब्रह्मण्य.
ष्ट		उ० यष्टिः	= लट्ठी.	म० यष्टी.
ष्ठ	ट्ठ ठ	उ० निष्ठुरः	= निट्ठुरो.	म० निष्ठुर.
स्थ		उ० स्थितम्	= ठिअम्.	म० थांबलें.
र्त	ड्ड	उ० गर्तः	= गड्डो.	म० खाडा.
र्द		उ० गर्दभः	= गड्डहो.	म० गाढव.
ढ्य		उ० आढ्यः	= आड्ढो.	म० आढ्य.
र्ध	ड्ढ	उ० वर्धते	= वड्ढइ.	म० वाढतें.
न्त	ण्ट	उ० तालवृन्तकम्	= तालवेण्टअम्	म० ताडाचा पंखा
न्द	ण्ड	उ० भिंदिपालः	= भिंडिवालो.	म० (गोफण.)

ण्व		उ० कण्वः	= कण्णो.	म० कण्व.
ज्ञ		उ० विज्ञानम्	= विणाणम्.	म० विज्ञानम्
न्न	ण्ण	उ० भिन्नम्	= भिण्णम्.	म० भिन्न.
न्य	ण	उ० अन्यः	= अण्णो.	म० अन्य.आन.
ण्य		उ० पुण्यम्	= पुण्णम्.	म० पुण्य.
म्न		उ० प्रद्युम्नः	= पज्जुणो.	म० प्रद्युम्न.
र्ण		उ० सप्तवर्णः	= छत्तवणो.	म० सप्तवर्ण.
स्न		उ० स्नेहः	= णेहो.	म० स्नेह.
क्ष्ण		उ० तीक्ष्णम्	= तीण्हम्.	म० तिखट.
श्न		उ० प्रश्नः	= पण्हो.	म० प्रश्न.
ष्ण	ण्ह	उ० विष्णुः	= विण्हू.	म० विष्णु.
स्न		उ० स्नानम्	= ण्हाणम्.	म० नाहाण.
न्ह		उ० वन्हिः	= वण्ही.	म० वन्ही.
क्त		उ० भक्तम्	= भत्तम्.	म० भक्ताचें. भक्त.
प्त		उ० सुप्तः	= सुत्तो.	म० झोंपलेला.
र्त	त्त	उ० कर्तरी	= कत्तरी.	म० कर्तरी.
त्र		उ० चैत्रः	= चइत्तो.	म० चैत्र.
त्व		उ० सत्वरम्	= सत्तरम्.	म० सत्वर.
ब्द	द्द	उ० शब्दः	= सद्दो.	म० शब्द.
द्य	द्	उ० सद्य	= सद्दम्.	म० सद्य.
द्र		उ० द्रोहः	= द्रोहो.	म० द्रोह.
ग्ध		उ० मुग्धः	= मुद्धो.	म० मुग्ध.
ब्ध		उ० लुब्धकः	= लोद्धओ.	म० लुब्धक.
र्ध	द्ध	उ० अर्धम्	अद्धम्.	म० अर्धे.
ध्व		उ० अध्वा	– अद्धा.	म० (रस्ता.)
ध्र		उ० गृध्रः	= गिद्धो.	म० गिधाड.
न्त	न्द्	उ० महन्तः	= महन्दो.	म० मोठा.
न्ह	न्ध	उ० चिन्हम्	= घिन्धम्.	म० चिन्ह.
स्प	फ	उ० स्पन्दनम	= फंदणम्.	म० फुंदणें.
प्र	प	उ० प्रति	= पडि.	म० प्रत (त्याप्रत)

र्प	प्प	उ० कर्पूरः	= कप्पुरो.	म० कापूर.
ल्प		उ० अल्पः	= अप्पो.	म० अल्प.
त्प		उ० उत्पलम्	= उप्पलम्.	म० उत्पल.
क्म		उ० रुक्मम्	= रुप्पम्.	म० रसरशीत!
त्म		उ० आत्मा	= अप्पा.	म० आत्मा.
द्ब	ब्ब	उ० बुद्बुदः	= बब्बुडो.	म० बुडबुडा.
ल्ब		उ० शुल्बम्	= सुब्बम्.	
म्र	म्ब	उ० आम्र.	= अंबो.	म० आंबा.
न्म	म्म	उ० जन्म	= जम्मो.	म० जन्म.
म्य		उ० सौम्यः	= साम्मो.	म० सौम्य.
र्म		उ० वर्म	= वम्मो	म० वर्म.
म्ल		उ० अम्लः	= अम्मो.	म० आंबट.
ष्म	म्ह	उ० ऊष्मन्	= उम्हा.	म० ऊष्मा.
ह्म		उ० ब्रह्मा	= बह्मा.	म० ब्रह्मा.
क्ष्म		उ० पक्ष्म	= पम्हो.	म० पख.पापणी.
स्म		उ० विस्मयः	= विम्हओ.	म० विस्मय.
र्य	य्य	उ० कार्यम्	= कय्यम्.	म० काज.
र्ज		उ० दुर्जनः	= दुय्यणो.	म० दुर्जन.
र्य	र	उ० धैर्यम्	= धीरम्	म० धीर.
		उ० सौन्दर्यम्	= सुदेरम्.	म० सुन्दर.
र्य	रि	उ० चौर्यम्	= चोरिअम्.	म० चोरी.
दृ		उ० सदृशः	= सरिसो.	म० सारखा.
र्श	रिस	उ० स्पर्शः	= फरिसो.	म० स्पर्श.
र्ष		उ० हर्षः	= हरिसो.	म० हर्ष.
र्ह	रिह	उ० अर्हः	= अरिहो.	म० अर्ह.
र्य	ल्ल	उ० पर्याणम्	= पल्लाणम्.	म० पर्याण.
ल्य		उ० मूल्यम्	= मोल्लम्.	म० मोल.
र्ल		उ० दुर्लभः	= दुल्लहो.	म० दुर्लभ.
ल्व		उ० बिल्वः	= बेल्लो.	म० बेल.

ह्ल	ल्ह	उ० आल्हादः	= आह्लादो.	म० आल्हाद.
ष्ट्र		उ० कोष्ट्रा	. = कोल्हा.	म० कोल्हा.
व्य	व्व	उ० ज्ञातव्यः	= जाणव्वो.	म० जाणावा.
र्श		उ० दर्शनम्	= दंसणम्.	म० दर्शन.
श्रु	ँस	उ० अश्रु	= अंसु.	म० असुं.
श्व		उ० अश्वः	= अंसो.	म० अश्व.
स्व		उ० मनस्विनी	= मणंसिनी.	म० मनस्विनी.
श्म		उ० रश्मिः	= रस्सी.	म० रशी.
श्य		उ० नश्यतु	= णस्सदु.	म० नासो.
च्छ		उ० कच्छपः	= कस्सवो.	म० कांसव.
ष्म		उ० क्षुष्मम्	= सोस्सम्.	
ष्य		उ० पुष्यः	= पुस्सो.	म०पूस (महिना)
स्य	स्स	उ० हास्यम्	= हस्सम्	म० हसूं.
श्र	स	उ० स्मश्रु	= मस्सू.	म० स्मश्रु.
श्व		उ० अश्वः	= अस्सो.	म० अश्व.
त्स		उ० उत्सवः	= उस्सवो.	म०उत्सव.उत्साव.
र्ष		उ० ईर्षा	= इस्सा.	म० ईर्षा.
स्व		उ० स्वर्गः	= सग्गो.	म० स्वर्ग.
ष्म	ह	उ० कुष्माण्डः	= कुहालो.	म० कोहोळा.
र्ष		उ० कार्षापणः	= काहावणो.	म० कार्षापण.

४१ संस्कृत शब्दांत तीन जोडव्यंजनें येऊन, जर त्यापैकीं एकादें य, र, ल, अगर व असलें, तर तें प्राकृतांत नाहींसें होतें, आणि राहिलेलीं व्यंजनें देखील बदलतात. उदाहरणार्थ, "मत्स्या" चें प्राकृतांत व मराठीत "मच्छ" होतें. तथापि, त्यांतलें पहिलें व्यंजन अनुनासिक असल्यास, तें तसेंच राहतें, आणि बाकीच्या व्यंजनांतच वरील नियमांप्रमाणें बदल होतो. मात्र, भेद म्हणून इतकाच कीं, अनुनासिकापुढें दोहोंतून कोणतेंही व्यंजन द्वित्त होत नाहीं. जसें, विंध्य = विंझ.

शब्दाचा अपभ्रंश, व रूपान्तर होण्याचें कारण.

तात्पर्य. मूळ भाषेंत बदल होऊन, प्राकृतांत किंवा मराठींत जे अपभ्रष्ट शब्द बनतात, त्यांचें रूपान्तर तीन करणांनीं होतें. ह्मणजे, तें बहुत करून

१ लुप्तवर्णानें,

२ विकृत वर्णानें, किंवा

३ अधिक वर्णानें

होत असतें, असें खालील उदाहरणांवरून वाचकाच्या लक्षांत सहजीं येईल.

संस्कृत.	अपभ्रंश.	
उपघेहि.	उपहि.	(वर्णलोप.)
आदेहि.	आहि.	
हेऽरयः	हेऽलयः	(विकृतवर्ण.)
गौः	गावी. गोणी. गोता. गोपोतलिका.	(वर्णाधिक्य.)

आतां, लुप्तवर्णानें, वर्णविकृतीनें, अथवा, वर्णाधिक्यानें, संस्कृत शब्दाचें प्राकृतांत आणि मराठींत कसकसें रूपान्तर होतें, हें समजण्यासाठीं, येथें तद्विषयकही थोडासा तपशील देतों.

	संस्कृत.	प्राकृत.	मराठी.	वर्णान्तराचा प्रकार.
१	कर्पूरः	कुप्पुरो.	कापूर.	वर्ण लोप.
	आम्रः	अंबो.	आंबा.	
	सदृशः	सरिसो.	सारखा.	
	धैर्यम्	धीरम्.	धीर.	
२	पक्कम्.	पिक्कम्.	पिकलेलें.	विकृतवर्ण.
	उत्खातम्.	उक्खाअम्.	खणलेलें.	
	इक्षुः	उच्छू.	ऊंस.	
	क्रोष्टा	कोल्हा.	कोल्हा.	
३	पक्ष्म.	पम्हो.	पापणी.	वर्णाधिक्य.

भाग ७५ वा.

मराठी भाषेचें प्रास्ताविक विवेचन.

इ. स. ९००-१२७०.

मराठी भाषेची बाल्यावस्था.

ह्या भागांत, मराठी भाषेचें प्रथमावस्थेंतील स्वरूप, तिचें ऐतीह्य, तिचा गद्यपद्यात्मक प्रकार, तिच्यातील कल्पकथा, तिचा स्वयमेव ओघ, तिच्यांतील रसवत्ता, आणि तिची मुग्धावस्था, इत्यादि विषयांचें तपशीलवार विवेचन करण्याचें आमच्या मनांत असून, आमच्या समाजावर, आमच्या नीतीवर, आमच्या धार्मिक वृत्तीवर, व आमच्या एकंदर महाराष्ट्रमंडलावर, या सुमनोहर वाङ्मयाचा कितपत परिणाम झाला; त्यायोगानें, आमचें इष्टकार्य शनैः शनैः, परंतु अगदीं अचुक आणि निःशंकपणें कसें साधत गेलें; सनातन आर्यधर्माच्या रक्षणाचें अत्युन्नत बीज त्यांत अन्तर्धानच पावलेलें असल्यामुळें, आमचे शौर्यादि गुण कसे एकदम उदयास आले; त्याचकारणानें, आमचें प्रच्छन्न साहस, व मृतप्राय झालेला देशाभिमान, यांजला एकाएकीच कसें स्फुरण मिळालें; आणि अखिल महाराष्ट्रीयांची स्वातंत्र्यस्पृहा कशी तत्काळ जागृत झाली; वगैरे गोष्टींचाही

साद्यन्त वृत्तान्त ह्या व पुढील भागांत, शक्त्यनुसार देण्याचें आम्हीं योजिलें आहे.

भाषोन्नति हें राष्ट्रोन्नतीचें फळ.

आम्हा हिंदू लोकांची उन्नति आज सुमारें पंधरा[1] वीस हजार वर्षांच्या दीर्घकालांत, जी एकसारखी होत गेली, तिलाच कालचक्राच्या नेमिक्रमानें ओहोटी पण लागली, आणि दैववशात् पुनश्च भरतीही प्राप्त झाली.

---

[1] ह्यासंबंधानें विचार करण्यासाठीं, आपल्यास वेदकालांतच गेलें पाहिजे. कारण, वेदकालीं दृग्गोचर होत असलेली आमची उन्नति अगदीं प्राचीनतम होय. आतां, आमचे वेद हे हैमयुगापूर्वी उद्यास आले, आणि त्या गोष्टीला आज सुमारें १८,००० किंवा २०,००० वर वर्षें होऊन गेलीं, असें कित्येक भूगर्भशास्त्रवेत्त्यांचें म्हणणें आहे. सबब, त्याच अनुरोधानें हें आम्हीं लिहिलें आहे. ह्या बाबतींत, रा. रा. बाळ गंगाधर टिळक यांनीं " **वेदांचें पौराणत्व** " नांवाच्या आपल्या सुप्रसिद्ध लेखांत असें म्हटलें आहे कीं,

" But, to be on the safer side, I have accepted the lowest estimate, viz, that of the American Geologists, who fix the beginning of the present post-glacial period approximately at 10,000 years before present time, or at about 8,000 B. C. There are other Geologists, who hold that the date cannot be placed earlier than 18,000 or 20,000 B. C. "

(Antiquity of the Vedas. By Bal Gangadhar Tilak. P. P. 5·9.)

ग्रंथकर्त्याचा संस्कृत भाषेचा इतिहास. भा. सा. पु. १० वें. पान ६१-६२ आणि ग्रंथकर्त्याचें भाषाशास्त्र. भाग ३रा ८७वा पहा.

तेव्हां, ह्या घडामोडीबद्दल कोणाला देखील विषाद वाटण्याचें बिलकुल प्रयोजनच नाहीं. तथापि, ह्या सर्वभक्षी काळाच्या अतिविक्राळ दंष्ट्रेखालीं चिरडन लयास न जातां, आम्हा भारतीयांचें जें काहीं सुदैवानें थोडें बहुत तरी अवशिष्ट म्हणून राहिलें आहे, त्यातच आमच्या प्राकृत भाषाचीं, व तदुद्भूत मराठी वगैरे प्रलापांची गणना करण्यास, तिळमात्र सुद्धां हरकत नाहीं.

संस्कृत, प्राकृत, व मराठी भाषा, हीं आर्योन्नतीपासून उद्भवलली दिव्यरत्नें.

सुन्दर भाषा, अपूर्व वचोविन्यास, आणि सुमनोहर शब्दमौक्तिकें, इत्यादि सर्व, मनुष्याच्या श्रेष्ठोन्नतीचे केवळ उत्कृष्ट अलंकारच होत. तेव्हां, अशा प्रकारची खरी वस्तुस्थिति असल्यामुळें, संस्कृतासारखी अतुल, उदात्त, व शास्त्रीय मायभाषा, महाराष्ट्र प्राकृतासारखी तिची पुराण आणि मधुर दुहिता, व मराठीसारखी सुरस आणि विसृत प्रदेशांत व्यवहारांत असलेली तिची दौहित्री, हीं आमच्या प्राचीनतम उन्नतीपासून प्रसवलेलीं सर्वमान्य व अजरामर दिव्यरत्नेंच आहेत, असें कोणाही समंजस मनुष्यास अगदीं निर्विवादपणें कबूलच केलें पाहिजे.

मराठीचा प्रसार, व ती बोलणारांची संख्या.

असो. मराठी भाषा सुमारें दोन कोटी लोक बोलत असून, ती उत्तर हिंदुस्थानांतील ग्वाल्हेरच्या प्रदेशापासून तों तहत दक्षिण टोंकाजवळील तंजावर प्रान्तापर्यंत प्रचारांत आहे; आणि महाराष्ट्रांत तर, तिनें

आपला प्रकाश विलक्षण रीतीनें पाडला असून, एके वेळीं तिचें तेज कांहीं कालपर्यंत,. अखिल भरतखंडभर चमकून राहिलें होतें.

महाराष्ट्रीपासून मराठीचा उद्भव, व महाराष्ट्रीची उन्नति.

मराठी भाषा महाराष्ट्रीपासून उद्भवली असल्याचें आम्हीं पूर्वींच सांगितलें असून, " महाराष्ट्र" हें नाव, अशोक[1] बादशहाच्या वेळीं व त्यानंतर[2], बरेच प्रचारांत असल्याचें दिसतें. कारण, एक तर वररुचीनेंच[3] या महाराष्ट्र भाषेचें व्याकरण केलें आहे. त्यावरून, हें नांव आणि ही भाषा तत्कालीं व त्याच्याही अगोदर सुमारे तीन चार शतकें प्रचारांत असावी, असें वाटतें दुसरें असें कीं, कालिदासाचा काल हाच असून, वररुचि व कालिदास असे विक्रमादित्याच्या पदरीं नवरत्नापैकींच असल्याविषयीं वर्णन आहे. इतकेंच नव्हे तर, कालिदासाचें

---

१ अशोकाचा अमल महाराष्ट्रांत, व सुपाऱ्यापर्यंत कोंकणांत, असल्याचें वाचकाच्या ध्यानांत असेल. (मागें पान १०९–११० पहा).

२ शालिवाहन कुळांतील कृष्णराजाच्या कारकीर्दीतल्या जुन्नराजवळच्या नाणेघाटांतील शिलालेखांत " महारठिगनकयिरो " म्हणजे " मराठा योद्धा, " असें लिहिलेलें दृष्टीस पडतें. (इ. स. पूर्वी ५० वर्षे व नंतर).

३ हा वररुचि इ. स. पूर्वी ५६ वर्षे उदयास आल्याचें म्हणतात. (मागें पान ४ पहा). परंतु, कात्यायन नांवाचा जो सुप्रसिद्ध वैयाकरण आणि वार्तिककार होऊन गेला, व ज्याला वररुचिकात्यायन म्हणतात, त्याचा काल भट भांडारकरांच्यामतें इ. स. पू. चारशें वर्षे असल्याचें दिसतें. (मागील पान ८५ पहा).

सेतुबंध म्हणून जें महाराष्ट्री भाषेत काव्य आहे, त्याच्या माधुर्याविषयीं आणि उत्कृष्टतेबद्दल, दण्डी व बाणासारख्या रसिक कवींनीं देखील मोठीच प्रशंसा केली आहे.

महाराष्ट्राश्रयां भाषां प्रकृष्टं प्राकृतं विदुः ।
सागरः सर्व सूक्तीनां सेतु बंधादियन्मयम् ॥
(दण्डीकृत काव्यादर्श.)

निर्गतासु नवाकस्य कालिदासस्य सूक्तिषु ।
प्रीतिर्मधुर सार्द्रासु मंजरीष्विव जायते ॥
(बाणकृत हर्षचरित.)

तेव्हां, ही भाषा इतक्या परिपक्व दशेप्रत येण्याला, संवत्सराचीं अनेक शतकें लोटलीं पाहिजेत, हें उघड आहे.

महाराष्ट्रप्राकृताची ही परिणतावस्था इ० स० च्या तिसऱ्या शतकांतही असल्याचें दिसतें. कारण, हाल[1] नामक राजाचें "सप्तशाति" नावाचें आर्यावृत्तांतलें काव्य सुद्धां, सुरस व अजरामर असल्याविषयीं, बाण कवीनेंच म्हटलें आहे.

भट्टार हरिचन्द्रस्य पद्यबन्धो नृपायते ।
कविनाशनमग्राम्यमकरोत् सातवाहनः ॥
(बाणकृत श्रीहर्षचरितम्. प्रथमोच्छ्वासः).

अशा प्रकारें, महाराष्ट्र भाषेची उन्नति दिवसानुदिवस

---

१ हालाच शातवाहन किंवा शालिवाहन म्हणतात. हा अन्ध्रभृत्य राजांपैकीं असून, महाराष्ट्रांत शातवाहन अथवा अन्ध्रभृत्य राजांचें राज्य इ. स. पूर्वी ७३ सालापासून तों इ. स. २१८ वर्षांपर्यंत होतें.

महाराष्ट्रीची अवनति व अपभ्रंश.

अधिकाधिकच होत गेली, आणि अनेक कविगणाच्या साहायानें, ती नांवारूपासही आली. परंतु, पुढें, कालान्तरानें कित्येक राजकीय, सामाजिक, व धार्मिक, कारणांनीं तींत शनैः शनैः आपोआपच फरक पडत गेला; आणि त्यामुळें, भिन्न भिन्न देशांतील परिवेष्टनानुरूप व परिस्थित्यनुसार, तिला निरनिराळें स्वरूप प्राप्त झालें. अर्थात्, आमच्या ह्या महाराष्ट्र देशांत, तिला मराठीचा आविर्भाव येण्याची सुरवात होऊन, मुकुंदरायकवीच्या ग्रंथांत ती ज्या स्थितींत दृष्टीस पडते, त्या स्थितीप्रत पोहोंचली.

मराठी भाषेच्या इतिहासाचा उत्तर-कथाभाग.

याप्रमाणें, मराठी भाषेचा पूर्ववृत्तान्त इत्थंभूत समजण्यासाठीं, तद्विषयक अवश्य ती हकीकत केवळ उपोद्घातरूपानेंच आम्हीं आपल्या वाचकांपुढें ठेविली. सबब, आतां मराठी भाषेच्या उत्तरभागाकडे क्षणभर वळूं, आणि मराठी वाङ्मयाचा आदिकवि जो मुकुंदराज, तेथपासून तों तहत सांप्रत कालपर्यंत, म्हणजे इ० स० च्या दहाव्या शतकापासून तों थेट विसाव्या शतकापर्यंत, मराठी भाषेचा साद्यन्त इतिहास देऊं.

मात्र, विषयविवेचनाच्या सोयीसाठीं, १ मराठी भाषेची बाल्यावस्था, २ यत्रावस्था, व ३ प्रौढावस्था, अशा तिच्या स्थितित्रयाचें यथावकाश वर्णन करूं; आणि त्यांचा प्रथमकाल, द्वितीयकाल, त्रितीयकाल, अगर चतुर्थकाल, असे जरूरीप्रमाणें विभाग करून, तत्संबंधीं पृथक् पृथक् हकीकत वाचकांपुढें ठेवूं.

भाग ७६ वा.

मराठी भाषेची बाल्यावस्था.

प्रथम काल.

इ० स० ९००--१०००.

मुकुन्दराजाचा काल, व चरित, याविषयींच्या सप्रमाण माहितीचा अभाव.

मुकुन्दराजाच्या कालाची गणना, अगदीं विश्वसनीय रीतीनें अगर खात्रीपूर्वक करण्यास, अवश्य तितकें आधारभूत प्रमाण दिसून येत नाहीं. तथापि, आम्हांस जी माहिती उपलब्ध झाली आहे, तीच साधकबाधक कारणांसहित, येथें थोडक्यांत सादर करणें विशेष श्रेयस्कर वाटतें.

आपलें वृत्त, अथवा आपल्या कृतीचा त्रोटक वृत्तान्त, ग्रंथान्तरीं कोठें तरी देण्याचा आमच्या बहुतेक कविगणांचा संप्रदाय आहे. परंतु, मुकुन्दराजानें तसें कोठेंही केलेलें नसल्यामुळें, त्याचा निश्चित काळ समजण्यास मार्ग नाहीं.

त्याच्या गुरुपरंपरेचा वृत्तान्त.

मात्र, त्यानें आपल्या श्रीगुरूची परंपरा, त्याची जन्मभूमि, आणि त्याची शाखा, यांचें साधारण दिग्दर्शन विवेकसिन्धूंत एके ठिकाणीं केलें आहे. यावरून, हरि नामक श्रीसद्गुरूची कृपा त्यानें संपादन केली होती, असें दिसतें.

तरी आदि गुरु श्रीआदिनाथ। तेथूनि श्रीहरिनाथ ॥
तयाचा शिष्य रघुनाथ। जो गुणसिन्धु ॥ २७ ॥
बाण गंगेच्या तीरीं। मनोहर अंबा नगरीं ॥
तेथें प्रगटले श्रीहरी। जगदीश्वर ॥ २८ ॥
माध्यंदिनी शाखे। अवतार केला परम पुरुषें ॥
चांपे गोरटें निवेशें। अति मनोहर ॥ २९ ॥

(विवेकसिन्धु. उत्तरार्ध. प्रकरण ११ वें.)

त्याचा आनुमानिक काल.

हा प्रख्यात कवि व साधुवर्य, शालिवाहन शकाच्या ९०० वर्षांच्या सुमारास,[1] म्हणजे इ०स० ९७८ वर्षांच्या आत बाहेर, उदयास आल्याचें समजतें. हा जयपाळ राजाच्या कारकीर्दींत होता, असें म्हणतात; आणि जयपालाची कारकीर्द इ० स० ९९० पासून इ० स० १००८ पर्यंत असल्याविषयीं ऐतिहासिक प्रमाण आहे. तेव्हां, मराठी भाषेचा हा आद्यकवि इ० स० च्या दहाव्या शतकातच होऊन गेला असावा, असें वाटतें.

ह्याखेरीज दुसरा एक दाखला असा मिळतो कीं, प्राचीनकाळीं, पैठणात कोणी एक शूरसिंह (शूरसेन) नांवाचा राजा झाला असून, ह्याचाच जयपाळराजा[2] हा वंशज होता. पुढें, कालान्तरानें, ह्याची व मुकुन्दराजाची भेट

---

१ हाच काल नवनीतांतही नमूद केला आहे.

२ विवेकसिंधूंत मुकुन्दराजानें ज्या जयन्तपाळाचा उल्लेख केला आहे, तो कदाचित हाच असावा. (पुढील पान १६० पहा.)

झाली; आणि ह्या राजाला पारमार्थिक विषयाची मोठी अभिरुचि असल्याकारणानें, मजकूर कवीनें सदरहू राजासाठीं, १ परमामृत व २ विवेकसिन्धु असे दोन आध्यात्मिक ग्रंथ तयार केले. हे दोन्ही ग्रंथ दहाव्या शतकांतच संपूर्ण झाले असल्याचें कळतें, आणि त्यावरून, त्याचा काल इ० स० चें दहावें शतक असल्याचें उघड होतें.

तिसरें प्रमाण याहीपेक्षां, निदान दर्शनीं तरी, बळवत्तर दिसतें. कारण, तें प्रत्यक्ष मुकुन्दराज कवीच्या तोंडचेंच आहे. त्यामुळें, तें अर्थातच विशेष साधारसें वाटतें. पण त्यावरून देखील कवि मजकूरच्या कालाचा निर्णय ह्मणन होतच नाहीं. कारण, विवेकसिन्धूंत, ह्या कवीनें एके ठिकाणीं सहजगत्या असा महत्वाचा उल्लेख केला आहे कीं, "नृसिंहाच्या बल्लाळ नामक पुत्राचा जो जयन्तपाळ मुलगा, तोच कारणीभूत झाल्यानें विवेकसिन्धूसारखा पवित्र व आध्यात्मिक ग्रंथ उदयास आला."

नृसिंहाचा बल्लाळ। त्याचा कुमर जयन्तपाळ॥
तेणें करविला गदारोळ। ग्रंथरचनेचा॥ ५५॥
भगीरथाचेचि दैवयोगें। विश्वसुस्नात गंगे॥
तैसें जयन्तपाळाचोनि प्रसंगे। जग सुखीया होय ५६
ज्यां आपुली निजवाणी। पवित्र केली इहीं वचनीं॥
ते प्रीति पावो पिनाक पाणी। श्री मुकुन्दराज म्हणे ५७

(विवेकसिन्धु. पू. प्र. ७ वें).

परंतु, हा जयन्तपाळ कोण, आणि तो केव्हां होऊन गेला, याविषयींची स्पष्टता मुकुन्दराजानें कोठेंही केली असल्याचें दिसत नाहीं. त्यामुळें, तत्संबंधानें खरोखरच शंकाच राहते. कारण, बल्लाळ नांवाचे राजे सेऊंण[1] देशांत व कोल्हापुरांतही होऊन गेले होते.

त्याची जन्मभूमि, व कुटुंबेतिहास.

शिवाय, अन्य दाखल्यावरून आणखी असें देखील समजतें कीं, मुकुन्दराजाच्या पूर्वजांस नांदेड गांवची वंशपरंपरेनें चालत आलेली वृत्ती होती; व ते तेथले वृत्यंशी जोशी असल्यामुळें, त्यांजला तत्संबंधीं वतनाचा कांहीं भाग सुद्धां मिळत असे.[2] हा घांटावरील राहणारा असून, त्याचें जन्म जोगाईचें अंबें म्हणून जें खेडें आहे, तेथें झाल्याचें कळतें. हा माध्यंदिन वाजसनेय यजुर्वेद शाखेंतील देशस्थ ब्राह्मण होता; आणि बालपणापासूनच तो सत्वगुणसंपन्न असल्यामुळें, पारमार्थिक विषयांत ह्या राजश्रीची वृत्ति अगदीं अल्पवयांतच तल्लीन झाली होती.

त्याचा गुरु,

ह्याचा गुरु मोठा शैव असे, व श्रीशंकर आपल्यास सुप्रसन्न व्हावा एतदर्थ, श्रीहरिसद्गुरूनें फारच कडकडीत तपश्चर्या केली होती, अशाबद्दलचें वर्णन विवेकसिन्धूंत आहे.

बारा वर्षें पाशुपत । आचरला महाव्रत ॥
तेणें पार्वतीसहित । शंभु प्रसन्न केला ॥ ४७ ॥

---

१ इ. स. ११०९. } भट भांडारकरकृत दक्षिणचा प्राचीन इतिहास.
२ इ. स. १०५८. }

**तयाचे परी अतिगहन । हरीनें आदरिलें अनुष्ठान ॥
तेणें तपें त्रिभुवन । पोळतें झालें ॥ ४९ ॥**

(वि. सि. उ. प्रकरण ११ वें).

व संप्रदाय.

आपल्या गुरूप्रमाणेच, मुकुंदकवि सुद्धां प्रचंड शंकर-भक्त व शैवसंप्रदायी होता, आणि त्याच्या प्रेरणेनेंच मराठी भाषेंत आपण ग्रंथ लिहिले, असें त्यानें स्पष्टपणें सांगितलें आहे.

**शंकरोक्तीवरी । मी बोलिलों मराठी वैखरी ॥
म्हणूनी निर्धारावी चतुरीं ॥ शास्त्रबुद्धी ॥ १४७ ॥**

(विवेकसिंधु. पूर्वार्ध. प्रकरण ७ वें).

**या संप्रदायाचा अभिमानी । स्वयें आपण शूलपाणी ॥
तरी प्रीति पावो तेथ वचनीं । सर्वेश्वरीं ॥ १३६ ॥**

(विवेकसिंधु. उत्तरार्ध. प्रकरण ११ वें).

याप्रमाणें, ह्या कविवराच्या गृहस्थितीची उपलब्ध असलेली अवश्य तितकी हकीकत सादर केल्यामुळें, आतां त्याच्या ग्रंथाकडे वळूं, व तत्संबंधीं विचार करूं.

त्याच्या कृतीविषयीं दोन शब्द

मुकुन्दराजाचे सुप्रसिद्ध आणि उपलब्ध असे फक्त तीनच ग्रंथ आहेत. १ **परमामृत**, २ **विवेकसिन्धु**, व ३ **मूळस्तंभ**. परमामृताचीं चौदा प्रकरणें असून, त्यांत स्थूलदेहनिरसन, लिंगदेहनिरसन, कारणदेहनिरसन, महाकारणदेहनिरसन, निदिध्यास, दृश्यभासखंडन, अज्ञानखंडन, स्वानुभव, मुक्तिरहस्य, साक्षात्कार, इत्यादि विषयांचें फारच मार्मिक रीतीनें विवेचन केलेलें

दृष्टीस पडतें. परंतु, त्यांत सुद्धां, बाराव्या आणि तेराव्या प्रकरणांत, स्वानुभव व मुक्तिरहस्यासंबंधीं मुकुन्दराज कवीनें आपल्या विचारसुवर्णाची जी मूस ओतली आहे, ती निःसंशय अमूल्य असून, केवळ अनभ्यस्तांस देखील अत्यानन्द देते; व त्याजवर नीति, सदाचार, आणि भक्ति-रस, याचा प्रत्यक्ष ठसाच उमटविते. मग, ज्या भाग्य-शील मानवानीं परमार्थमहोदधीचें अहोरात्र मंथन केलें आहे, त्यास तेथें नानाविधरसात्मक अमृततुल्य नवनीत प्राप्त होऊन, ते परमाल्हाद पावतात; आणि मुकुन्दरायानें वाढ-लेल्या मिष्टान्नसेवनानं, ते मोठ्या प्रेमानें माना डोलवितात; यात नवल ते कोणते?

असो. ह्या बाराव्या प्रकरणांत, परब्रह्मप्राप्तीचें स्वानु-भवात्मक वर्णन फारच चटकदार असल्यामुळें, तें खरोखरच विशेष महत्वाचें आहे. सबब, त्यांतील कांहीं उतारे येथें देतों.

मुकुन्दराय म्हणतो:—

जैसें अमृत चाखे आपुलेचवी। तैसें स्वसुख अनुभवी॥
तेथें कोण आठवी। संसारासी॥ ४॥
बोले स्वानंदाचा घन। दाटे सुख परिपूर्ण॥
तयामाजी विवेक सुजाण। हारपोनि जाय॥ ५॥
अहंता स्वरूपीं गळे। विषय तृष्णा मावळे॥
इन्द्रियांचे ळळे। क्रियेविण पूर्ण होतीं॥ ६॥
सदा स्वानंदाचे सोहळे। विषय विजाती वितळे॥
स्वरूप सुखाचेनि मेळे। इन्द्रियां तृप्ती॥ ७॥

परम सुखाचेनिभरें । एकही स्फूर्ती न स्फुरे ॥
कार्य जाती विसरे । निमिष्यांत ॥ १० ॥
खुंटलें मनाचे जाणणें । ते सुख अनुवदावें कवणें ॥
हें अनुभवी तोचि जाणे । इतरा टकमक ॥ १३ ॥

(परमामृत. प्रकरण १२ वें).

तेराव्या प्रकरणात, मुक्तिरहस्याचे निरूपण करून, संकल्प व विकल्प नाहीसा झाल्यानें कसा अत्यानन्द होतो; विधिनिषेधाला कसा फांटा मिळतो; पाप आणि पुण्य हीं कशीं लयास जातात; भेद नाहींसा होऊन देखील, सद्गुरुच्या ठिकाणीं कसें कायमचें प्रेम राहते; सद्गुरु व परमेश्वर याचें किती ऐक्य होतें; आत्मस्वरूपी कशी सावधान वृत्ति जडते; मानापमानासंबंधीं किती उदास वृत्ति होऊन जाते; आणि सुख दुःख, व लाभ हानि, याविषयीं योग्याचें मन किती निर्विकार असते; इत्यादींचे सर्व प्रकारें हृदयंगम वर्णन आहे. ह्या बाबतींत, आदिकवि मकुन्दराज असें लिहितो कीं,

ऐशी पावोन योगी खुण । स्वानन्द भोगितो परिपूर्ण ॥
तया योगिया न घडे शीण । संसाराचा ॥ १ ॥
विधिनिषेधाची कडसणी । न वर्ते जया अन्तःकरणीं ॥
पाप पुण्याची कहाणी । तेही नेणती ॥ ७ ॥
शुभाशुभ फळें । न बाधती कवणें वेळें ॥
ते सर्वांपासून सुटले । जीवन्मुक्त ॥ ८ ॥
आणि विश्वामाजी ईश्वरु । एकच व्यापक सद्गुरु ॥
म्हणनि सर्वांभूतीं आदरू । करिती ते ॥ १६ ॥

सुखदुःख न गणी । समाधान लाभ हानी ॥
उदार ते अन्तःकरणीं । न गुंतती कोठें ॥ १९ ॥
सदा विवेकीं चित्तवृत्ति । पडों न देती विस्मृती ॥
सावधान अहोरातीं । आत्मस्वरूपीं ॥ २० ॥
(परमामृत. प्रकरण १३ वें).

विवेकसिन्धूचे १ पूर्वार्ध आणि २ उत्तरार्ध, असे दोन भाग असून, पहिल्यांत सात व दुसऱ्यांत अकरा प्रकरणें आहेत. ह्यात पंचीकरण, आणि परमामृतांत सांगितल्या-प्रमाणेंच अन्य विषयाचेंही विवेचन आहे. मात्र, त्यांत, ह्या सर्वांचा जरा विशेष तपशिलवार ऊहापोह केलेला दिसतो. साकार जगत् व निराकार परमात्मा, यांचें सदैव ऐक्यच असतें. परंतु, अहंकारामुळें मायारूपी आवरण पडून, त्यानेंच हें सर्व विश्व व्याप्त झालें; आणि मुळची रज्जु असताही, भ्रांतीच्या योगानें सर्पाचा भास होऊं लागला; असें प्रतिपादन करण्याचा ह्या आदिकवीचा मुख्य कटाक्ष आहे.

मुकुन्दराज म्हणतो,

जें ब्रह्म सगुण । तोचि परमात्मा जाण ॥
परम पुरुष ऐसी खूण । तेथेंचि बोलिजे ॥ ९५१ ॥
अहो समस्त मायेतें । सगुण ब्रह्म चेष्टवितें ॥
म्हणूनी सर्वेश्वर आणिकातें । म्हणूंचि नये ॥१६६॥
जें सर्वेश्वरें आधिष्ठित । त्रिविध अहंकारा प्रसवत ॥
माया गुणी चेष्टित । प्रकटली ॥ .७० ॥
(विवेकसिन्धु. पू. प्र. ३).

विवेकसिन्धु हा आध्यात्मिक ग्रंथ, जयन्तपाळाला उपदेश करण्यासाठींच रचला होता, असें अन्तर्गत प्रमाणावरून चांगलें व्यक्त होतें. कारण मुकुन्दराज म्हणतात,

नृसिंहाचा बल्लाळ ॥ त्याचा कुमर जयन्तपाळ ॥
तेणें करविला गदारोळ ॥ ग्रंथरचनेचा ॥ ५५ ॥

(विवेकसिन्धु. पूर्वार्ध. प्रकरण ७ वें).

मूलस्तंभांत बहुतेक शिवस्तुतीच असून, क्वचित् अध्यात्मविवेचन देखील आहे.

पौरस्त्य व पाश्चात्य तत्वविचाराची तुलना.

ह्यावरून, पारमार्थिक विचारांत आणि तत्वविषयक प्रतिपादनात, आम्हां भारतीयांचा हात खंडाच होय, असें कोणासही वाटल्यावाचून राहणार नाहीं.

पाश्चात्य देशांत, तत्वज्ञानाच्या संबंधानें ग्रीसदेश मोठा नांवाजलेला असून, त्याला या कामांत सर्व पाश्चात्यराष्ट्रें केवळ अग्रेसर व शिरोमणीच मानतात. परंतु, आमच्या परम कोटीप्रत गेलेल्या तत्वविचारांपुढें, त्याचें देखील तेज तिळमात्रही पडेनासें होऊन, तें सूर्यासमोरील काजव्याप्रमाणेंच म्लानवत् भासं लागतें. तसेंच, कालान्तरानें, हीच गोष्ट कित्येक पाश्चात्य विद्वानाच्यां देखील प्रत्ययास येते;

---

१ ह्या बाबतींत; सुप्रसिद्ध इतिहासकार एल्फिन्स्टन् म्हणतो,

"And iu the knowledge of the being and nature of God, they (the Hindus) were already in possession of a light, which was but faintly perceived, even by tho loftiest intellects iu the best days of Athens."

(History of India. P. P, 92-95).

आणि परस्परांतील प्रत्यक्ष तुलनेनें तर, खरें मापच त्यांच्या पदरांत पडतें. त्यामुळें, केवळ निरुपाय होऊन, पारमार्थिक विचारांसंबंधानें आम्हां भारतीयांचें परंपरेनें चालत आलेलें वर्चस्व, पाश्चात्यांस अगदीं निमुटपणें कबूल केल्याशिवाय, गत्यन्तरच नाहिसें होतें.

मुकुन्दकवीची भाषा.

असो. मुकुन्दराजकवीची भाषा सुबोध असून, अगदीं सरळ दिसते. इतकेंच नव्हे तर, हातीं धरलेला विषय दुसऱ्याच्या मनांत योग्य रीतीनें भरवून देण्याची हातोटी देखील त्याला चांगली साधली होती, असें वाटतें. त्याची वाणी खचितच पोरकट नाहीं. तथापि, ती रसाळ, मधुर, मनोहर, किंवा अलंकृतही नाहीं; आणि ती तशी नीटनेटकी करून सजविण्याचाही त्यानें प्रयत्न केल्याचें कोठें दिसत नाहीं. परंतु, अशा स्थितींत देखील, त्याच्या अध्यात्मविचारांत विशेष कल्पकता असल्याचें भासमान होतें; व त्यानें उच्छिष्ट सेवन म्हणून कोणाचेंच केलेलें नव्हतें, एवढें उत्तम प्रकारें दिसून येतें.

ह्याच्या कालांत, मुसलमान लोकांच्या स्वाऱ्यांचा धुडकूस महाराष्ट्रांत येऊन अजूनपर्यंत थडकला नव्हता. त्यामुळें मराठी भाषेंत फारशी, आरबी, इत्यादि पारदेशिक शब्दांचा भरणा झालेला दिसत नाहीं.

अन्य कवींचा अभाव.

मराठी भाषेच्या बाल्यावस्थेंतील प्रथमकालांतलाच मुकुन्दराज कवी होय. हा काल इ० स० ९०० पासून तों इ० स० १००० पर्यंत, सुमारें शंभर वर्षांचा होता; व त्यांत नामाजण्यासारखा

असा मुकुन्दराज हा एकच कवि होऊन गेला. इतक्या दीर्घ अवधींत, अन्य कोणीही कवि निपजला नव्हता; यावरून तो काळ आमच्या महाराष्ट्र कवींच्या उत्पत्तीस अनुकूल नव्हता, असेंच म्हणावें लागतें.

तत्संबंधीं भ्रामक कल्पना.

कदाचित्, यावनी परचक्राच्या धामधुमीमुळें हें कविदुर्भिक्ष ओढवलें असावें, अशी कोणाची कल्पना होण्याचा संभव आहे. परंतु, ती केवळ निराधार होय, असें अनेक प्रमाणांनीं दाखवितां येईल. कारण कीं, मराठी भाषेच्या युवावस्थेंतील प्रथम व द्वितीय कालांत, मुसलमानांची स्वारी खुद्द दक्षिणेंतच येऊन थडकली असतांही, ज्ञानेश्वर, नामदेव, इत्यादि अनेक कविरत्नें चमकलीं. इतकेंच नव्हें तर, यवनांच्या दीन् दीन् शब्दांनीं दक्षिणेंतील वातावरण एकसारखें क्षुब्ध होऊन, दुमदुमून राहिलें असतांही, मुक्ताबाई व जनाबाई सारखीं स्त्रीकविरत्नें उदयास आलीं. फार तर काय[१] सांगावें, पण, इसवी सनाच्या सतराव्या आणि अठराव्या शतकांत, अखिल भरतखंडभर, व त्यांत सुद्धां विशेषेंकरून सर्व महाराष्ट्र देशांत, एकसारखी यावनी धामधूम, राजकीय चळवळ, आणि सदैव लढाई चालू असतांही, ह्या देशांत नांवाजण्यासारख्या अनेक कवींचा जणूकाय पूरच लोटला होता, असें ऐतिहासिक प्रमाणांवरूनही चांगलें निदर्शनास येतें.

१ कबीर, सूरदास, मिराबाई, तुळशीदास, नाभाजी, वगैरे उत्तर हिंदुस्थानांतील कवी; नरसी मेहेता, तुळशी, शिवदास,

(पुढें चालू)

तिचें निरसन.

ह्यावरून, कवि, ग्रंथकार, धीमान, महात्मे, वीरपुरुष, रसिकजन, इत्यादि निपजण्याला एकच कारण पुरेसें होत नसून, त्याला अनेक कारणांचा संयोग लागतो. परंतु, ह्या सर्वांचें यथार्थ अवबोधन व खरें ज्ञान आपल्याला केव्हांही नसतें. यामुळें, देशांतील शान्ति हेंच त्याचें मूळ कारण आहे, अशी कोणाचीही सहजीं कल्पना होते. तथापि, केवळ तिच्यावरच सर्व कांहीं अवलंबून नसतें. इतकेंच नव्हें, तर कित्येक प्रतिकूल गोष्टींचा त्यासमवेतच जो प्रादुर्भाव होत असतो, तो तर बिलकुल आपल्या लक्षांत सुद्धां येत नाहीं. त्यामुळें, आपण हवी ती, व पाहिजेल त्या प्रकारें, कल्पना करतों; आणि आपल्या क्षुद्र मानवी दृष्टीला देखील आपण त्याचप्रमाणें भासवितों. परंतु, खरें कारण अगदींच निराळें असतें, व त्याचा आपल्याला थांग सुद्धां लागत नाहीं.

तत्संबंधीं दाखला.

कवनस्फूर्ति ही कांहीं विलक्षण व अलौकिक शक्ति असून, तिचा उद्भव ज्या कारणांनीं होतो, ती निःसंशय कल्प-

---

(मागील पृष्ठावरून पुढें चालू.)

प्रेमानन्द, विनयविजय, उद्यरत्न, अखोभक्त, शामळभट, इत्यादि गुजराथ प्रांतांतले कवि; ज्ञानदेवापासून तों मोरोपंतापर्यंतचे महाराष्ट्रांतले कवी; आणि आलसानी पेद्दन्ना, कृष्ण रावळू, मोहनांगी, मुकु तिमण्णा, तेनाल रामलिंग, वेंकट पतिराजा, कावेली वेंकट बोरय्या, इत्यादि दक्षिण हिंदुस्थानांतले म्हणजे द्रविड व तैलंगण देशांतले कवी; हे सर्व धामधूमीच्या वेळचेच होत.

नातीत आणि मानुषी ज्ञानाच्या आटोक्याबाहेरचीं आहेत. त्यामुळें, राष्ट्राचा काव्यौघ कोणत्याही धामधूमीनें अगर परचक्रानें बंद होत नाहीं; किंवा शांततेनें तो उद्भवतही नाहीं; असेंच म्हणावें लागतें.

ह्याचें प्रत्यक्ष व आजकालचें अगदीं ताजें उदाहरणच मी वाचकांपुढे ठेवितों. म्हणजे त्यावरून, त्यांची आपोआप खात्री होईल, व आम्ही म्हणतों त्याची सत्यताही त्यांस पूर्णत्वानें भासेल.

प्राचीन.

गेल्या सतराव्या शतकाच्या पूर्वार्धांत, तुकारामाच्या वेळीं, लोहगांवाला परचक्राचा वेढा पडला; आणि कविमजकूर यवनांच्या तडाक्यांत सर्व गांवाबरोबरच सांपडला. परंतु, अशा प्रसंगीं, अतोनात भडकलेल्या तप्त कुंडाच्या कृष्ण धूम्रानें, त्याची तत्कालीन कवनदीप्ति यत्किंचित देखील दूषित न होतां, मलीनही झाली नाहीं; अथवा, त्याच्या असह्य ज्वालाग्नीनें, ह्या कविवरमालिकेचा अपूर्व काव्यनिर्झर समूळ आटून, कोरडाही पडला नाहीं. इतकेंच नव्हें तर, तो दिवसानुदिवस अधिकाधिक जोरावत जाऊन फोंफावत चालला; व त्यानें त्याला कीर्तिशिखराच्या अगदीं अग्रस्थानींच बसविलें.

लोहगांवच्या वेढ्यानें अखिल जनास फार दुर्घट आणि अति दारुण कष्ट सोसावे लागले. त्यामुळें, त्यांची ती दीनावस्था पाहून, आमच्या ह्या प्रेमळ कवीनें केवळ अश्रूच ढाळले. त्यावेळीं, ह्या दुःसह देखाव्याचें हृदयद्रावक

वर्णन तुकारामानें स्वतःच केलेलें आहे. सबब, आम्ही तें येथें थोडक्यांत देतों:—

५५७

न देखवे डोळां ऐसा हा आकान्त ।
परपीडें चित्त दुःखी होतें ॥ १ ॥
काय तुम्ही येथें नसालसें जालें ॥
आम्ही न देखिलें पाहिजे हें ॥ छ ॥
परचक्र कोठें हरिदासांच्या वासें ॥
न देखिजेत देशें राहातीया ॥ २ ॥
तुका ह्मणे माझी लाजविली सेवा ॥
हीनपणें देवा जिणें जालें ॥ ३ ॥

* * ५५८ * *

उच्छेद तो असे हागे आरंभला ॥
रोकडें विठ्ठला परचक्र ॥ छ ॥

* * ५५९ * *

भीत नाहीं आतां आपुल्या मरणा ॥
दुःखी होतां जना न देखवें ॥ १ ॥

* * * *

भजनीं विक्षेप तेंचि पैं मरण ॥
नवजावा क्षण एक वांया ॥ २ ॥

याप्रमाणें, म्लेच्छांच्या दीन् दीन् शब्दांत व परचक्राच्या कोलाहलांत, जी सहज स्फूर्ति इतस्ततः चमकत होती, व

अर्वाचीन.

जो महाराष्ट्र काव्यौघ जणूंकाय आकाशांतल्या मेघांप्रमाणेंच सर्वत्र एकसारखा वर्षाव करीत होता; तोच सांप्रतकाळीं धामधूम नसून सुद्धां, साफ आटून अगदीं कोरडा पडला आहे. आणि सबंध एकोणिसाव्या शतकांतल्या आंग्लशान्ततेंत तर, आमच्या महाराष्ट्र देशांत, ज्ञानदेव, नामदेव, एकनाथ, मुक्तेश्वर, तुकाराम, रामदास, मोरोपंत, इत्यादींच्या तोडीचा एकसुद्धां कवि निपजला नाहीं. इतकेंच नव्हें तर, नुसतें कवि हें नांव शोभण्यासारखें देखील एकही रत्न उदयास आलें नाहीं!! ह्याचें कारण काय?

मुकुन्दराजाच्या कृती, व त्यांचा अध्यात्म विषय.

असो. मुकुन्दराजाचे तिन्ही ग्रंथ पद्यात्मक असून, त्या तिहींतही पारमार्थिक विषयाचेंच विवेचन आहे. किंबहुना, मराठी भाषेच्या बाल्यावस्थेंतील यच्चावत् कवींच्या कृती पद्यात्मकच आहेत, असें म्हटलें असतां कोणताही बाध बिलकुल येणार नाहीं. इतकेंच नव्हें तर, ह्या सर्व कवींचा आवडता विषय म्हटला म्हणजे निव्वळ परमार्थच असून, त्या व्यतिरिक्त, शास्त्र व कला, इतिहास आणि भूगोल, चरित्र व कल्पितकथा, व्यवहार आणि शिक्षण, विद्या व उन्नति, यांपैकीं एकही विषय कोणीच हातीं घेतला नव्हता, अथवा कोणी त्याला शिवलें सुद्धां नव्हतें, असेंच म्हणावें लागतें. तेव्हां, ह्याचें कारण काय, हें अवश्य समजलें पाहिजे.

त्याचें कारण.

आतां, ह्या संबंधानें कोणी कदाचित् अशी आशंका घेईल कीं, सदरहू महत्वाचे अन्य विषय आमच्या भारतीय पिंडांत पूर्वीं

कधीं खिळलेलेच नसल्यामुळें, ते भरतखंडांत केव्हांही उदयास पावले नव्हते; किंवा, ते आमच्या भारतीय राष्ट्रास प्राचीनकाळीं बिलकुल माहीतच नव्हते. आणि जर असें होतें तर, मराठी भाषेच्या बाल्यावस्थेंत, त्यांचा उदभव प्रथमतःच तो कसा होणार? अगर, त्यांजवर ग्रंथ लिहिण्यास नानाविध साधनांची सामग्री ती कोठून मिळणार? अर्थात नाहीं, अशी कोणीही कल्पना करील. परंतु, ही कल्पना अगदींच शुष्क व निरर्थक आहे; व ह्मणूनच तिचें निरसन कोणालाही तेव्हांच करतां येईल, हें उघड आहे.

कारण, आमच्या **संस्कृत ग्रंथोदधींत** सदरीं निर्दिष्ट केलेल्या सर्व प्रकारचे[1] ग्रंथ पूर्वींच निर्माण झालेले आहेत. आणि **मराठी** पारमार्थिक ग्रंथांत देखील जर **संस्कृत निर्झरा**चेंच प्रतिबिंब पर्यायानें उठलेलें दिसतें; व त्याकडे पाहिल्याशिवाय आदिकवींना गत्यंतरच नव्हतें असें वाटतें; तर अन्यविषयासाठीं ह्या मूळ, विशाळ, आणि सुसंपन्नखाणीचें साहाय्य घेण्याला आमचे पुराण **महाराष्ट्र** कविजन कां प्रवृत्त झालें नव्हते, हें खचितच ध्यानांत येत नाहीं. अर्थात्, जी वस्तुस्थिति आहे, ती झांकून ठेविलेली नसून, ती आपणाला प्रत्यक्षच दृग्गोचर होत आहे. सबब, ह्याच कार्यावरून, कारणाचा शोध लावण्याचा आपण यथामति प्रयत्न करूं, व त्यापासून काय निष्पन्न होतें, तें पाहूं.

---

१ आह्मां आर्यांची अनेक विषयपारंगता सर्वांस महशूरच आहे. मात्र, इतिहास व भूगोलविषयक ग्रंथ आधुनिक शास्त्रीय पद्धतीस अनुसरून लिहिलेले नाहींत, ही गोष्ट कबूल केली पाहिजे. तथापि त्यांचीं बीजें सर्वत्र पसरलेलीं आहेत, यांत संशय नाहीं. **भारतीय साम्राज्य.** पुस्तक ३।४ पहा.

आमच्या मनोधर्माचें पृथक्करण करून, त्यांत कोणते घटकावयव आहेत हें पाहिलें; अथवा आमच्या पिंडांत कोणत्या प्रकारच्या वृत्ती अगदीं खिळून राहिल्या आहेत याचें निरीक्षण केलें, तर त्यांत स्वधर्माभिरुचि, भक्तिरस, पारमार्थिक विचाराचें प्रेम, आणि उत्पत्ति-स्थिति-लयाची जिज्ञासा, यांचेंच गुणाधिक्य दिसून आल्याशिवाय खचितच राहणार नाहीं. आणि ह्याच कारणानें, जेव्हां जेव्हां म्हणून आम्ही विचार करण्यास प्रारंभ केला, तेव्हां तेव्हां, धर्म, परमार्थ, व तत्त्व-विचार, यांविषयींच आम्ही प्रथम लिहिलें; आणि अजून देखील आमचा तोच क्रम सुरू आहे.

त्याचें पृथक्करण.

ह्या गोष्टींची सत्यता, आमच्या ग्रंथोदधीवरूनच कोणालाही तेव्हांच भासमान होणारी आहे. कारण, ऋगवेद हे आमचे प्राचीनतम वाङ्मय असून, त्यांतलि आमचे प्रथमोद्गार म्हटले म्हणजे अग्नि, इन्द्र, मरुत्, इत्यादि देवतांची स्तुतिच होय. ह्याच स्तोत्रांस कालान्तरानें प्रागल्भ्य येऊन, त्या योगानें उपनिषदें निर्माण झालीं; आणि त्यानंतरच शास्त्र व कलासमुदाय उदयास आला. प्राकृत भाषेची हकीकत सुद्धां अशाच मासल्याची असून, ह्या भाषेचा पहिला उपयोग बौद्धधर्म प्रसारार्थच झाला होता, असें बुद्धाच्या उक्तींवरून, आणि अशोकाच्या शिलालेखांवरून स्पष्टच दिसतें.

त्याची सत्यता, व प्राचीन प्रमाण

आमच्या मराठी भाषेचें देखील याचप्रमाणें झालें अस-

तीच मराठी भाषेंत दृग्गोचर होत असलेली परंपरा.

त्याचें चांगलें व्यक्त होतें. अर्थात्, महाराष्ट्रांतील आदिकवींनीं ह्या मराठी वाङ्मयावर अनेक अलंकार चढविण्याचें ज्या वेळीं मनांत आणिलें, त्यावेळीं शास्त्रीय विषयांवर लिहिण्याचें त्यांच्या अंगीं सामर्थ्य नव्हतें असें नाहीं. अथवा, त्या त्या विषयासंबंधीं विवेचन पूर्वीं कधींही झालें नव्हतें, म्हणून ती दिशाच त्यांनीं सोडून दिली होती, असेंही नव्हें. किंवा, त्या बाबतींत मार्ग दाखविण्यासाठीं, आमच्या ह्या विस्तीर्ण भरतखंडांत, किंवा त्या अपूर्व संस्कृतोदधींत, एकसुद्धां ग्रंथ नसल्याकारणानेंच आमच्या रसिक महाराष्ट्र कविजनांस नानाविध विषयांवर लिहिण्याची स्फूर्तिच झाली नव्हती, असेंही म्हणतां येणार नाहीं. तर, ह्या बाबतींत, आजपर्यंत चालत आलेली जी आमची परंपरा; तसेंच, प्रथमारंभीं धार्मिक विषयच हातीं घेऊन, परमार्थ प्रतिपादन करण्याचा जो आमचा संप्रदाय; आणि तत्संबंधानें, अनादिकालापासून आमच्या पिंडांत खिळलेली जी आमची ईश्वरपरायण मनोवृत्ति; त्या सर्वांचा परिणाम व सुसंस्कार आमच्या महाराष्ट्र कविमंडलांवर होऊन, त्यामुळेंच पारमार्थिक विषय त्यांनीं अगोदर हातीं धरिला, असें मानण्यास बलवत्तर कारण मिळतें.

ह्या गोष्टीचें अगदीं सांप्रतकाळचें, व निःसंशय ताजें आणि

तद्विषयक अर्वाचीन व चालत्या पिढींतले प्रामाण्य.

नूतन उदाहरण, ह्याच प्रसंगीं दिल्याशिवाय, माझ्याच्यानें राहवत नाहीं. सबब, तेंही येथें थोडक्यांत

नमुद करतों. आमच्या भरतखंडांतील आधुनिक ग्रंथांत, किंवा संस्कृतेतर पुस्तकांत, अथवा शास्त्रसंबंधीं लेखांत, कोणत्याही विषयाला आरंभ करण्यापूर्वी, परमेश्वरस्तवन करण्याची प्राचीनतम काळापासून चालत आलेली पद्धत, बहुतेक बंद झाल्यासारखीच दिसते. किंबहुना, ती अजिबात नाहींशीच झाली आहे, असें सुद्धां ह्मणण्यास कांहीं हरकत नाहीं. शिवाय, मराठी ग्रंथांतच जर ह्या मंगलाचरणाला समूळ फांटा मिळाला आहे, तर आम्ही भारतीयांनीं लिहिलेल्या आंग्ल भाषेंतील ग्रंथांत, किंवा लेखांत, अथवा व्याख्यानांत, त्याचा नुसता गंध देखील मिळावयाचा नाहीं, हें उघड आहे. परंतु, आमच्या आर्यपिंडांत व हिंदुबीजांतच अध्यात्मविचार, धार्मिक प्रेरणा, आणि परमेशसेवाहीं अतोनात खिळून गेल्यामुळें, त्यांचा इतका कांहीं एकजीव झाला आहे कीं, त्यांचा प्रादुर्भाव केव्हां ना केव्हां तरी झाल्याखेरीज, खचितच राहत नाहीं.

इ० स० १८८५ सालीं, भट्ट भांडारकर यांनीं, विल्सन्च्या भाषाशास्त्रविषयक व्याख्यानमालेंत, पहिलेंच व्याख्यान दिलें. त्यावेळीं, सर्व व्याख्यान इंग्रजींत झालें असूनही,

"नमः मरमात्मने."

अशा मंगलाचरणानेंच प्रथम प्रारंभ करून, त्यांनीं तें व्या-

---

१ ह्या व्याख्यानाचा विषय खालीं लिहिल्याप्रमाणें होताः—

१ भाषेची परिपक्वता, आणि संस्कृताचा विकास.

२ पालि व तत्कालीन इतर प्राकृत भाषा.

३. संस्कृत, पालि, प्राकृत, आणि सांप्रतच्या व्यावहारिक भाषा, यांचा संबंध.

ख्यान सुरूं केलें. यावरून, अध्यात्म विषय हाच आमच्या धार्मिक मनोवृत्तीचा पहिला थर व बाळकडु होय, ही गोष्ट कोणाच्याही लक्ष्यांत तेंव्हांच येईल.

त्या परंपरेंत कालान्तरानें झालेला बदल.

तथापि, ह्या समवेतच आपल्याला आणखी देखील एक महत्वाची गोष्ट लक्षांत ठेविली पाहिजे. ती ही कीं, आमच्या या पुढील कविगणांच्या व ग्रंथकारांच्या मनोवृत्तींत, कालान्तरानें जसजसा बदल होत गेला, तसतसा विषयवैचित्र्याचा शिरकाव आपोआपच होऊन, त्यांच्या कृती विशेष चटकदार, ज्यास्त रसभरित, अधिक रमणीय, आणि अनेक गुणालंकृत झाल्या, यांत तिळमात्रही संदेह नाहीं.

आमच्या आदिकवीनें आमच्या देशावर, राष्ट्रावर, व भाषेवर केलेला उपकार.

याप्रमाणें, आमच्या आदिकवीनें आध्यात्मिक विषयाचें कोणत्या कारणानें अवलंबन केलें, याबद्दलचा खरा तपास लागल्यामुळें, आतां परमार्थाची निःसीम अभिरुचि, व मुमुक्षुत्वाची अपूर्व गोडी, यांचा आमच्या देशावर, आमच्या राष्ट्रावर, आणि विशेषतः आमच्या मराठी भाषेवर, कसा व कितपत परिणाम घडून आला, याविषयीं पुढील भागांत विचार करूं.

---

१ " नमः परमात्मने. "

" The occassion that brings us here to-gether is the first of its kind, in the history of this University. "इत्यादि. इत्यादि.

(R. A. Society. Bombay Branch. vol. XVI. P. 245. 1885.)

भाग ७७ वा.

मराठी भाषेची बाल्यावस्था
व
प्रथमकालाचें सिंहावलोकन.

जयन्तपाळाला नश्वर विषय तुच्छ वाटून, केवळ अविनाश वस्तु प्राप्त होण्यासाठींच, त्यानें आपलें आयुष्य घालविण्याचा निश्चय केला. पुढें, कालान्तरानें, मुकुंदरायासारखें अत्युत्तम सद्गुरुरत्न त्याला लाधलें, आणि त्या योगानेंच त्याची मनीषा पूर्ण झाली. परंतु, तन्निमित्त, मुकुन्दराजानें विवेकसिंधु नावाचा नामांकित ग्रंथ तयार केला; व तन्निसृत पीयूषपानानेंच जयन्ताचें काम झालें; याविषयींचें दिग्दर्शन आम्ही मागील भागांत केलें.

त्याचें पूर्वस्वरूप धर्मबीजारोपण.

तथापि, ह्या अपूर्व कृतीनें, केवळ जयन्तपाळासारख्या एकाच व्यक्तीवर परिणाम घडून आला, असें नाहीं. तर, त्याचें महत्कार्य सर्व व्यक्तींवर झालें; त्याचा इष्टप्रभाव अखिल राष्ट्रावर घडून आला; आणि त्याच्या अमोघ सिद्धीचें पूर्व स्वरूप अखिल महाराष्ट्र देशावर चमकूं लागलें. जणूंकाय,

प्रसादाचिन्हानि पुरः फलानि ॥ २२ ॥

(रघुवंश. सर्ग दुसरा.)

ह्या सुप्रसिद्ध-कालिदासोक्तीची सत्यता अनुभवास आणण्यासाठींच, मुकुन्दराज अवतरले; अथवा, महाराष्ट्र शब्दाची पुनश्च सार्थकता करण्याच्या हेतूनेंच, त्यानें विवेकसिन्धु निर्माण केला; किंवा, सर्व हिंदूंचा अखिल भरतखंडभर दिग्विजय करण्याकरतांच, त्यानें परमामृत रचलें; अगर ब्राह्मणाच्या तेजानें, सकलभूमंडल दिपवून टाकण्यासाठींच त्यानें हें आध्यात्मिक ब्रह्मास्त्र सोडिलें; असें कोणाही सुविचारी मनुष्याच्या ध्यानांत आल्यावांचून खचितच राहणार नाहीं.

सकल उन्नतीचें मूळबीज, व यच्चावत् अभ्युदयाचें अधिष्ठान, केवळ धर्मच होय. अर्थात्, धर्मामुळेंच आपला अन्तरात्मा शुद्ध होतो. त्या योगानेंच एकंदर राष्ट्राची नीति वाढते. त्यामुळेंच धैर्य आणि बळ, हीं उदयास येतात. तेणेंकरूनच साहस व श्रमसातत्यास अवकाश मिळतो. आणि त्याच कारणानें, प्रच्छन्नावस्थेंत असलेल्या सर्व गुणांचा आविर्भाव होऊन, ते वृध्दीप्रत पावतात.

जयन्तपाळाला परमार्थाची मोठी चटक लागली, व त्याचा राजावर, तत्प्राप्त्यर्थ त्यानें अगदीं अकाण्डताण्डव केलें. अशावेळीं, जणूंकाय त्याच्या भाग्योदयानेंच त्याला मुकुन्दरायासारखा कृपानिधि भेटला. त्यामुळें, ह्याला त्याची करुणा येऊन, त्यानें विवेकसिन्धु नांवाचा ग्रंथ रचला, आणि तो राजास देऊन, त्यानें त्याचें चांगलें परिशीलन करावयास सांगितलें.

त्याच्याही पूर्वींच, परमामृत ग्रंथ तयार झालेला असावा. परंतु, तो जरा संक्षिप्त असल्याकारणानें, राजाला पंचीकरणाचें व अन्य विषयांचें यथार्थ अवबोधन होण्यासाठीं, मुकुन्दरायानें विवेकसिन्धु लिहिला, आणि त्यांत त्यानें सर्व गोष्टींचें तपशिलवार विवेचनही केलें. पुढें, ही कृती तयार झाल्यावर, त्यानें ती व परमामृत असे दोन्ही ग्रंथ राजाच्या स्वाधीन केले, आणि ते त्यास समजावून सांगितलें. त्यानन्तर, राजानें त्या दोन्ही ग्रंथांचें अनेक वेळा पारायण केलें; इतकेंच नव्हें तर, परमामृतांत लिहिल्याप्रमाणें, त्यानें मुक्तिरहस्याचा प्रत्यक्ष अनुभव देखील घेतला; ही गोष्ट खचितच ध्यानांत ठेवण्यासारखी आहे.

प्रजेवर, व देशावर परिणाम.

अशाप्रकारें, हे दोन्ही ग्रंथ राजाश्रयास पात्र झाल्या कारणानें, त्याच्या प्रजेस मुद्धां त्याची विलक्षण अभिरुचि लागून, त्याचीं मूलतत्त्वें त्यांच्या हृत्कमलांत जणूं काय बाणूनच गेलीं. त्यायोगानें, बराच कालपर्यंत ओसाड राहिलेल्या ह्या महाराष्ट्र भूमींतील खळमळ, दगडगोटा, केरकचरा, इत्यादि नष्ट होऊन, तिचें विस्तीर्ण क्षेत्र बीजारोपणास पात्र झालें; व तींत पडलेला हा मुकुन्दरायाचा आध्यात्मिक प्रसाद केवळ खतरूपीच बनला. फारतर काय सांगावें, पण, " **राजाकालस्य कारणम् ।** " या न्यायानें, तींत कालान्तरानें नानाप्रकारच्या, भिन्नभिन्न जातींच्या, आणि निःसंशय जगद्वंद्य अशा, उदण्ड संत वृक्षांची अभिवृध्दि झाली. त्यामुळेंच त्याची अपूर्व व मधुर फळें

प्राणिमात्रासही चाखावयास मिळाली. तेणेंकरूनच, ही पुराण-भरतभूमि आणि प्राचीनतम हिंदुराष्ट्र पुनश्च नांवारूपास आलें. त्याच कारणानें, आमच्या सनातन हिंदुधर्मास पूर्ण भरती लागली. त्यामुळेंच, उन्मत्त झालेल्या शिखानष्टांची खोड मोडली. इतकेंच नव्हे तर, ह्या मातलेल्या अविधांची लाट एकसारखी आणि जोरानें, अखिल भरतखंडभर उसळली असतांही, तिला हिंन्दूनीं पालथें घालून जेथल्या तेथेंच जिरविलें, आणि ते तिच्यावर सानन्द व दिग्विजयानें हर्षयुक्त होत्साते यथेष्ट नाचले. त्या योगानेंच आमचे बाहू स्फुरण पावले. तेणेंकरूनच आम्हीं पुनश्च स्वराज्य व साम्राज्य मिळविलें. आणि त्याचकरणानें, आम्ही आपला दरारा कांहीं कालपर्यंत अखिल भरतखंडभर, सर्व

---

१ ही गोष्ट पाश्चात्यांस देखील कबूल करावी लागते. डेव्हिड सिंक्लेर आपल्या हिंदुस्थानच्या इतिहासांत असें म्हणतो कीं,

"Balaji Bajirao was now Soveriegn in reality. (During his reign), the Maratha power attained its greatest limits, and received its most crushing blow." (P. P. 101-102.).

एल्फिन्स्टन लिहितो.

"The celebrity of the Marathas was reserved for recent times, when they were destined to act a greater part than all other Hindu Nations, and to make a nearer approach to universal sovereignty than any of those to whom modern writers have ascribed the enjoyment of the empire of India."

(History of India. vol. I. P. 433.)

मुसलमानांवर,[1] यच्चावत् यवनांवर, व मी मी ह्मणवि-णाऱ्या सकल पाश्चात्य किरिस्ताबी राष्ट्रांवरही बसविला. फार तर काय सांगावें, पण, कित्येक प्रसंगीं हींच पाश्चात्य राष्ट्रें आमच्या भीतीनें थरथरा कांपू देखील लागलीं; आणि आमच्या वीरश्रीनें चकित होऊन, केवल तटस्थ बसलीं. ही सर्व हकीगत इतिहासज्ञांस सुविश्रुत असून, तीच पुढील निरूपणावरून सुद्धां वाचकांच्या लक्षांत सहजीं येईल.

---

१ कारण आम्ही दिल्लीच्या बादशहाकडून देखील खंडणी घेतली होती. डेव्हिड म्हणतो,

"And over the whole of the imperial territory chouth had been promised by Mahamad Shah."

(P. P. 98-101-102. मागील पान ४८–४९ पहा.)

२ हें ह्मणणें कदाचित् कोणास अतिशयोक्तीचें दिसेल, व स्वभाग्योदयासंबंधीं निव्वळ गर्वोक्तीचें, आणि निष्कारण फुशारकीचेंही वाटेल सबब, आमच्या ह्या पदस्या दर्शेत, सोनारानेंच कान टोंचलेला बरा, असें समजून, पाश्चात्य पंडिताचा व आंग्लाभिमान्याचाच हतवीर्य लेख आणि प्रत्यक्ष कबूल जबाब, मी वाचकापुढें ठेवतों. म्हणजे, त्यावरून, आमच्या लिहिण्याची सत्यता त्यांस भासमान होईल. आमच्या दराऱ्यासंबंधानें लॉर्ड मेकॉले म्हणतो,

"Even the European factors *trembled* for their Magazine, and the name of the Maráthà Ditch *still preserves the memory of the danger.*"

(Lord Clive. By Mecaulay),

सदरहू अवतरणांतील इतालिक वर्ण आमचे आहेत. (ग्रंथकर्ता.)

भाग ७८ वा.

मराठी भाषेची बाल्यावस्था.

द्वितीय काल.

इ० स० १००१-१२७०.

बाल्यावस्थेच्या द्वितीय कालांतील ग्रंथसंपत्तीचा अभाव.

ह्या कालांत, मराठी भाषेवर अलंकार चढविणारा रसिक कविजन कोणी देखील निपजला नव्हता, असेंच ह्मणावें लागतें. निदान, नावाजण्यासारखें एकादें कविरत्न सुद्धां यावेळीं उदयास आलें नव्हतें, इतकें तरी कबूल करणें खचितच भाग पडतें. आतां, कदाचित्, कोणी क्षुद्र कवि एकाद्या कोनाकोपऱ्यांत जन्मला असेल. परंतु, त्याचा प्रकाश क्षितिजावर न पडल्यामुळें, तो आला तसाच लयास गेला, यांत संशय नाहीं.

मराठी भाषेवरील जाधव राजांचें प्रेम.

तथापि, अशा स्थितींत देखील, ह्या महाराष्ट्राचे अधिपति हे जाधव राजेच असल्यामुळें, त्यांचें मराठी भाषेवर चांगलें प्रेम असल्याचें दिसतें, व ती गोष्ट अनेक बलवत्तर प्रमाणांनीं सिद्धही होते. कारण, एकतर त्यांची स्वतःची भाषा मराठीच असल्यामुळें, त्यांचा एकंदर व्यवहार, आणि हर तऱ्हेचें दळणवळण, तिच्यांतच चाले. दुसरें असें कीं, राजकीय व दरबारची भाषासुद्धां

हीच असल्यामुळें, सामाजिक प्रश्नाची वाटाघाट हिच्यातच होई. धार्मिक विचाराचा ऊहापोह हिच्यांतच करण्यांत येई. नीतिविषयक विवेचन हींतच चाले. आणि दरोबस्त राजकारण, महत्वाचा पत्रव्यवहार, व परराष्ट्राकडील सल्ला-मसलत, इत्यादि सर्व मराठी भाषेच्या द्वारेंच होई. त्या योगानें, मराठी भाषेचा जोम कमी न होतां, तो जशाचा तसाच आणि कायम राहिला.

त्यामुळें तिचा ऱ्हास न होतां राहिलेली स्थिरता.

ह्या स्थिरतेच्या योगानें देखील, मराठी भाषेवर एक प्रकारचा उपकारच झाला, असें म्हणावें लागतें. कारण, सुमारें पावणे तीनशें वर्षांच्या दीर्घ अवधींत, मराठी वाङ्मयाचें पाऊल यत्किंत् देखील पुढें न पडतां जर कायमही राहिलें नसतें, तर तिची सर्वतोपरी पीछेहाट होऊन, कालान्तरानें तिचा खचितच ऱ्हास सुद्धां झाला असता. इतकेंच नव्हें तर, मुकुन्दराज कवीच्या वेळीं, जें तिचें स्वरूप दृष्टीस पडूं लागलें होतें, तें प्राप्त होण्याला लागणारा कालावधि, केवळ तिची पुनश्च प्रतिष्ठापना करण्यांतच अगदीं निष्कारण व फुकट गेला असता, यांत संशय नाहीं. अर्थात्, त्यामुळें मराठी भाषेच्या उन्नतावस्थेचा तेवढा काळ वाचून, तो सार्थकीं लागला; निदान, तो निरर्थक तरी खचित गेला नाहीं, असेंच म्हणणें प्राप्त येतें.

भाग ७९ वा.

मराठी भाषेची युवावस्था.

प्रथम काल.

इ० स० १२७१–१२९४.

मराठी भाषेची युवावस्था.

मागील भागांत मराठी भाषेच्या बाल्यावस्थेंत जो तिच्या स्वरूपाचा आविर्भाव दिसला, त्याबद्दलची अवश्य ती हकीकत आह्मी आपल्या अल्प समजुती-प्रमाणें वाचकापुढें ठेविली. सबब, आतां तिच्या युवावस्थे-कडे आपण क्षणभर वळूं; आणि तींत ह्या भाषेवर कोणी कोणी, किती किती, व कसे कसे अलंकार चढविले; कोणत्या कवींनीं तिचें विशेष परिशीलन केलें; तिची परिणति दिवसानुदिवस कशी होत गेली; आणि तिला प्रौढावस्था शनैः शनैः कशा प्रकारें येत चालली; या संबं-धाची तपशिलवार हकीकत देऊं.

आतां, विषयप्रतिपादनाच्या सोयीसाठीं, आपण ह्या मराठी भाषेच्या युवावस्थेचे १ प्रथमकाल, २ द्वितीयकाल, व ३ त्रितीयकाल, असे तीन विभाग कल्पूं, आणि त्या प्रत्येकाचें यथार्थ विवेचन करूं.

तिचा प्रथम काल; व ज्ञानदेव कवि.

ह्या कालांतला कविरत्नमुकुटमणि व संतशिरोभूषण ह्मटलें ह्मणजे ज्ञानदेवच होय. ह्यानें आपल्या विद्वत्तेनें, कवित्वानें, खऱ्या साधुत्वानें, आणि शमदमादि अलौकिक गुणांनीं, सर्व महाराष्ट्रास, किंबहुना अखिल भरतखंडासच दिपवून टाकिलें होतें, असें ह्मणण्यास हरकत नाहीं.

त्याचें पूर्ववृत्त.

ह्याच्या पित्याचें नांव विठ्ठलपंत व मातुःश्रीचें नांव रखमाबाई असून, ते आपेगांवचे राहणारे असत. ह्यांचें आडनांव महिपे किंवा ह्मैसे असल्याचें कळतें, व ते वृत्तिवंत ब्राह्मण असावें, असें वाटतें. विठ्ठलपंत हा फार विद्वान होता. तथापि, तो विरक्त असल्यानें त्याला ह्या संसारसुखाचा वीट आला, आणि तो काशीस जाऊन राहिला. तेथें ह्याची अलिप्त वृत्ति पाहून, एका सिद्धपुरुषानें त्याच्याच आग्रहावरून त्याला सन्यास दिला. परंतु, कालान्तरानें त्याला असें समजलें कीं, सन्याशी मजकूरला कुटुंब असून, पोटीं कांहींच संतान नसल्याकारणानें, ह्या अबलेची संसारसुखात्मक इच्छा अत्युत्कट कोटीप्रत पोहोंचून, ती भर्तृवियोगानें दिवसानुदिवस अगदीं क्षीण होत चालली आहे. ही गोष्ट ऐकतांच, त्यानें त्यास खरी हकीकत विचारली; व ती त्यानें कबूल केल्यावरून, सदरहू सिद्धपुरुषानें त्या संन्याशास असें सांगितलें कीं, "आपल्या स्त्रीच्या ऋणांतून

मुक्त झाल्याखेरीज, ह्या चतुर्थाश्रमाचा बिलकूल उपयोग नाहीं. यासाठीं, तूं पुनश्च गृहस्थाश्रमाचा स्वीकार कर, आणि आपल्या स्त्रीचे हेतू सिद्धीस ने."

हें सिद्ध पुरुषाचें वचन विठ्ठलपंतानें मान्य केलें, व तो पुनश्च गृहस्थाश्रमांत शिरला.

त्याचीं भावंडें.

त्यानन्तर, त्याला, १ निवृत्तिनाथ, २ ज्ञानदेव, ३ सोपानदेव, आणि ४ मुक्ताबाई, अशीं चार अपत्यें झालीं. ह्यांपैकी, पहिले तीन पुत्र असून, चौथी कन्या होती.

सदरहू चार भावंडांत, ज्ञानदेव हा दुसऱ्या शेजेचा होय. तथापि, गुणाधिक्यांत तोच श्रेष्ठतम असल्याकारणानें, त्याच्यापासूनच प्रारंभ करण्याचें आम्हीं योजिलें आहे.

ज्ञानदेवाचें जन्म शके ११९३ म्हणजे इ. स. १२७१ सालीं झालें; व कार्तिक वद्य १३ शके १२१९ (इ० स० १२९३) रोजीं आळंदी मुक्कामीं तो निजधामास गेला. ह्या वेळीं, त्याचें वय फक्त बावीस वर्षांचेंच होतें; यावरून त्याचा सर्व बाजार अगदीं अल्प काळांतच आटपला, ह्यांत शंका नाहीं.

त्याचा जन्म व समाधिकाल.

हा मोठा भगवद्भक्त होता. त्यामुळें, सद्गुरुभक्ति आणि परब्रह्मप्राप्ति, हेंच कायतें जीवितांचें खरें साफल्य होय, असे तो

त्याचे ग्रंथ.

१ ह्या सर्वांचें स्वतंत्र चरित्र, भारतीय साम्राज्याची "महाराष्ट्र कविरत्नें" या नांवाचें चौदावें पुष्प ह्या मालेंत गुंफिते वेळीं देण्याचा आमचा विचार आहे. (ग्रंथकर्ता).

मानी. ह्यानें केलेले कित्येक अभंग भक्तिवैराग्यानें थबथबलेले असून, ह्याची ओंवी[1] तर फारच रसाळ व प्रेमळ आहे. ह्याचे ग्रंथ मुख्यत्वेंकरून खालीं लिहिल्याप्रमाणें होत.

१. ज्ञानेश्वरी. हिलाच भावार्थ दीपिका असें देखील ह्मणतात.

२. अमृतानुभव.

३. स्वात्मानुभव.

४. पंचीकरण.

५. चांगदेव पांसष्टी. ह्या पांसष्ट ओंव्या चांगदेवाला उपदेश करण्यासाठीं त्यानें लिहिल्या होत्या.

६. समास.

७. योगवासिष्ठ.

८. हरिपाठ.

९. किरकोळ अभंग.

ह्या सर्वांत ज्ञानेश्वरी ही सर्व प्रकारें श्रेष्ठ मानली जाते.

ज्ञानेश्वरी.

कारण, हांत ज्ञानेश्वरानें जो विषय हातीं घेतला आहे, त्यांत त्याचा हातखंडाच असल्यामुळें, त्याचा चतुरस्रपणा, त्याचें नैपुण्य, त्याचें ज्ञान, आणि त्याचे गूढ विचार, इत्यादि

---

[1] ज्ञानदेवाची ओंवी, मयूराची आर्या, वामनाचा श्लोक, व तुकारामाचा अभंग, हे सर्वांस महशूर आहेत. एके ठिकाणीं असें म्हटलें आहे कीं,

सुश्लोक वामनाचा अभंग वाणी प्रसिद्ध तुकयाची ।
ओंवी ज्ञानेशाची, किंवा आर्या मयूर पंताची ॥

तेव्हांच व्यक्त होतात. शिवाय, विषयप्रतिपादन करण्याची त्याची पद्धति, तो समजाऊन सांगण्याची त्याची अपूर्व शैली, व तो अनेक तऱ्हेनें दुसऱ्याच्या मनांत ठसवून देण्याची त्याची रीति, हीं खरोखरच अलौकिक दिसतात. इतकेंच नव्हे तर, ह्याच्या ज्ञानभांडाराविषयींचें विलक्षण कुतूहल आपल्या मनांत एकदम जागृत होऊन, ह्या लोकोत्तर भट्टारक ब्राह्मण बटूनें, नानाविध विषयांची निरनिराळी माहिती, इतक्या अल्पवयात, कधीं, कोठून, आणि कशी मिळविली, याबद्दलचें निखालस आश्चर्य वाटतें. फार तर काय सांगावें, पण, त्या पुण्यश्लोकाबद्दलची आपली आदरबुद्धि देखील व्यक्त झाल्यावाचून खचितच राहत नाहीं.

तिच्यांतील दुर्बोधत्व व प्रसाद.

आतां, ज्ञानेश्वरींत, व ह्या कविवराच्या अन्य ओंवीबद्ध ग्रंथांत, दुर्बोधत्वाच्या संबंधानें विचार केला तर, तें ठिकठिकाणीं बरेंच भासमान होतें, ही गोष्ट कोणालाही कबूलच केली पाहिजे. कारण, नावेक (क्षणभर), बिक (सामर्थ्य), अपाडें (विशेषत:), ठासी (स्वस्थ राहासी), नव्हाळी (शोभा), कडवसे (आभास, परावर्तन, प्रतिबिंब), पाहला (उदय पावलेला), उतरोर्धे (भिडेनें), धाला (तृप्त झाला), आभारू (भय, भार), आवांकुनिया (पूर्णपणें), बुझतासि (समजलास), बापिया (चातकाला), आधें (अर्धें), भाष (वचन), पाठी (पूर्वीं), उजरी (स्पष्टता), आडळें (अटकावानें), भाळलों (स्वाधीन झालों), वोखटें (वाईट), ताकौ-

मिया (ताकांतून), माघौतें (पुनः), पवतें (प्राप्त होतें), इत्यादि शब्द अनभिज्ञास बिलकुल समजण्यासारखे नाहींत. तथापि, तेवढयानेंच ह्या अमूल्य वाङ्मयरत्नांतले खरे गुण लेशमात्र सुद्धां कमी न होतां, ते केवळ निजतेजानेंच आपोआप चमकतात, असें कोणाच्याही लक्षांत आल्यावांचून राहणार नाहीं.

भानु तेजें धवळलें । जैसें त्रैलोक्य दिसे उजळिलें ॥
तैसें व्यासमति कवळिलें । मिरवे विश्व ॥ ३९ ॥
कीं प्रथम वय साकाळीं । लावण्याची नव्हाळी ॥
प्रगटे जैसी आगळी । अंगना आंगीं ॥ ४२ ॥
नातरी उद्यानीं माधवी घडे । तेथ वन शोभेचीं खाणी उघडे ॥
आदिला पासोनि अपाडे । जियापरी ॥ ४३ ॥
आतां भारतकमळ पराग । गीताख्य प्रसंग ॥
जो संवादला श्रीरंग । अर्जुनेसी ॥ ५० ॥
नातरि शब्दब्रह्माब्धि । मथियला व्यासबुद्धि ॥
निवडिलें निरवधि । नवनीतहें ॥ ५१ ॥
मग ज्ञानाग्नि संपर्कें । कडसिलें विवेकें ॥
पद आलें परिपाकें । आमोदासी ॥ ५२ ॥
जैसें शारदीयेचें चन्द्र कळेंमाजीं अमृतकण कोंवळें ॥
ते वेंचिती मनें मवाळें । चकोर तलगे ॥ ५६ ॥

(ज्ञानेश्वरी. अध्याय १ ला.)

हा ग्रंथसागर येव्हडा । उतरोनि पैलीकडा ॥
कीर्ति विजयाचा धडा । नाचें जं कां ॥ १७८१ ॥

(ज्ञानेश्वरी. अ. १८ वा).

यावरून, ज्ञानेश्वराचें व्यावहारिकत्व उत्तम रीतीनें दिसून येतें. त्याची मर्मज्ञता चांगली व्यक्त होते. हा ब्रह्मचारी असूनही, जी रसिकता त्याच्या ग्रंथांत दृष्टीस पडते, ती वर्णनीय वाटते. आणि त्याच कारणानें, कवीच्या श्लाघ्य पदवीस तो सर्व प्रकारें योग्य होता, असें निर्धास्त म्हणावें लागतें.

त्याची रसिकता व मर्मज्ञता.

ज्ञानेश्वरी म्हणजे गीताविस्तारच होय. अथवा, श्रीकृष्ण भगवानानें अर्जुनास निवेदन केलेला, भारतान्तर्गत भीष्मपर्वांतील अध्यात्म विषयक, परंतु सुरस, असा मराठी भाषेतील एक कथाभागच समजावयाचा. हिलाच भगवद्‌गीता अशी संज्ञा आहे. भगवद्‌गीतेचें मूळ कायम राखून, मराठी वाङ्मयाला स्वतंत्र रीतीनें अलंकृत करणारें असें अनुपम काव्य, ज्ञानेश्वरीशिवाय दुसरें खचितच नाहीं. आणि असें म्हणणेंही अतिशयोक्तीचें नाहीं, अशी आमची अल्प समजूत आहे. कारण, प्रौढावबोधन, विचारगांभीर्य, विषयविन्यास, उपमासौन्दर्य, अर्थव्यंजकता, वाक्प्रसाद, आणि विचारस्वातंत्र्य, इतके अपूर्व गुण अन्य गीताविस्तारांत कोठें देखील आढळून येत नाहींत.

---

१ **आतां भारतकमळपराग ॥ गीताख्य प्रसंग ॥
जो संवादला श्रीरंग ॥ अर्जुनेसी ॥ ५० ॥**
(अध्याय १ ला).

२ **जे आकर्णिजे भक्ति ॥ जें आदिवंद्य त्रिजगतीं ॥
तें भीष्मपर्वी संगती ॥ सांगिजल ॥ ५४ ॥**
(अध्याय १ ला).

ज्ञानेश्वरीचा काल.

ही टीका शके १२१२ मध्यें, म्हणजे इ. स १२९० साली ज्ञानदेवानें स्वतः सांगितली, व ती सच्चिदानंदबावानें लिहिली, असें कळून येतें कारण, तद्विषयक खुद्द ज्ञानेश्वराच्या तोंडचेंच प्रमाण दृष्टीस पडतें. कवि मजकूर म्हणतो,

शके बाराशें बारोत्तरें ॥ तैं टीका केली ज्ञानेश्वरें ॥
सच्चिदानन्द बाबा आदरें ॥ लेखकु जाहाला ॥[1]८११॥
(ज्ञानेश्वरी. अ. १८ वा).

तिचा लेखक.

जनीच्या अभंगांत सुद्धां, ज्ञानदेवाचें व अन्य भक्तजन कवींचें रसात्मक काव्य कोणी कोणी लिहिलें, याविषयींचा उल्लेख आहे

ज्ञानेश्वर अभंग बोलिले ज्या शब्दां ।
चिदानन्दबावा लिही त्यास ॥
निवृत्तीचे बोल लिहिले सोपानें ।
मुक्ताईचीं वचनें ज्ञानदेवें ॥
चांगयाचा लिहिणार शामा तो कांसार ।
परमानन्द खेचर लिहित होता ॥
सांगे पूर्णानन्द लिही परमानन्द ।
भगवंत भेटी आनंद रामानंद ॥
सावत्या माळयाचा काशीबा गुरव ।
कर्म्याचा वसुदेव काईत होता ॥
चोखामेळ्याचा अनंत भट्ट अभ्यंग ।
म्हणोनी नामयाचे जनीचा पांडुरंग ॥

---

१ ज्ञानेश्वरींतील एकंदर ओंव्या ९०३७ आहेत.

असो. सच्चिदानंदबाबानें लिहिलेल्या ज्ञानेश्वरींत बरेंच अशुद्ध राहिलें असावें, असें वाटतें. परंतु, एकनाथानें त्या कामीं आपलें योग्य लक्ष्य पुरवून, शके १५१२ (इ० स० १५९०) सालीं, त्यानें मुळच्या हस्तलिखितांत राहिलेल्या सर्व चुका दुरुस्त केल्या. इतकेंच नव्हें तर, त्यानें या ग्रंथाचें फारच काळजीपूर्वक परिशीलन केलें, आणि त्याची खरी योग्यता व नितान्त महत्व लोकांपुढें ठेविलें. ह्यासंबंधानें, एकनाथ महाराजांनीं खालीं लिहिल्याप्रमाणें आपले उद्गार काढले आहेत:—

तिच्यांतील चुक्यांची एकनाथानें केलेली दुरुस्ती, व त्यानें केलेलें ज्ञानेश्वरींचें परिशीलन.

श्री शके पंधराशें बारोत्तरीं। तारण नाम संवत्सरीं ॥
एका जनार्दनअत्यादरीं।गीता ज्ञानेश्वरीप्रति शुद्ध केली
ग्रंथ पूर्वीच अति शुद्ध। परी पाठान्तरीं शुद्ध अबद्ध ॥
तो शोधुनिया एवं विध। प्रति शुद्ध सिद्ध ज्ञानेश्वरीं ॥
नमोज्ञानेश्वरानिष्कलंका।जयाचींगीतेचीवाचिताटीका
ज्ञान होय लोकां। अति भाविकां ग्रंथार्थियां ॥
बहु काळ पर्वणी गोमटी। भाद्रमास कपिला षष्ठी ॥
प्रतिष्ठानीं गोदा तटीं। लेखन कामाठी संपूर्ण झाली ॥
ज्ञानेश्वरी पाठीं। जो वोवी करील मऱ्हाटी ॥
तेणें अमृताचे ताटीं। जाण नरोटी ठेविली ॥

अशा प्रकारें, एकनाथानें ज्ञानेश्वरीची केलेली प्रशंसा उगीच नसून, ती तिच्या गुणानुरूपच झाली आहे, यांत शंका नाहीं. आणि म्हणूनच, तिला

ज्ञानेश्वरी म्हणजे मराठी गीता.

महाराष्ट्रगीता असें अन्वर्थ नामधेय दिल्यास, तें खचितच शोभण्यासारखें आहे. शिवाय, अन्य राष्ट्रांच्या तुलनेनें पाहिलें तर, ज्ञानदेवानें हें एक महत्कार्य फारच अल्पवयांत केलें, असेंही म्हणावें लागतें. इतकेंच नव्हें तर, केवळ देशोन्नत्यर्थ, राष्ट्रोन्नत्यर्थ, धर्मोन्नत्यर्थ, आणि महाराष्ट्रभाषोन्नत्यर्थच, त्यानें तें अल्पकालांत सिद्धीस नेलें, असें देखील म्हणणें प्राप्त येतें.

ज्ञानदेवाच्या कृतीची आंग्लकवीच्या कृतीशीं तुलना.

पोपनें होमरकृत ईलियड्चें ग्रीकमधून इंग्रजींत केलेलें पद्यात्मक भाषान्तर पुष्कळ अंशीं मुळास धरूनच आहे. तथापि, अस्सलांतील प्रसाद व माधुर्य, उत्साह आणि सत्व, जीवित व गांभीर्य, इत्यादि नकलेंत बिलकुल उतरलेलींच नाहींत. तेव्हां, अशा प्रकारची खरी वस्तुस्थिति असल्यामुळें, तद्विषयक बेण्टलेचें गुणदोषनिरूपण अगदीं यथार्थ आहे, असें अवश्य म्हणावें लागतें. तो म्हणतो, "अरे पोपराया, तुझें यमकी काव्य सुन्दर दिसतें खरें. परंतु, बापा, त्याला होमराची कृति खचितच म्हणतां येणार नाहीं." कारण, त्यांत त्या ग्रीक कवीचें हृदयंगमत्व मुळींच नाहीं.

१ ज्ञानदेवानें हें गीतारहस्य (ज्ञानेश्वरी) आपल्या वयाच्या फक्त सोळाव्या वर्षीच तयार केल्याचें सुप्रसिद्ध आहे. (डाक्तर आण्णा मोरेश्वर कुंटे प्रकाशित ज्ञानेश्वरी, प्रास्ताविक विनंति. पान ५ वें).

२ ह्यानें ह्या बाबतींत असें लिहिलें आहे कीं,

"It is a pretty poem Mr. Pope, but you must not call it Homer." (Bentley).

पोपचें बाल्यावस्थेंतील ट, फ, करणें, आणि बोबडें बोलणें, म्हणजे कविताच होय, अशी . आख्यायिका आहे. परंतु, असें असून सुद्धां, त्यानें आपल्या वयाच्या सोळाव्या वर्षी, ज्ञानेश्वरीसारखें एक देखील काव्य केलें न[२]व्हतें, ही गोष्ट विशेष ध्यानांत ठेवण्यासारखी आहे.

ज्ञानेश्वरींतील स्फूर्ति, व त्यामुळें तिला कविकाव्य असें मिळालेलें उपपद.

ज्ञानदेवाची ज्ञानेश्वरी नांवाची कृति, केवळ भगवद्गीतेवर टीका म्हणूनच करण्यांत आली होती. तथापि, स्फूर्ति व प्रसाद, सहृदयता आणि उत्साह, प्रेमरस व जीवित, अलोट प्रवाह आणि आंगची चमक, हे जे कवीचे मुख्य गुण, ते सर्व तिच्यांत तत्काल दिसून येतात. आणि त्याच कारणानें ज्ञानदेवाच्या अन्य कृतींचा विचार न केला तरी, फक्त एकट्या ज्ञानेश्वरीनेंच हा सत्पुरुषमुकुटमाणि कविपदवीप्रत चढण्यास निःसंशय पात्र होतो, असें कोणाच्याही लक्षांत सहजीं येण्यासारखें आहे.

ज्ञानेश्वरीविषयीं जनीचें मत.

ह्या ज्ञानेश्वरीच्यासंबंधानें, एकनाथासारख्या रसिक व सन्माननीय कवीचें मत आम्हीं पूर्वींच दिलें आहे. (मागें पान १९३-९४ पहा). सबब, जनीसारख्या स्त्रीकविरत्नाला देखील ह्या काव्याचें महत्व आणि त्याच्यांतील

---

१ पोपनेंच आपल्या संबंधानें असें म्हटलें आहे कीं, "मी बोलतों तें स्वयमेव कवनच असतें."

"I lisped in numbers, for the numbers came."

२ ह्याचें शांकृत चरित्र पहा.

हृदयंगमता भासमान झाल्यामुळें, ती काय म्हणते, याबद्दलचें आतां येथें थोडक्यांतच दिग्दर्शन करतों. ती सांगते,

भाव अक्षराची गाठी । ब्रह्मज्ञानानें गोमटी ॥
ते हे माया ज्ञानेश्वरी । संतजना माहेश्वरी ॥
ज्ञानेश्वर मंगल मुनी । सेवा करी दास जनी ॥
गीतेवरी आन टीका । ज्यांनीं वाढियेली लोकां ॥
रत्न ताटा माजीं । त्यांनीं वोगरिली कांजी ॥
या ज्ञानेशा वांचोनी । म्हणे नामयाची जनी ॥

निवृत्तिनाथाच्या सांगीवरून अन्य ग्रंथांची रचना.

ज्ञानेश्वरीची अशा प्रकारची योग्यता असून देखील, ज्यावेळीं ज्ञानदेवानें ती निवृत्तिनाथास दाखविली, त्यावेळीं हा त्याला असें म्हणाला कीं, "बा, ज्ञानदेवा, ह्या कृतींत तुझें मुळचें कांहींचाकिरे दिसत नाहीं! सबब, कांहीं अपूर्व आणि नवीन रचना करून, खरा पुरुषार्थ दाखीव." त्यावरून, ज्ञानदेवानें अमृतानुभव लिहिलें, व स्वात्मानुभव, पंचीकरण, समास, योगवासिष्ठ, इत्यादि ग्रंथ रचले.

अमृतानुभव, व त्यावरील टीका.

अमृतानुभव हा ग्रंथ समजण्यास फारच कठिण असल्यामुळें, त्याजवर शिवकल्याण, निरंजन, रघुनाथ, इत्यादींच्या सर्वमान्य टीका आहेत. इतकेंच नव्हें तर, त्यांतील अध्यात्मविषय परम गहन, परंतु सुरस असल्याचें स्वतःच्याच अनुभवास आल्यावरून, कोणी एक प्र-

ल्हाद बटवई नांवाच्या पंडितानें त्याचें संस्कृतांत देखील भाषान्तर केलें आहे.

चांगदेवपांसष्टी.

ज्ञानदेवाच्या इतर ग्रंथाप्रमाणेंच, चांगदेव पांसष्टी नांवाचा लेख सुद्धां आध्यात्मिकच असून, त्यांतील पांसष्ट ओंव्यांत ज्ञानदेवानें चांगदेवास ज्ञानाचा उपदेश केला आहे.

ज्ञानदेव संप्रदाय.

ज्ञानदेव हा शिवसंप्रदायी असल्याचें दिसतें; व तो श्रीनिवृत्तिनाथाचा चेला असून, यादवराजापैकीं रामचन्द्र राजाच्या कारकीर्दीत, गोदावरी तटाकीं तो उदयास आला असावा, असें वाटतें. कारण, ह्याबद्दलचा उल्लेख प्रत्यक्ष ज्ञानेश्वरींतच केलेला आढळतो.

येथ ह्मणे श्री विश्वेशरावो। हा होईल दान पसावो ॥
येणें बरें ज्ञान देवो। सुखिया जाला ॥ १८०१ ॥
ऐसें युगीं परिकळीं। आणि महाराष्ट्र मंडळीं ॥
श्री गोदावरीच्या कुळीं। दक्षिणिली ॥ २ ॥
त्रिभूवनैक पवित्र। अनादि पंचक्रोश क्षेत्र ॥
जेथ जगाचे जीवन सूत्र। श्री महालया असे ॥ ४ ॥
तेथ यदुवंश विलास। जो सकळ कळा निवास ॥
न्यायातें पोषी क्षितीश। श्रीरामचन्द्र ॥ ५ ॥
तेथ महेशान्वय संभूतें। श्रीनिवृत्तिनाथ सुतें ॥
केलें ज्ञानदेवें गीते। देशीकार लेणें ॥ १८०६ ॥

(ज्ञानेश्वरी. अ० १८ वा).

निवृत्तिनाथ हा इ० स० १२६८ साली जन्मला, व इ० स० १२९४ मध्यें, म्हणजे आपल्या वयाच्या सव्वीसाव्या वर्षी, त्र्यंबकेश्वरीं समाधिस्त झाला. ह्याचे ग्रंथ खालीं लिहिल्याप्रमाणें आहेत.

निवृत्तिनाथाचा काळ, व कृती.

१ निवृत्तिबोध.

२ परमप्रकाश. आणि

३ किरकोळ अभंग.

ह्याच्यावर गहिनीनाथाची कृपा होऊन, त्यायोगानेंच त्याला ईशपदाची प्राप्ति झाली असावी, असें त्यानें दिलेल्या गुरु परंपरेवरून चांगलें व्यक्त होतें.

त्याची गुरुपरंपरा.

आदिनाथ उमा बीज प्रगटलें।
मंच्छिन्द्रा लाधले सहज स्थितीं॥
तोचि प्रेममुद्रा गोरक्षीं दिधली।
पूर्ण कृपा केली गहिनीनाथा॥
निवृत्ति गहिनीं कृपा केली पूर्ण।
कुळ हे पावन कृष्ण नामें॥

केवळ वाङ्मयाच्या दृष्टीनेंच पाहिलें, आणि भाषेचे अलंकार या नात्यानेंच निवृत्तिनाथाच्या ग्रंथांचा विचार केला, तर त्यांत विशेष नांवाजण्यासारखें कांहींएक दिसत नाहीं. तथापि, त्याच्या कृती भक्ति-

त्याच्या ग्रंथांतलि भक्तिरस.

रसानें अगदीं ओथंबलेल्याच आहेत, ही गोष्ट कोणाला दखील नाकबूल करवणार नाहीं.

भावबळें देव भावबळें देव ।
भक्तीचा सद्भाव पहातसे ॥
जना उपदेशी विश्वीं हृषीकेशी ।
आपण भक्तीसी दुरावीत ॥
निवृत्ति ह्मणें ज्ञान हें सकळ ।
तेथें अद्वैत कृपाळ बिंबतसे ॥

व त्याचा आमच्या देशावर आणि राष्ट्रावर परिणाम.

हा भक्तीचा महिमा सकृद्दर्शनीं जरी आपल्या लक्षांत येत नाहीं, तरी तो फारच मोठा आहे; व त्यानें आपलें महत्कार्यही आमच्यावर केलें, यांत संशय नाहीं. फार तर काय सांगावें, पण, त्याचा परिणाम आमच्या राष्ट्रावर खचितच झाला होता, असें म्हणणें आम्हांला प्राप्त येतें. कारण, ह्या साधुवर्याच्या वेळीच, मुसलमान लोकांची टोळधाड दक्षिणेंत येऊन थडकल्यांमुळें, आमच्या स्वातंत्र्यवृक्षाचें त्यांजकडून यथेष्ट छेदन झालें असतांही, त्याला केवळ स्वधर्मभक्तीचेंच भरपूर सिंचन मिळून, त्याला कालान्तरानें सर्वत्र अंकुर फुटले, आणि तो पहिल्यापेक्षांही ज्यास्त जोरानें फोंफावत चालला. इतकेंच नव्हे तर, त्या धर्मांध अविंधांचा तो दीन् दीन् शब्द, (आमचें शिरकमळ त्यांच्या छूरिकेप्रत व तरवारीला अर्पण होते वेळीं), इतस्ततः

---

१ भारतीय साम्राज्य पुस्तक तिसरें. (पान १३२ ते १३७).

संचार करीत असतांही, आम्ही जसेच्या तसेच, कायम व हिंदुधर्माभिमानी राहिलों; आणि आमचे अनेक प्रकारचे छळ व नानाविध विटंबना होत असून देखील, आम्हीं धैर्याची कांस केव्हांही सोडली नाही; ही गोष्ट आमची स्वदेशप्रीति,[1] आमचें अतुळ धैर्य, व आमचा स्वधर्माभिमान, इत्यादि व्यक्त करते; आणि आमच्या सनातन धर्माची यथावकाश मशाल पेटवून, तीं उचितकाळीं ज्या साधुवर्यांनीं प्रज्वलित केली, त्यांच्या नीतिमत्तेची, बाणेदार वृत्तीची, सहनशीलतेची, व दूरदर्शित्वाची, ती प्रत्यक्ष साक्षच देते.

---

१ कित्येक पाश्चात्य, हे आमच्या ह्या स्वदेशप्रीतिस व श्रीशिवाजी छत्रपतींनें जागृत केलेल्या स्वदेशाभिमानास, त्या त्या तत्वांचे खरे बीजांकुर समजत नसून, तो केवळ धर्मान्धत्वाचाच परिणाम होय, असें मानतात. परंतु, ह्यांची अशी समजूत होण्याला, ह्यांचें अज्ञानजन्य भ्रांतिपटलच कारणीभूत होतें, यांत तिलमात्रही संदेह नाहीं. ते दूरवर विचार करीत नाहींत, आणि खरी वस्तुस्थिति इतिहासदृष्ट्या पहात नाहींत. त्यामुळें, त्यांचें अज्ञान कायम रहातें, व ते हवे तसे बडबडतात. तथापि, वाचकाची खात्री होण्यासाठीं, व ह्यासंबंधानें नामदार कैलासवासी रानडे यांचें कसें मत होतें, तें कळण्यास्तव, त्यांनीं केलेल्या महाराष्ट्र इतिहासांतील अवश्य तेवढें अवतरण वाचकांपुढें ठेवितों. न्यायमूर्ति मजकूर म्हणतात,

"This *feeling of patriotism* illustrates most forcibly the characteristic result of the *formation of a Nation in the best sense* of the word, and constitutes another reason, why the History of the Marathas deserves special study." P. 8.

(पुढें चालू)

निवृत्तिनाथ हा अध्यात्म विषयांत निःसंशय पारंगत होता. त्यामुळें, ज्ञानदेवासारख्यांनीं सुद्धां त्याला गुरुस्थानीं मानिलें असे; आणि त्याच्याच संगतीचें फल सोपानदेव व मुक्ताबाई, या भावंडांत दृग्गोचर होतें.

सोपानदेवाचा काल व त्याच्या अभंगांची प्रेमळता.

सोपानदेवाचें जन्म इ० स० १२७४ सालीं झालें, व इ० स० १२९३ मध्यें तो निवर्तला. ह्यानें कांहीं अभंग मात्र केले आहेत. पण, ह्याखेरीज त्याची दुसरी कृत्ति ऐकिवांत नाहीं. ह्याचे अभंग फारच प्रेमळ आहेत.

(मागील पृष्ठावरून पुढें चालू.)

" It was a *higher moral force which brought ou all the virtues oj the best men of the nation,—daring heroism, noble endurance, administrative skill*, hope which rose higher with every disappointment, *a faith which was never shaken, devotion to a high ideal*, which was independent of time, place, or person, a sense of brotherhood in common danger, *a spirit of complete self-sacrifice*, and mutual concession for the common good, a *trust* in the final success of their cause, becanse it was the cause of their *religion*. These were the *virtues* which enabled the *patriots* of this generation to accomplish the deliverance of their country from a danger which no *other race* in India had been able to withstand. " (P. P. 194-195).

सदर्हू अवतरणांतील इतालिक वर्ण आमचे आहेत. (ग्रंथकर्ता.)

आपरूप हरि आपणची देव ।
आपणची भाव सर्व जाहला ॥
सर्व हरि हरि सबाह्य अन्तरीं ।
एक चराचरीं आत्माराम ॥
सर्वकाळ सम नाहीं तेथें विषम ।
आपणचि राम सर्व ज्योती ॥
सोपान तिष्ठत रामनामीं लीन ।
मन तेथें मौन एकरूप ॥

मुक्ताबाई इ० स० १२७७ सालांत जन्मली, आणि इ० स० १२९४ त मरण पावली. ह्या वेळीं तिचें वय अवघें सतरा-वर्षांचेंच असून, तिचा अन्त चैत्र वद्य १२ रोजीं, खानदेश जिल्ह्यांतील एदलाबाद गांवीं झाला. हिनें केलेले बरेच अभंग प्रसिद्ध आहेत. त्यावरून, अध्यात्मज्ञानांत तिचें प्राविण्य किती होतें, याचें सहज अनुमान करता येतें. मासल्याकरतां, ह्या अभंगांतील कांहीं वेंचे येथें देतों:—

मुक्ताबाईचा जन्म, व अन्त.

पैल पैल तें कांहीं नाहीं ।
तेंचि तूंगा पाही आपणीया ॥
आम्हां नाम नाहीं आम्हां रूप नाहीं ।
नामरूप नाहीं तेचि आम्ही ॥
मुक्ताबाई म्हणे चांगया तूं बुझ ।
अन्तरीचें गुज सांगितलें ॥

आदि अन्तु हरी सर्वां घटीं पूर्ण ।
जाणोनि संतजन प्रेमभरीत ॥
पूर्णपणें सार अविट आचार ।
सारासार विचार निज तेजें ॥
निर्गुणीं आकार सर्वत्र साकार ।
एकरूपें विचार निज तेजें ॥
मुक्ताई चैतन्य अवघे चिद्घन ।
आदि अन्तीं खूण निवृत्तीची ॥

मुक्ताबाईची ताटी नांवाची अभंगावळी याहीपेक्षां फा-रच प्रशंसनीय व मनोहर आहे. इतकेंच नव्हें तर, तिच्यांतील वि-चार देखील उदात्त आणि प्रौढ आहेत; असें तदवलोकनानें कोणाच्याही तेव्हांच लक्षांत येईल.

तिच्या अभंगांतील उदात्त विचार.

मजवरी दया करा । ताटी उघडा ज्ञानेश्वरा ॥
संत जेणें व्हावें । जग बोलणें सोसावें ॥
तरीच अंगीं थोरपण । जया नाहीं अभिमान ॥

ह्या ताटी अभंगांचा कथाप्रसंग जरा ध्यानांत ठेवण्या-सारखा आहे. एके दिवशीं, ज्ञानदेव व मुक्ताबाईचें आपापसांत बोलणें झाल्यावर, दोघांच्याही समजुतींत विपर्यास झाल्या कारणानें, ज्ञानदेव तेथून उठून आपल्या खोलींत गेला, व तिचें दार आंतून लावून घेऊन, एकटाच स्वस्थ बसला. त्यावेळीं, "रागास न येतां, खो-

ताटी अभंगाचा कथा-प्रसंग.

ळीचें दार उघडावें," म्हणून मुक्ताबाईनें ज्ञानेश्वराची ही अभंगात्मक प्रार्थना केली, आणि त्याचें मन रिझविलें. ह्यावरून, तिची योग्यता केवढी होती, हें सहजीं ध्यानांत येतें.

याप्रमाणें, ह्या अप्रतीम चाऱ्हीं रत्नांनीं, आपल्या अल्पवयांतच विलक्षण प्रकाश पाडून, महाराष्ट्र भाषेवर, महाराष्ट्र लोकांवर, व महाराष्ट्र देशावर, किंबहुना अखिल भरतखंडावर, कायमचे उपकार कसे करून ठेविले, याबद्दलची आम्ही जरूर ती हकीकत यथावकाश दिली. सबब, आतां, राहिलेल्या अवशिष्ट रत्नाकडे वळूं, आणि तत्संबंधीं उपलब्ध असलेली माहिती वाचकापुढें ठेवून, ह्या प्रथमकालाचें विवेचन आटोपतें घेऊं.

हेमाद्रि व त्याचा काल.

हें रत्न ह्मटलें ह्मणजे हेमाडपंत होय. ह्यालाच हेमाद्रि ह्मणण्याचाही पाठ आहे. ह्याच्या बापाचें नांव कामदेव असून, तो वत्सगोत्रांतला, व ब्राह्मण जातीचा होता. हा रामदेव[1] राजाच्या पदरीं मुख्य प्रधान असल्या कारणानें, ह्याला श्रीकरणाधीप किंवा श्रीकरणप्रभु असा किताब असल्याचें दिसतें. हा मोठा शूर, पराक्रमी, व विद्वान होता; आणि ह्याचे मुख्यत्वेंकरून धर्मशास्त्रावरच ग्रंथ आहेत. लेखनपद्धति नांवाचा ह्याचा एक मराठी ग्रंथही असल्याचें सांगतात. ह्यांत, ज्याच्या त्याच्या दरज्याप्रमाणें ज्यानें त्यानें परस्पर व एकमेकांस कसें लिहावें, याविषयीं सांगितलें आहे. आपली मोडी लिपी हेमाडपंतानेंच सिंव्हलद्विपांतून आ-

१ हा इ. स. १२७१ सालीं गादीवर बसला.

णिली असल्याविषयीं, आख्यायिका आहे. कित्येक असेंही ह्मणतात कीं, त्यानें तिकडूनच तीन अपूर्व वस्तु आणिल्या होत्या १ खाण्यासाठीं बाजरी; २ राहण्याकरितां बिनचुन्याचीं घरें; व जलदीनें लिहिण्यास्तव मोडीलिपी. तथापि, मोडीलिपीच्या संबंधानें आपली परंपरेनें झालेली समजूत भ्रांतिमूलक असावी, असें वाटतें. कारण, भिन्न वळण खेरीज करून, मोडी आणि देवनगरी लिपींत ह्मणण्यासारखा कांहींच फरक दिसत नाहीं.

त्याची कृति.

हेमाद्रीची सदरीं निर्दिष्ट केलेली लेखनपद्धती आह्मांला पहावयास मिळाली नाहीं. त्यामुळें, त्यांतील गुणदोषांसंबंधानें कोणत्याही प्रकारें लिहिण्याची मोठी अडचण आहे. तथापि, आमच्या अवलोकनांत जो एक मायना आला, तो सदरहू ग्रंथांतलाच असल्याचें आम्हांला ऐकीव माहितीवरून समजलें. सबब, त्याचा मासला वाचकाच्या सोईसाठीं येथें देतों.

" विज्ञापना अशी कीं राजश्री देवरावदादांनीं मजला विनंती केली कीं आमच्या सर्व भाऊबंदांनीं दीक्षित यांचा आश्रय करून समाईक जो इनाम आहे तें क्षेत्र पितृसंपादित तेव्हां भागिलें असावें हें विहित असून विभाग न देतां उत्पन्न तेच घेतात यास्तव आलों आहों. तरी कृपा करून त्या इनामांत आम्हांस भाग येईल असें दीक्षित यांस स्नाहितकीचें एक पत्र द्यावें. याकरितां लेखनांत येतें

कीं, दादांनीं जो वाका मज समजाविला असे तो सत्य रीतीनें ध्यानांत आणाल. विशेष लिहिणें नकोच हे विनंति."

अन्य कवि चांगदेव.

चांगदेव, ज्याला चांगदेव वटेश्वर असेंही म्हणतात, तो सुद्धां ह्याच कालांतील होय. ह्याचे कांहीं अभंग मात्र उपलब्ध आहेत. ह्याला आपल्या ज्ञानाचा मोठा अभिमान झाल्याचें पाहून, ज्ञानदेवानें पांसष्ट ओंव्यांनीं त्यास उपदेश केला, आणि मुक्ताबाईनें देखील चार गोष्टी सांगितल्या.

चांगया सोय धरी ज्ञान वटेश्वरीं।
मुक्ताई जिव्हारी बोध करी ॥

त्याची कवींत गणना.

चांगदेव हा खचितच एक नांवाजल्यापैकीं कवि असल्याचें दिसतें. कारण, ज्ञानदेव, निवृत्तिनाथ, नामदेव, इत्यादि प्राकृतकविमालिकेंतच त्याची गणना असून, ती एकनाथासारख्या रसिक कवीनें देखील केली आहे. आणि काव्यपरीक्षणार्थ जरी त्याचे ग्रंथ किंवा त्याची एकादी कृति हल्लीं उपलब्ध नाहीं, तरी एकनाथ हा स्वतःच मर्मज्ञ असल्यामुळें, तो भलत्यालाच अथवा कोणा तरी अलबत्या गलबत्याला ह्या कविपदाचा बहुमान निःसंशय देणार नाहीं, एवढी गोष्ट कबूल करणें अगदीं भाग पडतें. कारण, एकनाथ ह्मणतो,

---

१ ह्याच चांगदेव पांसष्टी या नांवानें सुप्रसिद्ध आहेत. (मार्गे पान १८८ पहा).

वंदू प्राकृत कवीश्वरू ॥
निवृत्ति प्रमुख ज्ञानेश्वरू ॥
नामदेव चांग वटेश्वरू ॥
ज्यांचें भाग्य थोर गुरुकृपा ॥

बहिरा पिसा आणि त्यांची कृति.

चांगदेवाप्रमाणेंच ज्ञानदेवाचा दुसरा समकालीन कवि म्हटला ह्मणजे, बहिरापिसा होय. हा मयूरकवीचा समकालीन जो बहिरवनाथ तो नसून, ह्याचे १ धनेश्वरचरित, व २ भागवत टीका, असे दोन ग्रंथ आहेत.

भाग ८० वा.

मराठी भाषेची युवावस्था.

प्रथमकाल-उपसंहार.

मराठी वाङ्मयाच्या युवावस्थेतील प्रथम कालांतल्या महत्त्वाच्या गोष्टी.

ह्या प्रथम कालांतील महाराष्ट्र वाङ्मयाच्या संबंधानें, कित्येक गोष्टी निःसंशय नितान्त महत्त्वाच्या आहेत. सबब, ह्याच मुख्यत्वेंकरून विशेष रीतीनें ध्यानांत ठेविल्या पाहिजेत.

१ स्त्रियांचें अध्यात्मविषयक ज्ञान.

२ त्यांची कविताशक्ति.

३ त्यांची नैसर्गिक स्फूर्ति.

४ त्यायोगानें त्यांचें मराठी ग्रंथसंपत्तीवर झालेले उपकार. आणि

५ गद्यवाङ्मयाचा प्रारंभ.

आमच्या कवनस्फूर्तीचीं अध्यात्मविषयक परंपरा.

आमची अध्यात्मज्ञानाची परंपरा, व तत्संबंधानें आमच्या भारतीय स्त्रियांवर झालेला आनुवंशिक संस्कार, हीं आजकालचीं नसून, तीं आज दहा पंधरा हजार वर्षांपलिकडील कालापासूनच सतत चालत आलीं आहेत. त्याचप्रमाणें, कवनस्फूर्ति, स्वधर्मप्रीति,

प्रावीण्य, ज्ञान, आणि उदात्त विचार, ह्यांचें प्रतिबिंब देखील ऋग्वेदकाळापासूनच त्यांच्यावर पडलेलें दृग्गोचर होतें.

ऋग्वेदकालांत ममता[1] ही वेदाचें पठण करी. ईळा[2] ही धर्माचें शिक्षण देई. मैत्रेयी[3]च्याकडून वेदाध्ययन करवून, खुद्द याज्ञवल्क्यच तिला ब्रह्मज्ञान शिकवीत असे. विश्ववारानें तर पौरोहित्य स्वीकारून, यज्ञयागादिक्रिया स्वतःच चालविल्या. घोषा, अपाला, आणि घृताचि, या स्त्रीरत्नांनीं स्वतंत्रच यज्ञ केले. रोमशानें ऋग्वेदाच्या पहिल्या मंडलांतील १२६ वें सूक्त रचलें. लोपामुद्रेनें सुद्धां त्याच मंडलांतलें १७९ वें सूक्त केलें. अधीति ही कवि असून ब्रह्मज्ञानी होती. शाश्वती, श्रद्धा, यमि, अगस्त्यश्वसा, सूर्या, दक्षिणा, सरमा, युहु, वाक्, ह्या सर्व स्त्रिया संसारनिपुण व परमार्थदक्ष असत. गार्गीनें परमहंस दीक्षा घेतली होती. सुलभा[5], अंबा[6], धरिणी, यांनीं कौमार्य स्वीकारून तपश्चर्या केली. चित्रलेखा[7] ही योगशास्त्रांत प्रवीण होती. यशोमतीला[8] स्मृति शास्त्राचें चांगलें ज्ञान असे. कुन्ती आणि विदुला यांनीं आपल्या पुत्रांस भरतखंडाचा प्राचीन इतिहास व क्षात्रधर्म शिकविला. त्याच-

---

१ ऋग्वेद. (४. १०). २ ऋग्वेद. मं० १. सू० ३८. ३ बृहदारण्यक. ४ बृहदारण्यकोपानिषद्, मधुकांड. ५ महाभारत. शांतिपर्व. ६ उद्योगपर्व. ७ भागवत. ८ हरिवंश. (१६७) १७६). भागवत. (१०–६२). ९ देवी भागवत. (६–२१.२२, १० महाभारत, उद्योगपर्व. (१३१. १३३. १३६).

प्रमाणें, देवहूति[1], अनसूया[2], मायावती[3], चूडाला[4], तारा, मंडोदरी, सावित्री[5], पतिव्रता[6], मदालसा[7], इत्यादि स्त्रिया अध्यात्मविषयांत मुक्ताबाईप्रमाणेंच फार निपुण असत.

तिचा ह्या कालांतील प्रत्यय.

ह्या कालांत, मुक्ताबाईच्या अध्यात्मज्ञानानें व तिच्या नैसर्गिक स्फूर्तीनें, मराठी वाङ्मयांत एक प्रकारची सुरम्य भर पडून, भावी स्त्रीकविहाराची ती एक प्रसादचिन्हात्मक सुमनोहर पुष्पच बनली. कारण, मराठी-भाषेच्या युवावस्थेंतील द्वितीय कालांत तर, आमच्या स्त्री-कविरत्नांची जणूंकाय मालिकाच लागली; आणि त्या योगानें, ह्या भाषेचें तेज शुक्ल पक्षांतील चन्द्राप्रमाणेंच दिवसानुदिवस फांकत चाललें. मात्र, गद्यात्मक ग्रंथाला हेमाद्रीनें जरी सुरुवात केली होती, तरी त्याचा खरा उदयकाल इ० स० च्या सतराव्या, अठराव्या, व एकोणीसाव्या शतकापर्यंत आला नव्हता. अर्थात्, तो आल्यावरच गद्यग्रंथांचा विस्तार झाला; आणि त्यामुळेंच मराठी भाषेला आपोआप प्रौढत्व येऊं लागलें.

---

१ भागवत. (३.३३). २ रामायण. अयोध्याकांड. सर्ग ११७. ३ ब्रह्मवैवर्त पुराण. ४ योगवासिष्ट. निर्वाण प्रकरण. ५ महाभारत, वनपर्व. (२९३–२९४). मत्स्यपुराण. (२१२—२१४). ६ मार्कंडेय पुराण. १६. महाभारत. वनपर्व. २०५. ७ मार्कंडेय पुराण. (२५—२६).

भाग ८१ वा.

मराठी भाषेची युवावस्था.

द्वितीयकाल.

इ० स० १२९८–१३५०.

नामदेव, व त्याचा काल.

ह्या कालांतील प्रमुख कवि व संताशिरामाणि म्हटला म्हणजे नामदेवच होय. हा जातीचा शिंपी असून इ. स. १२७० सालीं जन्मला, आणि इ. स. १३५० सालीं मरण पावला, असें कळून येतें; व ती गोष्ट नामदेवाच्या स्वतःच्या उक्तीवरूनच सप्रमाण ठरतें. कारण, ह्यानें आपली जन्मतिथि कार्तिक शुद्ध ११, रविवारीं, प्रभवनामसंवत्सरीं, शालिवाहन शकाच्या ११९२ व्या वर्षीं, असल्याचें लिहिलें आहे; आणि आपण एकंदर ऐंशीं वर्षें वाचलों, म्हणूनही त्यानें सांगितलें आहे.

माझें जन्मपत्र बाबाजी आपण ।
लिहिले त्याची खूण नारु एक ।
अधिक ब्याण्णव गणित अकराशेंत ।
उगवतां आदित्य तेजोराशी ॥
शुक्र एकादशी कार्तिकी रविवार ।
प्रभव संवत्सर शालिवाहन शक ॥ .

ऐशीं वर्षे आयुष्य पत्रिका प्रमाण ।
नामसंकीर्तन नामया बुद्धि ॥

शिवाय, ह्याच मित्तीला, लाडाईच्या अभंगाचें देखील चांगलें प्रत्यन्तर मिळतें. कारण, हिनें त्याचा मृत्युकाल शके १२७२ (इ. स. १३५०) मध्यें असल्याचेंच सांगितलें आहे. ती म्हणते,

त्याचें प्रमाण.

द्वादश बहात्तरीं कृष्ण त्रयोदशी ।
आषाढ हे मासीं देवद्वारीं ॥
सर्वांनीं देह अर्पिला विठ्ठलीं ।
मज कां ठेविली पापीणीशीं ॥
लाडाई म्हणे देह अर्पीन विठ्ठला ।
म्हणोनी आदरीला प्राणायाम ॥

कित्येक संत मंडळींच्या व कविजनांच्या पद्धतीप्रमाणें, नामानें सुद्धां आपलें कुलवृत्त दिलें आहे. त्यावरून, असें कळून

त्याचें कुलवृत्त.

१ ह्यावरून, व तुकारामाच्या उक्तीवरून, नामा हा चन्द्रभागा नदींत सांपडला नव्हता, हें व्यक्त होतें. कारण, नाम्याचा पिताच दामाशेट, असें तुकारामानें म्हटलें आहे.

पिता दामाशेटी । अभंग दोन कोटी ॥
भक्तिभावें ताटीं । निवेदी देवा ॥

शिवाय, प्रत्यक्ष दामासुद्धां असें म्हणतो कीं,

तुजसाठीं नवस केला । शेखीं हाचि कामा आला ॥

ह्याखेरीज, नामाची आई गोणाई, ही देखील

(पुढें चालू)

येतें कीं, ह्याच्या बापाचें नांव दामाजी आणि आईचें नांव गोणाई होतें. अर्थात्, कित्येकांच्या ह्मणण्याप्रमाणें तो दामाला चन्द्रभागा नदींत सापडलाच नव्हता, हें उघड आहे. राजाई ही त्याची बायको असून, तिच्या पोटीं त्याला १ नारा, २ म्हादा, ३ गोंदा, व ४ विठा, असे चार पुत्र, व लिंबाई नांवाची एक कन्या झाली. ह्या चौघांच्या १ लाडाई, २ गोडाई, ३ येसाई, आणि ४ साकराई, अशा अनुक्रमें चार बायका असत; व नाऊबाई नांवाची त्याला बहीणही होती. ह्याखेरीज, जनी नांवाची एक लहान मुलगी देखील

(मागील पृष्ठावरून पुढें चालू.)

आम्हां वृद्धपण आमुचें पालन ॥
करि तूं नाम्या सुजाण आमुचे पोटीं ॥

असें स्पष्टपणेंच सांगते; त्यावरून, त्यांच्या पितृत्वाची अगदीं शंकाच राहत नाहीं.

तसेंच राजाई ही आपल्या पतीच्या संबंधानें असें बोलते कीं,

भोळी सासू गोणाई । पांढरा स्फटिक व्याली काई ॥

जनाबाई ही नाम्याची दासी असून, ती त्याच्यापाशीं अगदीं बालपणापासूनच राहिली होती. तेव्हां, तिला त्याची गृहस्थिति चांगली माहित असे, हें निर्विवाद आहे. ती म्हणते,

गोणाईनें नवस केला । देवा पुत्र देईं मला ॥
शुद्ध देखोनियां भाव । पोटीं आले नामदेव ।
दामाशेटी हरूषला । दासी जनीस आनंद झाला ॥

शिवाय महिपति हा गोणाईच्या संबंधानें म्हणतो,

नवमास म्यां वाहिला पोटीं ॥ ४९ ॥

(भक्तविजय. अ. ४.).

त्याच्याच जवळ असे. कारण, तिला आई बाप, भाऊ बहीण, आप्तसोयरे, वगैरे कोणीच नसल्यामुळें, तिला अनाथ समजून, नामा तिचें मोठ्या प्रेमानें, परंतु अगदीं निरिच्छ पालनपोषण करी. नामा म्हणतो,

गोणाई राजाई दोघी सासू सुना।
दामा नामा जाणा बाप लेक॥
नारा म्हादा गोन्दा विठा चौघे पुत्र।
जन्मले पवित्र त्याचे वंशीं॥
लाडाई गोडाई येसाई साकराई।
चौघी सुना पाही नामयाच्या॥
निंबाई ते लेकी नाऊबाई बहिणी।
वेडी पिशी जनी दासी त्याची॥
इतुक्याही जणी अभंग आरंभिले।
देवें पूर्ण केलें नामा म्हणे॥

त्याच्या कुटुंबांतील माणसांची भगवतभक्ति.

ही सर्व मंडळी मोठी प्रेमळ असून, त्यांची विठ्ठलचरणीं निःसीम भक्ति होती. त्यामुळें, ते नेहमीं पंढरीची वारी करीत. पिता दामा आणि पुत्र नामा, असे दोघेही पांडुरंगाला वाहिलेलेच असल्यामुळें, एकट्या गोणाईलाच हें संसारचक्र ओढणें भाग पडे. तथापि, ह्या गोष्टीचा तिला रात्रंदिवस खेद वाटे, व तिचा कुटुंबभार मोठा

१ नामदेवाचे आईबाप, बायको, चार मुलगे, चार सुना, एक मुलगी, एक बहीण, व जनी दासी, मिळून एकंदर कुटुंबाचीं माणसें पंधरा होतीं.

असल्याकारणानें, तत्पोषणार्थ ती नेहमीं तळमळ करी. इतकेंच नव्हे तर, ती मोठ्या काकुळतीनें नामास वारंवार म्हणे कीं, " अरे नाम्या ! हें देवाचें वेड तूं सोडून दे, आणि संसाराकडे लक्ष लाव. अरे, तूं विचार करून पहा कीं, दुसरीं मुलें आपआपला प्रपंच उत्तम प्रकारें संभाळतात, व तूं तर आपल्या संसाराची निव्वळ होळीच करून टाकिली आहेस. तेव्हां, तुला काय बरें म्हणावें ! "

गोणाई व राजाईची चित्तव्यग्रता.

राजाई ही नामदेवाची बायको असल्याविषयीं, आह्मी पूर्वीच सांगितले असून, ती सुद्धां ह्यासंबंधानें अहर्निशीं चिन्ताग्रस्त असे. ती म्हणे कीं, " माझा पति टाळ कुटून, सदैव विठोबा पुढें नाचतो, व संत भेटले ह्मणजे त्यांच्या पायां पडतो. त्यायोगानें, माझ्या संसाराची केवळ राखरांगोळीच झाली आहे. "

नामदेवाची प्रतिज्ञा व त्याची काव्यस्फूर्ति.

नामाचें सर्व लक्ष्य विठ्ठलाचें चरणीं असे, आणि तो त्याच्या भजनांतच निरंतर गुंग राही. एके दिवशीं, त्यानें विठोबा-जवळ असें गाऱ्हाणें गाइलें कीं, " वाल्मीकीनें शतकोटी रामायण केलें असून, मी आपलें

---

१ गोणाईचे अभंग, तिच्या कृतीचा विचार करते वेळीं आम्हीं दिले आहेत. त्यावरून, तिच्या मनाची स्थिति वाचकांच्या लक्षांत सहजीं येईल.

२ राजाईच्या अभंगावरून, तिचा हृद्रोग वाचकास तेव्हांच कळेल.

आयुष्य तर अगदीं व्यर्थच घालविलें. सबब, माझ्या मनांत देखील तुझे गुणानुवाद गाऊन शतकोटी अभंग रचावे, असें आलें आहे. यासाठीं, हे पांडुरंगा! माझे मनोरथ तुलाच सिद्धीस नेले पाहिजेत. नाहीं तर, मी आपली जिव्हा उपटून तुझ्यासमोर प्राणत्याग करीन." हें ऐकून त्या भक्तवत्सल कृपासागरानें, नामदेवास आश्वासन दिलें व त्याचे लळे मोठ्या प्रेमानें पुरविले.

चन्द्रभागे तटीं ऐकीयेली गोष्टी।
वाल्मीकें शतकोटी ग्रंथ केला ॥
येऊनीया नामा विठ्ठलासी म्हणे।
केलें रामायण वाल्मीकीनें ॥
तेणें माझ्या चित्ता बहु झाले क्लेश।
व्यर्थ म्यां आयुष्य गमावीलें ॥
जरी तुझा दास असेन मी देवा।
तरी सिद्धी न्यावा पण माझा ॥
करीन मी तुझे शतकोटी अभंग।
बोले पांडुरंग ऐके नाम्या ॥
तये काळीं होती आयुष्याची वृद्धी।
आतांची अवधि थोडी आहे ॥
नामा म्हणे जरी न होती संपूर्ण।
जिव्हा उतरून ठेवीन मी ॥
भीमातीरीं सांगे सारजेसी हरी।
बैसे जिव्हेवरी नामियाच्या ॥

लडीवाळ माझें नामा बाळ तान्हें ।
मजवीण आहे कोण त्यासी ॥
मजवरी त्याचें फार आहे रीण ।
एवढ्यानें उत्तीर्ण होईन मी ॥
नामा म्हणे आंगें बांधोनिया वह्या ।
बैसे ल्याहावया पांडुरंग ॥

ह्या कथानकाचा आपण सूक्ष्म विचार केला, म्हणजे आपल्या लक्षांत इतकें खचित येऊन चुकेल कीं, नामदेवानें शतकोटि अभंग रचण्याची जी प्रतिज्ञा केली, तिला मूल कारण केवळ वाल्मीकिच असून, ह्यानें रामायणासारखा विस्तीर्ण ग्रंथ लिहिल्याचें ऐकूनच त्याला कवन करण्याची स्फूर्ति झाली, आणि विठ्ठलाचे गुणानुवाद गाण्याचें त्याच्या मनांत आलें. ह्या शतकोटि अभंगांपैकीं, नामदेवानें ९४,९४,००,००० अभंग करून, आपला देह ठेविला, अशी आख्यायिका आहे. परंतु, इतके अभंग हल्लीं कोठें देखील उपलब्ध नाहींत. कदाचित्, यवनांनीं जी आमच्या ग्रंथसंपत्तीची होळी केली, तींतच ह्यांचा व तुकारामाच्या अभंगांचाही स्वाहा झाला असावा, असें वाटतें.

त्याच्या अभंगांची संख्या.

नामदेवानें एके ठिकाणीं म्हटलें आहे कीं,

त्याचें प्रमाण.

पिता दामाशेटी अभंग दोन कोटी ।
भक्तिभावें तारीं निवेदी देवा ॥

तीन कोटी अभंग गोणाईचा बाद ।
स्वात्मसुख बोध सुखाचा तो ॥
तीन कोटी अभंग नारोबाची कविता ।
उगवी स्वात्महिता दिवस रजनी ॥
तीन कोटी अभंग विठाचा झगडा
प्रेमरस गोडा प्रेमाचा तो ॥
महादा आणि गोंदा अडीच अडीच कोटीं ।
प्रेमरस पोटीं प्रेमळ तो ॥
एककोटी अभंग लक्ष वरती सोळा ।
प्रेमरस जिव्हाळा आऊबाईचा ॥
चौऱ्याण्णव लक्ष रंगाईची करुणा ।
प्रेमें नारायणा आळविलें ॥
दोन कोटी अभंग राजाईची वाणी ।
प्रेमें चक्रपाणी आळविलें ॥
लाडाई, गोडाई, येसा, साकराई ।
कवित्व हें पाही दीड दीड कोटी ॥
एक कोटी देव पन्नास लक्ष रुक्मिणी ।
कोटी दासी जनी साडे बारा ॥
एकुण हत्तर लक्ष चौपन्न कोटी ।
कविता गोमटी नामयाची ॥

ह्यावरून, नामदेवानें व त्याच्या कुटुंबांतील इतर

त्याचे उपलब्ध अभंग.

जणांनीं किती अभंग केले, याबद्दलचा तपशिलवार दाखला कळून येतो. आणि त्याचा विचार केला ह्मणजे, चौपन कोटी व एकुण सत्तर लक्ष अभंगच कायते नामदेवानें केल्याचें होतें. परंतु, तितके सुद्धां, किंबहुना त्याचा लक्षावा हिस्साही, प्रस्तुतकाळीं पहावयास मिळत नाहीं, ही दुःखाची गोष्ट होय.

नामदेवाचा गुरु, व तो करण्याचें कारण.

नामदेवावर जरी श्री विठ्ठलाचें निःसीम प्रेम होतें, तरी आपल्या भक्ताची समदृष्टि झाली नाहीं असें पाहून, त्यानें नामदेवास विसोबा खेचराला गुरु करावयास सांगितलें. त्याप्रमाणें, त्याजकडे जाऊन, नाम्यानें कांहीं काळपर्यंत विसोबाची सेवा केली, आणि त्याच्याच कृपेनें नामदेवाला पूर्णत्व प्राप्त झालें.

समवृत्ति होऊन, ज्ञानदीपाची मशाल पेटल्यावर, नामदेव हा मोठ्या सद्‌गदीत अन्तःकरणानें असें ह्मणे कीं,

परेहून परतें घर। तेथें राहूं निरंतर॥
सर्वांचें जें अधिष्ठान। तेंचि माझें रूप पूर्ण॥
अवघी सत्ता आली हातां। नामयाचा खेचरि दाता॥

नामदेवाचें प्रेम पंढरीच्या[१] विठ्ठलावर विलक्षण असून,

---

१ पंढरीचें सुख आनंदें गर्जती।
ध्यातसे पार्वती अखंडित॥
भीमातीरीं उभा सखा पांडुरंग।
देई अंगसंग अखंडित॥

नामदेवाची विठ्ठल प्रीति, भक्ति, व नीति, आणि त्यांचा महाराष्ट्र देशावर व राष्ट्रावर परिणाम.

त्याची भक्ति[1] आणि नीति[2] इतकी सोज्ज्वळ व पवित्र होती कीं, त्यांचा उत्कृष्ट परिणाम त्याच्या कुटुंबांतील सर्व माणसांवर होऊन, त्याचे आईबाप, पुत्रकलत्र, आणि दासीसुद्धां भगवद्भक्त झाले व सजह स्फूर्तीनें कवन करूं लागले. एवढेंच नव्हें तर,’ त्याचे अभंग हिंदुधर्मांतील उदात्त रसानें अगदीं थबथबलेले असल्यामुळें, त्याचा उद्दाम संस्कार सर्व महाराष्ट्रावर होऊन,

---

१ तीर्थासी जाऊनी काय स्यां करावें ।
वाउगें हिंडावें पंथें तेणें ॥
माझें तीर्थ क्षेत्र पंढरी पैं जाणा ।
उघडें निधान दृष्टी पुढें ॥
मागें थोरथोरीं हेंचि पैं साधिलें ।
नाम्यासी दिधलें खेचर यानें ॥

नामयानें बंदर घेतलें । विठ्ठलासी जीत धरिलें ॥
नामा आलारे ह्मणती । भेणें कळिकाळ कांपती ॥
भाव भक्ति करोनी कडी । विठ्ठल पायीं जडली बेडी ॥
देह करोनि बंदीखान । विठ्ठल सांठविलें निधान ॥
सोहं शब्दें मार केला । विठ्ठल काकुळती आला ॥
नामा ह्मणे विठ्ठलातें । जीव गेल्या न सोडी तूतें ॥

२ परदारा परधन परनिन्दा परपीडन ।
सांडोनिया भजन हरिचें करा ॥
सर्वांभूतीं कृपा संतांची संगति ।
मग नाहीं पुनरावृत्ति जन्ममरण ॥
नामा ह्मणे नलगे साधन आणिक ।
दिधली मज भाक पांडुरंगें ॥

आमच्या भगवद्भक्तांची, संतसाधूंची, आणि अनेक कविजनांची परंपरा निपजण्यास, ते जणूंकाय कारणीभूतच झाले, यांत संशय नाहीं. फार तर काय सांगावें, पण विठ्ठलनामाच्या अनवरत भजनानें, व तत्प्रीत्यर्थ चालणाऱ्या अहोरात्र टाळीनें, अखिल महाराष्ट्रदेश अगदीं दणाणून गेला, आणि त्यायोगानें यवनांच्या दीन् दीन् शब्दाला आपोआपच विरजण लागत चाललें.

दामा. दामा हा नामदेवाचा बाप होय. हा देखील भगवद्भक्त असे; व तो विठ्ठलाची सेवा आणि वारी करी. तथापि, आपल्या एकुलत्या एक मुलाला पंढरीनाथाचें निःसीम वेड लागल्याचें पाहून, तो नाम्यावर कातावे, व चरफडे. इतकेंच नव्हें तर, तो त्याला वारंवार धंदा करण्याच्या हेतूनें शिकवी. परंतु, त्याचा कांहींच उपयोग होत नसल्यामुळें, विठोबाचें मात्र धिंडवडे निघत. ह्यासंबंधाचे दामाचे अभंग खचितच ध्यानांत ठेवण्यासारखे आहेत. सबब त्यांतील काहीं वेंचे येथें देतों.

बोले दामाशेटी । नाम्या त्वां ऐकावी गोष्टी ॥
पाहे संसाराची सोय । हाट बाजारासी जाय ॥
कुटुंब चालवणें तुज । वृद्धपण आलें मज ॥
तुजसाठीं नवस केला । शेखी हाचि कामा आला ॥
दामा म्हणे नामयासी । किती शिकवावें तुजसी ॥

नामदेव गेला राउळा त्वरित ।
सांगतसे मात केशवासी ॥

दामशेटी म्हणे नाम्या काय केलें ।
धोंडयासी कोंडिलें घरामाजीं ॥

गोणाई ही नामदेवाची आई असल्यामुळें, ह्या पोराची विरक्तवृति पाहून ती मनांत संत्रस्त होई; आणि प्रसंगविशेषीं आपली सर्व आग विठ्ठलावरच पाखडी. ती ह्मणे,

गोणाई,

लोकांचे हे पुत्र संसार करिती ।
आमुची फजीती केली नाम्या ॥
नाम्या विठोबाचा छन्द नाहीं बरा ।
मैन्द हा खरा गळाकादू ॥
याचे संगतीनें संसार जाळावा ।
भोपळा हा घ्यावा भीक मागूं ॥

विठ्ठलावर रागावून गोणाई त्याला असें सांगे कीं,

माझा नामा मज देई । जीव देईन तुझे पायीं ॥
तुझ्या संगती जे लागले । ते त्वां जिताचि मारिले ॥
यातें अनुसरती त्यांचें नुरे कांहीं ।
हा देव नोहे पाहीं घरघेणा ॥
याची भक्ति कैसी लौकिका वेगळी ।
संसाराची होळी केली नाम्या ॥

नामाच्या मातापितरांची वृद्धावस्था असून, हा तर संसाराकडे बिलकूल लक्ष्यच देत नसे. त्या कारणानें, त्यांच्या पोटापाण्याचे व अन्नवस्त्राचे सर्व प्रकारें हाल होत; आणि

त्यामुळें, ते अनेक वेळां आपल्या नेत्रांतून अश्रु ढाळीत. अशा प्रसंगीं, गोणाईनें केलेले अभंग इतके हृदयद्रावक आहेत, व त्यांच्या काव्यरसांतील सदयता इतकी मोहक आहे कीं, ते वाचकाच्या दृष्टीसमोर आणिल्यावांचून माझ्याच्यानें राहवत नाहीं. गोणाई म्हणते,

आम्हा वृद्धपण आमुचें पाळन ॥
करि तूं नाम्या सुजाण आमचें पोटी ॥
तुजला स्त्री पुत्र असोनी देऊळीं ॥
कारे जाशी वेळोवेळीं नामया तूं ॥
आम्हा अन्नवस्त्र न मिळे तत्वतां ॥
आमची कांहीं चिंता तुज नाहीं ॥
नाम्या तूं विठूचा नको छन्द धरूं ॥
गोणाईसी गहिंवरु नावरेची ॥
दोन प्रहर रात्र पाहोनी एकान्त ।
राजाई वृत्तान्त सांगे मातें ॥
अहो रखुमाई विठ्ठलासी सांगा ।
भ्रताराशीं कां गा वेडें केलें ॥
वस्त्र पात्र नाहीं खाया जेवायासी ।
नाचे अहर्निशीं निर्लज्जसा ॥
चवदा मनुष्यें आहेत माझे घरीं ।
हिंडतीं दारोदारीं अन्नासाठीं ॥
बरा मार्ग तुम्ही उमजोनी सांगा ।
नामयाची राजा भली नव्हे ॥

राजाईची देखील अशाच मासल्याची स्थिति होती; आणि

राजाई. नामा हा पंढरीच्या विटेसमोरच अहोरात्र नाचत असल्यामुळें, ती दुःखीकष्टी असे; व ही संसारयात्रा तिला अतिशयच कष्टमय वाटे. ह्या संबंधानें, तिचे अभंग सुद्धां फार प्रेमळ आहेत.

घरधन्यांनीं केला गुरु । बाई मी आतां काय करूं॥
असुनि नाहीं हा संसारु । चमत्कार कृपेचा ॥
धांव पाव गे मेसाई । कवणाचें ही नचले कांहीं ॥
सत्यपण तुझिये ठायीं । असुनि नाहींसें करि हें ॥
एकमेकांच्या पडती पाया॥लौकिकांतून गेले वाया॥
ह्मणती येगा पंढरीराया । ब्रह्मानन्दें डुलती ।
भोळी सासु गोणाबाई। पांढरा स्फटिक व्याली काई॥
त्यानें जोडला शेषशाई । ह्मणे राजाई काय करूं ॥

नारा[1], ह्मादा[2], गोंदा[3], आणि विठा[4] असे नामदेवाचे चार पुत्र; लाडाई[5], गोडाई, येसाई[6], व साकराई[7], अशा त्याच्या

---

१ नारा म्हणे विष्णुदास । आमुचे वंशीं हा विश्वास॥

२ नामयाचा महादा बळकट झाला ।
विठोबा आणिला चौघरांत ॥

३ ऐसा नामाचा पोंवाडा । म्हणे नामयाचा गोंदा ॥

४ विठा म्हणे देवा नको हा संसार ।
पायीं अभ्यंतर ध्यान देई ॥

५ लाडाई म्हणे देवा भेट देई वेगीं ।
ब्रीद तुझें जगीं दीनानाथा ॥

६ नाम्याच्या प्रसंगें आज्ञा प्राप्त झालें ।
येसाई तें लाधलें प्रेमसुख ॥

७ मजसी तंव आस चरणसेवादान ।
साकराई वचन देवा बोले ॥

चार सुना; निंबाई त्याची मुलगी; आऊबाई त्याची बहीण; आणि जनी त्याची दासी; हीं सब भक्तिमान असून, विठ्ठलचरणीं वाहिलेलीं होतीं, व त्यांचें आचरणही पवित्र, आणि वृत्ति समाधानी असे. इतकेंच नव्हे तर, ते अहोरात्र अभंग ह्मणून आपला काळ भजनांत घालवीत. त्यामुळें, त्यांचें मराठी भाषेवर मोठे उपकार झाले आहेत. आऊबाई ही अबला असून देखील, तिचें पारमार्थिक ज्ञान नांवाजण्यासारखें होतें; आणि ह्मणूनच त्याबद्दलचें आश्चर्य वाटल्यावांचून राहवत नाहीं. आऊबाई ह्मणते,

नारा, आऊबाई, इत्यादींचें मराठी भाषेवर झालेले उपकार.

शून्य साकारलें साध्यांत दिसे ।
आकार नासे तेथें शून्याकार दिसे ॥
शून्यतें सार शून्य तें सार ।
शून्यीं चराचर सामावलें ॥
नामयाची बहिण आऊबाई शून्यीं सामावली ।
विठ्ठलीं राहिली चित्तवृत्ति ॥

स्त्रीयांमध्यें, जनी हें खरोखरच एक नामांकित कविरत्न होऊन गेलें. उत्तर हिंदुस्थानांत ज्याप्रमाणें मिरा ही स्त्रीकवि व ईश्वरभक्त उदयास आली; अथवा द्राविड देशांत आव्हेयर नामक अबलेनें कवित्वाच्या बाबतींत आणि विद्वत्तेच्या संबंधानें ज्याप्रमाणें आपलें नांव गाजविलें; त्याचप्रमाणें जनीनें सुद्धां, आपलें नांव अखिल

जनीचें कवित्व, व त्यांतील सहृदयता.

महाराष्ट्रांत अजरामर करून ठेविलें. हिच्या काव्यांत सहृदयता असून, उत्साह भासमान होतो; आणि ग्राहकत्व असून, प्रेमळताही दृष्टीस पडते.

मनामार्गे मन लावूं । तेथें सर्व सुख पाहूं ॥
मग आम्हा काय उणें । दया करी नारायण ।
जनी म्हणे ऐसें मन । करूं देवा हो आधिन ॥

* * *

लज्जा सांडोनिया मांडावें दुकान ।
तेव्हां नारायण जोडी होय ॥

* * *

दळूं कांडूं खेळूं । सर्व पाप ताप जाळूं ॥
सर्व जीवामध्यें पाहूं । एक आम्ही होउनि राहूं ॥
जनी ह्मणे ब्रह्म होऊं । ऐसें सर्वांघटीं पाहूं ॥

भक्तिरस.

ह्यावरून, जनीची निःसीम भक्ति, ब्रह्मस्वरूपाची सर्वत्र व्याप्ति असल्याविषयीं तिची दृढबुद्धि, आणि परमेश्वर प्राप्त्यर्थ कोणते उपाय योजिले पाहिजेत, याबद्दलचा तिचा स्वानुभव, हीं चांगलीं व्यक्त होतात.

व अन्य गुण.

परंतु, ह्याखेरीज अन्य गुण देखील तिच्यांत चांगल्या रीतीनें वसत असल्याचें, तिच्या काव्यावरूनच दृष्टीस पडतें; व त्यामुळें, तिच्या स्वभावाची उन्नति, तिचें गांभीर्य, तिचा सदाचार, तिची सरलता, तिचें धैर्य, आणि तिचे उदात्त

विचार, यांची सहजीं कल्पना होऊन, त्यांचें आश्चर्य वाटल्यावांचून आपल्याला खचितच राहवत नाहीं.

जनी ही केवळ अबलाच होती. तरी देखील, तिनें आपल्या कर्तबगारीनेंच आपली गणना साधुसन्तांत करून घेतली; व

तिचें कर्तृत्व.

नर करे तो नरका नारायन बन जाय,

या सत्पुरुष वाक्याची सफलता दाखवून, त्याचा धडा स्वतःच्या आचरणानेंच लोकांस घालून दिला.

स्त्री जन्म म्हणुनीया न व्हावें उदास ।
साधुसंता ऐसें केलें जनीं ॥
संताचे घरीची दासी मी अंकीली ।
विठोबानें दिली प्रेमकळा ॥

* * *

नामयाची जनी भक्तीतें सादर ।
माझें तें साचार विटेवरी ॥

ह्याच कालांत, परळी वैजनाथ येथील जगमित्रनागा, परिसा

---

१ हीच उपासना धरा । नरदेहीं सार्थक करा ॥
भक्ति देवाची-करावी । भेद दृष्टि हे सोडावी ॥
आत्मा आहे हा भूतांत । भूतें आहेती आत्म्यांत ॥
ऐसा दृढ धरा भाव । जगमित्रनाग्याचा हा ठाव ॥

२ आणुमाजीं राम रेणुमाजीं राम ।
तृणकाष्ठीं राम वर्ततसे ॥

(पुढें चालू)

भागवत, विसोबा खेचर, जोगापरमानंद, बंका, कुर्मदास,

(मागील पृष्ठावरून पुढें चालू.)

बाहींजु भीतरीं राम चराचरीं ।
विश्वीं विश्वाकारीं व्यापलासे ॥
रामेंविण स्थळ रितें पै नाहीं ।
वर्ते सर्वांठायीं राम राम ॥
परिसाभागवत काया वाचा मनें ।
श्री रामावांचून आन नेणें ॥
१ तुझें निज सुख तुजपासीं आहे ॥
विचारूनि पाहे मना माजीं ॥
विवेक वैराग्य शोधूनिया पाहे ।
तेणें तुज होय ब्रह्म प्राप्ति ॥
ज्ञानाचा प्रकार सहजची झाला ।
आहेभाव गेला गळोनिया ॥
खेचर विसा ह्मणे येथें ओंकार निमाला ।
सहजची झाला ब्रह्म मूर्ति ॥

* * *

आहे तें तें बुडे नाहीं तें तें तरे ।
लटकी याचें खरें वाढवीसी ॥
म्हणे खेचर विसा तूं झालासि पिसा ।

* * *

या दृश्याची आशा तूं सांडी नाम्या ॥
जळ स्थळ काष्ठ पाषाणु । पिंड ब्रह्मांड अणुरेणु ॥
सर्वस्वें आपणूं । साक्ष असे ॥
खेचर म्हणे मज । ज्ञानराज गुरु ॥
नेणें अगोचरु । नामा हा केला ॥

कान्होपात्रा, केशव, सांवत्या[1] माळी, नरहरि[2] सोनार, नामाचे समकालीन कवि. गोरा[3] कुंभार, चोखामेळा, इत्यादि अनेक संत व कविजन होऊन गेले.

---

१ माझी हीन याती । तुह्मी उदार श्रीपति ॥ १ ॥
नको देऊं भुक्ति मुक्ति । माझी परिसावी विनंती २
सांवता ह्मणे पांडुरंगा । दुर्जनपण न्यावें भंगा ॥ ३ ॥

* * *

नेणों योग याग तपें । वाचें जपे विठ्ठल ॥ १ ॥
हेंचि आह्मचें निज धन । सुखसंपन्न विठ्ठल ॥ २ ॥
नलगे संपत्ति मान धन । आह्मां परिपूर्ण विठ्ठल ३
सांवता माळी ह्मणे देवा । मजसंता पायीं निरवा ४

२ आनन्द अद्वय नित्य निरामय ॥
जें कां ध्यान ध्येय निगम्याचें ॥
कैवल्य ठेवणें सदा जपें पोटीं ।
बैसोनी नेहटी शंभुराणा ॥
परब्रह्म परात्पर निरामय साचार ।
नरहरी सोनार ध्यानीं लक्षी ।

३ केशवाचे भेटीं लागलेंसें पिसें ।
विसरलों कैसें देहभान ॥
जाहली झडपणी जाहली झडपणी ।
संचरलें मनीं रूप आधीं ॥
न लिंपेची कर्मी न लिंपेची धर्मी ।
न लिंपे षडुर्मी पुण्यपापा ॥
म्हणे गोराकुंभार सहजीं जीवन्मुक्त ।
सुखरूप अद्वैत नामदेवा ॥

चोखामेळा महार.

चोखामेळा हा अतिशूद्र होता. इतकेंच नव्हे तर, तो महार जातीचा असल्यामुळें, " ओनामा, " " श्रीग, " किंवा " एकीएक, " हीं त्याच्या स्वप्नीं देखील नसत. परंतु, असें असूनही, त्याचें अभंगरूपी काव्य फारच चटकदार, अतिशय प्रेमळ, आणि विशेष आविर्भावाचें दिसतें. त्यानें देवापाशीं जी सलगी केली आहे, ती पाहून तर परम आश्चर्य वाटतें; व त्यावरून, त्याची निःस्पृहता, त्याच्या मनाचा मोठेपणा, त्याची स्वतःची योग्यता, आणि त्याच्या अंगचें पाणी, हीं आपोआप व्यक्त होतात.

एके वेळीं, त्यानें परमेश्वरापाशीं अशी देणगी मागितली कीं, ती ऐकून आश्चर्य वाटतें.

ऐसा पुत्र देगा देवा । जग म्हणे त्याला बावा ॥ १ ॥
कन्या ऐसी तरी देई । जैसी मिरा मुक्ताबाई ॥ २ ॥
ऐसा भक्तराज गुंडा । त्याचा तिहीं लोकीं झेंडा ३॥
इतकें न देवें तुझ्यानें । माझें करिगा निसंतान ॥ ४ ॥
दोहीमाजीं एक लेखा । बोले केवळ दास चोखा ५॥

व त्याची बायको, यांची रसज्ञता.

चोख्याची बायको सुद्धां मोठी भगवद्भक्त, ज्ञानी, व रसिक होती; आणि आपल्या पतीप्रमाणेंच ती देखील स्वतःच्या अभंगानींच पंढरीच्या विठ्ठलास प्रेमपूर्वक आळवी.

येई येई गरुडध्वजा । विटेसहित करीन पूजा ॥ १ ॥
धूपदीप पुष्पमाळा । तुज समर्पूं गोपाळा ॥ २ ॥

पुढें ठेवोनीया पान । वाढी कुंटुंबीं तें अन्न ॥ ३ ॥
तुम्हां योग्य नव्हे देवा । गोड करूनीया जेवा ॥ ४ ॥
विदुरा घरच्या पातळ कण्या । खासी मायबापा धन्या॥५
द्रौपदीच्या भाजीपाना । तृप्ति झाला नारायणा ॥६॥
तैसी झाली येथें परी । म्हणे चोखयाची म्हारी॥७॥

* * *

देहासी विटाळ म्हणती सकळ ।
आत्मा तो निर्मळ शुद्धबुद्ध ॥
विटाळा वांचूनी उत्पत्तीचें स्थान ।
कोण देह निर्माण नाहीं जगीं ॥
देहाचा विटाळ देहींच निर्धारी ।
म्हणतसे माहारी चोखीयाची ॥

भाग ८२ वा.

मराठी भाषेच्या युवावस्थेंतील द्वितीय काल.

सिंहावलोकन.

त्या द्वितीय कालांतील महत्वाच्या गोष्टी.

या कालांतील, किंबहुना मराठी भाषेच्या युवावस्थेंतील, पुष्कळ गोष्टी फारच महत्त्वाच्या असून, त्या निःसंशय विशेष रीतीनें ध्यानांत ठेवण्यासारख्या आहेत. सबब, त्यांचें येथें थोडक्यांत विवेचन करतों.

१ कवींची मालिका.
२ कवित्वाची परंपरा.
३ कुटुंबकवित्व.
४ स्त्रियांची काव्यकृति.
५ स्त्रीकविरत्नांची श्रेणी.
६ चाऱ्ही वर्णांची भक्तिपरायणता.
७ अतिशूद्रांची काव्यस्फूर्ति.
८ मराठी ग्रंथसंपत्तीची वाढ.
९ तिचा महाराष्ट्र देशावर झालेला परिणाम. आणि
१० धर्माभिमानामुळें देशाभिमानाचें बीजारोपण.

त्यांची अपूर्वता.

आतां, वास्तविक विचार केला तर, सदरहू गोष्टीपैकीं, एक एक बाब देखील, कोणत्याही देशांत सांपडण्याची मारामार प-

डेल. मग, एकसमवायच्छेदेंकरून तर, त्या कोठेंही कधींच दृष्टीस पडावयाच्या नाहींत, याबद्दलची बिलकुल शंकाच नको. खुद्द नामदेव हा ऐंशी वर्षांचा होऊन समाधिस्त झाला. तथापि, तितक्या मुदतींत सुद्धां, आमच्या महाराष्ट्रांत कमींत कमी लहानमोठे तीस कवी होऊन गेले, ही खचितच सामान्य गोष्ट नव्हे. तसेंच, बाप दामा हा कवि; त्याचाच मुलगा नामा हा कविव्याघ्र; व ह्याचे चाऱ्ही पुत्र देखील कवीच; ही कविपरंपरा पाहून, कोणालाही नवलच वाटण्यासारखें आहे. शिवाय, एकाच कुटुंबांतील सर्व माणसें, म्हणजे आई व बाप, मुलगा आणि मुलगी, सून व नातू, नात आणि नातसुना, हीं सर्व भक्तिमान असून कविपदाप्रत पावतात; एवढेंच नव्हें तर, ह्याच कुटुंबांतील मोलकरीण सुद्धां रसिकजनांनीं मान डोलाविण्यासारखी काव्यरचना करते, ही किती आश्चर्याची गोष्ट आहे!

अशा प्रकारची नामाच्या कुटुंबांतली स्थिति असून, चोखामेळ्याची बायको देखील अभंग करी, व आपल्या पतीस अनुसरून विठोबाला आळवी. त्याचप्रमाणें, विठ्ठलपंताच्या घरची देखील हीच स्थिति होती. कारण, त्यांचीं चाऱ्हीं अपत्यें, ह्मणजे निवृत्तिनाथ, ज्ञानदेव, व सोपानदेव, असे तीन पुत्र, आणि मुक्ताबाई कन्या, हीं सर्व कविरत्नें त्याच्या कुटुंबाचे केवळ अलंकारच होते.

त्यांचा अन्यत्र अभाव.

ह्या कालांतील कविमालिका, कविपरंपरा, व कुटुंबकवित्व, हीं स्वयमेवं आश्चर्य वाटण्यासारखीं आहेत. तथापि, त्यांत

देखील स्त्रियांच्या काव्यस्फूर्तीचा विचार केला, ह्मणजे आपल्याला फारच विस्मय वाटतो. शिवाय, ह्या स्त्रिया सुद्धां एक दोन नव्हत्या; तर, त्या अकरा होत्या; आणि ह्या अकराजणी आमच्या प्रिय महाराष्ट्रांतल्या अमूल्य मराठी भाषेवर यथाशक्ति अलंकार चढविण्यास कारणीभूत झाल्या, हें पाहून, किंवा ऐकून, भरतखंडांतल्या कोणत्या आर्यजनाचें हृदयारविन्द अत्यानन्दानें विकसित होणार नाहीं? अशा प्रकारचें अपूर्व उदाहरण, भरतखंडाबाहेर अन्यत्र कोठेंही असल्याचें आमच्या माहितींत नाहीं; व अनेक जातींत, अगर वर्गांत, अथवा निरनिराळ्या धंदेवाल्यांतही, अशा तऱ्हेची कवनस्फूर्ति आणि भक्तिप्रेम, अन्यत्र कोठें सुद्धां आढळून येत नाहीं.

मराठी भाषेच्या युवावस्थेचें सिंहावलोकन.

असो. मराठी भाषेच्या युवावस्थेंत, अशा प्रकारचीं जीं लहानमोठीं कविरत्नें चमकलीं, त्यांनीं केवळ आमचा महाराष्ट्र देशच अलंकृत केला, असें नाहीं. तर, तीं अखिल भरतखंडाचेंच तिलक होण्यास कारणीभूत झालीं; आणि आमच्या मराठी भाषेच्या ग्रंथसंपत्तींत तर, त्यांनीं निःसंशय फारच महत्वाची भर पाडली; असें ह्मणण्यास बिलकुल हरकत नाहीं. परंतु, ह्या संतमालिकेचे आमच्यावर खरोखरच याहीपेक्षां जास्त उपकार झाले आहेत. सबब, ते सांगितल्याशिवाय तर माझ्याच्यानें अगदींच राहवत नाहीं. ते हे कीं, त्यांच्या निःसीम भक्तिपरायणतेमुळें, सर्व महाराष्ट्रदेशांतल्या लोकांची आपल्या धर्मावरील

श्रद्धा शनैः शनैः वाढत जाऊन, तिचीं मुळें एकसारखीं सर्वत्र पसरलीं. फार तर काय सांगावें, पण, मराठी भाषेच्या ह्या युवावस्थेंतच त्या श्रद्धात्मक मूळांचें भगवद्गुणमहिमामृतरसानें योग्य पोषण होऊन, तीं बिनघोर वाढीस लागलीं. त्याच कारणानें, त्यांस नूतन अंकुर फुटले. ह्या अंकुरांनींच स्वधर्माभिमान जागृत केला. ह्यानेंच सर्व देश दणाणून सोडला. त्या योगानेंच त्याला तीव्रता प्राप्त झाली. तिच्यामुळेंच स्वदेशप्रीतीचें सनातन, परंतु भर्जित झालेलें बीज पुनश्च सुक्षेत्रीं रोंवलें गेलें. ह्याच बीजाची व स्वधर्माभिमानात्मक अंकुरांची कालान्तरानें आपोआप सल्लग्नता झाली. ह्या सल्लग्नतेनेंच स्वातंत्र्यस्पृहा वाढविली. आणि हीच स्पृहा पारतंत्र्याचा अतीव तिरस्कार उत्पन्न करण्यास सर्वांशी कारणीभूत झाली.

भाग ८३ वा.

मराठी भाषेची युवावस्था.

तृतीयकाल.

इ० स० १३५१–१५४७.

मराठी भाषेच्या युवावस्थेच्या तृतीय कालांतील ऱ्हास.

हा काल सुमारें दोनशें वर्षांचा असून, त्यांत खऱ्या योग्यतेचें अगर नांवाजण्यासारखें असें एकही महाराष्ट्र कविरत्न निपजल्याचें दिसत नाहीं. तथापि, ह्या कालांतील असंख्य गोष्टी ध्यानांत ठेवण्यासारख्या आहेत. इतकेंच नव्हे तर, त्या सर्वांचा परिणाम, क्वचित् प्रत्यक्ष, व क्वचित् पर्यायानें, आमच्या मराठी वाङ्मयावर एकसारखा होत गेल्यानें, तत्संबंधीं विस्तृत ऊहापोह केल्याशिवाय गत्यन्तरच नाहीं. सबब, त्याबद्दलची यथावकाश हकीकत येथें देतों.

त्याचें कारण.

गिझनीचा महंमद ह्यानें आपला मोरचा भरतखंडाकडे फिरविल्यावर, इ०स० च्या अकराव्या शतकापासून, अविंधांचें कायमचें ठाणें ह्या पवित्र भूमींत झालें; आणि इ० स० च्या तेराव्या शतकांत तर, ते दक्षिणेंत व प्रत्यक्ष महाराष्ट्रांतही येऊन थडकले. तदनन्तर, त्यांच्या एकसारख्या स्वाऱ्या, त्यांची

सर्वत्र धामधूम, त्यांचा चोहोंकडे सुळसुळाट, त्यांचा लुटारूपणा, त्यांची बेबन्दनगरी, त्यांची झोटिंग पादशाही, त्यांची परधर्मविषयक असहिष्णुता, त्यांचा प्रजेवर जुलूम, त्यांनीं बलात्कारानें करविलेलें धर्मान्तर, त्यांचें दांडगाईचें वेशान्तर, त्यांनीं केलेला देवालयांचा विध्वंस, त्यांच्या एका हातांतळें कुराण व दुसऱ्या हातांतील तलवार, आमच्या अमूल्य ग्रंथसंपत्तीची त्यांनीं केलेली होळी, मराठीचा ऱ्हास, यावनी भाषेचा प्रादुर्भाव, तिच्यांतील शब्दांचा आमच्या घरींदारीं प्रवेश, राजगृहीं आणि दरबारांत तिची मान्यता, इत्यादि यच्चावत् गोष्टी इतिहासज्ञांस तर सर्व प्रकारें महशूरच आहेत. सबब, त्या सांगण्याची येथें आवश्यकता नसून, तत्कथनार्थ ह्या स्थळाची योजना देखील नाहीं. मात्र, आमच्या मराठी भाषेवर, त्यांचा कितपत, कसा, व कोणता परिणाम झाला, हें सांगण्यासाठींच त्यांचें येथें किंचित् दिग्दर्शन केलें आहे.

फारशी भाषेचा प्रचार व मराठीची पिछेहाट.

कांहीं नामांकित अपवाद खेरीज करून, प्रायः मुसलमानांची कारकीर्द, कोणत्याही प्रकारें, केव्हां देखील, सुखावह ह्मणून झालीच नाहीं. आणि त्याच कारणानें, त्यांचें आगमन ह्मणजे अनिष्टाचें व अरिष्टाचें मूळ

---

१ एक आंग्ल इतिहासकार देखील असें ह्मणतों कीं,

"I do not find that Mahomedan kings conferred any benefits on their Hindu subjects, but vast ruins attest their ancient magnificence."

(Indian History. By Rev. Pope. 1893. Part I. P. 57.)

होय, असेंच ह्मणणें प्राप्त येतें. देशोन्नति, राष्ट्रोन्नति, धर्मोन्नति, इत्यादि तर त्यांच्या स्वप्नींच नव्हती. पण, सामान्यतः, भाषेच्या संबंधानें सुद्धां, त्यांच्या आगमनानें आमच्यावर ह्मणण्यासारखे कसलेही उपकार न होतां, उलट अपकारच झाले आहेत, असें ह्मणावें लागतें. कारण, महाराष्ट्र व दक्षिण प्रांत जिंकल्यावर, त्यांनीं सर्वत्र फारशी भाषा आणि फारसी लिपिच सुरू केली; व मराठीला अजिबात फांटा देऊन, फक्त फारसीचेंच महत्व ज्यास्त वाढविलें.

तिची दैन्यावस्था.

खऱ्या दृष्टीनें पाहिलें तर, हल्लीं ज्याप्रमाणें मराठी भाषेची दैन्यदशा झाली आहे, आणि आपलीं मुलेंबाळें, आप्तसोयरे, इष्टमित्र, इत्यादींबरोबर, लेशमात्रही कारण नसून देखील, ज्याप्रमाणें आपण इंग्रजींतच सर्व कांहीं व्यवहार करतों, त्याचप्रमाणें त्यावेळीं फारसी भाषेंतच यच्चावत् कारभार चाले. आणि त्यांतही विशेष नवल हें कीं, फारसी लिपी ऐवजीं जरी क्वचित् कोठें मोडी अगर देवनगरी लिपीचाच उपयोग करण्यांत येई, तरी तिची भाषा ह्मटली ह्मणजे फारसीच असे, ही गोष्ट ध्यानांत ठेवण्यासारखी आहे.

आशा प्रकारची वस्तुस्थिति असल्यामुळें, ह्या यवनां-

---

१ आमच्या मराठी भाषेला विश्वविद्यालयांत एम. ए. ची परीक्षा खेरीज करून, अजूनसुद्धां स्थल मिळत नाहीं; व त्यांत तिचा शिरकाव होण्याचें केवळ लांबणीवरच पडत चाललें आहे; हेंच तिच्या दीनावस्थेचें खरें द्योतक होय. ह्या संबंधाचा आम्ही पुढें योग्य त्या स्थळीं यथावकाश विचार करणार आहों. सबब, येथें तद्विषयक जास्त विवेचन केलें नाहीं.

त्यामुळें तिची रसातळास जाण्याची पाळी.

च्या अमलांत आमचा महाराष्ट्र देश, आमचें महशूर मराठी राष्ट्र, व आमची ऐतिहासिक महत्वाची मराठी भाषा, हीं सर्व रसातळासच जातात कीं काय, याबद्दलची प्रत्येकास मोठी भीति वाटूं लागली. कारण कीं, अविघ्न हे बलिष्ठ झाले असून, त्यांजकडून होत असलेल्या अनन्वित कृत्यांचा प्रतिकार करण्याचें सामर्थ्य, महाराष्ट्रवासिजनांत बिलकुल राहिलें नव्हतें.

हें अरिष्ट टळल्याचीं कारणें.

परंतु, अशा वेळीं, ह्या स्वेच्छाचारी यवनांचा असह्य जुलूमच आमच्या निराश आणि उदास वृत्तीवर स्वातंत्र्यस्पृहेचे अपूर्व संस्कार करण्यास कारणीभूत झाला. त्यांच्या अविचारी धर्मवेडेपणानेंच आमच्या धर्माभिमानास जागृत केलें. त्यांची दुष्टबुद्धि, त्यांचें नीतिशैथिल्य, व पातिव्रत्यभंग करण्याविषयीं त्यांची तीव्र लालसा, ह्यांनींच आमचें पित्त खवळलें. आणि आमच्या मराठी भाषेस त्यांनीं बहिष्कृत केल्यानेंच, जणूंकाय तिला स्वस्थानापन्न करण्याची आमच्या मनाची प्रवृत्ति झाली.

---

१ आमचें राष्ट्र व्यवहारदक्ष, शूर, आणि लढवय्ये असल्याविषयीं, पाश्चात्य व यवन या सर्वांची पुरी खात्री झाली आहे. ग्रँण्ट् डफ् ह्मणतो, "Ibrahim Adilshah, upon his accession to the throne of Bijapoor, in 1555, showed a great preference for the natives of Maharastra, *both as men of business and as soldiers.*"

(History of the Marathas. 3rd Edn. P. 34.)

असो. ह्या तृतीय कालांतच फारसी भाषेचा शिरकाव झाल्यामुळें, मराठीचा ऱ्हास होण्याचीं जरी बरींच चिन्हें दिसत होतीं, तरी महाराष्ट्रांतील पुष्कळ व्यवहार मराठी भाषेंतच चालल्याशिवाय गत्यन्तर नव्हतें. त्यामुळें, ती कांहीं अंशानें जिवंत राहिली. कारण, आमच्या आपापसांतील खासगत लिहिणें व महत्वाचा पत्रव्यवहार मराठींतच चाले, आणि देशाचा किंवा राजघराण्याचा इतिहास देखील ह्याच भाषेंत लिहून ठेवण्यांत येई. त्याचप्रमाणें, राज्याभिषेक, राज्यक्रान्ति, लहान मोठे ध्यानांत ठेवण्यासारखे प्रसंग, अनेक लढाया, व दुसऱ्या महत्वाच्या गोष्टी, इत्यादि सर्व मराठी भाषेंतच लिहून ठेवण्याचा प्रचार असे. आतां, अशा प्रकारें देशाचा इतिहास लिहून ठेवण्याची पद्धत आमच्या भरतखंडांत नवीन नसून, ती फारच जुनी असल्याचें दिसतें; आणि आमचा प्राचीन इतिहास खऱ्या प्रकारें समजण्यास देखील तीच साधनीभूत झाली आहे, असें म्हणावें लागतें. ह्या लेखांस बखरी म्हणतात, व ह्या कालांतील बखरीसुद्धां ग्राण्टडफ् इतिहासकारास उपलब्ध होत्या, यांत तिळमात्रही शंका नाहीं.

---

१ कारण, त्यानें ह्या बखरींचा आपल्या इतिहासांतच उल्लेख केला आहे. तो म्हणतो,

" And few circumstances may be gleaned from the legends (or *Bakhars*), (of the period of the Bahminee dynasty). which are found in possession of most of the descendants of the old Maratha families, " (P. P. 23-24).

भाग ८४ वा.

मराठी भाषेची प्रौढावस्था.

इ० स० १५४८-१९००.

प्रथमकाल.

इ० स० १५४८-१६०९.

मराठी वाङ्मयाची दोन शतकें गाढ निद्रा.

मराठी भाषेच्या युवावस्थेंतील नामदेव कवी बरोबरच, आमच्या महाराष्ट्र देशांतील एकंदर कविमंडल मावळलें; निदान, तें कांहीं कालपर्यंत तरी खचितच लयास गेलें, असें म्हणण्यास हरकत नाहीं. किंबहुना, आपल्या ह्या प्रिय पुत्राच्या विरहदुःखानें, श्री वाग्देवी सरस्वती परम विव्हल होऊन, तिनें या महाराष्ट्र देशांतून आपला गाशा गुंडाळला, आणि त्याच्या मागोमागच वैकुंठाप्रत गमन केलें; असेंच म्हणणें प्राप्त येतें.

असो. ही वाग्देवी आमच्या महाराष्ट्र देशांतून जी एकदां गेली, ती फिरून आपल्या माहेरीं लौकर म्हणून परतलीच नाहीं. जणूंकाय एकनाथाच्या जन्माची वाट पहात, ती सुमारें दोनशें वर्षे आपल्या पतिसमवेत श्वशुरगृहींच राहिली; आणि ह्या प्रौढ कवीबरोबरच ती पुनश्च महाराष्ट्रांत प्रकट झाली.

एकनाथाच्या जन्माबरोबर तिचा सतेज उपक्रम.

एकनाथ हा इ० स० १५४८ सालीं जन्मला, व इ० स० १६०९ मध्यें फाल्गुन वद्य ६ ला, पैठण मुकामीं मरण पावला. ह्याच्या वडिलाचें नांव सूर्यनारायण असून, मातुःश्रीचें नांव रुक्मिणी होतें. एकनाथाचा बाप मोठा विद्वान आणि भगवद्भक्त असे; व हेच गुण त्याच्या पुत्रांतही विकास पावल्याचें दिसतें. बाप लहानपणींच वारल्यामुळें, ह्याच्या पालनपोषणाचा भार त्याच्या वृद्ध आजावर पडला, आणि केवळ नाइलाजास्तव तो त्यानें आपल्या गलितावस्थेंतही कंठला. एकनाथ वयांत आल्यावर, कालान्तरानें त्याचें लग्न होऊन, त्याची बायको गिरजाबाई इजपासून त्याला दोन कन्या व एक पुत्ररत्न प्राप्त झालें, असें केशवदासाच्या ओंवीवरून कळून येतें.

श्रीनाथ कृपेशीं सत्पात्र । गिरिजाबाई सुक्षेत्र ॥
प्रसवली ते पुत्र । कन्या विचित्र पैं दोघी ॥

एकनाथाचा गुरु.

एकनाथ हा जनार्दनस्वामीचा पट्ट शिष्या असून, त्याच्या कृपेनेंच त्याला भक्तींचें रहस्य[1] व ब्रह्मज्ञानाची किल्ली[2] प्राप्त झाली

---

१ भक्तीच्या प्रभावाचें वर्णन एकनाथानें थोडक्यांतच परंतु चांगलें केलें आहे. तो म्हणतो,

भक्तीच्या पोटीं मुक्ति पैं आली । भक्तीनें मुक्तीतें वाढविली ॥

* * *

भावें भक्ति फळे भावें देव मिळे । निजभावें सोहळे आनंदाचे ॥
(एकनाथी अभंग.)

२ आपल्या "**स्वात्मसुख**" नामक ग्रंथांत एकनाथ लिहितो,

आतां ब्रह्मज्ञानाची किल्ली ॥ सांगेन एकेच बोली ॥
ज्याची कल्पना निमाली ॥ तो प्राप्ति पुरुष ॥ ४१८ ॥
(स्वात्मसुख.)

होती, असें ह्मणण्यास हरकत नाहीं. जनार्दनस्वामीनें एकनाथास अमृतानुभव आणि ज्ञानेश्वरी समजावून सांगितली, व त्यानन्तर सर्व तीर्थयात्रा करण्याविषयीं आज्ञा दिली. त्यामुळें त्याची दीर्घ दृष्टि होऊन, एकंदर अनुभव वाढला; आणि परमार्थ ग्रहणांतही त्याचें पाऊल पुढेंच पडत चाललें.

एकनाथी भागवत

तीर्थयात्रा करीत करीत काशीस गेल्यावर, एकनाथानें इ० स० १५७३ सालीं एकनाथी भागवत लिहिलें, व तें फारच चांगलें उतरलें त्यावेळीं, त्याचें वय अवघें पंचवीस वर्षांचेंच होतें, ही गोष्ट मनांत आणिली म्हणजे, त्याच्या कृतीची खरोखरीच धन्यता वाटते. भागवतांतील एकादश स्कंधाच्या अपूर्व रुचीचा लाभ सर्वांस एकसारखा व्हावा एतदर्थ, व केवळ लोकोपकारार्थच एकनाथानें ह्या ग्रंथाची रचना केली, यांत शंका नाहीं. ह्यांतील कांहीं भाग निःसंशय अप्रतीम असून, ते भक्तिरसानें इतके कांहीं थबथबलेले आहेत कीं, ते वाचावयास लागलें म्हणजे निःसीम आनन्दोद्वेगानें, आपल्या नेत्रकमलांतून एकसारख्या अश्रुधाराच सुरू होतात, आणि आपलें मन अगदीं तल्लीन होऊन जातें, असें आह्मी आपल्या स्वानुभवानें खात्रीपूर्वक सांगतो. हा ग्रंथ सुमारें वीसहजार होईल, असें वाटतें.

एकनाथगुणमंडल.

एकनाथ हा केवळ संत, भगवद्भक्त, आणि कविच नव्हता. तर, तो पुरा मर्मज्ञ व यथार्थ गुणदोषविवेचकही असे.

शिवाय, ग्राह्याग्राह्य विचारांत देखील त्याची दृष्टि चांगली चालत असल्यामुळें, त्यानें ह्या बाबतींत आपल्या देशबांधवास एक प्रकारचें सुरेख वळणच लावून दिलें होतें, असेंही ह्मणण्यास हरकत नाहीं. कारण, इ० स० १५८४ सालीं, ज्ञानेश्वरी शुद्ध करण्याचें त्याच्या मनांत आल्यावरून, तिच्या उपलब्ध असलेल्या सर्व प्रती त्यानें एकत्र जमविल्या, आणि त्यांचें यथावकाश निरीक्षण करून, त्यावरून ज्ञानेश्वरीची एक शुद्ध प्रत तयार केली. आणि सांप्रतकाळीं ज्ञानेश्वरीचें जें शुद्ध स्वरूप आपल्या दृष्टीस पडतें, तें निव्वळ त्याच्याच श्रमाचें फल होय, यांत तिळमात्रही शंका नाहीं.

भावार्थरामायण.

१ एकनाथी भागवताप्रमाणें, २ भावार्थ रामायण देखील एकनाथाचीच सर्वमान्य कृति असून, ती चांगली उतरली आहे. युद्धकांडापर्यंत, हिचे चव्वेचाळीस अध्याय होऊन, ग्रंथ संख्या (३९,३२९ ह्मणजे) सुमारें चाळीस हजार झाल्यावर, एकनाथाची प्रकृति बिघडली, व त्याची शक्ति आणि उत्साह, हीं अगदीं नाहींशीं झालीं. त्यामुळें, आपलें देहावसान कदाचित् लवकरच होईल असें त्यास वाटून, ह्या ग्रंथाचा राहिलेला अवशिष्ट भाग, त्यानें आपल्या गावबा नामक प्रिय शिष्यास पुरा करावयास सांगितला. गावबांनीं हा जोड इतक्या बेमालुम रीतीनें सांधला आहे कीं, बाणाच्या पुत्रानें कादंबरीचा केलेला उत्तरार्ध ज्याप्रमाणें बाणकृत पूर्वार्धापासून

अगदीं ओळखूं येत नाहीं, त्याचप्रमाणें गावबाची रचना व एकनाथाची कृति, यांत सुद्धां भिन्नत्व भासमान होत नाहीं. आणि म्हणूनच त्यासंबंधानें, कै० परशुरामपंतांनीं खालीं लिहिल्याप्रमाणें उद्गार काढिले आहेत.

जरी पात्र पालटलें । तरी न्यूनत्व नाहीं आलें ॥
स्वर्ण पात्रीं कीं पर्णपुटीं । अमृतस्वादा भेद न पडे ॥

तद्विषयक मयूरकवि-प्रशंसा.

एकनाथी भागवत व भावार्थ रामायण हे ग्रंथ इतके अपूर्व झाले आहेत कीं, त्याचा महिमा मयुरासारख्या रसिक कवीनें देखील मोठ्या प्रेमानें वर्णन केला आहे. तो म्हणतो,

ग्रंथ श्रीभागवत श्रीरामायण करी सुविस्तर ते ॥
जरि न रचता दयानिधि केवळ जडजीव तरि कसे तरते ॥

(एकनाथस्तव).

एकनाथाचे अन्य ग्रंथ.

ह्या खेरीज एकनाथाचे अन्य ग्रंथ म्हटलें ह्मणजे, ३ चतुःश्लोकी भागवत, ४ आनंद लहरी, ५ हस्तामलक, ६ रुक्मिणी स्वयंवर, ७ स्वात्मसुख, आणि ८ किरकोळ पदें व अभंग, हे होत. हे सर्व ग्रंथ नीतीनें, भक्तिरसानें, व पारमार्थिक ज्ञानानें, ओतप्रोत भरलेले आहेत. त्यामुळें, त्यांचा अचुक परिणाम आमच्या देशावर आणि राष्ट्रावर झाला असून, त्या योगानेंच ह्या महाराष्ट्र देशांत एकामागून एक

१ भारतीय साम्राज्य पूर्वार्ध. पु. २ रें. पान २२९।२३० पहा.

असे अनेक कविवर होऊन, त्यांनीं ह्या देशाचा जीर्णोद्धार केला, आणि त्याला खरोखुरीच ऊर्जितावस्थेप्रत आणिलें.

एकनाथाची रसिकता.

एकनाथ हा स्वभावतः विरागी असूनही, परम गुणज्ञ व नितान्तरसिक असे, यांत संशय नाहीं. कारण, प्रणयी जनांचें गूढतम हृद्गत देखील तो जाणी, आणि त्यांच्या मनोव्यापरांचें अगदीं हुबेहूब चित्रच तो रेखी. त्याचप्रमाणें, सौन्दर्यश्री अथवा नैसर्गिक वैभव, यांचें वर्णन करण्यांतसुद्धां तो आपलें सहज नैपुण्य जितक्या अंशानें व्यक्त करी, तितक्याच अंशानें श्रृंगार व वीररस, करुणा आणि रौद्ररस, भयानक व भीभत्सरस, यांचें आविष्करण आणि लालन करण्यांतही, तो आपल्या अंगचें कविचातुर्य मोठ्या खुबीनें व विलक्षण रीतीनें दाखवी.

त्याच्या कृतींतील शृंगार रस.

श्रृंगाररसांत कविमजकूरचें स्वभावज नैपुण्य खालीं लिहिलेल्या उक्तींवरून वाचकांच्या ध्यानांत येईल.

शरीर अत्यन्त सुकुमार । खुपों शकती चन्द्रकर ॥
पद्मग पद्मिणी ती पुढें निबर । निजांगें अरुवार नभापरिस॥२५
तिचें होतांची स्पर्शन । मनादि इन्द्रिया गुदगुदल्या पूर्ण ॥
फिकें अमृताचें गोडपण । तिचें बरवेंपण देखोनी ॥ २६ ॥
देखोनी तिचीया मुखासी । अत्यन्त सुख डोळयासी ॥
ते मुखीं झाले क्षेत्रसंन्यासी । आन पहावयासी नावडे ॥२७॥
तिसी होता डोळेभेटी । धैर्याची विरे गांठी ॥
बरवेंपणें अत्यन्त लाटी । देखिल्या दृष्टी उपडेना ॥ २९ ॥

(बालकांड. अ. १४).

भीमकी कटाक्षाच्या घायीं । मदन पाडिला ठायींच्या ठायीं॥
तेथें सुरनरांचा पाड काई । निधडा पाही श्रीकृष्ण ॥२६॥
नभीं इन्द्र धनुष्य रेखा । तैसा भांगीं सिंदूर देखा ॥
भुलवावया यदुनायका । मोहनीमुखा पूजियेलें १९ ॥
भीमकी मुखकमल सुन्दर । कृष्णपणें श्रीकृष्ण भ्रमर ॥
आमोद भावाचे शेजार । निजमंदिर हरीचें ॥ ३६ ॥

(रुक्मिणीस्वयंवर. अ. ७).

वीर रस.

त्याचप्रमाणें, वीररसाचा मासलाही मी येथें थोडक्यांत देतों:—

ससा चढोनि सिंहाचे माथां । जरी नाचवील निजसत्ता॥
तरी तुज मज समता । युद्धीं सर्वथा घडेना ॥ ३३ ॥

* * *

शस्त्र घालीन मी गदू । काढीन अभिमानाचा रेन्दू ॥
तोडीन जरामरण कन्दू । हृदय शुद्ध करीन मी ॥ ३९ ॥
ऐकुनि खवळला मागध । जाहला कवचेसी सन्नद्ध ॥
किती करिसी अनुवाद । होई सावध चावटा ॥ ४० ॥

करुणा रस.

आतां,ह्या कविवराच्या करुणारसाचा चुटकाही येथें दिल्या-वांचून माझ्याच्यानें राहवत नाहीं.

श्रीरामाचें वनप्रयाण । त्या सांगातें जाईल लक्ष्मण ।
त्यासवें जाईल माझा प्राण । सत्य जाण कैकेयी ॥ ११० ॥

* * *

म्हणोनी चरणीं ठेविला माथा । क्षमा करी मज दशरथा ॥
न मागावी हे वरदकथा । वना रघुनाथा न दवडावें ॥११३

(अयोध्याकांड. अ. ४).

श्रीरामाचें रूप गुण । आठवितां मूर्छा आली पूर्ण ॥
मूर्छेसवें गेला प्राण ॥ राम स्मरण करितची ॥ ४५ ॥

रौद्र, भयानक, व भीभत्स, रस.

त्याचप्रमणें, **रौद्र**, **भयानक**, **आणि बीभत्स**, या रसांचाही.मासला देऊन, हा **एकनाथ**-विषयक लेख पुरा करतों.

हाकें कांपती लोकालोक । विक्राळ दाढा विकट मुख ॥
जे भयानका भयानक । तिन्ही लोक गिळूं पाहती ॥८५॥

* * *

ऐकतां राक्षस आरोळी । भयें द्विज पडीले भूतळीं ॥
येकाच्या बैसल्या दांतखिळी । येक ते चळचळी कांपत॥९५
येकाचीं धोत्रें गळतीं । कैक ते धोत्रावरी मूतती ॥
कैकां अधोवात सरती । कांहीं करिती महाशब्द ॥ ९६ ॥
येक आरडती ओरडती । येक दीर्घ स्वरें रडती ॥
येक उघडे पडती । येक चरफडती अतिधाकें ॥ ९७ ॥
येकाचे खुटखुटती दांत । येकाचे फुटले ओंठ ॥
येकाचें भयें फुगलें पोट । अतिसंकट ब्राह्मणा ॥ ९८ ॥

(अयोध्याकांड. अ. २. ९. १०)

ह्या सर्व वर्णनांत, वस्तुस्थितीचें चित्र किती हुबेहूब रेखलेलें दिसतें, हें कोणाच्याही लक्षांत तेव्हांच येण्यासारखें आहे.

एकनाथाचे समकालीन अन्य कवि, गावबा, दासोपंत, इत्यादि.

गावबा, **चिन्तामणशास्त्री**, **दासोपंत**, **सरस्वती गंगाधर**, इत्यादि कवी **एकनाथाचेच** समकालीन होत. **गावबानें भावार्थ**-रामायणांतल्या युद्धकाण्डांतील उत्तरार्धापासून सुरुवात करून तो पुरा केला. **चिन्तामण** शास्त्र्यानें ध्रुवाख्यानावरील दिण्डया, पदें, वगैरे रचल्याचें कळून येतें. हा **एकनाथाचा** जामात होय. **दासोपंताचीं** गीतेवर ओंवीबद्ध टीका आहे, व ही सव्वालक्ष असल्याचें

मोरोपंत कवीच्या लेखावरून दिसतें. कारण, तो एके ठिकाणीं असें म्हणतो कीं,

दासोपंतीं केला गीतार्णव मानवा सवालक्ष ॥

यावरून, हा ग्रंथ फारच विस्तृत असावा, यांत शंका नाहीं. दासोपंत हा नृसिंह सरस्वतीचा शिष्य होता, आणि तो जोगाईचें आंबें येथें असे. सरस्वती गंगाधर याचें आडनांव साखरे होतें,व त्याची सुप्रसिद्ध कृति गुरुचरित्र ही भाविकजनांस सर्व प्रकारें मान्य आहे. हिच्यांतच ह्यानें आपलें कुलवृत्त थोडक्यांत दिलें आहे; सबब, तें वाचकाच्या सोईसाठीं येथें संक्षेपानें नमुद करतों.

अपस्तंब शाखेसी । गोत्र कौण्डिण्य महाऋषी ॥
साखरे नाम ख्यातीसी । सायंदेवापासाव ॥ ३८ ॥
त्यापासून नागनाथ । देवराव तयाचा सुत ॥
सदा श्रीसद्‌गुरुचरण ध्यात । गंधाधर जनक माझा॥ ३९
कश्यपाचे गोत्रीं । चौडेश्वर नामधारी ॥
वागे जैसा जन्हु अवधारी । अथवा जनक गंगेचा ॥ ४१ ॥
त्याची कन्या माझी जननी । निश्चयें जैशी भवानी ॥
चंपा नामें पुण्यखाणी । स्वामिणी माझी परियेसी ॥ ४५ ॥
म्हणोनी सरस्वती गंगाधर । करी संतासी नमस्कार ॥
श्रोतया विनवी वारंवार । क्षमा करणें बाळकासी ॥४५॥

(श्री गुरुचरित्र अ० १ ला.)

मृत्यूंजयस्वामी, कृष्णदास, व शिवरामस्वामी.

ह्याच सुमारास मृत्यूंजयस्वामी, कृष्णदास, आणि शिवराम स्वामी, हे देखील उदयास आले असावे, असें वाटते. मृत्यूंजयस्वामीचा अमृतसार नांवाचा

ग्रंथ व कांहीं पदें असून, कृष्णदासाचीं फक्त पदेंच उपलब्ध आहेत. हा जयरामस्वामीचा गुरु होय. शिवरामस्वामी हे रंगनाथस्वामिच्या तीर्थरूपांचे गुरुबंधु असल्याचें कळतें. ह्याची मुख्य कृति झटली ह्मणजे "देहास बोध" ही असून, याखेरीज त्याची अनेक पदेंही आहेत.

ह्या प्रौढावस्थेच्या कालांत, मराठी भाषेला मिळालेला राजाश्रय.

अशा रीतीनें, अनेक कविकुलपरंपरेच्या साहाय्यानें, त्यांच्या दीर्घोद्योगानें, आणि त्यांच्या श्रमसातत्यानें, आमच्या मराठी भाषेचें दैन्य, तिचा पोरकटपणा, व तिची उच्छृंखलावस्था, हीं शनैः शनैः नाहींशीं होत जाऊन, तिला प्रौढत्व येण्याचीं सुचिन्हें चांगल्या प्रकारें दिसूं लागलीं. तथापि, त्यांतही आणखी एक महत्वाची आणि विशेष ध्यानांत ठेवण्यासारखी गोष्ट, ह्याच काळाच्या पूर्वार्धांत घडून आल्यामुळें, दुधांत साखर घातल्यासारखें होऊन, महाराष्ट्र वाङ्मयाला जणूंकाय तेजीच येत चालली. ही चिरस्मरणीय गोष्ट म्हटली म्हणजे मराठी भाषेला मिळालेला राजाश्रय, तिचें दरबारांत होऊं लागलेलें चलन, व तिचा सरकारच्या दफ्तरांत झालेला प्रवेश, ही होय.

आतां, मराठी भाषेच्या संबंधानें, ह्या सर्व गोष्टी अगदीं नमूद करण्याजोग्या आहेत. सबब, यावनी कारकीर्दींत, महाराष्ट्र वाङ्मयाला उत्तेजन मिळण्याचा हा असंभवनीय, परंतु निःसंशय अपूर्व योग, कसा आणि कोणत्या कारणांनीं घडून आला, हें वाचकाच्या लक्षांत येण्यासाठीं, त्या बद्दलचा पूर्वापर त्रोटक वृत्तांत येथें देतों.

त्याचीं कारणें.

इ० स० १५२९ सालच्या सुमारास, बुऱ्हाण निजामशहा बादशहानें कावेरशीण नामक ब्राह्मणास मुख्य प्रधानाची वस्त्रें देऊन, त्याला आपला पेशवा केला. त्यामुळें, निजामशाही सरकारांत ब्राह्मणांचें चलन सुरू होऊन, हिंदूंचें वजन आपोआप वाढत गेलें. तदनन्तर, इ० स० १५५५ सालीं, इब्राइम आदिलशाहा हा विजापूरच्या तक्तावर बसला; व महाराष्ट्रांतले लोक शूर, लढवय्ये, पराक्रमी, आणि व्यवहारज्ञ असल्यानें त्याला ते फारच आवडले; व त्यामुळें, तो त्यांनाच मोठमोठ्या हुद्याच्या जागांवर नेमूं लागला. इतकेंच नव्हें तर, महाराष्ट्र देशावर, व महाराष्ट्र भाषेवर, त्याचें विलक्षण प्रेम असल्या कारणानें, त्यानें आपल्या दरबारचें आणि सरकारी दफतरांतलें फारसी लिहिणें बंद केलें, व त्याऐवजीं मराठी लिपीच सुरू ठेविली. त्या योगानें, मराठींत जास्त दळणवळण चालू होऊन, तिला अर्थातच स्वयमेव महत्व आलें.

---

१ ग्रॉण्ट डफ कृत मराठ्यांचा इतिहास. (पान ३४. इ. स. १८७३.) हा इतिहासकार म्हणतो,

"Ibrahim Adil Shah, upon his accession to the throne of Bijapur, in 1555, likewise showed a great preference for the natives of Maharashtra, both as men of business and as soldiers. He discontinued keeping the accounts in Persia, for which he substituted Mahratti, though deeds of importance (old deeds) were written in both languages."

उपसंहार.

याप्रमाणें, मराठी भाषेच्या प्रौढावस्थेंतील प्रथम कालाचें आम्ही कसेंबसें आणि यथावकाश विवेचन केलें; व त्यांतील अवश्य त्या गोष्टी आम्ही आपल्या समजुतीप्रमाणें, वाचकांपुढें ठेविल्या. आतां, एकंदर सर्व गोष्टी मनांत आणून सारासार विचार केला, आणि दूरवर दृष्टि देऊन पाहिलें, म्हणजे आपणांस असें दिसून येईल कीं, मराठी भाषेच्या प्रौढावस्थेला एकनाथ कवीपासूनच खरी सुरवात झाली; व तेव्हांपासूनच ती त्या थाटानें मिरवूं लागली, यांत शंका नाहीं. निदान, आमची तरी अशी अल्प समजूत आहे; व ती तशी होण्यास अनेक कारणेंही आहेत.

१ पहिलें कारण हें कीं, एकनाथानें ग्रंथसंशोधनाचें काम फारच काळजीपूर्वक आणि मोठ्या प्रेमानें सुरू केलें, व तें पवित्र बुद्धीनें व नेटानें त्यानें तडीस देखील नेलें.

२ दुसरें असें कीं, तें करण्यांत सूक्ष्मनिरीक्षणाचा त्यानें चांगला उपयोग केला, व पाठान्तराचे गुणदोष त्यानें सर्व प्रकारें मनांत आणिले.

३ तिसरें हें कीं, ग्राह्याग्राह्यविचारास त्यानें योग्य अवकाश दिला, आणि त्या सर्वांचा त्यानें सुविनियोग केला.

४ चवथें असें कीं, आमचें हें नामांकित कविरत्न स्वतः बिलक्षण वैराग्यशील असून देखील, सर्व काव्याचे किंबहुना अखिल वाङ्मयाचे, नितान्त पोषक जे षडरस, त्यांजवर त्यानें आपल्या प्रसादवाणींतील काव्यरसामृताचें यथेष्ट सिंचन करून, त्यांस जणूंकाय सजीवच केलें.

५ पांचवें हें कीं, अध्यात्मनिरूपणाचा केवळ विजयध्वजच फडकावून, त्यानें नीतितत्त्वाचें सिंचन भरपूर केलें, व त्यांत रोंवलेल्या धर्माभिमानात्मक बीजांकुरांस, महाराष्ट्रभूमिगत धैर्यलतांवर सुमुहूर्तानें चढविलें.

६ सहावें असें कीं, प्रसाद हें जें भाषेचें खरें जीवन, त्यांत सुद्धां तो श्रेष्ठत्वाप्रत पावलेला असल्यामुळें, त्यानें तो अपूर्व गुण प्रत्ययास आणन दिला, आणि

७ सातवें हें कीं, महाराष्ट्र भाषेला राजाश्रय मिळाल्या कारणानें तिची ज्यास्त हालचाल होऊन, तिला तेजी येऊं लागली.

तात्पर्य, १ संशोधन, २ सूक्ष्मनिरीक्षण, ३ ग्राह्याग्राह्यावलोकन, ४ गुणदोषविवेचन, ५ षड्रसपोषण, ६ अध्यात्मनिरूपण, ७ प्रसादजीवन, इत्यादि जे भाषेच्या प्रौढावस्थेचे मुख्य गुण, त्यांची प्रभा ह्या कालांतच चांगल्या रीतीनें भासमान होऊं लागली होती. आणि म्हणूनच, एकनाथाच्या वेळेपासून महाराष्ट्र वाङ्मयाची प्रौढावस्था लागली असें समजून, त्याप्रमाणें आम्हीं विवेचन केलें आहे.

भाग ८५ वा.

मराठी भाषेची प्रौढावस्था.

द्वितीयकाल.

इ० स० १६१०—१६९३.

मुक्तेश्वर कवि, व त्याचें जन्म.

ह्या कालांतील अनेक कविरत्नांपैकीं, मुक्तेश्वर हा पहिला होय. हा इ० स० १६०८[1] सालीं जन्मला असून, ह्याच्या आईचें नांव गोदावरी व बापाचें नांव चिंतामणशास्त्री होतें. ह्याचा आजा, म्हणजे याच्या मातुःश्रीचा जो पिता, तो मोठा सुविश्रुत विद्वान, नामांकित कवि, आणि उदंड भगवद्भक्त होऊन गेला. त्यामुळें, त्याच्याशी वाचकांचा अगदीं नवथर, परंतु चांगलाच परिचय झाला आहे. शिवाय, तो त्यांच्या पूर्णपणें ध्यानांतही असेल; व एकनाथ नामधेयानें तर ते त्यास सहजींच ओळखतील, यांत संशय नाहीं.

त्याचें कुलवृत्त, व पूर्वकथा.

मुक्तेश्वराचा बाप प्रथमतः बाहेरख्याली होता. परंतु, एकनाथानें आपल्या जामातास चांगला उपदेश केल्यामुळें, ह्याचा नाद कालान्तरानें सुटला. मुक्तेश्व-

---

१ हें संवत्सर खरोखरच लक्षांत ठेवण्यासारखें आहे. कारण, ह्या वर्षी मुक्तेश्वराखेरीज तुकाराम, व रामदास, असे दुसरे दोन सुप्रसिद्ध कवी जन्मले होते.

ऱ्याच्या मातुःश्रीचें सासरचें नांव लीलाबाई असे, आणि ह्याच्या बापाला विश्वंभरबावा ह्मणत.[१] मुक्तेश्वर हा बराच मोठा झाला तरी बोलत नव्हता. त्यामुळें, त्याच्या आईला मोठी चिन्ता पडली, व एकनाथाच्या हस्तामलक ग्रंथाचें नियशः पठण करून, ती ह्याचें तीर्थ आपल्या पुत्राला देऊं लागली. त्या योगानें, त्याला आपोआप वाचा फुटली. इतकेंच नव्हें तर, त्याला कवित्वाची देखील आपोआप स्फूर्ति झाली; आणि त्यानें सुमनोहर व सर्वमान्य अशी ग्रंथरचना केली.

त्याचे ग्रंथ. ह्याचें मुख्य आणि सर्वांस महशूर असें ग्रंथ म्हटले ह्मणजे खालीं लिहिल्याप्रमाणें आहेत.

१ रामायण. (सर्व मराठींत ओंवीबद्ध.)
२ महाभारत. (अठरा पर्वे मराठींत पद्यात्मक.)
३ शतमुखरावणवध.
४ वत्सलाहरण. आणि
५ हरिश्चन्द्राख्यान.

ह्यानें केलेलें समग्र प्राकृत महाभारत, व तद्विषयक प्रमाण. ह्याचें भारत समग्र असल्याचें त्याच्या उक्तीवरूनच व्यक्त होतें. कारण तो असें म्हणतो कीं,

तो मुद्गल चिन्तामणिसुत। लीलाविश्वंभर जगविख्यात। व्यास भारतीचा अर्थ। महाराष्ट्र बोलला ॥

---

१ ही गोष्ट मुक्तेश्वरानें दिलेल्या कुलवृत्तावरूनच व्यक्त होते.
अहो लीला विश्वंभरा ॥ शंभो शिवहरा शंकरा ॥
तारिसी मुक्तेश्वरा ॥ नवल काय ॥
हा देशस्थ ब्राम्हण असून, ह्याची शाखा आश्वलायन असे.

त्याचप्रमाणें, दुसऱ्या एके ठिकाणीं तो असें लिहितो कीं,

व्यासग्रंथगिरीचें सोनें ॥ संस्कृत गोढियें गाळु विमनें ॥
देशभाषा घडिलें लेणें ॥ साहित्यरत्नीं सुजडित ॥

शिवाय, त्या पुराण **व्यास**कवीपाशीं, **संस्कृत** महाभारतांतल्या प्रत्येक अक्षराची भिक्षा मागून ऋण घेतलें, आणि नन्तर आपण **प्राकृ**तांत महाभारत रचलें, असे सुद्धां **मुक्तेश्वरा**नें उद्गार काढले आहेत.

एक एक अक्षराची भीक । जीर्ण कवीतें मागून देख ॥
मी सर्वज्ञ कविनायक । असें म्हणविलें लौकिकीं ॥

त्याच्या कृतीचें परीक्षण.

ह्याचे विचार उदात्त असून हृदयंगम आहेत. ह्याची भाषासरणी मोहक असून मधुर आहे. आणि ह्याची वर्णनशैली सुरम्य असून यथार्थ आहे. ह्यानें व्यक्त केलेले मनोभाव तर इतके हुबेहुब, चटकदार, व प्रसंगानुरूप आहेत कीं, तदवलोकनानें आपले नेत्र सुखावतात; आपले विकार तीव्रता पावतात; आणि आपल्या हृदयकमळाला केवळ गुदगुल्याच होतात. ह्यापैकीं, कित्येक स्थळें निःसंशय प्रेक्षणीय आहेत; व कांहीं चुटके खरोखरच गमतीदार आहेत. सबब, त्यांचा आमोद रसिक वाचकास दिल्यानें, अप्रासंगिकपणाचा दोष बिलकूल येणार नाहीं, अशी आशा धरून, त्यांतील एक दोन उतारे मी मासल्याखातिरां येथें देतों.

त्याची वर्णनशैली.

आपल्या आनंदभरांत, सुकुमार स्त्रीजन जलक्रीडा करीत असतां, पवनोद्वेगानें त्यांचीं वस्त्रें उडाल्यामुळें, त्यांची जी त्रेधा होऊन गेली, ती सांगतां पुरवत नाहीं. आणि हीच मुक्तेश्वरानें अगदीं हुबेहूब वर्णिल्यानें, ती केवळ मूर्तिमंतच आपल्या डोळ्यांसमोर भासमान होते, असें वाटतें. कवि मजकूर म्हणतो,

गंधवायो विनोदें तेथें । वस्त्र उडवोनी नेलें परोतें ।
येरी धांवोन धरी हातें । तंव तें वेगी नाटोपे ॥
रातोत्पलें इन्दीवर । आच्छादीजे तेंवि सुकुमार ।
वामकरें कामागार । कवळोनि धांवे नग्नांगी ॥
धरोनि धांवे चपळांगी । सलज्जा आंग झांकी वेगीं ।
मुखें निंदित म्हणे आगीं । पडे रे पवना पापिष्टा ॥

अन्य कवि देवीदास.

मुक्तेश्वराच्याच वेळचा देवीदास कवि होय. ह्याचे तीन ग्रंथ सुप्रसिद्ध आहेत. १ वेंकटेशस्तोत्र. २ करुणामृत. आणि ३ संतमालिका. पहिल्यांत ईशस्तुति, व दुसऱ्या दोहोंत भगवद्भक्तांचें वर्णन आहे.

तुकाराम व त्याचा पूर्ववृत्तांत.

ह्या कालांतील तुकाराम हा दुसरा श्रेष्ठ कवि होय. हा इ. स. १६०८ सालीं देहूगांवीं जन्मला, आणि इ. स. १६४९ त, आपल्या वयाच्या बेचाळीसाव्या वर्षी मरण पावला. ह्याच्या आईचें नांव कनकाई असन, बापाचें नांव बोल्होबा होतें; व हीं दोघें आणि त्यांचे पूर्वज अ-

परायण असत. आनुवंशिकसंस्कारानुरूप, तुकाराम देखील मोठा प्रेमळ, पापभीरु, देवभोळा, व विरक्त असे. पुढें, त्याच्या सतराव्या वर्षी, त्याची भावजय आणि आईबाप निवर्तले, व त्याच दुःखानें त्याचा भाऊ सावजी हा देखील तीर्थयात्रेस निघून गेला. त्याच्या वियोगानें, आणि संसारभारानें, तुकारामाचें मन उद्विग्न झालें; व त्यांतच कालान्तरानें व्यापाराची मंदी, भयंकर दुष्काळ, शेराची धारण, कुटुंबाचे हाल, मुलाबाळांची उपासमर, अन्नावांचून त्याच्या थोरल्या बायकोचा शेवट, सन्तु नामक त्याच्या वडील मुलाचा काळ, आणि राहिल्या साहिल्या ढोरांची हानि, यांची एकामागून एक अशी एक सारखी भर पडून, त्याचें चित्त अगदीं होरपळून गेलें. त्यामुळें, लोकांत तोंड दाखविण्याची लाज वाटून, संसाराचाही त्याला अगदीं वीट आला; व तो केवळ वमनाप्रमाणेंच त्यास भासूं लागला.

त्याच्या आयुष्याच्या उत्तरार्धांतील त्याचा वर्तनक्रम.

अशाप्रकारें, ह्या तीव्र दुःखाग्नींतून, तुकाराम हा तावून व सुलाखून निघाल्यावर, हरदासाच्यामागें उभें राहवें, ध्रुपद धरावें, उपोषण करावें, सुभाषित ह्मणावें, तीर्थ घ्यावें, शरीर कष्टवावें, इत्यादि नानाविध साधनांनीं त्यानें आपल्या कालाचा सद्व्यय केला, आणि आपला देह भजनांत, नामस्मरणांत, व विठ्ठलसेवेंतच सार्थकीं लाविला. पुढें, कालान्तरानें त्याला काव्यस्फूर्ति झाली, आणि तो [illegible]लोट कवन करूं लागला. ह्या त्याच्या आयुष्यक्रमाचें

वर्णन त्यानें स्वतःच केलेलें असल्यामुळें, त्याचें इतिवृत्त वाचकाच्या लक्षांत सहजी येण्यासारखें आहे.

त्याला सोसावे लागलेले दुःसह कष्ट.

विरक्त होऊन संसार सोडल्यावर देखील तुकारामास अनेक यातना, बहुत कष्ट, व मोठे हाल सोसावे लागले, आणि ते सर्व त्यानें अगदीं निमूटपणें

---

१ तुकाराम म्हणतो, १३३३

यातीं शूद्रवंश केला वेवसाव । आदि तो हा देव कुळपूज्य ॥ १ ॥
नये बोलों परी पाळिलें वचन । केलियाचा प्रश्न तुम्ही संतीं ॥ छ ॥
संवसारें जालों अति दुःखें दुःखी । मायबापसेखीं क्रमिलीया ॥ २ ॥
दुष्काळें आटिलें द्रव्यें नेला मान । स्त्री एकी अन्न अन्न करितां मेली ३॥
लज्जा वाटे जीवा त्रासलों या दुःखें । वेवसाय देखें तुटी येतां ॥४॥
देवाचें देऊळ होतें तें भंगलें । चित्तासी जे आले करावेंसें ॥ ५ ॥
आरंभीं कीर्तन करी एकादशी । नव्हतें अभ्यासी चित्त आधीं ॥ ६ ॥
कांहीं पाठ केलीं संतांचीं उत्तरें । विश्वासें आदरें करोनिया ॥ ७ ॥
संतांचें सेविलें तीर्थ पायवणी । लाज नाहीं मनीं येऊं दिली ॥ ८ ॥
गाती पुढें त्यांचें धरावें धृपद । भावें चित्त शुद्ध करोनिया ॥ ९ ॥
टाकला तो कांहीं केला उपकार । केलें हें शरीर कष्टवूनी ॥ १० ॥
वचन मानिलें नाहीं सुहृदाचें । समूळ प्रपंचें वीट आला ॥ ११ ॥
सत्य असत्यासी मन केलें ग्वाही । मानियेलें नाहीं बहुमतां ॥ १२ ॥
मानियेला स्वप्नीं गुरूचा उपदेश । धरिला विश्वास दृढ नामीं ॥ १३ ॥
यावरि या जाली कवित्वाची स्फूर्ति । पाय धरिले चित्तीं विठोबाचे॥
निषेधाचा कांहीं पडला आघात । तेणें मध्यें चित्त दुखविलें ॥ १५॥
बुडविल्या वह्या बैसलों धरणें । केलें नारायणें समाधान ॥ १६ ॥
विस्तारीं सांगतां बहुत प्रकार । होईल उशीर आतां पुरे ॥ १७ ॥
आतां आहे तैसा दिसतो विचार । पुढील प्रकार देव जाणे ॥ १८ ॥
भक्त नारायण नुपेक्षी सर्वथा । रुपावन्त ऐसा कळों आलें ॥ १९ ॥
तुका म्हणे माझें सर्व भांडवल । बोलविले बोल पांडुरंगें ॥ २० ॥

सोसले. अर्थात्, ह्याच कारणानें तो ज्यास्त कसोटीस लागला, व अखिल जगाच्या स्तुतीस पात्र झाला, यांत संशय नाहीं.

त्याचा निश्चय व भक्तिपरायणता, त्याचें धैर्य आणि दयार्द्रशीलता, त्याचें स्पष्ट वक्तृत्व व निर्भिडता, त्याचें जितेन्द्रियत्व, आणि निस्पृहता, त्याचा निर्लोभ व अभेदवृत्ति, हीं सर्व खरोखरच वाखाणण्यासारखीं आहेत; आणि म्हणूनच तो साधुत्वाच्या श्रेष्ठपदवीप्रत पावला, हें निर्विवाद आहे.

ह्याची निःस्पृहता निःसंशय आश्चर्य करण्यासारखी आहे.

त्याची अलौकिक निःस्पृहता.

कारण, खुद्द श्रीशिवाजी छत्रपतीनेंच छत्र, चामर, हत्ती, घोडे, रत्नें, मौक्तिकें, इत्यादि त्याच्याकडे पाठवून तीं त्यास स्वतः नजर केली असतांही, त्यानें त्यांचा स्वीकार न करतां, तीं मोठ्या नम्रतेनें परत पाठविलीं, व ह्मणाला,

१८८४

दिवट्या छत्री घोडे। हें तो बऱ्यांत न पडे। * * *
मान दंभ चेष्टा। हे तो शूकराची विष्टा ॥ * * *

१८८५

जन धन तन। वाटे लेखावें वमन ॥ ४॥ * * *

१८८६

शिव तुझें नाम ठेविलें पवित्र।
छत्र पति सूत्र विश्वाचें कीं ॥ ३ ॥ * * *
हेत हा लागला आमुचीये भेटी।
पत्रामाजी गोष्टी हेचि थोर ॥ ५ ॥ * * *

याचें हें उत्तर ऐक गा भूपति ।
लिहिली विनंति हेताची हे ॥ ६ ॥
अरण्यवासी आम्ही फिरों उदासीन ।
दर्शन ही हीन अमंगळ ॥ ७ ॥
वस्त्राविण काया जालीसे मळीन ।
अन्नराहित हीन फळाहारी ॥ ८ ॥
रोडके हातपाय दिसे अवकळा ।
काय तो सोहळा दर्शनाचा ॥ ९ ॥
तुका ह्मणे माझी विनंती सलगीची ।
वार्ता हे भेटीची करूं नका ॥१०॥ * * *

१८८७

निराशेचा गांव दिधला आम्हांसी ।
प्रवृत्ति भागासी सांडियेलें ॥ ४ ॥ * * *

१८९३

तुका ह्मणे धन । आम्हां गोमासा समान ॥३॥ * * *

तथापि, अशा उदासीन स्थितींत, आणि निर्लोभवृत्तींत सुद्धां, तुकारामानें श्रीशिवाजी महाराजास जो उपदेश केला, तो खचितच अपूर्व व अमूल्य असल्यामुळें, विशेष संग्रह करण्या योग्य आहे. इतकेंच नव्हें तर, ह्या वैराग्यशील पुरुषानें राजकीय धोरणाच्या प्रत्येक बाबीवर, किती दूरवर लक्ष्य पोहोंचविलें होतें, हें मनांत येऊन, आपलें मन विस्मय पावतें, आणि त्याच्या शिघ्र-कवित्वाबद्दल मोठी धन्यता वाटते.

त्यांची वर्णनीय दूर दृष्टि व

१८८९

आतां एक योग साधावा हा नीट ।
भल्याचा तो वीट मानूं नये ॥ १ ॥
जेणें योगें तुम्हां घडो पाहे दोष ।
ऐसा हा सायास करूं नये ॥ छ ॥
निंदक दुर्जन संग्रहीं असतीं ।
त्यांची युक्ति चित्तीं आणूं नका ॥ २ ॥
परीक्षावे कोण राज्याचे रक्षक ।
विवेका विवेक पाहोनीयां ॥ ३ ॥
सांगणें नलगे सर्वज्ञ तूं राजा ।
अनाथाच्या काजा साह्य व्हावें ॥ ४ ॥
हेंचि ऐकोनीया चित्त समाधान ।
आणिक दर्शनें चाड नाहीं ॥ ५ ॥
घेऊनीया भेटी कोण हा संतोष ।
आयुष्याचे दिस गेले गेले ॥ ६ ॥
एकदोनी कर्मे जाणोनीया वर्मे ।
आपुलीया भ्रमें राहूं आतां ॥ ७ ॥
कल्याण कारक अर्थ याचा एक ।
सर्वां भूतीं देख एक आत्मा ॥ ८ ॥
आत्मारामीं मन ठेवूनीया राहे ।
रामदासीं पाहे आपणें या ॥ ९ ॥
तुका ह्मणे राया धन्य जन्म क्षितीं ।
त्रैलोकीं हे ख्याति कीर्ति तुझी ॥ १० ॥

हें पद्यात्मक पत्र श्रीशिवरायास लिहिलेलें असून, तें त्याच्या सेवक जनांबरोबरच रवाना झालें होतें. तेव्हां, कोणी तरी,

मंत्रीमंडळास प्रार्थना.

भिडेखातर, त्याचा अर्थ भलताच करील, तो करूं नये म्हणून, व त्यांतील योग्य हेतु तोच राजास समजावून सांगण्यासाठीं, त्यानें मंत्रिमंडल, मानकरी, आणि अधिकारी वर्ग, या सर्वांस यथोचित प्रार्थनेनें अनेक प्रकारें विनाविलें होतें. त्यामुळें, कविमजकूरच्या कवित्वाबरोबरच त्याचें दूरदार्शित्व देखील सहजीं ध्यानांत येतें.

१८९०

आतां हे विनवणी प्रधान अष्टक ।
प्रभूसी विवेक समजावा ॥ १ ॥
प्रतिनिधि मानरक्षक चतुर ।
सात्विकाचें घर तुम्हांपाशीं ॥ छ ॥
मजुमुचे धणी लेखन कारक ।
पत्रींचा विवेक समजावा ॥ २ ॥
पेशवे सुरनिस चिटणीस डबीर ।
राजाज्ञा सुमंत सेनापति ॥ ३ ॥
भूषण पंडितराय विद्याधन ।
वैद्यराजा नमन माझें असे ॥ ४ ॥
पत्राचा हा अर्थ अंतरीं जाणोनी ।
विवंचोनी श्रवणीं घाला तया ॥ ५ ॥
सात्विक प्रेमळ दृष्टांताच्या मतें ।
बोलिलों बहुत कळावया ॥ ६ ॥
यथास्थित निरोप सांगणें हा राया ।
अर्थ पाहा वांयां जाऊं नेदा ॥ ७ ॥
भिडेसाठीं बोला गाळूनि अर्थातें ।
अनर्थकारी तुमतें होइल तेणें ॥ ८ ॥
तुका ह्मणे तुह्मां नमन अधिकाऱ्यां ।
सांगणें तें राया पत्र माझें ॥ ९ ॥

तुकारामाचें जितेन्द्रियत्व.

तुकारामाचें जितेन्द्रियत्व सुद्धां फारच अलौकिक होतें; व हीं गोष्ट कोणालाही कबूलच केली पाहिजे. कारण, एका लावण्य आणि सकुमार स्त्रीनें, निव्वळ एकान्तांत, त्याजवर केवळ कामशान्त्यर्थ झडप घातली असतांही, तो त्या आणीबाणीच्या प्रसंगांतून केवळ स्वसामर्थ्यानेंच परावृत्त झाला, व मोठ्या धैर्यानें अचानक सुटला. अर्थात्, त्याच कारणानें, ह्या वेळेचे त्याचें उद्गार कोणाच्याही मनावर वज्रलेप संस्कार करणारे आहेत, यांत संशय नाहीं. तो म्हणतो:—

५२३

स्त्रियांचा तो संग नको नारायणा।
काष्ठाया पाषाणा मृतिकेच्या॥ १॥ ध्रु॥
नाठवे हा देव न घडे भजन।
लांचावलें मन आवरेना॥ छ॥

* * *

तुका ह्मणे जरी अग्नि जाला साधु।
परि पावे बांधु संघट्टणें॥ २॥

५२४

परावीया नारी रखुमाई समान।
हें गेलें नेमून ठायींचेंची॥ १॥
जाई वो तूं माते न करी सायास।
आम्ही विष्णुदास नव्हों तैसे॥ छ॥
न साहवे मज तुझें हें पतन।
नको हें वचन दुष्ट वदों॥ २॥
तुका म्हणे तुज पाहिजे भ्रतार।
तरी काय नर थोडे जाले॥ ३॥

त्याची अपूर्व अभेद्-बुद्धि.

त्याचप्रमाणें, राव आणि रंक, नीच व थोर, सोनें आणि माती, इत्यादि संबंधाची त्याचीं अभेदबुद्धि सुद्धां फारच नांवाजण्यासारखी आहे.

१८९५

मुंगी आणि राव। आम्हां सारखाची जीव ॥ १ ॥
सोनें आणि माति। आम्हां समान हें चित्तीं ॥ २ ॥

त्याचा काव्यविस्तार व त्याचें कारण.

तुकारामाचें सर्व काव्य अभंगात्मक असून, त्यानें एकंदर पांच कोटीवर अभंग केल्याचें कळून येतें. कारण, नामदेवानें शतकोटी अभंग करण्याची प्रतिज्ञा केली असल्याविषयीं, तो स्वतःच सांगतो. (मागें पान २१६ पहा.) ह्यापैकीं, चौऱ्याण्णव कोटी एकूण ऐंशीं लक्ष अभंग नामदेवाच्या कुटुंबानें आणि विठोबा रखुमाईनें भागींत केलेले असल्यामुळें, (मागील पान २१७-१८ पहा), बाकी राहिलेले पांच कोटी एकवीस लक्ष अभंग तुकारामानें करावे, अशी नामदेवाची सांगी होती; व त्याप्रमाणें त्यानें केलें, असें त्याच्याच कृतीवरून दिसतें.

१३२०

नामदेवें केलें स्वप्नामाजीं जागें।
सवें पांडुरंगें येऊनीया ॥ १ ॥ ध्रु० ॥
सांगितलें काम करावें कवित्व।
वाउगें निमित्य बोलों नको ॥ छ ॥
माप टाकी सळ धरिली विठ्ठलें।
थापटोनि केलें सावधान ॥ २ ॥

प्रमाणाची संख्या सांगे शतकोटी।
उरले शेवटीं लावी तुका ॥ ३ ॥

आतां, ह्या शतकोटी अभंगांची पूर्तता होण्यासाठीं, तुकारामानें जे अभंग केले, त्याचा तपशील येथें[1] दिला आहे. त्यावरून, ४, ७०, २९, ००० अभंगांचें कर्तृत्व त्याच्याकडे येतें. परंतु, याखालीं टिपेंत दिलेल्या शेवटल्या अभंगांत तर, त्यांची एकंदर संख्या ९, ०१, ३४, ००० दिली आहे. तेव्हां, या संख्येचा परस्पर मेळ कसा लावावा, हें समजत नाहीं. तथापि, तुकारामाचा बोलण्याचा सर्व व्यवहार आणि यच्चावत दिनचर्या अभंगांतच होत असल्यामुळें, त्यानें कोट्यावधी अभंग केले असतील, यांत अगदीं शंका नाहीं.

त्याचा तपशील

तुकारामाच्या अभंगांत अलंकार, प्रौढता, पदलालित्य, किंवा काव्यसौन्दर्य, इत्यादि गुण बिलकुल नाहींत. तथापि, त्यांतील सहज स्फूर्ति, आणि नैसर्गिक ओघ विलक्षण असून, त्यांतच शम, दम, धैर्य, निस्पृहता, निर्लोभता, व अभेदवृत्ती, हे गुण तर ठायींठायीं केवळ

त्याचा आमच्या राष्ट्रावर व देशावर झालेला परिणाम.

---

१ वेदाचे अभंग केले श्रुतिपर ॥ द्वादश सहस्र संहितेचे ॥ १ ॥
निरुक्त निघंट आणि ब्रह्मसूत्र ॥ अवतार सहस्र उपग्रंथ ॥ २ ॥
अभंग ते कोटी भक्तिपर केले ॥ ज्ञानपर केले तितुकेची ॥ ३ ॥
पंचाहत्तर लक्ष वैराग्य वर्णिलें ॥ नाम तें गाइलें तितुकेंची ॥ ४ ॥
साठी लक्ष केला बोधक जनासी ॥ वर्णिलें रुपासीं तितुकेंची ॥ ५ ॥
द्वादश सहस्र आत्मबोध केला ॥ अनुभव घेतला एक सर्व ॥ ६ ॥
चौतीस सहस्र लक्ष कोटी पांच ॥ सांगोनीया साच तुका गेला ॥ ७ ॥

मूर्तिमंतच भासमान होतात. त्यामुळें, ह्या साधुश्रेष्ठाचे चिरकाल उपकार, केवळ आमच्या मराठी वाङ्मयावरच झाले आहेत, असें नाहीं. तर ते सर्व महाराष्ट्रावर, किंबहुना अखिल भरतखंडावरच झाले आहेत, असेंही ह्मणणें प्राप्त येतें. कारण, त्याच्या काव्यामृताचा संस्कार रावावर अथवा रंकांवर, एकसारखा होऊन, त्यानें आमचा देश अगदीं हालवून दिला, व अखिल महाराष्ट्र तर केवळ दणाणूनच सोडलें.

आणि त्याचा कार्यभाग.

शिवाय, ह्यानें आपल्या पवित्र विचारानें आमचें राष्ट्रीय मन देखील अगदीं निर्मल करून टाकिलें होतें. त्यामुळें, राजगुरु रामदासानें देशोन्नतीच्या चालविलेल्या तजविजीस, तो जणूं काय सहायभूतच झाला, असेंही म्हणण्यास हरकत नाहीं. अर्थात्, त्यायोगानें, सर्वत्र तयार होत असलेल्या सामग्रींत, समर्थांच्या काव्याग्नीची ठिणगी पडतांच, महाराष्ट्रीयांच्या देशाभिमानानें एकदम पेट घेतला; आणि त्यांच्या वर्धमान होत असलेल्या ज्वाला कायम राहव्या म्हणून, ते स्वातंत्र्य देवीचे उपासकच बनले.

तुकारामाच्या अभेद्‌भक्तीनें रामदासावर झालेला परिणाम.

तुकारामाची गणना सामान्यव्यक्तींत खचितच करतां येणार नाहीं, असें म्हणणें प्राप्त येतें. कारण, त्यानें आपल्या निःसीम भक्तीनें व अपूर्व प्रेमनिर्झरानें श्रीरामदासासारख्या समर्थांस सुद्धां पान्हा आणून, त्यांचा द्वैतभाव निरसून टाकिला, आणि अखिल विश्वास-

मवेत त्यांचें केवळ ऐक्यच करून दिलें. ह्या गोष्टीची सत्यता पाहण्यासाठीं फार दूर न जातां, खुद्द समर्थच काय म्हणतात, तें आपण ऐकूं. तुकारामाची भेट होऊन, त्याच्या प्रेमनिर्झरानें रामदासाचा द्वैतभाव धुवून जाण्यापूर्वी, रामाव्यतिरिक्त ह्यांची अन्य कोणत्याही देवावर भक्ति नसे. इतकेंच नव्हे तर, ते आणखी असेंही म्हणत कीं,

* * *

श्रीराम माझें कुळदैवत ।
त्याजविण कोठें न बैसे चित्त ।
यासि मी निश्चित काय करूं ॥

पुढें पंढरीला गेल्यावर, त्यांच्याच वृत्तींत हळूं हळूं फरक पडत चालला, व त्यांची भावना बदलत गेली, असें खालील अभंगावरून लक्षांत येईल.

चापबाण काय केले । कर कटावरी ठेवियेले ॥
येथें उभा कां श्रीरामा । मनमोहन मेघश्यामा ॥

यानन्तर, कांहीं दिवसांनीं, रामदासाचें केवळ समचित्तच झालें, आणि राम हा विठ्ठलांत आपोआप लीन होऊन गेला.

माझें मानस विटेवरी । विठ्ठल चरणीं निरंतरी ॥
जो जो पंढरीसी गेला । तेणें कळीकाळा जिंतिला ॥
रामदास ह्मणे पंढरी । नाना साधनेंवीण तारी ॥

* * *

न विसंबीजे न विसंबीजे । आमुतें पांडुरंगा न विसंबिजे॥
यात्रा सफळ जाहली एकी । वृत्ती पारुषल्या अनेकीं ॥

देवें दाटलें आकाश । अवघा देव सावकाश ।
भक्त भिन्न बैसों कोठें । नवल मांडलेंसें गोमटें ॥
जावें तरी कोणीकडे । देव जिकडे तिकडे ॥

असो. तुकारामाच्या संत मंडळांतील लहान मोठे कवी ह्मटले ह्मणजे, रामेश्वरभट्ट, सेना, न्हावी, नारायण बोवा, कान्होबा, बोधलेबुवा, प्रेमाबाई, शेखमहमद शेखसुलतान, इत्यादि होत. ह्यापैकीं, रामेश्वरभट्ट हा मोठा संस्कृत पंडित असे. त्यामुळें, ह्या प्रौढ व राजमान्य विद्येच्या दर्पानें ग्रस्त होऊन, तो आपला सर्व काळ घटपटादि खट-पटींत, भक्तिनिर्भर्त्सनेंत, आणि प्राकृत भाषेच्या निन्देंतच घालवी. तथापि, तुकारामाच्या संगतीनें रामेश्वरभट्ट याची वृत्ति पालटून तो भगवद्भक्त झाला, व प्राकृत काव्य करूं लागला. ह्याचे कांहीं अभंग, पदें, आणि स्तोत्रें प्रसिद्ध आहेत.

तुकाराम संतमंडळांतील कवी.

सेना न्हावी हा सुद्धां मोठा भगवद्भक्त असून, त्यानें पुष्कळ अभंग केले आहेत. त्यावरून, तो चांगला मर्मज्ञ व रसिक होता, यांत संशय नाहीं.

सेना न्हावी.

आम्ही जातीचे बारीक । काम करणें बारीक ॥
गुरु डोळां दर्पण दावूं । भावार्थाचा चिमटा घेऊं ॥
इषा मनीषा बगला झाडूं । काम क्रोध नखें काढूं ॥
बादशहाचे द्वारीं । सेना न्हावी काम करी ॥

नारायण बोवा, कान्होबा, बोधले बोवा, व प्रेमाबाई, यांचे कांहीं अभंग, पदें, वगैरे मात्र प्रसिद्ध आहेत.

अन्य कवी.

शेख महमद.

शेख महमद हा केवळ यवनच होता. तथापि, तो पंढरीस गेल्यापासून, त्याची निःसीम भक्ति विठ्ठलचरणीं जडली. हा नगर जिल्ह्यांत चांभारगोंदें व श्रीगोंदें गांवीं राहत असे, आणि ह्याची मूळ मुल्लाण्याची वृत्ति होती. एके दिवशीं बकरें कापण्याची पाळी जेव्हां ह्याजवरच आली, तेव्हां त्या गरीब जनावराचें केविलवाणें ओरडणें ऐकून, त्याचें हृदय विव्हल झालें; व त्याच वेळीं त्याच्यांत आत्मज्ञानाचा प्रकाश पडला. ह्या प्रसंगास अनुसरून तो म्हणतो,

अहिंसा विज्ञान। दुःखीं सुख कळलें॥
आत्मज्ञान फळलें। शेख महमदा॥

त्याचे ग्रंथ.

हा नेहेमीं पंढरीची वारी करी, आणि आपला काळ भगवद्भजनांत घालवी. हा जातीचा मुसलमान असून देखील, मराठींत चांगली व प्रेमळ काव्यरचना करी, असें त्यानें केलेल्या अभंगांवरून आणि ग्रंथावरून व्यक्त होतें. मात्र, त्याची मायभाषा मराठी नसल्याकारणानें, त्यांत क्वचित् कोठें अशुद्धता दिसते. तथापि, तेवढ्यानेंच त्याच्या काव्याला हीनत्व न येतां, रसभंगही झाल्याचें भासमान होत नाहीं. ह्याचे कांहीं अभंग, आणि १ पवनविजय, २ निष्कलंकप्रबोध, व ३ योगसंग्राम, असे तीन ग्रंथ उपलब्ध आहेत. ह्यापैकीं योगसंग्राम हा सर्वांत मोठा होय. याचीं एकंदर अठरा प्रकरणें, आणि ग्रंथसंख्या सुमारें २,३०० आहे. ह्यांत

भाव, भक्ति, आणि वैराग्य, यासंबंधीं विवेचन असून, हा इ. स. १६९६ मध्यें (शके १६१८ त श्रावणमासीं) पुरा झाल्याचें कळून येतें. ह्याचे कांहीं अभंग बरेच रसाळ असल्यामुळें, त्यांतील एक लहानसा चुटका येथें देतों.

ऐसें केलें या गोपाळें । नाहीं सोंवळें ओंवळें ॥
कांटे केतकीच्या झाडा । आंत जन्मला केवडा ॥
फणसा अंगें करड कांटे । आंत साखरेचे गोटे ॥
ऊंस सर्वा अंगीं काळा । आंत अमृत जिव्हाळा ॥
नारळ वरी तो कठिण । आंत सांठवें जीवन ॥
काळी कस्तुरी दिसती । आंत सुगंध सुटती ॥
मध माशांचीं घोंगडीं । आंत अमृताची खाणी ॥
शेख महमद विलासी । झाला हरिभक्ताचा रहिवासी ॥

शेख सुलतान व त्याचे अभंग.

शेख सुलतान हा देखील मोठा प्रेमळ कृष्णभक्त असे. ह्यानें मराठींत पुष्कळ अभंग केले असल्याचें प्रसिद्ध आहे. ह्यापैकीं, एक दोन येथें मासल्याकरितां देतों, म्हणजे त्यांवरूनच बाकीच्यांचें सौरम्यही सहजीं कळून येईल.

हिरवेची द्राक्ष घड । रसा येती बहु गोड ॥
शेखसुलतान अविंध । त्याच्या हृदयीं गोविंद ॥

उद्धवचिद्घन.

ह्याच सुमारास उद्धवचिद्घन झाला असावा, असें दिसतें., तथापि, ह्याचा काल क-विचरित्रांत शक १२९० दिला असून, गोऱ्याकुंभारानन्तर त्याचें इतिवृत्त लागलींच सांगितलेलें आढळतें. परंतु, हा त्याचा काल चुकीचा असावा, असें आह्मांस वाटतें. कारण, कविमजकूरनें एके ठिकाणीं

असें म्हटलें आहे कीं, " शाहामहंमद तो बामणीकर बेदरची पाछाई. " त्यावरून, हा यवनांच्या ब्राह्मणी राज्यांत किंवा त्यानंतर उदयास आला असावा, असें म्हणण्यास बलवत्तर प्रमाण मिळतें. आतां, मुसलमानी ब्राम्हणी राज्याचा काल इ० स० १३४७ पासून १५२६ पर्यंत होता, आणि त्यानंतर त्याचे पांच विभाग झाले, ही गोष्ट तर सर्वांसच महशूर आहे. सबब, हा कवि चवदाव्या-शतकानंतर व अठराव्या शतकापूर्वी झाला, यांत शंका नाहीं. कारण, महीपतीनें आपल्या भक्तविजयांत ह्या कवीचा वृतान्त दिला असून, महीपतीचा काळ इ० स० चें अठरावें शतक असल्याचें प्रमाण सिद्ध आहे.

त्याचा काळ.

शिवाय, ह्या कवीच्या वेळचें जें वर्णन महीपतीनें दिलें आहे, त्यांवरून मुसलमान लोकांचें यथेष्ट स्वास्थ्य दक्षिणेंत झाल्यावर, आणि मराठ्यांकडून त्यांची खोड मोडण्यापूर्वी, ते मदोन्मत्त झालेले असल्यामुळेंच त्यांच्या पुंडाईची ही गोष्ट घडून आली होती, यांत शंका नाहीं. परंतु, हा काळ ह्मटला ह्मणजे, पंधराव्या शतकानंतर व आठराव्या शतकापूर्वीचा होय.

---

१ महीपति म्हणतो,

तेव्हां यवनांचें प्राबल्य बहुत । कोणी न पाहे न्याय नीत ।
शहरीं गुंडे उन्मत्त बहुत । बैसले पांच शत ते ठायीं ॥१९९॥
* * वैष्णवांसि शेणमार करिती ।
* * वैष्णवास ताडिती निजहस्तें ॥२०१॥
(भक्तविजय. अ० ५६ वा.)

सबब, उद्धवचिद्घन हा इ० स० च्या सतराव्या शतकांत, आणि बहुत करून पूर्वार्धांतच झाला असावा, असें वाटतें.

हा कवि मानदेशचा असून, याचे ग्रंथ खालीं लिहिल्याप्रमाणें असल्याचें कळतें. १ भक्तचरित्र. २ गोऱ्याकुंभाराचें चरित्र. ३ द्रौपदीचा धांवा. ४ सवाईबद्ध अष्टदशाध्यायी भगवद्गीता. ५ साकीबद्ध नागनाथ चरित्र. ६ मृत्युंजयचरित्र. ७ दिण्डीवृत्तबद्ध शुकरंभासंवाद. व ८ श्रियाळ चरित्र.

त्याचे ग्रंथ.

ह्यावरून, भक्तचरित्रांत वर्णन केलेले संत, गोराकुंभार, नागनाथ, आणि मृत्युंजयस्वामी, हे होऊन गेल्यावरच उद्धवचिद्घन झाला, हें उघड आहे.

त्याचा महिपतीनें केलेला उल्लेख.

उद्धव चिद्घनानें संतांचीं पुष्कळ चरित्रें वर्णिलीं असल्याविषयीं, महीपतीनें देखील भक्तलीलामृतांत सांगितलें आहे.

उद्धव चिद्घन भक्त थोर।
ज्यानें संतचरित्रें वर्णिलीं फार ॥ २८१ ॥

(भक्तलीलामृत. अ० ५०)

त्याचप्रमाणें, नाभाजी व उद्धवचिद्घन यांनीं जीं संतचरित्रें लिहिलीं, त्यांचा आपण पुष्कळ उपयोग केला, अशाबद्दलही त्यानें आपले आभार प्रदर्शित केले आहेत.

तरी उत्तर देशीं साचार। नाभाजी विरिंची अवतार।
तेणें संत चरित्र ग्रंथ थोर। ग्वाल्हेरी भाषेंत लिहिला असे॥

आणि मानदेशीं उद्धव चिद्घन ।
त्याहीं भक्तचरित्रें वर्णिलीं जाण ।
दोहींचें संमत एक करून ।
भक्तविजय आरंभिला ॥ ३९ ॥
(भक्तविजय अ. १).

रामदास व त्याचें पूर्ववृत्त

तुकारामाचा समकालीन असा श्रेष्ठ कवि ह्मटला ह्मणजे, निःसंशय रामदासच होय. हा शके १५३०, ह्मणजे इ० स० १६०८ सालीं जन्मला, व शके १६०३ किंवा इ. स १६८१ मध्यें समाधिस्त झाला. ह्याच्या बापाचें नांव सूर्याजीपंत आणि आईचें नांव राणुबाई असून, ह्याचें स्वतःचें नांव नारायण होतें. ह्याच्यापासून तेवीसावा पुरुष जो कृष्णाजीपंत, तो प्रथमतः बेदर प्रांतांत राहत असे. परंतु शके ८८४ (इ. स. ९६२) मध्यें, तेथें भयंकर दुष्काळ पडल्यामुळें, ह्यानें दक्षिणेंत गंगा (गोदावरी) तीरीं, मौजे ह्विरें तर्फ तालखेड, प्रांत बीड, येथें येऊन वस्ती केली. ह्याचें गोत्र जमदग्नि, शाखा आश्वलायन, व उपनांव ठोसर असे; आणि ह्याच्या वंशजांनीं आसपासच्या साठ गांवची वृत्ति व कुळकरणीपण संपादिलें होतें. हे सर्व रामभक्त असत. आणि रामदासाचें मुळचें नांव जरी नारायण होतें, तरी तो निःसीम रामभक्त असल्याकारणानेंच त्याला सर्वजण रामदास ह्मणूं लागलें, व तेंच त्याचें नामधेय कायम राहिलें.

रामदासाला एक वडील भाऊ असून, त्याचें नांव

त्याचें ब्रह्मचर्य, व त्याजवर झालेला प्रसाद.

गंगाधरपंत होतें. तथापि, तो आपल्याला रामीरामदासच ह्मणवी. रामदास हा ब्रह्मचारी असे, व ह्याच्या इच्छेविरुद्ध याच्या विवाहाचा योग आणिल्यामुळें, तो लग्नमंडपांतूत पळून गेला, आणि नाशकाजवळच्या टांकळीस जाऊन, राममंत्राचें पुरश्चरण करीत बसला. त्यावेळीं, त्याला साक्षात्कार होऊन, श्रीरामचन्द्राचा उपदेश झाल्याचें दिसतें. कारण, एका अभंगांत त्यानें खालीं लिहिल्याप्रमाणें ह्मटलें आहे.

वसिष्ट उपदेशी श्रीरामरायासी ।
रामेंरामदासीं उपदेशिलें ॥

रामदासाच्या वेळच्या एकंदर भगवद्भक्तांत, याचें श्रेष्ठत्व

रामदासाचें श्रेष्ठत्व, व त्याचें समर्थ हें अन्वर्थ नामधेय.

सर्वमान्य असे, व त्याचकारणानें त्यास समर्थ ह्मणत. ह्याचें वैराग्य फारच कडकडींत, आणि विलक्षण असून देखील, धार्मिक, नैतिक, सामाजिक, व्यावहारिक, लौकिक, व राजकीय विषयांत, त्यानें विशेष दूरवर विचार केला होता, यांत अगदीं शंका नाहीं. कारण, त्यासंबंधानें, त्याचे प्रत्यक्ष ग्रंथच बहुमूल्य साक्ष देतात.

ह्याचे लहान मोठे ग्रंथ सुमारें वीस आहेत. सबब, त्यांची

त्याचे ग्रंथ.

अवश्य ती हकीकत येथें थोडक्यांत देतों.

१ दासबोध, २ सगुणध्यान, ३ निर्गुणध्यान, ४ मानसपूजा, ५ पंचसमासी, ६ सप्तसमासी, ७ एकवीस समासी, ८ जुनाट पुरुष, ९ पूर्वारंभ, १० आत्माराम,

११ गोसावी, १२ मनाचे बोधपर श्लोक, १३ अभंग-शतकें (चौदा), १४ अन्यस्फुट अभंग, १५ पदें, इत्यादि.

ह्या पैकीं, सर्वांत अग्रेसर आणि विशेष महत्वाचा असा ग्रंथ ह्मटला ह्मणजे दासबोधच होय. सबब, त्याबद्दलचें जरा तपशिलवार विवेचन करणें अत्यवश्य आहे.

दासबोधाचें महत्व.

ह्या अपूर्व ग्रंथांत, हरएक बाबतींत सर्व प्रकारचा यथास्थित ऊहापोह केलेला दृष्टीस पडतो. त्यामुळें, समर्थांच्या व्यवहारदक्षतेची आणि सर्वज्ञतेची धन्यता वाटते. इतकेंच नव्हें तर, हे स्वत: मोठे निर्भिड व स्पष्ट वक्ते असल्याकारणानें, या देहाची इतिकर्तव्यता, क्षेत्रलक्षण, उपासनालक्षण, मूर्खलक्षण, कुविद्यालक्षण, सद्‌विद्यालक्षण, स्त्रीलोभदु:ख, दारिद्र्यकष्ट, वैराग्यचिन्ह, अध्यात्मसुख, गुरुलक्षण, शिष्यलक्षण, ज्ञानलक्षण, सिद्धलक्षण, साधकलक्षण, पंचभूतलक्षण, भ्रमलक्षण, प्रचीतिलक्षण, राजकारण, निस्पृहता, याचना, उद्योग, यत्न, सारासारविचार, कवित्व, लेखन, चातुर्य, विवेक, इत्यादींचें त्यानें फारच सुरेख वर्णन केलें असल्याचें व्यक्त होतें.

त्यांतील विषय.

किंबहुना, गेल्या सतराव्या शतकांत, बेकन्‌नें ज्याप्रमाणें भिन्नभिन्न विषयांवर अनेक चुटकेदार लेख गद्यात्मक लिहिले, व इंग्लंडची देशसेवा केली; त्याच प्रमाणें, आमच्या ह्या नामांकित कवीनें, त्याच शतकांत,

समर्थ व बेकन्, यांत तुलना.

भिन्नरुचिरंजनार्थ अनेक विषयावर पद्यात्मक लेख रचले, आणि ते आखिल महाराष्ट्र देशाच्या उन्नत्तीसाठीं मोठ्याप्रेमानें अर्पण केलें. परंतु, हींचं तुलना आपण किंचित् विस्तृत केली, व सूक्ष्म अवलोकनानें पाहिलें, तर आपणांस असें खचित दिसून येईल कीं, हीं दोन्हीं अद्वितीय रत्नें जरी अतुल दीप्तीचीं होऊन गेलीं, तरी सारासार विचारानें त्यांत निःसंशय जमीन अस्मानाचें अन्तर आहे. कारण, एकानें आपल्या विलक्षण बुद्धिवैभवानें आपला सर्व देश प्रकाशित करून, जणूंकाय तें तेज असह्य झाल्यानेंच,

---

१ बेकन्‌ची विशाल बुद्धि, त्याची कृष्ण कीर्ति, आणि त्याचें अति निंद्य व घोर दुराचरण, हीं एका आंग्ल ग्रंथकाराच्या मुखानेंच सांगतों. तो म्हणतो,

" Bacon * not only abandoned his former friend (and benefactor) but volunteered with malignant eagerness among the foremost ranks of his enemies, * to blacken his memory. " *

" The whole of his public career was stained with acts of the basest servility and curruption. " * * * (P. 95.)

" He sat on the House of Commons, and gave evidence not only of his unequalled powers as a speaker, but also of that cowardly and interested subservance to the court, which was the great blot upon his glory, and the cause of his ultimate disgrace. " P. 94.

(History of English Literature. By T. B. Shaw. 1897.)

भारतीय साम्राज्य. पु. सहावें. पान १३९ पहा.

त्यानें आपल्या विवेकशून्य, नीच, आणि अतिनिंद्य कर्मानें, त्याला सलज्जच खालीं पहावयास लाविलें. इतकेंच नव्हें तर, त्यानें आपल्या निःसीम अपकीर्तीनें स्वदेशाच्या मुखावर वज्रलेप काजळ फांसलें, व त्याचें निरन्तरचें कृष्णमुख करून टाकिलें. परंतु, दुसऱ्यानें तसें केलें नाहीं. ह्यानें आपल्या अपूर्व बुद्धिसामर्थ्याचा प्रचंड दीप सर्व महाराष्ट्रभर, व अखील भरतखंडांत लाविला; आपल्या धवल यशाचा परिमल इतस्ततः सोडला; आणि आपल्या सुकीर्तीचा दुंदुभि सर्वत्र गाजवून, महाराष्ट्राचें अवनत झालेलें मुख मोठ्या थाटानें उन्नत केलें. इतकेंच नव्हें तर, आपल्या प्रिय देशास व प्रेमळ बांधवास पारतंत्र्यांतून मुक्त करून, त्यांजला स्वातंत्र्यदेवीचे अचल उपासक बनविलें; आणि महाराष्ट्राच्या अत्युच्च भगव्या झेंड्याकडे अखिल भूमंडलास साश्चर्य अवलोकन करावयास लावून, त्याची वैभवश्री देखील केवळ शुक्लचन्द्रमाप्रमाणेंच वाढविली.

तींत रामदासाची सरशी व तिचें कारण.

श्रीरामदास हा कवि असून तत्ववेत्ता होता; लॉर्ड बेकन् सुद्धां शास्त्रज्ञ व तत्वज्ञ असे. समर्थांनीं तत्वज्ञानासंबंधानें अध्यात्म विषयांतच ऊहापोह केला; बेकन्नें केवळ व्यावहारिक शास्त्रकलांतच तत्वविचार चालविला. रामदास हा अगदीं निस्पृह आणि दृढ निश्चयाचा होता; बेकन् हा अत्यन्त लोभी व विकारवश असे. रामदास हा, देशकीर्ति आणि महाराष्ट्र सेवा हीच काय ती आपली खरी इतिकर्तव्यता मानी; परंतु बेकन् हा, स्वार्थ-

परायणता व नीचकर्म, यांतच आपला कार्यभाग समजे. रामदासाची वृत्ति गंभीर असून उदात्त होती; बेकन् हा केवळ क्षुद्र आणि हीन प्रकृतीचा असे. राव किंवा रंक या दोघांशींही रामदास हा समान वर्तन ठेवी; बेकन् हा नीच वृत्तीनेंच लांगूलचालन करून रावास रिझवी, आणि रंकास पराङ्मुख होई. रामदासाच्या सन्निध आल्यावर, राजाधिराज देखील अवनत होऊन, त्याच्या चरणारविन्दस्पर्शानें आपले मुकुटमणी पवित्र करीत; बेकन् हा स्वयमेव राजचरणीं लोळून क्षुद्र दासत्व करी, व निष्कारण हीन वृत्तीचें अवलंबन करून, आपल्या अनेक प्रज्वलित गुणांस अपवित्रता आणी. रामदास हा कृतज्ञ आणि उपकार करणारा असे; बेकन् हा कृतघ्न व अपकार करणारा होता. (मागील पान २७७ वरील टीप पहा.)

रामदासाच्या ज्ञानाचे चुटके.

आतां, श्री समर्थांच्या नानाविध ज्ञानाचा खरा प्रत्यय वाचकांस आणून देण्यासाठीं, दासबोध रत्नाकरांतील कांहीं निवडक मौक्तिकें त्यांजपुढें ठेवितों.

त्याचें राजकीय धोरण.

राजकारण कसें करावें; त्याचा भेद न होऊं देण्याविषयीं किती काळजी राखावी; लोकांचें इंगित कसें जाणावें; परदुःखानें कसें दुःखित व्हावें; प्रसंग कसा ओळखावा; कांट्यानें कांटा कसा काढावा; दुसऱ्यावर विश्वास किती खबरदारीनें ठेवावा; महत्वाचें कार्य किती लक्ष्यपूर्वक पहावें; शत्रूला कसें "दे माय धरणी ठाय" करावें; त्याची नांगी कशी मोडून टाकावी; राजा-

चा धाक कसा असावा; इत्यादि गोष्टी फारच रसिकतेनें वर्णून, सखोलअन्वेषणानें व मर्मज्ञतेनें त्यांनी सांगितल्या आहेत. रामदास ह्मणतात,

राजकारण बहुत करावें । परंतु तें कळोंच न द्यावें ॥
परपीडेवरी नसावें । अन्तःकरण ॥ १९ ॥
लोक पारखून सोडावे । राजकारणें अभिमान झाडावे ॥
पुन्हां मेळऊनि घ्यावे । दुरिल्या दुरें ॥ २० ॥
प्रसंग समयो ओळखावा । धीर बहुत असावा ॥
समंध पडो न द्यावा । अति परिचयाचा ॥ ८ ॥ * * *
नव्हें तेंचि करावें । दीर्घ प्रयत्नें ॥ ११ ॥ *
फड नासोंच न द्यावा । पडिला प्रसंग सांवरावा ॥ (२॥ *

(दशक ११ वें. समास ५ वा).

नष्टासी नष्टच योजावे । आपणांवरी विकल्पाचे गोंवें ।
पडोचि नेदी ॥ ११ ॥
कांटीनें कांटी झाडावी । झाडावी परी ते कळों न द्यावी १२
जो दुसऱ्यावरी विश्वासला । त्याचा कार्यभाग बुडाला ॥
जो आपणची कष्टत गेला । तोचि भला ॥ १६ ॥ *
मुख्य सूत्र हातीं घ्यावें । करणें तें लोकां करवीं करवावें ॥
कित्येक खलक उगवावे ॥ राजकारणांमध्यें ॥ १८ ॥ *
दुर्जनें राजकारण दाटे ॥ ऐसें न करावें ॥ १९ ॥
दुर्जन प्राणी समजावे ॥ परी ते प्रगट न करावे ॥
सज्जनापरी आळवावे ॥ महत्व देऊनी ॥ २३ ॥
गलिमाच्या देखता फौजा ॥ रणशूरांच्या फुरफुरती भुजा ॥
ऐसा पाहिजे कीं राजा ॥ कैपक्षीं परमार्थीं ॥ २५ ॥
जयास देखता दुर्जन धाकें ॥ बैसवी प्रचीतीचे तडाखे ॥
बंड पाषांडाचे वाखे ॥ सहजचि होती ॥ २६ ॥

हीं धूर्तपणाचीं कामें ॥ राजकारण करावें नेमें ॥
ढिलेपणाच्या संभ्रमें ॥ जाऊंच नये ॥ २७ ॥
कोठेंच पडेना दृष्टी ॥ परी ठायीं ठायीं त्याच्या गोष्टी ॥
वाग्विलासें सकळ सृष्टि ॥ वेधिली जेणें ॥ २८ ॥

(दशक १९ वें. समास ९ वा).

अशा प्रकारें, त्यांनीं लिहिलेल्या सर्व बाबतींत त्यांचा अनुभव पूर्ण असल्यामुळें, त्यांनीं आपल्या उपदेशाचीं शस्त्रें योग्य ठिकाणीं पाझळून, त्यांचे वार उचित काळीं, त्यांच्या तडाक्यांत सांपडलेल्या प्रत्येक मनुष्यावर, त्यानीं सतत केले आहेत.

त्याचा संभाजीस उपदेश व त्याची मर्मज्ञता.

दुसऱ्या एके ठिकाणीं, समर्थांनीं संभाजी राजास केलेला उपदेश खरोखरच ध्यानांत ठेवण्यासारसा आहे. कारण, त्यांत राजाची इतिकर्तव्यता सांगितली आहे. राजानें सर्व जनांस संतुष्ट राखून, आपल्या प्रजेची प्रीति संपादन करावी. राज्यांत कोठेंही कलह न माजूं देतां, संधि राखावा. कारण, दोघांचें भांडण झाल्यानें तिसऱ्याचा फायदा होतो; सबब, त्याचें बीजच मोडून टाकावें. राज्यांत एकी राखून, शत्रूला हद्दपार करावें. नाहीं तर, तो जोरावत जाऊन, आपल्या राज्यास अपाय होतो. यासाठीं, शत्रूला जेरीस आणून, म्लेच्छांची दाणादाण करावी. स्वराज्याचें रक्षण करून, अन्य देश काबीज करीत जावें. सर्व सुखांचा त्याग करून, पुरुषार्थ मिळवावा. विस्तीर्ण राज्य संपादावें. ह्या महाराष्ट्र साम्राज्याचा झेंडा श्रीशिवछत्रपतीच्या वर्तनानुरूप, चोहोंकडे

मिरवून, तो सर्वत्र फडकवावा; आणि जिकडे तिकडे मराठे-शाहीच्या तीव्र दुंदुभींचें यथेष्ट ताडन होईल असें करावें; इत्यादि खऱ्या अंत:करणानें लिहिलेलीं समर्थांचीं प्रेमळ व रसाळ अमृतवचनें, अतीव मनोवेधक, नितान्त मोहक, आणि प्रत्येक महाराष्ट्रीयाच्या, किंबहुना अखिल भारतवर्षाच्या हृदयाला केवळ झोंबणारींच आहेत. श्रीसमर्थ ह्मणतात,

अखंड सावधान असावें ॥ दुश्चित कदापि नसावें ॥
तजवीज करीत बसावें ॥ एकास्थळीं ॥ १ ॥
कांहीं उग्रस्थिति सोडावी । कांहीं सौम्यता धरावी ॥
चिंता लागावी परावी ॥ अन्तर्यामीं ॥ २ ॥
मागील अपराध क्षमा करावे ॥ कारभारी हातीं धरावे ॥
सुखी करून सोडावे ॥ कामाकडे ॥ ३ ॥
पाटांतील तुंब निघेना ॥ तरी मग पाणी चालेना ॥
तै जें जनाच्या मना ॥ कळलें पाहिजे ॥ ४ ॥
जनाचा प्रवाह चालिला ॥ ह्मणजे कार्यभाग आटोपला ॥
जन ठायीं ठायीं तुंबला ॥ ह्मणजे तें खोटें ॥ ५ ॥
श्रेष्ठीं जें जें मिळविलें ॥ त्या साठीं भांडत बसलें ॥
तरी मग जाणावें फावलें ॥ गलीमाशीं ॥ ६ ॥
ऐसें सहसां करूं नये ॥ दोघे भांडतां तिसऱ्याशीं जाये ॥
धीर धरून महत्कार्य ॥ समजून करावें ॥ ७ ॥
आधीच पडली धास्ती ॥ मग कार्यभाग होय नास्ती ॥
या कारणें समस्ती ॥ बुद्धि शोधावी ॥ ८ ॥
राजी राखतां जग ॥ मग कार्यभागाची लगबग ॥
ऐसें जाणोनियां सांग ॥ समाधान करावें ॥ ९ ॥

सकळ लोक एक करावे ॥ गलीम निवटून काढावे ॥
तेणें कीर्ति धांवे ॥ दिगंतरीं ॥ १० ॥
आधीं गाजवावें तडाखे ॥ तरी मग भूमंडळ धाके ॥
ऐसें न होतां धक्के ॥ राज्यास होती ॥ ११ ॥
समय प्रसंग ओळखावा ॥ राग निपटून काढावा ॥
आला तरी कळों न द्यावा । जगामाजीं ॥ १२ ॥
राज्यामध्यें सकळ लोक ॥ सलगी देऊन करावे साक ॥
लोकांचे मना धाक ॥ उपजोचि नये ॥ १३ ॥
बहुत लोक मिळवावे ॥ एक विचारें भरावे ॥
कष्ट करोनि घसरावे ॥ म्लेंच्छावरी ॥ १४ ॥
आहे तितुकें जतन करावें ॥ पुढें आणिक मिळवावें ॥
महाराष्ट्र राज्य करावें ॥ जिकडे तिकडे ॥ १५ ॥
अहंमती लोकीं धरावी ॥ हिमतीची तरवार करावी ॥
चढती बढती पदवी । पावाल येणें ॥ १६ ॥
शिवराजास आठवावें ॥ जीवित्व तृणवत् मानावें ॥
इहलोकीं परलोकीं तरावें ॥ कीर्तिरूपें ॥ १७ ॥
शिवराजाचें आठवावें रूप॥शिवराजाचा आठवावा साक्षेप॥
शिवराजाचा आठवावा प्रताप॥भूमंडळीं ॥१८॥
शिवराजाचें कसें बोलणें ॥ शिवराजाचें कसें चालणें ॥
शिवराजाची सलगी देणें ॥ कैसी असे ॥ १९ ॥
सकल सुखाचा करावा त्याग ॥ करुनि साधिजे तो योग॥
राज्य साधनाची लगबग ॥ कैसी केली ॥ २० ॥
त्याहून करावें विशेष ॥ तरीच म्हणवावें पुरुष ॥
याउपरी आतां विशेष ॥ काय लिहावें ॥ २१ ॥

ह्यावरून, श्रीरामदास समर्थ हे परमार्थ विचारांत अहोरात्र निमग्न असतांही, स्वदेशहितासाठीं किती झटत होते; अत्यन्त विरक्त असून देखील; महाराष्ट्र देशाच्या कल्याणार्थ त्यांजला किती काळजी वाटे; सन्यस्त असतांहीं महाराष्ट्र-स्वातंत्र्यार्थ ते कसे भगीरथ प्रयत्न करीत; महाराष्ट्रानें आपली विजयी तलवार सर्वत्र गाजवून, अखिल भूमंडलावर त्यानें आपला यशोध्वज फडकवावा व कीर्तिपरिमल सोडावा म्हणून, आपल्या देशबांधवास त्यांनीं किती तऱ्हेनें आणि कशाप्रकारचे नानाविध उपाय सुचविले; इत्यादि गोष्टी आम्हीं व इतरांनीं, स्वदेशीयांनीं आणि पारदेशीकांनीं, पौरस्त्यांनीं व पाश्चात्यांनीं, खचितच ध्यानांत ठेवण्यासारख्या आहेत.

शिवाय, राज्यसंपादनानिमित्त आणि तद्वृध्द्यर्थ, ह्या अद्वितीय पुरुषानें जे जे उपाय सुचविले, ते ते मी मी म्हणविणाऱ्या पाश्चात्य मुत्सद्यांस देखील सकौतुकाश्चर्य तोंडांत बोटें घालावयास लावण्यासारखे आहेत. आणि म्हणूनच ह्या संतशिरोमणीची व महात्म्याची कोणासही धन्यता वाटते.

अशा प्रकारची वस्तुस्थिति असल्याकरणानें, पाश्चात्यांत अथवा पौरस्त्यांत, जे कोणी म्हणत असतील कीं, भारतीयांत राष्ट्रहित ह्मणून केव्हां देखलि जागृतच नव्हतें; किंवा, सामाजिक कल्याण त्यांच्या स्वप्नीं सुध्दां नसे; अगर, देशाभिमान व स्वार्थत्याग तर त्यांस ठाऊकच नव्हता; त्यांनीं निदान रामदास, शिवाजी, बाळाजी विश्वनाथ, ब्रह्मेन्द्रस्वामी, पहिले बाजीराव पेशवे, थोरले माधवराव पेशवे, नाना फडणीस,

इत्यादि महात्म्यांनीं जीं कृत्यें केली, व ज्या धोरणार त्यांनीं हें साम्राज्य शकट चालविलें, त्याजवर कृपा करून आपली दृष्टी एकदां तरी फेंकावी; आणि कै० नामदार न्यायमूर्ती रानडे यानीं लिहिलेल्या मराठ्यांच्या इतिहासावर मेहेरबानीनें जराशी नजर द्यावी; ह्मणजे त्यांची ह्या बाबतींत पुष्कळ अंशानें खात्री होईल, अशी आम्ही आशा करतों. मात्र, आमच्या ह्या पडत्या काळांत, आम्ही त्यास इतकें सुचविण्याचें सविनय साहस करतों कीं, कोणी कांहीं ह्मटलें तरी, आमचें भारतीय राष्ट्र एवढें खचितच मूढ नाहीं; व ती गोष्ट पाश्चात्य विद्वानांस आणि इतिहासज्ञांस सुद्धां कबूल करणें भाग पडतें.

---

१ मागील पान २००–२०१ वरील टीप पहा.

२ ह्यासंबंधानें सीली असें लिहितो कीं,

" Brahminism by its peculiar trick of absorption and assimilation has brought together under one name, forms of civilization which are really diverse. * * * Perhaps no race has shown a greater aptitude for civilization. * * * This is only natural. We are not cleverer than the Hindu; our minds are not richer or larger than his. We cannot astonish him, as we astonish the barbarian, by putting before him ideas that he neverd reame dof. * Even our science perhaps has few conceptions that are altogather novel to him. "

(Seeley's Expansion of England. 1890.
P. P. 240, 241, 244.)

असो. रामदासाचे समकालिन असे लहान मोठे पुष्कळच कविजन होऊन गेले. सबब, त्या सर्वांची अवश्य तेवढी हकीकत येथें थोडक्यांत देतों.

रामदासाचे समकालीन अन्य कवी.

रंगनाथस्वामी हे निगडी येथील राहणारे होत. यांच्या वडिलांचें नांव गोपाळराव असून, यानीं सन्यास घेतल्यावर, त्यांजला निजानन्दस्वामी ह्मणूं लागले. ह्यांना तीन पुत्र होते. त्यांपैकीं, रंगनाथ हे मधले होत. ह्यांचा जन्म मार्गशीर्ष शु० १० शके १९३४ (इ० स० १६१२) साली झाला; आणि त्यांनीं अल्पवयांतच सन्यास घेतला. हा अनुग्रह त्यांचे वडील निजानंदस्वामी यानींच केला असल्याचें सांगतात. रंगनाथ हे आपल्या वयाच्या ७२ व्या वर्षी, ह्मणजे इ. स. १६८४ मध्यें वारले. ह्यांची नेहेमींची राहण्याची पद्धति केवळ सरदारी बाण्याची असे. त्यामुळें, घोडा, भाला, तलवार, व अनेक ब्रह्मचारी, इतक्या लवाजम्यानिशींच ते बाहेर पडत. ह्यांचा महत्वाचा आणि लोकमान्य ग्रंथ म्हटला ह्मणजे वासिष्ठसार होय. हा योगवासिष्ठाच्या आधारेंच केल्याचें दिसतें. इतकेंच नव्हें तर, ह्यांतील सुमारें २२९ श्लोकांवरच स्वामींनीं टीकेदाखल ओंवीबध्द काव्य रचलें, व त्यास वासिष्ठसार-टीका हें नांव दिलें, असें सुध्दां म्हणण्यास हरकत नाहीं.

निगडीचे रंगनाथस्वामी, त्यांचा काल,व ग्रंथ.

ह्याच सुमारास, रंगनाथ नांवाचा दुसरा एक कवि पै-

पैठणचा रंगनाथ व त्याची कृति.

ठणांस[1] जन्मला असल्याचें कळतें. ह्याचे ग्रंथ १ बृहद्वाक्यवृत्ति, २ चित्सदानन्दलहरी, इत्यादि होत. ह्यापैकीं, चित्सदानंदलहरी ही भगवद्गीतेवरील टीका असून, श्रीज्ञानेश्वरी शिवाय, अशी विस्तृत टीका त्यावेळीं दुसरी नव्हती. सबब, वामन पंडिताची यथार्थदीपिका नांवाची भगवद्गीतेवरील टीका होईपर्यंत, तिची परिगणना चांगल्यांतच होत असें, हें उघड आहे.

वामन पंडित, त्याचें पूर्ववृत्त, व काळ.

वामनपंडित हा इ० स० १६१८ च्या सुमारास जन्मला, आणि इ. स. १६९३ सालीं वारला,[3] असें वाटतें. हा कोरेगांव कुमठें येथील राहणारा असून, ह्याच्या आईचें नांव लक्ष्मी व बापाचें नांव नरहर पंडित होतें. ह्यानें आपलें विद्यार्जन श्री काशीक्षेत्रीं केलें, आणि येथें दशग्रंथी व अनेक शास्त्रविशारद होऊन, तो सर्वांपासून अजिंक्य पत्रें मिळवूं लागला. एवढेंच नव्हें तर, संस्कृताखेरीज इतर सर्व भाषांस व प्राकृत प्रलापांस देखील तुच्छवत समजून, मराठींत भाषण करण्याचें तर त्यानें अजिबातच वर्ज्य केलें. अर्थात्, मराठी त्याची मायभाषा होती.

---

१ का. स. हितेच्छु.

२ कित्येकांच्या अभिप्रायाप्रमाणें, ह्या टिकेचें कर्तृत्व रंगनाथ स्वामीकडे येतें. (काव्य संग्रह. रुक्मिणीमाला.)

३ ह्याचा अंतकाल इ. स. १६७३ सालीं झाल्याचेंही कांहींचें मत आहे. (कविचरित्र.)

तेव्हां, तिलाच फांटा मिळाल्यामुळें, त्याचा यच्चावत् व्यवहार केवळ संस्कृतांतच चाले, हें उघड आहे.

पुढें, कालांतरानें, कांहीं विशिष्ट प्रकार उद्भवून त्याला उपरति झाली; आणि अहंभावानें या नृजन्माचें सार्थक न होतां, आपल्याला निव्वळ अधोगतीच येणार, असें त्याला वाटूं लागलें. किंबहुना, श्रीसमर्थ रामदासाच्या शिष्यवर्गांत हा असल्यानें, त्याच्या कृपेचाच हा परिणाम होय, असें ह्मणणें प्राप्त येतें. कारण, त्याची मति आपोआप पालटली, व तो इतउत्तर फक्त मराठींतच ग्रंथरचना करूं लागला. फार तर काय सांगावें, पण, संस्कृतांत लिहिण्याचें किंवा बोलण्याचें देखील त्यानें अगदीं सोडून दिलें, असें ही ह्मणण्यास हरकत नाहीं.

त्याचे ग्रंथ.

ह्याचे मराठींत पुष्कळ ग्रंथ आहेत, व ते चांगल्यांत मोडतात. १ प्रियसुधा. २ भीष्मप्रतिज्ञा. ३ यथार्थदीपिका. ४ राजयोग. ५ कर्मतत्व. ६ तत्वमाला. ७ सीतास्वयंवर. ८ कालियामर्दन. ९ भामाविलास. १० रासक्रीडा. ११ निगमसार. १२ ब्रह्मस्तुति. १३ समश्लोकीगीता. १४ गीतार्णवसुधा. १५ श्रुतिकल्पलता. १६ अपरोक्षानुभूति. १७ अनुभूतिलेश. १८ गंगालहरी. १९ विराटपर्व. २० सिद्धांतविजय. २१ भक्तिमहिमा. २२ नाममहिमा. २३ ब्रह्मोपदेश. इत्यादि.

यथार्थदीपिका, व त्या विषयीं तत्कालीन मत.

प्रियसुधा हा ग्रंथ त्यानें आपल्या प्रियपत्नीसाठीं केला होता. हिचें नांव गिरा असे, व तिला ब्रह्मज्ञानाचा उपदेश व्हावा, एतदर्थच तो रचला होता. यथा-

र्थदीपिकेंत वामनानें आपलें खरें ज्ञान आणि शास्त्रभांडार ओतलें आहे. कारण, शंकराचार्यापासून तों तहत ज्ञानेश्वर व रंगनाथापर्यंत त्यानें सर्व टीकाकारांचें पर्यालोचन करून, एकंदर मथितार्थ व आपला अभिप्राय दर्शविला आहे. त्यामुळें, सुमारें २२,००० वर काव्य होऊन, एकंदर ग्रंथ फारच विस्तृत झाला आहे. आणि अशा योग्यतेचा श्रीमद्-भगवद्गीतेवर अन्य ग्रंथच नाहीं, असें म्हणतात. तथापि, तत्कालीन रसिकजनास तो पसंत पडल्याचें दिसत नाहीं. कारण, ह्यासंबंधानें खुद्द वामनच असें म्हणतो कीं,

वाचोत जे वाचिती ॥ न वाचोत जे वाईट मानिती ॥
संतुष्ट होय एक जगत्पति ॥ या यथार्थनिरूपणें ॥

ह्या ओंवीवरून, आमचा सुप्रसिद्ध संस्कृत कवि जो भवभूति, व आंग्ल कवि जो मिल्टन, त्यांच्या उक्तींचें लागलींच स्मरण होतें. आणि कवींचें स्वकृतीवरील प्रेम, व तत्कालीन जनसमूहाचा तद्विषयक अभिप्राय, यांत किती विपर्यास पडतो, याबद्दलचें महदाश्चर्य वाटतें. कारण, आपण केलेल्या नाटकाचें यथोचित गौरव होत नाहीं असें वाटून, भवभूति म्हणतो,

ह्या प्रसंगाची अन्यत्र तुलना.

येनामकेचिदिहनः प्रथयन्त्यवज्ञाम्
जानन्ति ते किमपि तान्प्रति नैषयत्नः ।
उत्पत्स्यतेऽस्ति मम कोऽपि समानधर्मा
कालोह्ययं निरवधिर्विपुलाच पृथ्वी ॥ ८ ॥

(मालती माधव. प्रथमांक.)

भवभूति,

आतां, ह्या नाटकाची खरी योग्यता कोणाही रसिक विद्वानाच्या लक्षांत तेव्हांच येण्यासारखी आहे. तथापि, भवभूतीच्या वेळीं त्याचें यथार्थ गुणग्रहण होत नव्हतें, याचें कोणालाही सहजीं नवल वाटेल.

मिल्टन्, व

हाच प्रकार मिल्टन्चा सुद्धां झाल्याचें दिसतें. कारण, त्याबद्दलचा उल्लेख कविमजकूरनें आपल्या "नन्दनवनच्युति" नामक महाकाव्यांत स्पष्टपणेंच केलेला असल्याचें आढळून येतें.

वामन, यांचे तत्संबंधीं उद्गार.

वामनाच्या यथार्थदीपिकेची अशीच निर्भर्त्सना किस्येक कुत्सित लोकांनीं केली होती. परंतु, तिला न भितां, अथवा त्यांच्या कुटिल वाग्बाणांनीं यत्किंचित्सुद्धां न डगमगतां, वामनानें त्यांचा खरपूस समाचार,

---

1 Paradise Lost.

2 "Half yet remains unsung, but narrower bound
Within the visible diurnal sphere;
Standing on earth, not rapt above the pole.
More safe I sing with mortal voice, unchanged
To hoarse or mute, though fallen on evil days,
On evil days though fallen, and evil tongues,
In darkness, and with dangers compassed round,
And solitude; yet *not* alone while thou
Visitest my slumbers nightly, or when morn
Purples the east : still govern thou my song,
Urania, and fit audience find, though few."
(Paradise Lost. Book VII. Lines 21-31.)

बहुतेक भवभूतीप्रमाणेंच घेतला असल्याचें, त्याच्या टीके-
वरून व्यक्त होतें. कारण, तो असें म्हणतो कीं,

कोणाची नसे भीड । आणि कोणाची नसे चाड ॥
अनन्यभक्ति लागतां गोड । या भगवद्गीतेंत ये रीती ११७९
वाचोत जे वाचिती । न वाचोत जे वाईट मानिती ।
संतुष्ट होय एक जगत्पती । या यथार्थ निरूपणें ॥११८०॥
जे अनुभवी आणि भक्त । जे इतर फळीं विरक्त ।
आणि जे समजती युक्तायुक्त । ते क्षणही न सोडिती हे
टीका ॥ ११८१ ॥

भ्रमरा कमळें प्रार्थावें । कीं चकोरा चंद्रे आमंत्रण द्यावें ।
कीं मयुरास मूळ पाठवावें । घराधरीं ॥ ८२ ॥

चन्द्र नावडे तस्करा । ह्मणोनि वीट ये ना चकोरा ।
कुमुदें लाजती भास्करा । ह्मणोनि कमळें मुख न झां-
किती ॥ ८३ ॥

जगद्वंद्य श्रीमद्भागवत । तेथें अप्रीति धरिती कुश्रित ।
अभक्त आणि कुमार्गस्त । त्यांस तैसी हे टीका ॥ ८४ ॥
बौद्धीं वेद दुषिले । तरी काय ते वाया गेले ।
स्वहित तत्पर रसज्ञ भले । तेच वाचिती हे टीका॥ ८५ ॥
असो तें आतां अर्जुन रथाचे ठायीं। जो गीता उपदेशितो
शेषशायी ।
प्रतिपदीं अर्पिली त्याच्या पायीं । हे यथार्थ दीपिका
वामन ह्मणे ॥ ११८६ ॥

(यथार्थदीपिका. अध्याय ७ वा).

ज्यास इतर टीकाकारांचे अभिमान । ते न देतील या
टीकेस मान ।

हरिभक्त निर्मत्सर निरभिमान । तेचि देतील सन्माग
या टीके तें ॥ ११९८ ॥
अध्याय ८ वा.

निगमसारावरून वामनाचा अन्तकाल.

निगमसार हा ग्रंथ शके १५९५ सालीं, ह्मणजे इ० स० १६७३ मध्यें रचला असल्याविषयीं, प्रत्यक्ष वामनकविच स्वमुखानें सांगतो.

शके पंधराशतें पंचाणव ॥ तैं ग्रंथ प्रगटला अभिनव ॥
जो अनादि अनुभव ॥ सकळ संताचा ॥ १६३ ॥
(निगमसार. अ० ९.)

ह्या नन्तरच श्रुतिकल्पलता नांवाचा ग्रंथ त्यानें तयार केला असून, तो पुष्कळ मोठा आहे. तेव्हां, इ० स० १६७३ सालानन्तर बऱ्याच कालानें तो निर्वर्तला, असेंच म्हणावें लागतें.

काव्यपरीक्षण.

वामनकवि हा प्रचंड विद्वान, विलक्षण रसिक, चांगला शास्त्रज्ञ, आणि अलोट काव्यस्फूर्तीचा होता, यांत मिळमात्रही शंका नाहीं. संस्कृतवाक् तर त्यांच्या घरीं केवळ पाणीच भरीत असे. पण, मराठी भाषेंत देखील त्याचा हातखंडाच होता, असें ह्मणावें लागतें. कारण, ह्या भाषेंत लिहिण्याचें किंवा बोलण्याचें त्यानें बहुतकालपर्यंत अजिबात वर्ज्य केलें असतांही, त्यानें ह्याच भाषेंत येवढी प्रचंड ग्रंथरचना

१ ह्याची समाधि सातारा जिल्ह्यांत, शिरगांव कोरेगांव मुक्कामीं, वारणा नदीच्या तीरीं असल्याचें कळतें.

केली; व ती सुद्धां अगदीं सहजगत्या, बिलकुल प्रयास न पडतां, आणि पूर्ण रसभरित झाली; ही निःसंशय फारच आश्चर्याची गोष्ट होय.

ह्यानें मराठी भाषेला विशेष सुसंस्कृत करून, तिच्यावर सुरम्य अलंकार चढविले; अत्युत्तम सुवर्ण[1] भूषणें घालून, मौक्तिक शब्दांनीं ती श्रृंगारिली; मणिमाणिक्यांनीं भरून काढून, अत्युज्ज्वल पदरत्नांनीं तिला देदीप्यमान केलें, व हवा तो भाव प्रगट करण्याचें त्यानें तिच्यांत विशेष सामर्थ्य आणिलें. आतां, ह्यांत क्वचित् कोठें शब्दांची ओढाताण, छन्दोभंग, वर्णप्रमाद, इत्यादि दोष दृग्गोचर होतात खरे. तथापि, त्या योगानें, एकंदर काव्यामृताचा स्वाद कोणत्याही प्रकारें यत्किंचिद् देखील कमी न होतां, त्याची गोडी कायम रहाते; आणि ह्या कवीच्या उदार कृतीविषयीं मोठें कौतुक वाटून, आपली प्रेमबुद्धीच व्यक्त होते.

जयरामस्वामी.

जयरामस्वामी देखील कविजनांपैकींच होत. यांची जन्ममित्ती समजत नाहीं. तथापि, त्यांनीं इ० स० १६७२ सालीं समाधि घेतल्याचें कळतें. ह्यांचे १ सीतास्वंयवर, २ शांतिपंचीकरण, ३ रुक्मिणीस्वयंवर, इत्यादि ग्रंथ असून, ह्यांनीं रचलेलीं कित्येक पदेंही हल्लीं उपलब्ध आहेत. यांची समाधि वडगांवास असल्याचें कळतें.

१ सुवर्ण = चांगलें वर्ण, कांचन.

केशवस्वामी.

केशवस्वामींची सुध्दां जन्मतिथि कळून येत नसून, ते इ० स० १६६८ सालच्या सुमारास वारल्याचें कळतें. यांचे फक्त एकादशीचरित्र व दुसरीं पदें उपलब्ध आहेत.

निरंजनस्वामी.

निरंजनस्वामी हे ह्या सतराव्या शतकांतीलच होत. तथापि, ह्यांचा जन्ममरणकाल कळून येत नाहीं. ह्यांचीं फक्त पदेंच कायतीं उपलब्ध आहेत.

आनन्दमूर्ति.

आनन्दमूर्तीचाही जन्मकाळ समजत नसून, तो इ० स० १६९६ मध्यें वारल्याचें कळतें. ह्यांचीं फक्त पदेंच सांपडलेलीं दिसतात.

अनन्त कवि, व त्याचे ग्रंथ.

श्रीरामदास समर्थांच्या शिष्यवर्गांत वामनानन्तर, कवि या नात्यानें, अनन्त हाच विशेष प्रसिद्ध दिसतो. हा सातारा जिल्ह्यांतील राहणारा असून, इ० स० १६९८ सालीं जन्मला, आणि इ० स० १७२४ च्या सुमारास किंवा त्यानन्तर वारला, असें कित्येकांचें मत आहे. ह्याचे मुख्य ग्रंथ म्हटले म्हणजे १ सुलोचना गहिंवर, २ सीतास्वयंवर, ३ अहिमहिआख्यान, ४ कुशलवाख्यान, ५ गरुडगर्वपरिहार, इत्यादि अजमासें वीस

---

१ कारण, सुलोचनाख्यानांत, ह्या प्रकरणाचा काल देतांना, कवि मजकूरनें असें म्हटलें आहे कीं,

सोळाशें निगमावरी शिवमुखें ठेवूनि संख्यागणा ।

त्यावरून, शके १६४५ (इ० स० १७२३) सालीं हें कवन झालें असें समजून, त्यानंतर तो वारला, असें कित्येक मानतात.

असून, त्यांस प्रकरणें म्हणतात. ह्याखेरीज, त्याची अनेक पदें सुद्धां आहेत. यां सर्वांमिळून एकंदर ग्रंथसंख्या (म्हणजे काव्य अथवा ओंवी संख्या) सुमारें दीड हजार होईल, असें वाटतें. ह्या सर्वांत सुलोचना गार्हिवर हें विशेष लोकप्रिय आहे, व त्या खालोखाल दुसरींही चांगली उतरलीं आहेत. ह्याची भाषा सुबोध असून, अलंकृत दिसते; आणि साधी असून रसाळ भासते. समर्थांच्या आज्ञेवरून, ह्याला निलंगाबादेस बांधलेल्या मठाचा अधिकारी केला होता.

श्रीशिवाजी महाराज.

आतां, श्रीरामदासाच्या शिष्य मंडळांत, ज्यांनीं ह्मणून महाराष्ट्र भाषेची सेवा केली, असे फक्त श्रीछत्रपति शिवाजी महाराज, व अन्य लहान सहान कविगण, इतकेच काय ते राहिले असून, त्यांजविषयींची अवश्य ती हकीगत देणें निःसंशय अगत्याचें आहे. सबब, ती येथें थोडक्यांत देऊन, मराठी भाषेच्या प्रौढावस्थेंतील द्वितीयकालाचें हें विवेचन आटोपतें घेतों.

शिवाजीचे मराठी भाषेवर उपकार.

शिवाजी हा मोठा रसिक असे. त्यामुळें, सर्व गुणांत तो केवळ अष्टपैलूच बनला होता, असें ह्मणण्यास हरकत नाहीं. फार तर काय सांगावें, पण, ज्यानें आपल्या शौर्यादि गुणांनीं आखिल महाराष्ट्र, किंबहुना सर्व भरतखंडच, विभूषित केलें; ज्यानें अविंधांस चळचळा कांपविलें; ज्यानें महत् प्रयासानें महाराष्ट्र साम्राज्याचा पाया घातला; ज्यानें तो

दीर्घ युक्तीनें सांभाळिला; ज्यानें मोठ्या शौर्यानें आणि विलक्षण साहसानें तो विस्तृत केला; ज्यानें सर्व महाराष्ट्रीयांस व यच्चावत् भारतपुत्रांस स्वातंत्र्यदेवीचे पूर्ण उपासक बनविलें; आणि ज्यानें जयश्रीचा भगवा झेंडा सर्वत्र फडकावून, स्वतःच्या पराक्रमानें दिगन्त कीर्ति मिळविली; त्याच नरव्याघ्रानें देशसेवेच्या अश्रान्त परिश्रमांत, व अनवरत कार्यबाहुल्यांत, मराठी भाषेकडेही पूर्ण लक्ष्य देऊन, तिची देखील मनःपूर्वक सेवा केली, हें आमचें महद्भाग्य होय, असें कोणालाही कबूलच केलें पाहिजे.

शिवाजीनें केलेले अभंग.

श्रीशिवाजी हा कवि नव्हता. त्यामुळें, त्याची गणना कविवर्गांत तर खचितच करता येणार नाहीं. तथापि, ह्या अद्वितीय रत्नाच्या असह्य दीप्तींत, अगर त्याच्या असंख्य राजकीय खटपटींत, किंवा त्याच्या तीव्र राजकारणांत, आणि त्याच्या अतुल परिश्रमसातत्यांत, त्याचें जें काव्य आपल्या श्रुतिपथावर येतें; अथवा, त्याचा जो अल्पस्वल्प विद्याविलास आपल्या दृग्गोचर होतो; तो पाहून फारच आश्चर्य वाटते. सबब, त्याचा रसास्वाद वाचकास उपलब्ध व्हावा एतदर्थ, त्यांतील कांहीं भाग मी येथें देतों.

सद्गुरु बापा तूं माहेरा । माते तुझाचि उबारा ।
परकी जे भवसागरा । पूर्णोद्धारा स्वामीया ॥
अनन्याच्या प्रतिपालका । दारुण भवभय हारका ।
रक्षा आपुल्या बाळका । नका नका उपेक्षूं ॥
भवसर्पे गुंडाळलें । तेणें मन हें व्याकुळ झालें ।
हित अहित विसरलें । सांभाळिलें पाहिजे ॥

मोकलिलें तुह्मी जरी । निरवावें म्या कवणें परी ।
तुह्मावीण गती दुसरी । मातें नाहीं दयाळा ॥
शुद्ध करोनिया मन । पूर्ण निजरूप जाणून ।
रामदासीं लोटांगण । शिवराजानें घातलें ॥

ह्यावरून, शिवाजी महाराजांची रसिकता कोणाच्याही लक्षांत सहजीं येण्यासारखी आहे.

शिवाजीनें केलेली मराठी भाषेची सेवा.

परंतु, महाराष्ट्र भाषेची खरी सेवा महाराजांनीं अन्य दिशेनेंच करून, आपली इतिकर्तव्यता केवळ मनोभावानें व चांगल्या प्रकारेंच बजाविली असल्याचें, त्यांच्या कृतीवरून उत्तम रीतीनें व्यक्त होतें. कारण, महाराजांचा देशाभिमान फारच उत्कट असल्यामुळें, प्रत्यक्ष धामधुमीच्या प्रचंड झंझावातांत, आणि एकंदर वातावरण क्षुब्ध झालेलें असतांही, आपल्या देशांत, आपल्या राष्ट्रांत, व आपल्या लोकांत, विद्येची संपूर्ण अभिवृद्धि व्हावी म्हणून, आणि स्वभाषा ऊर्जित अवस्थेप्रत पोहोंचावी या हेतूनें, त्यांनीं आपलें दूरवर लक्ष्य पोहोंचविलें होतें; व अनेक दिशांनीं, भिन्न भिन्न प्रकारचे सतत प्रयत्न, त्यांनीं त्या कामीं चालविलेले असत. एवढेंच नव्हे तर, दर वर्षीं नियमित रक्कम खर्च करून, किंवा अमुक खंडी धान्य पोहोंचवून, अगर कांहीं बक्षीस पाठवून, अथवा इनाम देऊन देखील, त्यांनीं आपल्या प्रजाजनांकडून विद्याभ्यास करविला असल्याविषयीं, पुष्कळ दाखले सांपडतात.

महाराजांनीं तयार करविलेला राजव्यवहारकोश. तर,

त्यांनीं करविलेला राजव्यवहारकोश व त्याचा हेतु.

त्यांच्या स्वभाषाभिमानाची प्रत्यक्ष साक्षच देतो, आणि त्यांची उद्योगप्रीति चांगली व्यक्त करतो. ह्यांच्या कारकीर्दीत व ह्यांच्या पूर्वी, महाराष्ट्रांत यवनांचा केवळ सुळसुळाटच झाला. त्यामुळें, फारसी, आरबी, तुर्की, उर्दू, इत्यादि शब्दांचा मनसोक्त शिरकाव, आमच्या मराठी भाषेंत निष्कारण होत चालला. सबब, त्यांचा अटकाव करावा; मराठी भाषेला प्रौढत्व यावें; आणि ती पवित्र व्हावी; एतदर्थच सदरहू कोशाची योजना झाली. त्याप्रमाणें, इ० स० १६७५–७६ सालीं, राजाज्ञेवरून, वे० शा० सं० रा० रघुनाथ नारायण अध्वरी पंडितराव यांनीं तो रचला. ह्यांत, १ राजवर्ग, २ कार्यस्थानवर्ग, ३ भोग्यवर्ग, ४ शस्त्रवर्ग, ५ चतुरंगवर्ग ६ सामन्तवर्ग, ७ दुर्गवर्ग, ८ लेखनवर्ग, ९ जनपदवर्ग, व १० पण्यवर्ग, यांसंबंधाचे जे जे यावनी शब्द मराठींत घुसले, त्या त्या ऐवजीं तुल्यार्थ अशा संस्कृत शब्दांचीच योजना केली आहे.

अन्य कवी.

शिवाजी महाराजानन्तर, ज्यांनीं मराठी भाषेबद्दल थोडाबहुत तरी प्रयत्न केला, असे दामाजीपंत, रामीरामदास,

१ ह्यांच्या पवाड्यांतील थोडासा मासला येथें देतों:—
अनंत ब्रह्मांडें ज्याचे पोटीं । तो सांवळा जगजेठी । काळी घोंगडी काळी काठी । काळा दोरा कंठीं । बोली थेट मराठी । गांडीस लंगोटी । पायीं वाहणा । मोटा शहाणा । पतित पावन । नाम तयाचें ।।

२ हे रामदासाचे वडील बंधु असून, यांचें नांव गंगाधर होतें. ह्यांचें भक्तिरहस्य व सुगमोपाय, हे दोन ओंवीबद्ध ग्रंथ आहेत. हे इ. स. १६७७ सालीं वारले.

आक्काबाई, वेणूबाई[2], बहिणाबाई[1], कल्याण[3], उध्दव, निंबराज, प्रेमाबाई, राजाराम[4] प्रसादी, बाळस्वामी[5], रघुनाथस्वामी[6] ब्रह्मनाळकर, आत्मारामस्वामी[7] निगडीकर, कान्होपाठक[8], इत्यादि असून, त्यांनीं यथाशक्ति, पदें, किंवा अभंग, अथवा ओंवी, अगर अन्य काव्यरचना केलेली आढळते.

---

१ यांची पद्यरचना व कांहीं पदें मात्र प्रसिद्ध आहेत.

२ ही मिरजकर देशपांड्यांची कन्या असून, ती इ. स. १६२८ सालीं जन्मली, आणि इ. स. १६५५ मध्यें मृत्यु पावली. हिनें निवृत्तिराम नांवाचा सुमारें पांच हजार ओंव्यांचा एक बोधपर ग्रंथ लिहिला आहे. ही कीर्तन देखील फार सुरेख करी.

३ ह्याचीं कांहीं पदें व पद्यरचना असून, समर्थांचा दासबोध कल्याणानेंच लिहिला, असें म्हणतात.

४ ह्यानें कांहीं पदें, व रामदासलीला नांवाचा ग्रंथ लिहिलेला आहे.

५ समाधिकाल इ. १६५४.

६ समाधिकाल इ. स. १६६६.

७ समाधिकाल इ. स. १७०५.

८ ह्याचा नामापाठकी अश्वमेध नांवाचा ग्रंथ असून, त्याचे १२० अध्याय आहेत.

भाग ८६ वा.

मराठी भाषेच्या प्रौढावस्थेंतील द्वितीयकाल.

सिंहावलोकन.

मराठी भाषेच्या प्रौढावस्थेंतील महत्वाच्या गोष्टी.

मराठी भाषेच्या प्रौढावस्थेंतील द्वितीय कालासंबंधीं कित्येक गोष्टी फारच महत्वाच्या आहेत, आणि ह्मणूनच त्या निःसंशय विषेश रीतीनें ध्यानांत ठेविल्या पाहिजेत. सबब, त्या येथें थोडक्यांत देतों.

१ भक्तीचा पूर. २ श्रध्देवर निष्ठा. ३ त्यामुळें नीतीचा प्रसार, निश्चयाचें बळ, व धैर्याचें अवलंबन. ४ त्यायोगानें घडून आलेला अपूर्व कार्यभाग. ५ स्त्रियांच्या कवित्वाचा पुनश्च प्रादुर्भाव. ६ मराठी भाषेंतील यवन कवित्व. ७ रामदासाची प्रचंडव्यक्ति. ८ शिवाजीचा उदय. ९ ह्या गुरु शिष्यांच्या स्वभावाचें विलक्षण ऐक्य. १० त्यांच्या कृतीनें महाराष्ट्र देशास, किंबहुना अखिल भरतखंडास मिळालेलें वळण, आणि जागृत झालेला देशाभिमान. ११ तेणेंकरून स्वार्थपरायणतेचा लोप, ऐक्यतेची विशालदृष्टि, व देशाच्या महत्कार्यास मिळालेलें साहाय्य. ह्या सर्व गोष्टीनीं आमच्या पुराण देशास सुखाची भरती आली; त्याची सर्व प्रकारें भरभराट होत चालली, आणि तो पुनश्च स्वस्थाना-

पन्न होऊन, जणूंकाय स्वातंत्र्योत्साहांतच आपलें डोकें वर करूं लागला.

आम्ही आपल्या श्रध्दान्वित भक्तीनें, इ० स० च्या सतराव्या शतकांत केवळ नीतीच्या जोरावर, व श्रीपरमेश्वराला अनन्य-भावें शरण जाऊन, निव्वळ त्या अनश्वराच्या कृपाकटाक्षाखालींच, जी आपली इतिकर्तव्यता बजाविली; तसेंच त्यावेळीं जो आम्ही विलक्षण पराक्रम केला; व त्या अणीबाणीच्या प्रसंगांत जें अनन्वित शौर्य आम्हीं दाखविलें; त्याचा मासला, किंवा त्याच्याशीं तुलना करण्याला अशा धार्मिक उन्नतीचें आणि अपूर्व नीतितत्वाचें एक देखील उदाहरण, ह्या जगाच्या इतिहासांत, अन्यत्र कोठेंही पहावयास खचितच मिळावयाचें नाहीं.[1]

तत्कालीन अतुल नीतिधैर्य,व श्रद्धान्वित भक्ति.

चवदाव्याशतकांत, नामदेवाच्या वेळीं ज्याप्रमाणें

---

१ हें ह्मणणें कोणास कदाचित् अतिशयोक्तीचें वाटेल. परंतु, तसें बिलकुल नसून, वाचकाची खात्री होण्यासाठीं, नामदार न्यायमूर्ती रानड्यासारख्या इतिहासज्ञांची, व महाराष्ट्र इतिहासकारांचीच आम्ही येथें साक्ष देतों. ते म्हणतातः—

" There are features which the religious history of few other countries can match or reproduce, unless where elevating influence is the result of a popular awakening. "

(Rise of the Maratha Power. Maratha History. P, 146. vol. I. By the Hon. Mr. Justice M. G. Ranade.)

स्त्रीकवित्व व यवनसंत.

स्त्रिया सुद्धां सहज काव्य करीत, त्याचप्रमाणें सतराव्या शतकांत देखील स्त्रीकविरत्नें उदयास येऊन, त्यांनीं आपल्या कवित्वाचा, नीतीचा, व धैर्याचा, अगदीं प्रकाशच पाडला होता. शेखमहमद आणि शेखसुलतान हे मुसलमान फकीर असतांही हिंदु संत बनले. इतकेंच नव्हें तर, ते निव्वळ मराठींतच काव्य सुद्धां करूं लागले. (मागें पान २७०–७१ पहा.)

रामदासाची प्रचंड व्यक्ति.

रामदासाच्या प्रचंड व्यक्तीनें तर, जणूंकाय सर्व महाराष्ट्र देश, किंबहुना अखिल भरतखंडच अगदीं हालवून सोडिलें. कारण, मुकुन्दराज, ज्ञानदेव, निवृत्ति, सोपान, मुक्ताबाई, चांगदेव, नामदेव, जनाबाई, एकनाथ, तुकाराम, इत्यादींनीं महाराष्ट्र देशांतील भूमीवर भक्ति, श्रद्धा, दृढनिश्चय, शुद्धभाव, पवित्रता, व अनन्यशरणता, यांचें यथेष्ट बीजारोपण केल्यावर, त्याजवरच रामदासानें नीति, धैर्य, इतिकर्तव्यता, आणि स्वदेशाभिमान यांचें भरपूर सिंचन केलें. त्यामुळें, संतांचें प्रथमचें दौर्बल्य जाऊन, त्यांच्या अंगीं नैसर्गिक सामर्थ्य आलें. त्यांचें असह्य तेज आपोआप बाहेर पडून, तें प्रकाशमान झालें. कर्तुम्, अकर्तुम्, अन्यथा कर्तुम्, अशी त्यांची शक्ति वाढून, ते अचाट कृत्यें करूं लागले. आणि त्याच कारणानें ते प्रबल होऊन, समर्थ ह्या अन्वर्थ पदवीप्रत पावले.

१ श्रीरामदासास "समर्थ" ही जी पदवी प्राप्त झाली, ती आम्हीं सदरीं केलेल्या विवेचनाचें केवळ प्रत्यक्ष प्रमाणच होय.

परंतु ही अलौकिक व्यक्ति एवढ्यानेंच तृप्त झाली नाहीं, किंवा स्वस्थही बसली नाहीं. तिनें "परोपकाराय सतां विभूतय" : या सद्वाक्यमंजरीची सत्यता आपल्या स्वःतच्या कृतीनेंच करून दाखविली; व अखिल महाराष्ट्रीयांस, आणि त्यांच्या मध्यस्थीनें सर्व भरतखंडास, स्वातंत्र्यामृत पाजण्याचा निश्चय केला. अर्थात्, पारतंत्र्याचा अनिष्ट परिणाम रामदासाच्या मनांत येऊन, त्यानें त्याची निव्वळ होळीच केली; व म्लेंच्छ यज्ञ आरंभिला. तथापि, तो कशा उपायांनीं, कोणत्या साधनांनीं, आणि कसल्या मंत्रतंत्र क्रियांनीं चालविला पाहिजे, इत्यादि संबंधी दीक्षा श्री शिवाजीसच मिळालेली असल्यानें, ह्यालाच निमित्त मात्र करून, त्याच्याकडूनच अविंधाहुति देवविली. त्यामुळें, हें होमकुंड पेटतांच, त्याच्या तीव्र ज्वाला एकदम भडकल्या जाऊन, त्यांनीं सर्वत्र पेट घेतला; व पूर्व, पश्चिम, दक्षिण, आणि उत्तर, या चाऱ्ही दिशा त्यांनीं अगदीं दणाणून सोडून, व्यापून टाकिल्या.

त्यानें केलेली स्वातंत्र्याची चळवळ.

दासबोधांत रामदासाचा देशाभिमान ठायीं ठायीं व्यक्त होतो. अर्थात्, आमच्या राष्ट्राचें मन तयार करण्यास, तें ताळ्यावर आणण्यास, त्याला पारतंत्र्याचा तिटकारा स्वयमेव येण्यास,

त्याचा देशाभिमान.

१ कारण, रामदास हा सन्यासी व चतुर्थाश्रमी असून, शिवाजी महाराज हे गृहस्थाश्रमी होते. सबब, ह्यांच्याकडूनच समर्थांनीं म्लेछनिर्दलन चालविलें, हें उचितच होय.

शृंखलाबंधन दुःसह होण्यास, व स्वातंत्र्याचा खरा आनन्द वाटण्यास, केवळ तोच कारणीभूत झाला, यांत लेशमात्रही शंका नाहीं. ' राजकारण बहुत करावें; ' ' प्रसंग समयो ओळखावा; ' ' धीर बहुत धरावा; ' ' नव्हें तेंचि करावें, दीर्घ प्रयत्नें; ' ' पडिला प्रसंग सांवरावा; ' ' नष्टासी नष्टचि योजावे; ' ' मुख्य सूत्र हातीं घ्यावें; ' ' सज्जनापरी आळवावें; ' ' गलिमाच्या देखता फौजा, रणशूरांच्या फुरफुरती भूजा, ऐसा पाहिजे कीं राजा; ' ' ढिलेपणाच्या संभ्रमें, जाऊंच नये; ' इत्यादि वचनामृतें प्रत्यक्ष मेलेल्यास देखील जिवंत करणारीं आहेत. मग, शिवाजी महाराजासारखा कुशल नेता, भारतांसारखे गुणज्ञ जानपद, व महाराष्ट्रासारखी सुपवित्र भूमी, यांजवरच त्यांचें शब्दामृत पडल्यावर, ते सचेतन उठून, सर्व देश त्यांनीं इतस्ततः एकदम हालवून सोडिला, यांत नवल तें कोणतें ?

त्याचें त्याच्या कृतींत दिग्दर्शन.

संभाजी हा राज्यमदानें उन्मत्त झाल्यावर, त्याला ताळ्यावर आणण्यासाठीं, समर्थांनीं त्यास एक पत्र पाठविलें आहे. तें पाहिल्यावर, त्यांतील प्रत्येक ओळींत, राजकीय शहाणपण, पुढील धोरण, कार्यक्षमता, अलौकिक दूरदृष्टी, विलक्षण देशाभिमान, अपूर्व राजनीति, राज्यसाधनाचे अमूल्य उपाय, आणि पुरुषार्थाचें लक्षण, हीं जणूंकाय मूर्तिमंतच भासमान होऊन, त्या महापुरुषाच्या चतुरस्रतेचें बहुत आश्चर्य वाटतें.

' तरि मग जाणावें फावलें, गलिमाशीं; ' ' दोघे भा-

डता तिसन्याशीं जाये;' 'सकळ लोक एक करावे, गलीम निवटून काढावे, येणें कीर्ति धांवे, दिगंतरीं;' 'आधीं गाजवावे तडाखे, तरी मग भूमंडळ धाके, ऐसे न होतां धके, राज्यास होती;' 'बहुत लोक मिळवावे, एकविचारें भरावे, कष्ट करोनी घसरावें, म्लेच्छावरी;' 'आहे तितुकें जतन करावें, पुढें आणिक मिळवावें, महाराष्ट्र राज्य करावें, जिकडे तिकडे;' 'हिमतीची तरवार करावी;' 'जीवित्व तृणवत् मानावे;' 'त्याहूनि करावें विशेष, तरीच म्हणावें पुरुष, हीं अमृतवाक्यें, व हा सदुपदेश, प्रत्येक आर्यपुत्रानें, प्रत्येक भारतानें, आणि प्रत्येक हिंदूनें, आपल्या हृत्पटिकेवर, आपल्या घरावर, व आपल्या घराच्या प्रत्येक भिंतीवर, प्रत्येक दारावर, आणि जेथें जेथें ह्मणून अवकाश मिळेल, तेथें तेथें निरंतर स्मरणार्थ, खचितच कोरून ठेवण्यासारखा आहे. आणि ह्याच कारणासाठीं, देशोन्नत्यर्थ अपूर्व प्रयत्न केल्याबद्दल, महाराष्ट्र वाङ्मयांत, रामदासाच्या कृतीस खचितच अत्युच्च[1] स्थान दिलें पाहिजे, हें कोणी सुद्धां विसरतां कामा नये.

खरोखर, स्वदेशाभिमान ही एक अपूर्व वस्तु असून, तो बहुतकरून सर्व देशांतल्या कवींत, सदैव वास करीत

---

१ रामदासासारख्या साधूंनीं जें देशाचें महत्कार्य केलें, तें केवळ अमूल्य व अतुल असल्याविषयीं, नामदार न्यायमूर्ती रानड्यासारख्या इतिहासज्ञांस सुद्धां कबूल आहे. ते ह्मणतात,

"In this respect, the work they accomplished was priceles, and blessed beyond all comparison."

(Maratha History. vol. I. P. 149).

असते. एका स्कॉच कवीनें तर ह्या संबंधानें इतकें सुरेख वर्णन केलें आहे कीं, ज्याला म्हणून तें वाचण्याची सवड असेल, त्यानें एकदां तरी त्याचें अवलोकन अवश्य करावें; ह्मणजे त्याचा मोबदला मिळाल्यावांचून खचितच राहणार नाहीं.

जनसमूहावर परिणाम करणारे त्याचे ग्रंथ, व अन्यकवी.

रामदासाच्या ह्या अशा प्रकारच्या उदात्त कृतीनें, व त्याच्या त्या विलक्षण काव्यस्फूर्तीनें, आणि लोकांच्या मनावर अमोघ संस्कार करणाऱ्या त्याच्या वाङ्मयानें, त्याची गणना उत्तम कवीं-

---

१ ह्याच्या काव्यांतील अवश्य तितकें अवतरण, वाचकाच्या सोईसाठीं, मी येथें देतों. ह्या कवीचें नांव स्कॉट होय. तो म्हणतो,

" Breathes there the man, with soul so dead,
Who never to himself hath said,
This is my own my native land !
Whose heart hath ne'er within him burn'd,
As home his footsteps he hath turn'd,
From wandering on a foreign strand !
If such there breathe, go, mark him well ;
For him no minstrel rapture swell ;
High though his titles, proud his name,
Boundless his wealth as wish can claim :
Despite those titles, power, and pelf,
The wretch, concentred all in self,
Living shall forfeit fair renown,
And, doubly dying, shall go down
To the vile dust, from whence he sprung,
Unwept, unhonoured, and unsung, "
(The Lay of the Last Minstrel. Canto. VI. I.)

तच करणें भाग पडतें. सामान्य जनावर अशा तऱ्हेचा परिणाम करणारे कवी, आमच्या महाराष्ट्रांत फारच थोडे आहेत. किंबहुना, कोणत्याहीं देशांत, असे कवी विरळाच निपजतात, असेंही ह्मणण्यास हरकत नाहीं. अर्थात्, मुकुन्दराज, ज्ञानदेव, नामदेव, एकनाथ, मुक्तेश्वर, तुकाराम, रामदास, वामन, श्रीधर, अमृतराय, महिपति, मयूरकवि, रामजोशी, अनन्तफंदी, इत्यादि कवी ह्यांपैकींच होत, हें सांगावयास नलगे.

त्यांतही कवित्रयाचें श्रेष्ठत्व.

तथापि, त्यांतही गोवर्धनास अनुसरून, सदरहू कविजनांपैकीं फक्त कवित्रयांचीच निवड करणें झाल्यास, आमच्या अल्प समजुती-प्रमाणें, १ ज्ञानदेव, २ एकनाथ, व ३ रामदास, यांजलाच नूतन पद्यमालेंत गुंफणें योग्य दिसतें. निदान, राव आणि रंक, अशिक्षित व सुशिक्षित, पंडित आणि मूर्ख, यांच्या मनावर एकसारखा व अचुक परिणाम करणारे, आणि भेदबुद्धीला अजिबात फांटा देऊन ऐक्य वाढविणारे, असे ह्यांच्या तोलाचे प्रौढ व रसिक कवी फारच थोडे दिसतात.

गोवर्धनाची संस्कृत कवित्रयाविषयीं उक्ति.

आमच्या भरतखंडांत, भिन्नभिन्न काळीं, जे संस्कृत कविश्रेष्ठ आजपर्यंत होऊन गेले, त्यांत १ वाल्मीकि, २ व्यास, आणि ३ गुणाढ्य, यांची गणना

---

१ संस्कृत भाषेचा इतिहास. भारतीय साम्राज्य पु. १० वें पान २५१–६६ पहा.

२ भारतीय साम्राज्य. पु. २ रें पान. १५७–२०३; व भा. सा. पु. १० वें पा. २६७–७५ पहा.

३ भारतीय साम्राज्य. पु. २ रें. पान २३०; व भा. सा. पु. १० पा. ३१५–१७ पहा.

(पुढें चालू)

अतिश्रेष्ठ ह्मणून, गोवर्धनाचार्यांनीं आपल्या काव्यांत केली आहे.

श्रीरामायणभारतबृहत्कथानां कवीन् नमस्कुर्मः ।
त्रिस्रोता इव सरसा सरस्वती स्फुरति यैर्भिन्ना ॥

युरोपखंडांतले कवित्रय.

सदरहू कवित्रयांच्या नामधेयाचा उल्लेख गोवर्धनानें केल्याचें पाहून, एका आंग्लकवीनें यूरोपखंडांतल्या भिन्नभिन्न काळाच्या, निरनिराळ्या देशांतील, व फार नांवाजलेल्या अशा तीन कवींचें जें वर्णन केलें आहे, त्याची आम्हांला सहजींच आठवण येतें; आणि त्यांच्याप्रमाणेंच आमच्या महाराष्ट्र कवींस देखील एखाद्या पद्यमालेंत अवश्य गुंफावें, अशी उत्कट इच्छा उत्पन्न होते. परंतु, ती गुंफण्याची या

(मागील पृष्ठावरून पुढें चालू.)

व्यासाची ग्रंथरचनेची तृप्ति न झाल्यामुळें, त्यानें गुणाढ्यरूपानें पुनर्जन्म घेऊन, बृहत्कथा केल्याविषयीं आख्यायिका आहे. ह्यासंबंधानें, रावबहादुर निळकंठ जनार्दन कीर्तने यांच्यासारख्या विद्वानाचें तर असें मत आहे कीं, या भूगोलावर जेवढी ह्मणून मनोवेधक व खुबीदार गोष्ट प्रचारांत आहे, तिचें मूळ या बृहत्कथांत नाहीं, अशी सांपडणेंच कठिण.

१ हें आम्ही येथें थोडक्यांतच देतों. ह्यांतील कवींचीं नांवें म्हटलीं म्हणजे होमर (ग्रीस), व्हर्जिल (इटली), व मिल्टन (इंग्लंड), अशीं होत.

" Three poets in three distant ages born,
Greece, Italy, and England did adorn.
The first in loftiness of thought surpassed;
The next in majesty; in both the last. "

(John Dryden.)

महाराष्ट्रांतले कवित्रय.

सेवकाची बिलकूल शक्ति नसल्या कारणानें, " उत्पद्यन्ते विलीयन्ते दरिद्राणां मनोरथाः । " या उक्तीची सत्यता भासून, जशा सुचल्या तशा चार आवडधोबड ओळी, वाचकापुढें ठेवण्याचें मी थोडेंसें साहस करतों.

ज्ञानेश्वरें रचुनि गीत[1] यथार्थबोधी[2] ।
ज्ञानेश्वरी प्रकटिली[3], तरणी[4] भवाब्धीं[5] ॥
तैसाचि नाथ दुसरा कवि मन्मनाला ।
वाटे समर्थ[6] तिसरा जगिं धन्य झाला ॥

आतां, मयूर कवीनें एके ठिकाणीं, कांहीं कवीस आपल्या

मयूर कवीचे कविचतुष्टय.

सुमनोहर पद्यरत्नहारांत गुंफिलें आहे खरें. तथापि, त्यांत एकंदर चौघाजणांस स्थान दिल्याचें दिसतें.

ज्ञानोबाची जैशी एकोबाची सुधा जशी वाणी ।
कीं मुक्तेश्वर कविची महिपतीची सेविती तशी प्राणी॥

खरोखर, ह्या भरजरीच्या शालजोडीजवळ, मी आपल्या फाटक्या तुटक्या घाबळीचा, सर्वत्र ठिगळ लावलेला लक्तरा, कसा तरी ठेवण्याचा मोठाच धृष्टपणा केला आहे. परंतु, त्याबद्दल उदार वाचक आपल्या थोर मनानें क्षमा करितील, असा मी भरंवसा बाळगतों.

---

१ गीता. २ यथार्थ बोध करणारी. ३ प्रसिद्ध केली, लिहिली. ४ नौका. ५ भवसागरांत (तरण्यासाठीं); म्हणजे संसारचक्रांतून मुक्त होण्यास्तव. ६ रामदास ह्यास समर्थ म्हणत असल्याचें सर्वांस महशुर आहे. (मागें पान ३०२ पहा).

असो. ह्याच कालांत, संताच्या कृतींचें फळ चोहों-बाजूंनीं दिसूं लागलें. कारण, १ स्वार्थपरायणतेचा समूळ लोप, २ स्वदेशकार्याची उत्कट इच्छा, ३ ऐक्यतेची विशाल दृष्टि, व ४ लोकहितार्थ देहत्याग, हीं जणूंकाय इतिकर्तव्यतेच्या रूपानें, प्रत्येक महाराष्ट्रीयाच्या मनावर पूर्णत्वानें बिंबत चाललीं. त्यामुळें, उच्च किंवा नीच, लहान अथवा थोर, श्रीमंत अगर गरिब, मूढ किंवा पंडित, राव अथवा रंक, आणि राजा अथवा प्रजा, इत्यादि सर्वांनीं आपापला मताभिमान केवळ देशहितासाठीं, अगदीं निरपेक्ष बुद्धीनेंच सोडून दिला. इतकेंच नव्हें तर, विद्येचा गर्व, उच्चस्थितीचा दर्प, व जातीचा अभिमान, यांचाही त्यांस केवळ देशकार्यार्थच विसर पडला, यांत शंका नाहीं. कारण, वामन हा संस्कृतज्ञ आणि श्रेष्ठ पंडित असतांही, त्यानें गीर्वाण भाषेला जरा बाजूला ठेवून, आपल्या महाराष्ट्र भाषेचीच मनःपूर्वक व नितान्त सेवा केली. त्याचप्रमाणें, आपण यवनांच्या हातीं सांपडलों, तरच औरंगझेबाचा भडकलेला क्रोधाग्नि शांत होऊन, आपापसांत फूट न होतां, अखिल महाराष्ट्रदेश सुरक्षित राहील व निर्भय होईल, असा दूरवर विचार करूनच श्रीशिवाजी देखील आपल्या मोगल शत्रूंच्या स्वाधीन झाला; आणि कांहीं कालपर्यंत कैद्यासारखें राहून, केवळ निरुपायास्तवच दिल्ली येथील पारतंत्र्याचें दुःसह दुःख त्यानें भोगिलें. अर्थात्, स्वतःच्या अंगीं विलक्षण पराक्रम असतांही, काल,

महाराष्ट्रांतील संताच्या कृतीनें महाराष्ट्रीयांवर झालेला सुपरिणाम.

देश, वर्तमान, इत्यादि गोष्टींवर दूर दृष्टि देऊन, व स्वतःची अत्युच्च राजपदवी विसरून, फक्त देशहितासाठींच त्यानें आपला देह विकला, आणि आपण स्वतः बंदिवान होऊन, महाराष्ट्राचें स्वास्थ्य साधलें, ही गोष्ट कोणालाही कबूलच केली पाहिजे. वाहवारे शिवराया! हा तुझा केवढारे स्वार्थ-त्याग! ही तुझी केवढी देशभक्ति! हें तुझें केवढेंरे धैर्य! खरो-खर, यासाठींच तूं धन्य आहेस! ह्मणूनच हा तुझा अजरामर सुकीर्तिपरिमल! आणि ह्मणूनच हा तुझा तीव्र विजयदुंदुभि!!

त्याचप्रमाणें, एकनाथासारख्या ब्राह्मण साधूनें देखील अन्त्यजांसच मान देऊन, आपल्या जातीचा वृथाभिमान न बाळगितां, त्यांजवर निःसीम दया केली; आणि पितृश्राद्धार्थ सिद्ध झालेला पाक ब्राह्मणांस न घालतां, महारांसच वाढला, व त्यांच्या क्षुधेचें पारणें फेडलें. एवढेंच नव्हें तर, त्यानें आपल्या आचरणानें मनाची अलौकिक समता प्रगट केली, आणि

सर्वांभूतीं भगवद्भावो। हाचि भक्तीचा निजनिर्वाहो॥

* * *

कर्म जनार्दन धर्म जनार्दन॥ भोग जनार्दन अहर्निशीं॥

या तत्वज्ञानाचा खरा अनुभव केवळ स्वतःच्या कृतीनेंच सर्व लोकांस प्रत्यक्ष दाखविला. ह्यासंबंधानें महिपति म्हणतो,

करावया ब्राह्मणपूजन। गंधाक्षता पुष्पें सुमनें।
साहित्य ठेविलें होतें करून। तें केलें अर्पण अनामिका ६०
शूद्रा हातीं पात्रें मांडून। तयांसि वाढविलें पक्वान्न।
घृत शर्करा शाखा लवण। बाहेर आणोनि ठेविली॥६१॥

जनीं जनार्दन आहे निश्चित । हा भाव जाणोनि चित्तांत।
संकल्प सोडी एकनाथ । भोक्ता कृष्णनाथ म्हणूनी ॥६२॥
ग्रास घ्या म्हणतां त्याकारणें । अनामिक सेवितीं पक्वान्नें
मुलें लेंकरें थोर लहानें । करिती भोजन यथारुचि ॥६३॥

(भक्तविजय. अ. ४६.)

तात्पर्य.

तात्पर्य. **एकनाथ, तुकाराम, रामदास,** इत्यादि साधुश्रेष्ठांच्या कृतींत जें **ऐक्य** पदोपदीं मुसमुसलेलें आपल्या दृष्टीस पडतें; अथवा, त्यांच्या ग्रंथांत, लोकोत्तर नीतिचा जो विलक्षण पूर ठायीं ठायीं दृग्विषयीभूत होतो; किंवा, धैर्यावलंबनाचीं जीं अमृततुल्य वचनें आपल्या कर्णरंध्रावर वारंवार थडकतात; त्यांचाच हा साक्षात् परिणाम होय, असें ह्मटल्यावांचून आमच्यानें राहवत नाहीं.

भाग ८७ वा.

मराठी भाषेची प्रौढावस्था.

तृतीयकाल.

इ० स० १६९४-१८१७.

मराठी भाषेच्या प्रौढावस्थेंतील तृतीय कालांतला, नांवाजण्यासारखा पहिला कवि श्रीधर होय. ह्याचें जन्म इ० स० १६७८ सालीं झालें असून,

श्रीधर व त्याचा जन्म-काल.

त्यानें आपला रामविजय नांवाचा जगन्मान्य ग्रंथ आपल्या वयाच्या पंचविसाव्या वर्षीं, ह्मणजे इ० स० १७०३ मध्यें पुरा केला. तेव्हां, द्वितीयकालाच्या शेवटीं, आणि तृतीय कालाच्या आरंभींच ह्या कविवराचा उदय होऊं लागल्यामुळें, ह्या भागांत आम्ही त्याच्या पासूनच प्रारंभ [illegible] योजिलें आहे.

ह्याच्या मातुःश्रीचें नांव सावित्री असून, त्याच्या बापाचें नांव, पूर्वाश्रमांतील यादवराव, व चतुर्थाश्रमांतलें ब्रह्मानन्दस्वामी असे. हा सुप्रसिद्ध रंगनाथ-

त्याचें कुलवृत्त.

१ शिवलीलामृत हा उत्तरकालीन ग्रंथ होय.
शके सोळाशें चाळीस । विलंबीनामसंवत्सरास । शुद्धपौर्णिमा फाल्गुन मास । रविवारीं ग्रंथ संपविला ॥ २१२ ॥ (शिवलीलामृत.)

स्वामीचा पुतण्या होय. **श्री**धरानें आपलें कुलवृत्त **शि**वलीलामृताच्या शेवटीं दिलें आहे. त्यावरून, **पं**ढरपुरापासून चार कोसांवर **नाझरे** गांवीं, ह्याच्या वंशजांस कुळकरण्याची वृत्ति असावी, असें वाटतें. ह्याच्या बापानें **पं**ढरपुरास सन्यास घेतला; आणि आपल्या पुत्राची (**श्री**धरची) बाळपणापासूनच विरक्तवृत्ति पाहून, त्याजला त्याच्या चौदाव्या वर्षीच त्यानें सन्यास दिला, व पुढें कालान्तरानें तो **पं**ढरपुरांतच समाधिस्त झाला. तदनंतर, **श्री**धरस्वामीनें बहुतकरून तीर्थयात्रांत, आणि ग्रंथरचना करून महाराष्ट्रभाषेची [illegible]ा करण्यांतच आपला काळ घालविला, व तो आपल्या वयाच्या पन्नासाव्या वर्षी, ह्मणजे इ०स० १७२८ सालीं मरण पावला.

ह्याचे मुख्य ग्रंथ १ **शि**वलीलामृत, २ **ह**रिविजय, ३ **रा**मविजय, आणि ४ **पां**डवप्रताप, असे असून, ५ **ब्रह्मो**त्तरखंड, ६ **जै**मिनी **अश्व**मेध, व ७ **पां**डुरंगमाहात्म्य, हे देखील त्याचेच असल्याचें समजतें.

त्याच्या काव्यांतील गुण.

ह्या कवींचो कृति प्रौढ असून रसाळ वाटते; आणि प्रेमळ असून उदात्त दिसते इतकेंच नव्हें तर, हा कवि मोठा मर्मज्ञ असल्यामुळें, **रा**मविजयासारखें ह्याचें काव्य, जणूंकाय सर्व रसांनीं अगदीं थबथबलेलेंच भासतें.

ह्याच्या वेळेस साधारण कवी बरेच होऊन गेले. सबब,

---

१ अध्याय १४. ओंवी २०६—२१३.

त्याच्या वेळचे कवी.

त्यांचाही येथें उपलब्ध असलेला अवश्य तो तपशील देतों. आपल्या महाराष्ट्रांत, विठ्ठल नांवाचे आजपर्यंत पांच कवी होऊन गेले. १ विठ्ठल दीक्षित. २ विठ्ठल केरीकर. ३ विठ्ठल बीडकर. ४ विठ्ठल कृष्ण. आणि ५ विठ्ठल पद्यकार. ह्यांच्या जन्ममरणाची हकीकत कोठेंही मिळत नाहीं. त्यामुळें, त्याजबद्दलची जी हकीकत माहीत आहे, तेवढ्यावरच निर्वाह करणें भाग पडतें.

विठ्ठलपंचक.

१ विठ्ठल दीक्षिताचा भगवद्गीतेवर एक सुरेख कटाव आहे. २ विठ्ठल केरीकराचे पूर्ण नांव विठ्ठल नरसिंह नाईक असें असून, हा कोण्या एका मंगीश स्वामीचा शिष्य असल्याचें कळतें. हा गोमान्तकाकडे फार प्रसिद्ध असे; व तिकडे त्यानें विद्वत्तेच्या संबंधानें थेट काशीपर्यंत कीर्ति मिळविली होती, असें म्हणतात. ह्याचें कांहीं लहान सहान ग्रंथ आहेत; त्यांपैकीं, वामनचरित्र आणि शुकरंभासंवाद, हे सुविश्रुत होत. ३ विठ्ठल बीडकर हा बीड परगण्यांतील गौरीपूर गांवीं राहत असून, ह्यानें रुक्मिणीस्वयंवर, बिल्हण चरित्र, सीतास्वयंवर, रसमंजरी, द्रौपदीवस्त्रहरण, वगैरे ग्रंथ, आणि कांहीं पदें, इत्यादि, रचल्याचें समजतें; व हीं सर्व मिळून एकंदर ग्रंथसंख्या सुमारें एक हजार होईल, असें वाटतें. ह्याच्या काव्यांत, क्वचित् कोठें, कालनिर्देश केल्याचें दिसतें; आणि त्यावरून, रुक्मिणीस्वयंवर इ० स० १६७४ सालीं, व द्रौपदीवस्त्रा-

हरणाचा काल इ० स० १६८० च्या सुमारास असावा, असें मानण्याला सबळ कारण मिळतें. परंतु, ह्याचा मरणकाल निश्चयपूर्वक कळून येत नसल्याकारणानें, आम्ही त्याची गणना सतराव्या शतकांतच केली आहे. ४ विठ्ठल कृष्ण हा गोकर्ण माहात्म्याचा कर्ता होय. आणि ५ विठ्ठल पद्यकार यांचीं कांहीं पदेंच आहेत, असें समजतें.

ह्याच सुमारास त्र्यंबक[1], सदाशिव[2], जनार्दन[3], गणेशराय[4], कृष्णानन्द[5], साम्राज्यवामन[6], विश्वनाथ[7], शिवदासगोमा[8], किंकर[9],

मध्वमुनीश्वर, इत्यादि, व त्यांच्या कृती.

---

१ ह्याचीं पुष्कळ पदें असल्याचें कळून येतें.

२ हा उद्धवगोसाव्याचा बाप असल्याचें म्हणतात. ह्यानें बरींच पदें केलीं आहेत, व उमाविलास नांवाचें ह्याचें काव्यही आढळांत येतें.

३ रामस्तुति, दामाजीपंतचरित्र, दानावर्ताख्यान, वगैरे ह्याचेच ग्रंथ होत.

४ ह्याचीं फक्त पदेंच असल्याचें दिसतें.

५ ह्याची कित्येक पदें, आणि राधाविलास नांवाचा ग्रंथ आहे.

६ हा वामन पंडिताचा शिष्य होय. सुदामचरित्र, राजयोग, ब्रह्मोपदेश, इत्यादि ग्रंथ ह्याचेच असून, वामनाच्या अनुभूतिलेशावर देखील ह्याची प्राकृतांत टीका आहे.

७ हा सुद्धां वामनाचाच शिष्य होता, असें "जो विश्वनाथ निज किंकर वामनाचा" या त्याच्या उक्तीवरून व्यक्त होतें. ह्याची सुदामचरित्र नांवाची कृति आहे.

८ ह्यानें काशीखंड नांवाचा ग्रंथ रचला आहे.

९ ह्याचें राहण्याचें गांव गंगेच्या तीरावरील वैजापूर हें होय. ह्याचे १ शुकरंभासंवाद (इ. स. १७१४), २ द्रौपदीवस्त्राहरण (इ. स. १७१५), ३ सुदामचरित्र (इ. स. १७१७), ४ गरुड-विमोचन (इ. स. १७३८), ५ महिम्नरस्तोत्र (प्राकृत), वगैरे ग्रंथ आहेत.

मालोनाथ[1], नरहरि[2], बालकृष्ण[3], मुद्गलभट्ट[4], अंबिये मध्वमुनीश्वर[5], इत्यादि कवि होऊन गेले.

अमृतराय व त्याचें वृत्त.

अमृतराय हा देशस्थ ब्राह्मण होता, व तो मोगलाईत औरंगाबादेस राहत असे. ह्याच्या मातुःश्रीचें नांव उमा होतें, आणि ह्याच्या वडिलास शंकरराव म्हणत. हा फारच थट्टेखोर असे. त्यामुळें, प्रसंगवशात् त्यानें मध्वमुनीसारख्या साधूची देखील थट्टा केली. परंतु, ती शान्तपणें सोसून, मध्वमुनीनें त्यास समजावून सांगितलें कीं, " बा अमृतराया, तुझ्या मातापितरांनीं तुझें नांवही तुझ्या वाणीप्रमाणेंच अन्वर्थ ठेविलें आहे. सबब, अशा अमृततुल्य वाणीचा दुरुपयोग न करितां, ती तूं ईशस्तुतीला वाहिलीस, तर तूं खचितच कृतार्थ होशील." हा सदुपदेश अनाठायीं गेला नाहीं. कारण, त्यायोगानें अमृतरायास लागलींच उपरति प्राप्त होऊन, त्यानें मुनि मजकुरास गुरु केला, आणि महाराष्ट्र भाषेची काव्यात्मक सेवा करून, आपलें आयुष्य श्रीचरणारविंदीं घालविलें.

---

१ ह्यानें रुक्मिणीस्वयंवर केलें आहे.

२ हा दानव्रत, गंगारत्नमाला, इत्यादींचा कर्ता होय.

३ ह्याचीं कांहीं पदें आहेत.

४ ह्याचे मुद्गलशतक आणि मुद्गलरामायण, असे ग्रंथ आहेत. मुद्गलशतक हें रामचन्द्रस्तुतिपर आर्याशतकच होय.

५ ह्यानें धनेश्वराचें चरित्र, कांहीं पदें, व अभंग, असें केल्याचें कळतें.

त्याचे ग्रंथ.

ह्यांच्या मुख्य कृति म्हटल्या म्हणजे, गणपतिचूर्णिका, रामचन्द्रचूर्णिका, जीवदशाचूर्णिका, दुर्वासयात्रा, मार्कंडेयचूर्णिका, द्रौपदीवस्त्राहरण, सुदामचरित्र, दामाजीपंताची रसद, शुकचरित्र, व ध्रुवचरित्र, या होत. ह्याशिवाय, त्याचे अन्य कटाव आणि पदें सुद्धां प्रसिद्ध आहेत.

त्याच्या काव्यांतील रस.

ह्याच्या काव्यांत बहुतेक भरणा कटावांचाच असून, त्या कामांत त्याचा हातखंडाच होता, असें म्हणण्यास हरकत नाहीं. हा कवि संस्कृत, मराठी, आणि हिन्दी, या तिन्ही भाषांत अगदीं निपुण होता. त्यामुळें, ह्या अपूर्व भाषांतील कोणतेही शब्द त्याच्या सेवेस सदैव तत्पर असत. अर्थात्, त्याच कारणानें त्याच्या कीर्तनास रंग चढे; व त्याचें समयोचित भाषण, हं हं म्हणतां अपूर्व काव्यरचना, आणि विनोदपर भाषणाचे चुटके, यांनीं श्रोत्यांचें मन केवळ तल्लीनच होऊन जाई. ह्या कवीचा अशा प्रकारचा सुकीर्तिपरिमल श्रीमंत सरकार नानासाहेब पेशवे यांच्या श्रुतिपथावर गेल्यामुळें, त्यांनीं त्याचें मुद्दाम कीर्तन करविलें, व तत्कथामृतपानांत मग्न होऊन, त्यांनीं आपला पूर्ण संतोष प्रकट केला.

सोहिरोबा व त्याचे ग्रंथ.

सोहिरोबानाथ अंबि हा सांवतवाडीचा राहणारा असून, ह्याचें जन्म इ० स० १७१४ मध्यें होऊन, तो इ० स० १७८९ सालीं वारल्याचें समजतें. हा आपल्या वयांत आल्यावर त्यानें सरकारी नोकरी धरली, व

आपल्या वयाच्या पस्तिसाव्या वर्षी सन्यास घेतला. त्यानंतर त्यानें आपला सर्व काळ ईशसेवेंतच घालविला. ह्याचीं पदें, अभंग, सवाया, मिळून सुमारें सातशें काव्य, आणि अद्वयानंद, अक्षय्यबोध, व महदनुभवेश्वरी, असे ग्रंथ प्रसिद्ध आहेत. ह्यांची संख्या अदमासें बीस हजार होईल असें वाटतें.

साळ्या रसाळ व त्याची कृति.

साळ्या रसाळ हा यजुर्वेदी ब्राह्मण असून, पंढरपुरास राहत होता. ह्याचा काळ इ० स० १७३८ च्या सुमारास असल्याचें दिसतें. हा मोठा शास्त्रज्ञ, आचारसंपन्न, व परम भागवत असे. ह्यानें संपूर्ण रामायण मराठी भाषेंत ओंवीबद्ध केलें आहे, आणि त्यालाच रसाळ रामायण म्हणतात. हा मोठा प्रेमळ असल्यामुळेंच, त्याला रसाळ हें अन्वर्थ नांव पडलें होतें, असें वाटतें.

आनंदतनय.

आनंदतनय हा आश्वलायन शाखेंतील देशस्थ ब्राह्मण असून, तो अकोट येथील कुळकर्णी होता. याचें खरें नांव गोपाळ असे, आणि त्याच्या बापाला आनन्द म्हणत. कदाचित्, ह्यामुळेंच त्यानें आपल्यास आनन्दनन्दन, आनन्दसुत, व आनन्दतनय, असें म्हटलें असावें. हा कवि सुप्रसिद्ध रघुनाथ पंडिताचाच व्याही होय; व त्याचा काळ इ० स० १७७८ असल्याचें दिसतें. (अर्वाचीन कोश. पान ४१६ पहा.) ह्याचीं कित्येक पदें, प्राकृतात्मक

श्लोकबद्ध मार्कंडेय आख्यान, उमारमासंवाद, सीतास्वयंवर, ताटकावध, इत्यादि प्रसिद्ध आहेत.

त्याची कलमबहादुरी व तलवार बहादुरी.

ह्याच्या काव्यावरून, हा जसा कलमबहादुर होता, तसाच तलवार बहादुरही असावा, असें चांगलें अनुमान होतें. इतकेंच नव्हें तर, त्या गोष्टीला एके ठिकाणीं प्रत्यंतराचें प्रमाण देखील मिळतें. कारण, अरणीच्या[1] लढाईत वीराप्रमाणें निकराचें युद्ध करून, शिपायासारखी त्यानें तलवारही गाजविली असल्याविषयीं, खालीं लिहिलेल्या श्लोकपंक्तीवरून चांगलें व्यक्त होतें.

त्या कृष्णाचेच पायीं नमन करितसे आरणीचा शिपाई।
(पूतनावध.)

त्याच्या काव्यांतील गुणदोष.

ह्याच्या काव्यांत, शब्दमाधूर्य व रचनासौन्दर्य. पदलालित्य आणि प्रसाद, अन्तरंग व बाह्यरंग, श्रृंगार आणि वीररस, हीं चांगलींच साधलीं असल्यामुळें, तें हृदयंगम होऊन त्याला सहजींच मनोहरत्व आलें आहे. मात्र, कित्येक ठिकाणीं अल्पस्वल्प दोष आढळतात. परंतु एकंदर गुणबाहुल्यांत, त्यांचा विसरच पडतो.

रघुनाथपंडित व त्याचें कवन.

रघुनाथ पंडित हा इ० स० १७७८ च्या सुमारास उदयास आल्याचें दिसतें. तथापि, ह्या कवीचें ज्यास्त कुलवृत्त कळून येत नाहीं. हा विद्वान असून, संस्कृ-

[1] इ० स० १७५१. अरणी हें मद्रासेपासून चाळीस कोसांवर पश्चिमेस आहे.

तांत निष्णात होता; आणि असें असतांही त्यानें महाराष्ट्र भाषेची अगदीं नांवाजण्यासारखी सेवा केली, ही विशेष अभिनन्दनीय गोष्ट होय. ह्याचें नलदमयन्तीस्वयंवरोपाख्यान नांवाचें काव्य सुप्रसिद्ध आहे. ह्यांत शृंगाररस प्रधान असूनही, त्याचें मर्यादेबाहेर उल्लंघन नाहीं. इतकेंच नव्हें तर, रसात्मक रचना, वाङ्माधुर्य, मनोहर उपमा, पदसौष्ठव, इत्यादि अनेक गुणांनीं ह्यानें आपल्या काव्यदुहितेस विशेष अलंकृत केली आहे. त्यामुळें, ती फारच शोभायमान दिसते, व चित्ताकर्षक भासते.

शाहामुनि व त्याची कविता.

शाहामुनि हा परम भागवत असून, ह्याचा पणजा शाहाबावा, हा प्रयाग येथें जन्मला होता तथापि, ह्याच्या बापाचा जन्म भीमातीरीं सिद्धटेक गांवींच झाला, व तो आपल्या कुटुंबासहित दक्षिणेंतच राहूं लागला. शाहामुनीच्या बापाचें नांव मानसिंग आणि आईचें नांव अमाई होतें. पण तिला ताई ह्मणत. शाहामुनि हा परदेशी जातीचा असतांही, त्यानें मराठींत सिद्धान्तबोध नांवाचें काव्य ओंवीबद्ध केलें. ह्याचे एकंदर पन्नास अध्याय आहेत. यांत वेदान्तविषयाचें प्रतिपादन असून, तें इ० स० १७७८ साली पुरें झाल्याचें कळतें. मराठीप्रमाणेंच ह्याचें हिंदीभाषेंत देखील काव्य आहे, असें ह्मणतात.

सुभानराव हा जातीचा ब्राह्मण होता, व तो अराणि

सुभानराव व त्याची कृति.

गांवीं राहत असे. हें गांव मद्रासेपासून चाळीस कोसांवर पश्चिमेस आहे. हा आरकाटचा नबाब जो सादत्तउल्लाखान, त्याच्या कारकीर्दीत इ. स. १७१८ च्या सुमारास असल्याचें म्हणतात. हा राजकीय सल्लामसलतींत आणि दरबारच्या खटपटींत फार निपुण असे; त्यामुळें, त्यानें बरेंच राजकारण करून, आपलें चातुर्य व पराक्रम दाखविला होता. हा मोठा मारुतिभक्त असून, त्यानें राम आणि सीता यांच्या लग्नासंबंधीं एक शंभर श्लोकांचें काव्य रचलें आहे.

श्रीधरानन्तर, ह्या कालांतला मोठा कवि ह्मटला ह्मणजे महिपतीच होय. ह्याचें जन्म इ० स० १७१५ सालीं झालें, व तो इ० स० १७९० मध्यें मरण पावला. हा ऋग्वेदी ब्राह्मण राहूरी तालुक्यांतील ताराबाद गांवचा राहणारा असून, ह्याच्या बापाचें नांव दादोपंत होतें. हा वतनदार कुळकर्णी असल्यामुळें, महिपति जाणता झाल्यावर, तो देखील तेंच काम पाहूं लागला. पुढें, एके दिवशीं हा स्नानसंध्या आणि देवतार्चन करीत बसला असतां, सरकारी कामानिमित्त त्याला कोणी टाकून बोलले. त्यामुळें, त्याला फार वाईट वाटून, त्यानें ही पारतंत्र्याची बिडी अजिबात काढूनच टाकिली, व आपला देह ईश्वरकारणीं वाहिला. हा फार अशक्त होता. तथापि, तो मोठा बुद्धिमान आणि चलाख असे. शिवाय, तो विशेष भाविक

महिपति, त्याचा काल, व इतिवृत्त.

व अतिशय प्रेमळही होता. त्यामुळें, अनेक संतांचे फारच सुरस आणि चरित्रात्मक लेख त्यानें लिहिले. मात्र, हा सर्व प्रभाव श्री पांडुरंगाच्या कृपेचाच होय, असें त्यानें ठिकठिकाणीं सूचित केलें आहे.

> नेणें मी कांहीं चातुर्यव्युत्पत्ति ।
> नव्हे बहुश्रुत अध्यात्म ग्रंथीं ॥
> नेणें संस्कृत वाणी निश्चितीं ।
> श्री रुक्मिणी पति जाणतसे ॥ १८ ॥
> तो बुद्धीचा दाता चक्रपाणी ।
> जैसी वदवील कवित्व वाणी ॥
> ती सादर होऊनी संतसज्जनीं ।
> परिसा श्रवणीं निजप्रेमें ॥ ३६ ॥
> श्री भीमातीरवासी रुक्मिणीरमण ।
> तेणें दिधलें आश्वासन ॥
> ग्रंथ प्राकृत वदविला गहन ।
> तो परिसा सज्जनहो प्रीतीनें ॥ ४० ॥
>
> (भक्तविजय. अ. १ ला.)

त्याचे मुख्य ग्रंथ, व त्यांचें ऐतिहासिक महत्व.

ह्याचे मुख्य ग्रंथ म्हटलें म्हणजे १ संतविजय, २ संतलीलामृत,[1] ३ भक्तविजय,[2] ४ भक्तलीलामृत,[3] हे असून, यांखेरीज ५ कथासारामृत, ६ शनिमाहात्म्य, ७ कृष्णलीलामृत, ८ तुकारामचरित्र, ९ हरितालिकाव्रत, व १० ऋषिपंचमीव्रत, हीं देखील त्यानेंच रचिलीं आहेत.

---

१ समाप्ति काल इ० स० १७५७; २ इ० स० १७६२; ३ इ० स० १७७४.

ह्या सर्वांत, महिपतीचे संतचरित्रात्मक लेख फारच महत्वाचे आणि अपूर्व आहेत. कारण, त्यांत पुरातन काळापासून तों तहत अठराव्या शतकापर्यंत, जे जे नामांकित साधू, श्रेष्ठसंत, परमभक्त, व जितेन्द्रिय विरक्त होऊन गेले, त्यांची माहीत असलेली बहुतेक सर्व हकीकत त्यांत दिलेली आढळते. आतां, केवळ एकदेशी मनुष्यास, किंवा निव्वळ वरवर पाहणारास, अथवा फक्त बाह्य दृष्टीनेंच विचार करणारास, त्यांत विशेषसा अर्थ दिसणार नाहीं; अगर, त्यापासून कांहीं फायदा देखील वाटणार नाहीं. परंतु, तसें बिलकुल नसून, खऱ्या शोधकास, आणि इतिहासाच्या दृष्टीनें पाहणारास तर, त्यांत ऐतिहासिक साधनांची एक अमूल्य खाणच सांपडेल, यांत तिळमात्रही शंका नाहीं. कारण, ह्या चरित्रवर्णनांत, त्या त्या वेळची समाजस्थिति, धर्मसंबंधी आमची सहिष्णुता, लोकांचे आचार विचार, धैर्याचें अवलंबन, नीतीचे उदात्ततत्व, धर्मावरील आमची अचलश्रद्धा, व भक्तीचें तीव्रबंधन, इत्यादि महत्वाच्या गोष्टी चांगल्या प्रकारें व्यक्त होतात.

महिपतीचे आधारभूत ग्रंथ.

महिपतीनें शेंकडों संतांचीं चरित्रें महत्प्रयासानें एकत्र करून, आणि कित्येकांचें इतिवृत्त अनेक प्रकारें मिळवून, तीं विशेष श्रमानें लिहिलीं. किंबहुना, तीं निरपेक्ष बुद्धीनें तयार करण्यांतच त्यानें आपलें सर्व आयुष्य खर्चलें, व महाराष्ट्र भाषेची अपूर्व सेवा बजाविली, असेंही म्हणण्यास हरकत नाहीं. आणि ही ग्रंथरचना

करतांना, त्यानें नाभाजी व उद्धवचिद्घन यांनीं लिहिलेल्या चरित्रात्मक कथांचें अवश्य तेवढें साहाय्य खचित घेतलें होतें, असें तो स्वतःच कबूल करतो. कारण, तो ह्मणतो,

तंरी उत्तर देशीं साचार।
नाभाजी विरिंची अवतार ॥
तेणें संतचरित्र ग्रंथ थोर।
ग्वाल्हेरी भाषेंत लिहिला असे ॥ ३८ ॥
आणि मानदेशीं उद्धवचिद्घन।
त्याहीं भक्तचरित्रें वर्णिलीं जाण ॥
दोहींचें संमत एकत्र करून।
भक्तविजय आरंभिला ॥ ३९ ॥

(भक्तविजय. अ. १ ला.)

त्याची प्रमाणभूत माहिती.

शिवाय, हीं संतचरित्रें लिहितांना, त्यानें मनःपूत किंवा प्रमाणरहित असें कांहींच नमुद केल्याचें, त्याच्या लेखावरून दिसत नाहीं. इतकेंच नव्हें तर, त्या संतमंडळींची माहिती जसजशी त्याच्या हातास लागली, तसतशी ती तो लिहीत गेला; आणि त्याच कारणानें, ह्या संतचरित्रवर्णनांत,

---

१ कारण, ह्यासंबंधानें महिपति असें म्हणतो कीं,
आणिक स्वदेशामाजी निश्चित। प्रख्यात जाहले जे महासंत ॥
त्यांच्यावंशीं सज्ञान महंत। त्यांचे वचनार्थ पाहिले ॥
आपुल्याचि मतें वदलों जर। तरी सर्वज्ञ न मानिती उत्तर ॥
यासी साक्ष रुक्मिणीवर। जाणे अन्तर सकळांचें ॥

२ ही गोष्ट महिपतीच्या लेखावरूनच सिद्ध होते.
संतांचीं चरित्रें संपूर्ण। एकदांची ना कळती जाण ॥
जेव्हां जी झाली आठवण। तीं चरित्रें लिहून ठेविलीं ॥

कालानुक्रम साधण्याला त्याला विशेष अडचणीचें झालें असावें, असें वाटतें.

त्याच्या काव्यांतील रसवत्ता.

महिपतीचें काव्य फारच रसाळ आहे, व ही गोष्ट मयूरासारख्या मर्मज्ञ कवीनें देखील कबूल केल्याचें दिसतें. कारण, तो एके ठिकाणीं असें म्हणतो कीं,

ज्ञानोबाची जैशी एकोबाची सुधा जशी वाणी ।
कीं मुक्तेश्वर कविची महिपतिची सेविती तशी प्राणी ॥

मयूरकवि, त्याचा काल, व इतिवृत्तांत.

तिसऱ्या कालांतील शेवटला प्रचंड कवि मयूर (मोरोपंत) होय. ह्याचें जन्म इ० स० १७२९ मध्यें झालें, आणि तो इ०स० १७९४ सालीं मरण पावला. ह्याच्या बापाचें नांव रामाजीपंत पराडकर असून, श्रीमंत पेशवे सरकारचे व्याही जे बाबूराव बारामतीकर, त्यांच्या पदरीं तो कारकून होता. पुढें, मोरोपंताला देखील त्यांच्या दफ्तरांत कारकुनीची असामी मिळाली व त्यानें कांहीं दिवस पन्हाळगडावरही काम केलें. याची संस्कृतांत आणि मराठींत चांगली प्रवीणता असे, आणि तो मुळचा चांगला बुद्धिमान असल्यामुळें, तो पुराण सुद्धां फार सुरेख सांगे. त्यामुळें, त्याची विद्वत्ता पाहून, बाबूराव बारामतीकरांनीं त्याला आपल्या घरांतच पुराण सांगण्यासाठीं ठेविलें, व तो त्यांच्याच पदरीं सालीना ९०० रुपये वेतनानें, मरेपर्यंत होता.

त्याला झालेली उपरति.

हा कारकून असतांना, त्याला हिशेबांत पाव आण्याची चूक लागली. त्यावेळीं, स्वतःचें काम चोख, आणि तो जात्या निर्मळ व विश्वासूक असल्यामुळें, त्याला त्रिरात्र झोंप आली नाहीं; आणि ती चूक शोधून काढण्यांतच त्यानें दिवा लावून जागरण केलें. हें पाहून, त्याचे यजमान त्याच्याजवळ येऊन एकदम उभे राहिले, व त्याला जागण्याचें कारण विचारलें. तेव्हां, त्यानें खरी हकीकत सांगितल्यावर, ते त्यास म्हणाले, "मोरोपंत! इतकाच काल, आणि मनाची तीव्र एकाग्रता, हीं श्रीपरमेश्वराच्या चरणारविन्दीं जर तुम्ही लाविलीं असतीं, तर तुम्ही खचितच कृतार्थ झाला असता." हें भाषण ऐकून, मयूरकवीस अनुताप झाला, व भगवद्-गुणानुवादाशिवाय, पुनश्च अन्यकामीं मी आपली लेखणीच चालविणार नाहीं, अशी त्यानें शपथ वाहिली.

मयूरकवीची उदार व प्रचंड रुति.

मयूरकवीचे पुष्कळ ग्रंथ आहेत, आणि तो फारच जाडा लेखक होता, यांत अगदीं संशय नाहीं. १ प्रल्हादविजय. २ गंगावकिली. ३ तुळसीस्तव. ४ सीतागीत. ५ कृष्णविजय. ६ अठरा पर्वे महाभारत. ७ भागवती द्वादशस्कन्द. ८ हरिवंश. ९ ब्रह्मोत्तरखंड.

---

१ हा ग्रंथ श्रीमंत थोरल्या माधवरावांच्या मातुःश्री श्रीमती गोपिकाबाई यांच्या सांगीवरून रचल्याचें म्हणतात.

२ यांत रुक्मिण्यादि ज्या कृष्णाच्या बायका, त्यांच्या स्वयंवरांची मनोवेधक हकीकत आहे. हा साडेछत्तीसशांवर ग्रंथ होईल.

१० एकशें आठ रामायणें. ११कुशलव चरित्र. १२साधुसत्कार. १३रामनामार्या. १४आर्यमुक्तमाला. १५नामसुधाचषक १६ नामरसायन. १७ केकावली. इत्यादि त्याचेच ग्रंथ होत.

मयूरकवीचा प्रथम काव्यप्रयत्न.

खालील आर्या मयूर कवीचा प्रथम प्रयत्न म्हणून प्रसिद्ध आहे. परंतु, ती केव्हां, कोणत्या प्रसंगानुसार म्हटली, हें कळून येत नाहीं.

नित्य तुम्ही प्रभुपाशीं पेढे बरफी नवा खवा खावा ।
तरि म्या एके दिवशीं रेवडिचा स्वाद कां न चाखावा ॥

मयूराचें शिघ्र कवित्व, व त्याची दिगंत कीर्ति.

मोरोपंत हा मोठा शिघ्र कवि होता, व त्याचें लिहिणें फारच टापटीपीचें असे. त्यामुळें, एका बैठकीस, व सहजगत्या, तो दीडदीडशेंपर्यंत देखील आर्या करी. ह्याच्या कवनाची कीर्ति त्याच्या हयातींतच झाली होती, आणि ती काशीपासून थेट रामेश्वरापर्यंत पसरली होती, असें रामचन्द्र बडवे नामक कवीनें केलेल्या उल्लेखावरून दिसून येतें. कारण, हा एके ठिकाणीं असें म्हणतो कीं,

या जन्मतांचि गेल्या काशी रामेश्वरा नमायाला ।
प्रौढपणीं आर्या तें जगतीतलही पुरे न मायाला ॥

ह्या कवीचे आमच्या मराठी भाषेवर बहुत उपकार झाले

१ लघुरामायण, स्तोत्ररामायण, निरोष्ठरामायण, इत्यादि १०८ रामायणांपैकीं, फक्त थोडींच उपलब्ध आहेत. यांतील एकटें मंत्ररामायण हाच सुमारें चार हजारांवर ग्रंथ होईल.

महाराष्ट्र वाङ्मयावर ह्या कवीचे उपकार.

आहेत, असें अगदीं प्रांजल बुद्धीनें कबूल करावें लागतें. कारण, ह्यानें तिच्यांत प्रौढत्वाची रमणीय मूस ओतून, तिला उन्नतावस्थेप्रत आणिलें; तिच्यावर नानाविध सुवर्णालंकार[1] चढवून, तिला विबुधजनांचें कौतुकागारच बनविलें; तिच्यांतील शब्दमौक्तिकांची विचित्र रचना करून, तिला हरएक प्रकारें सजाविलें. तिला पदलालित्याच्या रत्नहारांनीं नखशिखान्त शृंगारून, प्रेक्षणीय केलें; आणि तिच्यावर षड्रसात्मक भरजरीचीं वस्त्रें घालून, तिला इतस्ततः तेजोमयच करून सोडिलें.

मयूर कवीवरील आक्षेप, व त्यांची निराधारता.

अशा प्रकारची खरी वस्तुस्थिति असल्यामुळें, "मोरोपंत हा कवि नव्हे;" "तो केवळ भाषान्तर कर्ताच होय;" असे जे कित्येकांचे आक्षेप आहेत, व जे आपण नेहमीं ऐकतों, आणि ग्रंथान्तरीं देखील पाहतों, ते निःसंशय निराधार व भ्रांतिमूलकच समजले पाहिजेत. तथापि, ह्या कवीनें आपल्या अलौकिक कवित्वाचा कित्येक ठिकाणीं थोडाबहुत भलताच उपयोग केला आहे, असें म्हणणें प्राप्त येतें. निदान, अशा उदात्त देणगीचा त्यानें सर्वमान्य उपयोग खचितच केला नाहीं, असें अवश्य म्हणावें लागतें. कारण, ह्यानें केवळ कर्णमाधुर्यास्तवें[2], किंवा

---

१ सुवर्ण = सोनें. सुवर्ण = चांगलें वर्ण.

२ ज्याचें किरातरूपि प्रभु धिक्कृतिगर्भ गांय नाक वच।
हांसे आपणहि म्हणे ठावे मज काय गायना कवच ॥ २९ ॥
(मयूरकृत महाभारत. विराटपर्व. अ० ३).

दृष्टिप्रसादार्थ, अथवा फक्त आपल्या मनाचीच अनावर हौस पुरी करण्यास्तव, अनेक शब्दांचे प्रास साधून, अगर त्यांची चित्रविचित्र साधनिका करून, अथवा ते लाघव चमत्कृतींत बसवून, जो कांहीं कार्यभाग उरकला, त्यामुळें कदाचित् वरवर पाहणारांचें, व बाह्यरंगानें खुष होणाऱ्या सामान्य जनाचें, मनोरंजन होण्याचा संभव आहे. परंतु, अशा कृतीनें कविस्फूर्तीस निःसंशय तिळमात्रही उन्नति प्राप्त होत नाहीं; किंवा त्या योगानें तिचा सुकीर्तिमेरु सुद्धां अचल राहत नाहीं; अशी आमची अल्प समजूत आहे.

त्याच्या काव्यांतील गुणदोष.

अशा प्रकारच्या लाघवचमत्कृतीचा मयूरकवीस फारच नाद होता असें दिसतें, आणि त्याचें प्रत्यक्ष प्रमाण आपल्याला त्याच्या ग्रंथांतच सांपडतें. मंत्रिरामायणांत, श्रीराम जयराम जयजयराम, या त्रयोदशाक्षरमंत्रांतील प्रत्येक अक्षर, एकामागून एक असें प्रत्येक श्लोकांत, आम्ही आतांच सांगितल्याप्रमाणें, प्रथमारंभीं योजिलें आहे. ही बालकांडांतील व्यवस्था होय. अयोध्याकांडांत कांहीं निराळीच टूम आहे. ती अशी कीं, ह्यांत हें मंत्राक्षर प्रत्येक गीतीच्या पहिल्या चरणाच्या दुसऱ्या अक्षरांत असून, अरण्यकांडांत तिसऱ्यांत, किष्किंधाकांडांत चौथ्यांत, सुंदरकां-

२ मंत्रिरामायण, बालकांड, यांत श्रीराम जयराम जयजयराम, हा त्रयोदशाक्षरात्मक मंत्र या रामायणाच्या प्रत्येक श्लोकांत साधलेला आहे; आणि म्हणूनच त्याला मंत्रिरामायण, म्हणजे मंत्रयुक्त रामायण, असें नामधेय दिल्याचें व्यक्त होतें.

डांत पांचव्यांत, युद्धकांडांत सहाव्यांत, याप्रमाणें क्रमाक्रमानें, तें शेवटच्या उत्तरकांडांत, सातव्या अक्षरापर्यंत गेल्याचें नजरेस येतें. अशाच तऱ्हेची योजना बालमंत्ररामायणांत आणि मंत्ररामायणांतही केल्याचें व्यक्त होतें. प्रत्येक कांडांत एक मंत्र, याप्रमाणें ह्यांत सात मंत्र असल्याचें दिसतें. नामांक रामायणांत प्रत्येक गीतीच्या प्रथमपंक्तीचें प्रथमाक्षर 'रा' व द्वितीय पंक्तीचें 'म,' याप्रमाणें सर्वत्र आहे. आणि हाच प्रकार, उमारामायण, शिवरायामण, गंगारामायण, काशीरामायण, इत्यादींतही[1] नजरेस येतो.

हा कृत्रिम प्रकार चरत चरत कसा एकसारखा वाढत गेला, याची कल्पना होण्यासाठीं, मयूरकृतीचे आणखी कांहीं प्रकार, मी वाचकापुढें सादर करतों.

त्याच्या कृत्रिम काव्याची निःसीमता.

निरोष्ठ रामायणांत, प, फ, ब, भ, म, व, इत्यादि ओष्ठ्यवर्ण गाळाऊ झाल्यामुळें, बाकी राहिलेल्या अक्षरांतच निर्वाहा केला आहे. अर्थात्, राम, लक्ष्मण, रावण, मारुति, बिभीषण, यांच्यांतील ओष्ठ्यवर्ण वर्ज्य असल्याकारणानें, ते निःसंशय अगदींच निरुपयोगी होत. तेव्हां, त्या ऐवजीं इष्ट शब्द घालणें, आणि दुसऱ्या ओष्ठ्यवर्णाबद्दल अन्य शब्द पाहून त्याची योग्य त्या स्थानीं योजना करणें,

निरोष्ट रामायणांतील शब्दांचा वर्ज्यावर्ज्य विचार.

---

१ ह्यांत, प्रत्येक आर्येच्या पहिल्या ओळींत ह्या शब्दाचें प्रथमाक्षर, व दुसऱ्या ओळींत द्वितीयाक्षर, असें घालून, उमा, शिव, गंगा, आणि काशी, हे शब्द साधले आहेत.

किती प्रयासाचें आहे; व अभ्यासानें तें कदाचित् प्रयासाचें वाटत नसल्यास, किती कृत्रिम आहे; आणि कवीची सहज स्थिति व उपजत स्फूर्ति यांपासून तें किती दूर आहे; याची कल्पना करण्याचें काम मी वाचकाकडेसच सोंपतों.

मात्रारामायणांत 'अ' पासून 'ज्ञ' पर्यंतचे सर्व वर्ण आर्येच्या आरंभीं वर्णानुक्रमानें योजिले आहेत. अर्थात्, हें खचितच सोपें, किंवा कवीच्या सहज स्फूर्तीचें बिलकुल काम नसून, तें फक्त प्रयत्न करून, व द्राविडी प्राणायामानेंच साधण्यासारखें आहे. तेव्हां, अशा स्थितींत, 'ण' हें अक्षर हातीं घेतल्यावर, त्या वर्णानेंच आपली काव्यपंक्ति सुरू करण्यास, मयूर कवीला देखील किती अडचण पडली, आणि बळसा घेऊन निव्वळ पांच सात कोसाचा हेलपाटा मारल्यावरही, त्याचा इष्ट हेतु कितपत सिद्धीस गेला, याची कल्पना खालील ओळीवरून, वाचकांनींच करावी.

मात्रारायायणांतील द्राविडी प्राणायाम.

ण पुढें मागें राज्या, तो राय कपीस भेटला, वानीं; ।
मानी बहु सिंधु तटा गेला, घेऊनि कीश सेनानी ॥ २६ ॥

(मात्रारामायण).

लघुरामायणांत, दीर्घ स्वरात्मक एक देखील अक्षर योजिलेलें नाहीं. तसेंच "परंतु" रामायणांत, "परंतु" शब्दाची योजना कोठें तरी एकदां प्रत्येक आर्येंत केलेली दिसते. आणि दामरामायणांत प्रत्येक

लघुरामायणांतील लघुअक्षरें, व दामरामायणांतील शब्दगुंफा.

१ मात्र, ह्यांत दीर्घ ॠ, ङ, ञ, व ळ, हीं अक्षरें नाहींत.

आर्यार्धाची दोन, तीन, किंवा चार अक्षरें, दुसऱ्या अर्धाच्या आरंभींच आणिलेलीं दिसतात.

मयूराच्या कृत्रिम आणि सहज काव्याची तुलना.

आतां, अशा प्रकारच्या शब्दवैचित्र्यात्मक कृतीजवळच, जर आपण ह्या कवीची केकावली ठेविली, आणि परस्पर तुलना केली, तर त्या दोहोंत आपल्याला पुष्कळच, किंबहुना जमीन अस्मानाचें, अंतर दिसेल, अशी आमची अल्प समजूत आहे. पहिलींत बाह्यालंकार, शब्दाभरणाची दीप्ति, रसवैचित्र्य, व कृत्रिम रचना, हींच इतस्ततः दृग्गोचर होतील. परंतु, दुसरींत सहजस्फूर्ति, प्रचंड काव्यौघ, रसप्राचुर्य, नैसर्गिक माधुर्य, मनोहर पदलालित्य, आणि उत्कृष्ट वाक्सरणी, हीं चन्द्रबिंबाप्रमाणें आपल्या हृत्कमलावर पूर्ण प्रकाश पाडून, त्याला पदोपदीं तत्काल प्रफुल्लित करतील, व त्याची सत्यताही आपल्या अनुभवास तेव्हांच आणितील.

महाकवीवरील लोकहिताची जबाबदारी.

तात्पर्य, मोठ्या कवींच्या शिरःकमलांतून जें वचनामृत बाहेर पडतें; किंवा पीयूषतुल्य असा जो वचोविन्यास त्यांच्या मुखाबाहेर निघतो; त्या योगानेंच आपल्या मनाची एक प्रकारची उन्नति होण्याचा विशेष संभव असतो. आणि त्यामुळेंच, अशा उदार कवींच्या काव्यरचनेसंबंधीं जें विलक्षण कुतूहल आपल्या मनांत उद्भवतें व जागृत राहतें, त्याचें देखील पारणें फेडण्याला त्यांच्या अमूल्य कृतीच कारणीभूत होतात. तेव्हां, अशा प्रकारची खरी

वस्तुथिति असल्यामुळें, प्रत्येक नांवाजलेल्या कवीनें हे हेतु पार पाडण्याची, आणि लोकहित करण्याची, मुख्यत्वें-करूनच काळजी बाळगिली पाहिजे. नाहींपेक्षां, ह्या उदात्त काव्यशक्तीचा ओघ भलत्याच दिशेनें फिरला जाऊन, ती निष्कारण व अपात्रस्थानीं खर्ची पडते. इतकेंच नव्हें तर, तिच्यापासून महत्कार्यभाग होण्याची जी आशा असते, तिचा सुध्दां समूळ भंग होतो.

कृत्रिम काव्याचें दुर्बोधत्व, व तादात्म्याभाव.

शिवाय, अशा प्रकारच्या कृत्रिम रचनेनें, काव्यास दुर्बोधत्व येऊन, आपलें मन देखील अगदीं खट्टु होतें. अर्थात्, तें बिलकुल तल्लीन राहत नाहीं; त्याचें तादात्म्य केव्हांही होत नाहीं; आणि त्याच कारणानें त्यांत सहृदयताही भासत नाहीं.

शब्दयोजनेची निरर्थक खटपट.

कोणता शब्द खालच्या ओळींत उपयोगी पडतो; कोणता वरील पंक्तींत शोभतो; कोणता उजवीकडेच ठिकाणीं बसतो; आणि कोणता डावीकडे मात्र स्वस्थानापन्न राहतो; इत्यादि निरर्थक खटपटींत कोणत्याही धीमानकवीनें आपला अमूल्यकाल व अनुपम काव्य केव्हांही खर्ची घालणें अगदींच श्रेयस्कर नाहीं. असा दुरुपयोग किंवा अपव्यय, फक्त बिन्भांडवलाच्या कुकवीकडूनच कायतो होतो, आणि तसा इतर सहसा करीत नाहींत. कारण, त्यांच्याजवळ भरपूर सामग्री असल्यामुळें, ते तिचा विनियोग सुकारणींच लावतात, यांत संशय नाहीं. मात्र, मयूरकवि हा निःसंशय

फारच मोठ्या योग्यतेचा असतांही, त्यानें केवळ मनाच्या हौसेस्तव अशा शब्द योजनेंतच आपलें अमोल कवित्व दवडिलें, याबद्दल अति दुःख वांटणें अगदीं साहजीक आहे.

काव्याचें वास्तविक स्वरूप व मुख्य जीवन, आणि त्याचा प्रत्यय.

सहज बोध, आणि नैसर्गिक स्फूर्ति, हेंच काव्याचें वास्तविक स्वरूप, मुख्य जीवन, व खरें अंग असल्याकारणानें, कालिदासाच्या

वत्सोत्सुकापि स्तिमिता सपर्यां
प्रत्यग्रहीत्सेति ननन्दतुस्तौ ।
भक्त्योपपन्नेषु हि तद्विधानां
प्रसादचिन्हानी पुरःफलानि २२ ॥

(रघुवंश. स० २)

या, किंवा त्याच्या काव्यांतील अन्य कोणत्याही श्लोकपंक्तीनें, जो आपल्या हृदयाला पाझर सुटतो, व आनन्द होतो, तसा भारवि कवीच्या

देवाकानिनि कावादे वाहिकास्वस्वकाहि वा ।
काकारे भभरे काका निस्वभव्यव्यभस्वनि ॥ २५ ॥

(किरातार्जुनीयम्. स० १५).

या सर्वतोभद्र श्लोकानें खचितच होत नाहीं. अथवा, मयूरकवींचीच

दयामृतघना अहो हरिवळा मयूराकडे
रडे शिशुतयासि घे कळवळोनि माता कडे ।

(केकावली.)

ही पदपंक्ती जितका आल्हाद उत्पन्न करून, आपल्या मनाला सुसंस्कारानें विलक्षण तल्लीनता आणते, तशी

"ण" पुढें मागें "रा"ज्या तो राय कपीस भेटला वानी।
(मात्रारामायण.)

ही पंक्ती निःसंशय आणीत नाहीं, हें कोणालाही कबूलच करावें लागेल.

ह्या वेळचे अन्य कवी.

असो. ह्याच कालांत, दुसरेही लहान मोठे कवी उदयास आले. सबब, त्यांजविषयींची देखील अवश्य ती हकीकत देणें जरूरीचें असल्यामुळें, ती येथें यथावकाश सादर करतों.

हरिराज.

हरिराज माणकेश्वर शेंडे याचें मराठींत, व हिंदींत देखील, काव्य आहे. ह्याची मुख्य कृति म्हटली ह्मणजे १ भस्मासुराख्यान, २ राधावर्णन, आणि ३ रामाचार्यांचें श्लोकबद्ध भाषान्तर, ही होय.

शिवरामस्वामी.

शिवराम कवीला शिवरामस्वामीही ह्मणत. ह्यांचें १ गंडिकाख्यान, २ मुद्रिकाख्यान, ३ रामतुळसी, ४ अपराधस्तोत्र, ५ श्रीमंत नानासाहेब पेशव्यास पद्यात्मक उपदेश, इत्यादि लहान सहान बारा प्रकरणें प्रसिद्ध आहेत.

शामा इत्यादि कवी.

शामा, जनार्दन, दामोदर, वगैरे सामान्य कवी ह्याच सुमाराला होऊन गेले.

गोविंद कवि हा मोठा भगवद्भक्त होता, व तो

गोविंद कवि.

अयाचित आणि साधुवृत्तीनें राही. ह्याची स्त्रीसुद्धां कवन करी, व तें गोविंदकाव्याबरोबरच प्रसिद्ध झालें आहे. हें काव्य मधुर आणि प्रेमळ असल्याचें दिसतें.

चतुर साबाजी.

चतुर साबाजीच्या बापाचें नांव विश्वनाथ होय. हा पुण्यांत पेशवे सरकारच्या पदरीं असे. १ बलिदानकथा, २ रावणगर्वपरिहार, इत्यादि आख्यानें ह्यानेंच लिहिलीं आहेत.

मोरेश्वर.

मोरेश्वर हेबळीकर याचे १ चन्द्रावलीवर्णन, व २ वीरभद्रचरित, असे दोन ग्रंथ प्रसिद्ध आहेत. पहिलें शृंगाररसपर काव्य असून, दुसऱ्यांत सुमारें सात हजार ओंव्या आहेत.

रामचंद्र.

रामचंद्र मल्हारानें बरींच प्रकरणें लिहिलीं असल्याचें कळून येतें. ह्यापैकीं सुभद्राहरण प्रसिद्ध आहे.

पांडुरंग.

पांडुरंग कवीनें श्रीमंत नारायणराव पेशवे यांचें पद्यात्मक चरित्र लिहिलें आहे. याखेरीज, १ रामगौरव, २ द्रौपदीस्वयंवराख्यान, ३ स्थालीपाक, ४ पार्थहनुमंतसंवाद, इत्यादि ह्याच्याच कृती असल्याचें समजतें.

सिद्धेश्वर.

सिद्धेश्वर हा अमृतराय कवीच्या शिष्यवर्गांपैकीं असून, याचे कटाव आणि पदें प्रसिद्ध आहेत. अद्वैतसरणी नांवाचें काव्य देखील याचेंच असल्याचें ह्मणतात.

सुभानंतस्वामी.

सुभानंतस्वामीनें बरेच ग्रंथ लिहिल्याचे दिसतें. ह्यांपैकीं, १ भीष्मपर्व व २ उद्योगपर्व उपलब्ध असून, ते छापले आहेत.

महेश्वर.

महेश्वर हा फारच चांगला विद्वान होता, असें ह्मणतात. ह्याचा जन्म इ स. १७१८ साली झाला, आणि तो इ. स. १८१७ मध्यें निवर्तला. ह्यांची कृति कोठें उपलब्ध नाहीं. परंतु, ज्योतिष, व तदितर संस्कृत ग्रंथ, ह्मणजे मुहूर्तमाला, अद्वैत मकरन्द, इत्यादि ग्रंथांवर त्याची बरीच टीका असल्याचें सांगतात.

सज्जनरंजन.

सज्जनरंजन हा इ० स० १७७६ साली जन्मला, आणि इ० स० १८०४ मध्यें मरण पावला. याची कविता उपलब्ध नाहीं.

भैरवनाथ व त्याची कृति.

भैरवनाथ हा इ० स० १७७८ सालच्या सुमारास झाल्याचें कळून येतें. हा जातीचा ब्राह्मण असून, विटप क्षेत्रीं राहत असे. ह्यानें नाथलीलामृत नांवाचा ग्रंथ लिहिला आहे, व त्यांत सुमारें २८ अध्याय आहेत. हा ग्रंथ इ० स० १८३४ सालीं समाप्त झाला, असें म्हणतात. ह्यांत अनेक भक्तकथांचें वर्णन आहे.

रामजोशी व त्याचें काव्य.

ताया ऊर्फ रामजोशी हा देशस्थ ब्राह्मण असून, सोलापूरचा राहणारा होता. ह्याचें जन्म इ० स० १७६२ सालीं झालें, व तो इ० स० १८१२

मध्यें मरण पावला. हा जसा कवि तसाच वक्ताही असे; व तो प्रथम तमाशे करून,व नंतर कथाकीर्तनानेंच आपला निर्वाह करी. ह्यानें लावण्यांच्या चालीवर बोधपर आणि नीतिप्रसारक कविता केलेली आहे; आणि त्यामुळेंच ती विशेष प्रचारांत असल्याचें दिसतें. ह्याची छन्दोमंजरी नांवाची छन्दःशास्त्रावरील कृति देखील प्रसिद्धच आहे.

हा मोठा व्युत्पन्न व संस्कृतज्ञ ब्राह्मण असे. त्यामुळें, ह्याचें कवन लावणी छन्दांत असतांही, ते अशुद्ध, ग्राम्य, किंवा अश्लील नाहीं. एवढेंच नव्हें तर, त्यांत सुश्राव्य शब्दरचना, मनोहर पदलालित्य, आणि सुरम्य प्रौढता, यांची देखील झांक मारते.

अनन्तफंदी याचें वृत्त, व कवन.

अनंतफंदी हा इ० स० १७७३ सालीं नगर जिल्ह्यांत संगमनेर गांवीं जन्मला, आणि इ.स. १८१९ मध्यें मरण पावला. ह्याचा बाप मोठा विद्वान ब्राह्मण असे, व त्याला भवानीबाबा घोलप ह्मणत. यांचा, वडिलोपार्जित धंदा सराफीचाच होता. तथापि, अनन्तफन्दीला तमाशाचा नाद लागल्यामुळें, तो रामजोशाप्रमाणेंच लावणी ह्मणून तमाशा करी. परंतु, कंठ मधूर, आणि वाणी रसाळ, हीं दोन अपूर्व साधनें त्याच्याजवळ असल्याकारणानें, त्याच्या तमाशाला देखील माणसांची विलक्षण गर्दी होई. हा प्रकार अहिल्याबाई होळकरीण हिनें संगमनेरास असल्यावेळीं समक्ष पाहून, त्या साध्वी स्त्रीनें अनन्तफन्दीस उपदेश केला, व अमृततुल्यवाणीचा दुरुपयोग न करतां, ती सच्चिदानन्द-

चरणीं लावावी, असें तिनें त्यांस सांगितलें. तेव्हांपासून फंदीबोवा कीर्तन करूं लागले. ह्यानें केलेला श्रीमाधवग्रंथ, आणि कटाव, फटके, लावण्या, पवाडे, इत्यादि लेख प्रसिद्ध आहेत. ह्यापैकीं, श्रीमाधवग्रंथ हा इतिहास-दृष्ट्या विशेष महत्वाचा आहे. कारण, त्यांतील हकी-कतीची मूळरचना खुद्द शेवटल्या बाजी प्रभूनेंच स्वहस्तें केली असून, त्याचें पद्यात्मक मात्र त्यानें अनंत फंदी याजकडून करविलें. यांत, श्रीमंत सवाई माधवराव पेशवे यांनीं माडीवरून उडी टाकल्यापासून तों थेट शेवटले बाजीराव गादीवर येईपर्यंतची हकीकत आहे. ह्यासंबंधानें, खालीं लिहिलेला मजकूर आढळून येतो; व त्यावरून, तो विशेष काळजीपूर्वक लिहिला होता, यांत शंका नाहीं.

हें कथानक राघव पुत्रें । आपुल्या स्वहस्तें लिहिलीं पत्रें।
त्या पत्रांवरून हीं चरित्रें । कवीनें कवीता केली असे ॥
यांत पदरचें नाहीं यत्किंचित। बाजी रघुनाथ साक्षभूत ।
टीका केली प्राकृत । लहान थोरास समजावया ॥

त्याचे वंशज.

अनन्त फंदीचा मुलगा श्रीपत फंदी (इ० स० १७९७-१८७२) हा देखील कविता करी. त्याचप्रमाणें, त्याचे नातू (श्रीपतीचे पुत्र) अनंत व गणपति हे सुध्दां कवन करीत, असें ह्मणतात. सांप्रतकाळीं, ह्याचे वंशज संगमने-रास असल्याचें कळतें.

देवनाथाचा जन्म इ० स० १७५४ सालीं अंजनगांव

देवनाथ, त्याचा जन्म, व कृति.

येथें झाला, व तो इ. स. १८२१ मध्यें वारला. हा कीर्तन करी, आणि स्वतः रचलेलीं पदें ह्मणे. ह्याचीं कांहीं आख्यानें, वेदान्तपर अभंग, भक्तिपर पदें, बोधपर दोहोरे, व सुरस कटिबंध, अशीं प्रसिध्द आहेत. हा मोठा भगवद्भक्त, निस्पृह, आणि स्पष्टवक्ता असे. त्यामुळें, त्याचा अनुग्रह गंगाबाई साहेब पेशवे (श्रीमंत सवाई माधवराव साहेब पेशवे यांच्या मातुःश्री) यांनीं घेतला असल्याचें समजतें.

प्रभाकर व त्याचें वृत्त, आणि काव्य.

प्रभाकर हा इ० स० १७६९ सालीं जन्मला, व इ० स० १८४३ मध्यें मरण पावला. ह्याच्या बापाचें नाव जनार्दन असून, हा हरणई मुरुड (किंवा बांवडें पाली) येथें राहत होता. ह्याच्या १ रंग, २ लक्ष्मी-पार्वती संवाद, ३ लावण्या, ४ कटाव, ५ पवाडे, इत्यादि कृती प्रसिध्द आहेत.

दयाळ वगैरे अन्य कवी.

ह्याच्याच वेळचे दयाळनाथ[1], लोकनाथ[2], कृष्णदास[3], काशिकवि[4], चिंमणकवि[5], काशिनाथकवि[6], वगैरे होत.

---

१ हा देवनाथाचा शिष्य असून त्याची बरीच कविता प्रसिद्ध आहे.

२ हा पेशवाईच्या अखेरीस उदयास आला. ह्याचें गोपीकृष्णाख्यान व कांहीं पदें छापिलीं आहेत.

३ ह्याचीं कांहीं पदें प्रसिद्ध आहेत. हा पेशवाईच्या अखेरीस झाला.

४ ह्यानें कांहीं पदें व लावण्या केल्या आहेत. लावण्या रुक्मिणीच्या स्वयंवरावर आहेत.

५ इ. स. १८१३–१८६२. हा विद्वान असून, ह्याचें हंसपद्धति नांवाचें ५००० ओंव्यांचें काव्य प्रसिद्ध आहे.

६ ह्याचें किंचित्रामायण ह्मणून श्रीधरकृत रामविजयाचें सार आहे.

राघव कवि हा जवळपूरकडील राहणारा असून, ह्याच्या १ वीरमाणिकथा, २ सुरतसुधन्वावध, ३ शिबिचक्रवर्त्याख्यान, इत्यादि कृती प्रसिध्द आहेत.

राघव कवि.

रामचन्द्र बडवे हा मयूर कवीनन्तर उदयास आला. ह्याचें कवन फारसें उपलब्ध नाहीं. तथापि, मयूरकाव्याच्या कीर्तिपरिमलासंबंधी ह्याची आर्या व इतर चुटकें सुप्रसिद्ध आहेत. मयूरकवीच्या आर्यासंबंधानें हा म्हणतो,

रामचंद्र बडवे.

या जन्मतांचि गेल्या काशीरामेश्वरा नमायाला ।
प्रौढपणीं आर्यांतें जगतीतलही पुरे न मायाला ॥

खालीं लिहिलेली आर्या देखील त्याचीच असल्याचें कळून येतें.

सुश्लोक वामनाचा अभंगवाणी प्रसिद्ध तुकयाची ।
ओंवी ज्ञानेशाची किंवा आर्या मयूरपंताची ॥

आमच्या शेवटल्या बाजी प्रभूचे प्रसिद्ध दिवाण सदाशिवभाऊ माणकेश्वर, हे देखील चांगलें कवन करीत, म्हणून ऐकिवात आहे. परंतु, त्यांचें काव्य कोठेंही उपलब्ध नाहीं, ही मोठ्या दुःखाची गोष्ट होय. निदान, तें मला तरी मिळालें नाहीं, याबद्दल वाईट वाटतें. सदाशिवभाऊ हे प्रथम कथाच करीत, आणि आपला

सदाशिवभाऊ माणकेश्वर.

उदरनिर्वाह चालवीत. परंतु, तो जातीनें हुशार व चांगला मुत्सद्दी होता; त्यामुळें तो आपल्या गुणांनींच नांवारूपास आला[1].

आतां, फक्त शाईर, गोंधळी, तमासगीर, भराडी, इत्यादिंच्या कवनांसंबंधीं अवश्य तो उल्लेख करून, हा भाग पुरा करतों. ह्या मंडळींचे महत्वाचे पद्यात्मक लेख ह्मटले ह्मणजे पोंवाडे, कटाव, आणि लावण्या, वगैरे होत; व ह्यांच्या रचनेनेंच लोकांचें मनोरंजन करून, ते आपला उदरनिर्वाह चालवीत. शिवाय, मराठेशाहींत आणि पेशवाईंत ह्याच धंद्यावर त्यांचा चरितार्थही सहजीं चाले. कारण, त्यावेळीं आमचें स्वराज्य असल्यानें, आमचे बाहू वारंवार स्फुरण पावत; व त्यांच्या अतुलपराक्रमानें अखिल जगत् देखील थक्क होऊन जाई. तेव्हां, अशा प्रसंगांचा मोहक वृत्तान्त ह्या पवाड्यांत असल्यामुळें, आमच्या शौर्याची, साहसाची, आणि विजयश्रीची आह्मांस फारच अपूर्वता वाटे. इतकेंच नव्हें तर, तच्छ्रवणानें आह्मां महाराष्ट्रीयांचें चित्त वेधलें जाऊन, ते आपल्या आनन्दभरांत ह्या गांवकवींची चांगलीच संभावना करीत[2].

शाईर व गोंधळी, यांचें कवन.

---

१ ह्याच्यासंबंधानें ग्रांटडफ म्हणतो,

"But not withstanding his humble origin, he was dignified in his manner, polite and affable in conversation, and, as a statesman, possessed of considerable ability," "Sadashiv Bhau Mankeshwar was a great musician and composer." (P. 613.)

२ ह्या संबंधानें न्या० रानडे म्हणतात,

"Some......(Powadas) such as the capture of Sinhagada, display real poetical talent of a very high order—(Note. Marathi Literature.)

शिवाय, ह्या व अन्य गुणिजनांस, खुद्द शिवछत्रपति व पेशवे सरकार, हेच उदार हस्तानें सहाय्य करीत. त्यामुळें, त्यांस भरपूर दक्षिणा, चांगल्या बिदाग्या, भरगच्ची दुपेटे, उत्तम मंदिलि, मौल्यवान बक्षीस, अथवा दुसरें एकादें छानदार इनाम, अवश्य मिळे. त्यायोगानें, अशाप्रकारच्या कवनास भरती येऊन, ती महाराष्ट्र वाङ्मयाच्या अभिवृध्दीस पुष्कळ अंशानें कारणीभूत झाली, ही गोष्ट आपण केव्हांही विसरतां कामा नये.

त्यांस मिळालेलें प्रोत्साहन.

असो. या पवाड्यांत सर्वांहून जुना पवाडा ह्मटला ह्मणजे, श्री शिवाजी छत्रपतींनें अबदुलखानास मारून, त्याजवर मिळविलेल्या जयाबद्दलचा होय. ह्या पवाड्याचा कर्ता अज्ञानदास नांवाचा कोणी शाईर असून, तो ह्या प्रसंगाच्यावेळीं हयात होता, यांत शंका नाहीं. कारण, ह्या विजय श्रीच्या संबंधानें स्वतःच पोंवाडा रचून, अज्ञानदास शाईरनें तो खुद्द श्री छत्रपति शिवाजी महाराजांसच म्हणून दाखविला होता. त्यावरून, त्यांनीं त्यास एक घोडा, व शेरभर सोन्याचा तोडा, मोठ्या आनन्दानें बक्षीस दिला, असें ह्या पवाड्याच्या शेवटल्या म्हणजे सदतीसाव्या चौकावरून चांगलें व्यक्त होतें. अज्ञानदास म्हणतो,

धन्य जिजाऊचे कुशीं । राजा अवतार जन्मला ॥
आपल्यामतें अज्ञान दासानें । बीरमाल राजाचा गाइला ॥
शिवाजी सरज्यानें । इनाम घोडा बाक्षिस दिला ॥
शेरभर सोन्याचा । तोडा हातांत घातला ॥
यश जगदंबेचें । तुळजा प्रसन्न शिवराजाला ॥ ३७ ॥

ऐतिहासिकदृष्ट्या पवाड्यांचें महत्व.

आतां, हे पोवाडे केवळ वाङ्मयाच्या दृष्टीनेंच महत्वाचे आहेत, असें नाहीं. तर, ते ऐतिहासिक दृष्टीनें सुद्धां फारच किंमतीचे आहेत. किंबहुना, ते निःसंशय अमूल्य आहेत, असेंच ह्मणावें लागतें. कारण, त्यांत ऐतिहासिक माहितीचें खरें बीज, आणि मूळ पाया, योग्य कारणांसहित दिलेला आढळतो; व त्यामुळेंच त्यांचा उपयोग बहुत होतो.

त्याचा प्रत्यक्ष दाखला.

अबदुल खानाला शिवाजीनें कपटानें ठार मारल्याबद्दल, मुसलमानी ग्रंथांत, आणि त्यावरून तयार झालेल्या आंग्ल व मराठी इतिहासांत, वारंवार लिहिलेलें दिसून येतें. इतकेंच नव्हें तर, तीच गोष्ट खरी मानून, यवन, म्लेच्छ, फिरंगी, गनीम, पाश्चात्य, आणि कित्येक प्रसंगीं खुद्द आमचे लोक सुद्धां, शिवाजी महाराजावर निष्कारण कपटाचा आरोप घालून, त्यांस दोष देतात. परंतु, वास्तविक पाहतां, हा अबदुलखान यवनच कपटी असून, ह्याचें धिप्पाड व राक्षसीच शरीर असल्यानें, त्याच्याच मनांत ह्या वामनमूर्ति शिवाजीला चिरगडून, त्याजवर वार करावा, आणि अशा प्रकारें त्याच्या शक्तीचा निपात व संहार झाल्यावर, त्याला अचानक उचलून विजापुरास न्यावा, असें होतें. तेव्हां, हें कपटजाल अबदुलखानाच्या मनांत प्रथमपासूनच असल्यामुळें, तें सिद्धीस नेण्याकरितां, त्याची सर्व सामग्री सज्ज असे; व ह्या प्रसंगीं तर, ती त्यानें आपल्या प्रत्यक्ष हातांतच बाळगिली होती. परंतु, शिवाजी देखील दूरदृष्टीच

असल्यानें, शत्रूचे हेतु सिद्धीस न जातां, ते सर्वथैव फसले, आणि शिवाजीस मात्र संपूर्ण यश मिळालें.

पवाड्यांतील प्रमाणानें खरी वस्तुस्थिति कळण्यास मार्ग.

हा सर्व प्रकार या पवाड्यांवरूनच इत्थंभूत कळतो; व त्यावरूनच, श्री शिवाजी महाराजांवरील अपवाद, अथवा दुष्कीर्तीचा डाग, आणि विश्वासघाताचें दूषण, इत्यादि दूर होण्यास सबळ प्रमाण मिळतें. सबब, त्यांतील अवश्य तितकें अवतरण वाचकाच्या सोयीसाठीं येथें नमूद करतों.

शिवाजी सरजे सलाम केला॥ अबदुलखान गुमानकेला॥
मनीं धरलें कपट । पुरतें कळलें महाराजाला ॥
मग तो शिवाजी सरज्याला । खान दाबून बोलला ॥
तूं तो कुणबीका छोकरा ॥ सवरत बाच्छाई सदरा ॥२८॥

(अज्ञानदास कृत पोंवाडा. अबदुलखान वधे.)

अबदुलखानाचें मूलकपटजाळ, व त्याचा शिवाजीनें केलेला भंग.

ह्यावरून, शिवाजीला पाशांत घालण्याचा अबदुलखानाचा मूळापासूनचाच हेतु होता, यांत शंका नाहीं. इतकेंच नव्हे तर, त्याला पकडून नेऊन, विजापुरास दाखल करण्याचेंही त्याच्या मनांत असल्याचें दिसतें. कारण, "शिवा तुम चलो विजापुराला," असें अबदुलखानानेंच शिवाजीला म्हटल्यावरून, ह्यानें त्यास खालील उत्तर दिलें होतें.

---

१ सिंहानें. २ तृप्त, खुष. ३ सिंहाला. ४ दटावून. ५ हा वध इ० स० १६५८–५९ सालीं, आश्विन शुद्ध ७ मीला झाला.

शिवाजी सरजे नेतां । बहुत दिन लागतील खानाला ॥
कळला पुरुषार्थ । तुमचा बसल्या जाग्याला ॥ २९ ॥

(अबदुलखानाचा वध.)

अन्य पोवाडे, त्यांतील विषय, व त्यांचे कर्ते.

ह्याखेरीज, दुसरे पोवाडे भिन्न भिन्न प्रसंगानुसार असून, ते छत्रपति मराठे राजे, पेशवे सरकार, मराठे सरदार, यांजवर, निरनिराळे शाईर, गोंधळी, पाटील, इत्यादींनीं रचलेले आहेत. ह्यापैकीं, फक्त खालीं लिहिलेले मात्र उपलब्ध आहेत:—

१ तानाजी मालुसरे आणि सिंहगड. २ बाजी पासलेकर,[2] ३ प्रतापसिंह व शहाजी[3] महाराज. ४ प्रतापसिंहाची शिकार ५ प्रतापसिंहाची पदच्युति. ६ प्रतापसिंहाची काशीयात्रा. ७ प्रतापसिंहाच्या राणीचा शोक. ८ जंगली राजे अथवा प्रतापसिंहाच्या पुत्राचा जन्म. ९ प्रतापसिंहाचे धाकटे बंधु शहाजी राजे यांचें तक्तारोहण. १० शहाजीच्या स्वारीचा थाट. ११ सातारकर छत्रपति व त्यांचे सरदार. १२ आंबाजी महाराजांचा सयाजी मोहित्याच्या हातून मृत्यू. १३ सामान गडच्या गडकऱ्यांचें[10] बंड. १४ पानपतची लढाई. १५ नानासाहेब[11] पेशव्यांचा मृत्यु.

---

१ कवि तुळशीदासशाईर. २ कवि यमाजी शाईर. ३ हरी रामकवि. ४ कवि सगनभाऊ ५ कवि राघूजी पाटील. ६ कवि पिराजी. ७ कवि मार्तंड बाजी शाईर. ८ कवि मरी पिपाजी. ९ कवि पेमा माळी. १० कवि कृष्णा वाघ्या, सुलतान, हुसेन, आणि विठ्ठल. ११ कवि शिवराम पिंपळगांवकर.

१६ पेश[1]वाईच्या आरंभापासून तों नानासाहेब पेशव्यांच्या मृत्यूपर्यंतचा वृत्तांत. १७ थोरले माधवराव पेशव्यांची पतिव्रता स्त्री रमाबाई सती गेली, त्यावर पोंवाडा. १८ नारायणराव पेशव्यांचा मृ[2]त्यु. १९ सवाई माधवरावांचा जन्[3]म. २० पेशव्यांची बदामी किल्ल्यां[4]वर मोहीम. २१ सवाई माधवरावांची रंगं[5]क्रीडा. २२ खर्ड्यांची लढाई. २३ सवाई माधवरा[6]वांचा मृत्यु. २४ शेवटल्या बाजीरावाची कार[7]कीर्द. २५ शेवटले बाजीरा[8]व पेशवे. २६ खर्डकींची लढाई. २७ खडकीची व अं[9]ग्रीची लढाई. २८ नानाफ[10]डणीस. २९ जन[11]कोजी शिंदे. ३० महादजी शिंदे. ३१ अहिल्या[12]बाई होळकरीण. ३२ मल्हार[13]राव होळकर. ३३ यशवंतरा[14]व होळकर. ३४ फत्तेसिंग गायक[14]वाड. ३५ नागपूर[15]कर चिमणाजी बापु भोंसले. ३६ नागपूरकर आप्[16]पासाहेब भोंसले. ३७ परशुरा[17]मभाऊ पटवर्धन. ३८ परशराम भाऊंची कर्नाटकावरील स्वारी. ३९ चिंता-

---

१ कवि प्रभाकर जनार्दन दातार. हा हरणई मुरूडचा राहणारा असून, त्याचें जन्म इ. स. १७६९ सालीं होऊन, तो इ. स. १८४३ मध्यें मृत्यु पावला. २ कवि लहरी मुकुन्दा. ३ कवि खंडू संतू. ४ कवि राघु मुंबवडकर. ५ कवि प्रभाकर. ६ कवि प्रभाकर, आपा यशवंत, बाळा लक्ष्मण, अनन्तफन्दी, होनाजीबाळ गवळी, व रामचंद्र. ७ कवि रामजोशी. ८कवि सगनभाऊ. ९कावि रत्नु केर. १० कवि बाळू बहिरु व अनन्तफन्दी. ११ कवि परशुराम. १२ कवि होनाजी बाळ. १३ कवि राणू सुतार, व राजूताजूशा फकीर. १४ कवि अनंतफंदी संगमनेरकर. १५ कवि सुलतान यानें नागपुरास केला. १६ कवि बापु मराठा शेतकरी. १७ कावि जिवाजी पांचाळ.

मणेराव पटवर्धन सांगलीकर. ४० थोरले बाळासाहेब पटवर्धन मिरजकर. ४१ आनन्दराव धुळप. ४२ परशुरामपंत प्रतिनिधि. ४३ फलटणचे निंबाळकर. आणि ४४ दुसरे सयाजीराव गायकवाड.

उत्तम पोंवाडे.

ह्यापैकीं, कांहीं, ह्मणजे सिंहगड, पानपतची लढाई, नारायणराव पेशव्यांचा मृत्यु, खडर्याची लढाई, सवाई माधवरावांचा मृत्यु, खडकीची लढाई, परशुरामभाऊ पटवर्धन, इत्यादिविषयक पोंवाडे इतके मनोवेधक आणि हृदयद्रावक आहेत कीं, ते ऐकून व वाचून, आपल्या नेत्रांतून आनन्दाश्रू आणि प्रसंगानुसार दुःखाश्रू देखील गळल्यावांचून क्वचितच राहत नाहींत.

ह्या सर्वांत, पानपतच्या घोर संग्रामासंबंधीं पोवाडे फारच सुश्राव्य असल्याकारणानें, त्यांची गणना अग्रस्थानीं होते, यांत नवल नाहीं. हे पवाडे तीन असून, पहिला पवाडा सगनभाऊनें रचला, व तो सर्वांमध्यें उत्तमांत मोडतो. सगनभाऊकवि हा शेवटल्या बाजीरावाच्या वेळीं विद्यमान होता. दुसरा पवाडा रामा सटवा कवीनें केला; आणि तिसरा सटवा रामानें रचला.

---

१ अनंतफंदी. २ कवि भिकु बाळा. ३ कवि दाऊ बहुरूपी. ४ कवि बिकनदास हैबती व आपा सवाई. ५ कवि गंगुहैबती व प्रभाकर.

त्यांचा महाराष्ट्रावर झालेला संस्कार.

हे पोंवाडे ऐकून, आमचा निःसीम देशाभिमान[1] जागृत होतो; आणि प्रत्येकाचे बाहू कांहीं शौर्य व साहस करण्याच्या इच्छेनें, प्रत्यक्ष स्फुरणच पावतात. इतकेंच

---

१ ह्या संबंधानें मिस्तर ॲक्वर्थ माजी म्युनिसिपल कमिशनर, मुंबई, यानें दखील मोठ्या गौरवानें लिहिलें आहे. सबब, त्याच्या लेखां-तील अवश्य तितकें अवतरण येथें देतों. म्हणजे त्यावरून सुद्धां, आमच्या प्रतिपादनाची सत्यता सहजीं भासमान होईल. तो असें म्हणतो कीं,

"It is something higher and nobler than a mere national impulse which his ballads evoke in the breast of a Maratha. * * * They recall to him ... ... great historical deeds and figures which crowded round the nation's mighty development. ... ... But the fact is that the Maratha, differing herein from every other native of India, has strong national feelings. ... ... But the Ballads of the Marathas are the ballads of the men of Maharashtra (the "Great Nation"), as such, and burn through and through with patriotic fervour. ... He has the solid self-respect which true national feeling engeuders; he has known when to fight and how to fight; he has won his freedom once from fanatical oppressors. .... Apart from their value as national poetry, their phraseology is well worthy of study, as an exemplar of flexibillity, the force, the richness, and capacity of the vernacular language of the Maratha ryot."

(Maratha Ballads. P. P. II. III. XI.)

नव्हे तर, त्यामुळेंच आम्हांला आमच्या पूर्वस्थितीची आठवण होऊन, आमचे डोळे प्रसंगानुसार मोठ्या आनन्दानें व कचित् दुःखानेंही भरून येतात; आणि तच्छ्रवणानें आमची चित्तवृत्ति देखील अगदीं तल्लीन होऊन जाते.

लावण्या वगैरे.

आतां, लावण्या वगैरे संबंधानें विचार करतां, राम जोशाच्या लावण्या मात्र फारच बोधप्रद, रसाळ, व तत्वविचारानें मुसमुसलेल्या दिसतात. ह्याखेरीज, इतरत्र विशेष श्रृंगार, आणि अश्लीलता असल्यामुळें, वाङ्मयाच्या दृष्टीनें त्याचा विचार करण्याचें बिलकुल अगत्य दिसत नाहीं.

भाग ८८ वा.

मराठी भाषेची प्रौढावस्था—तृतीयकाल.

इ० स० १६९४—१८१७.

ऐतिहासिक ग्रंथ.

ह्या कालांतील ऐतिहासिक ग्रंथ.

ह्या कालांतलि विशेष महत्वाचे गद्यात्मक ग्रंथ म्हटले ह्मणजे इतिहास, बखरी, चरित्रें, कैफीयती, यादी, व पत्रें, इत्यादि होत. सबब, त्यांचा ह्या भागांत अगदीं स्वतंत्र रीतीनेंच विचार करण्याचें आम्हीं योजिलें आहे.

इतिहास लिहिण्याची आह्मां महाराष्ट्रीयांची, किंबहुना अखिल भारतीयांची प्रवृत्ति.

शोधकबुद्धीनें विचार केला असतां, असें सहजीं दिसून येतें कीं, घडून आलेल्या गोष्टीचें इतिवृत्त लिहून ठेवण्याची चाल, आह्मां महाराष्ट्रीयांची आजकालची नसून, ती मराठी भाषेचा उदय झाल्यापासूनच प्रचारांत होती, यांत शंका नाहीं. किंबहुना, इतिहास, किंवा विशिष्ट चरित्रात्मक लेख, अथवा दुसरी सामान्य अगर महत्वाची हकीकत, इत्यादि लिहिण्याची पद्धति, आह्मां भारतीयांत अति प्राचीनकालापासूनच सुरू होती, असेंच ह्मणावें लागतें. कारण, वेद, रामायण, महाभारत, श्रीहर्षचरित, ललितविस्तार, (बुद्धचरित), राजतरंगिणी, पुराणें, वगैरे सर्व ग्रंथ, आ-

मच्या मानसिक उन्नतीचे, राष्ट्रविस्ताराचे, उद्यमसातत्याचे, उदात्त शौर्याचे, देशस्थितीचे, आणि अवस्थान्तराचे, केवळ मूर्तिमंत इतिहास व मनोवेधक लेखच होत, यांत लेशमात्र-ही संदेह नाहीं.

आमच्या प्राचीन इतिहास ग्रंथांतील व्यंग.

आतां, हे ग्रंथ इतिहासाच्या शास्त्रीय पद्धतीस अनुसरून नाहींत; व त्यांत कित्येक ठिकाणीं निष्कारण पाल्हाळ, आणि क्वचित् निःसीम अतिशयोक्ति सुद्धां आढळून येते[२]; ही गोष्ट आम्हाला देखील कबूल करणें भाग आहे. तथापि, इतिहासाचें महत्व आह्मांस बिलकूल माहीतच नव्हतें, ही गोष्ट मात्र आम्हांला केव्हांही मान्य होणार नाहीं. कारण, त्यासंबंधानें केवळ प्रत्यक्ष प्रमाणच आमच्या तर्फे साक्ष देतें; व महाभारतांत तर त्याबद्दलचा साक्षात् उल्लेखच केलेला दृष्टीस पडतो.

महाभारतांत, एके ठिकाणीं असें ह्मटलें आहे कीं,

इतिहासोत्तमादस्माज्जायन्ते कविबुद्धयः ।

*　　　*　　　*

इतिहासाः सवैयाख्याविविधाः श्रुतयोऽपिच ॥ ५० ॥

*　　　*　　　*

इतिहासप्रदीपेन मोहावरण घातिना ।
लोकगर्भगृहं कृत्स्नं यथावत्संप्रकाशितम् ॥ ८७ ॥

(महाभारत, आदिपर्व.)

---

१ भारतीय साम्राज्य. पु. १० वें. पान ३९६ ते ३९९ पहा.

२ ह्याच प्रकार इंग्लंडसारख्या देशाच्या इतिहासांतही प्रथमावस्थेंत दृग्गोचर होतो; व जिऑफ्रेकृत आंग्ल नृपावलीचा प्राचीन इतिहास वाचला म्हणजे तर, निव्वळ कादंबरीचीच आठवण येते. अर्थात्, सर्व देशांतले अभिनव प्रयत्न असेच असतात, हें उघड आहे.

ह्यावरून, इतिहासाची उदात्त कल्पना आह्मां भारतीयांत खचित आहे. इतकेंच नव्हें तर, तिचें बीजारोपण फारच प्राचीन काळापासून झालेलें आहे, ही गोष्ट सुद्धां कोणालाही कबूलच केली पाहिजे.

इतिहासाविषयीं भारतीयांची उदात्त कल्पना.

आतां, हे बीजांकुर आर्यपिंडांत मुळापासूनच खिळलेले असल्यामुळें, आह्मांला इतिहासाचा विसर पडणें संभवनीयच नाहीं. आणि त्याच कारणानें, इस्लामशाहीचा विध्वंसरूपी नांगर, अखिल भरतखंडभर, बहुत काळपर्यंत फिरला असतांही, आमच्यांत बखरीसारखे ऐतिहासिक ग्रंथ अजून देखील उपलब्ध होतात; फार तर काय सांगावें, पण, इ० स० च्या चौदाव्या शतकांतील थोडीशी हकीकत, व तत्पूर्वकालीन कांहीं वृत्तांत, ह्याच बखरींतून मिळाल्याबद्दलची गोष्ट, ग्रॅण्टडफनें देखील आपल्या मराठ्यांच्या इतिहासांत नमूद केली आहे; सबब, ह्या एकंदर बखरीसंबंधीं उपलब्ध असलेला वृत्तांत आम्ही यथावकाश येथें देतों.

आमच्या पुराण बखरी, व त्यांचा पाश्चात्यानीं केलेला उपयोग.

ह्या बखरींत व गद्यग्रंथांत, कृष्णाजी अनंत सभासद यांनीं लिहिलेलें श्री शिवछत्रपतीचें चरित्र सर्वांत पुरातन अस-

श्री शिवाजीचें चरित्र.

---

१ मराठ्यांचा इतिहास. आवृत्ति तिसरी. इ. स. १८७३. पान २३।२४. अबुल फाजिलनें देखील भारतीय इतिहासावरूनच भरतखंडाचा प्राचीन इतिहास लिहिल्याचें दिसतें. भारतीय साम्राज्य. पु. ३. पान ७–३१ पहा.

त्याचें दिसतें. सभासद मजकूर हे राजाराम महाराजांच्या पदरीं, चिटनीशी दफ्तरांत कोठीकडील कामगार होते. ह्यांचे वंशज अजून ही कोल्हापुरांत असून, ह्यांनीं हें चरित्र राजाराम महाराजांच्या आज्ञेवरून लिहिलें, आणि तें शके १६१६ ह्मणजे इ० स० १६९४ सालीं चंदीचंदावर (तंजावर) येथें पुरें केलें. ह्यावेळीं, ईश्वरनाम संवत्सर असल्यामुळें, हा शक १६१९ असावा, असें काव्येतिहाससंग्रहकारांचें मत आहे. हें चरित्र पुष्कळच विस्तारानें दिलेलें असल्या कारणानें, श्रीशिवछत्रपतीनें जीं जीं महत्वाचीं कृत्यें केलीं, त्यापैकीं त्यांनीं एकही गाळलेलें असल्याचें आढळून येत नाहीं. ह्यावरून, त्यांची माहिती व कार्यक्षमता, हीं चांगलीं व्यक्त होतात. ह्याची भाषा अगदीं साधी आणि जुन्या पद्धतीची आहे. त्यामुळें, भाषासौंदर्य, पदलालित्य, माधुर्य, किंवा विचारगांभीर्य, इत्यादि दृष्टीनें त्यांत ह्मणण्यासारखी रसवत्ता नाहीं. तथापि, त्यांतील एकंदर माहिती फारच विलक्षण असून, ती अगदीं तपशिलवार दिलेली आहे; आणि म्हणूनच, ह्या शिवचरित्राला महाराष्ट्र साम्राज्याच्या मूळ पायाचा इतिहास, असें नामधेय देण्यास अगदींच हरकत नाहीं.

पेशव्यांची बखर.

ह्यानंतर, दुसरा महत्वाचा इतिहास ह्मटला ह्मणजे, पेशव्यांची बखर होय. हिची हकीकत खरोखरच विशेष मनोवेधक आहे. सबब, ती येथें थोडक्यांत देतों. ही बखर कुसुरघाटाखालीं, भिंवपुरी जवळील बैजनाथ नांवाच्या गांवीं, रा० रा० कृष्णाजी विनायक सोहनी यांनीं स्वमुखानेंच

निवेदन केलेली असून, त्यांनीं अशा रीतीनें ही तोंडीं सांगितलेली हकीकत, तेथील लोकांपैकींच कांहींजणांनीं लिहून घेतली, आणि तिचा आदरपूर्वक संग्रह केला. हे मूळचे रत्नागिरी नजीक सोमेश्वर गांवचे राहणारे होत; व पेशवाईत ते सुभेदारीच्या कामावर असत. परंतु, कालान्तरानें, यांच्यावर सुद्धां कालचक्राची धाड आली, आणि त्यांच्या ऐश्वर्याची धूळधाण झाली. तदनन्तर, ते अगदीं विरक्त होऊन गेल्यामुळें, त्यांनीं सर्व संसार सोडला, व आपल्या आयुष्याचा उत्तरार्ध नदीतीरीं, वैजनाथ येथें, श्रीशंकराच्या देवालयांत, ईश्वरोपासनेंत घालविला. पुढें, त्यांचा काल, त्याच ठिकाणीं, त्यांच्या वयाच्या सत्तराव्या वर्षीं झाला. ह्यांचा जन्म, श्रीमंत सवाई माधवराव यांच्या कारकीर्दीत, इ० स० १७८४।८५ सालीं होऊन, ते सुमारें इ० स० १८५४।५५ मध्यें वारले, असें कळून येतें.

हा पुरुष निःसंशय फारच चतुरस्त्र, विलक्षण बुद्धिमान, आणि मराठ्यांच्या इतिहासविषयक माहितीचे केवळ भांडारच होता, असें ह्मटल्यावांचून आमच्यानें राहवत नाहीं. कारण, ज्यानें पेशवाईचा इतका सुसंगतवार वृत्तान्त अव्वलपासून अखेरपर्यंत, सुमारें दोनशें वर्षांचा फक्त स्वमुखानेंच निवेदन केला, त्याची जेवढी ह्मणून तारीफ करावी तेवढी थोडीच. असें अपूर्व उदाहरण, अन्य कोणत्याही देशांत असल्याचें आमच्या पाहण्यांत, किंवा वाचण्यांत, अथवा ऐकिवांतही नाहीं; आणि तें पौरस्यांत, अगर पाश्चात्यांत कोठेंच सांपडावयाचें नाहीं.

याखेरीज, दुसरे ऐतिहासिक ग्रंथ खालीं लिहिल्याप्रमाणें होत. भाऊसाहेबांची बखर (अथवा पानपतच्या लढाईचा व दुसऱ्या मोहिमांचा इतिहास), शहाजी महाराज भोंसले यांची कैफीयत, चिटणीसकृत शिवछत्रपतींचे चरित्र, संभाजी महाराजांची बखर, थोरले राजाराम महाराज यांची बखर, शाहू महाराजांची बखर, धाकटे राजाराम महाराज यांची बखर, शाहू महाराजांची बखर (चतुःश्रृंगीच्या हकीकतीसह), चित्रगुप्त विरचित शिवाजी महाराजांची बखर, शिवदिग्विजय, शिवप्रताप, भूषण कविकृत शिवराज भूषणकाव्य, पुरुषोत्तम कविकृत शिवकाव्य, मराठी साम्राज्याची छोटी बखर, बाळाजी विश्वनाथ यांची कैफीयत, बाजीराव बल्लाळ यांची कैफीयत, नारायणराव पेशवे यांची बखर, पांडुरंग कृत नारायणराव पेशवे यांचें ओंवीबद्ध चरित्र, भाऊसाहेबांची कैफियत, रघुनाथ यादवकृत पानिपतची बखर, साष्टीची बखर, विंचुरकराची बखर, दाभाड्यांची हकीकत, गायकवाडांची हकीकत, खरड्याच्या स्वारीची बखर, ब्रह्मेन्द्रस्वामीचें चरित्र, जयरामस्वामीचें चरित्र, रामदासस्वामीचें चरित्र, होळकरांची कैफियत, नागपूरकर भोंसल्यांची कैफीयत, मल्हार रामरावकृत राजनीति, संभाजी महाराजकृत राजनीति, पंतप्रधान यांची शकावलि, कंपनीप्रतापमंडनम्, गोविन्दपंत बुंदेल्यांची कैफियत, पंतप्रातिनिधींची कैफियत, काशीराजाची बखर (भाषान्तर), नानांची बखर, अमात्य बावडेकर यांची कैफियत, इत्यादि.

भाऊसाहेबांची बखर, व अन्य ग्रंथ.

हे अत्यन्त महत्वाचे ऐतिहासिक ग्रंथ कधीं व कोणी केले, याबद्दलची तपशिलवार हकीकत आमच्या मनांत द्यावयाची होती. परंतु, ती कोठेंही उपलब्ध नाहीं. यामुळें आमचा नाइलाज आहे.

सदरीं नमुद केलेल्या सर्व बखरी हल्लीं उपलब्ध आहेत.

त्यांची विल्हेवाट.

परंतु, ह्याखेरीज दुसऱ्या अनेक बखरी, महत्वाच्या कैफीयती, व अमूल्य कागदपत्रें, वगैरे सर्व ग्रॅण्ट डफच्या हातीं लागलें असून, त्यापैकीं कित्येक बखरी तर, ह्या इतिहासकाराच्या ग्रंथायेवढ्या मोठ्या होत्या, असें तो स्वतःच कबूल करतो. इतकेंच नव्हे तर, त्यांचा त्यानें यथेष्ट उपयोगही केला होता, यांत संशय नाहीं. परंतु, मोठ्या दुःखाची गोष्ट ही कीं, हें गद्यात्मक अपूर्व वाङ्मय अजिबात नाहींसें झालें असून, त्यांचा कोठें पत्ताही नाहीं.

ह्या नाश झालेल्या बखरी किती अमूल्य होत्या, आणि

---

१ Grant Duff's History of the Marathas. P. XXVIII. 1873.

२ हें अभिनारायणाला स्वाहा झालें असल्याविषयीं, रावबहादुर नीलकंठ जनार्दन कीर्तने, यांनीं आशंका घेतली असून, त्या गोष्टीला प्रमाण नाहीं, असें नामदार तेलंग म्हणतात.

(मराठ्यांच्या बखरीवरील टीका. पान १२।१३.इ० स० १८८४; आणि Telang's Gleanings from Maratha Chronicles, या नांवाचा प्रबंध पहा.

ह्या बखरींचें महत्व व तद्विषयक विद्वानांचा अभिप्राय.

ज्या हल्लीं उपलब्ध आहेत त्याचें किती महत्व आहे, व कसा उपयोग होतो, हें अनुभवानें तर कोणाच्याही लक्षांत तेव्हांच येण्यासारखें आहे. मग, त्यासंबंधानें, कैलासवासी नामदार तेलंग आणि न्यायमूर्ती रानडे, यांच्यासारख्या रसिकांस व इतिहासज्ञांस मोठें कौतुक वाटावें, यांत कांहींच नवल नाहीं.

नामदार तेलंग[1] हे असें म्हणतात कीं, ऐतिहासिक दृष्टीनें मराठ्यांच्या बखरी फारच महत्वाच्या असून, एकंदर भारतीय वाङ्मयांत तर, त्या केवळ अपूर्वच होत, असें म्हणण्यास हरकत नाहीं.

नामदार न्यायमूर्ति रानडे[2] यांनीं देखील, ह्या बखरींच्या बाबतींत, प्रसंगानुसार फारच महत्वाचा आणि

१ ह्यानीं एके ठिकाणीं असें लिहिलें आहे कीं,

"There was no doubt that the Maratha Bàkhars were most valuable historic records, and might be fairly said to be almost unique in Hindu Literature."

२ न्यायमूर्ति रानडे म्हणतात,

"The Marathi Bakhars......constitute one of the most distinguishing features of our literature." "Some of these Bakhars compare very favourably with the chronicles of modern European History, published in the sixteenth Century; and a few of them, such as Bhausàheb's Bhakhar and that of the Battle of Panipat, possess very great literary merit."

(Growth of Marathi Literature.)

ध्यानांत ठेवण्यासारखा उल्लेख केला आहे; व त्यांत त्यांनीं अगदीं स्पष्टपणें असें पण सुचविलें आहे कीं, ह्या मराठी बखरी महाराष्ट्र वाङ्मंयाचें एक उत्कृष्ट अंगच आहेत. इतकेंच नव्हे तर, त्यांत मराठ्यांच्या धामधुमीचा साद्यन्त व मूर्तिमंतच वृत्तान्त असल्यामुळें, त्यांची योग्यता गेल्या सोळाव्या शतकांतील युरोपखंडांल्या इतिहासा-प्रमाणेंच आहे, यांत शंका नाहीं. शिवाय, महाराष्ट्र वाङ्मयाच्या दृष्टीनें देखील, त्या फारच महत्वाच्या आहेत, असेंच म्हणावें लागतें.

भाग ८९ वा.

मराठी भाषेच्या प्रौढावस्थेंतील तृतीयकाल.

उपसंहार.

वास्तविक विचार केला तर असें दिसून येईल कीं, मराठी भाषेच्या प्रौढावस्थेंतील तृतीयकालांतल्या पुष्कळ गोष्टी खरोखरच विशेष रीतीनें ध्यानांत ठेवण्यासारख्या आहेत. सबब, त्या येथें थोडक्यांत नमुद करतों.

मराठी भाषेच्या प्रौढावस्थेंतील तृतीय कालांतल्या महत्वाच्या गोष्टी.

१ मराठी भाषेची सत्ता व तिचा विस्तार.

२ महाराष्ट्र स्वराज्य व साम्राज्यामुळें, तिच्याविषयीं सर्वत्र उत्पन्न झालेली आर्तता.

३ त्यामुळें तिची झालेली अभिवृद्धि, व

४ त्याचा परिणाम.

१. श्रीशिवाजी छत्रपतीनें महाराष्ट्र साम्राज्याचा पाया घातल्यावर, मराठी भाषेची पूर्ण अभिवृध्दि व्हावी एतदर्थ, प्रथमतः त्यानेंच उपक्रम केला, आणि रघुनाथ पंडिताकडून राजव्यवहार कोश रचविला. ह्या अद्वितीय पुरुषसिंहाचें आपल्या देशावर, आपल्या राष्ट्रावर, व आपल्या भाषेवर, जें विलक्षण प्रेम होतें, त्याचें यथार्थ वर्णन करणें यास्थळीं अगदींच शक्य नसून, त्याबद्दलची

मराठी भाषेची सत्ता व तिचा प्रसार.

खरी साक्ष, महाराष्ट्र देशाचा इतिहास आणि त्याची कृति, हींच प्रत्यक्ष देतील. सबब, तत्संबंधानें, येथें विशेष रीतीनें सांगण्याची कांहींच अपेक्षा नाहीं. मात्र, याठिकाणीं इतकें सांगणें अत्यवश्य आहे कीं, शिवाजी महाराजांनीं मराठी भाषेची ही अशा प्रकारची अप्रतीम सेवा करण्याचें सुरू केल्यामुळें, त्याचा कित्ता थोड्याबहुत प्रमाणानें, पुष्कळांनीं गिरविला, व त्याच कारणानें, इ० स० च्या सतराव्या आणि अठराव्या शतकांत, मराठी भाषेला जणूंकाय चोहों-बाजूंनीं भरतीच आली, असें सहजीं अनुमान होतें.

अशाप्रकारें, मराठी भाषेला इतका प्रचंड राजाश्रय मिळाल्यानें, तिच्या अभिवृद्धीचीं सुचिन्हें तेव्हांच दिसूं लागलीं. पुढें, कालान्तरानें, श्रीमंत पेशवे सरकारच्या कारकीर्दीत, महाराष्ट्र साम्राज्याचा विस्तार फारच अफाट झाला; आणि त्यामुळें, मराठी भाषेची सत्ता देखील अधिकाधिकच फैलावली. कारण, पेशवे हे सार्वभौम राजे असून, (मागील पान ४८—४९ पहा,) त्यांचें यच्चावत् दफतर सुद्धां मराठींतच असे. त्याचप्रमाणें, आमचे मांडलिक, सामंत, राजे, सरदार, जहागीरदार, इनामदार, मोठमोठे तैनातदार, व मानकरी, यांचें लिहिणें आणि एकंदर व्यवहार सुद्धां केवळ मराठींतच चाले. इतकेंच नव्हें तर, परराष्ट्रांच्या वकीलांशीं जें बोलणें चालणें, व लिहिणें पुसणें करावें लागे, तें देखील मराठी भाषेंतच होई. त्या योगानें, मराठी भाषेचें प्राबल्य सहजींच वाढलें, आणि तिला चोहोंकडून आपोआपच मान मिळूं लागला. मांडलिक राजांकडे, दिल्लीदरबारांत,

किंवा विदेशियांच्या राज्यप्रकरणांत, जे आमचे वकील असत, त्यांची स्वभाषा मराठीच असल्यानें, सर्व राजकीय सल्लामसलत, सामाजिक व्यवहार, राजकारण, व हरएक प्रकारचें दळणवळण, केवळ मराठींतच चालविणें भाग पडे. त्या कारणानें, मराठीशिवाय अगदीं पानच हलेंनासें होऊन, तिची सत्ता स्वयमेव वाढली, आणि तितक्या काळांत तिचा विस्तार फारच झपाट्यानें होत गेला.

अर्थात्, मराठी समजणें, व तींत लिहितां, किंवा बोलातां येणें, ही निव्वळ आवश्यकताच झाली. किंबहुना, तिच्यांत प्रावीण्य असणें, ही एक चतुरस्रतेची, नित्यनैमित्तिक, आणि महत्वाचीच बाब होऊन राहिली. कारण, मांडलिक संस्थानिकांचे मंत्री, सामंत राजांचें दिवाण, सरदारांचे कारभारी, जहागीरदारांचे मुखत्यार, इनामदारांचे कारकून, व आमच्या दरबारांत असणारे परराष्ट्रांचे वकील, हे सर्व मराठी भाषा समजणारेच असणें जरूर होतें. तेव्हां, ह्या सर्व गोष्टींनीं मराठी ही आमच्या महाराष्ट्र दरबारची केवळ राजकीय भाषाच होऊन, ती सर्वत्र चमकूं लागली, यांत विशेष आश्चर्य तें कोणते ?

तिच्याबद्दलची झालेली आर्तता.

२. अशा प्रकारें, मराठी भाषेची जिकडे तिकडे, जेथें तेथें, घरींदारीं, आणि प्रत्यक्ष दरबारीं देखील, खरी आवश्यकता भासूं लागल्यामुळें, ती शिकण्याविषयीं, व तिचें परिशीलन करण्यासंबंधानें, पुष्कळच आर्तता सर्वत्र उद्भवली. फार तर काय सांगावें, पण,

खुद सार्वभौम पेशवेसरकारास सुद्धां, आपल्या अफाट साम्राज्यांत ज्ञानाचा प्रसार होऊन, अनेक विद्वान लोक निपजावे, असें वाटत असे.

त्यामुळें तिची झालेली अभिवृद्धि.

३. ह्याचकारणानें, मराठी वाङ्मयाला तेजी येऊन, तिची दिवसानुदिवस अभिवृद्धीच होत गेली. शिवाय, रघुनाथराव दादासाहेब पेशवे आणि अन्य रणधुरंधुर मराठे सरदार, यांनीं कन्याकुमारीपासून तों थेट हिमाचलपर्यंत, ठिकठिकाणीं स्वाऱ्या करून, अखिल भरतखंड सर केलें; भिमथडीच्या सुप्रसिद्ध तट्टांना सिंधुनदाचें स्नान घालून, हिंदुस्थानांतील राजे लोकांसही खंडणी द्यावयास लाविलें; आणि दिल्लीतक्ताधिपतीस देखील अगदीं जर्जर करून सोडिलें. त्यामुळें, पुण्यपत्तनांतील आमच्या एकाद्या कारकुनाचा निव्वळ शब्दही अखिल भरतखंडभर शिरसा वंद्य होऊन, मराठेशाहीला स्वयमेव तेज आलें, व त्या योगानें मराठी भाषा आपोआपच सरसावली.

त्या सर्वांचा इष्ट परिणाम.

४. ह्या सर्व गोष्टींचा परिणाम इतका इष्ट आणि सुरेख झाला कीं, राव आणि रंक, मोठा व लहान, हिंदु आणि मुसलमान, या सर्वांनींच महाराष्ट्र वाङ्मयाला हात बोट लाविलें, व त्याला अलंकृत करण्याचा स्तुत्य उद्योग चालविला. श्री शिवाजी महाराजांच्या काव्याचा आह्मी पूर्वीच उल्लेख केला असून, राजाराम महाराजांनीं श्री शिवछत्रपतीचें गद्यात्मक चरित्र, कृष्णाजी अनंत सभासद यांजकडून लिहिविल्याविषयीं, वाचकास श्रुत आ-

हेच. (मागील पान ३६४–६९ पहा.) शिवाय, आमची कविपरंपरा तर, आजपर्यंत अनेक शतकें, किंबहुना पांचसातशें वर्षे चालत आली असून, तिलाच ह्यावेळीं आणखी भरती आली, आणि अखिल महाराष्ट्र देश जणूंकाय काव्यस्फूर्तीनेंच चमकूं लागला. त्यामुळें, ह्या काळांत पुष्कळ कविरत्नें उत्पन्न होऊन, स्त्रियांस देखील कविता करण्याचें स्फुरण झालें. फार तर काय सांगावें, पण, मुसलमानांस सुद्धां महराष्ट्र कवनाची स्फूर्ति होऊन, सुलतान, पारद, हुसेन, इत्यादींनीं पवाडे रचले.

ह्याच कालांतल्या उत्तरार्धांत, श्रीमंत बाजीराव रघुनाथराव पेशवे सारख्या राजपुत्रानें देखील, अनन्तफंदी कवीकडून श्रीमंत सवाई माधवरावावर बरेंच मोठें काव्य करविलें. एवढेंच नव्हे तर, त्यांतील सर्व हकीकतीचा मजकूर बाजीराव साहेबांनीं स्वतः लिहून, त्या मुद्यावरच कवि मजकूरला माधवकाव्य रचावयास सांगितलें; ही विशेष रीतीनें ध्यानांत ठेवण्यासारखी गोष्ट होय. (मागें पान ३४० पहा.)

त्याचप्रमाणें, बखरी, कैफीयती, चरित्रें, इत्यादि इतिहासात्मक गद्यवाङ्मय, आणि देशाभिमानाला विलक्षण रीतीनें जागृत करणारे शाईरांचे पोंवाडे, हे सुद्धां ह्याच कालांतील होत. आणि हे सर्व आमच्या भारतीयांस स्वतःचें पूर्वस्वरूप दाखवून, आपली इतिकर्तव्यता बजावयास लावण्याच्या कामीं, फारच उपयोगी पडले, यांत काडीमात्रही शंका नाहीं.

---

१ गोविन्द कविची पत्नी चांगल्या प्रकारचें कवन करीत असल्याचें आम्ही पूर्वीच सांगितलें आहे. (मागील पान ३३७ पहा.)

भाग १० वा.

मराठीभाषेची प्रौढावस्था.

चतुर्थकाल.

इ० स० १८१८–१९००.

महाराष्ट्र वाङ्मयाची चतुर्थकालाच्या पूर्वार्धांत अवनति.

ह्या चतुर्थकालाच्या पूर्वार्धांत, मराठी भाषेला जी ग्लानि येऊन ओहोटी लागली, ती सांगतां पुरवत नाहीं. कारण, आमचा राजा व प्रभु जो शेवटला बाजीराव त्याच्या मूर्खपणानें आमचें प्रचंड साम्राज्य इ० स० १८१८ मध्यें एकदम लयास गेल्यावर, ह्या महाराष्ट्रांत एकच हाहाःकार होऊन, सर्वत्र कल्होळ उडाला. जिकडे तिकडे बेबंदनगरी आणि झोटिंगपादशाही मातली. आमच्या विस्तीर्ण साम्राज्यांतील सर्व बंधन तुटलें. एकंदर राज्यांत विलक्षण बखेडा होऊन गेला. ब्राह्मणशाहींत दुई झाली. प्रजेच्या विश्वासाला हरताळ लागली. स्वावलंबन व नीतिधैर्य अजिबात बुडालें. आमच्या आर्यसिंहाची आणि हिंदुपदपादशाहीची तीव्र गर्जना मावळली. आमचें शौर्य व साहस लयास गेलें. आमची एकी अगदीं मोडली. आम्हांस पूर्ण निःसत्वता प्राप्त झाली. आमचें सार्वभौमत्व परकीयांनीं हिरावून घेतलें. आमची सत्ता संपुष्टांत आली. आमचें

स्वातंत्र्य नष्ट झालें. आमचा दरारा अस्तास गेला. आमचा ज्ञानदीप अजिबात मावळला. आणि आमच्या ग्रंथसंपत्तीची तर अगदीं वाताहातच झाली.'

त्याचें कारण.

याप्रमाणें, आमचें प्रचंड ब्राह्मणी साम्राज्य, आम्हां मराठ्यांचें प्रखर तेज, व आम्हा हिंदूंची बडी पातशाही रसातळास जाऊन, चोहोंकडे एकदम सामसूम झाल्यावर, सर्वत्र अंधकार पसरला; आणि त्या योगानें, सुमारें पांच पंचवीस वर्षें, किंबहुना अर्ध शतक पावेतों, जणूंकाय तीव्र दुःखाग्नींत पडून होरपळून गेल्यामुळें मतिशून्य होऊन, आमच्या महाराष्ट्रांतील अमूल्य ग्रंथसंपत्तीकडे, कोणीं ढुंकून देखील पाहिलें नाहीं. मग, एकादा सुंदर ग्रंथ, कांहीं अपूर्व कृति, अगर कोणी उदात्त कवि, यांची तर गोष्टच कशाला?

मराठी भाषेचें पुनरुज्जीवन.

अशा प्रकारें, महाराष्ट्र साम्राज्याची सर्व तऱ्हेनें धूळधाण होऊन, मराठी वाङ्मयाची पूर्ण अवनति झाली असतां, महाराष्ट्रांतील प्रजेस पाश्चात्य पद्धतीनें शिक्षण देण्याचा उपक्रम, इ० स० १८१८ पासून इंग्रजांनीं चालविला. सबब, त्याचा कसा आणि कितपत उपयोग झाला; त्या योगानें, महाराष्ट्र वाङ्मयाच्या अभिवृद्धीस किती अंशानें प्रोत्साहन मिळालें; त्यामुळें, त्याचें डोकें कसें वर होत चाललें; व त्याच कारणानें, त्याला किती सतेजता येऊं लागली; ह्या बद्दलची अवश्य तितकी हकीकत थोडक्यांत, परंतु साद्यन्त, आणि क्रमशः देण्याचा आमचा विचार आहे.

प्रथम दशकांतील मराठीची स्थिति.

इ० स० १८१८ पासून तों इ० स० १८२७ पर्यंतच्या दहा वर्षांत, फक्त तीनच मराठी ग्रंथ छापले असल्याचें कळतें. हे तीन्ही ग्रंथ गणित विषयकच असून, त्यांचें भाषान्तर शालोपयोगार्थ कर्नल जर्व्हिसनें केलें होतें. कारण, त्याच्या ताब्यांत, आणि त्याच्याच देखरेखीखालीं, कित्येक शाळा असत. त्यामुळें, ह्या शाळांतील मुलांस शिकविण्यासाठीं, सदरहू पुस्तकांचा बराच उपयोग होई.

द्वितीय दशकांतील अहवाल.

इ० स० १८२८ पासून तो इ० स० १८३७ पर्यंतच्या दशकांत, सुमारें तेरा पुस्तकें छापण्यांत आलीं. ह्यापैकीं, दोन वैद्यकावर, म्हणजे एक औषधिविद्येवर आणि दुसरें निदानशास्त्रावर असून, तीं डाक्तर म्याकलिन्नें तयार केलीं होतीं. दुसरीं सहा पुस्तकें भूमिति व भूगोलविषक असून, तीं बाळशास्त्री जांभेकर यांनीं रचलीं होतीं. एक व्याकरणविषयक ग्रंथ रा० ब० दादोबा पांडुरंग यांनीं तयार केला होता; आणि हाच मराठी भाषेचें व्याकरण म्हणून सर्वांस महशूर आहे. दुसरीं दोन पुस्तकें मराठी पाठक्रमाचीं असून, तीं मेजर क्यांडीनें रचलीं होतीं. एक पदार्थविज्ञान शास्त्राचें पुस्तक हरि केशवजीनें तयार केलें होतें; व मराठीकोश जगन्नाथशास्त्री आणि मोल्सवर्थ यांनीं रचला होता. ह्यावरून, इ० स० १८३७ पर्यंतच्या दहावर्षांत, मराठी भाषेची अगदींच सामान्य प्रगति झाल्याचें दिसतें.

तृतीय दशकांतील प्रगति.

इ० स० १८३८ ते इ० स. १८४७ पर्यंतच्या दहा वर्षांत, मराठी भाषेंत एकंदर तीस पुस्तकेंच छापून बाहेर पडलीं. ह्यांपैकीं, ईसापच्या कल्पितकथांचें व बालमित्राचें भाषान्तर सदाशिव काशिनाथ छत्रे यांनीं केलें असून, परिमाण ह्मणजे मापन विषयात्मक गणित ग्रंथाचें भाषांतर, कर्नेल जर्व्हिसनें छापविलें. ह्याखेरीज, हरि केशवजीनें ज्योतिःशास्त्र आणि रसायणशास्त्र, यांजवर दोन पुस्तकें लिहिलीं. बाळशास्त्री जांभेकरांनीं हिंदुस्थानचा लघुइतिहास तयार केला. देशी पंचांग करण्याची देखील ह्याच शतकांत सुरवात झाली, व यात्रिक क्रमण, पारमार्थिक विषयांचीं भाषान्तरें, आणि अन्य शालोपयोगीं पुस्तकेंही छापविण्यांत आलीं. कित्येकांनीं तर पुराण कर्वीचाच जीर्णोद्धार करण्याचें मनांत आणिलें; व ज्ञानेश्वर, हरिविजय, रुक्मिणीस्वयंवर, इत्यादि पोथ्या छापविल्या. कांहींनीं गीता आणि स्मृति, यांचीं भाषान्तरें प्रसिद्ध केलीं; व इ० स० १८४८ सालीं, क्यांडी आणि श्रीकृष्ण शास्त्री तळेकर, यांचे मराठी कोश बाहेर पडले. त्यावरून, ह्या दहा वर्षांत, मराठी वाङ्मयाची प्रगति पहिल्या मानानें बरीच झाली, असें म्हणण्यास हरकत नाहीं.

चतुर्थ दशकांतील ग्रंथवृद्धि.

इ० स० १८४८ पासून इ० स० १८५७ पर्यंतच्या दहा वर्षांत, सुमारें एकशें दोन पुस्तकें छापण्यांत आलीं. ह्यांत कित्येक शालोपयोगी पुस्तकें असून,

बाकीचीं भिन्न भिन्न विषयांवर होतीं. भर्तृहरीचें शतकत्रय, विदुरनीति, हितोपदेश, इत्यादि संस्कृत कवींच्या कृतींचें मराठींत भाषान्तर झालें; व त्याचप्रमाणें, इंग्रजी पुस्तकांचें देखील मराठींत भाषांतर होऊं लागलें. रावसाहेब मंडलिकांनीं एल्फिन्स्टन्कृत हिंदुस्थानच्या इतिहासाचें भाषांतर केलें. तसेंच, ग्रॅाण्टडफकृत मराठ्यांचा इतिहास, आणि क्यापटन म्याक्डोनल्डकृत नानाफडणीसाचें चरित्र, यांचेंही भाषांतर झालें. शिल्पशास्त्र, व आत्म्याचें अमरत्व नांवाचें पुस्तक, भाषांतर रूपानें गोविंद गंगाधर फडके यांनीं प्रसिद्ध केलें. मिल्लच्या अर्थशास्त्राचें भाषान्तर कृष्णशास्त्री चिपळुणकरांनीं करून छापविलें. अग्निरथ किंवा आगगाडी संबंधी प्रबंध कृष्णशास्त्री भाटवडेकरांनीं लिहिला. केरो लक्ष्मण छत्र्यांनीं पदार्थविज्ञानशास्त्रावर ग्रंथ रचला. गणेश शास्त्री लेले यांनीं क्यापटन कुक्चें चरित्र लिहिलें. बर्योल्डचें भाषान्तर भवानी विश्वनाथ काणविन्दे यांनीं केलें. महादेव शास्त्री कोल्हटकरानीं कोलंबस्चें चरित्र लिहिलें. आणि कृष्णशास्त्री चिपळूणकरांनीं सॉक्रेटीजचें चरित्र लिहून छापविलें. त्याचप्रमाणें, सादी नामक फारसी ग्रंथाचेंही मराठींत भाषांतर झालें; व बाबा पदमजीनें गृहोन्नतीवर एक लेख लिहिला.

ह्या अष्टकांतील ग्रंथप्रकाशन.

इ० स० १८५८ पासून इ० स० १८६५ पर्यंतच्या आठ वर्षांत, सुमारें पांचशेपन्नास ग्रंथ प्रसिद्ध झाले. अपरोक्षानुभूतीचें भाषांतर महादेव शास्त्र्यां-

नीं केलें. रघुनाथशास्त्री पर्वते यांनीं कोल्हापूरच्या महाराजांसाठीं भगवद्गीतेवर नवीन टीका तयार केली. कृष्णशास्त्री राजवाड्यांनीं मालतीमाधवाचें भाषान्तर केलें; व प्रसन्नराघव आणि रत्नावली यांचीं भाषांतरें देखील करण्यांत आलीं. परशुरामपंत गोडबोले यांनीं शाकुन्तल, मृच्छकटिक, वेणीसंहार, व उत्तररामचरित, यांचें भाषान्तर केलें; आणि कृष्णशास्त्री चिपळुणकरांनीं मेघदूताला मराठी भाषेंत सजविलें. तसेंच, विक्रमबत्तीशी, वेताळपंचविशी, शुकबहात्तरी, व बकासूर बखर, हीं देखील छापण्यांत आलीं.

संस्कृतांतून मराठींत भाषांतरें.

ह्याखेरीज वैद्यक व स्मृतिग्रंथ यांचीं सुद्धां ह्याचवेळीं भाषांतरें झाल्याचें दिसतें. कारण, कृष्णशास्त्री भाटवडेकरांनीं माधवनिदान, त्रिंबकी, आणि वैद्यजीवन, यांचें मराठींत भाषांतर केलें; व रघुनाथशास्त्री दाते यांनीं मिताक्षरास्मृतीला महाराष्ट्र भाषेंत शृंगारिलें; आणि मयूखाचेंही भाषान्तर झालें.

पुराण काव्यांचें संस्करण.

कांहींनीं नामांकित कवींच्या सुप्रसिद्ध कृती छापविल्या, आणि त्यांजला लोकांच्या दृष्टीसमोर आणिलें. अशा प्रकारचा दीर्घप्रयत्न आणि स्तुत्य उद्योग करण्याचें साहस प्रथमतः माधव चन्द्रोबांनीं केलें; आणि मोरोपंत कवींचीं महाभारतांतील आर्यवृत्तात्मक अठरा पर्वें, केकावलि, मदालसा, सप्तशति, व कृष्णविजय; मुक्तेश्वरकृत ओंवीवृत्तात्मक सभापर्व, आदिपर्व, आणि रामायण;

इत्यादि काव्यें छापिलीं. कित्येकांनीं यथार्थदीपिका, गजेन्द्रमोक्ष, गोपीगीत, सीतास्वयंवर, वगैरे वामनकवीचे ग्रंथ प्रसिद्ध केले. त्याचप्रमाणें, रामदासकृत दासबोध; श्रीधरकविकृत रामविजय, नलाख्यान, रुक्मिणीस्वयंवर, पांडवप्रताप, व शिवलीलामृत; महिपतिकृत संतलीलामृत, भक्तलीलामृत, संतविजय, आणि भक्तविजय; उध्दवचिद्घनाचे ग्रंथ; व प्रभाकर आणि अमृतरायाचे ग्रंथ; हे सुध्दां छापण्यांत आले. ह्याखेरीज, परशुरामपंत गोडबोल्यांनीं, अनेक कवींच्या कृतींतून उत्तमोत्तम वेंचे घेऊन, ते एकत्र केले. त्यामुळें, त्यांचाही फार उपयोग झाला. हे वेंचे नवनीत या नांवानें सुप्रसिद्ध आहेत.

इंग्रजींतून मराठींत झालेलीं भाषांतरें.

ह्याच सुमारास, इंग्रजी पुस्तकांतूनसुध्दां कित्येक भाषान्तरें झालीं, व तीं नांवाजलेल्या विद्वानांनीं केलीं. कृष्णशास्त्री भाटवडेकरकृत नभोमंडल, कृष्णशास्त्री चिपळुणकरकृत आरबी भाषेंतील सुरस गोष्टी, कृष्णशास्त्री गोडबोले कृत ज्योतिःशास्त्र, आणि नृसिंहशास्त्री ओक व विष्णुशास्त्री पंडित यांनीं केलेलें मरेकृत हिंदुस्थानच्या इतिहासाचें भांषातर, कायद्यांचीं पुस्तकें, व अदालतीच्या ठरावाचीं भाषान्तरें, इत्यादि छापण्यांत आलीं.

नवीन ग्रंथ.

ह्या शिवाय, कित्येक नवीन ग्रंथ देखील याच वेळेस प्रसिद्ध झाले. श्रीमंत दाजीसाहेब क्रिबे, इंदूरचे प्रख्यात पेढीवाले यांनीं लिहिलेला दक्षिणचा प्रवास, विनायक कोंडदेव

ओककृत नीतिपाठ, गोविन्द नारायण यांचा "सभ्यता, स्वच्छता, आणि अनियमितपणा," यांजवर निबंध, व मुंबईचें वर्णन, बाबा पदमजींचें यमुनापर्यटन, विष्णुबोवा ब्रह्मचारीकृत वेदोक्तधर्मप्रकाश, डाक्तर नारायणदाजीकृत वैद्यक आणि रसायणशास्त्र, डाक्तर भिकाजी अमृतकृत विच्छेदशास्त्र, प्रोफेसर दाजी निळकंठ नगरकरकृत शंकुछेद, प्रोफेसर केरो लक्ष्मण छत्रेकृत ग्रहवेध, कृष्णशास्त्री भाटवडेकरकृत विद्युच्छास्त्र, हरिश्चन्द्र चिंतामणकृत आलोकलेख्यशास्त्र, महादेवशास्त्री पुराणीककृत भूगोलशास्त्र, गोविन्द गंगाधर फडकेकृत शिल्पविद्या, कृष्णशास्त्री चिपळूणकरकृत अनेकविद्या मूलतत्त्वें, रावबहादूर मोरोबा कान्होबाकृत घाशीराम कोतवाल, लक्ष्मणशास्त्री हलवेकृत मुक्तमाला, बाबा गोखलेकृत राजामदन, इ० स० १८९७ सालचें बंड, खंडेराव फडकेकृत इंग्लंडचा इतिहास, हरि केशवजीकृत इंग्रजांचा इतिहास, कोल्हापुरचा इतिहास, मिसर (इजिप्त) देशाचा इतिहास, रूसदेशांतील क्याथराईन राणीचें राज्य, जनार्दन रामचन्द्रकृत (भारतीय) कविचरित्र, विष्णु मोरेश्वर भिडेकृत सायरसचें चरित्र, विष्णुशास्त्रीकृत नानाफडणवीसाचें चरित्र, भास्कर हरि भागवतकृत राजामोहनरायाचें चरित्र, इत्यादि ग्रंथ छापून बाहेर पडले.

इ.स. १८६६-१८७५ पर्यंत प्रसिद्ध झालेले ग्रंथ.

इ० स० १८६६ पासून १८७५ पर्यंतच्या दहा वर्षांत एकंदर, १,५३० मराठी ग्रंथ छापून प्रसिद्ध झाले. ह्यांत ५७१ नवीन पुस्तकें असून, ४१३ जुनें ग्रंथ छापविलें, आणि सुमारें ५४६ भाषांतरें करण्यांत आलीं.

इ० स० १८७६ ते १८८५ पर्यंतच्या दशकांत, २७७२ पुस्तकें छापलीं. परंतु, तत्संबंधी अवश्य तो अन्य तपशील उपलब्ध नसल्यामुळें, तो देतां येत नाहीं.

इ. स. १८७५-८५ पर्यंतचे ग्रंथ.

इ० स० १८८६ पासून १८९५ पर्यंतच्या दहा वर्षांत २,७९८ ग्रंथ छापण्यांत आले. ह्यापैकीं, अदमासें दोन हजार नवीन पुस्तकें असून, ७७९ भाषांतरें, व १९ दुसरे छापून काढलेले जुने ग्रंथ होते.

इ. स. १८८६-९५ पर्यंतचे ग्रंथ.

ह्या कालांत, म्हणजे इ० स० १८६६ ते १८९५ पर्यंतच्या तीस वर्षांच्या अवधींत, महाराष्ट्रांतील पुराण आणि प्रसिद्ध कवींचीं बहुतेक सर्व काव्यें छापून बाहेर पडलीं, व त्यांतील रसास्वाद घेण्यास प्रत्येकाला चांगली सवड मिळाली. सबब, ह्या दृष्टीनें विचार केला तर, हें एक महत्कार्यच झालें, असें म्हणण्यास बिलकूल हरकत नाहीं. कारण, ही कविमाला खरोखरच नांवाजण्यासारखी असून, तशी अन्यत्र कोठेंही बहुतकरून दृष्टीस पडावयाची नाहीं. आणि म्हणूनच, त्यांचें पुनरुज्जीवन झाल्यानें, केवळ देशाच्या व राष्ट्राच्या कार्यालाच हातबोट लागलें, असें म्हणणें प्राप्त येतें.

इ. स. १८६६-९५ पर्यंतच्या तीस वर्षांतील ग्रंथप्रसिद्धि.

हे कवी म्हटले म्हणजे, मुकुन्दराज, ज्ञानेश्वर, नामदेव, जनाबाई, एकनाथ, मुक्तेश्वर, तुकाराम, रामदास, वेणूबाई,

वामन, मिराबाई, रंगनाथस्वामी, श्रीधरस्वामी, सरस्वती, अमृतराय, रघुनाथ पंडित, महीपति, मोरोपंत, रामजोशी, आनन्दतनय, भैरवनाथ, शिवदास, प्रभाकर, अनन्तफन्दी, होनाजी, सगनभाऊ, असे होत; आणि ह्यांनीं आपापल्यापरी महाराष्ट्र भाषेवर सुरेख अलंकार चढविलेले असल्यामुळें, त्यांच्या कृती जगापुढें आणणें अत्यन्त महत्वाचें होतें.

सदरहू कवींचा आमच्या स्वतंत्र राज्यांत उदय.

ह्या सुमनोहर कविमालिकेवर दृष्टि देतांना, वाचकांनीं एक विशेष मुद्याची गोष्ट फारच लक्षांत ठेविली पाहिजे. ती ही कीं, सदरहू कवी, महाराष्ट्रांत आमचें स्वतंत्र राज्य असतांनाच उदयास आले होते. आणि त्यानंतर, म्हणजे आमच्या स्वराज्याची व स्वातंत्र्याची राख रांगोळी झाल्यावर, ज्ञानेश्वर, तुकाराम, रामदास, इत्यादींच्या तोडीचा एकही कवि झाला नाहीं. फार तर काय सांगावें, पण, आमचें पूर्वीचें काव्यतेज, ती सहज स्फूर्ति, आणि ती अपूर्व दीप्ति, यांचा सांप्रतकाळीं लेशमात्रही कोठें दिसत नाहीं. अर्थात्, पारतंत्र्यानें तें सर्व कांहीं नष्टच झालें. पुढें,

---

१ ही गोष्ट नामदार न्यायमूर्ति रानडयासारख्या इतिहासज्ञांस आणि विचारशील गृहस्थांस सुद्धां कबूल करावी लागते. ते म्हणतात,

"By the side of the works of these ancient poets, we can hardly name any of those, who have distinguished themselves in this department of Marathi literature, since the British conquest of the Deccan. Somehow, the Poetic fire has become extinct with the loss of political power.

(The Growth of Marathi Literature.)."

स्वातंत्र्यविरहानें ह्मणा, अथवा तज्जन्य तीव्र दुःखानें ह्मणा, किंवा अन्य कोणत्याही कारणानें ह्मणा, आमचा महाराष्ट्र देश आंग्लसत्तेखालीं गेल्यावर, आमचा तो तीव्र काव्यौघ समूळ आटला, आणि आमच्या कवनस्फूर्तीला खरोखरच ओहोट लागली. तथापि, अशा स्थितींतही, आंग्ल सहवासानें विद्येची चळवळ आमच्यांत ज्यास्त सुरू झाली, एवढी गोष्ट मात्र, अगदीं कृतज्ञतापूर्वक आम्ही मोठ्या आनंदानें कबूल करतों.

सदरहू दशत्र्यांतील आधुनिक काव्यकार.

असो. इ० स० १८६६ पासून इ० स० १८९९ पर्यंतच्या काळांत, आमच्यांपैकीं ज्यांनीं ज्यांनीं म्हणून काव्यविषयक थोडा बहुत तरी प्रयत्न केला, त्याबद्दलचा उपलब्ध असलेला अवश्य तितका वृत्तान्त येथें देतों. रा. रा. महादेव मोरेश्वर कुंटेकृत श्री शिवाजी काव्य, डा. कान्होबा रणछोड कीर्तिकरकृत इन्दिरा; हें राजपुत्री (प्रिन्सेस्) नांवाच्या आंग्लकाव्याचें महाराष्ट्राभरणांतच शृंगारलेलें काव्य होय, असें ह्मणण्यास हरकत नाहीं; सांगलेकृत ख्रिस्तस्तोत्र, भास्कर दामोदरकृत रत्नमाला, जुवेकरकृत कृष्णा कुमारी, वामन दाजी ओककृत काव्यमाधुर्य, बाबा प्रधानकृत दैवसेनी, चिंतामण पेठकरकृत गंगावर्णन, महाजनीकृत कुसुमांजलि, वासुदेव शास्त्री खरेकृत यशवन्त महाकाव्य, इत्यादि. याखेरीज, शंकर मोरो रानडे; ओक; गोविन्द वासुदेव कानिटकर, रिसबूड, मोगरे, लोण्ढे, निम्तुरे, लेंभे, भांडारे, इत्या-

दींचेही लहान लहान चुटके बरेच चांगले उतरलेले असल्याचें दिसतें. परंतु, ह्यांपैकीं कोणांतही मुकुन्दराजाची सहजस्फूर्ति व सरलता; ज्ञानदेवाची व्यंजकता आणि मर्मज्ञता; नामदेवाचा काव्यौघ व प्रेमरस; एकनाथाची सतेजता आणि काव्यदीप्ति; मुक्तेश्वराचें नैसर्गिक माधुर्य व रसिकता; तुकारामाचें नैतिकस्फुरण आणि तादात्म्य; रामदासाचे अपूर्व वाग्बाण व अलौकिक अन्तर्दृष्टि; वामनाचें विचारगांभीर्य आणि वाग्विभव; श्रीधराची वर्णनशैली व प्रसाद; अमृतरायाचें पदलालित्य आणि रसज्ञता; मयूराचें भाषावैदग्ध्य व सुरम्यवैचित्र्य; महिपतीची उत्कट भक्ति आणि चारुमुग्धता; रामजोशाचा तीव्राघात व सहजविलास; अनन्तफन्द्याचें सौरभ्य आणि कोमलता; इत्यादि गुण कोठें देखील दृग्गोचर होत नाहींत.

ह्या कालांत आम्हांस मिळालेलें नेत्रांजन.

असो. ह्याच कालांत, महाराष्ट्र वाङ्मयाच्यासंबंधानें दुसरी ही एक महत्वाची गोष्ट घडून आली; व त्याचा परिणाम असा झाला कीं, आमच्या राष्ट्राला आपलें पूर्वस्वरूप अंशतः तरी दृष्टीस पडून, त्यावेळचें वैभवही त्यांच्या डोळ्यांसमोर तत्काल दिसूं लागलें. इतकेंच नव्हें तर, त्यायोगानें आम्हाला सुरेख नेत्रांजन मिळून, आमचा सारासार विचार जागृत झाला, आणि आमची झोंप सुध्दां थोडीबहुत उडाली. कारण, आमचें पूर्वींचें स्वातंत्र्य व सांप्रतचें पारतंत्र्य, यांत जमीन अस्मानाचें अंतर भासमान झालें. प्रथमचें स्वराज्य आणि नन्तरचें

परराज्य, यांतील भेद दृष्टीस पडत चालला. अगोदरचें माहेरपण व नंतरचा सासुरवास, यांत अंतर दिसूं लागलें. प्राक्कालीन स्वेच्छाचार आणि सांप्रतचें दासत्व, यांचा अनुभव आला. पूर्वीचें प्रभुत्व व आतांची सेवाहीनता, हीं विपरीत वाटूं लागलीं. प्रथमची पुष्टता आणि नन्तरची क्षीणता, यांची तुलना करण्यास साधन मिळालें. आणि पूर्वींची अतुल संपत्ति व हल्लींचें अठराविस्वें दारिद्य, यांनीं तर सूर्य व जयद्रथ प्रत्यक्षच दाखविला. त्याकारणानें, महाराष्ट्र साम्राज्याचा इतिहास पाहण्याकडे प्रमुख विद्वानांचें आणि देशभक्तांचें मन वेधलें जाऊन, त्यांनीं ऐतिहासिक लेख, चरित्रात्मक वृत्तान्त, व देशोन्नतिकारक काव्यकलाप, इत्यादि छापविण्याचा उपक्रम चालविला.

काव्येतिहाससंग्रहाचा उपक्रम.

इ० स० १८७९ सालीं, रा. रा. जनार्दन बाळाजी मोडक, बी. ए. आणि रा. रा. काशिनाथ नारायण साने, बी. ए; यांनीं काव्येतिहाससंग्रह नांवाचें एक फारच महत्वाचें मासिक सुरू करून, त्यांत बखरी वगैरे ऐतिहासिक लेख, महाराष्ट्र कविता, व संस्कृतकाव्य, इत्यादि छापून प्रसिद्ध करण्याचें मनांत आणिलें. हें काम सदर्हू विद्वानांनीं मोठ्या परिश्रमानें, नेटानें, आणि बऱ्याच खर्चानें, सुमारें बारा वर्षेंपर्यंत चालविलें. परंतु, पुढें, केवळ दामाजीपंतांचेंच साहाय्य नसल्यामुळें, तें निव्वळ बंद करावें लागलें, ही खचितच मोठ्या दुर्दैवाची गोष्ट होय. ह्या संग्रहांत, ऐतिहासिक ग्रंथ सुमारें चाळीस आल्याचें कळून

येतें; व त्यांत महाराष्ट्रसाम्राज्यांतल्या ठळक ठळक गोष्टी फारच मार्मिकपणानें लिहिलेल्या असल्याचें दिसतें.

अन्य ग्रंथांचा उदय.

ह्याखेरीज दुसऱ्याही कित्येक गृहस्थांनीं विशेष परिश्रम करून, महाराष्ट्र वाङ्मयांत बरीच भर पाडली असल्याचें आढळून येतें. कारण, रा. रा. गुप्ते यांनीं परभू मंडळीचा इतिहास लिहिला. रा. रा शंकर तुकाराम शाळिग्राम यानीं ऐतिहासिक पवाडे छापले. कांहींनीं विंचूरकर, दाभाडे, आंग्रे, नागपूरकर भोंसले, शिन्दे, होळकर, गायकवाड, इत्यादि सरदारांच्या घराण्यांची हकीकत प्रसिद्ध केली. आणि रा. वासुदेवशास्त्री खरे राहणार मिरज, रा. पारसनीस राहणार सातारा, व रा. आपटे आणि राजवाडे राहणार पुणें, यांनींही पेशवाईतल्या जुन्या बखरी, कैफीयती, व कागदपत्रें, इत्यादि छापून प्रसिद्ध करण्याचा उपक्रम चालविला.

इ० स० १८६५–९६ पर्यंतचा आहवाल.

इ० स० १८६९–७३ आणि इ० स० १८८४--९६ पर्यंतचा बावीस वर्षांच्या अवधींत, सुमारें ७७९ ग्रंथांचीं मराठींत भाषान्तरें झालीं. यांपैकीं, १७ चरित्रें. ४८ नाटकें. ११३ कादंबऱ्या किंवा कल्पितकथा. २६ इतिहास. १९ भाषाविषयक ग्रंथ. १२० कायद्याचीं पुस्तकें. ३० वैद्यकीय ग्रंथ. ८ राजनीतीचीं पुस्तकें. ४० आध्यात्मिक ग्रंथ. ९२ धर्मविषयक ग्रंथ. ६२ शास्त्रविषयात्मक पुस्तकें. २ प्रवासवर्णनें. ३६ काव्यें. आणि २१० किरकोळ ग्रंथ होते. मात्र, ह्यांत संस्कृतां-

तून मराठींत झालेलीं भाषांतरें १६० असून, इंग्रजींतून मराठींत झालेलीं भाषान्तरें १२० होतीं.

आतां, इ० स० १८१८-९६ पर्यंतच्या ७९ वर्षांतला एकंदर अहवाल पाहिला, तर त्यांत खालीं लिहिलेले ग्रंथ प्रसिद्ध झाल्याचें दिसून येतें. म्हणजे, ज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथ, तुकाराम, रामदास, वामनपंडित, जयरामस्वामी, बुद्ध, शंकराचार्य, राजाराममोहनराय, बाळाजी विश्वनाथ पेशवे, बाजीराव पेशवे, महादजी शिन्दे, मल्हारराव होळकर, नाना फडणवीस, अहिल्याबाई, हरिपंत फडके, परशुरामभाऊ पटवर्धन, बापू गोखले, अकबर, औरंगझेब, कोलंबस, रूसदेशाची क्याथराईनराणी, पीटर, नेपोलियन, डिमाँस्थिनीज, साँक्रेटीज, शिकन्दर, जाँर्ज वाशिंगटन्, बेन्जामिन्फ्रांकलिन्, लिंकन्, गार्फील्ड, लाँर्ड क्लाइव्ह, सर टाँमसमन्रो, आनि विझांट्, ब्रॉड्लॉ, डाक्तर लिव्हिंगस्टन्, क्याप्टन् कुक्, काँब्डेन्, गोल्डस्मिथ, सर ऐझाक् न्यूटन्, स्विफ्ट्, बेकन्, विल्यम् पिट, शेक्सपियर, महाराणी व्हिक्टोरिया, इत्यादींचीं चरित्रें; शकुन्तला, मृच्छकटिक, उत्तररामचरित, विक्रमोर्वशी, मुद्राराक्षस, प्रबोधचन्द्रोदय, वेणीसंहार, मालतीमाधव, मालविकाग्निमित्र, रत्नावली, प्रसन्न राघव, हॉम्लेट, सिंबलाईन्, लियर, शेवट गोड, हेमन्तकथा, संभ्रमप्रहसन, कर्कशादमन, व्हेरोनाचे दोन गृहस्थ, व्हेनीसचा व्यापारी, मरजीप्रमाणें, निरर्थक दीर्घयास, सीझर, ऑण्टनी, ओथेल्लो, रिचर्ड, प्रभंजन, रोमिओ आणि

जूलियट्, द्वादशरात्रि, इत्यादि नाटकें; बाण, गुणाढ्य, वेंकटाध्वरी, स्कॉट्, लिटन्, रेनोल्डज्, जॉन्सन, डीफो, स्विफ्ट, बनियन, बोकेशियो, रिनान, डूमॉस, टेलर, इत्यादींच्या कादंबऱ्या व ऐतिहासिक कल्पित कथा; आणि वेताळपंचविशी, विक्रमबत्तिशी, शुकबहात्तरी, इराणी सुरम्य कथा, आरबी सुरम्य कथा, हातिमताई, प्रेमबंधन, विचित्रपुरी, मंजुघोषा, मुक्तमाला, मोचनगड, वेषधारी पंजाबी, अनाथपांडुरंग, नारायणराव व गोदावरी, बाजीराव व मस्तानी, पण लक्षांत घेतों कोण, आजकालच्या गोष्टी, बाजीराव पेशवे, पानपतची मोहीम, इत्यादि कल्पित व ऐतिहासिक गोष्टी, एलफिन्स्टनकृत हिंदुस्थानचा इतिहास, ग्रॅण्ट डफकृत महाराष्ट्र देशाचा इतिहास, मरेकृत भरतखंडाचा इतिहास, हंटरकृत भरतखंडाचा इतिहास, इराण, ईजिप्त, कार्थेज, तुर्कस्थान, प्राचीनफ्रान्स, स्पानिशमूरलोक, जर्मनी, आसीरिया, रोम, रशिया, इत्यादि इतिहास; शब्दव्युत्पत्ति, भाषा, निबंध, व्याकरणें, वगैरे भाषाविषयक ग्रंथ; स्मृतिग्रंथ, अदालतींचे ठराव, व सरकारानें वेळोवेळीं मंजूर केलेले कायदे; वाग्भट, वैद्यदर्पण, शस्त्रवैद्यक, वैद्यकल्पतरु, वैद्यकसंग्रह, शार्ङ्गधर, इत्यादि वैद्यक ग्रंथ; राजधर्म, इंग्लंडचा विस्तार, पौरस्त्य आणि पाश्चात्य ग्रामसंस्था, वगैरे राजनीतीचे ग्रंथ; वेदार्थयत्न, छान्दोग्य, नारायण, ऐतरेय, तैत्तिरीय, ईशावास्य, इत्यादि उपनिषदें; षडदर्शनचिंतनिका, भागवतपुराण, मत्स्यपुराण, गणेशपुराण, अद्वैतमीमांसा, धर्ममीमांसा,

वगैरे अध्यात्म व धर्मग्रंथ; कृषिकर्मविद्या, जीवनशास्त्र, नीतिशास्त्र, न्यायतत्व, वेदांगज्योतिष, ज्योतिर्विलास, शास्त्ररहस्य, आत्मनीतीचीं तत्वें, नीतिसिद्धान्त, सूपशास्त्र, इत्यादि शास्त्रीय पुस्तकें; दक्षिणचा प्रवास, विलायतचा प्रवास, पंडिता रमाबाईचा प्रवास, वगैरे प्रवास वर्णनें; आणि विचार रत्नाकर, सद्वर्तन, मधुमक्षिका, शिरस्तेदार, ब्राह्मण आणि त्यांची विद्या, निबंधमाला, संसारसुख, इत्यादि विविधविषयात्मक ग्रंथ, सदरहू कालांतच प्रसिद्ध झाले.

इ० स० १८९७ सालांत ग्रंथ.

इ० स० १८९७ सालांत, एकंदर मराठी ग्रंथ १४७ छापण्यांत आले. ह्यांपैकीं, २७ पद्यात्मक पुस्तकें, १२ चरित्रें, ८ नाटकें, १३ कल्पित कथा, ४ ऐतिहासिक ग्रंथ, ४ कायद्याचीं पुस्तकें, १ राजनीति, ४ आध्यात्मिक ग्रंथ, ६ धर्म पुस्तकें, २ शास्त्रीय ग्रंथ, ९ कलाविषयक पुस्तकें, १ प्रवासवर्णन, आणि ९९ शालोपयोगी व किरकोळ पुस्तकें, अशीं होतीं.

सदरहू पद्यात्मक पुस्तकांत, केशव सदाशिव रिसबूडकृत शिवचरित्र खेरीज करून, बाकीच्यांत वाङ्मयाच्या दृष्टीनें कांहीं विशेष लिहिण्यासारखें दिसत नाहीं. चरित्रांपैकीं, चाडेकरकृत अकबरचें चरित्र, नाटेकरकृत एल्फिन्स्टनचें चरित्र, विनायक कोंडदेव ओककृत राजादिनकररावाचें चरित्र, व धनुर्धारीकृत प्रौढप्रतापानिधि माधवराव पेशव्याचें चरित्र, हीं नमुद करण्याजोगीं आहेत. नाटकांत, संगीतसीताशुद्धि हें पौराणिक नाटक काशीबाई

फडके हिनें लिहिलें असून, तें बरेंच चटकदार आहे; आणि रेगेकृत सत्वशील श्रीमती नाटकांतही कांहीं कल्पकता दिसते. कल्पितकथांत, नांवाजण्यासारखें पुस्तक एकही आढळून येत नाहीं. चार ऐतिहासिक ग्रंथांपैकीं, तीन महत्वाचें असून, एक शालोपयोगी आहे. आध्यात्मिक व धर्मग्रंथांत रा० रा० फडके, बी. ए. आणि दीक्षितकृत भाषान्तरें उपयुक्त आहेत. शास्त्रीयग्रंथांत रा० शंकर बाळकृष्ण दीक्षित यांनीं केलेलें भारतीय ज्योतिःशास्त्र हें फारच महत्वाचें व विशेष उपयोगी आहे, यांत अगदीं शंका नाहीं. कारण, ह्यांत भरतखंडांतील ज्योतिःशास्त्राचा साद्यन्त इतिहास, पौरस्त्य आणि पाश्चात्य विद्येच्या तुलनेनें, अनेक ग्रंथांचें परिशीलन करून दिला आहे. त्याचप्रमाणें, विठ्ठल बाळकृष्ण भाटे, बी. ए. यांनीं लिहिलेलें जीवितशास्त्र, व रा० महादेव शिवराम गोळे एम. ए., यांनीं भूगर्भशास्त्र, ज्योतिःशास्त्र, उद्भिद्विद्या, आणि पदार्थविज्ञानशास्त्र, यांजवर लिहिलेले पाठ, हीं सर्व फारच उपयुक्त आहेत. कलाविषयक पुस्तकांत, भुजंगराव रामचंद्र मानकर यांची लघुलिपि, व शिंपी नांवाचें पुस्तक संग्रहणीय आहे. याखेरीज, अन्य पुस्तकांबद्दल कांहीं विशेष रीतीनें लिहिण्यासारखें नाहीं.

इ० स० १८९८ सालांत ५ चरित्रें, ८ नाटकें, २ कल्पितकथा, ६ इतिहास, १ अर्थशास्त्रविषयक पुस्तक, ३ कलाविषयक निबंध, ४ आध्यात्मिक

इ० स० १८९८ सालीं महाराष्ट्र वाङ्मयांत पडलेली भर.

ग्रंथ, आणि ३ शालोपयोगी व किरकोळ पुस्तकें प्रसिद्ध झालीं. ह्यापैकीं, चरित्रात्मक लेखांत, १ गौतमबुद्ध, २ मध्वाचार्य, ३ अहल्याचरित्रकाव्य, ४ अकबर, आणि ५ संगीत लघु-टिळकचरित्र, अशीं पांच असून, त्यांपैकीं पहिलें व चौथें हीं साधारण बरीं आहेत. नाटकांत लोकमतविजय आणि मणिबंध हीं देखील कांहीं बरीं दिसतात. कल्पितकथांत, आनन्दाश्रम हें बंगाली कादंबरीचें भाषांतर आहे, व उद्यांवरची गोष्ट हें दिनावधींचा दुष्ट परिणाम कथन करणारें आत्मवृत्तच असल्याचें दिसतें. इतिहासांत फक्त दोनच ग्रंथ विशेष महत्वाचे आणि नांवाजण्यासारखे आहेत, असें सरकारी रिपोर्टर व अन्य गुणिजन म्हणतात. संपात्तिकथा-वलि हें अर्थशास्त्रावर लहानसें पुस्तक असून, हें इंग्रजी अस्सलावरून रचलेलें आहे. कलाविषयक पुस्तकांत १ चित्रकला, २ तरणकला अथवा पोहोण्याची विद्या, आणि ३ विणकाम व शिवणकाम, हीं नवीन शिकणारास उप-युक्त आहेत. ह्याखेरीज, अन्य ग्रंथांत विशेष कांहीं दिसत नाहीं.

इ. स. १८९९ व १९०० सालच्या माहितीची अपूर्तता.

आतां, इ. स. १८९९ सालीं प्रसिद्ध झालेल्या ग्रंथाची सरकारी नोन्द आह्मांला मिळाली नसल्यामुळें, ह्या वर्षाचा तपशील देतां येत नाहीं. आणि इ. स. १९०० सालापासून तर, अशा प्रकारच्या पुस्तकांसंबंधीं सरकारी दफतरांतला आहवाल पूर्वीप्रमाणें जाहीर रीतीनें प्रसिद्ध होण्याचा अजिबात बंदच झाला असल्याचें कळून येतें. तेव्हां, सदरहू कारणानें ह्या

सालची साद्यन्त हकीकत समजण्याससुद्धां बिलकूल साधनच नाहीं. सबब, त्याबद्दल आह्मांस दिलगिरी वाटते. तथापि, ह्या दोन्ही सालांत, मराठी ग्रंथांचा चांगला प्रसार होत गेला, व महाराष्ट्र वाङ्मयाची अभिवृद्धीच झाली, असें वाटतें. मात्र, सांप्रतच्या भयंकर ग्रंथिरोगामुळें, त्याच्या वाढीस कांहीं अंशानें तरी खचितच प्रतिबंध झाला असावा, असें मानण्यास बलवत्तर कारण मिळतें.

सदरहूवरून महाराष्ट्र वाङ्मयाची खरी योग्यता समजण्यास मार्ग.

असो. याप्रमाणें, मराठी भाषेच्या प्रौढावस्थेंतील चतुर्थ कालांतलें अवश्य तितकें विवेचन झाल्याकारणानें, इ० स० १८१८ पासून इ० स० १९०० पर्यंतच्या त्र्यांयशी वर्षांच्या मुदतींत, महाराष्ट्र वाङ्मयाची अभिवृद्धि कोणत्याप्रकारें, कशी, आणि किती अंशानें झाली, याची कल्पना सहजीं होण्यासारखी आहे. अर्थात्, त्यावरून, आमची महाराष्ट्र ग्रंथसंपत्ति नानाविध, विशाल, विचित्र, व उदार असून, सांप्रतकाळीं तर ती खचितच चांगल्या नांवारूपास येऊं लागली आहे, असें वाचकांच्या ध्यानांत येईल. शिवाय, तिच्यांत दिवसानुदिवस नवीन नवीन भर एकसारखी पडत गेल्यामुळें, तिची शनैः शनैः अभिवृद्धीच होऊन, तिच्यांत प्रागल्भ्य व प्रसाद, माधुर्य आणि मोहकता, पदलालित्य, व रमणीयता, वैचित्र्य, आणि व्यंजकता, इत्यादि वाङ्मयाचे अवश्य ते गुण आपोआपच ज्यास्त प्रमाणानें येत चालले आहेत, याबद्दलची लेशमात्रही शंका नाहीं.

तिच्या योग्यतेनुरूप, तिचा विद्यापिठांत शिरकाव व्हावा एतदर्थ, नामदार रानड्यांचे प्रयत्न.

तेव्हां, अशा प्रकारची खरी वस्तुस्थिति असल्याकारणानें, आमची प्राचीन काळापासून विशेष नांवाजलेली ही महाराष्ट्र भाषा, केवळ एकाद्या पोरक्या पोराप्रमाणें अगदींच निराश्रित राहूं नये म्हणुन, आणि हरएक प्रयत्नानें, व कोणत्या तरी उपायानें, तिचा विद्यापिठांत अवश्य तो प्रवेश जरूर व्हावा एतदर्थ, इ० स० १८९८ सालीं, कै० नामदार न्यायमूर्ति महादेव गोविन्द रानडे यांनीं, इ० स० १८१८ पासून तों तहत इ० स० १८९६ सालापर्यंतच्या एकुणऐंशी सालांत, जितके जितके म्हणून नूतन किंवा प्राचीन ग्रंथ मराठींत छापण्यांत आले, त्या सर्वांचा एकंदर आहवाल तयार करून, तो विद्यापीठाधिकारी यांजपुढें, बाबदवार तपशिलासहित, मोठ्या मार्मिकतेनें मांडला; आणि महाराष्ट्र वाङ्मयांत भिन्न भिन्न विषयांवर कोणकोणते ग्रंथ उत्तमोत्तम आहेत, व त्यांत किती वैचित्र्य आणि कसें सौरभ्य आहे, हें देखील त्या समवेतच त्यांनीं दाखविलें. इतकेंच नव्हें तर, त्यासंबंधाची हकीकत अगदीं खात्रीपूर्वक कळण्यासाठीं, आणि ती प्रत्येकास सर्व प्रकारें विश्वसनीय वाटून, विद्यापीठानें देखील तिचा सर्वतोपरी अंगिकार करावा एतदर्थ, सदरहू सर्व ग्रंथांचें योग्य परीक्षण नामांकित विद्वान, रसिक ग्रंथकार, व मर्मज्ञ गुणदोषविवेचक, यांजकडून त्यांनीं मुद्दाम करविलें, आणि तद्विषयक त्यांचे तपशीलवार अभिप्रायही मागितले.

मराठी ग्रंथासंबंधीं त्यांनीं विद्वान लोकांकडून मागितलेले अभिप्राय.

तदनन्तर, एकंदर सामग्री सिद्ध होऊन, सर्वांकडून अवश्य तो खुलासा आल्यावर, नामदार मजकूरनीं त्याची निवड केली; आणि ज्या ग्रंथांच्या उत्कृष्टतेसंबंधीं पांच व पांचाहून ज्यास्त अशा विद्वान, रसिक, मर्मज्ञ, आणि नामांकित गुणज्ञांचे अभिप्राय पडले, ते सर्व ग्रंथ विषयानुक्रमानें लावून, त्यांची नांवनिशिवार यादी, पूर्वोक्त आहवालास जोडली; व उपलब्ध असलेल्या यच्चावत् तपशिलासहित, ती त्यांनीं विद्यापीठापुढें ठेविली.

त्यांच्यामतें मराठींतील उत्कृष्ट ग्रंथांची यादी.

ह्या यादींतील ग्रंथ खालीं लिहिल्याप्रमाणें होत.

काव्य.

१ नलोपाख्यान.	रघुनाथ पंडितकृत.
२ रामविजय.	श्रीधर कविकृत.
३ हरिविजय.	श्रीधर कविकृत.
४ महाभारत.	मुक्तेश्वरकृत.
५ केकावलि.	मोरोपंतकृत.
६ महाभारत.	मोरोपंतकृत.
७ यथार्थदीपिका.	वामनकृत.
८ ज्ञानेश्वरी.	ज्ञानदेवकृत.
९ भागवत.	एकनाथकृत.
१० अमृतानुभव.	ज्ञानदेवकृत.
११ लावण्या.	रामजोशीकृत.
१२ दासबोध.	रामदासकृत.
१३ मनाचे श्लोक.	रामदासकृत.
१४ अभंग गाथा.	तुकारामकृत.

१५ राजा शिवाजी. कुंटेकृत.
१६ पवाडे. शंकर तुकाराम शालिग्राम यानीं छापलेले.
१७ गंगावर्णन. चिन्तामणि पेठकरकृत.

चरित्रें.

१८ एकनाथ. सहस्रबुद्धेकृत.
१९ संभाजी व राजाराम. भागवतकृत.
२० राणी लक्ष्मीबाई. पारसनिसकृत.
२१ आनन्दीबाई जोशी. बाई कानिटकरकृत.
२२ सॉक्रेटीज. चिपळूणकरकृत.
२३ नाना फडणीस. वासुदेवशास्त्री खरेकृत.
२४ परशुरामभाऊ पटवर्धन. निगुडकरकृत.
२५ जॉर्ज वॉशिंग्टन्. रानडेकृत.
२६ महादजी शिन्दे. नातूकृत.
२७ पृथ्वीराज चव्हाण. गोपाळराव हरि देशमुखकृत.

इतिहास.

२८ संयुक्तसंस्थानें. पंडिता रमाबाई.
२९ पेशव्यांची बखर. सोहोनीकृत.
३० भाऊसाहेबांची बखर. कर्त्याचें नांव कळत नाहीं.
३१ मराठ्यांचा इतिहास. ग्रॉण्टडफकृत इतिहासाचें भाषांतर.

कादंबऱ्या.

३२ मी.
३३ आजकालच्या गोष्टी. } हरि नारायण आपटेकृत.
३४ पण लक्षांत कोण घेतो!
३५ अनाथ पांडुरंग.
३६ प्रेमबंधन, योगीकृत.
३७ ठगाची जबानी. बर्वेकृत.

३८ बाजीराव पेशवे. } नागेशराव बापटकृत.
३९ पानपतची मोहीम. }
४० मुक्तमाला. हळवेकृत.
४१ मोचनगड. गुंजीकरकृत.

नाटकें.

४२ कादंबरी. देवलकृत.
४३ जयपाल. } विनायकराव कीर्तनेकृत.
४४ थोरले माधवराव पेशवे. }
४५ विकारविलसित. आगरकरकृत.
४६ मृच्छकटिक. }
४७ विक्रमोर्वशीय. } परशुरामपंत गोडबोलेकृत.
४८ वेणीसंहार. }
४९ उत्तररामचरित्र. }
५० त्राटिका. केळकरकृत.
५१ शाकुन्तल. किर्लोस्करकृत.

शास्त्रग्रंथ.

५२ ज्योतिर्विलास. शंकरराव दीक्षितकृत.
५३ अनेकविद्यामूलतत्त्वें. कृष्णशास्त्री चिपळूणकरकृत.

निबंध आणि प्रवास.

५४ बेकनूचे लेख. वागळेकृत भाषांतर.
५५ निबंधमाला. विष्णुशास्त्री चिपळूणकरकृत.
५६ रासेलस्. बापटकृत भाषान्तर.
५७ भारतीय साम्राज्य. नाना पावगीकृत.
५८ विलायतचा प्रवास. रावजी पावगीकृत.
५९ धोम महाबळेश्वर. उद्‌दासकृत.
६० केसरींतील निबंध. आगरकरकृत.

अशा प्रकारें, सर्व सिद्धता झाल्यावर, मराठी, गुजराथी,

विद्यापीठाधिकाऱ्यास विज्ञापना.

कानडी, आणि हिन्दी, या प्राकृत भाषांचा प्रवेश विद्यापीठांत होण्याच्या संबंधानें, ज्या ज्या अडचणी व हरकती यापूर्वी आणि ह्यावेळीं रुजू करण्यांत आल्या, त्या त्या ऐकून घेऊन, त्या सर्वांचा विचार न्यायमूर्ति रानड्यांनीं फारच दूरवर दृष्टीनें केला. आणि विद्यार्थ्यांवर ज्यास्त अभ्यासाचा बोजा न पडावा एतदर्थ, व ज्या लोकांस स्वतःची देशी भाषा मुळींच नाहीं, त्यांस देखील सदरहू भाषांचा विद्यापीठांत प्रवेश झाल्यानें कोणत्याही प्रकारची नड येऊं नये म्हणून, मराठी, गुजराथी, कानडी, आणि हिन्दी, या भाषा बी. ए., व एम. ए., च्या परिक्षेंत वैकल्पिक विषय समजून दाखल कराव्या, अशी एक सूचना त्यांनीं विद्यापीठाधिकारी यांस केली; व आपल्या प्रतिपादनाच्या पुष्टीकरणार्थ, विद्यापीठाच्या एकंदर चौपन सदस्यांचे (फेलोंचे) अभिप्राय घेऊन, हें सर्व प्रकरण विद्यापीठाचे उपाध्यक्ष (चान्सेलर) जे नामदार न्यायमूर्ति क्याण्डी, त्यांजकडे तदनुकूल विचारार्थ पाठविलें.

तिचा परिणाम, व देशी भाषांचा विद्यापीठांत प्रवेश.

त्यानन्तर, इ० स० १८९९–१९०० या दोन सालांत त्याबद्दलचा अवश्य तो विचार होऊन, इ० स० १९०१ सालीं, जानेवारी महिन्याच्या २९ तारखेस विद्यापीठाची मंजुरी मिळाली, आणि मराठी, गुजराथी, व कानडी, या तीन देशी भाषांचा त्या भव्य मंदिरांत, सरकारच्या शेवटल्या

हुकमानें, एकदांचा शिरकाव झाला. आतां, फक्त एम. ए. च्या परिक्षेसाठींच, सदरहू भाषांतील कांहीं ग्रंथ निवडण्याचें ठरलें आहे, ही गोष्ट अवश्य ध्यानांत ठेविली पाहिजे. तथापि, " अल्पारंभाः क्षेमकराः । " हें मनांत आणून, आमच्या मराठीस, आणि गुजराथीस व कानडीस, मुंबईच्या विद्यापीठांत स्थळ मिळाल्याबद्दल, आपण त्या संस्थेचे व सरकारचे फारच आभार मानिले पाहिजेत.

भाग ९१ वा.

मराठी भाषेची प्रौढावस्था—चतुर्थकाल.

सिंहावलोकन.

मराठी भाषेच्या प्रौढावस्थेंतील महत्वाच्या गोष्टी. मराठी भाषेच्या प्रौढा-वस्थेंतल्या चतुर्थ कालां-तील महत्वाच्या गोष्टी.

मराठी भाषेच्या प्रौढावस्थेंतील चतुर्थ कालांतल्या किल्येक गोष्टी चांगल्या ठळक ठळक असल्याकारणानें, त्या निः-संशय चिरस्मरणीय आणि विशेष ध्यानांत ठेवण्यासारख्या आहेत. सबब, त्या सर्वांचें विहंगम-दृष्ट्या अवलोकन करून, त्यांतच ज्या दुसऱ्या महत्वाच्या अशा अनेक गोष्टींचा अन्तर्भाव होतो, त्या देखील वाच-कापुढें यथावकाश मांडण्याचा आमचा विचार आहे.

आतां, हा चतुर्थ काल इ० स० १८१८ पासून तों इ० स० १९०० पर्यंतचा असल्याचें, वाचकाच्या ध्यानांत आहेच, अशी आम्ही कल्पना करतों. (मागील पान ३३६ पहा). तेव्हां, ह्या कालावर आपण बरीच दूरदृष्टि दिली, व तद्विषयक सूक्ष्म विचार केला, ह्मणजे आपलें मन मुख्यत्वें-करून पांच गोष्टींनींच वेधलें जातें, यांत संशय नाहीं.

ह्या पांच गोष्टी खालीं लिहिल्याप्रमाणें होतः—

१ महाराष्ट्र साम्राज्याचा ऱ्हास.

२ मराठी भाषेचें तदंगभूत दैन्य.

३ मराठी भाषेचें कालानुसार अवस्थांतर.

४ मराठी भाषेचा अभ्युदय. आणि

९ मराठी भाषेचा विद्यापीठांत प्रवेश.

सबब, ह्या सर्व गोष्टींच्या कार्यकारणांचा विचार करून, तत्संबंधी अवश्य ती हकीकत अगदीं तपशिलवार देतों.

महाराष्ट्र साम्राज्याचा ऱ्हास, व त्याचा मराठी भाषेवर परिणाम.

महाराष्ट्र साम्राज्याच्या ऐन भरभराटींत, वामन, श्रीधर, मयूर, इत्यादि कविवरांनीं आपल्या काव्य लावण्यानें मराठी भाषेला जें विलक्षण ऐश्वर्य आणिलें, तें इ० स० १८१८ सालीं, आमचें महाराष्ट्र साम्राज्य नष्ट होतांच, जणूंकाय त्यांच्या परस्पर आकर्षणशक्तीनें, आपोआप लयास गेलें. त्यामुळें, आमच्या राष्ट्रांतील ती प्रथमची अपूर्व दीप्ति, त्याच्यांतील तो अलोट नैसर्गिक ओघ, आणि त्याची ती सहज कवनस्फूर्ति, हीं अजिबात मावळलीं; व सुमारें पंचवीस तीस वर्षेंपर्यंत, किंबहुना अर्धशतक पावेतों, आम्हीं थोड्याबहुत प्रमाणानें, निव्वळ अज्ञातवासांतच आपले दिवस कंठिले, असेंही म्हणण्यास हरकत नाहीं.

कारण, सुमारें दीडशें वर्षांपेक्षांही ज्यास्त कालपर्यंत आम्ही महाराष्ट्रांत व भरतखंडांत विस्तृत साम्राज्य आणि अप्रतिहत स्वातंत्र्य भोगिलें असून, त्यानंतर केवळ दैवदुर्विपाकानेंच आमच्यावर हें एकाएकीच मोठें अरिष्ट ओढवलें. त्यामुळें, आम्ही अगदीं हतवीर्य व तेजहीन होऊन मृतप्राय झालों; आणि आह्मांला सर्व कांहीं शून्यवत् व कष्टमयच वाटूं लागलें.

तेव्हां, अशा प्रकारची खरी वस्तुस्थिति येऊन ठेपल्यानें, आह्मांस तत्काल दौर्बल्य यावें; आमचें बुद्धिवैभव नष्ट

व्हावें; आमचा उत्साह लयास जावा; व आमचा काव्यनिर्झर समूळ आटावा; यांत नवल तें कोणतें ! अर्थात्, ह्या सर्व कारणांनीं आमच्या महाराष्ट्र भाषेला दैन्य आलें, आणि त्यानें आपला पूर्ण अम्मल कांहीं कालपर्यंत आमच्यावर बसविला, यांत अगदीं शंका नाहीं.

तद्विषयक प्रमाण.

आमचें महाराष्ट्र साम्राज्य, किंबहुना अखिल भारतीय वैभव नष्ट झाल्यावर, त्याचा दुःखदायक, भयंकर, व अवनतिकारक, असा घोर परिणाम आह्मांवर ओढवल्यामुळें, त्यानें आह्मांस सुमारें अर्ध शतकपर्यंत जमीनदोस्त करून, कसें आणि किती बुद्धिमान्द्य आणिलें, ह्याचें प्रत्यक्ष प्रमाण पहावयाचें असल्यास, क्षणभर सरकारी दफ्तरावर दृष्टि दिल्यानेंच, तें आपल्यास तत्काल उपलब्ध होण्यासारखें आहे. सबब, तिकडेच आपण जरासें वळूं.

इ० स० १८१८ पासून इ० स० १८९७ पर्यंत, एकंदर चाळीस वर्षांचे जे आहवाल मराठी भाषेच्या संबंधानें प्रसिद्ध झाले आहेत, त्यांवरून खालीं लिहिलेल्या प्रत्येक दहा वर्षांत, मराठी ग्रंथ किती बाहेर पडले, किंवा छापण्यांत आले, हें सहजीं कळून येतें.

इसवी सनाचें साल.	प्रसिद्ध झालेली ग्रंथसंख्या.	शेरा.
१८१८—१८२७	३	हे आंकडे व इतर माहिती नामदार न्यायमूर्ति कै० रानडे यांच्या "महाराष्ट्र वाङ्मयाची अभिवृद्धि" नामक लेखावरून घेतलेली आहे.
१८२८—१८३७	१३	
१८३८—१८४७	३०	
१८४८—१८५७	१०२	
एकूण वर्षें ४०	ग्रंथ १४८	

त्यावरून सिद्ध झालेली गोष्ट.

याप्रमाणें, आमच्या दिगन्त कीर्तींच्या, व बुद्धिवैभवशील महाराष्ट्रीयांच्या सतेज शिरःकमलांतून, आणि त्यांच्या अतुल व अक्षय्य वैदग्ध्यभांडारांतून, फक्त एकशें अठ्ठेचाळीस ग्रंथच कायते एकंदर चाळीस वर्षांत बाहेर पडले, असें उघड होतें. अर्थात्, प्रत्येक वर्षाला सरासरीनें तीनच ग्रंथ आमच्या जित प्रजेनें जगापुढें ठेविले; आणि त्यावरून, नष्ट वैभवाचा दुष्ट परिणाम ह्या प्रिय महाराष्ट्रावर किती भयंकर प्रमाणानें घडून आला, हें सप्रमाण दाखविलें.

मराठीच्या प्रसारार्थ आंग्लप्रभूंचे उद्योग, व त्यांचा परिणाम.

तथापि, आमचा सर्व मुलूख इंग्रजांच्या ताब्यांत इ० स० १८१८ सालीं गेल्यावर, आह्मांस पाश्चात्यपद्धतीप्रमाणें शिक्षण देण्याचा उपक्रम त्यांनीं लागलींच चालविला; व ठिकाठिकाणीं शाळा स्थापन करून, त्यांत निरनिराळ्या विषयांवर भिन्न भिन्न पुस्तकें, इंग्रजींतून भाषान्तरें करवून, चालविलीं. त्याचप्रमाणें, संस्कृतांतल्या कित्येक गद्यपद्यात्मक कृतींस महाराष्ट्र आभरणांत सजवून, हे अभिनव ग्रंथ सुद्धां तयार झाले. त्यामुळें, कालान्तरानें, महाराष्ट्र वाङ्मयावर कांहीं परिणाम होऊन, त्याचें शनैः शनैः अवस्थान्तर होत चाललें.

मराठी भाषेंत अन्य सामग्रीची भर

अशा प्रकारें, महाराष्ट्राचें स्थित्यन्तर कालानुरूप होत असतां, राजकारणानें, सामाजिक उन्नतीनें, राष्ट्रान्तर्गत नैसर्गिक दीप्तीनें, लोककल्याणेच्छेनें, साहस-

बुद्धीनें, आणि स्वभावज ज्ञानार्जनप्रीतीनें, कित्येक अनुकूल गोष्टी एकसारख्या घडून आल्या. त्यामुळें, आमच्या महाराष्ट्र वाङ्मयांत फारच महत्वाच्या सामग्रीची चांगली भर पडून, त्या योगानें त्याला दिवसानुदिवस अधिकाधिक तेज येत चाललें, व त्याच्या अभ्युदयाचीं सुचिन्हें बरींच दिसूं लागलीं.

या सामग्रीचा तपशील.

आमच्या आंग्ल प्रभूंनीं महाराष्ट्र भाषोन्नत्यर्थ प्रथमपासूनच स्तुत्य प्रयत्न चालविले, आणि त्यांनीं तिला प्रसंगानुसार प्रोत्साहनही दिलें. त्याचप्रमाणें, श्रीमंत सयाजीमहाराज गायकवाडासारख्या विद्याविभूषित महाराजांनीं, परकी भाषेंतील अनेक उपयुक्त ग्रंथांत महाराष्ट्राभरण्यांतच मोठ्या खर्चानें व प्रयत्नानें सजविण्याचें श्रेय घेतलें. काव्येतिहाससंग्रह कर्त्यांनीं पुराण ग्रंथ आणि मराठे शाहींतील अमूल्य बखरी, मोठ्या धैर्यानें, उदारबुद्धीनें, स्वार्थत्यागानें, व श्रमसातत्यानें छापविल्या. बळवंतराव दाभोळकरासारख्यांनीं फारच उपयुक्त असें ग्रंथप्रकाशनाचें काम मोठें साहस करून हातीं धरिलें. बडोद्यांतील ग्रंथप्रसारक मंडळींनीं देखील हेंच स्तुत्य व महत्कार्य अगदीं झपाट्यानें अजूनही चालविलें आहे. आणि अन्य देशभक्तांनीं सुद्धां, हें राष्ट्रोन्नतीचें व भाषाभ्युदयाचें काम केवळ निरपेक्षबुद्धीनेंच आपल्या शिरावर घेऊन, तें मोठ्या नेटानें सुरू केलें आहे. ह्याखेरीज, लोकांत आणि महाराष्ट्रांत विद्याभिरुचि उत्पन्न करण्यासाठीं, कित्येक तरुण,

होतकरू, व विद्वान मंडळींनीं, ठाणें, पुणें, मुंबई, वगैरे ठिकाणीं ग्रंथसंग्रहालय, किंवा सरस्वतीमंदिर, इत्यादि संस्था काढून, महाराष्ट्र भाषेची सेवा मोठ्या आदरानें आणि प्रेमानें चालविली आहे.

त्याचा परिणाम, व इष्ट फळाची किंचित् प्राप्ति.

याप्रमाणें, १ राजाश्रय, २ लोकाश्रय, ३ राष्ट्रकल्याणेच्छा, ४ मातृभाषाप्रेम, व ५ नैसर्गिक ज्ञानार्जनप्रीति, इत्यादींचें अंशतः सहाय्य मिळाल्या कारणानें, महाराष्ट्र वाङ्मयाचा कांहींसा अभ्युदय जवळ आला; आणि न्यायमूर्ति रानडयांच्या अश्रान्तश्रमानें, त्याचा किंचित् प्रवेश विद्यापीठांतही होऊन, एम. ए. च्या परीक्षेसाठीं, मराठी भाषेची योजना झाली. (मागील पान ३९१ पहा.)

आपली इतिकर्तव्यता,

परंतु, एवढ्यानेंच झालें नाहीं. इतक्यानेंच आपली इतिकर्तव्यता आटोपली नाहीं. आणि किंचित् यश मिळालें म्हणून, महाराष्ट्र भाषोन्नत्यर्थ आपले प्रयत्न देखील शिथिल करण्याची सोय नाहीं. कारण, एक तर, आम्ही आपल्या मायभाषेसाठीं, यापेक्षांही शतपटीनें ज्यास्त परिश्रम करावयास पाहिजे होते; व ते आह्मीं अजूनसुद्धां केवळ मनोभावानें आणि प्रेमपूर्वक सतत चालविलेच पाहिजेत. दुसरें

१ ही ज्ञानार्जनाची गोडी आमच्या किंचित् भाग्योदयानें, आमच्यांत बरीच वाढूं लागल्याचें दिसतें. कारण, त्यामुळें, आमच्या भारतीय स्त्रियांस देखील विद्येची अभिरुचि लागून, त्यांनीं नांवाजण्यासारखे ग्रंथ केले आहेत. (मागील पान ३८८ पहा)

असें कीं, आपल्या ह्या प्रिय महाराष्ट्र वाङ्मयाला, संस्कृतासारखी चारुता, व्यंजकता, व प्रौढता आली पाहिजे. ह्या दौहित्रीला मातामहाची योग्यता अवश्य आणिली पाहिजे. आणि आपली मायभाषा इंग्रजीच्या तोलाला येईल, अशी तिला रत्नखचितशब्दमौक्तिकांनीं श्रृंगारलीच पाहिजे.

व तद्विषयक जागृतीची आवश्यकता.

अर्थात्, श्रमसातत्याशिवाय, ही गोष्ट साध्य नाहीं. अहोरात्र, व एकसमयावच्छेदेंकरून झटून पडल्याखेरीज, आपणांस यश मिळणेंही शक्य नाहीं. आणि देशकार्यार्थ हाडाचीं काडें करून तीं झिजविल्यावांचून, भाषेचा अभ्युदय होण्यास मार्गच नाहीं. यासाठीं, मत्प्रियबांधव हो!

उत्तिष्ठत जाग्रत प्राप्य वरान्निबोधत।

(कठोपनिषद्. १. ३. ४.)

भाग ९२ वा.

मराठी भाषेच्या संबंधानें आमचें शैथिल्य, आणि त्याचा विघातक परिणाम.

सांप्रतच्या कालांत आमच्या मायभाषेच्या संबंधानें आमचें औदासिन्य.

सांप्रतच्या प्रगतीच्या कालांत, प्रस्तुत उन्नतीच्या सुसंस्कृत परिवेष्टनांत, व ह्या उत्साहशीलतेच्या उदात्तशतकांत, आम्ही आपल्या प्रत्यक्ष मायभाषेसंबंधीं देखील जी शिथिलता दाखवीत आहोंत; किंवा, त्या बाबतींत ज्या भीरुत्वाचा आम्ही यथेष्ट स्वीकार केला आहे; अथवा, त्या संबंधानें आम्ही अतिनिंद्य औदासिन्याचें जें मनःपूत अवलंबन चालविलें आहे; तें पाहून, कोणासही निस्सीम खेद व परम आश्चर्य वाटल्यांवाचून खचितच राहणार नाहीं.

परकी भाषेंत चाललेल्या लोकशिक्षणामुळें, झालेला तोटा, व त्या बाबतींत आम्हीं केलेली डोळेझांक.

हल्लीं, भरतखंडांतील उच्च प्रतीचें सर्व प्रकारचें शिक्षण परकी भाषेंतूनच चालतें, ही गोष्ट प्रमाणसिद्ध असून, त्याचा अनुभव देखील आबालवृद्धांस आहे. अर्थात् त्यामुळें, आमच्या महाराष्ट्र वाङ्मयाला आणि इतर देशीभाषांस विद्यापीठांतून एम. ए. खेरीजकरून, अजिबात फांटा

मिळतो; त्याच कारणानें, आमची गुरुतर हानि होते; त्या योगानेंच आमची अवनति होऊं पाहते; व तेणेंकरूनच आमच्या इतिकर्तव्यतेचा आह्माला विसर पडतो; इत्यादि महत्वाच्या गोष्टींकडे आम्हा भारतीयांचे लक्ष्य, अवश्य तेवढें आणि एकसमयावच्छेदेंकरून, बिलकुल वेधलें जाऊं नये, याविषयींचें खरोखरच नवल वाटण्यासारखें आहे!

त्याचा परिणाम.

परकी भाषेचा अभ्यास विदेशीय भाषेच्या द्वारेंच आम्हांला करावा लागतो; आणि हा जबरदस्त बोजा केवळ आमच्या शक्तीबाहेरचाच असल्याकारणानें, तो कसाबसा तरी उचलण्यास, आह्मांला अश्रान्त परिश्रम व जीवापाड मेहनत अगदीं रात्रंदिवस करणें भाग पडतें. शिवाय, त्यांतही, हा दुःसह भार उचलण्याचें आमच्या कपाळीं केवळ बाल्यावस्थेपासूनच आल्यानें, आमच्या दुःखास खचितच पारावार नसतो. कारण, हा तीव्र जीवनकलह, जसा कांहीं हात धुऊनच आमच्या पाठीशीं लागलेला असल्यामुळें, एकंदर कष्टासमवेत ह्या संसारचक्राची माळही आमच्या गळ्यांत, अकालींच पडलेली असते. तेव्हां, अशाप्रकारें आमच्या संपूर्ण अवनतीची यच्चावत् सामग्री एकदम सिद्ध होऊन, त्याचा घोरतर परिणाम केवळ एका विशिष्ट व्यक्तीवर किंवा समाजावर न होतां, तो आमच्या सर्व देशास, आमच्या यच्यावत् राष्ट्रास, आमच्या निरपराधी अर्भकांस, आणि आमच्या सकल जीविताचे व आशेचे केवळ आधारस्तंभच असें जें आमचें होतकरू तरुणमंडळ, त्यांस देखील निष्कारण भोगावा

लागतो. इतकेंच नव्हें तर, ह्या भयंकर, व अरिष्टकारक सत्राचा निव्वळ कळस व परमावधिच होता, असेंही ह्मणणें प्राप्त येतें. कारण, शिक्षणभार असह्य झाल्यानें, ज्यांचा निभाव लागेनासा होतो, ते आपले हातपायच टेंकतात, आणि शेवटीं निरुपाय होऊन, मृत्यूच्या विक्राळ दंष्ट्रेंत मात्र अचानक पडतात.

तत्संबंधी उदाहरणें व त्यांच्या कारणांचा तपास.

कांहीं वर्षांमागें, रा० धुंडिराज[1] आगाशे, रामचन्द्र[2] विष्णु गोखले, लक्ष्मण[3] रामचन्द्र वैद्य, विठ्ठल[4] विष्णु गोखले, वा[5]मन शिवराम आपटे, नामदार काशिनाथ[6] त्र्यंबक तेलंग, इत्यादि तरुण गृहस्थ, विद्यापीठ-पार मोठ्या थाटानें पडल्यावर, आपल्या तीव्र आणि अ-पूर्व बुद्धीचा परिमल सर्वत्र सोडून, तिचा प्रकाश पाडतात न पाडतात, इतक्यांत त्यांजवर निर्दय मृत्यूनें अकालिक झडप घातल्यामुळें, ते हं हं ह्मणतां, आणि पटापट् यमस-दनास गेले. त्यावेळीं, ह्या दुःसह व देशविघातक परिणा-माचें बीज काय असावें, तें शोधून पाहण्यास्तव, आमचे

---

१ एम. ए. जगन्नाथ शंकरशेट संस्कृत सीनियर स्कॉलर.

२ एम. ए; एल. एल. बी; ॲड्व्होकेट; फेलो इत्यादि.

३ एम. ए; एल. एल. बी; भगवानदास संस्कृत स्कॉलर; सी-नियर दक्षिणा फेलो.

४ एम. ए; एम. डी.

५ एम. ए. सुपरिंटेंडण्ट, न्यू इंग्लिश स्कूल, पुणें.

६ एम. ए; एल. एल. बी; ॲडव्होकेट; हायकोर्टजज्ज; मुंबई.

अग्रणी आणि दूरदर्शी कैलासवासी नामदार न्यायमूर्ति रानडे, यांनीं त्याबद्दलची खरी माहिती विद्यापीठांतून व इतर ठिकाणांहून आणवून एकत्र जमविली; आणि ती सुशिक्षित जनसमूहापुढें साधक बाधक कारणांसहित यथास्थित मांडून, लोकमत जागृत करण्याचा त्यांनीं फारच स्तुत्य व निःसंशय अनुकरणीय प्रयत्न केला. परंतु, इतकें असूनही, त्याचा ह्मणण्यासारखा काडीमात्र देखील उपयोग झाला नाहीं, याबद्दल वाईट वाटतें.

देशी भाषा विद्यापीठांत प्रविष्ट होण्याविषयीं, कांहीं उदारधीचे परिश्रम.

तथापि, रावसाहेब वामन आबाजी मोडक, नामदार न्यायमूर्ति महादेव गोविंद रानडे, इत्यादि गृहस्थांनीं देशीभाषांच्या संबंधानें आपली इतिकर्तव्यता पूर्णपणें बजावून, भारतीयांचे कल्याण, आणि महाराष्ट्र व इतर देशी भाषांची उन्नत्ति व्हावी एतदर्थ, त्यांनीं फारच परिश्रम घेतले आणि भगीरथ प्रयत्न केले, यांत अगदीं संशय नाहीं. सबब, त्याबद्दल आपण त्यांचे केवळ कृतज्ञतापूर्वकच बहुत आभार मानले पाहिजेत. मात्र, त्यांच्या दीर्घ प्रयत्नांस इ० स० १९०० अखेरपर्यंत यत्किंचित देखील यश आलें नाहीं, याबद्दल जेवढें म्हणून वाईट वाटावें तेवढें थोडेंच.

त्यांचा उपक्रम.

मराठी वाङ्मयांस व इतर देशी भाषांस विद्यापीठांत स्थळ मिळावें, म्हणून त्यांनीं खटपट चालवून, हा प्रश्न इ० स०

---

१ ही गोष्ट अगदीं ताजी असल्यामुळें, ती आमच्या वाचकांच्या ध्यानांत खचित असेल, अशी आम्हांला आशा आहे.

१८६२ सालीं प्रथमतः पुढें आणिला. परंतु, त्या वेळीं त्याचा कांहींएक उपयोग न झाल्यामुळें, इ० स० १८६३ सालीं, त्याची त्यांनीं पुनश्च सुरुवात केली. त्यानंतर, सुमारें दोन तपें ह्मणजे चोवीस वर्षेपर्यंत, हें घोंगडें तसेंच भिजत पडून, इ० स० १८८८ सालीं, दैवयोगानें, त्याच्या पुनरुज्जीवनाचीं कांहीं चिन्हें दिसूं लागलीं. ह्या वर्षी, संस्कृता-प्रमाणेंच मराठी व इतर भाषांची देखील विद्यापीठांत गणना व्हावी, व ह्या भाषांतील एकादें तरी पुस्तक परीक्षेंतील विषयांत असावें, ह्मणून रा० सा० वामनराव मोडकांनीं सूचना आणिल्यावरून, तत्संबंधानें अवश्य तें नियमन होण्यासाठीं, विद्यापीठाकडून एक कार्यसभा (कमिटी) देखील नेमण्यांत आली; आणि न्यायमूर्ति कैलासवासी तेलंग यांनीं ते नियम तयार करून, विद्यापरिषदेपुढें ठेवण्याचेंही अभिवचन दिलें. तदनंतर, ठरल्याप्रमाणें सर्व सिद्धता झाली, व आगाऊ तजवीज केल्याअन्वयें, यच्चावत् सामग्री देखील रुजु करण्यांत आली. परंतु, तेथेंही आमचें दुर्दैवच ओढवलें; आणि युक्तिवादांत कांहीं न्यूनत्व व सांकेतिक गौणत्व आल्यानें, त्या वेळीं सुद्धां हरिः ॐ फसच झालें.

प्रथमतः, ह्या महत्वाच्या वादविवादाची तारीख १२ सप्तेंबर सन १८८९ रोजीं नेमिली होती, आणि ह्या वेळीं आमच्या देशी भाषांचें दैव कदाचित् उघडेल, असेंही सर्वांस वाटत होतें. कारण, त्यावेळीं, एकंदर लोकमत ह्या प्रश्नाला बरेंच अनुकूळ होतें, व तसें मानण्याला बलवत्तर

कारणही[१] दिसून येतें. तथापि, विद्यापीठांत तद्विरुद्धच मत-बाहुल्य झाल्यानें, ह्या डावांत सुद्धां आह्मांस हारच आली, व आमच्या देशीभाषा विद्यापीठारूढ व्हावयाच्या असतां, त्या बिचाऱ्या तशाच अनाश्रित राहिल्या.

त्यापासून झालेला कार्यभाग, व त्याची निष्फळता.

पुढें इ० स० १८९४ सालीं, न्यायमूर्ती रानड्यांनीं देशी भाषांचा प्रश्न पुनश्च विद्यापीठापुढें आणिला. ह्यावेळीं विद्यापरिषदानें त्यांची सूचना तर मान्यच केली. परंतु, त्यायोगानें, विद्यार्थ्यांच्या अभ्यासाचा बोजा जास्त वाढेल; आणि

---

१ ह्या संबंधानें पुणें सुधारक यांचा लेख फारच महत्वाचा आहे. सबब, त्यांतील अवश्य तितकें अवतरण येथें देतों. ते ह्मणतातः–

"We appeal once more with all our earnestness, to every individual member of the Senate to bear in mind that nothing less than the fate of Western education in this Presidency, depends on the vote he will give day after to-morrow. The 12th of September will indeed be a memorable day in the annals of the University. If our men cheerfully respond to the call of duty on that day, a glorious future for the people of this Presidency will be ensured. If, on the other hand, they allow paltry considerations to stand between them, and the performance of that duty, it will be a practical admission of the contemptible selfishness of our character, and a formal renunciation, at least for the present, of all hopes of national greatness."

(The Sudharak, or the Reformer. 10th Sept. 1889.)

वाङ्मयाची अभिवृद्धि न होतां, ज्यांना स्वतःची देशी भाषाच नाहीं, त्यांच्या बद्दलचा प्रश्न मात्र वादग्रस्तच राहील; हा युक्तिवाद लढवून, विद्यापीठानें देशी भाषांस त्यावेळीं सुध्धां अर्धचंद्रच दिला.

नामदार रानड्यांचें प्रयत्नसातत्य, व त्यास अंशतः यश.

त्यानंतर, इ. स. १८९८ सालीं, न्यायमूर्ति रानड्यांनीं देशीभाषांचा प्रश्न पुनश्च विद्यापीठापुढें आणिला, व पूर्वीं आलेल्या हरकतींचें सर्व तऱ्हेनें निरसन आणि उलगडा करून, त्याला निर्वेधता प्राप्त व्हावी या हेतूनें, त्यांनीं असें सुचविलें कीं, बीए. आणि एम्. ए. च्या परीक्षेंत, देशीभाषा, ह्मणजे मराठी, गुजराथी, कानडी, व हिंदुस्थानी, ह्या वैकल्पिक, अथवा आवडीच्या, किंवा स्वेच्छानुसार घेण्याच्या समजून, त्या द्वितीय भाषेंत दाखल कराव्या. त्यानन्तर, त्याचा योग्य तो विचार होऊन, इ. स. १९०१ सालीं जानेवारी महिन्याच्या २९ व्या तारिखेस, मराठी, गुजराथी, आणि कानडी भाषा, एम्. ए. च्या परीक्षेसाठीं, विद्यापिठांत दाखल करण्याचा ठराव झाला, व त्याला सरकारची देखील मंजुरी मिळाली. (मागें पान ३९०-९१ पहा).

त्यांचें अनुकरण केल्यास, महाराष्ट्री व इतर देशीभाषांची भावीउन्नति.

अर्थात्, ह्याबद्दल आपण सरकारचे बहुत उपकार मानले पाहिजेत. तथापि, ह्या परिणामाचें सर्व श्रेय कै० नामदार न्यायमूर्ति रानडे यांसच दिलें

---

१ ह्यावेळीं, देशीभाषा विद्यापीठांत प्रविष्ट होण्याबद्दलचीं मतें ३४ असून, तद्विरुद्ध ४२ होतीं.

पाहिजे, असेंच म्हणणें प्राप्त येतें. आणि ह्यांच्यासारखेंच प्रयत्नसातत्य जर आमच्या सर्व विद्वान व होतकरू मंडळीनें चालविलें, तर प्रवेश (ह्मणजे पी) परीक्षेपासूनही आमची महाराष्ट्रभाषा, आणि इतर देशीभाषा, विद्यापीठांत मोठ्या थाटानें चमकूं लागतील, व त्यांची उन्नति झाल्यावांचून खचितच राहणार नाहीं.

भाग ९३ वा.

मराठी भाषोन्नत्यर्थ उचित उपाय.

मराठी भाषेच्या उन्नतीचीं साधनें.

ह्या भागांत, मराठी भाषेची उन्नति कशा प्रकारच्या साधनांनीं होण्यासारखी आहे, आणि त्यासंबंधानें कोणकोणते उपाय योजिले पाहिजेत, याविषयींचा विचार करण्याचें आमच्या मनांत आहे.

कोणत्याही भाषेच्या उन्नतीचीं खरीं साधनें ह्मटलीं म्हणजे, मुख्यत्वेंकरून खालीं लिहिलेलींच होत, अशी आमची अल्प समजूत आहे.

१ काव्य अथवा पद्यात्मक वाङ्मय.
२ लौकिक गद्यग्रंथ.
३ गद्यपद्यात्मक श्रेणी.
४ ऐतिहासिक लेख.
५ शास्त्रविषयक ग्रंथ.
६ मनोवेधक कल्पितकथा.
७ भाषेचा साद्यन्त इतिहास.
८ धार्मिक ग्रंथ.
९ नीतिविषयक ग्रंथ.
१० विद्यापीठांत[१] भाषेचा प्रवेश.
११ तद्वारें लोकशिक्षण. आणि
१२ राजाश्रय.

---

१ विद्यापीठ म्हणजे विश्वविद्यालय किंवा युनिव्हर्सिटी होय.

आतां, सदरीं नमूद केलेली प्रत्येक बाब भाषोन्नतीच्या कामीं कशी उपयोगी पडते, व तिला किती साहाय्य करते, हें आपण लक्ष्यपूर्वक पाहूं.

काव्य अथवा पद्यात्मक वाङ्मय.

१ काव्य हें षड्रसांचें जीवन, स्फूर्तीचें धाम, आणि सरस्वतीचें केवळ मंगलस्थानच होय. त्यामुळें, पद्यात्मक वचोविन्यांस हे आपल्याला नेहेमींच सुरम्य व विचित्र भासतात. इतकेंच नव्हें तर, त्यांतील वाङ्माधुर्याचा आपल्या हृत्पटिंकेवर तत्काल व श्रेयस्कर संस्कार होतो. फार तर काय सांगावें, पण, हें काव्य जितकें उदात्त आणि उच्च प्रतीचें असतें, तितकेंच तें आपल्या हृदयारविन्दाला एकदम प्रफुल्लित करून, अज्ञानतमाला अगदीं जाळून टाकतें.

त्याचा परिणाम.

अशाप्रकारें, काव्यरचनेचा खरा महिमा ह्याच असल्यामुळें, तो वाङ्मयाला सर्वतोपरि अलंकृत करतो, यांत तर कांहींच नवल नाहीं. पण, त्यायोगानें, एकंदर राष्ट्रांत एका प्रकारची विलक्षण स्फूर्ति उत्पन्न होऊन, त्याच्या मानसिक ओघाला व बुद्धिप्रवाहाला फारच सुरेख वळण मिळतें. तेव्हां, असले काव्यरसात्मक ग्रंथ झाल्यानें, भाषेला प्रौढता येते; तिला सहजींच उदात्तता प्राप्त होते; आणि त्यायोगानेंच ती श्रेष्ठस्थानाप्रत जाऊन पोहोंचते; यांत लेशमात्रही शंका नाहीं.

महाराष्ट्रांतील ज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथ, मुक्तेश्वर,

तुकाराम, रामदास, वामन, श्रीधर, महिपति, मयूर, इत्यादि कविमुकुटमण्यांनीं, महाराष्ट्र वाङ्मयावर फारच मनोहर भूषणें चढविलीं; व त्यामुळेंच ही मराठीभाषा इतक्या नांवारूपास आली.

ह्या नांवाजलेल्या रत्नांनन्तर, आमच्या महाराष्ट्र भूमींत, लहान मोठे कवी आतांपर्यंत बरेच उदयास आले. परंतु, त्यांच्या तोडीचें एकही कविरत्न हा कालपावेतों महाराष्ट्र क्षितिजावर चमकलें नाहीं, हें मोठें आश्चर्य होय. तथापि, मराठी भाषेच्या सांप्रतच्या अभिवृद्धींत, अशीं उज्ज्वलरत्नें लवकरच उदयास येतील, अशी आम्हांला बळकट आशा आहे.

गद्यात्मक रचना, व तिचा कार्यभाग.

२ गद्यात्मक रचनेनें, वाङ्मयाला पुष्कळच मोकळेपणा येऊन, यथेष्ट भ्रमण करण्याला चांगला अवकाश सांपडतो. कारण, तींत छन्दोनियमन, किंवा प्रासबंधन, इत्यादि कारणांनीं, मतिवैचित्र्य अथवा स्फूर्तिप्रवाह बिलकुल कुंठित न होतां, तो आपल्या शक्त्यनुसार दाही दिशांत मनसोक्त हिंडून, इच्छित कार्यभाग साधतो. अर्थात्, अशा तऱ्हेच्या गद्यात्मक ग्रंथांनीं भाषेस चांगलें वैभव प्राप्त होतें, हें नव्यानें खचितच सांगावयास नको.

हल्लीं. महाराष्ट्रांत गद्यग्रंथांचा उद्भव झपाट्यानें सुरू असून, त्यांत अवश्य तें विषयवैचित्र्य देखील पुष्कळच दिसून येतें. सबब, ह्या गद्यमय संपत्तीमुळें, आमच्या मराठी वाङ्मयाचा प्रवेश[1] विद्यापीठांतील सर्व परीक्षेंत आतां लवकरच होईल, अशीं सुचिन्हें भासमान होऊं लागलीं आहेत.

---

१ मराठी, गुजराथी, आणि कानडी, या भाषांचा विद्यापीठांत

 (पुढें चालू)

गद्यपद्यात्मक ग्रंथ व त्यांचा संस्कार.

३ गद्यपद्यात्मक ग्रंथांनीं देखील वाङ्मयास विशेष मनोहरत्व येतें, यांत बिलकुल संशय नाहीं. कारण, त्यांत नाटकासारख्या फारच चटकदार विषयांचा अन्तर्भाव होत असून, भिन्न भिन्न रुचींच्या सर्व लोकांस एकसारखी प्रिय होणारी, अशी नाटकाखेरीज दुसरी वस्तूच नाहीं. आणि ह्याच कारणासाठीं, कालिदासासारख्या कविश्रेष्ठानें देखील, नाटयाचें अत्यन्त गौरव केलेलें दिसतें. ह्यासंबंधानें, हा कविकुलावतंस असें म्हणतो कीं,

देवानामिदमामनंति मुनयः कान्त क्रतुं चाक्षुषं
रुद्रेणेदमुमाकृत व्यतिकरेस्वांगे विभक्तं द्विधा ।
त्रैगुण्योद्भवमत्रलोकचरितं नानारसं दृश्यते
नाट्यंभिन्नरुचेर्जनस्य बहुधाप्येकं समाराधनम् ॥

(मालविकाग्निमित्र. अंक १ ला.)

भावार्थः—ज्या नाटयाला भरत, मतंग, इत्यादि रसिक मुनी देखील, देवादिकांच्या नेत्रकमलांचें पारणें

(मागील पृष्ठावरून पुढें चालू.)

तारीख २९ जानेवारी इ० स० १९०१ रोजीं प्रवेश होऊन, त्या गोष्टीला सरकारची देखील मंजुरी मिळाली, असें हल्लीं कळून येतें. मात्र, त्या मंदिरांत, एम. ए. च्या परीक्षेसाठींच त्यांची योजना असल्यामुळें, त्यापासून इच्छित कार्यभाग लवकर होण्यासारखा नाहीं. सबब, आतां अव्वलपासून अखेरपर्यंत, ह्याच देशी भाषा अवश्य शिकण्याच्या विषयांत नमुद् केल्यानें, राष्ट्राचें खरें हित, देशाचें कल्याण, व भाषांची उन्नति होणारी आहे. यासाठीं, तत्प्राप्त्यर्थच आम्ही अहोरात्र झटलें पाहिजे.

फेडणारा एक चित्ताकर्षक यज्ञच समजतात. जें श्रीशंकरानें सुद्धां, लास्यतांडवरूपानें निजांगांत द्विधा केलेलें दिसतें. ज्यांत, अखिल मानवांचें त्रिगुणात्मक चरित्र, नानाविध रसांनीं केवळ भरलेलें असल्याचेंच भासमान होतें. तें अपूर्व नाटच, भिन्न भिन्न प्रकृतींच्या व निरनिराळ्या अभिरुचींच्या माणसांस देखील, एकसारखेंच आल्हादकारक वाटतें.

प्रस्तुत काळीं, अशाप्रकारच्या नाटयात्मक ग्रंथांची आमच्या महाराष्ट्र वाङ्मयांत पुष्कळच भर पडत चालली आहे, ही खचितच मोठ्या आनन्दाची गोष्ट होय. ह्याची खरी अभिरुचि आधुनिक संततीस आण्णा किर्लोस्करांनींच लाविली; आणि त्या कामांत त्यांजला चांगलें यशही आलें; याबद्दल त्यांचे निःसंशय अभिनन्दन केलें पाहिजे. तथापि, सहजस्फूर्ति, नैसर्गिक प्रेरणा, मानवी स्वभावाचें मर्मभेदकज्ञान, तत्संबंधीं तादात्म्य, सृष्टिवर्णनात्मक अद्भुत सामर्थ्य, अचाट कल्पना, तिची विलक्षण सौन्दर्य श्री, अप्रतीम बुद्धिवैभव, अपूर्व रसज्ञता, उदात्त विचार, मनोहर भाषासरणी, हृदयद्रावक मनोव्यापार, अलोट कविताशक्ति, रोमांचित रसप्राचुर्य, आणि कमनीय काव्यरचना, हीं पूर्णत्वानें कोठेंही वास करीत असल्याचें भासत नाहीं. सबब, तिकडेच अवश्य तितकें लक्ष्य पुरवून, आम्ही त्या कामांत नांवाजण्यासारखें प्राविण्य मिळविणें नितान्त महत्वाचें आहे.

ऐतिहासिक लेख, व त्यांचें कार्य.

४ ऐतिहासिक लेख हे वाङ्मयाचे केवळ नेत्रच होत, असें म्हणण्यास बिलकुल हरकत नाहीं. कारण, त्यांच्यायोगानेंच गतगोष्टींचा अनुभव येतो. त्यामुळेंच

वर्ज्यावर्ज्य वस्तूंचें खरें इंगित कळतें. त्यामुळेंच पुढल्यास ठेंच लागल्याचें पाहून, मागला शहाणा होतो. त्यायोगा-नेंच आदिस्थितीचें मूळस्वरूप दृष्टीस पडतें. त्यामुळेंच आपला प्रौढ पराक्रम मनांत येतो. त्याकारणानेंच आपली सद्यःस्थिति आपल्या डोळ्यापुढें अगदीं मूर्तिमंत उभी राहते. त्यामुळेंच आपली शारीरिक किंवा मानसिक उन्नति कळून येते. आणि त्यायोगानेंच आपली अवनति किंवा अन्य स्थित्यन्तर दृग्गोचर होतें. इतकेंच नव्हें तर, आपल्या पूर्वजांचे अपूर्व शोध, त्यांचे गहन परिश्रम, त्यांचा शास्त्र-विषयक दीर्घ उद्योग, त्यांचें कलाविषयक ज्ञान, त्यांचें तत्त्वनैपुण्य, त्यांचें पारमार्थिक श्रेष्ठत्व, त्यांची धर्मविष-यक परिपक्वता, त्यांची सामाजिक दूरदृष्टि, त्यांचें व्यव-हारचातुर्य, त्यांचे पवित्र आचार,त्यांचे उदात्त विचार, वगैरे सर्व गोष्टींचें त्यामुळेंच यथार्थ अवबोधन होतें. अर्थात्, अशा प्रकारच्या ग्रंथांनीं वाङ्मयाला चारुता येते. त्यामुळेंच त्याचें प्रागल्भ्य वाढतें. त्यायोगानेंच त्याची उदात्तता वृद्धीप्रत पावते. आणि त्याच कारणानें त्याचा प्रसादही आल्हादजनक होतो.

ऐतिहासिक तत्वाच्या शास्त्रीय पद्धतीस अनुसरून लिहिलेले अशा तऱ्हेचे ग्रंथ आमच्या मराठी भाषेंत फारच थोडे आहेत. किंबहुना, त्यांचा प्रसार नुकताच होऊं लाग-ला आहे, असें म्हटलें असतांही बाध येणार नाहीं. तथापि, त्यांची अभिवृद्धि दिवसानुदिवस लवकर व एकसारखी होत जाईल, अशी आम्ही आशा करतों.

शास्त्रीय ग्रंथ व त्यांचा परीणाम.

५ शास्त्रीय ग्रंथांनीं देखील भाषेंत, विचारव्यक्ततेचें एक प्रकारचें विशेष सामर्थ्य येतें. कारण, त्यायोगानें, नानाविध शब्दांचा उचित संग्रह होऊन, एकंदर वाङ्मयालाच शब्दवैपुल्य प्राप्त होतें. अशा प्रकारच्या ग्रंथांची मराठी भाषेंत बरीच उणीव आहे. सबब, ती पुरी करण्याकडे, आम्ही आपलें लक्ष अवश्य पोहोंचविलें पाहिजे.

कादंबरी व कल्पितकथा, आणि त्यांचा संस्कार.

६ कादंबरी, कल्पितकथा, आख्यायिका, अथवा प्रबंधरचना, इत्यादि सुरम्य अलंकारांची देखील वाङ्मयास खरी आवश्यकता असते. कारण, त्यामुळेंच आपल्या कल्पकतेला यथेष्ट अवकाश मिळून, ती विशाळ, सुसंस्कृत, आणि विभूषित होण्यास उत्कृष्ट संधि सांपडते. फार तर काय सांगावें, पण, काल्पनिक सृष्टि व विलास लावण्य, रमणीयता आणि माधुर्य, सौकुमार्य व सौजन्य, पवित्रता व पापभीरुत्व, इत्यादि मोहक गुण व्यक्त करून, एकंदर जनसमुहास चांगलें वळण लावण्यास सुद्धां, त्यामुळेंच योग्य प्रसंग हातीं येतो, असेंही ह्मणण्यास हरकत नाहीं. अशा प्रकारचे कांहीं ग्रंथ मराठींत आहेत. परंतु, त्यांत ही आणखी सुधारणा होऊन, उदात्त कल्पनेची विशेष भर पडली पाहिजे, असें आम्हास वाटतें.

वाङ्मयाचा इतिहास, व त्याचा उपयोग.

७ भाषेच्या साद्यन्त इतिहासाचा देखील, त्याचप्रमाणें वाङ्मयास निःसंशय विशेष उपयोग होतो. कारण, त्या योगानें आपल्याला अनेक गोष्टी कळून

येतात; आणि त्याच कारणानें, आपल्या एकंदर ज्ञानांत सुद्धां चांगली भर पडते. अर्थात्, भाषा ह्मणजे काय; ती कशी उद्भवली; तिच्यांतील मूळ शब्द कोणते; ते कसे व्यवहारांत आले; त्यांचें ऐतिहासिक बीज केव्हां दृग्गोचर होऊं लागले; मानवी प्राण्याला ह्या शब्दांची आवश्यकता केव्हां भासमान झाली; ही उत्पन्न झालेली अडचण दूर होण्यास्तव त्यानें कोणती तजवीज केली; मायभाषा कोणती; तिच्या शाखा कोणत्या समजावयाच्या; ती उन्नतीप्रत पावली आहे, किंवा तिची अवनत दशाच आहे; इत्यादि गोष्टींचें महत्वाचें ज्ञान, केवळ भाषेच्या साग्र इतिहासामुळेंच होतें, यांत बिलकूल शंका नाहीं.

अशा प्रकारचा वाङ्मयाचा इतिहास आमच्या महाराष्ट्र भाषेंत बिलकुल नाहीं. सबब, ही शोचनीय उणीव भरून काढण्यासाठीं, आमच्यांतील अनेक विद्वज्जनांनीं अश्रान्त परिश्रम करून, उद्योगसातत्यानें मनःपूर्वक झटणें अत्यवश्य आहे.

धर्मग्रंथ व त्यांचा संस्कार.

८ धर्मग्रंथ देखील वाङ्मयाच्या उन्नतीला विशेष कारणीभूत होतात, यांत संशय नाहीं. कारण, त्यायोगानेंच नीतीचा फैलाव होऊन, दुसरे अनेक गुण देखील उदयास येतात. अशा प्रकारचे धर्मविषयक ग्रंथ आमच्या मराठी भाषेंत पुष्कळ आहेत; आणि संस्कृत भाषेंत तर ते संख्यातीत असल्याचेच दृष्टीस पडतें. सबब, त्या सर्वांचा यथोचित उपयोग करून, त्या योगानें आम्हीं आपल्या भावी संततीला धर्मश्रद्धेचा मजबूत पाया, त्यांच्या

व भाषेच्या कल्याणार्थ, सुवेळींच घालून दिला पाहिजे. अर्थात्, तद्विषयक विपुलसामग्री, व तिच्यांतील मूलतत्त्वें, हीं ग्रंथरूपानें त्यांच्या अवलोकनांत सदैव आणून, त्यांचा सुसंस्कार त्यांच्यावर करविला पाहिजे, हें उघड आहे.

नैतिक ग्रंथ, व त्यांचा कार्यभाग.

९ त्याचप्रमाणें, नैतिक ग्रंथांनीं सुद्धां, भाषोन्नतीला मोठा उपयोग होतो, हें निर्विवाद आहे. कारण, त्यामुळें, एकंदर वाङ्मयावर निर्मल व पवित्र संस्कार होऊन, त्याचें ग्राम्यरूप एकदम पालटतें, आणि त्याला भारदस्तपणा सहजीं येतो.

विद्यापीठ, त्याचा उपयोग, व त्याची इतिकर्तव्यता.

१० विद्यापीठ देखील भाषोन्नतीचें एक महत्वाचें साधन आहे, ही गोष्ट कोणाला देखील नाकबूल करवणार नाहीं. निदान, अन्य साधनाभावात्, सांप्रतकाळीं तरी, त्याची योजना शिरोभागींच केली पाहिजे, असें म्हटल्यावांचून आमच्यानें राहवत नाहीं. कारण, विद्यापीठांत प्रवेश झाल्यानेंच भाषेला उत्तेजन मिळतें. इतकेंच नव्हे तर, तिला येथें जितकें प्रोत्साहन मिळण्याचा संभव असतो, तितका अन्यत्र (राजाश्रयाव्यतिरिक्त) कोठेंही नसतो, हें निर्विवाद आहे. सबब, ह्या विद्यापिठानेंच आपली इतिकर्तव्यता बजावून, आमच्या महाराष्ट्र वाङ्मयाला अवश्य तें साहाय्य केलें पाहिजे; आणि तिचा मनःपूर्वक अंगिकार करून, तिचें लालनपालन करण्याचें खरें श्रेय घेतलें पाहिजे.

आतां, ह्या विद्यापीठावर, तदितिकर्तव्यतेचा बोजा अशा प्रकारें लादल्यावर, "विद्यापीठांत प्रविष्ट होण्यासारखी मराठी भाषेची पात्रता आहे किंवा नाहीं," हा सकृद्दर्शनींच एक महत्वाचा प्रश्न उत्पन्न होण्याचा संभव आहे. सबब, तिकडेच क्षणभर वळूं, व त्याबद्दलचा विचार करूं.

विद्यापीठांत प्रविष्ट होण्यासारखी मराठीची पात्रता.

विश्वविद्यालयांत प्रविष्ट होण्यासाठीं, भाषेला जी पात्रता यावी लागते, ती येण्याकरितां कोणकोणत्या गुणांची अपेक्षा असते, हेंच प्रथमतः पाहिलें पाहिजे. ह्मणजे त्यामानानें, आमच्या महाराष्ट्र भाषेची खरी योग्यता कोणाच्याही लक्षांत येण्यास चांगलें साधन मिळून, त्यासंबंधाची शंका देखील सहजीं दूर होईल.

ही पात्रता होण्यास अवश्य ते गुण.

सूक्ष्म विचारानें इतकी गोष्ट कोणालाही कबूल केली पाहिजे कीं, ज्याप्रमाणें राष्ट्रांचें जीवन केवळ धर्मच आहे, त्याचप्रमाणें वाङ्मयाचें जीवन म्हटलें म्हणजे मुख्यत्वेंकरून धर्मग्रंथच होत, यांत संशय नाहीं. अशाच प्रकारच्या धर्मग्रंथांनीं आध्यात्मिक विचाराचें बीजारोपण होतें, आणि त्या योगानेंच नीति वाढून, आम्ही पूर्वी सांगितल्याप्रमाणें, तद्विषयक ग्रंथांतील उदार शिक्षण सर्वांस मिळतें, व त्यांचा एकंदर राष्ट्रावर फारच उत्कृष्ट परिणाम होतो. तेव्हां, भाषेचें श्रेष्ठत्व, अगर वाङ्मयाची

वाङ्मयाचें जीवन. ह्मटलें म्हणजे धर्म व नीतिविषयक ग्रंथ. अर्थात् त्यांचें बाहुल्य हा प्रथम गुण.

पात्रता होण्याला, धार्मिक, आध्यात्मिक, व नैतिक ग्रंथ निःसंशय विशेष कारणीभूत होतात, हें उघड आहे. अर्थात्, असे ग्रंथ आमच्या मराठी भाषेंत खचितच पुष्कळ आणि चांगले आहेत. सबब, विद्यापीठांत तिचा प्रवेश होण्याला हें एक योग्य आणि सबळ कारण आहे, असें ह्मणण्यास कोणतीही हरकत नाहीं.

व्यंजकता हा दुसरा गुण.

दुसरें कारण असें कीं, शब्दबाहुल्य, व्यंजकता, व प्रकाशन, हे महत्वाचे गुण देखील तिच्यांत पूर्णत्वानें वास करतात. आणि ही गोष्ट, नानाविध विचार, हरएक तऱ्हेनें प्रकट करण्याचें जें तिच्यांत सामर्थ्य आलें आहे, त्यावरून उत्तम प्रकारें व्यक्त होते.

ग्रंथवैचित्र्य हा तिसरा गुण.

तिसरें कारण हें कीं, तिच्यांत ग्रंथवैचित्र्य सुद्धां थोडें थोडकें नाहीं. एवढेंच नव्हे तर, तें तिच्यांत केवळ वैपुल्यानेंच दृष्टीस पडतें. सबब, त्यामुळें सुद्धां, विद्यापीठांत प्रविष्ट होण्याला तिची पात्रता निर्विवाद ठरते.

व अपूर्व कल्पकता हा चौथा गुण.

चौथें कारण असें कीं, ग्रंथनिर्माणकौशल्य व अपूर्व कल्पकता, या गुणांचा देखील आमच्या महाराष्ट्र वाङ्मयांत चांगला प्रादुर्भाव झाला असून, ते दिवसानुदिवस अधिकाधिकच वृद्धिंगत होत असल्याचें भासत आहे. सबब, ह्यामुळें सुद्धां, विद्यापीठांत प्रवेश होण्यासारखी मराठी भाषेची पात्रता खचितच असल्याचें सहजीं सिद्ध होतें.

एतद्विषयक पाश्चात्य मताची अपेक्षा करणारांस उत्तर.

आतां, महाराष्ट्र वाङ्मयाच्या पात्रतेसंबंधीं, कोणी कदाचित् पाश्चात्यमताची अपेक्षा करील; यांत अगदीं संशय नाहीं. सबब, ती पुरविण्याकरितां, आपण तिकडेच क्षणभर वळूं, आणि त्याबद्दलचा योग्य विचार करूं.

पाश्चात्यांचे अभिप्राय.

पाश्चात्य विद्वानांत, ज्यांनीं ज्यांनीं ह्मणून मराठी भाषेचें चांगलें परिशीलन केलें आहे, व ज्यांस तिच्यांतील खरें रहस्य आणि अपूर्व रसास्वाद माहीत आहे, असे फारच थोडे आहेत. तथापि, त्यांतच जे कित्येक मर्मज्ञ आहेत, त्यांचें एतद्विषयक कसें मत आहे, तें आपण विहंगमदृष्ट्या पाहूं.

सर. ग्रॅण्ट,

सर. आलेक्झांडर ग्रॅण्ट हा मुंबई इलाख्याचा एक नांवाजलेला विद्याधिकारी होऊन गेला. त्यानें तुकारामाचेंच ज्यास्त परिशिलन केलेलें असल्यामुळें, त्यासंबंधानें तो असें ह्मणतो कीं, तुकारामाच्या काव्यांत अत्यन्त धार्मिक विचार, मार्दव, कारुण्य, आणि कोमलता, हीं चांगलीं व्यक्त होत असून, उदात्तनीति, ईश्वरनिष्ठा, व निःसीम भक्ति, हीं देखील मूर्तिमंत दृष्टीस पडतात. अर्थात्, त्यामुळेंच मराठी वाङ्मयाचा मनोवेधकपणा भासमान होतो, असा त्याच्या ह्मणण्याचा आशय होय.

---

१ ह्यानें एके ठिकाणीं असें लिहिलें आहे कीं,

"If intense personal religion can be found any

(पुढें चालू)

डा. मिचेल, ऑकूवर्थ,

डाक्तर मिचेल हा महाराष्ट्र वाङ्मयाला जागतीज्योत असल्याचें ह्मणतो; व मिस्तर ऑकूवर्थ हा तर ती श्रेष्ठ आणि उदात्त भाषा असल्याचेंच लिहितो.

(मागील पृष्ठावरून पुढें चालू.)

where, it can be found in Tukaram. It is impos sible to avoid comparing his songs with the Psalms of David. * * * Of Tukarama's poetry in general, it may be said, that his thoughts and expressions indicate beyond question, a tenderness, *a high morality*, and a spirituality of devoutness. * * The purpose of the present article is merely to bring to notice, a *literature* which the writer of these pages has *himselj found interesting*. "

(The Bombay Educational Record. vol. III. 1867.)

१ मिचेल म्हणतो,

" The literature of the Maratha people may fairly be denominated *a living literature*. * * * The Maratha country abounds with Bakhars." * * *

२ हा असें लिहितो कीं,

" The works of the principal poets who have *adorned that noble language*, * * * have long been known. * * * The *Marathas are a Nation*; and from the Brahman to the Kunbi, *they glory in the fact*. "

(Journal. Anthropological Society. Bombay. No. IV. vol. II.)

" The second period (of Maratha Literature) is more important than the first. The power of the

(पुढें चालू)

व अन्य भाषाभिज्ञ.

त्याचप्रमाणें, दुसरे कित्येक भाषाज्ञिक सुद्धां, मराठी भाषेची थोरवी व योग्यता चांगल्या प्रकारें जाणून होते. आणि ह्मणूनच जावत्कालपर्यंत त्यांचें चाललें, तावत्कालपर्यंत त्यांनीं तिचा विद्यापीठाकडून आदरच करविला, व तिला ह्या भव्य मंदिरांतच ठेविलें[१]. ह्यावरून तिची योग्यता वाचकाच्या लक्षांत सहजीं येण्यासारखी आहे.

भाषोन्नत्यर्थ तिला उत्तेजनाची अपेक्षा.

पण, ह्याखेरीज, आणखी एक गोष्ट देखील विशेष रीतीनें लक्षांत ठेवण्यासारखी आहे. ती ही कीं, उत्तेजन दिल्याखेरीज कोणतीही भाषा, केव्हांही, पुढें ह्मणून बिलकुल सरसावयाचीच नाहीं; किंवा तिला उन्नति देखील प्राप्त व्हावयाची नाहीं. सबब, विद्यापीठानेंच आपली इतिकर्तव्यता मनांत आणून, मराठी भाषेच्या उन्न-

---

(मागील पृष्ठावरून पुढें चालू.)

Marathas was re-established and consolidated; and their name and language pervaded the length and breadth of the Indian Peninsula; while both *in numbers* and *in merit*, this was the golden age of the Maratha poets."

(Marathi Poetry. December 1891).

१ ह्यासंबंधानें नामदार न्यायमूर्ति रानडे देखील असें म्हणाले कीं, "The advocates of the vernaculars claimed that both Marathi and Gujrathi had a literature and linguistic peculiarities, which deserved special study."

(The Growth of Marathi Literature.
The Times of India. 1898. June.)

त्यर्थ तिला अवश्य तें प्रोत्साहन दिलें पाहिजे. कारण, ह्या जगांतील नांवाजलेल्या सर्व भाषांस, विद्यापीठांतून आणि ज्या त्या सरकाराकडूनच अशा प्रकारची पुष्कळ मदत मिळते, व अनेक तऱ्हेचें साहाय्यही होतें, ही गोष्ट अगदीं विसरतां कामा नये. आतां, कदाचित् ह्या संबंधाचीच कोणाला शंका येण्याचा संभव आहे. सबब, तिचें अगदीं निर्मूलन होण्यासाठीं, मी क्षणभर सद्यःकाळीं सुधारलेल्या अशा युरोपखंडाकडेच वळतों, आणि त्यांतील कांहीं भाषांच्या स्थितीचें दिग्दर्शन करतों.

अन्यत्र तें देण्याचा परिपाठ.

सांप्रतकाळीं, इंग्रजी भाषेचें जें इतकें मोहक स्वरूप आपल्या दृष्टीस पडतें, तें आजकालचें फल नसून, तें प्राप्त होण्याला, आज सुमारें सहाशें वर्षांपेक्षांही दीर्घकालपर्यंत एकसारखा उद्योग, सतत परिश्रम, व पुष्कळ प्रयत्न करावे लागले आहेत, ही गोष्ट आपल्या हृत्पटिकेवर निरंतर खोदून ठेवण्यासारखी असून, ती इतिहासज्ञांस तर सर्व प्रकारेंच महशूर आहे.

त्याचें उदाहरण

चॉसर हा पहिला आंग्ल कवि असल्याविषयीं प्रसिद्ध आहे. हा इ० स० १३४० सालीं जन्मला, आणि इ० स० १४०० मध्यें मरण पावला. अर्थात्, हा कवि क्षितिजावर येऊन, इ० स० च्या चौदाव्या शतकाच्या अखेरीस, त्याजकडून आंग्ल भाषेची प्राणप्रतिष्ठा होईपर्यंत, ही इंग्रजी भाषा अस्तित्वांत देखील नव्हती, असें ह्मटलें तरी चालेल.

कारण, खुद्द इंग्लंडांत, किंबहुना अखिल संयुक्त राज्यांत देखील, ह्मणजे इंग्लंड, स्कॉटलंड, आयर्लंड, आणि वेल्स, यांत कोणतीही ह्मणण्यासारखी अशी एकही भाषा चालू नसून, "गडबडगुंडा" अथवा सेल्टिक, ल्याटिन्, टयूटॉनिक, आंग्ली, साक्सनी, पिक्ट, स्कॉट, ज्यूट, नॉर्मन, फ्रेंच, इत्यादि अठरा धान्यांचें कडबोळेंच प्रचारांत होतें. किंबहुना, ज्याप्रमाणें, वारली, ठाकूर, कातकरी, धनगर, वगैरे रानटी जाति, निरनिराळ्या टापूंत भिन्नभिन्न भाषा बोलतात, व त्यांत सुद्धां कोणाचाच कोणाला मेळ नसतो, त्याचप्रमाणें हल्लींच्या इंग्रजी भाषेची गेल्या चौदाव्या शतकांतली, आणि त्यापूर्वींची स्थिति होती, यांत लेशमात्रही शंका नाहीं.

एवंच, एकना धड आणि भाराभर चिंध्या असल्यामुळें, अनेक सांधे लावून जशी एकादी ठिगळांची गोधडी तयार होते, व ती सर्वत्र फाटकी असल्यानें, तिला जसें कसलेंच रंगरूप नसतें, तद्वतच इ० स० चें

---

१ हा शब्द "आर्यल्याण्ड" ह्मणजे आर्यांची भूमी, याचा अपभ्रंश होय. ग्रंथकर्त्याचें भाषाशास्त्र, पान १७९–८०पहा.

२ टॉमस्. बी. शॉकृत इंग्रजी भाषेचा इतिहास पहा. (पान २९. १८९७.) तो म्हणतो,

"English literature, during this intervening period, was a literature of competing dialects." "Other dialects were still in use." There was "the confusion of dialects which followed the Anglo-Saxon period."

पंधरावें शतक सुरू होईपर्यंत इंग्रजी भाषेचें स्वरूप होतें, ही गोष्ट कोणालाही कबूल केली पाहिजे.

हें अबडधोबड स्वरूप पालटण्यासाठीं, आणि इंग्रजी भाषेची अवदशा घालविण्याकरितां, इंग्लंडांतील अनेक विद्यापीठांस, ह्या भाषेला हरएक प्रकारचें प्रोत्साहन देण्याची खरी आवश्यकता वाटली. इतकेंच नव्हें तर, आपल्या मनोहर मंदिरांत तिचा प्रवेश करवून, तिला त्यांनीं अनन्तहस्तें अपरंपार साहाय्य केलें; व मोठ्या प्रेमानें सर्व प्रकारचें प्रोत्साहन देऊन, तिला हरतऱ्हेनें वाढीस लाविलें. ही गोष्ट त्या देशांतील, आणि युरोपखंडांतील अनेक विद्यापीठांच्या इतिहासावरूनच चांगली निदर्शनास येणारी आहे.

युरोपांतील अन्य भाषांचें पूर्वस्वरूप, व त्यांच्याशीं तुलना.

ह्याच इतिहासाच्या अवलोकनानें, आपणांस आणखी असेंही खचित कळून येईल कीं, इंग्रजी भाषा विद्यापीठारूढ होण्यापूर्वीं, तिची योग्यता सांप्रतच्या मराठी भाषेहून शंभरपटीनें कमी होती. इतकेंच नव्हें तर, मिल्टन्, शेक्स्पियर, बर्क, मेकॉले, इत्यादि नामांकित ग्रंथकार उदयाचलावर येईपर्यंत, तिचा ग्रंथसमूह देखील हल्लींच्या मराठी भाषेच्या ग्रंथसमूहापेक्षां पुष्कळच कमी होता, यांत तिळमात्रही शंका नाहीं. त्याचप्रमाणें, फ्रेंच, स्पॅनिश, जर्मन्, इतालियन्, वगैरे भाषांची सुद्धां हकीकत आहे. अर्थात्, विद्यापीठांत शिरण्यापूर्वीं, ह्या भाषांचें हाल कुत्रेंही खात नव्हतें. परंतु विद्यापीठाच्या रमणीय मंदि-

रांत त्यांचा शिरकाव होतांक्षणींच, त्यांचें पूर्वरूप आपोआप गाळटत चाललें, व त्या सर्वत्र गर्जूं लागल्या.

आरबी व फारसी भाषांशीं मराठीची तुलना, त्यांतील साम्य, आणि सापत्नभाव.

आतां, आरबी आणि फारसी भाषांचा विद्यापीठांत प्रवेश झाला असल्याचें, वाचकास माहितच आहे. परंतु महाराष्ट्र वाङ्मयाची व त्यांचीं तुलना केली, तर त्यांत कांहींच, निदान म्हणण्यासारखा तरी खचितच विशेष दिसत नाहीं; आणि ही गोष्ट तद्भाषाभिज्ञ सुद्धां कबूल करीत असल्याचें वाटतें. परंतु, अशा प्रकारची खरी वस्तुस्थिति असून देखील, आमच्या मराठी भाषेलाच अर्धचन्द्र देण्यांत येतो, व दुसऱ्यांस केवळ बहुमानाचेंच स्थान मिळतें, ही महदाश्चर्याची गोष्ट होय!

---

१ युरोपखंडांतील वाङ्मयाचा इतिहास हॉल्याम्नें लिहिलेला असून, त्यावरून आमच्या प्रतिपादनाची सत्यता वाचकाच्या लक्षांत सहजीं येणारी आहे.

२ ह्या संबंधानें प्रोफेसर राजाराम कृष्ण भागवत हे असें ह्मणतात कीं, "फिर्दुसी सारखे ग्रंथकार हे केवळ आख्यानकारच होत. ह्यांच्या शहानाम्यासारख्या महाकाव्यांत भाकड अंशाचे थरांचे थर वर लादलेले असून, भूतार्थाचा कण असल्यास क्वचित असतो. फिरिस्त्यासारखे ऐतिहासिक फारसींत होऊन गेले; त्यांचे इतिहास मात्र उपयुक्त ग्रंथ होत. महंमदाचें चरित्र हें प्रायः चमत्कारानेंच भरलेले असल्यामुळें भाकड अंशानें ओतप्रोत भरलेल्या छापील रामदासाच्या बखरींच्या मालिकेंत ओंवावें लागतें. * * * तेव्हां वाङ्मयाच्या गुणवत्तेच्या संबंधानें, आमच्या देशी भाषेची आरबीशीं

(पुढें चालू)

त्यापासून घेण्याचा धडा, व विद्यापीठाची इतिकर्तव्यता.

असो. तात्पर्य म्हणून इतकेंच कीं, पौरस्त्य अगर पाश्चात्य, प्राचीन किंवा अर्वाचीन, सुधारलेल्या अथवा मागासलेल्या, वगैरे हरएक देशांतल्या भाषेस उत्तेजन देण्याची, व ती विद्यापीठांत प्रविष्ठ होण्याची, खचितच मोठी आवश्यकता असते. आणि म्हणूनच, हें उत्तेजन प्रत्येक विद्यापीठानें समजून उमजून, व आपल्या इतिकर्तव्यतेला जागरूक होऊन, अवश्य दिलेंच पाहिजे. कारण, इंग्लंडसारख्या सुधारलेल्या देशांत, आणि मी मी म्हणविणाऱ्या पुढारी राष्ट्रांत, व तेंही अत्युन्नतीच्या म्हणून मानलेल्या एकोणीसाव्या शतकांत, फार तर काय सांगावें, पण टेनिसन् सारख्या राजकवीस देखील, जर विद्यापीठांतील एका पदकानेंच मोठें उत्तेजन आलें, आणि तेंही द्यावें लागलें; तर मग, सांप्रत काळांतल्या, व निव्वळ ओहोटीसच लागलेल्या अशा भरतखंडासारख्या हतभाग्य देशाची कशी स्थिति असावी, आणि त्याला

(मागील पृष्ठावरून पुढें चालू.)

किंवा फारशीशीं सहज तुलना करतां येते. आमच्या शिवछत्रपतीसारख्या कित्येक बखरी तर केवळ अमोल्य होत. "

(मुंबई हेमंतव्याख्यानमाला, वर्ष ७ वें. १८९२).

१ हें पदक (Chancellor's Medal) टेनिसन् कवीला इ० स० १८२९ सालीं मिळालें; व ह्या उत्तेजनामुळेंच त्यानें इ० स० १८३० सालीं आपली दुसरी काव्यमाला प्रसिद्ध केली.
(शॉरुत आंग्लभाषेचा इतिहास. पान ५६५. इ. स. १८९७.)

उत्तेजन देणें किती अगत्याचें आहे, याची कल्पना करण्याचें काम मी आपल्या प्रियवाचकांवर, समंजस विद्वानांवर, आणि विद्यापीठाच्या धुरीणाधिपतीवरच सोंपतों.

११ विद्यापीठाप्रमाणेंच, भाषोन्नतीचा आणखीही एक महत्वाचा उपाय आहे. तो ह्मटला म्हणजे, माझ्या अल्प सममुती-प्रमाणें, देशी भाषेंतूनच लोकशिक्षण चालविणें, हा होय. हा उपाय फारच सोपा असून, फलप्रद आहे. कारण, त्या योगानें देशी भाषांची उन्नति होण्यास उत्तम साधन मिळून, कोणत्याही इच्छित विषयांचें अध्ययन होण्यास, किंवा त्याचें यथार्थ परिशील करण्या-सही, बिलकुल कष्टमयच वाटत नाहीं. इतकेंच नव्हें तर, तत्संबंधीं पाठ घेणारास, व तो देणारास, एकसारखेंच सुगम वाटून, अधीतविषयाचें देखील लवकरच तादात्म्य होतें. परंतु, हेंच शिक्षण परकी भाषेंतून दिल्यानें, फारच नुकसान होतें. कारण, एकंदर अध्ययनाचा मोठा बोजा पडून, तो दुःसह होऊं लागतो. शिक्षणपद्धतीची चित्ता-कर्षता जाऊन, ती नीरस वाटतें. आणि ज्ञानार्जनाचा खरा उत्साह नाहींसा होऊन, त्याऐवजीं औदासीन्य मात्र सहजीं येतें. (मागील पान ४००—४०१ पहा.)

देशीभाषेंतलि लोकशिक्षण, व त्यापासून होणारे हित.

परकी भाषेंतून शिक्षण मिळाल्यानें, हा अशा प्रकारचा[१] अत्यन्त दुष्ट परिणाम ओढवतो, याविषयीं आतां लेशमात्रही शंका नाहीं. सबब, त्याचा

परकी भाषेंतून मिळणाऱ्या शिक्षणापासून होणारें भयंकर नुकसान.

---

१ कारण, हा विघातक परिणाम केवळ अनावर व दुःसह झाल्या-

(पुढें चालू)

प्रतिकार झाल्यानें, आमच्या देशाचें, राष्ट्राचें, व एकंदर देशी भाषांचें देखील सर्व प्रकारें कल्याण होणारें आहे. यासाठीं, ह्या संबंधाचा आमच्या दयाळू आंग्ल प्रभूंनीं वेळींच विचार केल्यास, त्यांचे आमच्यावर महदुपकार होतील.

भाषोन्नतीस राजाश्रयाची अपेक्षा.

१२ अर्थात्, अशा कामीं, राजाश्रय हा सर्व प्रकारें विशेष महत्वाचा असल्यामुळें, त्याचा निःसंशय फारच उपयोग होतो, हें आज नव्यानें सांगण्याची खचितच आवश्यकता नाहीं. कारण, त्याचा अनुभव सर्वांस असून, "**राजा कालस्य कारणम्।**" हें तत्व प्राणिमात्राच्या हृत्पटिकेवर बिंबलेलेंच आहे.

(मागील पृष्ठावरून पुढें चालू.)

मुळेंच, त्याबद्दल **नामदार न्यायमूर्ति** कैलासवासी **महादेव गोविंद रानडे**सारख्या दूरदर्शी विद्वानास देखील वाईट वाटून, ते म्हणाले,

"The *fault* does not lie with the individuals so much, *as with the system under which they are brought up*. Their *education is so exclusively foreign*, that all incentives to study, and to add to, the stock of national literature, is, for the most part, entirely wanting, and year after year this indifference and neglect are becoming more pronounced. This is the mournful conclusion taught by the figures which have beon given above."

(The growth of Marathi Literature. Part. IV. The Times of India. Jnne 1898.)

सदरहू अवतरणांतील इतालिक वर्ण आमचे आहेत. (ग्रंथकर्ता.)

विल्यम् जेता हा इंग्लंडांत परमुलखी राजा असतांही, त्यांनें तद्देशीयांच्या भाषेकडे आणि विद्येकडे पूर्ण लक्ष्य देऊन, तदभिवृध्द्यर्थ स्वतःचें वजनही खर्च केलें होतें. आणि हीच परंपरा त्या व अन्य देशांतही आजपर्यंत चालू आहे. सबब, देशी भाषांचा हा नितान्त महत्वाचा प्रश्न आमच्या राज्यकर्त्यांनीं हातीं घेऊन, त्या उन्नतावस्थेप्रत पोहोंचतील, अशी तजवीज केल्यास, त्यांचे आमच्यावर महदुपकार होतील, यांत संशय नाहीं.

---

१ त्यासंबंधानें सर विल्यम् स्मिथ् म्हणतो,

" The new learning not only entered in the train of the Conqueror, but was fostered by his personal influence. "

(Shaw's History of English literature. P. 21. 1897.)

भाग ९४ वा.

मराठी भाषेचा धार्मिक, नैतिक, सामाजिक, आणि राजकीय परिणाम.

मराठी भाषेचा धार्मिक, नैतिक, सामाजिक, व राजकीय परिणाम.

प्रस्तुत भागांत, महाराष्ट्र वाङ्मयाचा धार्मिक, नैतिक, सामाजिक, व राजकीय परिणाम, आमच्या एकंदर महाराष्ट्रावर कसा झाला; किंबहुना, अखिल भरतखंडावरच त्यानें आपला पगडा शनैः शनैः परंतु भासमान होण्यासारखा, कोणत्या प्रकारें बसविला; याविषयींचें विवेचन यथावकाश करण्याचें आम्हीं योजिलें आहे.

आतां, ह्यासंबंधाचा विचार करतांना, आपल्याला कित्येक गोष्टींवर प्रथमतःच लक्ष्य पुरविलें पाहिजे. कारण, त्या अन्योन्य भावानेंच सदैव असतात; आणि त्यामुळेंच त्या एकमेकींवर प्राधान्येंकरून अवलंबून राहतात. सबब, त्या सर्वांचा कार्यकारणभावानें येथेंच ऊहापोह होणें, निःसंशय अगत्याचें आहे.

देशोन्नतीचा मूल पाया धर्म व त्यापासून अन्य गुणांची प्रसूती.

योग्य विचारानें, एक गोष्ट आपल्या लक्ष्यांत सकृत्-दर्शनींच येते. ती मुख्यत्वेंकरून ही कीं, १ मानवी प्राण्याच्या उन्नतीला धर्माच्या मजबूत पायाची

खचितच मोठी आवश्यकता असते. तसेंच २ ह्या धर्माचा पाया भक्कम असला ह्मणजे, त्यापासूनच नीतिनिर्झर प्रसवतो. ३ ह्याच्यामुळेंच सदसद्विचाराला अवकाश मिळतो. ४ त्याकारणानेंच सहिष्णुता वृद्धिंप्रत पावते. ५ हिच्या योगानेंच ऐक्यतेचा बीजांकूर फुटतो. ६ ह्या बीजांकुरांमुळेंच स्वातंत्र्यस्पृहा उद्भवते. ७ ह्या स्पृहेमुळेंच राजकीय चळवळ आपल्या घरीं चालून येते. ८ ती आल्यानेंच स्वदेशाचें हित व राष्ट्राचें कल्याण करण्यास, आपल्याला उत्कृष्ट संधि सांपडते. ९ ही संधि सांपडल्यानेंच आपली इतिकर्तव्यता बजाविण्याविषयीं खरोखरीचा उत्साह उत्पन्न होतो. आणि १० ह्या उत्साहश्रीमुळेंच राष्ट्रोन्नतीला व देशवैभवास चढती कळा लागते.

तेव्हां, अशाप्रकारची खरी वस्तुस्थिति असल्यामुळें, या सर्वांचा क्रमाक्रमानें, परंतु शनैः शनैः, ह्या भरतभूमींत इ. स० च्या अकराव्या शतकानंतर, पुनश्च¹ कसा विकास होत गेला, याविषयींचें साद्यन्त निरूपण इतिहासदृष्ट्या फारच महत्वाचें होय, अशी आमची अल्प समजूत आहे. सबब, तिकडेच क्षणभर वळून, ह्या संबंधाचा थोडासा इतिवृत्तान्त देतों.

---

१ पुनश्च म्हणण्याचें एवढेंच कारण कीं, यावनी राज्य भरतखंडांत होण्यापूर्वी, सदरहू सर्व गोष्टींचें भरतखंड हें केवळ माहेरघरच होतें. परंतु, मुसलमानांच्या कारकीर्दींत तो सर्व प्रकार एकदमच बदलत गेल्यानें, आम्हांला त्यांची प्रसंगानुसार पुनश्च प्रतिष्ठापना करावी लागली.

धर्म, आचार, आणि अध्यात्मज्ञान, यांचें परिशीलन

धर्म व अध्यात्मज्ञान, यांचें ऋग्वेदांत केलेलें परिशीलन.

आमच्या पुराणतम **वेदऋषींनीं** जगाच्या इतिहासांत प्रथमतःच केलेलें असल्याचें दिसतें. त्याकारणानें, त्याचें **बाळकडू** आम्हां **भारतीयांस** केवळ **अनादि** कालापासूनच पाजल्याचें भासमान होऊन, तें जणूंकाय आमच्या पिंडांत स्वयमेव खिळल्यासारखें वाटतें, यांत लेशमात्र देखील शंका नाहीं.

वेद हे आर्यधर्माचे केवळ भाजनच होत, अशाविषयीं

मनुस्मृतींत तत्संबंधी उद्गार.

स्मृतिकार तर वारंवार टाहोच फोडतात; व ही गोष्ट **स्मृत्यव**लोकनानें देखील कोणाच्याही ध्यानांत तत्काल येण्यासारखी आहे. कारण, **मनूनेंच** एके ठिकाणीं असें लिहिलें आहे कीं,

वेदोऽखिलो धर्ममूलं स्मृतिशीले च तद्विदाम्
आचारश्चैव साधूनामात्मनस्तुष्टिरेव च ॥ ६ ॥
(म. स्मृ. अ० २)

पण, स्मृतीपेक्षां ही पुराणतर अशा ज्या श्रुती त्यांत, व प्रत्यक्ष ऋग्वेदांत सुद्धां, धर्माचें महत्व, त्याचें खरें रहस्य, आणि त्याचें उद्गमस्थान, याबद्दलचें योग्य निरूपण केलेलें आढळतें.

यज्ञेन यज्ञमजन्त देवास्तानि धर्माणि प्रथमान्यासन् ।
(ऋग्वेद. अ. २ अ. ३. व २३. मं. १. अ. २२. सू. १६४.)

फार तर काय सांगावें, पण अध्यात्म विषयासारखें जें

गहन तत्त्व, त्याची देखील त्यांनीं मनःपूर्वक चर्चा चालविल्याचें, केवळ ऋग्वेदावरूनच दृग्गोचर होतें. कारण, त्यांत

मनः कुतो अधिप्रजातम् ॥ १८ ॥
(अ. २. अ. ३ व १७. मं. १. अ. २२. सू. १६४).

कोददर्श प्रथमं जायमानमस्थन्वतं ॥ ४ ॥
(अ. २. अ. ३. व १४. मं. १. अ. २२. सू. १६४).

पाकः पृच्छामि मनसा......... ।
(अ. २. अ. ३ व १४. मं. १. अ. २२. सू. १६४).

इत्यादि महत्वाचे प्रश्न विचारले आहेत. इतकेंच नव्हें तर, अध्यात्म ज्ञानाचा कळस ह्मणून मानलेलीं जीं उपनिषदें तीं देखील ह्यापासूनच उद्भवलीं असल्याचें उघड दिसतें.

धर्माची व अध्यात्म विषयांची महाराष्ट्र भाषेंत दिसून येत असलेली परंपरा.

एवंच, राष्ट्रोन्नतीचें आदिकारण केवळ धर्मच असल्यामुळें, त्याचें पारंपर्य आणि सातत्य अबाधित राखण्यासाठीं, आमच्या पुराण पूर्वजांनीं विशेष खबरदारी घेतली असून, हाच संस्कार पुढील संततीवर वज्रलेप व्हावा या हेतूनें, व संस्कृत भाषेचा गंधही नाहीं अशा प्राकृत जनांस देखील, त्यांतील सौरभ्य प्राप्त व्हावें ह्मणून, आमच्या महाराष्ट्र भाषेचा आदिकवि जो मुकुन्दराज, त्यानेंच ह्या गीर्वाण भाषेवर महाराष्ट्रालंकार चढवून, हें अपूर्व मिष्टान्न स्वदेशीयांपुढें मोठ्या आस्थेनें आणि उत्साहानें ठेविलें. सबब, ह्या महत्कार्याबद्दल, आपण त्या सत्पुरुषाचे फारच उपकार मानिले पाहिजेत.

देशहितार्थ साधूंचे प्रयत्न.

ज्यांनीं हा संसार निःशेष सोडल्याकारणानें, जे केवळ विरक्तच झाले आहेत; व ज्यांचा सर्वत्र अद्वैतभावच असतो; ते देखील आपल्या देशाविषयीं, आपल्या राष्ट्राविषयीं, आपल्या भाषेविषयीं, आणि तत्संबंधीं हिताविषयीं, अशाप्रकारची काळजी अहर्निशींच बाळगितात. तर, मग, ज्यांचा व्यापार भवसागरांतच सदैव चालतो; व जे कोणी देशहिताची निव्वळ वाचालता मात्र करतात; किंबहुना शब्दपांडित्यापलीकडे ज्यांची धांव केव्हां देखील जात नाहीं; त्यांनीं ह्या साधुश्रेष्ठांच्या अतुल कृतीपासून कोणता उपदेश घेतला पाहिजे; अथवा, ह्यासंबंधानें त्यांनीं कोणता धडा, कसा गिरविणें अत्यवश्य आहे; याबद्दलचें विचार करण्याचें काम मी आपल्या प्रिय वाचकाकडेसच सोंपतों.

त्याचें प्रमाण.

असो. उपनिषदांतील सारामृत मोठ्या प्रेमानें काढून, तें केवळ राष्ट्रोन्नत्यर्थ आणि देशहितार्थच स्वबांधवापुढें ठेविलें असल्याविषयीं, मुकुंदराजाच्या उदारग्रंथावरूनच पूर्णपणें निदर्शनास येतें, यांत बिलकुल शंका नाहीं. कारण, त्यानें एके ठिकाणीं असें लिहिलें आहे कीं,

उपनिषदांचें निर्मित । काढूनि केला हा ग्रंथ ॥
तेचि करीत शिष्यजात । सिद्ध भोक्के ॥ १३४ ॥

(विवेकसिंधु उ. प्र. ११ वें.)

परंतु, हें अपूर्व उपनिषद्‌मिष्टान्न महाराष्ट्र भाषेंतच आणून, तें केवळ यच्चावत् प्राकृतजनांस[illegible]रल्याबद्दल, त्या सत्पुरुषाचे आपल्याला केव्हांही उत्तराई होतां येणार नाहीं.

ये ग्रंथींचें हेचि आश्चर्य । जें रोकडे स्वानुभव सौन्दर्य ।
म्हणूनि ऐकती मुनिवर्य । विवेकसिंधु ॥ १३१ ॥
जयासी नाहीं प्रतीति । नेणती तर्क मुद्रेची स्थिति ।
तयालागीं मराठिया उक्ती । केली ग्रंथरचना ॥ १३२ ॥

(विवेकसिंधु. उत्तरार्ध. प्रकरण ११ वें.)

मुकुन्दराजाच्या कृती-चाभावी परिणाम.

तात्पर्य, इ० स० च्या दहाव्या किंवा अकराव्या शतकांत, आर्य धर्माचें खरें इंगित महाराष्ट्रीयांस त्यांच्याच भाषेंत सुगम व्हावें म्हणून, मुकुन्दरायानें मराठी भाषेला हातांशीं धरिलें, आणि तिला निमित्तमात्र करून, प्रच्छिन्न धर्माचीं सुदीप्तिमान किरणें सर्वत्र पसरतील, अशी एकदम योजना केली. जणूंकाय, ह्या किरणोद्भूत अग्नीनें, यवनतक्षकांस कालान्तरानें दहन करण्यासाठींच, मुकुन्दरायानें हें अध्यात्मज्ञानाचें होमकुंड रचलें. अथवा, पापाचरणाचा पूर्ण घडा भरल्यावर, ह्या अविवेकी अविंधांस जलसमाधि देण्यासाठींच, मुकन्दराजानें हा विवेकसिंधु महाराष्ट्र क्षितिजावर आणिला. किंवा, भरतखंडांत होणारें यवनांचें आगमन, फारच दुःखद व नितान्त कष्टमय होऊन, यावनी समशेरशाहीच्या तीव्र ज्वाला अखिल भरतभूमीवर पसरल्यावर, त्या शमविण्यास आणि त्यांचा प्रतिबंध करण्यास, ह्या महाराष्ट्राशिवाय अन्य कोणताही देश समर्थ होणार नाहीं, असें दिव्यदृष्टीनें पाहून, मुकुन्दराजानें त्याच्या साम्राज्य-

१ (१) विवेकसिंधु, (२) मूलस्तंभ, आणि (३) परमामृत, हे मुकुन्दरायाचे अध्यात्मविषयक तीन ग्रंथ होत.

रूपी भगव्या झेंड्याचा हा मूलस्तंभात्मक[1] उदंड दंडच रोंविला. अगर, दीन् दीन् शब्दाच्या अपवित्रतेनें आर्य-हिंदूंचें धर्मबंधन कोणत्याही प्रकारें कोमेजून जाऊन शुष्क व निःसत्व होऊं नये एतदर्थ, तत्सिंचनार्थच त्यानें जणूं-काय परमामृत रचलें. अर्थात्, त्यामुळेंच ह्यांचा इष्ट कार्यभाग आमच्यावर घडून आला, यांत लेशमात्रही शंका नाहीं. (मागील पान १७८–१८२ पहा.)

भाषावृक्षाची वाढ, त्याजवर संतांनीं केलेलें सिंचन, व त्याचा आमच्यावर झालेला संस्कार.

अशा प्रकारें, महाराष्ट्र वाङ्मयांत, धार्मिक व अध्यात्मिक विषयानें प्रारंभींच प्रवेश केलेला असल्यामुळें, हा अपूर्व भाषावृक्ष कालान्तरानें वाढीस लागला; आणि त्याजवर, ज्ञानदेव, मुक्ताबाई, नामदेव, जनाबाई, एकनाथ, तुकाराम, इत्यादि संतमंडळींनीं आपल्या ज्ञानामृताचें यथेष्ट सिंचन केल्यामुळें, त्याला आपोआपच उदात्त नीतीचीं रसाळ व गोमटीं फळें येऊं लागलीं. एवढेंच नव्हे तर, ह्या महात्म्यांच्या निःसीम तितिक्षेनें, आमच्या अखिल महाराष्ट्रीयांत देखील सदसद्विचार जागृत होऊन, त्यांजला इतकी धर्मसहिष्णुता प्राप्त झाली कीं, मुसलमानांनीं आमचा अत्यन्त छल केला असतां, आणि आमची निव्वळ प्राणान्तिक अवस्था होऊन, आमच्या वेदना दुःसह होईपर्यंत देखील, आमच्यावर ओढवलेल्या संकटाचा प्रतिकार करण्यास, आम्ही बिलकुल प्रवृत्तच झालों नव्हतों.

---

१ मागील पान ४३४ वरील टीप पहा.

त्याचा परिणाम.

तथापि, महाराष्ट्रावर ओढवलेलें हें निःसीम दुःख जेव्हां असह्य झालें, आणि आमच्या सहिष्णुतेची अगदीं कमाल होऊन गेली, तेव्हां मात्र या कष्टमय यमयातनांचा प्रतिकार झालाच पाहिजे, असें एकंदर राष्ट्राच्या मनांत तत्काल येऊन, ह्या इच्छाशक्तीचा एक प्रचंड ओघ बनला, व त्याला विलक्षण तीव्रता प्राप्त झाली. अशा वेळीं, श्री समर्थासारखा सद्गुरु उदयाचलीं चमकूं लागला, आणि श्रीछत्रपति शिवाजीसारखा रणधीर व रणशूर नेता महाराष्ट्रांत निपजला. त्यायोगानें, दुधांत साखर पडल्यासारखें होऊन, आमच्या महाराष्ट्राला एक प्रकारचें वळणच मिळालें. एवढेंच नव्हें तर, त्याचकारणानें सर्वांचा एकदिल होऊन, आमचा देश, आमचें राष्ट्र, त्याच्या दुःसह यातना, त्यांचा प्रतिकार, आणि म्लेच्छांचें निर्मूलन, याखेरीज अन्य गोष्टच कोणाच्याही मनांत येईनाशीं झाली.

रामदासाचा उपदेश, व त्याचें फल.

अशाप्रकारें, राष्ट्राच्या मनाचा ओघ, ह्या दिशेनेंच सोद्वेग वाहूं लागला असतां, व यावनी कृतींनीं तें क्षुब्ध होऊन, फक्त इशारतीचीच वाट पहात असतां, श्रीरामदासांनीं आपला दासबोधासारखा अमूल्य ग्रंथ महाराष्ट्रीयांपुढें ठेविला, आणि त्यांतील अमृतपान त्यांस करावयास लावलें. शिवाय, त्यांनीं आम्हांस देखील नानाप्रकारें उपदेश केला, व " अखंड सावधान असावें; दोघे भांडती तिसऱ्यासी जाये; धीर धरून महत्कार्य, समजूनि करावें;

सकल लोक एक करावें; गलीम निवटून काढावें; जीवित्व तृणवत् मानावें; हिमतीची तरवार करावी; येणें कीर्ति धावे दिगंतरीं; बहुत लोक मिळवावें; एक विचारें भरावें; कष्ट करोनि घसरावें, म्लेच्छावरी; सकल सुखाचा करावा त्याग; त्याहूनि करावें विशेष, तरीच म्हणवावे पुरुष;" इत्यादि हरतऱ्हेच्या गोष्टी आमच्या मनावर पूर्णपणें बिंबवून दिल्या. त्यामुळें, महाराष्ट्रांत सर्वत्र ऐक्य झालें; व त्या योगानेंच आमच्यांत एकदम स्वातंत्र्यस्पृहा उद्भवून, राजकीय चळवळ सुरू होण्यास प्रारंभ झाला; आणि आमच्या देशाचें व राष्ट्राचें हरएक प्रकारें कल्याण करण्याकडेसच आमचे पूर्ण लक्ष्य लागलें.

शिवाजी वगैरेनीं मराठी भाषेवर केलेले उपकार व त्याचा परिणाम.

ही संधि सांपडल्यावर, त्यावेळीं अत्यन्त धामधूम असतांही, ती शिवाजी महाराजांनीं बिलकुल फुकटच जाऊं दिली नाहीं; व आपली खरी इतिकर्तव्यता बजाविण्यांत, आणि महाराष्ट्र वाङ्मयाची उन्नत्ति करण्यातच तिचा सुविनियोग केला; ही खचितच मोठ्या आनंदाची गोष्ट होय. त्याचप्रमाणें, श्रीशिवाजी नंतर, महाराष्ट्रांतील राज्यशकटाचीं सूत्रें ज्यांच्या ज्यांच्या म्हणून हातांत गेलीं, त्यांनीं त्यांनीं सुद्धां, मराठी वाङ्मयाच्या संबंधानें, सवड सांपडल्या वेळीं योग्य उत्साह प्रकट करून, आपल्या देशाला व भाषेला चांगलें वैभव आणिलें; अटकपासून तों कन्याकुमारिका भूशिरापर्यंतच्या आमच्या विस्तीर्ण ताबे-प्रांतांत, सकल आज्ञापत्रांची केवळ मराठी हीच

राजकीय आणि दरबारची भाषा बनवून, तिचें त्यांनीं यथाशक्ति लालनपालन केलें; अवश्य त्याप्रसंगीं सामाजिक सुधारणा करून, महाराष्ट्रीयांस उन्नतावस्थेप्रत पोहोंचविलें; आणि आपलें गतवैभव पुनश्च स्थानापन्न करून, महाराष्ट्राचा पूर्ण दरारा इतर सर्व राष्ट्रांवर बसविला.

वास्तविक विचार केला तर, एकट्या **श्री समर्थांच्या** अपूर्व ग्रंथरचनेनें देखील आम्हां महाराष्ट्रीयांच्या हृत्पटिकेवर धार्मिक, नैतिक, सामाजिक, व राजकीय परिणाम अगदीं अचुक आणि विलक्षण रीतीनें घडून आल्याचें स्पष्टपणें व्यक्त होतें. मग, अनेक सुकवी, सुविख्यात राज्यकर्ते, नामांकित मुत्सद्दी, धार्मिक स्त्रीवर्ग, आणि प्रसिद्ध बखरीकार, यांचीच एकसारखी परंपरा लागल्यावर, त्या सर्वांचा वाङ्मयात्मक अपूर्व संस्कार, आमच्यावर संवशः झालाच पाहिजे, हें आणखी विशेष रीतीनें सांगावयासच नको.

श्रीछत्रपती शिवाजी महाराज हे आपल्या राजकीय

---

१ यवन राजे तर आमच्यापुढें गोगलगाईच झाल्या होत्या. परंतु, मी मी म्हणविणारे फिरंगी, आंग्ल, फ्रेंच, इत्यादि पाश्चात्य राष्ट्रें देखील आम्हांस चळचळा कांपत, व थरथरां भीत. ह्या संबंधानें मेकॉले म्हणतो,

"Even the European factors trembled for their magazines and the name of the Maratha Ditch still preserves the memory of the danger." (Lord Clive).

दिल्लीचा पातशहा देखील आम्हांस खंडणी देत असल्याविषयीं, आम्हीं पूर्वीच सांगितलेलें असल्यामुळें, तें वाचकाच्या ध्यानांत खचित असेल. (मागील पान १८१–१८२ व त्यांजवरील टीप पहा.)

रायकीय, कार्यव्यग्रतेंत सदैव नि असतां ही, महाराष्ट्र भाषे से.ा करण्याकडे त्यांचें लक्ष्य गेलें; व त्यांनीं रघुनाथरा पंडिताकडून राजव्यवहार कोश तयार करवून, आपलें उद्योगसातत्य, आपला देशाभिमान, आणि आपली मराराष्ट्र-भाषाभिरुचि, हीं उत्तम रीतीनें व्यक्त केली. राजाराम महाराजांनीं श्री शिवाजी छत्रपतीचें चरित्र, कृष्णाजी अनन सभासद यांजकडून लिहवून, आपली पितृभक्ति, राष्ट्रकार्य देशहित, व खरी इतिकर्तव्यता दाखविली; आणि त्यायो- गानें श्री शिवाजीचे पराक्रम, त्याचा देशाभिमान त्याचा स्वार्थत्याग, त्याची एकनिष्ठा, इत्यादींचा कित्त उचलण्यासाठीं, त्यांनीं ते लोकांच्या दृष्टीपुढें सदैव ठेविलें अर्थात्, त्यामुळें, महाराष्ट्र हृत्पटिकेवर त्याचें सुरेख प्रति- बिंब पडून, आमचा इष्ट हेतु सिद्धीस गेला, यांत संशय नाहीं. पुढें, कोल्हापुरच्या संभाजी महाराजांनीं आपल्या प्रधानाकडून, जें आज्ञापत्र लिहविलें, त्यांवरून तर एकंदर राजकारणाचें धोरणच आपल्या ध्यानांत येतें, व त्याचा अचुक परिणाम आपल्या मनावर झाल्यावांचून खचितच राहत नाहीं.

आमच्या बखरीकारांचा देखील आमच्यावर अशाच प्रकारचा उदात्त संस्कार घडून आला, ही गोष्ट कबूल करणें भाग पडतें. इतिहासदृष्टया मल्हारराव चिटणीस यांचे लेख व बखरी तर निःसंशय विशेष महत्वाच्या आहेत.

१ कारण ह्याचें प्रत्यक्ष प्रमाण देशव्यांच्या कारकीर्दीतलि महाराष्ट्र दिग्विजयावरूनच सहजीं दिसून येतें.

२ ह्याचीं एकंदर नऊ प्रकरणें असून, त्यांत राजकारस्थानाचें खरें इंगित दिसून येतें.

चप्रमाणें, कृष्णाजीपंत सोहनी यांनीं स्वमुखानें सांगितलेली शवाईतल्या साम्राज्यसंपादनाची हकीकत देखील निःसंशय तान्त मोहक, आणि फारच हृदयंगम आहे. शिवाय, आमच्या ऐतिहासिक पोंवाड्यांनीं तर महाराष्ट्रावर विलक्षण परिणाम केला, ही गोष्ट कोणालाही तेव्हांच कबूल केली पाहिजे. कारण, त्यांतील उदात्त श्रीनें आमचे बाहू स्फुरण पावले. दन्तर्गत विजयघोषानें आमचें साम्राज्य वाढत गेलें. आणि यांतील विवेकतत्वांनीं आमच्या नीतिधैर्यास भरती आली.

धार्मिक, नैतिक, व सामाजिक.

ह्याच वेळीं, आमच्या महाराष्ट्रांतील संतमंडळ व कविगण, यांस देखील कांहीं कालपर्यंत जणूं काय पूरच आला होता. त्यामुळें, काव्याची अगदीं रेलचेल होऊन, त्यांत धर्म, नीति, आणि सामाजिक उदात्त विचार, यांचें भरपूर सिंचन झाल्या कारणानें, एकंदर राष्ट्रांतील श्रेष्ठ गुण केवळ उदयाचळींच आले होते, असें म्हणावें लागतें.

एवंच, आमच्या संतमंडळानें व कविगणानें, अखिल महाराष्ट्रास ज्याप्रमाणें कविमय आणि धर्ममय करून सोडिलें, त्याचप्रमाणें श्रीरामदास व शिवाजी या अद्वितीय गुरुशिष्यांनीं महाराष्ट्रीयांस राजकारणांत निष्णात करून, त्यांच्या अंगीं साहस व शौर्य, कार्यनैपुण्य आणि एकनिष्ठा, स्वार्थत्याग व देशपरायणता, नीति आणि धैर्य, हे अलौकिक गुण आणण्याचा प्रयत्न चालविला. इतकेंच नव्हें तर, तत्प्रीत्यर्थ, स्वतःच्या आचरणानें त्यांनीं उत्कृष्ट कित्ता घालून देऊन, त्याचें त्यांस अनुकरणीय वळणही लाविलें.

…णें, हा अपूर्व महाराष्ट्रोदय इ. स. १८०० शत-

महाराष्ट्र वैभवाची पीछेहाट व तिचा राष्ट्रावर झालेला परिणाम.

कापर्यंत चालून, तदनन्तर महाराष्ट्र वैभवाची भरती संपली, व ओहोटीस आपोआपच सुरुवात लागली. ह्याच सालीं, राजकार्यधुरंधर नानाफडणीस वारले, आणि परकीय राष्ट्रांचीं कृष्णकारस्थानें बळावलीं. राज्यसूत्रें चालविणारा नाहींसा झाला, व आमचें नष्टचर्य ओढवलें. आमच्या प्रचंड आणि विस्तीर्ण साम्राज्याची पीछेहाट होत चालली, व आमचें एक एक पाऊल मागेंच येत गेलें. स्वार्थत्याग नाहींसा झाला, आणि आपलपोटेपणा उदभवला. नीतिभ्रष्टता मातली, व दुराचरण फैलावलें. एकीचें निर्मूलन झालें, आणि भेदाला यथेष्ट अवकाश मिळाला. धैर्य व साहस मावळलें, आणि त्यांच्या ऐवजीं भरित्व मात्र प्राप्त झालें. वीरकंकण गेलें, व स्त्रीकंकण हातीं आलें. आमचा उत्साह गेला, आणि परस्परांवरील विश्वास नाहींसा झाला. असें होतां होतां, महाराष्ट्र साम्राज्य संपुष्टांत आलें. हिंदुसिंहाची गर्जना मावळली. आणि चोहोंकडे एकदमच सामसूम झालें. अर्थात्, ही गर्जना मावळतांच, आम्ही स्वातंत्र्यास आंचवलों, व दुसऱ्यांचें अंकित झालों. जेथें आम्ही फुलें वेंचलीं, तेथें गोंवऱ्या गोळा करण्याचें आमच्या कपाळीं आलें. जेथें आम्ही दुसऱ्यावर हुकमत चालविले, तेथेंच केवळ त्यांचे दास होऊन बसावें लागलें. ज्या ठिकाणीं आम्ही अनेक मांडलीक प्रभूंवर आज्ञापत्रें सोडिलीं, तेथें त्यांचेंच बोलणें ऐकून घेणें प्राप्त आलें. आणि जेथें पातशाहावर देखील आम्हीं आपली हुकमत चालविली, तेथेंच व्यापारी वर्ग व कंपनी बहादर यांच्या अटी कबल कराव्या लागल्या.

आतां, ह्या शोचनीय स्थितीचा परिणाम आमच्या महाराष्ट्र-वाङ्मयावर देखील तत्काल झाला. कारण, त्यायोगानें कवींचें दुर्भिक्ष्य होऊन, काव्योत्पादनाला व ग्रंथ-रचनेला कांहीं कालपर्यंत बरेंच ग्रहण लागलें. इतकेंच नव्हें तर, हिंदु साम्राज्य नष्ट झाल्यानन्तर, सुमारें अर्ध शतकपर्यंत, ह्या अमूल्य मराठी ग्रंथसमूहाकडे, जणूंकाय अत्यन्त दुःखानें कष्टी झाल्यामुळेंच, कोणी ढुंकून देखील पाहिलें नाहीं. त्याकारणानें, कीटकांनीं त्यांजवर यथेच्छ ताव मारला. कित्येकांस कसरीनें खाल्लें. कांहींस वाळवी लागली. कांहींची मृत्तिका झाली. कित्येकांच्या पुड्या बांधल्या. आणि राहिल्यासाहिल्यांस वाण्यांच्या दुकानीं लोटण्यांत आलें.

त्यामुळें, महाराष्ट्र वाङ्मयावर झालेला अपकार.

तथापि, कालान्तरानें, माहाराष्ट्र वाङ्मयाचें दैव अंशतः तरी उघडण्याची वेळ आली; व त्याच्याकडे खुद्द आंग्ल सरकारचें आणि अनेक विद्वानांचेंही लक्ष्य गेलें. त्यामुळें, त्याची दिवसानुदिवस बरीच अभिवृद्धि होऊन, अलिकडे तर त्याच्यांत धार्मिक, नैतिक, सामाजिक, राजकीय, ऐतिहासिक, इत्यादि अनेक प्रकारच्या महामूल्य ग्रंथांचा भरणा झपाट्यानें होत चालला आहे, ही खरो-खरच मोठ्या आनन्दाची गोष्ट होय; व याबद्दल आम्ही आमच्या आंग्ल प्रभूंचें बहुत उपकार मानले पाहिजेत.

व त्याचा कालान्तरानें झालेला प्रतिकार.